म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
सं. क्र. ३४२६

# ग्रंथविशेष

ग्रंथविशेष
ग्रंथविशेष
ग्रंथविशेष
ग्रंथविशेष
ग्रंथविशेष
ग्रंथविशेष
ग्रंथविशेष
ग्रंथविशेष

शंकर सारडा

REFBK-0026376



ललित निबंध

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

20 JUL 1991
14 SEP 1991
26 OCT 1991
18 JAN 1992
1 FEB 1992
18 MAR 1992
22 APR 1992
26 SEP 1992
17 OCT 1992
26 DEC 1992
11 SEP 1993

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९

# ग्रंथविशेष

शंकर सारडा

REFBK-0026376

मेहता पब्लिशिंग हाऊस

पुणे ३०

प्रकाशक :
अनिल मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०

टाईपसेटिंग :
प्रमोद प्रिंटर्स
(प्रमोद वि. बापट)
११२०, सदाशिव पेठ
निंबाळकर तालीम चौक, पुणे ३०

© शंकर सारडा
प्राकृती प्रिंटर्स,
८५७, शनिवार पेठ, सातारा ४१५००२

प्रथमावृत्ती :
जानेवारी १९९१

किंमत ८० रुपये

ISBN 81-7161-116-8

ज्यांच्यामुळे हे लेखन घडले ते

'साप्ताहिक सकाळ'चे पहिले संपादक

**द्वारकानाथ लेले**

आणि

'साप्ताहिक सकाळ'चे विद्यमान संपादक

**सदा डुम्बरे**

यांना

सप्रेम समर्पण

# अनुक्रमणिका

**कादंबऱ्या**


१. पानिपत : विश्वास पाटील
२. झेलझपाट : डॉ. मधुकर वाकोडे
३. वृत्तान्त : श्री. ज. जोशी
४. मेड इन इंडिया : पुरुषोत्तम बोरकर
५. एकलव्य : शरद दळवी
६. हर्षखेद ते मावळले : ना. वा. फडके
७. अराजक : बा. ह. कल्याणकर
८. भंडारभोग : राजन गवस


**चरित्रे-आत्मकथने**


९. चिं. त्र्यं. खानोलकर : दीपक घारे
१०. माणसे : अरभाट आणि चिल्लर : जी. ए. कुलकर्णी
११. जी. ए. : एक पोर्ट्रेट : सुभाष अवचट
१२. हरवलेले दिवस : प्रभाकर ऊर्ध्वरेषे
१३. ककची क : व. पु. काळे
१४. नाच ग घुमा : माधवी देसाई
१५. लाव्हा : लता कामत
१६. अक्षरगंधर्व : प्र. श्री. नेरूरकर
१७. एक मार्ग, अनेक वाटा : बॅ. अप्पा पंत
१८. स्वाध्याय : सरोजिनी बाबर
१९. मागे वळून : डॉ. मथूताई आठल्ये

२०. वालांग : कर्नल श्याम चव्हाण १२३

**काव्य**

२१. मगध आणि नंतरच्या कविता : श्रीकांत वर्मा १३०
२२. राजघाट : अरुण शेवते १३७
२३. यक्षरात्र : अरुणा ढेरे १४३
२४. लय : सुधीर मोघे १४८
२५. मेघहृदय : वसंत बापट १५४
२६. मराठी भंडी कवितेचा गोपाळकाला : शं. ना. जोशी १६१
२७. मॉस्कोतील कविता : बापूराव जगताप १६७
२८. वाटेवरले गाणे : कविता जपे १७२

**ललित / इतर**

२९. आनंदयात्रा : ग. वा. बेहेरे १७५
३०. आरसपानी : सदा डुम्बरे १८२
३१. विसाजीपंताची वीस कलमी बखर : वसंत बापट १८६
३२. संसदेची सप्तपदी : मो. ग. तपस्वी १९१
३३. अजिंक्यतारा ते आल्प्स : अरुण गोडबोले १९८
३४. मधाळलेल्या संध्याकाळी : बॅ. सुनीती पुंगलिया २०३
३५. मराठी सारस्वत : सं. अनंत जोशी २०८
३६. महाराष्ट्र १९८८ : संतोष दास्ताने / राजेंद्र व्होरा २१३
३७. स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत : ग. प्र. प्रधान २१८

**इतर**

३८. लक्षवेधक पुस्तके : १९८८ २२४
३९. १९८८ : साहित्यक्षेत्रातील नवलविशेष २४०
४०. निवडक पुस्तकांची सूची २४७

३७२६९
५४८
२२।९।९९

# प्रास्ताविक

मराठी चोखंदळ वाचकांना त्या त्या वर्षातील महत्त्वाच्या पुस्तकांची माहिती व्हावी; त्यांपैकी काही पुस्तकांची स्थूल रूपरेखा कळावी; या दृष्टीने संदर्भ ग्रंथ तयार होण्याची गरज आहे. ललित मासिक, महाराष्ट्र साहित्य पत्रिका वगैरेंनी समालोचन अंक काढले आहेत आणि ही गरज अंशतः भागवली आहे. बरीच वर्षे माझ्या मनात असलेली, पुस्तकरूपाने दरवर्षी निवडक नव्या पुस्तकांवरील अभिप्राय / समीक्षणे प्रसिद्ध करण्याची कल्पना या पुस्तकाद्वारे प्रत्यक्षात येत आहे. १९८८ पासून पुढे दरवर्षी अशी पुस्तके प्रकाशित करण्याची तयारी मेहता पब्लिशिंग हाऊसचे उत्साही संचालक अनिलभाई मेहता यांनी दाखवली आहे, आणि हे काम सातत्याने होत राहावे अशी यंत्रणाही उभी करायची माझी मनीषा आहे. 'ग्रंथविशेष' हे १९८८ मधील पुस्तकांवर लक्ष केंद्रित करणारे पुस्तक. 'ग्रंथगौरव'मध्ये १९८९ मधील पुस्तकांचा परामर्श असेल. १९८८, १९८९ व १९९० मधील पुस्तक परिचयात्मक लेखन माझ्या हातून बरेच झाले तथापि पुढे ते तसे राहीलच असे नाही. म्हणून वेगवेगळ्या समीक्षकांनी लिहिलेल्या निवडक अभिप्राय / समीक्षणांचे संपादन १९९१ पासून या पद्धतीने करून ती पुस्तके प्रसिद्ध करावी अशी कल्पना आहे.

हा प्रयत्न अधिकाधिक वाचकाभिमुख राहावा आणि पुस्तकांशी संबंधित

असणाऱ्या सर्व घटकांना (ग्रंथविक्रेते, वाचनालये, शिक्षक-अध्यापक) उपयुक्त ठरावा अशा दृष्टीने सूचना आल्यास त्यांचा सादर विचार केला जाईल.

'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मराठी पुस्तकांचे परिचय देणारे जे सदर होते, त्यात १९६२ ते १९६४ पर्यंत अनेक पुस्तकांवर मी लिहिले. त्यांपैकी काही पुस्तकांचे परिचय 'काही पुस्तके काही लेखक' या पुस्तकात पुढे एकत्रित करण्यात आले. पॉप्युलर प्रकाशनने ते पुस्तक प्रसिद्ध केले. (१९६५) १९६९ पर्यंत 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मी होतो. त्यानंतर मात्र दीर्घकाळ माझ्या हातून फारसे लेखन झालेच नाही.

'दैनिक ऐक्य'चा संपादक म्हणून काम करीत असताना १९७७ ते ८२ या काळात दररोजचे अग्रलेख लिहिणे हे एक मोठेच काम ठरले. बड्या वृत्तपत्रांप्रमाणे सहसंपादकांवर ती जबाबदारी टाकण्यासारखी परिस्थिती नव्हती. कारण सहसंपादकच तेथे नव्हता. शिवाय सातारा जिल्ह्यापुरताच या दैनिकाचा व्याप असल्याने ते लेखन पुण्यामुंबईत कोणाच्या लक्षात येत नसे. डहाणूकर पारितोषिकाचा मान माझ्या एका अग्रलेखाला मिळाला. हीच काय ती जमेची बाजू.

'महाराष्ट्र टाइम्स'शी माझे स्वतःचे जे आयडेंटिफिकेशन झालेले होते, त्यामुळे इतरत्र कुठे लिहिण्यास उत्साह नसे. 'ऐक्य'मुळे ती कोंडी थोडीफार फुटली, परंतु वृत्तपत्रीय लेखन सोडल्यास इतर लेखनाला गती आली नाही.

१९८७ च्या शेवटी शेवटी 'साप्ताहिक सकाळ'चे त्यावेळचे संपादक श्री. द्वारकानाथ लेले यांनी साहित्यविषयक सदर लिहिण्याविषयी माझ्याकडे विचारणा केली. नियमित दर आठवड्याला लिहिणे कितपत जमेल याबद्दल मी मनोमन साशंक होतो. लेखनाचा सरावच उरला नव्हता. परंतु प्रयत्न करून बघायचे ठरवले व होकार भरला. सुदैवाने वेगवेगळे विषय मिळत गेले आणि लेखनातले सातत्य सांभाळण्यासाठी कसरत जमत गेली. आरंभी या सदराचे स्वरूप लवचिक होते. मराठी लेखक, भारतीय लेखक, परदेशी साहित्य, काही वाङ्मयीन घडामोडी, काही वाङ्मयीन प्रवृत्ती-याबद्दल त्यात लेख यावे अशी कल्पना होती. अनेक वर्षे नुसतेच वाचन चाललेले, त्यामानाने लेखन काहीच न झालेले. त्यामुळे डोक्यात अनेक विषय होते. आपल्याला जे विशेष वाटते,

आवडते किंवा खटकते त्याबद्दल इतरांना सांगावे ही एक प्रकारची आंतरिक उर्मी - ती अनेक वर्षे दबून राहिलेली. साहजिकच लिहिताना वेगवेगळे विषय समोर येत - किती लिहावे, किती ठेवावे हाच प्रश्न पडे. काही झाले तरी वृत्तपत्रातील जागेची मर्यादा नजरेसमोर ठेवावीच लागते. प्रत्येक वाक्य लिहिल्यावर हे वाक्य आवश्यक आहे का हा प्रश्न स्वतःलाच विचारावासा वाटतो. कमीत कमी शब्दात आपल्याला महत्त्वाचे वाटलेले मुद्दे मांडून मोकळे व्हायचे एवढी तडजोड स्वीकारावीच लागते. जादा लिहिले तर पानातील जाहिराती वा इतर बाबी यामुळे कुठला परिच्छेद शेवटच्या क्षणी कापला जाईल याची कल्पनाच येत नाही. वृत्तपत्रीय लेखनात काटछाट हे गृहीतकृत्य असते. सबिंग किंवा एडिटिंगमध्ये काटछाट अपरिहार्य ठरते. मीही संपादकीय कात्री अगणित वेळा वापरलेली आहे. तेव्हा संपादकांचा तो अधिकार नाकारणे शक्य नसते. . . हे सांगण्याचा उद्देश एवढाच की या सर्व वृत्तपत्रीय लेखनाला अनेक मर्यादा आहेत याकडे लक्ष वेधणे. लेखांमधला अपुरेपणा, त्रोटकपणा, प्रासंगिकपणा गृहीत धरूनच चालावे लागते. जे माध्यम वापरायला मिळते त्या माध्यमाच्या मर्यादा सांभाळूनच हे काम करावे लागते.

पुढे पुढे मात्र नव्या पुस्तकांचे परिचय करून देण्याकडेच लक्ष द्यावे लागले; नवनवी महत्त्वाची पुस्तके वाचकांसमोर यावी असा प्रयत्न सुरू झाला. मराठीतील ग्रंथव्यवहार असा आहे की बहुसंख्य वाचकांनी नवीन पुस्तके सहसा वाचलेली नसतात; त्यामुळे त्या पुस्तकांबद्दल लिहिताना त्यांचा परिचय करून देणे या गोष्टीलाच प्राधान्य द्यावे लागते. टीकाटिपणी करण्याला फारसा वाव नसतो. तशात 'साप्ताहिक सकाळ'चा जो संभाव्य व अपेक्षित वाचक आमच्यापुढे होता तो गंभीर, ॲकॅडमिक वा सैद्धांतिक लेखनापेक्षा विविध विषयांवरील रंजक माहितीसाठी उत्सुक, चौकस आणि बहुश्रुत असा वाचक होता. त्यामुळे नव्या पुस्तकांबद्दलचे त्याचे कुतूहल चाळवणे, वाङ्मयीन प्रवृत्तींबद्दलची त्याची जागरूकता आणि अभिरुची वाढवणे, यावर भर देणे क्रमप्राप्त होते. महाविद्यालयीन अभ्यासक्रमासाठी अपेक्षित असे समीक्षात्मक लेखन वृत्तपत्रीय अभिप्रायातून अभिप्रेत नसते. आकलन, परिचय, अभिप्राय, या पातळीवरच ते अधिक राहते. परीक्षण वा समीक्षा या पदवीला ते प्राप्त होत नाही.

वृत्तपत्रीय अग्रलेख हे ॲकॅडमिक शिस्त पाळणारे सैद्धांतिक विवेचन म्हणून मान्यता मिळवत नाहीत. वृत्तपत्रीय लेखनाच्या मर्यादा आज अधिकच जाचक होऊ लागल्या आहेत. वाचकवर्ग वाढत आहे; खप वाढत आहे; छपाई आकर्षक होत आहे; पृष्ठे वाढत आहेत, विविधता वाढत आहे; परंतु वृत्तपत्रीय लेखनाचा दर्जा हा त्यामानाने घसरत आहे; उथळ, एकांगी होत आहे असे जाणवत राहते. इंग्रजी-वृत्तपत्रांपेक्षा मराठीसारख्या प्रादेशिक भाषांमधील वृत्तपत्रांमधील लेखनाबाबत हे असमाधान मला अधिक त्रस्त करते.

वृत्तपत्रांमधील या त्रुटीची भरपाई करण्यासाठी अभ्यासपूर्ण नियतकालिके हवीत. दुर्दैवाने अभ्यासपूर्ण लेखन प्रसिद्ध करणारी अशी नियतकालिकेही गरजेच्या मानाने मराठीत फारच अपुरी आहेत. जी आहेत ती विशिष्ट वैचारिक गटांची असल्याने आपल्यापेक्षा वेगळ्या मतांच्या अभिव्यक्तीला सहसा जागा देत नाहीत. त्यांबद्दल असहिष्णू असतात.

पुस्तकरूपाने आज जे सैद्धांतिक लेखन बाहेर पडते ते बहुतांशी विद्यापीठीय अभ्यासक्रमाशी सुसंगत असते. अन्य लेखन मागे पडते, पुस्तकरूपाने क्वचितच प्रसिद्ध होते; झाले तरी त्याकडे दुर्लक्ष होते. विद्यापीठाबाहेरच्या व्यक्तींच्या व्यासंगी लेखनाची आपल्याकडे उपेक्षाच जास्त होते. विद्यापीठांचे अभ्यासक्रम व विद्यापीठातील मंडळी त्याबाबत लवचिकता सहसा दाखवत नाहीत.

पुस्तके, नाटके, चित्रपट, चित्रकला इ. गोष्टींची आणि सामान्य वाचक-प्रेक्षकाची जवळीक साधणे ही कामगिरी वृत्तपत्रांना बजावावी लागते. पारिभाषिक कलाशास्त्रीय संकल्पना वा शब्दसंहिता शक्यतो न वापरता हे काम करावे लागते. जरा अवघड वा गुंतागुंतीचे तात्त्विक विवेचन सुरू झाले की वाचक पान तसेच उलटतो. वृत्तपत्रात लिहिताना हे अवधान ठेवावे लागते.

या पुस्तकात १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांपैकी काही पुस्तकांचा परिचय आपल्याला आढळेल. एकूण १२०० पुस्तके प्रसिद्ध झाली; त्यांपैकी लक्षवेधक पुस्तके निवडायची झाली तर ती संख्याही शंभरावर जाईल. तेवढी पुस्तके वाचणे व त्यावर लिहिणे हे एकट्यादुकट्याचे काम नव्हे. शिवाय सगळीच पुस्तके हाती लागत नाहीत; माझ्या हाती आलेल्या पुस्तकांपैकी काही

पुस्तकांवरच लिहिणे शक्य झाले. १९८८ मधील अन्य काही पुस्तकेही वाचून झाली. पण त्यावर लिहून झाले नाही. ज्यावर लिहून झाले तीही सर्व पुस्तके या संग्रहात पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे घेता आलेली नाहीत. काही लक्षवेधक पुस्तकांचे परिचय करून देणे एवढाच मर्यादित हेतू समोर ठेवून हे संकलन आपल्या हाती देत आहे.

हे लेख आवडतात असे सांगणारे, लिहिणारे अनेक वाचक भेटतात; लिहितात; न पटलेल्या विचारांबद्दलही वाचक आपल्या प्रतिक्रिया कळवतात. काही वेळा कडक सूर लागतो; त्यामुळे काहीजण रागावतातही. मला लेखकांबद्दल, लेखनाबद्दल आस्था आहे; म्हणून ते समजून घेण्याची माझी कोशिस असते. त्या त्या लेखनाच्या भावी लेखनामधून त्याच्या स्वभावप्रकृतीनुसार कधीकधी अधिक काही मिळणे शक्य आहे असे जाणवते म्हणून त्रुटींचा उल्लेख केला जातो. तो क्वचित कुठे नको इतका धारदार होतो. कारण शर्करागुंठित कडू औषधी द्रव्याची मात्रा काही वेळा निरुपयोगी ठरेल असे वाटते. लेखनातले नवे प्रयोग स्वागतार्ह वाटतात, पण कुठल्याही वाङ्मयप्रकाराच्या तंत्रालाही त्याचा असा एक डौल असतो. आजचे अनेक लेखक त्याबाबत अनभिज्ञ असतात; तंत्राकडे अजिबात दुर्लक्ष करण्यानेही नुकसानच होते. वाङ्मयीन परंपरा मोडतानाही त्या परंपरेचे भान मनाशी पक्के असावे लागते. चित्रपट, दूरदर्शन, अनुबोधपट, पोस्टर यांसारखी माध्यमे; क्युबिझम, पॉप आर्ट, अतिवास्तववाद, इंप्रेशनिझम इ. चित्रकलेतील वाद व कोलाजसारखे तंत्रविशेष, नृत्य-शिल्प-वास्तुशास्त्र इ. शास्त्रे, यांचा वाङ्मयप्रकारांवर प्रभाव जाणवतो. त्याकडेही लक्ष वेधावे लागते.

आज मुद्रणाची साधने सार्वत्रिक आणि सुलभ झाल्यामुळे पुस्तकांची निर्मितीही मोठ्या प्रमाणावर होत आहे. दूरदर्शन, रेडिओ, चित्रपट, कॅसेट्स, कॉमिक्स, दैनिके व नियतकालिके यांचे आपल्या फावल्या वेळेवरील आक्रमण अधिक जोरदार होत आहे. वाचनासाठी लागणारा निवांतपणा किंवा पुस्तके ठेवण्यासाठी लागणारा घरातला कोपरा या गोष्टीही दुष्प्राप्य होऊ लागल्या आहेत. पुस्तकांच्या किंमतीही वाढत असल्याने स्वतःचा ग्रंथसंग्रह करण्याची कधी कोणाला उर्मी आली तरी ती लगेच ओसरून जात आहे. पुस्तकातून पूर्वी

जे मिळत असे ते ज्ञान वा जीवन चित्रण आज इतर माध्यमांतून अधिक सुलभपणे मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पूर्वी वाचकाचे आपल्या विशिष्ट लेखकाशी जणू एक गूढ पण अत्यंत घनिष्ट नाते जडलेले असे. वाचनाची कृती ही एकट्या व्यक्तीला, एका ठिकाणी बसून, एकाकीपणे करावी लागते. त्यासाठी निवांत व शांत, ध्वनिप्रदूषणरहित जागा हवी; आणि भरपूर वेळ हवा. लेखक जे मजेदार, गंभीर, खास अनुभव वा विचार सांगत आहे त्याच्याशी वाचक समरस होई. लेखकाने ह्या सर्व अंतरीच्या कळा केवळ आपल्यापुढेच खुल्या केल्या आहेत असा एक स्वतःला कृतार्थ बनवणारा भावही वाचकाच्या अहंकाराला तोषवीत असे. या लेखकाचे हे जे काही विचार मी वाचले, जाणले; त्यामुळे इतरांपेक्षा मी अधिक जाणकार आणि मोठा आहे हा आत्मप्रतिष्ठेचा प्रत्यय त्या वाचकाला सुखावत असे. आज ज्ञान मिळवण्यासाठी पुस्तक हे एकमेव साधन उरलेले नाही; 'मी शेक्सपियर वाचलाय' अशी फुशारकी आज मी मारू शकत नाही; कारण कोणी तो कॅसेटवर ऐकलेला असतो, कोणी दूरदर्शनवर तर कोणी चित्रपटाद्वारे शेक्सपियरच्या नाट्यकृतींचा आस्वाद घेतलेला असतो. पूर्वी वाचन हा एकमेव मार्ग ज्ञानसंपादनाचा होता, आज त्याला अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे ग्रंथयुगाला जबरदस्त हादरा बसला आहे. छापील पुस्तकाची जागा, व्हिडिओ कॅसेट, ऑडिओ कॅसेट वगैरे घेऊ लागल्या आहेत आणि पूर्वी जेथे पुस्तकाचे कपाट भरलेले दिसे तेथे आता कॅसेटची रॅक दिसू लागली आहे. ध्वनिफितींच्या रूपाने पुन्हा माणूस मौखिक वाङ्मयाच्या परंपरेकडे वळू लागला आहे. कवितावाचनाच्या, कथाकथनाच्या आणि कादंबरी-वाचनाच्या कॅसेटस् लौकरच मोठ्या प्रमाणावर निघू लागतील आणि छापील ग्रंथांच्या वर्चस्वाला धक्का बसेल अशीही शक्यता नजिकच्या भविष्यकाळात आहेच.

परंतु पुस्तकांना आणखी एक धोका आहे. पुस्तकांच्या रूपात आज जे काही लोकांसमोर येते आहे त्यातील बरेचसे केवळ कचऱ्याच्या टोपलीत टाकण्यासारखे आणि वाचकांच्या सहनशक्तीचा अंत पाहणारे असते. पुस्तक असे हवे की ते हाती घेतल्यावर वाचावेसे वाटायला हवे; पुस्तक आपल्याला शांतपणे आर्जवी आवाहन करीत असते : वाच. मला वाच. मला समजून घे. तुला

मी काहीतरी नवे देण्यासाठी आलो आहे. परंतु या भावनेने आपण पुस्तक हाती घ्यावे आणि केवळ भुसा यावा असे होते. 'तू मला कसा वाचू शकतोस तेच मी बघतो' असे आव्हान देणारेही एखादे पुस्तक असते. वाचक त्याच्याशी झटापट करायलाही तयार असतो. त्याचा अर्थ लावण्यासाठी जंगजंग पछाडतो. पण आजची बरीच पुस्तके ही रटाळ असतात. वाचकाचा आणि समीक्षकाचा वेळ फुकट घालवतात. त्याची थट्टा करतात. जेम्स फेन्टन या समीक्षकाने जॉन ॲशबेरीच्या काव्यसंग्रहाचे परीक्षण करताना म्हटले आहे की हा संग्रह वाचकाला वाचनापासून परावृत्त करण्यासाठीच लिहिला गेलाय असे वाटते. तो वाचायचा असेल तर वाचकाने कमालीचे अवधान पुरवायला हवे, आपल्या सहनशक्तीचा अंत गाठायला हवा, आपल्या बुद्धीचा भुगा करायला हवा आणि तर्कशक्तीला सक्तीच्या रजेवर पाठवायला हवे... "या संग्रहातील दुर्बोध कविता ही शुद्ध बनवेगिरी आहे आणि वाचक-समीक्षकाची थट्टा करणारी आहे..." या परीक्षणाने अमेरिकेत मोठी खळबळ उडवून दिली.

वाचक आणि लेखक, वाचक आणि पुस्तक या दोघांचे अत्यंत खाजगी असे एक विश्व असते. आणि पुस्तक वाचनात लेखक जणू खास आपल्याशीच बोलतो आहे, तो आपले अंतरंग आपल्यापाशी खुले करतो आहे असा वाचकाचा कळत नकळत भाव असतो. परंतु हा भाव सार्थ ठरावा असे महत्त्वाचे काही जेव्हा लेखक सांगत नाही तेव्हा अपेक्षाभंग होतो. आपल्याला जे नीटसे माहीत नाही असे काहीतरी वेगळे, विलक्षण, अद्‌भुत वा वास्तव हा लेखक आपल्याला सांगणार आहे, म्हणून आपण हे पुस्तक वाचणार आहो, अशी वाचकाची भूमिका पुस्तक हाती घेताना असते. एखाद्या लेखकाचे एक पुस्तक आवडले की दुसऱ्या पुस्तकाची वाट बघावीशी वाटते. तो आणखी काय नवे देतो याची उत्सुकता असते. हे वाचक व लेखक यांचे नाते खास असते. विलक्षण असते. 'सुनील गावस्करने प्रत्येक डावात धावांचा डोंगर रचावा' ही अपेक्षा त्याच्या चाहत्यांची असते तशीच काहीशी अपेक्षा आपल्या आवडत्या लेखकाने दरवेळी काहीतरी नावीन्यपूर्ण, विलक्षण द्यावे अशी वाचकाची राहते. एक वाचक म्हणून माझीही ही अपेक्षा असतेच. जो लेखक स्वतःचे वेगळेपण दाखवतो, त्याच्याकडे लक्ष जातेच. तो पुढे कशी झेप घेतो याबद्दल कुतूहल असते. ती झेप

जमली तर वाहवा म्हणावेसे वाटते; न जमली तर पुन्हा प्रयत्न कर म्हणावे लागते.

समीक्षेची रूढ चौकट निरुपयोगी ठरली आहे, असे मला सतत जाणवते. पाठ्यपुस्तकातील समीक्षेच्या संकल्पनांनी साहित्याच्या आकलनाला मदत होण्याऐवजी, अडचणच होत आहे. विशिष्ट सिद्धांतांच्या कसोट्यांवर एखादे पुस्तक उतरते की नाही हे पाहणारे समीक्षेचे रूप आता रद्दबातल व कुचकामी ठरू पाहात आहे. अमुक अमुक घटक आहेत म्हणून हे साहित्य श्रेष्ठ हे ठोकताळेही आता वाङ्मयाच्या आस्वादाला अपुरे ठरत आहेत. स्ट्रक्चरलिझम, सिम्बॉलिझम, आर्केटायपल, क्रिटिसिझम, सररिॲलिझम, एक्झिस्टँशियलिझम, डि-कन्स्ट्रक्शनिझम् वगैरे प्रमाण मानणाऱ्या समीक्षा प्रणालींचा दबदबा अल्पकाळातच ओसरला. फेमिनिझमचा सध्या प्रभाव आहे. मराठीत सैद्धांतिक समीक्षेच्या प्रांतात आनंदी आनंद आहे. समाधानकारक किमान परिभाषाही अजून सिद्ध झालेली नाही. विद्यापीठांमध्ये वाङ्मयाचा अभ्यास हा अगदीच उथळ पातळीवर चालू आहे. ग्रामीण, दलित, स्त्रीमतवादी, मार्क्सवादी अशी लेबले लावलेले साहित्यच आज विशेष भाव खाऊन जाते. साहित्याचे हे 'राजकीयीकरण' अनिष्ट होय. साहित्य म्हणून आपले स्वयंभू मोल आजचे साहित्य सांगत नाही असा समज त्यामुळे होतो.

कुठल्याही विशिष्ट समीक्षा प्रणालीचा ॲकॅडमिक अवलंब करून लिहिण्यात आणखी एक गडबड होण्याची शक्यता असते. मूल्यमापनाच्या नावावर दोन वा अधिक गटांमध्ये वादविवाद रंगवण्याची एक स्पर्धाच लागते. आशयसंपन्न कलाकृतीबाबत एकच एक वस्तुनिष्ठ मूल्यमापन होणे अशक्य असते. विविध दृष्टिकोनांतून तिच्याकडे पाहता येते आणि तरीही तिच्यात काही नवे सापडते. परंतु विशिष्ट समीक्षाप्रणालीचा अवलंब केल्यावर आपलेच मत बरोबर असे सिद्ध करण्यासाठी आटापिटा केला जातो. बर्नार्ड हॅरिसन या इंग्लिश टीकाकाराने 'कॉंटिंजन्सीज ऑफ व्हॅल्यू' या बार्बरा स्मिथच्या पुस्तकाबद्दल मांडलेले पुढील मत मला रास्त वाटते.

*"There is, that is, no goal of final, 'objective' insight to be arrived at by dint of seeing through the manipulative ploys of allegedly objective evaluative discourse. There is just the game of evaluation, played out for its own purpose by one group or another, always expressing the*

*desires and serving the interests of that group, always to some extent depreciating or practically suppressing some other group. We cannot ascend from the game to the still point of 'objective' vision postulated by traditional historicism : the most we can do is to analyse the workings of the game in limited and partial cases, for limited and partial political purposes." (TLS. No. 144b. Jan 4, 1990)*

सर्वसामान्य व चोखंदळ वाचकाला एखादे पुस्तक हे निरनिराळ्या समीक्षाप्रणालींच्या पुरस्कर्त्यांना परस्परांवर हल्ले चढवण्याची रणभूमी म्हणून कसे उपयुक्त आहे यात रस वाटेलच असे नाही. त्याला त्या पुस्तकाबद्दल माहिती मिळावी आणि ती माहिती त्याचे कुतूहल चाळवण्यास समर्थ असेल तर त्याने ते पुस्तक मिळवून वाचण्यास प्रवृत्त व्हावे या दृष्टीने हे लेखन करण्यात आले आहे. एखादी विशिष्ट समीक्षाप्रणाली पायाभूत धरून प्रत्येक पुस्तकाची त्या भूमिकेवर तपासणी करण्याचा हेतू येथे नाही.

१९८८ पासून मराठी साहित्याला नवा बहर आलेला आहे, अनेक नवे प्रतिभावंत लेखक पुढे येत आहेत; १९६०-६५ च्या नंतर असा नवचैतन्याचा काळ प्रथमच येत आहे. या पुस्तकाद्वारे या नव्या चैतन्याची थोडीफार चाहूल वाचकांना लागू शकेल अशी माझी भावना आहे.

१९८७ मधील काही पुस्तके यात आली आहेत. ती उशिरा बाजारात आली; किंवा ८८ मध्ये पारितोषिक वगैरे मिळाल्यामुळे विचारात घेण्याची गरज वाटली. अशी पुस्तके मोजकीच आहेत.

या लेखनामुळे काही लेखक दुखावले गेल्याची जाणीवही कधीमधी कोणी करून देते. साहित्याबद्दल आस्था असणारे सारेजण हे आपले सुहृदच असतात. परंतु सर्वच कलाकृती सारख्याच तोलामोलाच्या नसतात, काही रचनादृष्ट्या सदोष वाटतात; काही चांगली कल्पना केंद्रस्थानी असूनही ऐसपैस घोळ घातल्याने रटाळ बनतात, गुणवत्तेत उणावतात; काही विशिष्ट वैचारिक कलात्मक शाब्दिक वा भावनात्मक कोंडीत सापडून त्याच त्या आवर्तात घुमत राहतात. आपल्याला ते जाणवले तर त्याबद्दल बोलणेही आवश्यक ठरते. अर्थात काही शब्दांना नको एवढी धार येते. कुणावर तरी अभावितपणे वार होऊन जातो. हे लिहायलाच पाहिजे का असा प्रश्नही अधूनमधून पडतो. पण आपले जे काही

विचार असतील ते स्पष्टपणे लिहायचे नसतील तर मग लेखनच कशाला करायचे ? असाही विचार मनात येतो.

वाचाकांनीच खरे तर या प्रश्नांच्या संदर्भात सतत जागरूक संवाद साधायला हवा.

या पुस्तकाच्या अखेरीला दिलेल्या सूचीत अपुरेपणा आहे; याची मला कल्पना आहे. काही त्रुटीही राहून गेल्या असणे शक्य आहे. सर्वच पुस्तके एकत्र कुठे बघायला मिळत नाहीत. ही मोठी अडचण आहे. माझ्या लेखनातही काही त्रुटी असणारच. स्तंभलेखनाच्या मर्यादाही त्यावर आहेत. तथापि, नव्या लेखनाबद्दल चोखंदळ आस्था वाढीला लागावी हा या उद्योगामागचा जो मुख्य हेतू तो वाचकांना रुचेल असा विश्वास वाटतो.

या पुस्तकाच्या सिद्धतेसाठी सहाय्य करणाऱ्या सर्वांना धन्यवाद.

**शंकर सारडा**

# ग्रंथगौरव

## १९८९ मधील वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकांचे अंतर्वेधक परिचय

**कादंबऱ्या**
शोधयात्रा : अरुण साधू
एम टी आयवा मारू : अनंत सामंत
शिवप्रिया : शुभांगी भडभडे
रमाबाई : जोत्स्ना देवधर
काफर : राजन खान
उर्वशी : अरुणा ढेरे
७२ मैल : अशोक व्हटकर
भैरवी : ना. वा. फडके
कृतार्थ : शुभांगी भडभडे
अग्निपुष्प : रेखा बैजल

**कथा**
पश्चिमगंध : ललिता गडंभीर
वेशाख, मेघ, आषाढ : रणजित देसाई
लांडगा : राजेंद्र बनहट्टी

**चरित्र-आत्मकथने इ.**
स्वा. सावरकर : एक रहस्य : द. न. गोखले
नाथ हा माझा : कांचन घाणेकर
वडीलधारी माणसं : शांता शेळके
रामकृष्ण संघ : डॉ. वि. रा. करंदीकर
संघर्ष : वसुंधरा पटवर्धन

**काव्य**
पीकपाणी : इंद्रजित भालेराव
कॉलम : विलास शेळके
अंतरंग : हेमा लेले
माझ्या पृथ्वीवर : प्रसन्नकुमार पाटील

**इतर**
तिमिरभेद : अंजली सोमण
महात्मा फुले आणि वैदिक धर्म : डॉ. माळी
चौफेर : माधव गडकरी
महात्मा फुल्यांची बदनामी : हरी नरके
आणि
इतरही अनेक

# पानिपत : विश्वास पाटील

## *विशाल पट, भव्य शैली*

'पानिपत' : महाकाव्याच्या तोलामोलाची कादंबरी. तिशीच्या आतील एका तरुणाच्या हातून सिद्ध झालेली. मराठीतील ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या मालिकेत अग्रभागी मानाने मिरवावी अशी. किंबहुना खऱ्या अर्थाने पहिलीच मराठी ऐतिहासिक कादंबरी म्हणावी अशी बावनकशी कृती. पानिपतच्या रणसंग्रामावर भाऊसाहेबांची बखर आणि इतरही समकालीन साहित्य उपलब्ध आहे, त्यामुळे कोणी नवे काय सांगणार असा प्रश्न प्रथमदर्शनीच पडतो; परंतु या चिरपरिचित घटनेतील विविध धागेदोरे, नव्याने उपलब्ध झालेल्या कागदपत्रांच्या चौकस अभ्यासाने अशा काही साक्षेपाने विश्वास पाटील यांनी उलगडून दाखवले आहेत की थक्कच व्हावे.

अहमदिया करारानुसार शिंदे-होळकर यांनी दिल्लीच्या बादशहाच्या संरक्षणाची जबाबदारी पत्करली (१७५२), त्यानुसार अंतर्वेदीवर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले.

अफगाणिस्तानच्या अब्दालीने दिल्लीवर स्वारी करून त्याला शह दिला. तेव्हा राघोबाने अटकेपार भरारी मारली, परंतु पुन्हा अब्दालीने हिंदुस्थानाकडे प्रचंड सैन्यानिशी मोर्चा वळवला. त्यासाठी दिल्लीचा पाताळयंत्री मीरबक्षी नजीबखान रोहिला याने अब्दालीला भरीला पाडले. सरहिंदकडून अब्दाली, पंजाबकडून माधोसिंग, गंगापारहून नजीबखान आणि दुंदेखान, हफीज रहमतखान, कुतुबशहा गुरू, अयोध्येचा सुजाउद्दौला, फरुखाबादेहून अहमदखान पठाण- यांची युती जमवून नागाने भक्ष्याभोवती वेटोळे टाकावे तसे मराठा सैन्याला वेढण्याचा डाव नजीबखानने सिद्धीला नेला आणि वर मराठ्यांशी सलोख्याच्या प्रस्तावाचे नाटकही जारी ठेवून त्यांना बेसावध ठेवले. मल्हारराव होळकरांवर त्याने अशी जादू केली की ते नजीबखानला धर्मपुत्र मानून त्याच्याबद्दल कायम रदबदली करीत राहिले. नजीबने दत्ताजी शिंदे यांनाही गोड बोलून गाफील ठेवले. आपली चूक कळून आल्यावर शिंदे जागे होतात, हल्ला करतात. बुराडीच्या लढाईत दत्ताजी घायाळ होऊन पडतो. 'बचेंगे तो औरभी लढेंगे' हे त्यांचे बाणेदार उत्तर ऐकल्यावर कुतुबशाह त्याच्या

छातीत खंजीर खुपसतो, नजीबखान धारदार जमदाड्याचा वार करून त्याची मुंडी तोडतो... येथपासून ते पानिपतच्या रणभूमीवर मराठ्यांचा पराभव होईपर्यंतचा कथाभाग 'पानिपत'मध्ये येणे अपरिहार्य होतेच. तो तसा आलाही आहे; परंतु त्या पराभवाशीच न थांबता अब्दालीने दिल्लीवर कब्जा मिळवून तेथील व्यवस्था लावणे, सैन्यातील बंडाळीच्या भाषेमुळे अब्दालीने परत जाणे आणि या पराभवाचा धसका घेऊन भ्रमितचित्त होऊन नानासाहेब पेशवे यांचे पर्वतीवर प्राणोत्क्रमण होणे हा पुढचा घटनाक्रमही या शोकात्मिकेच्या उत्कटतेत अर्थपूर्ण भर टाकतो.

## इतिहासाची बांधिलकी

हा प्रचंड घटनापट पुढे ठेवताना विश्वास पाटील यांनी उपलब्ध ऐतिहासिक पुराव्याशी जास्तीत जास्त बांधिलकी पाळण्याची प्रतिज्ञा कसोशीने पाळली आहे. या कादंबरीत काल्पनिक व्यक्तिरेखा, सोंगाडे, गुहा-तळघरे, जादूटोणा, लुटुपुटीचे प्रसंग नाहीत. तसेच रोमँटिक वा कल्पनारम्य रुटीन प्रेमकथाही नाहीत. कणभर इतिहासावर डोंगरभर नवल उभारायची नाथमाधवांची किमया नाही. अद्भुताची उड्डाणे नाहीत. भाऊसाहेबांचे जागोजागचे मुक्काम, अब्दालीच्या आणि नजीबखानच्या सैन्याच्या हालचाली, यमुनेच्या विशाल पात्राची कमीअधिक खोली आणि वळणे, कुंजपुरा-बुराडी, कुरुक्षेत्र, पानिपत वगैरे स्थळे यांचे भौगोलिक स्थान, हवामान या सर्वांचे नेमके अनुसंधान ठेवले असून, घडलेल्या घटनांचा कालक्रमही कुठे विस्कटू दिलेला नाही. स्वतः तो भूभाग हिंडून त्याची खातरजमा करूनच त्या स्थळांची वर्णने पेश केली आहेत. शेवटी जोडलेले टिपण आणि नकाशे या नेमकेपणाला पोषक ठरतात.

चाळीसावर व्यक्तींचा या कथेत महत्त्वपूर्ण भाग आहे. यातील प्रत्येक व्यक्ती स्वतःचे रंगरूप, स्वभाववैशिष्ट्य, गतजीवन आणि जीवनविषयक दृष्टिकोन घेऊन आपल्यापुढे उभी होते. अहमदशहा अब्दाली, नजीबखान, सूरजमल जाट, सिराजउद्दौला, राघोबा, भाऊसाहेब, विश्वासराव, दत्ताजी शिंदे, इब्राहिमखान गारदी, जनकोजी शिंदे, नानासाहेब, मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले या प्रमुख व्यक्तिरेखा. त्या ठसठशीत आहेतच. बरोबर समशेर बहादूर, यशवंतराव पवार, नजीबचा गुरू कुतुबशहा, दिल्लीचा वजीर गाजुद्दिन, रसदुल्लारखान, गोपाळराव बर्वे, बळवंतराव मेहेंदळे, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, नाना फडणीस, अब्दाल्लीचा वजीर शहावलीखान, अफगाण सेनापती जहानखान, सुजाचा वकील काशीराज वगैरे व्यक्तींचेही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व सहजपणे मनावर ठसावे अशा रेखीवपणे आपल्यापुढे येते. व्यक्ती महत्त्वाच्या असोत वा दुय्यम, त्याच्या जीवनातील रंगवलेल्या घटना या वास्तवावर व पुराव्यावर आधारलेल्याच आहेत. गुहा, तळघरे, योगायोग, हिंदू तेवढे सज्जन आणि मुस्लीम सारे दुष्ट असले भाबडे समज, तलवारींची ऊठसूट खणाखणी-वगैरे नाथमाधव-हडपपंथीय मालमसाला यात चुकूनही आलेला नाही.

## चरित्रांचा मागोवा

बिहारीलाल आणि नरुद्दिन यांनी लिहिलेली नजीबखानची मूळ फारशी चरित्रे व त्यांचा जदुनाथ सरकारकृत अनुवाद, अब्दालीचे प्रा. गंडासिंग लिखित चरित्र, सूरजमलचे विद्यमान केंद्रीय मंत्री नटवरसिंह यांनी लिहिलेले चरित्र, डॉ. आशीर्वादीलाल श्रीवास्तव यांनी लिहिलेले सुजाउद्दौलाचे चरित्र, राजवाडे संपादित गोविंदपंत बुंदेले यांची पत्रे, सदाशिवरावांवरील रियासतकारांचा लेख (हितचिंतक-१९३३) शं. ना. जोशी यांचे सांगली पत्रावरील भाषण, चिटणीस दप्तरातील भाऊसाहेबांचे पत्र (२७ सप्टेंबर १७६०), अब्दालीच्या लष्करातील शिया-सुन्नींच्या दंग्यांचे फारशी बखरीतील उल्लेख, इतर बखरी, प्रा. शेजवलकरांचा ग्रंथ, इत्यादी साधन सामग्रीचा वापर करून, विश्वास पाटील यांनी आपल्या या कादंबरीतील पात्रे आणि प्रसंग घडवले आहेत. साहजिकच या साऱ्या लेखनात एक प्रकारचा ठामपणा जाणवतो. जे सांगायचे ते रोखठोक, स्पष्ट सांगितले आहे, सरळ तेथे सरळ, तिरकस तेथे तिरकस, एखादे रहस्य लपवून ठेवून कथानकाची रंगत वाढवायची आणि वाचकाला त्यात गुंतवून टाकायचे असा कुठेही प्रयत्न नाही. नजीब असो वा भाऊसाहेब असो, आपल्या भूमिका नेमक्या शब्दात मांडतात आणि दोघांचेही हेर असे चाणाक्ष, एकमेकांच्या बित्तंबातम्या मिळत राहतात. त्यामुळे एखादा पक्ष अगदी अंधारात राहून, गाफील राहून दुसऱ्यांच्यापुढे निष्प्रभ ठरत आहे, असे होत नाही. परिस्थितीच्या रेट्यानेच त्याच्या कृतीची दिशा ठरते, अडाणीपणाने नाही. अज्ञानाच्या आडोशाखाली भावी घटनांचे गांभीर्य दडपले जात नाही. त्यामुळेच पानिपतमधील संघर्ष हा धारदार बनला आहे.

नजीबखान आणि भाऊसाहेब या दोघांनाही विश्वास पाटील यांनी मोठ्या ताकदीने उभे केले आहे, तर भाऊसाहेबांच्या पराक्रमाबद्दल आपल्या मराठी वाचकांना सादर कौतुक आहेच. नजीबखानला पाताळयंत्री, मायावी, कारस्थानी, सैतान, साप, विश्वासघातकी वगैरे विशेषणे मराठ्यांच्या पत्रव्यवहारात वापरलेली आढळतात, परंतु त्याच्या शब्दांतून आणि कृतींतून ती विशेषणे सार्थ करून दाखविण्याचे कौशल्य काही वेगळेच ! भाऊसाहेब नायक म्हणून आपल्याला भारावून टाकतात, पण नजीबची अचाट कुटील नीती आपणाला स्तिमित करते. गाजरासारखा लाल, तीक्ष्ण बारीक डोळ्यांचा, डोळे रोखले की सुरामारी होतेय असे वाटायला लावणारा, देखणा, आखूड दाढीचा नजीबखान रोहिला. अफगाणिस्तानातून साधा प्यादा म्हणून येतो आणि पंधरा वर्षांत दिल्लीचा मीरबक्षी बनण्यापर्यंत मजल मारतो आणि हिंदुस्थानचा बादशहा बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतो. अब्दालीला बोलवून त्याच्या मदतीने मराठ्यांचा बंदोबस्त करून, उत्तरेत आपली अनिर्बंध सत्ता प्रस्थापित करण्याचा घाट तो घालतो. त्यासाठी कधी तो 'इस्लाम खतरेमें है' चा पुकारा करून जनमानसाला ढवळून काढतो तर कधी गोड बोलून प्रतिस्पर्ध्यांचा गळा कापतो. मल्हाररावांचा तो धर्मपुत्र बनतो

आणि गोविंदपंत बुंदेल्यांच्या बायकोला आपली बहीण बनवतो. बेलभंडारा घेऊन दत्ताजीला इकडे मिठी मारतो आणि तिकडे दत्ताजी नावाचा बडा बंदर झुलवत ठेवलाय म्हणून अब्दालीला खलिता टाकतो. सादुलखान हा त्याचा साडू, पण नजीब आपल्या साडूचाही जमीनजुमला लाटतो. आपल्या धर्मपुत्राला समजावणीच्या चार गोष्टी सांगायला गेलेल्या मल्हारराव होळकरांना तो सुनावतो, "तुमचे आमचे संबंध पितापुत्राचे आहेत, पण ते संबंध राजकारणातले आहेत. धर्मकारणातले नव्हेत. मी गाय मारेन नाहीतर वाघ मारेन. हा पूरा आमचा, खासगी मामला आहे." नजीब आपला भाऊ सुलतानखान याला सांगतो की शेकोटीसमोर बसलेल्या मराठ्यांच्या अंगावर झेप घेऊन त्यांना आगीने भाजून काढ. हा भाऊ बादशहाचा हुकूम कुठेय म्हणतो तर एकदम कडाडून नजीब भावापुढे लोटांगण घालून म्हणतो, "कोण बादशहा ? कुठला बादशहा ? हे सारं कुणासाठी चाललंय मूर्खा ? हे परवर दिगार, हा असला कसला भाऊ माझ्या झग्यात टाकलास की जो काफरांकडे गाझीसारखा झेपावत नाही, एलवंडीसारखा नुसता टकाटका बघतो...' जामा मशीद आणि निजामाचा दर्गा वगैरे पाडून देवळे बांधणार असे मुल्लामौलवींची बैठक घेऊन नजीब त्यांना सांगतो. "हे मराठे आपल्या सगळ्या मशिदी पाडणार आहेत. आपला धर्म संकटात आहे." मौलवी 'चलो दिल्ली- काफरको मारो' म्हणतात तेव्हा नजीब आपले वक्तृत्व पणाला लावतो:"तुम तो पढे लिखे आदमी हो, इतना शोर क्यों मचाते हो ? मैं तो सीधासादा गँवार आदमी...असा शेर करून तुम्ही दिल्लीकडे जाणार आणि यमुनेच्या पाण्यात डुंबून मारणार. आपापल्या मुलखात जा. इस्लामवरील खतऱ्याची सर्वांना कल्पना द्या. काफरांच्या वाटा, रसद बंद करा. जंग उभा राहील तेव्हा जवाँमर्द इस्लामच्या रक्षणासाठी धाडून द्या. गनीम लोकांत फिसाद घडवा.

अब्दालीला तो मोठ्या मिनतवारीने मराठ्यांशी झुंज घेण्यासाठी भरीला घालतो. स्वतःच्या महत्त्वाकांक्षेसाठी अब्दालीचा वापर करून घेण्याचा त्याचा आरंभापासूनच बेत आहे. भाऊ सुल्तानखान याला तो सांगतो : तो दुराणी काही तुझा माझा जिजाजी नाही. हा हौसेचा पती किती दिवस फुकट पोसायचा ?

भर दरबारात तो अब्दालीच्या वजीराला टोमणे मारतो. "मुंडावळ्या माझ्या कपाळाला बांधल्या आहेत, या युद्धात नवरदेव मीच आहे ! तुम्ही बाकीचे सगळी वऱ्हाडी आणि वाजंत्री आहात. ताशेतरफे, बेंडबाजा वाजवायचं सोडून तुम्ही माझ्या माघारी सुलुखाच्या गोष्टी कशाला करू लागलाय ? हा इसम कमहिंमतीचा... डरपोक आहे. काफरांशी हातमिळवणी करणारा हा आदमी आमच्या अफगाण बीजाचाच नाही."

अर्थात शहावलीही ते निमूट ऐकून घेत नाही. तो त्याच्यावर धावून जातो. म्हणतो: "बदमाष ! प्याद्याचा फर्जी झालास म्हणून मर्जीला येईल त्या बाता करतोस ? जिहादची झूठ भाषा बोलून आलमपन्हाच्या डोळ्यात धूळ फेकतोस ?... ताशाकर्ण्यावर नाचणारा मर्कट तू ! तुला शहाचं हित काय आणि अहित काय ?..." पानिपतच्या विजयानंही अब्दालीच्या

हाती फारशी धनसंपत्ती लागत नाही. नजीब बनेल. तो सुरजमलवर हल्ला करून आणि सुजाउद्दौलाकडून पैसे घ्या म्हणतो. तेव्हा अब्दाली त्याचा डाव ओळखून त्याला फैलावर घेतो. 'पाहुण्याच्या काठीने साप बडवायची शक्कल नामी आहे तुझी! जाटांचे कंबरडे मोडले की दिल्लीची सत्ता तुलाच.' अब्दालीचा नजीबवर विश्वास नसतोच. परत जाण्यापूर्वी अब्दाली नानासाहेबांना खलिता पाठवतो- "दिल्लीच्या कारभारावर पूर्ववत नजर ठेवावी. मात्र पंजाबचा मुलूख आमचेकडे राहील."

नजीब हा पानिपतच्या युद्धाचा कर्ताकरविता आहे आणि त्या दृष्टीने त्याचा बनेलपणा, बेरकीपणा, दुष्टपणा विविध प्रसंगांतून उत्तम प्रकारे प्रकट केला आहे.

### भाऊसाहेब

भाऊसाहेबांच्या व्यक्तित्वाचेही कुशल मुत्सद्दी, जबाबदार कुटुंबप्रमुख, सैन्य आणि सहकारी यांच्या अडीअडचणींची दखल घेणारा जागरूक सेनापती, म्हणून चित्र आपल्या मनावर ठसलेले आहे. त्याला अनेक परिमाणे विश्वास पाटील यांनी दिली आहेत. त्याची उदाहरणे द्यावीत तेवढी थोडीच होतील. नजीबखान-अब्दाली यांच्या व्यूहरचनेला तोडीस तोड अशी व्यूहरचना भाऊसाहेबांचीही होती. बरोबर असणाऱ्या बायकापोरांचा आणि बाजरबुणग्यांचा पसारा, धार्मिक क्षेत्री लांबत जाणारे मुक्काम, नानासाहेब पेशव्यांकडून व इतर सरदारांकडून वेळोवेळी मदत व रसद न मिळाल्याने सैन्याची झालेली उपासमार, मल्हारराव होळकरांनी कसोटीच्या ऐनवेळी दाखविलेली असहकाराची वृत्ती, अकारण वाया घालवलेले दिवस, लढाईच्या दिवशी दुपारपर्यंत सरशी होत असताना विठ्ठलपंत विंचुरकर आणि दमाजी गायकवाड यांनी इब्राहिमखानच्या तोफखान्याच्या वाटेत येऊन घोळ घातल्याने उडालेला गोंधळ आणि त्यामुळे लढाईला लागलेले विपरीत वळण- वगैरे तपशीलही डोळ्यांपुढे नेमका उभा केला आहे. विश्वासराव पडल्यावर भाऊसाहेबांनी केलेली लढाईची शर्थ त्यांच्या धीरोदात्त प्रतिमेला साजेशीच रंगवली आहे. लढाईचे रेखीव पण वास्तव वर्णन या कथेला महाकाव्याची व्यापकता प्रदान करते.

भाऊसाहेब धारातीर्थी पडले– येथे ही कादंबरी संपत नाही. त्यापुढच्या घटनांचीही नोंद ही कथा घेते आणि या सबंध लढाईचे एका अर्थाने मूल्यमापन करते. नानासाहेब पेशवे यांनी भाऊसाहेबांच्या मदतीसाठी २२ नोव्हेंबरलाच पुणे सोडले, परंतु त्यांची वाटचाल रमतगमतच चालली होती. स्वतःचे दुसरे लग्नही याच मोहिमेत उरकून घेण्याची संधी साधली. त्यांना ही पानिपतच्या पराभवाची बातमी कळल्यावर झालेला पश्चात्ताप, त्यातून त्यांच्या मनावर झालेला आघात, अब्दालीने दिल्लीची व्यवस्था लावून परतीची धरलेली वाट, पानिपतवरून जाताना झालेले भयानक भास, युद्धात वाचलेल्या मराठा सैनिकांचा परतीचा प्रवास, सुजाउद्दौलाची अब्दालीने केलेली मानखंडना, मल्हारराव होळकर, विठ्ठलपंत विंचूरकर प्रभृतींना लागलेली टोचणी, पार्वतीबाईंचा आपल्या अहेवपणाबद्दलचा

विश्वास, इत्यादी भाग हा पानिपतच्या शोकांतिकेच्या जगड्व्याळ भीषणतेचे भान देतो. अब्दालीच्या सैन्याचा परतीचा मार्ग पानिपतच्या रणभूमीवरूनच असतो. त्या वेळी त्या सैनिकांना होणारे भास त्यांच्या काळजाचे पाणी करतात आणि त्या भासांची टर उडवणाऱ्या बादशहालाही भाऊची प्रतिमा सांगते "तू आमचा विजय हिरावून घेतला असलास तरी तुझ्या मुद्रेवर विजयाचा आनंद दिसत नाही. माझ्या लाखो जनावरा-माणसांनी अग्निकुंडात बलिदान करून तुझा आनंद कधीच हिरावून घेतला आहे."

दचकून जागा झालेला अब्दाली वजीराला म्हणतो, "हा सारा मुलुख मला झपाटल्यासारखा वाटतो. यापुढे हिंदुस्थानवर स्वारी केली तरी पानिपत ओलांडून पुढे यायचे नाही. या साऱ्या मातीला रक्ताचा वास आहे..."

नानासाहेब शनिवारवाड्यात प्रवेश करतात. तेथील सातमजली मनोऱ्यातून दूर आळंदीकडे त्यांची नजर जाते. त्या जवळच्या गर्द झाडीतून दहा-बारा हजारांचे सैन्य येताना दिसते. नंतर भाऊसाहेब दिसतात, 'तीर्थरूपऽ हा पहा जरीपटका. त्या अब्दालीच्या रक्तात भिजलेला.'

शनिवारवाड्यातला तो सात मजली मनोरा त्याच वेळी अग्नीच्या ज्वालांनी वेढला जातो. जळत्या वाड्यातून नानासाहेब 'भाऊसाहेब भाऊसाहेब' करीत सैरावैरा धावू लागतात... २३ जून १७६१ रोजी भाऊ भाऊ म्हणतच नानासाहेब पर्वतीवर मृत्यू पावतात- तेथे ही कथा संपते.

बखरीला साजेशी अशी भाषा या कादंबरीला एक वेगळाच गोडवा देते. तिच्यात सांगलीकडची गावरान मराठी आणि बखर– पत्रव्यवहाराची भाषा यांचे मिश्रण आहे. कुठेही ही भाषा कृत्रिम वा खोटी वाटत नाही. "तटबंदीला ढुसण्या देऊन मराठे दिल्लीत घुसले." "मोहल्यामोहल्यात शस्त्रास्त्रांची टिपरीघाई सुरू होती..." "ओंकारेश्वराची शपथ घेऊन सांगतो- त्या नजीब्याची तंगडी फासटून एक यमुनेच्या डाव्या काठाला आणि दुसरी उजव्या काठाला टाकीन तरच..." कोसभर अंतर दौडल्यावर नजीब म्हणाला, "त्या मरगठ्ठ्यांच्या नजरा मला जहरी दिसल्या."

"नजीब मला तरी शुद्ध दिसतो आणि समजा बदललाच तर त्याला जित्ता फाडून शिळ्या भाकरीसंगे खाईन."

"इकडचा स्वभाव... एवढेसे मनाला लागले की काळ्या ढगासारखे गदगदून जातात."

"मुंढी छाटली तरी बिनागर्दनीची अ.्पळी ्डं ताबुतासारखी नाचतील..."

ही भाषा हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय होईल. कुठेतरी क्वचित भाषेचे, काळाचे अनुसंधान सुटते आणि नानासाहेबांचे वजन ८४ किलोवरून ५५ किलोवर आले, यासारखे विधान येऊन जाते, पण असे चुकूनच.

लेखकाची सर्वसाक्षी उपस्थिती व दोन्ही बाजूंची तुल्यबळ अशी पेशकश, समग्र

मानवी अस्तित्वाचे आणि गूढ भवितव्याचे भान देणारे, उदात्त अतिमानुष मूल्ये निर्भयपणे उद्घोषित करणारे वृत्तीचे ताटस्थ्य हे महाकाव्यांला आवश्यक असते. अलिप्तता, विशालता, निर्वृतता (रिपोझ), संयम आणि श्रद्धा अशी महाकाव्याची पाच लक्षणे प्रा. क्षीरसागर यांनी सांगितली आहेत. ग्रेट ॲक्शन अँड ग्रँड स्टाईल असा मॅथ्यू आर्नोल्ड उल्लेख करी. त्या कसोटीवरही 'पानिपत'ची महत्ता जाणवते. यातील कोणत्याही दोन व्यक्तींमधील संबंध हे मूलभूत मानवी प्रवृत्तींवर प्रकाशझोत टाकतील इतके मूलगामी आहेत, त्यांचे आवाहन सार्वत्रिक आहे. इतिहासातील घटना-व्यक्तींचा, मूल्यप्रणालीचा, समाजस्थितीचा प्रामाणिकपणे पाठपुरावा करून हे सर्व लेखन केलेले असले तरी ते इतिहासाच्या पातळीवरचे पाठ्यपुस्तक बनलेले नाही, महाकाव्यसदृश विशाल आशय आणि भव्य शैली, व्यक्तिरेखांची सजीव उभारणी आणि संघर्षाची निर्भयपणे केलेली नेमकी हाताळणी या सर्वांमुळे 'पानिपत' ही एक अभिजात कलाकृती बनली आहे. सव्वादोनशे वर्षांपूर्वीच्या या अभूतपूर्व संग्रामात सद्यःकालीन संघर्षाची शाश्वत अंतःसूत्रेही आपोआपच प्रकट होत असल्याने तिचे वाचन हा एक अंतर्मुख करणारा अनुभव ठरतो. उत्तम निर्मितीमूल्ये आणि मुखपृष्ठावरील रवींद्र मेस्त्री यांचे चित्र यामुळेही या अनुभवाच्या उत्कटतेत भर पडते.

(पानिपत : विश्वास पाटील, राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ ३०. पृष्ठे ८३६, दीडशे रुपये.)

□

# झेलझपाट : डॉ. मधुकर वाकोडे

## *कोरकू पार्श्वभूमीवरील चुटपुट लावणारी हळुवार प्रेमकथा*

कोरकू या आदिवासी जमातीच्या पार्श्वभूमीवरील 'झेलझपाट' ही कादंबरी म्हणजे कोरकूंच्या समाजजीवनाचे आणि जीवनपद्धतीचे एक अत्यंत प्रामाणिक व विश्वासार्ह दर्शन आहे. पारंपरिक आदिवासी जीवनशैलीला टायगर प्रोजेक्ट, सहकारी संस्थांतील भ्रष्टाचार, शासकीय अधिकाऱ्यांची अरेरावी आणि बाहेरून आलेल्या स्वार्थी व लबाड दलाल-व्यापाऱ्यांची लुबाडण्याची वृत्ती-या सर्वांमुळे निर्माण झालेला धोका, आजमितीचे काळाचे परिमाण कसे उद्‌ध्वस्त करीत आहे याचे एक सर्वंकष चित्र 'झेलझपाट' मधून वाचकांच्या मनःपटलासमोर उभे राहते.

हे चित्र सर्वंकष अशा अर्थाने, का तेथील निसर्गाची बदलती रूपे, कोरकूंच्या धार्मिक व ऐहिक श्रद्धा, निर्वाहाची साधने, स्त्री-पुरुष संबंधातील मूल्यप्रणाली– वगैरे तपशील त्याद्वारे अत्यंत विश्वासार्ह पातळीवर मिळतात. या स्थिर आदिवासी चित्राला गतिमानता लाभते ती नव्या युगाच्या तथाकथित सुधारणा-सोयींच्या स्पर्शाने. मग या सुधारणा-सोयी वाघांसाठी अभयारण्य निर्माण करण्यासारख्या इकॉलॉजीकल असोत; (माणसांना भय, अस्वल डुकरांना अभय) किंवा दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्या आदिवासींना स्वस्त दरात लुगडी मिळवून देणे, गाईगुरांसाठी वैद्यकीय सोयी मिळवून देणे, मुलांसाठी अंगणवाड्या काढणे यांसारख्या आर्थिक-शैक्षणिक असोत. टायगर प्रोजेक्टमुळे कोरकूंचे गाव उद्‌ध्वस्त होते; तर स्वस्त दरातील लुगडी सरळ रहिमशेठच्या दुकानात जातात आणि आदिवासी स्त्रियांना ती अव्वाच्या सव्वा किंमत देऊनच घ्यावी लागतात. मोहाची फुलं गोळा करून ती विकणं हा कमाईचा सर्वांत मोठा मार्ग; परंतु दलाल मंडळी वजनात, दरात फसवून कोरकूंना सरसहा नागवतात; त्यांना जीवनोपयोगी वस्तू विकताना मात्र त्यांच्याकडून भरमसाट दर घेतात. आदिवासींना गावठी दारू किंवा लालपरीसारख्या नशा आणणाऱ्या वस्तू विकतात आणि त्याबद्दल कोणी तक्रारीचा सूर लावला तर त्याला सरळ कुठल्या तरी गुन्ह्यात अडकवण्यासाठी पोलिसांपासून सर्व शासनयंत्रणा हे दलाल बरोबर

राबवतात.

अर्थात ही वास्तवता दाखवण्यामागे या कादंबरीचा हेतू समाजसुधारणेचा पुरस्कार करणे हा आहे असे नाही. कोरकू समाजजीवनाचे बदलते चित्र रंगवताना हे सर्व अपरिहार्यपणे येते आणि मुख्य कथासूत्राला ते कुठेही डोईजड न व्हावे अशा सहजतेने येते.

## जवळ येणे शक्य असूनही दूरच राहतात

तसे पाहिले तर 'झेलझपाट' ही एक सरळ रेषेत जाणारी, आक्रमक पण अबोल प्रेमाची कथा आहे आणि या प्रेमी जीवांच्या मीलनात अडथळा आणणाऱ्या शक्ती-कासमसारखा कामांध, लंपट पुरुष, किळस आणि आळस यांचा मूर्तिमंत अवतार असणारा पालकवर्ग आणि हुंडा देण्याची ऐपत असल्याविना लग्न होऊ नये असा रिवाज पाळणाऱ्या समाजाचे कायदेकानून, त्या कायदेकानूंचा आदर ठेवण्यासाठी स्वतःच्या मनःप्रेरणांना दाबून ठेवण्याचा शालीनपणा-अशा विविध स्वरूपात प्रकट होत असतात आणि एरवी चालण्या-बोलण्यात मुक्त-मोकळे असणारे आदिवासीही या शक्तींच्या एकत्रित ताकदीपुढे हतबल होऊन आपले चैतन्य हरवून बसतात. केरूच्या घरात घुसणे शक्य असूनही फुलय अलग राहते. लांबजाना (घरजावई) बनणे शक्य असूनही केरू ते टाळतो. आपल्या प्रेमाचीच मूल्ये ती दोघे जोपासतात. समाजाचा विरोध नसतानाही स्वतःच्या मूल्यकल्पनांसाठी ती कळत-नकळत दूर राहतात.

## कोरकू समाजाचे दर्शन

मधुकर वाकोडे यांनी ही प्रेमकथा सांगण्याच्या निमित्ताने कोरकू या आदिवासी जमातीचे अत्यंत डौलदार रूप रेखाटले आहे. त्यांच्यातील आधुनिक शहरी सुधारक आणि भ्रष्टाचारविरोधक व समाजसमीक्षक अधूनमधून सात्त्विक संतापाने उसळी मारून प्रकट होतो : 'देखण्या-कणग्या पण कोरकूच्या पोटासारख्या रिकाम्या. . ., ढाण्यातील वाघासारखी माणसं पण मजुरीसाठी वणवणत असणारी. . . खंडेलवालचं चुना लावलेलं घर त्या वस्तीत काळ्या चेहऱ्यावरच्या पांढऱ्या डागासारखं दिसत होते.' 'आंगणवाडीची शिक्षिका म्हणजे बिनधन्याचं शेत.' कोरकू लोक या शिक्षिकांना हरियाणा गाय आणि सरकारी अधिकाऱ्यांना सांड म्हणत. कॅफो आलाय म्हणून या शिक्षिकेला घ्यायला ड्रायव्हर येतो. ती त्याला सांगते, "बीडीओला सांग, तुझी बायको पाठव डाकबंगल्यावर कॅफोसाठी. तुझे हिशेबातले घोटाळे ती एका रात्रीत निस्तरून टाकील." 'खंडेलवाल व्यापारी त्या वस्तीला ढेकणासारखा चिकटला होता.'

कासम मण्यारवाल्याचं वर्णन करताना ते म्हणतात, "चंद्रकोरीसारख्या दाढीवर खरबुजासारखं ठेवलेलं तोंड. . . निमगोऱ्या तोंडावरील त्याची काळीशार दाढी. . . आग्यामोहळाच्या पोळ्यासारखी दिसत होती."

## निसर्ग : रोमारोमात भिनलेला

निसर्ग हा कोरकूंच्या जीवनाचा आद्य अविभाज्य घटक. सर्वव्यापी सर्वसाक्षी. या निसर्गाची विविध रूपे मधुकर वाकोडे यांनी अत्यंत तरलपणे टिपली आहेत. प्रतिमा-प्रतीके आणि नेमकी वास्तवदर्शी शब्दचित्रे यांद्वारे ही निसर्गशिल्पे डोळ्यांपुढे यथार्थपणे उभी राहतात. माघाच्या आरंभीच्या गारपीटीनं पानांच्या फर्दळ्या झाल्या होत्या. चिंध्यात लपेटलेल्या फाटक्या माणसासारखी झाडं अस्थिपंजर... उदासवाणी उभी होती. काळपट पांढरवट चट्टेपट्टे असलेल्या काही झाडांच्या उघड्या मुळ्या वेटोळे घातलेल्या अजगरासारख्या दिसत होत्या. धुळवडीच्या दिवशी कपाळावर गुलाल फासल्यावर पायाखालचा फफुटा जसा लालसर दिसतो तशी पळसाच्या झाडांची फुलं झगमगत होती... जत्रा जमल्यावर लालशेंदरी फेटाधारी माणसं जमल्यासारखी...'

तारुबांद्याचे गवळीढाणा व कोरकूढाणा अशा दोन भागांत विभाजन करणारा सलोन्याला जाणारा रस्ता. टेकडीच्या घसरगुंडीवरची कोरकूंची चौकोनी बर्फीच्या कापांच्या चळतीसारखी दिसणारी वावरं, सुकलेली सिपना नदी, विहिरीभोवती जमणारी बायांची गर्दी. गवळीढाण्यात दुधा-तुपाचा धमकारा तर कोरकूढाण्यात दारूचा भपकारा. एकीकडे सोन्याला सुस्ती आणणारं पिवळेपण तर दुसरीकडे अंधाराशी कुस्ती खेळणारं काळेपण. असे तपशील लेखकाचे ग्रह-पूर्वग्रह घेऊनच येतात. येथील दुकानेही 'लुटारू' असतात.

टेकडीच्या माथ्यावरचा कोरकूढाणा; तीस-चाळीस झोपड्यांच्या समोरासमोर दोन रांगा. मधोमध रस्ता. झोपडीपुढचा आंगणवजा सारवलेला ओटा, बासांच्या तट्ट्यांची बाज, शिंगाड्या, फटाड्या बंड्या, पलीकडच्या गवळीढाण्यातील सोन्याने मढलेल्या गौळणींच्या अंगाला येणारा तुपकट वास, गावच्या शीवेलगतचे झाडाखालचे मुंडाचे ठाणे. मूंड कोरकूंचे पितर म्हणून नागाच्या प्रतिमा, माथ्यावर सूर्याचे प्रतीक, मागे चंद्रकोर. लाकडाच्या गाभ्यात कोरलेले घोडेस्वार पितर आणि मुढवाभर नृत्य करणारे कोरकू.

## धुंद-मुक्त जीवन

जवळच्या जंगलात असणारा वाघ-अस्वलांचा वावर. मोहाच्या झाडाची फुलं गोळा करण्याचा हंगाम. त्या वेळी मोहफुलांचा सडा जमिनीवर पडतो. त्याचा मादक उग्र दर्प उंडारत वाहतो. अस्वले ही फुले खाण्यासाठी येतात. कोणी माणूस त्यांच्या वाटेत आला तर त्याला खलास करतात. इंधनाच्या मोळ्या, मोहफुलाच्या पाट्या घेऊन बायका येतात. मोहाची दारू पितात. रात्ररात्र नाचतात. होळीच्या वेळी तर नाच-गाण्यांना ऊत येतो. पिरिंग निरिंग जिंगच्या तालावर कमरेभोवती दुप्पटीचं लुबू नेसलेल्या पोरी टिकल्या लावलेले रुमाल-टपऱ्या घेऊन नाचासाठी घेर धरतात. ढोल-पिलमपोवे घेऊन तरुणही हजर होतात... गौलखेडचा बाजार; होळी पौर्णिमेचा उत्सव, चैत्राच्या चैतन्याची रानभर पसरणारी

लुसलुशीत कळा, नवख्या करकोचांचे धीट कळप, चैत्री अमावास्येपासून देवदर्शनाला निघणाऱ्या बंड्या, सीपनाच्या डोहातल्या खोल कपारी; त्यात चालणारी मासेमारी, त्या कपारीत वास्तव्य करणाऱ्या सात आसरा. . . या सर्व निसर्गाशी आणि ऋतुचक्राशी कोरकू स्त्री-पुरुषांचा जीवनक्रम पक्का बांधला गेलेला असतो. त्यांच्या साक्षी-संगतीतच त्यांच्या जीवनातील साऱ्या बऱ्यावाईट घडामोडी घडत असतात. कादंबरीतील सर्वच पात्रांच्या जीवनातील निर्णायक घटनांकडे येथील निसर्ग केवळ साक्षीदार म्हणून पाहतो असे नाही, त्या घटनांना तो आकारही देत असतो. मोहाची दारू प्याल्यावर धुंद तरुण-तरुणींना तो एकत्र आणतो. तसेच मासोळ्यांच्या मागे धावणाऱ्या केरूला डोह आपल्या कवेत घेतो. मोहाची फुले खाण्यात गढलेली अस्वले फुलयाच्या आईचे अतिक्रमण सहन करीत नाहीत. ते तिचा फडशा पाडतात. जंगलातला वाघ चुकून मार्गात आलेल्या गाईचा बळी घेतो आणि वाघाच्या मिशीचे केस मटणातून कासमच्या पोटात गेले की तो मरणार हे फुलयाच्या डोक्यात पक्के असते आणि त्याचा ती पडताळा घेते. अस्वलांची मादी कामातुर होऊन पुरुषाला नको ते करायला भाग पाडते. अस्वलीच्या नाजूक भागाचा तुकडा मंत्र टाकून तोंडात ठेवला की समागम करताना अचाट ताकद येते, यासारखे समजही या कोरकूंमध्ये दृढ रुजलेले असतात. निसर्गातील प्रत्येक घटकाशी कोरकूंचे घनिष्ठ नाते असते.

## व्यक्तिरेखांचे वैभव

श्री. मधुकर वाकोडे याच नेमकेपणाने तारुबांद्यातले रहिवासी आपल्यापुढे जिवंत करतात. या प्रेमकथेचा नायक केरू. मॅट्रिकपर्यंत गेलेला एकमेव कोरकू तरुण. पेपर वाचणारा, उंच शेलाट्या अंगाचा. धोतराऐवजी पायजमा-शर्ट घालणारा, केसांचा भांग पाडणारा, तुकतुकीत काळ्या रंगाचा, बोलक्या डोळ्यांचा, बसके नाक, पसरट चेहरा, भुवयांच्या मधली टिळ्यासारखी मस, हनुवटीवर चार-पाच केसांचा पुंजका. बापापासून अनेक हुन्नर शिकलेला. गुल्लरचा अचूक मारा करणारा, बासाच्या कमच्यापासून नाना वस्तू बनविण्यात पटाईत. मासोळ्या पकडण्यात वाकबगार. नाचगाण्यात हुशार. खराखुरा आदिवासी कोरकू हिरो आणि त्याच्यावर प्रेम करणारी फुलय. आईला अस्वलानं खाल्लं. ऐन यौवनात पदार्पण करताना घरची जबाबदारी पडलेली. दारूत सदा धुंद असलेल्या बैठ्या बैलासारख्या बापाला सांभाळणारी. पिळदार पोटऱ्या, उभट स्तन, बसके नाक, डोळ्यात वणव्याच्या ज्वाळा. गळ्यात हिरव्यागार मण्यांच्या माळा, गोंदणाचा निळसर ठिपका. काळसर पाणीदार चेहरा. ती मोहफुले गोळा करते. मोळ्या आणते. केरूच्या घरात घुसायची इच्छा बाळगते. आपला बाप केरूच्या बापाला भेटून रीतसर लग्न का ठरवत नाही हे तिला उमगत नाही. केरूबरोबर ती होळीपुनवेला नाचते. त्याच्याबरोबर मासळी पकडायला जाते. आपल्याशी लगट करू पाहणाऱ्या कासम मण्यारवाल्याला ती धुडकावून लावते. वाघाच्या मिसऱ्याचे केस मटणातून खायला लावून त्याला खंगून खंगून मरायला भाग पाडते; परंतु

इकडे केरू मासळी काढताना डोहात बुडतो. तो परत वर येतच नाही. आपण केरूबरोबर असतो तर तो बुडला नसता, आपण आधीच त्याच्या घरात घुसलो असतो तर जातपंचायतीनं त्याला मान्यता दिलीच असती, अशी विचारांनी ती उद्विग्न होते.

बापानं कासमला लाडावलं नसतं तर केरूच्या मनात आपल्याबद्दल संदेह निर्माण झाला नसता. त्यानं अबोला धरला नसता. ती तुंब्यातली शिडू पिते. मोहफुलानं उत्तेजित होते. झोपलेल्या बापाच्या तोंडात ती घोटभर दारू ओतते. घराबाहेर पडते. शीवेवरच्या नागप्रतिमेवर तुंब्यातील सगळी दारू ओतते. अनवाणी पायांनी दगडांना ठेचकाळत नदीतल्या त्या डोहाकडे जाते. कुंडात कुणी उडी मारतंय असं तिला वाटतं. ती त्याला हाक मारते. केरू सुरकांडी मारून वर आलाय असे तिला जाणवते. ती त्याच्या पाठोपाठ उडी घेते. सीपना नदीच्या कोरड्या पात्रात 'लाहोरी फसी गई राम'चे सूर थरथरतात.

जवळ येणे शक्य असूनही जवळ न आलेले हे युगुल मृत्यूनंतर एकत्र येते. फुलयच्या मैत्रिणीही या कथेत डोकावतात. सोमा पाटलाची शिसमच्या लाकडासारखी बायको रमोती गळयात हम्मल, चांदीच्या साखळ्या घालून त्याच्या घरात शिरते. मालाय आपल्या नवऱ्याबरोबर माहेरीच राहते. कारण नवऱ्याने हुंड्याची रक्कम चुकवलेली नसते. सासऱ्याकडे वर्षभर नोकरी करून ती फेडल्यावरच त्याला बायकोला घेऊन स्वतःचा संसार थाटायचा असतो. . . गावचा तलाठी उत्तम; त्याचा भाऊ विठू; चौकीदार संपत. . . मोपाबरोबर होणारी त्यांची मद्यपानाची बैठक. . . गिधाडी दृष्टीचा कासम मण्यारवाला, कर्जापोटी कोरकूंचा सारा माल हडप करणारा रहीमशेठ, व्यापारी खंडेलवाल, स्वतः कोरकू असूनही आता सोसायटीचे सेक्रेटरीपद मिळाल्यावर साहेब बनलेला वुईके; आंगणवाडीची शिक्षिका नकार देते तेव्हा तिची गैरसोयीच्या गावी बदली करणारे उन्मत्त अधिकारी, गुरांच्या दवाखान्यात आलेले सेवाभावी डॉक्टर आणि त्या शिक्षिकेशी जुळलेले त्यांचे स्नेहरज्जू. . . या सर्वांच्या चित्रणात अंतर्भूत असलेला सद्यःकालीन विसंवादी, भ्रष्टाचारी जीवनपद्धतीचा अंतःप्रवाह. यांमुळे या कादंबरीला मोठा कॅनव्हास लाभतो. तिचा आवाका मोठा होतो, कादंबरीतील समाजजीवनाच्या अंगोपांगांचे, निसर्गाचे तपशील उपरे बनत नाहीत; वृत्तपत्रीय पातळीवर रेंगाळत नाहीत. ते एकूण जीवनानुभूतीचे रंग गर्दगडद करतात. ताणतणाव संघर्षपूर्ण बनवतात. फुलयने केरूपाठोपाठ जलसमाधी घेण्याची घटना ही मात्र एकदम 'ॲबरप्टली' आल्यासारखी वाटते. कोरकू समाजातील स्त्री-पुरुष संबंधातील मोकळेपणाच्या पार्श्वभूमीवर फुलयचे हे सतीपण काहीसे अनपेक्षित ठरते. वाचकाची त्या दृष्टीने पुरेशी मानसिक तयारी कथानिवेदनात केली गेलेली नसते. तरीही बदलत्या कोरकू समाजजीवनाचे एक अस्सल, विश्वासार्ह बृहद्‌दर्शन ही कादंबरी घडवते. अनावश्यक पसारा न मांडता, विशेष घोळ न घालता घडवते, म्हणून ही कादंबरी लक्षवेधक ठरते.

(झेलझपाट : डॉ. मधुकर वाकोडे, देशमुख आणि कंपनी, ४७३ सदाशिव पेठ, पुणे ३० पृष्ठे १००, चाळीस रुपये.)

# वृत्तान्त : श्री. ज. जोशी

## *दूरदर्शनच्या रिपोर्ताज् तंत्राने सादर केलेला कुलवृत्तांत*

'वृत्तान्त' ही श्री. ज. जोशी यांची नवी गद्य कलाकृती. त्यांनी स्वतःच प्रास्ताविकात म्हटले आहे की, 'खरे तर रूढ अर्थाने ही कादंबरी नव्हे. तिच्यात नायक-नायिका, खलपुरुष वगैरे मंडळी नाहीत. शंभर वर्षांचा काळ हाच इथे नायक आहे. त्याची सर्व अंगोपांगे निरनिराळ्या हकिगतींच्याद्वारे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. सर्वसामान्यांचे जीवन गंगेप्रमाणे सतत वाहणारे. . . वृत्तांतमध्ये दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.' परंतु आपल्या वृत्तांतवरील लेखाचा शेवट करताना मात्र श्री. ज. जोशी पुन्हा म्हणतात, "अशी ही थोड्या निराळ्या पद्धतीची कादंबरी." श्रीजंच्या मनातच या लेखनाला काय म्हणावे याबद्दल गोंधळ आहे. कादंबरीची फूटपट्टी या लिखाणास लावता येणार नाही, असे त्यांचे त्यांनाच जाणवत असल्यामुळे या पुस्तकाची मूळ कल्पना सुचल्यावरही वीस एक वर्षे ती तशीच राहिली. यांपैकी काही हकिगतींना कथा-कादंबऱ्याचा घाट देण्याचा प्रयत्नही त्यांनी करून पाहिला, पण तोही जमला नाही असेही त्यांनी सांगितले आहे. रूढ वाङ्मयीन प्रकारात काही अनुभव बसवता येत नाहीत. त्यामुळे लेखकाला अडल्यासारखे होते. श्री. ज. जोशी यांच्याबाबतीतही हेच घडलेले दिसले.

हे लिखाण वाचल्यावर मला जाणवले ते हे की, कमलेश्वर दूरदर्शनवर जो 'परिक्रमा' किंवा 'बंद फाईल' हा कार्यक्रम करीत, त्या तंत्राचा या लेखनावर प्रभाव आहे. किंबहुना असेंही म्हणता येईल की, दूरदर्शनच्या प्रभावाने निर्माण झालेला हा नवा वाङ्मय प्रकार आहे.

### दूरदर्शनचे तंत्र

जोशी घराण्याचा शंभर-दीडशे वर्षांचा हा कुलवृत्तांत आहे आणि तो 'परिक्रमा'सारख्या दूरदर्शनवरील कार्यक्रमाच्या ढंगात पेश करण्यात आला आहे. दूरदर्शनवर अर्थातच मुलाखतींवर भर असतो, येथे भिकाजी लंबोदरांच्या बाडात

सापडलेल्या कागदपत्रांवर किंवा संबंधितांनी पाठवलेल्या पत्रांवर भर आहे आणि शंभर-दीडशे वर्षांच्या कालावधीत मूळ वेळणेश्वराच्या असणाऱ्या जोशी घराण्याच्या वंशविस्ताराच्या शाखा-उपशाखांच्या प्रवासाचा आणि चढउतारांचा धावता आढावा घेण्याचा प्रयोग 'परिक्रमा'सदृश कार्यक्रमात जसा दाखवावा लागला असता, तसाच 'वृत्तांत'मध्ये दाखवण्यात आला आहे. निरनिराळ्या व्यक्तींच्या मुलाखतींना जोडणारे भाष्य करणे व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांकडे लक्ष वेधणे हे काम परिक्रमाचे संयोजक-निवेदक म्हणून कमलेश्वर करीत. येथे ते काम श्रीज करीत आहेत. त्यांच्या कॉमेंटरीने अनेक व्यक्तींची आत्मनिवेदने जोडली गेली आहेत. घराण्याच्या इतिहासाच्या अनेक अंगोपांगांमधील समान/ असमान दुवे भाष्याद्वारे स्पष्ट करण्यात आले आहेत.

## शाब्दिक परिक्रमा

दूरदर्शनचा कॅमेरा कोकण किनाऱ्यावर रेंगाळेल, वेळणेश्वराच्या मंदिरावर झेपावेल, तेथील गावाला प्रदक्षिणा घालील, तेथील व्यक्तींचे दर्शन घडवील, कधी लांबून, कधी जवळून. मध्येच इतिहासातील दृश्य दाखवील, मध्येच पुण्या-मुंबईला रमेल, अमेरिका-इंग्लंडमधील दृश्यांवर स्थिरावेल, कधी स्वप्नदृश्यात रमेल. त्या त्या काळच्या पोशाखातील नरनारी हुबेहूब पेश करील. कुठे जास्त वेळ रमेल, कुणाला क्षणार्धात कटवील. भूतकाळातून वर्तमानकाळात, वर्तमानकाळातून स्वप्नदृश्यात, पुण्याहून एकदम पाकिस्तान अन् मुंबईहून एकदम टिळकांच्या कोठडीत– टी. व्हीचा कॅमेरा निःसंकोच फिरत राहतो. 'वृत्तांत'मधील विविध किस्सेही अशाच तऱ्हेने जोशीबुवा आपल्यापुढे पेश करतात. म्हणूनच 'वृत्तांत'म्हणजे जोशी घराण्याच्या दीडशे वर्षांच्या वाटचालीची दूरदर्शन तंत्राने घडवलेली शाब्दिक परिक्रमा होय. दूरदर्शनचा प्रभाव आपल्या वाङ्मयप्रकारांवर विविध अंगांनी पडत आहे. यापूर्वी चित्रपटाच्या तंत्रानेही आपल्या कथाकादंबऱ्यांच्या रचनापद्धतीत बरेच बदल घडवून आणले आहेत. त्यामुळे दूरदर्शनसारख्या सर्वव्यापी माध्यमाच्या प्रभावापासून आपले वाङ्मयीन प्रकार मुक्त राहू शकतील, अशी अपेक्षाही अ-वास्तव ठरेल.

'वृत्तांत' ही कादंबरी नव्हे असे म्हटले तरी ही परिक्रमा लक्षवेधक वा वाचनीय नाही, असे म्हणता येणार नाही. एका घराण्याच्या दीड-दोनशे वर्षांच्या वंशविस्ताराच्या विविध शाखा-उपशाखांच्या प्रवासाचा आणि चढउतारांचा आलेख रेखाटण्याचा हा प्रयोग निश्चितच महत्त्वाकांक्षी आहे.

सुप्रसिद्ध कथा-लेखक दि. बा. मोकाशी यांनी जोशी कुलवृत्तांत हा ग्रंथ तयार केला होता हे आपल्याला श्रीजंच्या निवेदनातून कळते. (मोकाशी हे मूळचे जोशीच!) हा पाच-सातशे पृष्ठांचा ग्रंथ म्हणजे अनेक जोशी कुटुंबियांच्या अस्सल जीवनकथांचा कोशच होय. त्याच्याच जोडीला वेळणेश्वर या आपल्या मूळ गावी जाऊन तेथील वयोवृद्ध अप्पांनी सांगितलेल्या कुलकहाणीतून व त्यांनी जमवलेल्या जोशी घराण्याच्या माहितीच्या बाडांतून

श्रीजंना खूपच खाद्य मिळाले. अनेक 'केस हिस्टरीज' त्यांच्यासमोर आल्या, अनेक नाट्यपूर्ण घटना, नियतीच्या गूढ रम्य फेऱ्यांची आवर्तने, एकेकाच्या नशिबाची तऱ्हा त्यांना खुणावू लागल्या. त्यांच्यातील कथालेखक त्या घटनातून कथांचे घाट शोधू लागला, कादंबऱ्यांचा वटवृक्ष हेरू लागला; परंतु वीस एक वर्षे या विषयाशी सतत झटापट करूनही मनासारखे रंगरूप त्याला देणे जमेना. त्या विशाल कुटुंबाच्या चित्रविचित्र पसाऱ्याला सामावून घेईल अशी नेमकी कलात्मक चौकट गवसेना.

जोशीबुवांच्या जाणकार वाचक मित्रांनी सल्ला दिला की, तुम्ही अॅलेक्स हेलीची 'रूट्स' ही कादंबरी वाचा; 'ऑल दि मॉम्स' ही कादंबरी वाचा. परंतु जोशीबुवा पक्के पुणेरी ! पुण्यातल्या कुठल्याही रद्दीच्या दुकानात देखील सहज मिळू शकणारी ही पुस्तके जोशीबुवांना म्हणे प्रयत्न करूनही वाचायला मिळाली नाहीत. पुण्यात फिनिक्ससारखी लायब्ररी आहे, पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय आहे याचे सोयीस्कर विस्मरण जोशीबुवांना वयोमानानुसार व्हावे हे काही नवल नव्हे ! ती पुस्तके वाचूनही जोशीबुवांच्या 'वृत्तांता'चे रूप बदलले असते असे नव्हे, परंतु जोशीबुवांचे प्रकृती वैशिष्ट्य नेमके प्रकट करणारा हा उल्लेख त्यांच्या प्रास्ताविकात आला आहे, म्हणून त्याकडे लक्ष गेले एवढेच ! जोशीबुवांनी ही पुस्तके वाचली असतीलही ! परंतु त्यांचा जो एकूण मुखवटा आहे त्याला अशी कबुली देण्यात स्वारस्य नाही एवढेच ! मग आपणही अविश्वास दाखवू नये. कबूल. 'परिक्रमा' तंत्राने जोशीबुवांची या कोंडीतून सुटका झाली. कथा-कादंबरीच्या चौकटीत न बसणारा हा विषय त्यांना शेवटी मनासारखा पकडता आला.

परंतु जोशीबुवांनी आपल्या घराण्याचा हा मागोवा घेताना मात्र त्यात सत्य तेच सांगेन असा बाणा कुठेच प्रकट केलेला नाही. जोशी कुलोत्पन्नांच्या नावावर गेल्या शतकभरातील अनेकविध नाट्यपूर्ण अथवा चमत्कृतिपूर्ण घटना त्यांनी सफाईने खपवल्या आहेत. वास्तव आणि काल्पनिक यांचे बेमालूम मिश्रण करण्याची किमया त्यांनी दाखवली आहे. श्री. दा. पानवलकर यांची गोष्टही त्यात संक्षेपाने येऊन जाते. (पृष्ठ १८-१९) (आता श्री. दा. पानवलकरांनी ती कल्पना कुठून घेतली हा आणखी संशोधनाचा विषय व्हायला हरकत नाही.) कोकणस्थांच्या साठ-पासष्ट कुलवृत्तांतातील काही नाट्यपूर्ण घटनाही जोशीबुवांनी आपल्या या वृत्तांतात चपखल बसवल्या आहेत. या वृत्तांतात काही खरे जोशी भेटतात. ते खऱ्या घटनांचे साक्षीदार-नायक आहेत; परंतु त्यांच्याबरोबर जे काल्पनिक जोशी इतरांच्या जीवनातील घटनांची कलमे आपल्यावर करून अवतरतात– त्यांचा शहानिशा करणाऱ्यांची दमछाक व्हावी इतकी चतुराई जोशीबुवांनी निश्चितच दाखवली आहे.

## शंभरावर व्यक्तिरेखा

एका दृष्टीने हे पुस्तक म्हणजे एक बृहत् चरित्रकोशच आहे. वेगवेगळ्या शंभरेक व्यक्तींच्या जीवनरेखा यात एकमेकांच्या साक्षी काढत आपापल्या अस्तित्वाच्या खाणाखुणा

पटवून देताना आढळतात. त्यातली विविधताही अगदी चक्रावून सोडणारी. सतराशे सात-आठ मध्ये वेळणेश्वरला राहणारे गणेशभट जोशी, त्यांना भेटलेले बाळाजी विश्वनाथ (पुढे पेशवे), त्यांनी पुण्याला केलेले आगमन, अठराव्या शतकाच्या शेवटी रत्नागिरीहून पुण्याला येऊन लोकहितवादींच्या वडिलांकडे नोकरीला राहिलेले जोशी, टिपू सुलतानाविरुद्ध लढाईवर गेलेला, वसई तालुक्याची मामलत मक्त्याने घेऊन भोगणारा जोशी, इस्टेटीच्या निम्मी रक्कम वकील फी म्हणून मिळाल्यावर हर्षवायूचा झटका आलेला जोशी, काशीला जाऊन डोक्यावरून नृसिंहाची मूर्ती आणून परचुरे यांच्या जागेत त्याची स्थापना करणारा जोशी. बाळंतविड्याच्या निमित्ताने राजपुरुषाचे पाय घराला लागणार, घरात लक्ष्मी येणार म्हणून त्या मुलाच्या मृत्यूची बातमी दडवून ठेवणारी हिकमती आत्याबाई, ब्रह्मावर्ताला, दुसऱ्या बाजीरावाबरोबर गेलेला जोशी कुळातला मूळ पुरुष, अमेरिकेत आपण सुखी नसलो तरी भारतात येणंही शक्य नाही अशा कैचीत सापडलेला उमाबाईंचा मुलगा, देवदर्शनाचा ध्यास घेऊन नवपरिणीत बायकोला टाकून बैरागी बनणारा आत्याबाईंचा नवरा, रेव्हरंड टिळकांच्या बरोबर ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्यांपैकी एकाच्या मुलीशी प्रेमविवाह करणारा, पण 'मी ब्राह्मण आहे' असे म्हणणारा मनोहर जोशी, बुटाचे बंद बांध असे सांगणाऱ्या गोऱ्या साहेबाला उचलून खंदकात फेकून देणारा रामकृष्ण भट, सरदार विंचूरकरांबरोबर ब्रह्मावर्ताला गेलेले व नानासाहेबांनी मागून घेतलेले, संन्याशी वेशात मुंबईला येऊन नाना शंकरशेट यांच्या आधाराने जम बसवून, लंगड्या रुक्मिणीशी लग्न करून वेळणेश्वरला जाऊन राहिलेले बाबाजी जोशी (आमच्या घराण्याचा-ज्ञात मूळ पुरुष) अशा नव्या जुन्या काळातल्या व्यक्तींची ओळख आपल्याला होते.

सर्व व्यक्तींना सामावून घेण्यासाठी श्री. ज. जोशी यांना अनेक प्रकारच्या कसरती कराव्या लागल्या आहेत. वेळणेश्वराला जाण्यासाठी श्रीधर भिकाजीच्या पत्राचे व भिकाजी लंबोदरांच्या वाढदिवसाचे निमित्त काढावे लागले आहे, तर कानपूर-ब्रह्मावर्ताला जाण्यासाठी माईंच्या कन्येच्या स्थळाचे निमित्त आणावे लागले आहे. अधूनमधून भिकाजी लंबोदरांच्या बाडातील कागद किंवा जोशी कुलवृत्तांतासाठी केलेल्या आवाहनानुसार आलेली पत्रे पेरण्यात आली आहेत. आपल्या पूर्वजांच्या जीवनातील घटना उभ्या करण्यासाठी दिवास्वप्नांचा किंवा स्वप्नाभासांचा आश्रय घेण्यात आला आहे. भरीला 'मला गंमत वाटली', 'माझ्या मनात विचार आला', 'मी तडफडत होतो', 'मी सुन्न झालो', 'मी स्वतःशीच हसलो', 'सगळीच गंमत होती', 'डोकं भणभणायला लागलं' अशी वाक्ये वरचेवर आहेतच. म्हणूनच तंत्रदृष्ट्याही हा एक लक्षणीय प्रयोग ठरतो. जोशी घराण्याची ही परिक्रमा आवर्जून बघावी (सॉरी ! वाचावी) अशी आहे.,

(वृत्तांत : श्री. ज. जोशी, मॅजेस्टिक प्रकाशन, ३१६ प्रसाद चेंबर्स, गिरगाव नाका, मुंबई ४. पृष्ठे २७५, किंमत ७० रुपये.)

□

# मेड इन इंडिया : पुरुषोत्तम बोरकर

*विनोदाचा ताजा गजरा*

'मेड इन इंडिया' या नावावरून तुम्ही नक्कीच गोंधळात पडाल. 'मेड इन जपान'च्या धर्तीवर ही कोणती चीज आहे की जी इंडियात बनली आहे ? तूर्त तरी इंडियात बनलेल्या कुठल्याही मालाचा दर्जा असा असतो की, मेड इन इंडिया असे त्यावर लिहिणे म्हणजे त्या मालाची बदनामीच करणे होय, परंतु पुरुषोत्तम बोरकर या पत्रकाराने लिहिलेले 'मेड इन इंडिया' हे पुस्तक मात्र खरोखरच धमाल उडवून देईल. या पुस्तकाला अनुष्टुभ या द्वैमासिकाच्या लघुकादंबरी स्पर्धेत १९८१ मध्ये दुसरे बक्षीस मिळालेले होते आणि त्याचे दीर्घ रूप म्हणजे दीडशे पृष्ठांचे हे पुस्तक १९८७ च्या डिसेंबरात बाजारी आले आहे. आता कादंबरी असे या पुस्तकाला म्हणायचे तर मोठी आफतच आहे. कथा नसलेली नवकथा आपल्याला ज्ञात आहे. नाट्य नसलेले नवनाट्य आपल्याला कधीमधी बघायची सवय आहे, परंतु प्लॉट वा कथानकविरहित अशा या पात्रमुखी निवेदनाला कादंबरी म्हणताना कोणालाही आपल्या वाङ्मयीन औदार्याची संकल्पना फारच ताणावी लागेल. सई परांजपे यांच्या 'नांदा सौख्यभरे'टाईप हा एक रेव्ह्यूच आहे असे फारतर म्हणता येईल. हशावर हशे आणणारी, गमतीदार किस्से सांगणारी, एका अगदी किरकोळ सूत्रात गोवलेल्या प्रासंगिक घटनांची व निरीक्षणांची मालिका गुंफणारी ही एक गमतीदार गद्यकृती आहे. कादंबरी असा शिक्का या गद्यकृतीवर न मारला तरी तिचे मोल काही कमी आहे असे नव्हे. 'कोसला'सारखाच चर्चाविषय होईल असा हा एक अत्यंत टवटवीत, फ्रेश वाण.

## सरपंचाबरोबर गरसोळी खुर्दचा फेरफटका

तर वाचकराव, आपणाला पंजाबराव साहेबराव पाटील, बी.ए. सरपंच, ग्रामपंचायत गरसोळी खुर्द यांच्या गढीत फेरफटका मारून यायचे आहे. भाऊ पंजाबराव हे आपल्याला अगदी स्टार्टिंगपासून ते थेट धी एन्डपर्यंत गाईड करणार आहेत. कधी कधी भाऊ पंजाबराव तंद्रीत आल्यावर स्वतःशीच बोलत राहतात, पण त्या वेळीही तुम्ही बारीक कान केला तर ते

स्वगत तुम्हाला जेम्स बाँडची शागिर्दी न करताही कळणे अवघड जाणार नाही.

अर्थाच फर्स्ट ऑफ ऑल, भाऊ पंजाबराव हे आपल्याला त्यांच्या गरसोळीला घेऊन जाणार. ते सरपंच आहेत. तेव्हा आधी आपल्याला सरपंचकी कशी मिळाली त्याची सगळी हिस्टरी सांगणार. तसा त्या स्टोरीत फारसा सस्पेन्स नाहीय. त्यांचे तात म्हणजे डॅडी हे गावचे सरपंच. पिढीजात सरपंचकी कंबरपट्टा याच घराण्याकडे. तेव्हा इथुल्ल्या शिस्टिमप्रमाणे शहरात राहून सात-आठ वर्षे शिक्षान घेऊन बी.ए. झालेल्या पंजाबरावची इच्छा नसली तरी सरपंचकीचा मुकुट त्यांच्या बुढ्याने त्याच्या मस्तकावर ठेवलाच. पंजाबरावला या सरपंचकीच्या इलेक्शनबाजीत, बोगसबाजीत, मुजोरलोलूप प्रकारात रस नाही, पण चेतनच्या आखरी बॉलवर मियांदादने रपसप छक्का मारल्यागत झालं आणि पंजाबरावचं सगळं बोलणं बुढ्याने फुलस्टॉपसारखं वोपलं, अन् सामना खिशात टाकला. पंजाबरावला सरपंच केल्यावर त्याच्या बुढ्यानं गावाला सांगितलं, "हे सरकेल माह्या मनासारखं वागले ना तर मंग मी गांधी-नेहरूले खेटूनच माझी समाधी बांधतो. अन् नोटांची कमाई किंती? तर गरसोईपासून थेट दिल्लीपर्यंत केवळ शंभराच्या थप्प्या लावतो आणि त्यावरून चालत जातो." "मात्र हे स्वप्न साध्य होण्यासाठी पंजाबनं रातरातभर जागून पुस्तकं वाचणं अन् कविता लिहिणं सोडलं पाहिजे.. ब्रामनाईसारखं आपन केलं तर ते जमणारं नाही." असाही इशारा तो देतो.

## संगमरवरी समाधीचं स्वप्न

साहजिकच इथंच घोडं पेंड खातं. सरपंच झेडपी-आमदार अशा उड्या मारत आपलं उपद्रवमूल्य वाढवत डांगचिकिडांग करत डायरेक मिनिस्ट्रीत राज्यमंत्री- विदर्भाचा बॅकलॉग डमरूसारखा वाजवत तांडवरूपी थयथयाटाचं प्रहसन पार पाडून कॅबिनेट मंत्री मग मुख्यमंत्री- आणि तेथून सातपुडा चक्क हिमालयाच्या मदतीला- असं धतिंग करून भूमी सोडून अन्य स्टेटचा इंडियाचा दुसरा पीएम- लाल किल्ल्यावर भाषण - आणि बुढ्याची संगमरवरी समाधी यमुनातीरी राजघाटावर बापूजींना खेटून. . . हे सारं स्वप्न मनातच राहतं. होतं नव्हतं ते सोनंनाणं, जमीनजुमलं जुगारात गेल्याने एन्ड्रीन पिऊन बुढा आत्महत्या करतो अन् जीवघेण्या आजारात उरलंसुरलं खर्च होऊन पंजाबरावाला सरपंचकीचा राजीनामा देऊन आपल्या मृत्यूनंतर आपली होणारी अर्धा कप राखळ भूलीतून पूर्णेत, पूर्णेतून तापीत आणि तापी नदीतून खंबायतच्या आखातातून अरबी समुद्रात कशी जाईल ते दिसू लागते, इथपर्यंतचे हे आख्यान आपल्याला ऐकायला मिळते.

## ग्रामीण राजकारणाचा खाक्या

गरसोळी खुर्दमध्ये पंजाबरावबरोबर हिंडताना आपल्याला तेथील अनेक नग भेटतात. त्यावरची पंजाबरावची लाइव्ह कॉमेंट्री ऐकायला मिळते आणि ग्रामीण इंडियाचे एक नवेच

दर्शन घडते. झेडपीद्वारे होणाऱ्या नळयोजनेच्या शुभारंभाची बातमी ..टोसह वाचायला मिळते. या योजनेचा लाभ 'शून्य गरसोळीवासीयांना मिळणार असून संकल्पित योजना टप्प्याटप्प्याने इ. स. २०८७ पर्यंत पूर्ण होईल. पहिल्या टप्प्यात ५० हजार गॅलन जलसंचय क्षमता असेल, दुसऱ्या टप्प्यात ती २५ हजार गॅलन इतकी होईल व तिसऱ्या टप्प्यात ती भूमिपूजनाच्या पातळीवर येईल, तिला ३६.६३ लक्ष रुपये खर्च येईल असे अभियंता बकासूर साहेब यांनी सांगितले.' अशी पुस्तीही बातमीला असते.

## गमतीदार व्यक्ती आणि वल्ली

सरपंच पंजाबराव आपल्या पाहुणचाराला आधी आपल्याला नेऊन आपल्या बुढ्याची, घराण्याच्या मोठेपणाची हकिगत सांगणार हे ओघानेच आले. एस.टी. स्टँडवर उतरल्यावर समोर दिसणारी हॉटेल्स व पानपट्टीची दुकानं, (पायालगत पिंक टाकताच तुम्ही खरे गरसोळीकर बनता) तेथील न्यू ड्रीमलँड हॉटेलचे आणि त्याचे मालक मांगीलालशेठ (तुफान च्येत्रेबाज, ऑलराउंडर, रतन खत्री युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सेलर, अळमाप खाऊन पगरल्यावानी ढ तबीयत) यांची ओळख होती. मांगीलालशेठनी चाळीस वर्षात गावात मटका, हातभट्टी, व्हिडिओ वगैरे आणून गावाचा कसा कायापालट केला त्याचीही झलक पंजाबराव दाखवतो. शहरात शिक्षणाबरोबर केलेले इतर पराक्रम अधूनमधून सांगूनही मजा आणतो. शेतावर काम करणाऱ्या बाया, त्यांचे नखरे, घरी आईच्या भेटीला येणाऱ्या बायकांचे किस्से, तमाशात नाच्या म्हणून काम केलेला आणि आता पाटलांकडे हरकाम्या म्हणून राहिलेल्या नथ्थूची चित्तरकथा, रेडिओवरून ऐकलेली नवकथा वा नवकाव्ये, राखणीला ठेवलेले कुत्रे, काकडआरती टाळण्यासाठी मळ्यात रात्री मुक्कामाला जाणे, गप्पा मारण्यात पटाईत असा गंपलास बुढा, लग्नातल्या पंगतीच्या तऱ्हा, बुद्धपुऱ्यातल्या फाइव्ह स्टार कंट्री डिस्को बारमध्ये रंगणारे नाट्यपूर्ण प्रकार, शेतावरून दिसणारे निसर्गाचे हिरवेगार गोंडस रुपडे, ऋतुचक्रातले नवलाईचे बदल, कुठं साप निघाला तर तो मारण्याचे तुळशीराम ठाकऱ्याचे व शेषरावाचे टेक्निक, शेजारच्या शेवंता बुढीनं सांगितलेल्या गोष्टी, विदर्भातल्या निरनिराळ्या स्थळांचा धावता ट्रेलर, बुढ्यानं पंजाबरावसाठी पोरी बघायचा चालवलेला खटाटोप. पंजाबरावचं लग्न, दुसऱ्या वर्षी त्याला लाभलेलं पितृपद, पुढे आलेलं आजारपण, वर्षातली तीन मेजर ऑपरेशन्स, त्यात झालेला अमाप खर्च आणि सरपंचकीचा राजीनामा दिल्यावर पुढं दिसणारा आपला एंड अशा विविध मालमसाल्यानं या पंजाबरावच्या आत्मकथनाला लांबी-रुंदी आणली आहे. विविध विषयांवरील त्याच्या सूत्रमय चिंतनात्मक बोधवचनांनीही सोळा पृष्ठे व्यापली आहेत आणि या सगळ्या आत्मकथनाला उपरोधपूर्ण तात्त्विक व सामाजिक आशयाची जोड दिली आहे.

## व्यावहारिक शहाणपणाचे नवनीत

अशी काही सूत्रमय निरीक्षणे वानगीदाखल द्यायचा मोह आवरत नाही.

* दारासिंग, शेख मुख्तार, रंधवा हे त्रिकूट म्हणजे आपले एकेकाळचे दत्तात्रयच.
* माणसाला जे आवडते ते कराल तो जवा प्रारंभ करते, तेव्हाच त्याच्या अत्यंत बिकट अडीअडचणींना प्रारंभ होत असते. टी. एच. व्हक्सले.
* येबीशीळी, मारली चिळी, घातली खिशात, तेली बाजारात, इकली हजारात. याचा अर्थ काय भाऊ पंज्याब ? तर इंग्लिश कमांड पाह्यजे, कमांड !
* यूनो- बोल्याले बोलकी अन् कामाले हलकी.
* जिंदगी कुछभी नही, तेरी मेरी कहानी है ।
* हिटलरचे मानचिन्ह अन् आपलंही मंगलचिन्ह स्वस्तिकच. या साम्याचे डिटेल्स मिळवले पाहिजेत.
* राष्ट्रीय पेय- दारू, राष्ट्रीय खेळ- जुगार, राष्ट्रीय वृक्ष- बेशरम, राष्ट्रीय पक्षी- डास, राष्ट्रीय प्राणी- म्हैस.
* क्रिकेट हाच आपला राष्ट्रीय खेळ. टी.व्हीवरून दाखवल्या जाणाऱ्या मॅचेस हेच या खंडप्राय देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेचे एकमेव सूत्र.
* जिनको प्यार है चांदीसे, इश्क सोनेसे वही कहेंगे की हमने खुदकुशी कर ली ।
* सत्यकथा बंद पडल्यावर म्यां धाकानंच अनुष्टुभ, युगवाणी, अभिरुची, प्रतिष्ठान, साधना, ललित, रुची यांच्या वर्गण्या भरून टाकल्या.
* या इंडियातला सगळ्यात जोरदार अन् बिगर भांडवली धंदा म्हणजे गोट्याले शेंदूर चोपडणं हा होय. गोटा रस्त्यावर भेटते अन् शेंदूर शनवारी मारोतीचा खळूलून आनता येतो. अन् एकडावचा का तुमचा हा साक्षात्कार सक्सेस झाला ना की मंग तुमच्यावर नोटाईची अखंड बरसातच बरसात ! फक्त मन निगरगट्ट अन् चार-दोन आरत्या मुखपाठ असल्या की काम झालं.

पंजाबला शेवटी एका गोष्टीची मात्र खंत वाटते. राजघाटावर समाधी बांधण्याचं बुढ्याचं स्वप्न राहिलं. ते पितृऋण चुकवलं गेलं नाही.

## आजच्या ग्रामीण तरुणांचा प्रतिनिधी

पंजाबरावची वऱ्हाडी भाषा आधी जरा अपरिचित असल्याने गोंधळात पाडते, परंतु ड ऐवजी ळ आणि ळ ऐवजी य अशी अक्षरे वापरण्याची वऱ्हाडी पद्धत लक्षात आली की,

अडखळणे कमी होते आणि इकडल्यातिकडल्या म्हणजे इकडयातिकडया आणि फुगळी खेयते म्हणजे फुगडी खेळते हे सहज डोक्यात शिरू लागते. बैलबुजाळ, धतिंग, चाबडूब, परमगंज, भंबरपट्टा, लबरलबर, पापळचिप्टी असे कितीतरी शब्द अर्थवैचित्र्याने लक्ष वेधून घेतात.

ग्रामीण भागातला तरुण शहरात जाऊन शिक्षण घेतो. हिंदी चित्रपट, वृत्तपत्रे, मासिके, टी.व्ही., इंग्रजी माध्यम या सर्वांच्या संपर्काने तो आधुनिकीकरणाच्या लाटेत ओढला जातो. त्यातून जे काही त्याचे रूप घडते त्याचे प्रतिनिधित्व हा पंजाबराव करतो. कोसलामधल्या पांडुरंग सांगवीकरने असेच प्रतिनिधित्व साठ सालच्या ग्रामीण तरुणाचे केले होते आणि लोकप्रियतेचे शिखर गाठले होते. सत्त्याऐंशीमधला राजीव गांधींच्या इलेक्ट्रॉनिक युगातला. पंजाबरावही असाच आजच्या ग्रामीण तरुणांचा प्रतिनिधी म्हणून समर्थपणे उभा राहतो कोसलाच्या पुढच्या पिढीचा तो आदर्श ठरतो. त्याची भाषा, त्याची मूल्ये, त्याची मानसिक ओढाताण, त्याची भावनात्मक गुंतावळ– या सर्वांची आपल्याला भूल पडेल. त्यातील उपहास, उपरोध आणि विडंबन हे रंजन करता करताच आपल्याला अंतर्मुख करतील. 'प्रदीर्घ पान्हावलेल्या गाईसारखा हंबर' फोडून शोकमग्न होणारा पंजाबराव एकटा नसेल, आपणही असू. पंजाबराव हा असा प्रॉडक्ट आहे. इंडियात बनलेला. थेट जाणारे, पट जिंकणारे, धी एन्ड होणारे असे मोजके भाग्यवान लोक वगळले तर इतर सर्वांचे प्रतिनिधित्व करणारा.

वऱ्हाडी, इंग्लिश, पुणेरी मराठी, हिंदी या सर्वांचे मिश्रण होऊन बसलेली नवीन भाषा ही पंजाबरावने लीलया वापरली आहे आणि या भाषेचे एक सौंदर्य आणि सहजपण आहे. भाषाशुद्धीचा आग्रह धरणाऱ्यांनाही नव्या संमिश्र भाषेची लाट थोपवता आलेली नाही. त्यातच दूरदर्शन, हिंदी चित्रपट, क्रिकेट, मराठी नवी पुस्तके वगैरेंचा संदर्भ लाभल्याने या भाषेला आधुनिक ताजेपणा लाभलेला आहे. या भाषेतील लवचिकपणाही विलोभनीय आहे. "सारा मुद्दा असा की, गावात दुधदुभतं नाही. म्हणून कसनाऱ्याईले स्टॅमिने नाहीत. अन् वदरून सेठच्या सौजन्याने देशी डे-नाइट खुल्ली. मंग काय पाहा लागते? अन् आता ज्याईच्या अथी आहेही परमगाज दुधदही त लाईले काही वावरात डायरेक धाम पाळाले जा नाही लागत, अन ज्याईले घाम पाळी लागते त्याईचे नासुकलं तेलही नाही भेटत भाकरीवर. मग कोन्त्या ताकदीनं कामं कर्तीन हे वावराईत? अन कसं उत्पादन वाढंन?" "अपना तो इस जमींसे एकही ख्वाब है, इस्टमनकलर ख्वाब. अपने गावके चारो तरफ और सिरीफ गावही नही, तो पुरे हिंदोस्ताभरके दिखना सब तरफ हराही हरा, पूरा डीपग्रीन फॉरेस्ट!" अशी ही भाषेची लचकमुरड गमतीदार ठरतेच, वर्ण्यविषयाला काहीशी नव्हाळी देते.

म्हणूनच या पुस्तकाचे वाचन हा एक प्रसन्न अनुभव ठरतो.

पुरुषोत्तम बोरकर यांचा हा विविध ग्रामीण प्रसंगांवर आधारित गजरा म्हणजे रेव्हू एकपात्री प्रयोगालाही साजेसा आहे. बोरकरांनी कथावस्तूच्या बांधणीचे तंत्र नीट लक्षात

घेतले तर कादंबरीकार होण्याचे त्यांचे स्वप्नही पुरे होऊ शकेल. 'कोसला'चा पुढचा टप्पा म्हणून 'मेड इन इंडिया'चा नायक पंजाबराव आपल्या वाङ्मयीन संस्कृतीचा एक वैशिष्ट्यपूर्ण घटक म्हणून गाजत राहील.

(मेड इन इंडिया : पुरुषोत्तम बोरकर, प्रकाशक : श्री विद्या प्रकाशन, २५०-क, शनिवार पेठ, पुणे ३०, पृष्ठे १५७, किंमत ४५ रुपये)

□

# एकलव्य : शरद दळवी

## *एकलव्याच्या कथेला आधुनिक परिवेश*

एकलव्याची कथा आपल्याला माहीत आहे. द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्येची उपासना करणारा हा निषादपुत्र गुरुदक्षिणा म्हणून आपला अंगठा कापून देतो; आदर्श शिष्याचे प्रतीक म्हणून एकलव्य भारतीय मिथककथावाङ्मयात अविस्मरणीय आहे.

एकलव्याच्या जीवनावर तीन-साडेतीनशे पृष्ठांची कथावस्तू उभारणे; या कथावस्तूला आधुनिक काळातील मानसशास्त्रीय संकल्पनांची जोड देणे, मानवी नात्यांनाही आधुनिक संदर्भ देऊन एक चिरशाश्वत कथा रंगवणे ही कल्पनाशक्तीचा कस पाहणारी गोष्ट आहे. शरद दळवी यांनी हे काम नेटकेपणाने पार पाडले आहे. कौरव-पांडव काळाचे एका वेगळ्या परिप्रेक्ष्यामधून घडविलेले हे दर्शन त्या काळातील आर्य संस्कृतीच्या बरोबरीने अनार्य संस्कृतीही तोडीस तोड उभी करते आणि तो संघर्ष धारदार बनवते. शरद दळवी यांनी द्रोणाचार्यांचा आश्रम, तेथील कौरव-पांडव ह्यांचे विद्यार्थिजीवन कौरव-पांडवातील स्पर्धा, आर्य-अनार्य संस्कृतीतील अंतराय, अर्जुन-कर्ण-दुर्योधन ह्यांच्यातील ताण-तणाव, द्रोणाचार्यांचे अर्जुनावर असणारे अत्याधिक प्रेम, अर्जुनापेक्षा बलाढ्य धनुर्धर कोणी असू नये म्हणून एकलव्याचा अंगठा गुरुदक्षिणा म्हणून मागण्याचा त्यांचा पवित्रा, राजा द्रुपदाने केलेल्या अपमानाचा सूड उगवण्यासाठी कौरव-पांडवांकडून 'द्रुपदाला पराभूत करून पकडून आणा' अशी मागितलेली गुरुदक्षिणा, अश्वत्थाम्यासाठी तिळतिळ तुटणारे त्यांचे पितृहृदय, त्याच्या हत्येमुळे त्यांच्या मनाचा झालेला क्षोभ, द्रुपदाने घडवून आणलेला द्रोणाचार्यांचा वध, एकलव्याने अर्जुनाला कायम आपला प्रतिस्पर्धी मानून शेवटीही त्याच्यावर मात करण्याचा केलेला प्रयत्न आणि अखेर सुदर्शन चक्राच्या सहाय्याने श्रीकृष्णाने घडवून आणलेला एकलव्याचा शेवट हा सर्व तपशील शरद दळवी यांनी संस्कृतप्रचुर भारदस्त भाषाशैलीत परंतु आधुनिक मानसशास्त्रीय संकल्पनांच्या चौकटीत अत्यंत कल्पकतेने बसवला आहे. शरद दळवींच्या या कल्पकतेमुळे ही चिरपरिचित कथा

नव्या भावसत्यांचा संघर्ष आपल्यासमोर उभा करते आणि अनेक मूलभूत मूल्यकल्पनांचे सत्-असत् कंगोरे भेदकपणे लक्षात अणून देते.

## आर्यसंस्कृतीचा कृत्रिमपणा

दळवींनी आर्य नागर संस्कृती आणि अनार्य निषादांची अरण्यसंस्कृती या दोहोंचे स्वरूप आपल्या मनाशी निश्चित केलेले असून, त्यातील विरोध स्पष्ट करण्याची संधी कुठेही हातची निसटू दिलेली नाही. आर्य संस्कृती संचयावर व लोभावर अधिष्ठित आहे, तर निसर्गपुत्रांची व भूमिपुत्रांची निसर्गाचे नियम पाळून साधे जीवन जगणारी, जगण्याला आवश्यक तेवढेच निसर्गाकडून घेणारी, निष्कपट संस्कृती निषादांची आहे. वंशपरंपरेने व कुळाचाराने राजपद व श्रेष्ठत्व आर्य संस्कृतीत मिळते, तर निषाद संस्कृतीतील आचारधर्म हा मूल्याधिष्ठित असतो. त्यांच्या राज्यपद्धतीत महादंड नायकाबरोबरच नायकमंडळाला महत्त्व असते. महादंडनायकपद हे गुणश्रेष्ठत्वाने व योग्यतेने मिळते. वंशपरंपरेने नाही. ज्ञातीच्या कल्याणासाठी सेवावृत्तीने ते पद सांभाळायचे असते. निषादांच्या अकृत्रिम स्वाभाविक जीवनपद्धतीचा मोठेपणा दळवींनी सतत प्रकट केला असून आर्य संस्कृतीबद्दलची आपली अरुची जागोजाग स्पष्ट केली आहे.

हस्तिनापूरच्या दक्षिणपूर्व अरण्यप्रदेशाचा निषादराज महादंडनायक हिरण्यधनू याचा एकलव्य हा पुत्र, द्रोणाचार्यांकडे धनुर्विद्या शिकण्यासाठी येतो. त्याच्याबरोबर राजपुरोहितपुत्र शम्बर हाही त्याचा मित्र, सखा, रक्षणकर्ता, पाठीराखा म्हणून असतो. जन्मतःच शिवाचं वरदान घेऊन आलेला व्याघ्रचर्मधारी, सिंहासारखा डौलदार एकलव्य आणि मृगचर्मधारी, मोरपिसे धारण केलेला, थोराड काळसर शम्बर यांनी द्रोणाचार्यांच्या आश्रमात पदापर्ण करून, गुरुमातेशी प्रथम संवाद साधला. त्यांच्या सरळ, प्रेमळ आचरणाने ती प्रभावित झाली. द्रोणाचार्य मात्र एकलव्याची विनंती धुडकावून लावतात. 'आर्यांकडून युद्धविद्या शिकून ती आर्यांवरच उलटवाल. मी कौरव-पांडवांना धनुर्विद्या देण्यास बांधिल आहे, इतरांना राजकुमारांबरोबर शिक्षण देणे योग्य नाही, अशी द्रोणाचार्यांची कारणे असतात. 'स्वसंरक्षणाविना ही विद्या मी वापरणार नाही' हे एकलव्याचे आश्वासन ते दुर्लक्षित करतात. परंतु एकलव्याला पैलू पाडले तर हा जगद्वीर होईल अशी त्यांची खात्री पटते. तरीही ते नकार देतात.

## अर्जुनाचे दोष

याच वेळी दुर्योधनाचा अहंमन्य स्वभाव, द्रोणाचार्यांची अर्जुनाबद्दल असणारी पट्टशिष्याची भावना, सूतपुत्र कर्णाची धनुर्विद्येतील गती यांचीही झलक एकलव्याला बघायला मिळते. अर्जुन धनुष्याशी एकजीव वाटत नव्हता. त्याचे बाण लक्ष्याला घासून जात होते पण लक्ष्यवेध करीत नव्हते. तेव्हा शम्बर हसतो. अर्जुन एकदम चरकतो. एकलव्य

त्याला सांगतो– निषादांना धनुष्यबाण लहानपणापासूनच अपरिहार्यपणे वापरावा लागतो. त्याचा अभ्यास कृत्रिमपणे करावा लागत नाही. अर्जुनाला तो अचूक बाण सोडून दाखवतो. कर्णाबाबत मात्र एकलव्याचे मत चांगते होते. धनुष्य हा कर्णाच्या शरीराचा एक भाग वाटत होता. तो सहजपणे प्रत्यंचा ओढत होता असे त्याला जाणवले. द्रोणाचार्य सूतपुत्र म्हणून त्याचा वेळोवेळी तेजोभंग करत राहतात. त्याबद्दल त्यांना स्वतःलाही टोचणी असते.

शम्बर हा सामान्य व्यवहारी माणसांचा प्रतिनिधी आहे. तो कर्तव्यनिष्ठ आहे, स्वामिभक्त आहे. द्रोणाचार्यांच्या आश्रमाबद्दल त्याचं प्रतिकूल मत होतं. इथे जी विद्या दिली जाते ती अपवित्र आहे. केवळ शत्रूला मारणे, विजयी होणे आणि तेही स्वार्थासाठी व आत्मप्रौढीसाठी; हे या विद्येचं उद्दिष्ट आहे. त्यामुळे ही विद्या विचारहीन आहे. स्वार्थ असेल तर ज्ञानाला मलीनता येते. व्यवहारोपयोगी पोटभरू ज्ञान म्हणजे विद्या, ज्ञानाला स्वार्थ चिकटला की त्याचं अधःपतन होतं. स्वार्थप्रेरक, पक्षपाती व व्यक्तिप्रेरित अशी विद्या म्हणजे खरं ज्ञान नव्हे, अशी त्याची धारणा आहे. द्रोणाचार्य हे कौरव-पांडवांना धनुर्विद्या देतात, परंतु त्यांची भावनाही शुद्ध नसते. त्याचमुळे एकलव्याला वा कर्णाला विद्या देताना ते भेदभाव करतात. गुरू हा आईसारखा प्रेमळ, अंतरंगदर्शी, निरपेक्ष माया करणारा, समभावी सूर्यासारखा प्रकाशदाता हवा, ह्या कसोटीवर द्रोणाचार्य उतरत नाहीत असे शम्बर मानतो.

## एकाकी साधना

द्रोणाचार्यांनी नकार दिल्यावर एकलव्य जवळच्याच अरण्यात कुटी बांधून, द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून आपली धनुर्विद्येची साधना पुढे चालू ठेवतो. शम्बरही त्याच्याबरोबर राहतो. शस्त्राला शास्त्राचं अधिष्ठान नसेल तर प्रलय होतो म्हणून हा पुरोहित सतत त्याच्या सोबतीला असतो. शूर, चतुर, शस्त्रकुशल पण उतावीळ. एकलव्यावर भावासारखा तो प्रेम करतो. त्याच्यासाठी प्राण देण्याचीही त्याची तयारी असते.

अर्जुन-एकलव्य यांच्यातील विरोधभाव दृढ करण्यासाठी दळवींनी आणखीही काही प्रसंग योजिले आहेत. कौरवपांडवांचे एकदा एकलव्याच्या कुटिराजवळ अरण्यात आगमन होते. त्यांच्या भुंकणाऱ्या कुत्र्याला बाण मारून, एकलव्य त्याचे तोंड बंद करतो. कुत्रा घायाळ होत नाही; पण भुंकण्याचा थांबतो. त्याचे हे बाण कसे काढावेत हे कौरव-पांडव कोणालाच कळत नाही. अर्जुनही तिथे निष्प्रभ ठरतो. ते सर्वजण एकलव्याकडेच येतात. एकलव्य एकाच बाणाने श्वानाला बंधमुक्त करतो. एकलव्याच्या या प्रावीण्याने थक्क झालेले कौरव-पांडव चौकशी करतात तेव्हा 'द्रोणाचार्य हेच माझे गुरू' असे एकलव्य सांगतो. द्रोणाचार्यांना याबद्दल जाब विचारला जातो; ते एकलव्याला भेटून गुरुदक्षिणा म्हणून त्याच्या उजव्या हाताचा अंगठा मागतात. तो अंगठा तोडून देतो. मात्र तुझी धनुर्विद्या पुढच्या दोन बोटांनी साध्य होईल, माझी सर्व विद्या समंत्र साध्य होईल. गुरूचं सारं तत्त्व तुला प्राप्त होईल असाही आशीर्वाद ते देतात. या कथेतला अर्जुन हा युद्धकौशल्यात आणि कर्तृत्वात उणा

दाखवला आहे. एकलव्याचे तुलनात्मक श्रेष्ठत्व दाखविण्यासाठी अर्जुनाची प्रतिमा अशी रंगवणे हा सोपा मार्ग झाला.

शम्बर द्रोणाचार्यांच्या या फसवणुकीने संतप्त होतो. त्याच्या मूर्तीत भाला खुपसतो. तू साऱ्या निषाद जातीचं स्वप्न उद्ध्वस्त केलंस म्हणून एकलव्याची निर्भर्त्सना करतो. अंगठा गेल्यानं विद्या गेली नाही. विद्या शरीराच्या एखाद्या अवयवात नसते. शरीर हे माध्यम असते. विद्या माझ्या बुद्धीत आहे, मनात आहे असे एकलव्य त्याला सांगतो. एकलव्याच्या वागण्याचे समर्थन पुढे त्याची आई रत्नगर्भा ही देखील करते. परंतु द्रोणाला मात्र ती नावे ठेवते. 'तुझा तो गुरू , तो मात्र गुरूसारखा वागला नाही. ज्ञानी माणसासारखाही वागला नाही. एखाद्या असंस्कृत दासासारखा वागला. मिळवलेलं सारं त्याला विफल वाटेल. सारं असून एकाकी व रिक्तच राहील तो. तशा घोर अवस्थेपेक्षा मृत्यू मानवेल त्याला.'

रत्नगर्भा पुढे म्हणते, 'ज्ञानाला पावित्र्य हवं. ज्ञान स्वतंत्र हवं तरच ते मंगलमय होईल. कल्याणकारक होईल. तुझ्या गुरूनं या दोन्ही गोष्टी गमावल्या. क्षुद्र स्वार्थापायी, राजघ़राण्याचं दास्य त्यानं पत्करलंय. ज्ञानाला विकताहेत ते !... आचार्यांनी या दुष्कृत्यामुळं घोर अन्याय केलाय. साऱ्या भावी पिढ्यांच्या नि कुमारांच्या मनाचा अंकुर खुडलाय. त्यांनी आर्य आणि अनार्यांच्याच नव्हे, साऱ्या मानवजातीच्या विनाशाचं बीज पेरलंय. ज्ञानानं सत्ता आणि दास्य आपण होऊन पत्करलं तर ते पिशाच्च बनेल.' ज्यांची ही विद्या दासी बनेल त्यांचं दुर्बलांवर अधिकार गाजवण्याचं ती साधन बनेल.'

कौरव-पांडव युद्धाला तोंड फुटते. अश्वत्थाम्याच्या मृत्यूची खोटी बातमी देऊन द्रोणाचार्यांना शोकाकुल केले जाते. दुःखविकल निःशस्त्र द्रोणाचार्यांचे मस्तक द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न रथावर चढून तसेच धडापासून अलग करतो.

एकलव्य त्यामुळे खवळून उठतो. निषादांनी या युद्धात अलिप्तता राखलेली असते. वैयक्तिक पातळीवर युद्धात उतरून पांडवांशी, अर्जुनाशी लढून गुरुद्रोहाचं पातक शांत करायची भाषा तो बोलतो. गुरुद्रोह्यांना देहदंड देणं हे आपलं जीवितकर्तव्य आहे असे त्याला वाटते. शम्बर त्याला या विचारातील फुसकेपणा पटवून देण्याचा प्रयत्न करतो. परंतु रत्नगर्भा मात्र त्याला अनुमती देते. ती शम्बराला समजावते, 'एकलव्यावर तुझं अमर्याद प्रेम आहे. त्याच्यासाठी तू प्राणही काढून देशील. पण तुझ्या प्रेमाचा मोबदला म्हणून त्यानं आपले आचार, विचार सारं तू म्हणतोस तसं करावं हा आग्रह का ? तसं नसेल तर त्याचं आयुष्य त्याला जगू दे. त्याला सांभाळण्याचा अतियत्न करून तो पांगळा होईल किंवा त्या प्रेमाची. . . तुझी घृणा करू लागेल. आपल्या माणुसकीचे, आदर्श वागण्याचे मानदंड व्यावहारिक सत्याच्या कसोटीवर पारखता येत नाहीत.'

## एकलव्याचा बळी

एकलव्यानं भीमाशी सामना दिला. भीमाची गदा आपल्या बाणानं उडविली. परंतु

एकलव्य त्याला जीवदान देतो. अर्जुनाशीही तो संघर्ष करतो. 'या कृतघ्न गुरुघातक्याला प्राणदंड द्यायचा. . .' हिंस्र पशूप्रमाणेच त्याची मृगया करायची' हे त्याचे मत कृष्ण खोडून काढण्याचा प्रयत्न करतो. अर्जुन मूर्च्छेतून सावध होतो. एकलव्याचा बाण सुटतो. परंतु श्रीकृष्णाचं सुदर्शनचक्र एकलव्याचा बळी घेते. कृष्णाच्या डोळ्यांत अश्रू उभे राहतात. एकलव्य आर्य नव्हता. अनार्यही नव्हता. मानवश्रेष्ठ होता. त्यानं निष्ठेचे, सत्याचे मानदंड सिद्ध केले आहेत. त्याचं मोठं ऋण आपल्यावर, साऱ्या मानवतेवर आहे.

दळवींनी या चरित्रात्मक कहाणीत अनेक मानसशास्त्रीय तपशील भरलेले आहेत. आणि त्यामुळे आधुनिक 'सेन्सिबिलिटी' घेऊनच ही कहाणी आपल्यापुढे उलगडते. द्रोणाचार्य, दुर्योधन, अश्वत्थामा, अर्जुन, कर्ण, कृपी व कृपाचार्य या सर्वच व्यक्तिरेखा या आधुनिक आहेत. स्पर्धेशिवाय कुणाला या जगात वर येता येतं असे विचारणारे द्रोणाचार्य कोणताही श्रेष्ठ साहसी कुमार दिसला की त्याची तुलना आपल्या मुलाशी करीत आणि मनोमन म्हणत, या पुत्रात विजिगीषु वृत्तीच नाही. आपल्या मनीच्या आकांक्षा तो पूर्ण करील असं दिसत नाही.

एकलव्यात प्रथम ईर्ष्या होती. स्पर्धेची भावना होती. इतरांहून श्रेष्ठ व्हावं ही इच्छा होती. आर्यांची विद्या मिळवून श्रेष्ठ व्हावं, ज्ञातीचं रक्षण करावं. परंतु त्याला कळतं की ज्ञानाला स्वार्थ चिकटला की त्याचं अधःपतन होतं. साधनेत आनंद असतो; साधन हे साध्य बनून उपयोगी नाही.

एकलव्य रानात राहून विद्यासाधना करणार असं म्हणतो तेव्हा शम्बराला जाणवतं, 'मला एकलव्याची व्यथा कधी दिसलीच नाही.'

कृपाचार्य आपल्या बहिणीला, कृपीला म्हणतो, "एकाच्या अपूर्णत्वानं दुसऱ्याच्या आयुष्याला पूर्णत्व येतं. बालकाच्या परावलंबनानं मातृत्वाला अर्थ येतो."

आचार्यपत्नी कृपी ही त्या स्वप्नवत् कृत्रिम आश्रमातलं सुखनिधान होती. ती माता तेवढी तिथं सत्य होती.

'या आश्रमातले छात्र विवेकहीन विद्या घेत आहेत. जीवनात ग्राह्य काय, त्याज्य काय हे समजावू शकत नाही ते कसलं ज्ञान ?' असा प्रश्न शम्बराला पडतो.

'मृत्यूपर्यंत मातृत्वाची भूमिका सुटत नाही हीच स्त्रीची खरी शोकांतिका. साखरेप्रमाणं आपलं अस्तित्व विसरून दुसऱ्याच्या जीवनात गोडवा आणणं हा तिचा नैसर्गिक स्वभाव.' असंही एक निरीक्षण लेखक नोंदवतो.

## नवा आशय

शरद दळवी यांनी एकलव्याच्या या चिरपरिचित कथेत असा नवा आशय भरलेला आहे. आर्य विरुद्ध अनार्य, अर्जुन विरुद्ध एकलव्य, नागरजन संस्कृती विरुद्ध निषादांची वनसंस्कृती यांमध्ये त्यांची ओढ ही अर्थातच रंजल्यागांजल्यांकडे अधिक आहे. त्यामुळेच

एकलव्य हा द्रोणाचार्य, भीष्म, अर्जुन या सर्वांपेक्षा अधिक प्रभावी ठरतो. निर्दोष नायकाचे गुण घेऊन अवतरतो. एकलव्याला झुकते माप देण्यासाठी दळवींनी या युक्तिवादाची उभारणी केली आहे त्याला महत्त्व आहे. ते काम त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक व अष्टावधानी साक्षेपाने केले आहे. म्हणून दळवींचा हा एकलव्य आपल्याला जवळचा वाटेल. अर्जुनाचे व्यक्तिमत्त्व अधिक सामर्थ्यशाली दाखविले असते तर हा संघर्ष अर्थपूर्ण ठरला असता.

काही भाग व काही संभाषणे ही काळजीपूर्वक संपादित केली असती तर कादंबरीची थोडीफार सूज कमी झाली असती. एकदा पार्श्वभूमी सिद्ध केली की अनेक तपशिलांची उजळणी करणे अनावश्यक ठरते. संस्कृतप्रचुर प्रौढ भाषेचा डौल कालमानाशी मेळ घालून चांगला सांभाळला असला तरी 'माझ्या स्वप्नपतंगाचा दोर आहेस तू' यासारखे वाक्य चुकून येते ते खटकते. अरण्याची वर्णनेही सांकेतिक व ढोबळच राहतात. एकलव्य हा जर अरण्यपुत्र तर त्याच्या दृष्टीला दिसणारे निसर्गचित्र हे अधिक प्रत्ययकारी व नवनवोन्मेषशाली असायला हवे होते. अर्थात आहे या स्वरूपातही एका जुन्या कथेला नवा आशय देण्याचा हा प्रयत्न वाचनीय ठरतोच. या लेखकाच्या भावी लेखनाबद्दल औत्सुक्य निर्माण करतो.

(एकलव्य : शरद दळवी, मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०.
पृष्ठे ३३६, शंभर रुपये.)

□

# हर्ष खेद ते मावळले : ना. वा. फडके

## *'दुसऱ्या' फडक्यांच्या तीन बहारदार कादंबऱ्या*

पंचाहत्तरी ओलांडलेली एखादी कर्तृत्ववान आणि आपल्या क्षेत्रातील यशस्वी व्यक्ती जेव्हा कथा-कादंबरी लिहिण्यासाठी सिद्ध होते तेव्हा त्या व्यक्तीच्या अंतर्यामी दाटून राहिलेल्या काही गूढरम्य घटनांचा व समस्यांचा आविष्कार करणे हाच प्रधान हेतू असतो; नवथर तरुणसुलभ मनाच्या वाङ्मयीन अनुकरण प्रवृत्तीचा तो उद्रेक नसतो, असे विधान केले तर ते अ-वास्तव ठरणार नाही. अनुभवसंपन्न, परिपक्व अशा व्यक्तींना आपले आत्मचरित्र लिहिण्याचा उतारवयात मोह होतो; परंतु कथा-कादंबऱ्यांसारखे वाङ्मय प्रकार हाताळताना त्यांची मानसिकता काहीशी वेगळ्या प्रकारची असणार हे देखील उघडच होय. आपले अनुभव तर मांडायचे आहेत; परंतु ते आपले म्हणून आत्मवृत्ताच्या ढंगात मांडणे सोयीस्कर नसेल तेव्हा त्या अनुभवांना स्थलकालाचे वेगळे संदर्भ देऊन, कल्पिताचा साज त्यावर चढवून, ललित-लिखाणाचा बाज स्वीकारून ही कोंडी फोडता येते. अशा व्यक्तींच्या ललित-लेखनाचा हा उतार वयातील बहर अनेकदा इतका बहारदार आणि रससंपन्न असतो की तो त्या भाषेला भूषणभूत ठरून जातो. लेखनाचा विशेष पूर्वानुभव नसल्याने आणि वाङ्मयीन संकेतांचे 'ॲकॅडमिक' भूत मानगुटीवर स्वार झालेले नसल्याने अशा लेखनातला प्रयोगशील ताजेपणाही आपल्याला आकृष्ट करतो. हे लेखन वाङ्मय प्रकारालाही– फॉर्मलाही नवी परिमाणे देते.

### खेळकर विनोदगर्भ जीवनदृष्टी

सुप्रीम कोर्टात अनेक गुंतागुंतीच्या खटल्यांमध्ये बिनतोड युक्तिवाद करून नावलौकिक मिळवणारे एक ज्येष्ठ कायदेपंडित नारायण वासुदेव फडके हे आज ८४ वर्षे वयाचे आहेत; आणि गेल्या तीन वर्षांत त्यांच्या 'हर्षखेद ते मावळले', 'तो योग खरा हटयोग', 'अमावास्येचा चंद्र' या तीन कादंबऱ्या आणि 'काही कथा काही व्यथा' हा कथासंग्रह असे ललित साहित्य प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या वकिली चातुर्याचा या लेखनात

जागोजागी प्रत्यय येतोच; त्याचबरोबर संस्कृत व पाश्चात्य साहित्याचा त्यांचा विदग्ध अभ्यास आणि मानसशास्त्र, तर्कशास्त्र, समाजशास्त्र, वैद्यकशास्त्र इत्यादींशी त्यांचा असलेला दीर्घ परिचय, रॉयिस्ट नवमतवाद व कामगार चळवळींशी त्यांची एकेकाळी असणारी जवळीक आणि देशा-परदेशातील उच्चभ्रू समाजात असणारा त्यांचा वावर यांमुळे या सर्वच ललित-लेखनाला एक व्यापक बैठक आहे; ती कुठल्याही वाङ्मयीन चौकटीत न मावणारी आणि म्हणूनच आपल्या रसरशीतपणाने व अल्लडपणाने आपल्याला अधिकच खुलवणारी आहे. सराईत धंदेवाईक कथा-कादंबरीकार जे संकेत मनोभावे पाळण्यात आपली व्यावसायिक कुशलता मानतात; ते संकेत लीलया धुडकावून लावूनही ना. वा. फडके हे आपल्या कथानकांमध्ये वाचकांना गुंतवून ठेवतात. रहस्याचा स्फोट आधीच करूनही आपल्या अनघड शैलीच्या व कथावस्तूंच्या चमत्कृतिपूर्ण प्रभावाने ते वाचकाला बांधून ठेवतात हे लक्षात आल्यावर त्यांच्या ललित लेखनाच्या अनोख्या जादूची जाणीव होते. फडके यांची जीवनाकडे व त्यातील विसंगतीकडे पाहण्याची विनोदगर्भ, सिनिकल आणि खेळकर वृत्ती त्यांच्या साऱ्याच कथावस्तूंना एक आगळा ढंग प्रदान करते.

## त्रिकोणी प्रेमाची कथा

ना. वा. फडके यांच्या या तिन्ही कादंबऱ्यांच्या कथावस्तूत वेगळेपणा आहे.

**तो योग खरा हटयोग** ही सरळ सरळ त्रिकोणी प्रेमाची कथा आहे. शास्त्रीय संशोधनात गढलेल्या आणि त्या नादात शरीराच्या व मनाच्या हळुवार भावना-वासनांना दडपून टाकणाऱ्या वीणावर मनःपूर्वक प्रेम करणारा तिच्याच ऑफिसमधला बुजरा पण बुद्धिमान कायदेपंडित माधव आणि आपल्या आग्रही व आक्रमक स्वभावाने वीणाच्या वृत्ती-प्रवृत्तींना जाग आणून आपल्या वासनेच्या आवेगात गुरफटून टाकणारा विवाहित-सापत्य मध्यमवर्गीय बँकर मधुकर– या तिघांतील ही कहाणी आहे. माधव हा आपल्या लाजऱ्या बुजऱ्या संयत स्वभावामुळे आपल्या प्रेमाची वाच्यता वीणाजवळ करण्याबाबत संकोच बाळगत राहतो; परंतु तिच्या आईवडिलांना भेटून मात्र आपले मनोगत स्पष्ट करतो. वीणाला मधुकरच्या चोरट्या प्रेमाचा नंतर अर्थातच जाच वाटू लागतो; अमृततुल्य तुफानी प्रेमाच्या सोनेरी नाण्याची दुसरी बाजू विषारी द्वेषाने माखलेली असते हे ध्यानात आल्यावर ती सावरू पाहते. 'मध्या गाढवा, काय ही माझी दशा करून टाकलीस तू?' असे म्हणतानाही खुसपटे, भांडणे, सलगी, तृप्ती, वादावादी यातून त्यांच्या भेटीगाठी नाट्यमय होतच राहतात. त्याच्या डोळ्यांतला कावेबाज संताप आणि वीणाच्या डोळ्यांतला असहाय्य तिरस्कार अशी ही स्पर्शबंबाळ प्रेमाची कथा मधुकरची हाँगकाँगला बदली झाल्याने वेगळेच वळण घेते.

तिच्या आई-वडिलांना या प्रेमप्रकरणाची कल्पना मधुकरची पत्नी आणि माधव दोघेही देतात. केतकरी कादंबऱ्यांतील चर्चेच्या धर्तीवरची प्रदीर्घ चर्चा मग या कादंबरीत

येते. वीणाचे आई-वडील, भाऊ-बहीण त्यात सामील होतात. पिता-पुत्रीचा हा संवाद तिच्या दुखावलेल्या व कोसळू पाहणाऱ्या भावविश्वाला सावरून धरतो. प्रीती, आसक्ती आणि भक्ती यांतील सीमारेषा, मुक्त प्रेम, शारीरिक आकर्षण, लग्नविषयक सामाजिक बंधने, नैसर्गिक आकर्षण व सामाजिक बंधने यांतील रस्सीखेच या कल्पनेभोवती असणारे दिव्य उत्कट कल्पनारम्य तेजोवलय आणि माणसाच्या सतत बदलत्या स्वभाववृत्तीमुळे एकमेकांबद्दल वाटणाऱ्या आकर्षणात होणारे चढउतार वगैरे अनेक विषय या प्रदीर्घ संवादात येऊन जातात. भुंग्याप्रमाणे फुलाकडे झेपावणारे वेडेपीर सतव नव्या फुलाकडे आकृष्ट होणार नाहीतच असे ठाम सांगता येत नाही; तसेच शहाण्याने भावनाशून्य असावे, प्रेम हे मृगजळ आहे असे सहारा वाळवंटी तत्त्वज्ञानही सत्याच्या कसोटीत उतरत नाही. प्रीती ही निसर्गाची ट्रिक आहे आणि मानवाचा महामानवापर्यंत प्रवास व्हायचा तर प्रीतीची गरज आहे, असे अनेक विचार या संवादात येऊन जातात.

या कथेचा शेवट मात्र गुलदस्तातच राहतो. वीणा, तिच्यावर निष्ठापूर्वक प्रेम करणारा माधव आणि तिचा प्रियकर मधुकर या तिघांनाही न्यू जर्सीच्या भूमीवर एकत्र आणण्याचा घाट घालून, हवा तसा निर्णय घेण्याची मोकळीक वीणाला असल्याचे दर्शवून ही कथा संपते. अर्थात दुसऱ्याच्या गुलाबगेंदापेक्षा हक्काचा कोबीचा गड्डाच चांगला असा तिचाही निश्चय झालेला असावा; म्हणूनच माधव लिमयेलाच ती वरमाला घालणार असा आपला ग्रह होतो.

या कथेच्या खमंग केतकरी बाण्याला नर्म विनोदाने आणि वेळी अवेळी घेतलेल्या गोड अस्वली गुदगुल्यांनी एक वेगळीच रंगत येते. हा प्रीतिमार्गाचा पितापुत्रातील संवाद बाळबोध मनोरंजक तसाच उद्‌बोधक होतो. नेहमीच्या प्रेमकथेपेक्षा एका वेगळ्या पातळीवर तो जातो.

## एक अजब तिढा

**अमावास्येचा चंद्र** या कादंबरीची कथावस्तू एका चमत्कृतिपूर्ण मानसशास्त्रीय व कौटुंबिक समस्येचे निरूपण करते. सुप्रीम कोर्टातील ॲडव्होकेट घनःश्याम केळकर यांना साठीनंतर एकवीस वर्षांच्या तरुणीचे रूप घायाळ करते. ती तरुणीच त्यांच्या घरात येते. पण ती त्यांच्या मुलाची पत्नी– त्यांची सून बनून. त्यामुळे त्यांची होणारी मानसिक कुचंबणा त्यांना अस्वस्थ करते. तगमग संपुष्टात येते कशी ? तर आपल्या सुनेशी रूपा-गुणात साम्य असणाऱ्या दुसऱ्या एका देवदासीच्या भक्तिपूर्ण प्रेमाचा प्रत्यय त्यांना आल्यानंतर. सून जानकी व देवदासी कावेरी- या दोघी बहिणीच असतात. एकाच बापाच्या या कन्या. एक औरस. दुसरी अनौरस. सबस्टिट्यूशन ॲंड सब्लिमेशन या मानसशास्त्रीय संकल्पनांचा आधार घेऊन उभे राहिलेले हे कथानक वाचकाला विस्मयचकित करते.

नारायणराव फडके यांच्या निवेदनशैलीचे एक मजेशीर आणि सराईत लेखकांपेक्षा

नव्या प्रयोगशील लेखकातच ज्याचा आविष्कार होऊ शकेल असे वेगळे रूप या कादंबरीत आढळते. पहिल्या आठ प्रकरणांत घनःश्याम केळकर, त्यांचा मुलगा प्रा. राम व त्याची प्रेयसी जानकी यांचे प्रेमप्रकरण वगैरे कथाभाग येतो. घनःश्यामराव मुलाला बजावतात, "ही जानकी. आपल्या घरात आली तर उंटाचं पिल्लू घरात शिरावं त्याप्रमाणे या घराण्याचा विध्वंस करील. माझे शब्द खोटे ठरणार नाहीत." घनःश्यामरावांना जणू एखादा मानसिक रोग होतो. रक्तदाब वाढतो. त्यांनी दिलेला शाप खरा ठरणार असतो. पुढच्या प्रकरणात आपल्याला कळते की दोन वर्षांनंतर घनःश्यामराव हे कुलाब्यातील एका इमारतीच्या गच्चीतून पहाटे पाच वाजता पडून जागच्याजागीच गतप्राण झाले. त्याच क्षणाला इकडे जानकी पुत्ररत्नाला जन्म देते. कॉरोनारच्या कोर्टात घनःश्यामरावांच्या या आत्महत्येबद्दलची केस उभी राहते. या केसमध्ये घनःश्यामरावांचा मुलगा राम व त्यांची देवदासी प्रेयसी कावेरी याचे जे जाबजबाब होतात त्यातून मध्यंतरीच्या दोन वर्षांतील घटनांचा पत्ता लागतो; आणि कथानकातील मधले दुवे सांधले जातात.

ना. वा. फडके यांचा न्यायालयात दीर्घकाळ एक कायदेपंडित या नात्याने संचार असल्याने कोर्टरूममधील नाट्य त्यांनी रंगतदार बनवून पेश केले आहे. त्यातील बारकावे, त्यातील विनोदाचे तुषार, मानवी स्वभाव प्रवृत्तींचे गूढगहन कप्पे हे वाचकाला आपल्या ताजेपणाने, अवखळपणाने खिळवून ठेवतात.

शेवटी अर्थातच जानकी-कावेरी या दोघी बहिणींची भेट होते. त्यांच्यातील मनोमीलन, कावेरीचा उदात्त स्वभाव आणि जानकीचा प्रेमळ जिव्हाळा– कर्नाटकात अमावास्येला पुत्रजन्म होणे हा शुभशकुन समजतात; दोन्ही बाजूंच्या शुद्ध बीजापोटी आलेले हे रसाळ गोमटे फळ... हा अमावास्येचा चंद्र आपल्या आजोबाचे आणि घराण्याचे पांग फेडील... असा आशीर्वाद देऊन कावेरी आपल्या मूळ गावी परत जाते.

## चमत्कार आणि योगायोग

जुळ्या बहिणींशी संपर्क येणे व नातवाचा जन्म आणि आजोबाचा मृत्यू– या दोन्ही घटना एकाच वेळी घडणे हा म्हटले तर योगायोग वा चमत्कार. त्याबाबत लेखकाने प्रस्तावनेतही अनेक युक्तिवाद मांडले आहेत. शामराव स्वप्नात आलेल्या एका सिद्धपुरुषाला सांगतात की, माझ्या हयातीतच माझ्या मुलाला एक सुंदर सुदृढ पुत्ररत्न व्हावे व माझे घराणे पुढे चालू राहावे. ज्या क्षणी असा पुत्र होईल त्या क्षणी मी स्वतः मरायला तयार आहे... तो सिद्ध पुरुष त्यावर तथास्तु म्हणून अंतर्धान पावतो– असा कथाभाग मध्येच देऊन या चमत्काराला परामानसशास्त्रीय बैठक देण्याचा प्रयत्नही लेखकाने केला आहे.

## हर्षखेद ते मावळले

ही फडक्यांची सर्वांत लक्षणीय कादंबरी. सांगलीकडचा एक तरुण– फर्ग्युसनचा विद्यार्थी– पुढे कामगार नेता– त्याच्या जीवनात आलेल्या दोन तरुणी. विवाह, वकिली, त्यानंतरच्या वयाच्या चाळीस ते सत्तर या मधल्या काळातील त्या घटनांची त्याला पडलेली विस्मृती (स्मृतिभ्रंश)... आणि ही स्मृती परत मिळवून देण्यासाठी हंगेरियन सायकिॲट्रिस्ट डॉ. रोजेन्वाल्ड यांनी त्याच्यावर केलेले प्रयोग, त्यातून परत आलेली स्मृती... त्या स्मृतीनंतर पूर्वाश्रमीच्या प्रेयसीचा शोध घेण्याचा त्याने केलेला प्रयत्न. अशा तपशिलातून रोमांचकारक कथावस्तू फुलते.

तो तरुण भय्या... किंवा राजा... किंवा तो गोड बोलतो म्हणून त्याला दिलेले नाव गोडबोले. डॉक्टर रोजेन्वॉल्ड यांनी हाती घेतलेली ही केस आणि पूर्वस्मृती जागृत करण्यासाठी पन्नास वर्षांपूर्वीच्या कॉलेज तरुणाच्या हॉस्टेलमधल्या जीवनाची प्रत्यक्षात उजळणी करण्याचा त्यांनी केलेला प्रयोग, त्यातून उलगडत जाणारे छोटेमोठे तपशील, कॉलेजमधील लीला व मंजिरी या दोघींनीही या गोडबोल्याला गटवण्यासाठी टाकलेले निरनिराळे डाव– त्यांच्यापासून पुढे झालेली ताटातूट या तपशिलाच्या पुनर्जागरणाबरोबर परत आलेली स्मृती हे सर्व इतक्या हळुवार नर्मविनोदाच्या गुलाबपाण्याच्या शिडकाव्यासारखे आपल्याला चिंब करते की, अंगावर थरार येतो.

## प्रेयसीची भेट-धक्कांतिका

सुप्रीम कोर्टातील एका केससाठी दिल्लीला गेल्यावर लीलाशी गाठ पडते, तिने त्याच्यावरील जुन्या प्रीतीच्या जपलेल्या खुणा आणि आपल्या नावडत्या पतीच्या सहवासात क्षणोक्षणी सहन केलेली घृणा– याचा स्फोट होतो. लीला आपल्या या पूर्वाश्रमीच्या राजाला सुनावते, "जगात पळपुटे पुष्कळ असतील पण तुझ्यासारखा विनाकारण किंवा भलत्याच कारणानं पळ काढणारा नादान व नालायक पळपुटा तूच. अद्वितीय पळपुटा. आणि तरीदेखील माझं तुझ्यावर पहिल्याइतकंच काय पण काकणभर जास्तच प्रेम आहे." परंतु त्याचबरोबर विमानतळावर जायला निघालेल्या त्याला ती सांगते, "आता आपली भेट पुढील जन्मी."

या भेटीनंतर गोडबोले मुंबईला येतात. विमानतळावरून घरी जाण्याऐवजी सरळ आपल्या 'ठेवलेल्या' देवदासीकडे जातात. जिन्यावरूनच गडगडत खाली येतात. बरे होतात, पण स्मृतिभ्रंशामुळे मधल्या काळातील घटनांचा त्यांना विसर पडतो. दुसरी प्रेयसी मंजिरीही त्यांच्यावरील प्रेमामुळे आपल्या वैवाहिक जीवनात रमलेली नसते. पुढे तिची पंचविशीतली नात मात्र गोडबोल्यांना भेटून विचारते, "तुमच्या मेंदूवर आलेले हे विस्मृतीचे सावट डॉक्टरांनी दूर केले ते कोणाबद्दलचे होते? आजी की तिची मैत्रीण? ती व तुमची मैत्रीण लीला या दोघी चांगल्या मैत्रिणी होत्या असं ती सांगायची. त्यातील कोणी तुमच्यावर प्रेम

करीत होतं का? तुमच्या मेमरी क्लॉटचा विषय कोण होता? माझी आजी की तिची मैत्रीण? की दोघीही?"

ना. वा. फडके या कथा सांगताना रूढ वाङ्मयीन संकेत पार धुडकावून लावतात. 'त्या दिवशी राम जर आग्रहाने त्यांच्याबरोबर गेला असता आणि समोरच उभ्या असलेल्या टॅक्सीत त्यांना बसवून आला असता तर ही कथा लिहिण्यातच काही अर्थ राहिला नसता. वडिलांच्या इच्छेविरुद्ध युक्ती-प्रयुक्तीने लग्न ठरविणाऱ्या मुलामुलीची कथा कोण येथे लिहायला बसला आहे? नेहमीच्या गोष्टी या. पण तसे व्हायचे नव्हते. रामच्या घराण्यावर कोसळू पाहणारे एक मोठे अरिष्ट त्याच्या अदृष्टात टपून बसले होते,' असे ते कथेच्या ऐन मध्यातच सांगून टाकतात. 'आणि मग शोभाने मैनाला ती गोष्ट जशी काही तिच्या समक्षच घडली असल्याप्रमाणे नटवून सजवून सांगितली. ती ऐकल्यानंतर मैनाला वाटणार होते की ती सत्यकथा आपल्याला कळलीच नसती तर किती बरं झालं असतं.' (कोंडमारा– काही कथा काही व्यथा)

## टवटवीत विनोद

काव्यशास्त्रविनोदाच्या आविर्भावात रमतगमत सांगितल्या गेलेल्या या कथांच्या ओघात संस्कृत नाट्य काव्यातील अवतरणे वा प्रसंग येतात, तसेच पाश्चात्य कथाकादंबऱ्यातील संदर्भ आणि विचारवंतांची मतमतांतरेही येतात. विवेचनातील युक्तिवादांना बहुश्रुत बौद्धिक अधिष्ठान असतेच, विनोदाचेही अंग असते. 'अगदी निकडीचे काम म्हणजे आपण माझ्यासाठी मला हवी असलेली पुस्तके काढून देऊ शकता आणि थोड्या सबुरीचे काम म्हणजे आपण माझ्याशी लग्न करू शकता'. (जानकीकडे रामने केलेली मागणी) 'नर आहेस नुसता. वानर नाही झालास म्हणजे मिळवली', 'तुम्ही फार गोड बोलता. तिनं तुम्हाला नवीन नाव दिलं आहे, गोडबोले म्हणून. मुली आता तुम्हालां गोडबोल्या या नावानं ओळखतात. पण मी तुला आपलं गोड्याच म्हणत जाईन... तुझे डोळे पाणावलेले दिसले की मला वाटतं तुला घट्ट धरून नि तुझा चष्मा उडवून डोळ्यातलं पाणी जिभेच्या शेंड्यानं टिपावं.' (लीलाने केलेली मल्लीनाथी) 'आपल्या पुरुषाला बाईनं घट्ट धरून ठेवावं. त्याला खायला-प्यायला चांगलं पोटभर घालावं. इकडं-तिकडं उंडरायला जागाच ठेवू नये. बाईनं घर सांभाळायचं असतं तसाच घरचा पुरुष,' (माळ्यानं दिलेला सल्ला). अशा विधानातला टवटवीत विनोदाचा अंतःस्रोत गमतीदार तर आहेच. फडक्यांच्या रगेल-रंगेल तत्त्वज्ञानावर व जीवनदृष्टीवरही त्यामुळे प्रकाश पडतो. फडक्यांच्या भाषेला संस्कृतचे सौंदर्य आणि इंग्रजीचे चटपटीतपण संपन्न करते, तसेच सांगलीकडच्या ब्राह्मणी मराठीचे अस्सल ऐवजही ही भाषा आपल्यापुढे रिते करते. फडक्यांना पंचाहत्तरीनंतर आलेला हा परिपक्व रसदार बहर– मराठीतील केतकरपंथीय कादंबरीत मोलाची भर टाकणारा आहे.

**नाट्यपूर्ण द्वंद्वयुद्धे**

आंग्ल-संस्कृत पांडित्य, न्यायालयातील कामकाजातील बारकावे, स्त्री-पुरुष संबंधांकडे रगेल खेळकरपणाने पाहण्याची दृष्टी आणि आपल्या विविध अनुभवांकडे पाहण्याची विनोदगर्भ वृत्ती, बौद्धिक युक्तिवादातील नाट्यपूर्ण द्वंद्वयुद्धे यांमुळे फडक्यांच्या या कादंबऱ्यांना एक स्वयंभू स्थान लाभलेले आहे. रूढ वाङ्मयीन संकेत धुडकावूनही एखादी अनुभवसंपन्न व्यक्ती अस्सल अनुभूतीच्या बळावर कसे रसरशीत लेखन करू शकते याचे हे लक्षवेधक उदाहरण आहे. कामगार चळवळ, रॉयिस्ट राजकारण, कोर्टातील किस्से, उच्चभ्रू वर्गातील जीवनमूल्ये यांच्या पार्श्वभूमीवरील प्रचंड खजिना फडक्यांजवळ असणार. तो त्यांनी द्रुत गतीने उदारपणे वाचकांसाठी खुला केला तर मराठी वाचक त्या खजिन्याच्या श्रीमंतीने दिपून गेल्याविना राहणार नाहीत.

(हर्षखेद ते मावळले : पृष्ठे २३६, पन्नास रुपये. अमावास्येचा चंद्र : पृष्ठे १४७, पंचेचाळीस रुपये, तो योग खरा हटयोग : पृष्ठे ११२, पस्तीस रुपये, लेखक : ना. वा. फडके, प्रकाशक : श्री विद्या प्रकाशन, पुणे ३०.)

□

शाखा (स्थळ प्रत)

# अराजक : बा. ह. कल्याणकर

## *हे चित्र किती खरे ? किती खोटे ?*

औरंगाबादचे प्राध्यापक व पत्रकार बा. ह. कल्याणकर यांचे 'अराजक' हे चारशे पृष्ठांचे पुस्तक. ते उघड उघड आत्मकथनपर आहे, परंतु त्यावर कादंबरी असे लेबल लावण्यात आले आहे. अनेक व्यक्तींची नावे बदलली, गावे बदलली, काही प्रसंगांचे व घटनांचे कलम एकाचे दुसऱ्यावर केले तरी त्यातला आत्मवृत्ताचा बाज त्यांना टाळता आलेला नाही आणि कादंबरीचा फॉर्म कितीही ऐसपैस असला तरी ह्या लेखनाला कादंबरी म्हणजे क्लेशकारक ठरेल. स्वतःच्या जीवनातले भलेबुरे अनुभव आणि त्या अनुभवांना कारणीभूत असणाऱ्या व्यक्तींच्या उदार, अनुदार वर्तनाबद्दलचा आपला आदरभाव व चीड-संताप प्रकट करण्याचा मोह आत्मचरित्रकाराला आवरत नाही. ज्याच्या त्याच्या पाप-पुण्याचा निवाडा आपल्यापुरता करण्यासाठीच तो लेखणी हाती घेत असतो. तर कादंबरीकार आपल्या वैयक्तिक अनुभवांच्या आणि हेव्यादाव्यांच्या पलीकडे जाऊन, त्यामागचे विशाल विश्व न्याहाळून, त्यांची संगती लावण्याचा व्यापक प्रयत्न करत असतो.

त्यादृष्टीने एक प्रकारचा तटस्थपणा त्याच्या दृष्टीत आणि प्रकृतीत असावा लागतो. सध्याच्या मूल्यबधिर समाजातील सार्वत्रिक अराजकाचा आपल्याला झालेला साक्षात्कार जगजाहीर करण्याचा प्रेषितासारखा कल्याणकर जो आव आणत आहेत तो एकूण लेखनातील आत्यंतिक आत्मपरतेमुळे अपरिहार्य वाटत नाही. सारा समाज मूल्यबधिर झाला आहे. सर्वच क्षेत्रात व राजकीय पक्षात सार्वत्रिक अराजक आहे हे गृहित धरून ते चालतात, ते पटत नाही. कादंबरी हा अघळपघळ सैल वाङ्मयप्रकार असला तरी त्याचे काही अटळ गुणविशेष आहेत. त्याचे भान लेखकाने ठेवलेले नाही. वृत्तपत्रीय बातम्या, प्राध्यापकांच्या गप्पाटप्पा, गावातल्या निरनिराळ्या व्यक्तींबद्दलच्या किस्सेवजा अफवा (गॉसिप), राजकीय, सामाजिक परिस्थितीवरची अर्धकच्ची मत-मतांतरे यांची आपल्या बालपणच्या प्राथमिक दुय्यम शिक्षणाच्या महाविद्यालयातील चळवळींच्या आणि प्राध्यापकी पेशाच्या संदर्भात गुंफण करून 'अराजक'चा डोलारा कल्याणकरांनी उभारला

आहे, परंतु वृत्तपत्रीय लेखनाच्या रिंगणातच तो रेंगाळत राहतो. कलाकृतीची पातळी त्याला लाभत नाही. स्वतःचं जीवन शून्यातून उभं करून एका प्रतिष्ठित प्राध्यापक पत्रकाराच्या पातळीवर आणल्याचे आत्मकौतुक सर्वदूर पसरलेले असल्याने संघर्षाचे जे काही क्षण दाखवण्यात आले आहेत, तेही बोथट बनून गेले आहेत. कुठेच अटीतटीचा संघर्ष नसल्याने या निरूपणातील बहुतेक व्यक्तिरेखाही एकांगी वाटतात. गरजेपुरत्या हजेरी लावून गायब होतात.

## भ्रष्ट सत्ताधीशांशी हातमिळवणी

एम.ए. झालेले कथानायक प्रा. जयवंत देशमुख आपली अर्धवेळ हंगामी नोकरी सोडून आमदार दामूअण्णा सावडगावकरांच्या खडळपूर येथील शिवप्रताप महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून जायचे ठरवतात. आमदार सावडगावकरांची ख्याती त्यांच्या कानावर आलेली असते. वीजमंडळाचे सदस्य असताना आमदार सावडगावकरांनी खूप संपत्तीची माया सावडून घेतली. या कॉलेजचे ते सर्वेसर्वा होते. सोलापूर रोडवर त्यांचा भक्कम बंगला होता. भोवती सुंदर बाग. झाडांनी व वेलींनी गर्द गच्च अंगण. आमदार सावडगावकरांचं एक पांगळं पोरगं शांताराम हे कायम कॉलेजात असतं. आपलेच नातेवाईक चपराशी आणि कारकून म्हणून ते कॉलेजमध्ये लावतात... प्रत्येकाच्या पगारातून ते आपला हप्ता वसूल करतात. आमदार बाहेरगावचे फोन कॉलेजमधून करतात. कुणी मंत्री आले की, जेवण त्यांच्या घरी आणि सारे बिल कॉलेजच्या नावावर. लोक म्हणतात की, हा आमदार म्हणजे संस्थेतली घाण आहे. कॉलेजला लागलेला रोग आहे. दामूअण्णा मूळचा अंगठेबहाद्दर. तमाशात काम करायचा, पवाडे म्हणायचा इ. इ. तमाशातला जी जी म्हणणारा हा कफल्लक झिलक्या 'लोकशाहीनं लखोपती केला होता.हे लोकशाहीचे घवघवीत यश' असे प्रा. देशमुखांना वाटते. अशा आमदारांची भ्रष्ट प्रतिमा असतानाही त्यांच्या संस्थेत काम करताना आपल्या मूल्यांना कसलाही धक्का बसणार नाही, असे कथानायक देशमुख मानतात.

प्रा. देशमुख यांची ख्याती असते ती विद्यार्थी नेता, बंडखोर, चळवळ्या, वादळी तरुण म्हणून. मग अशी विद्रोही व्यक्ती आमदार सावडगावकर यांना स्टाफवर कशी चालेल? परंतु आश्चर्य हे की, ते या नेमणुकीला मान्यता देतात. पहिल्याच भेटीत प्रा. देशमुख त्यांना शहाजोगपणे सुनावतात, "आपण राजकारणातली माणसं आहात. राजकारण जरूर करा. त्यातून आपण मोठे व्हा. पण आमचे शैक्षणिक उपक्रम राबवताना आम्हाला कुणाचा हस्तक्षेप नको... मी कोणतंही काम मनापासून करू इच्छितो... जबाबदारीनं काम करणं मी माझं मूल्य मानतो. ते करताना मला कुणाची आडकाठी असू नये. माझ्या बंडखोर आणि चळवळ्या स्वभावामुळं अनेक संस्थांनी मला प्राध्यापक म्हणून घेण्याची हिंमत दाखवली नाही... आपण अजून विचार करा. ऑर्डर द्यायची नसेल तर देऊ नका."

यावर आमदार सावडगावकर साळसूदपणे सांगतात, "बाबा, असं कसं? तुम्हाला

तुमचं काम करायला पूर्ण स्वातंत्र्य आहे. तुमच्यासारखी बोल्ड माणसं आमच्या संस्थेत हवी आहेत...खूप मोठे व्हा. आमच्या शुभेच्छा आहेत."

खडकपूरला देशमुखांचे चांगले बस्तान बसते. पाच हजार चौरस फुटांच्या प्लॉटमध्ये बगीचा व बंगला होतो. शून्यातून जीवन उभं केल्याची तृप्तता जाणवते. जीवनात कराव्या लागणाऱ्या संघर्षामुळं आपलं व्यक्तिमत्त्व बोल्ड झाल्याची आणि ऐन पस्तिशीत प्रगल्भ विचारांचं हे सेल्फमेड आयुष्य सुंदर पत्नीसह घडविल्याची त्यांना स्वतःलाच अपूर्वाई वाटत असते. आपल्यात उत्स्फूर्त असा फटकळपणा व रोखठोकपणा असल्यामुळे माणसे आपल्याशी सांभाळून व बेतानं वागतात, असेही ते मानतात व त्यामुळेही स्वतःवर खूष राहतात. या नोकरीनंतर देशमुखांमधील जो काही विद्रोहाचा व सामाजिक बांधिलकीचा स्फुल्लिंग असतो तो पार विझून जातो. अन्याय, भ्रष्टाचार यांच्यावर तुटून पडण्याची त्यांची धमक हरपते. प्रस्थापित धनदांडग्या व्यवस्थेचा स्वीकार करून ते विद्रोहाची वांझ मते मांडत जगत राहतात निबरपणे.

## बंडखोरपणा अग्रलेखापुरता

ज्यां अनूईच्या बेकेटप्रमाणे धर्मगुरू आणि राजा या भूमिकांमुळे दोन मित्रांत होणारा सामना आमदार आणि प्राध्यापक यांच्यात उभा राहील अशी आपली जी कल्पना झालेली असते ती कुचकामी ठरते. प्रा. कल्याणकर असे चलाख की, पुढे उरलेल्या कादंबरीच्या भागात आमदार सावडगावकर यांचे नाव ते घेत नाहीत. संघर्ष तर दूरच. त्यामुळेच भरल्या पोटी ढेकर देत मारलेल्या क्रांतीच्या गप्पा हा एक दैवदुर्विलासच ठरतो.

विद्यार्थी असताना विविध विषयांवर चिंतन करणाऱ्या जयवंत देशमुखांना पडलेला प्रश्न असा की, 'आयडल' राहण्यापेक्षा 'आयडियालिस्ट' राहणं आवडेल मला. कारण त्यात माझी स्वतंत्र आयडेन्टिटी असेल. माझा प्रश्न आहे तो असा की, या आयडियल्सला आपण कृतीचा भाग कसा बनवू ? (आयडल आयडियल यासारखा शब्दच्छल पोरकटच नाही का ?) या मूल्यबधिर समाजाला आपण कसे बदलवू ? आमच्या भोवतीच्या एका अज्ञानाच्या अराजकतेत गोची खाणाऱ्या समाजाला जीवनाचा वेग कसा समजावून सांगायचा ? तत्त्वज्ञानातलं अराजक हेच आजच्या समाजाच्या अराजकतेचं कारण आहे. आपला देश माणसांपेक्षा तेहतीस कोटी दगडांचा देश आहे. त्यांचं माणसात रूपांतर करण्याचं किती मोठं आव्हान शिक्षणासमोर आहे ? हे आव्हान कोण स्वीकारणार ?" अशा विचारांनी मेंदूला सुरुंग झाल्यासारखे त्यांना वाटे, परंतु हॉस्टेलवर एकटं असताना मात्र गावाकडची आठवण येत राहते. आईने पुरणपोळ्या केल्या असतील. सारे जण जान्या म्हशीचे दूध आणि पोळ्या खात असतील. आई मनातून माझी आठवण काढत असेल.' आणि ते आठवून त्याला रडू येते. रात्र तळमळत काढावी लागते.

या आईनेच त्याला शिक्षणासाठी प्रवृत्त केलेले असते. "माझे दागिने विका. जानी म्हैस

विका पण याला शिकवा. याचं शिक्षण हाच माझा दागिना." असे ती आपल्या नवऱ्याला बजावते, कारण गाडगेबाबांचे कीर्तन ऐकून शिक्षणाची महती मनावर बिंबलेली असते. या कादंबरीचा आरंभ होतो तो आईच्या मृत्यूच्या बातमीने. त्यामुळे गावी जायला निघालेला जयवंत आपल्या सगळ्या गतजीवनाची क्षणचित्रे रेखाटत जातो. गावी गेल्यावरही हा आत्मशोध सुरू राहतो. तेथून परतल्यावर पुन्हा कॉलेजमधल्या वातावरणात ते गुदमरत राहतात. इतर प्राध्यापकांना स्थिर, सुखासीन जीवनाची ओढ असते परंतु हे मात्र अस्वस्थ. म्हणून लेख, व्याख्याने याद्वारे आपण ही कोंडी फोडत आहोत असे समाधान ते मानतात. त्यासाठी एक त्रैमासिक ते चालवत असतात. सर्वांच्या जीवनाला अर्थ प्रदान करणारा, कुणाचंच स्वत्व न फाडणारा, विवेकी समाजजीवन उभं करणारा, विचार मांडणारा आपला अग्रलेख नवा लढा उभा करील अशा भ्रमजालात ते मश्गूल होतात. त्याच विचारात स्कूटरवरून घरी जायला ते निघतात. गावात दंगल पेटलेली असते. पोलिसांनी संचारबंदी पुकारून रस्त्यावर कोणी दिसले तर गोळी घालण्याचा इशारा दिलेला असतो. भेदरलेली माणसे बोळाबोळातून घुसून पळत असतात. अग्रलेखाच्या अक्षरातून रक्त ओघळतेय असे देशमुखांना वाटते. दंगलीची भीती घेऊन पळणाऱ्या गर्दीत त्यांना रस्ताच दिसेनासा होतो, येथे हे निवेदन संपते.

आपल्या गतजीवनातील विविध चित्रे कल्याणकरांनी अर्थातच आत्मीयतेने रंगवली आहेत. प्राथमिक शाळा, शंकरप्पांचे शिकवणे, गावची जत्रा, कंधारचा किल्ला, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गावात घडणाऱ्या विविध घटना, पाटलाच्या मुलाने एका तरुण मुलीवर केलेल्या बलात्काराने उडालेली खळबळ, इंग्रजी शाळेतले शिक्षक, दैनिक 'मराठा'चे वाचन, पांडवपुराणातील स्त्री-पुरुषांच्या जीवनाच्या तऱ्हा, एम.एस्सी.ला असताना स्त्रीसहवासाची जाणवलेली जादू, स्पर्शाच्या विळख्यात गुंतूनही आधी पैसे दे म्हणणारी व ते नसल्याने दूर होणारी लमाणी तरुणी, (तुझ्यावर कविता करणार मी– असं तिला म्हणणारा भाबडा जयवंत), कॉलेजशिक्षणासाठी नांदेडला केलेले प्रयाण, प्राध्यापकांना घातलेले पेच, प्राचार्यांशी घातलेली हुज्जत, प्राचार्यांना रात्री लॅबमध्ये एका महिलेसमवेत पकडून गाजवलेली बहादुरी, वृत्तपत्रांशी साधलेली जवळीक, निवडणुकांतील राजकारण, युवक शिबिरातील सहभाग, औरंगाबादला पदव्युत्तर शिक्षणासाठी घेतलेला प्रवेश, तेथील गांधी स्मारक हॉस्टेल, कॉपी आणि मार्क वाढविल्याबद्दल विद्यार्थ्यांनी पुकारलेला बंद, त्यात विद्यार्थ्यांचे नेतृत्व करण्याची साधलेली संधी, विद्यार्थी संघटनांमधील, नेत्यांमधील शह-काटशह देण्याचे प्रकार, आंदोलनांमुळे निर्माण झालेला तणाव, नांदेडला मिळालेली पार्टटाइम लेक्चररशिप वगैरे घटनाक्रम हा प्रथमपुरुषी निवेदनाद्वारे सांगण्यात आला आहे. १९६०-७५ दरम्यानच्या तरुण पिढीच्या जडणघडणीचे प्रातिनिधिक चित्रण या निवेदनाद्वारे कळू शकते. नरहरशास्त्री, रामराव मोहिते, प्रा. देसाई, माधवराव शिंदे, उषाताई देशपांडे वगैरे अनेक व्यक्ती ओळखू येण्यासारख्या आहेत.

तुमचं काम करायला पूर्ण स्वातंत्र्य आहे. तुमच्यासारखी बोल्ड माणसं आमच्या संस्थेत हवी आहेत... खूप मोठे व्हा. आमच्या शुभेच्छा आहेत."

खडकपूरला देशमुखांचे चांगले बस्तान बसते. पाच हजार चौरस फुटांच्या प्लॉटमध्ये बगीचा व बंगला होतो. शून्यातून जीवन उभं केल्याची तृप्तता जाणवते. जीवनात कराव्या लागणाऱ्या संघर्षामुळं आपलं व्यक्तिमत्त्व बोल्ड झाल्याची आणि ऐन पस्तिशीत प्रगल्भ विचारांचं हे सेल्फमेड आयुष्य सुंदर पत्नीसह घडविल्याची त्यांना स्वतःलाच अपूर्वाई वाटत असते. आपल्यात उत्स्फूर्त असा फटकळपणा व रोखठोकपणा असल्यामुळे माणसे आपल्याशी सांभाळून व बेतानं वागतात, असेही ते मानतात व त्यामुळेही स्वतःवर खूष राहतात. या नोकरीनंतर देशमुखांमधील जो काही विद्रोहाचा व सामाजिक बांधिलकीचा स्फुल्लिंग असतो तो पार विझून जातो. अन्याय, भ्रष्टाचार यांच्यावर तुटून पडण्याची त्यांची धमक हरपते. प्रस्थापित धनदांडग्या व्यवस्थेचा स्वीकार करून ते विद्रोहाची वांझ मते मांडत जगत राहतात निबरपणे.

## बंडखोरपणा अग्रलेखापुरता

ज्यां अनूईच्या बेकेटप्रमाणे धर्मगुरू आणि राजा या भूमिकांमुळे दोन मित्रांत होणारा सामना आमदार आणि प्राध्यापक यांच्यात उभा राहील अशी आपली जी कल्पना झालेली असते ती कुचकामी ठरते. प्रा. कल्याणकर असे चलाख की, पुढे उरलेल्या कादंबरीच्या भागात आमदार सावडगावकर यांचे नाव ते घेत नाहीत. संघर्ष तर दूरच. त्यामुळेच भरल्या पोटी ढेकर देत मारलेल्या क्रांतीच्या गप्पा हा एक दैवदुर्विलासच ठरतो.

विद्यार्थी असताना विविध विषयांवर चिंतन करणाऱ्या जयवंत देशमुखांना पडलेला प्रश्न असा की, 'आयडल' राहण्यापेक्षा 'आयडियालिस्ट' राहणं आवडेल मला. कारण त्यात माझी स्वतंत्र आयडेन्टिटी असेल. माझा प्रश्न आहे तो असा की, या आयडियल्सला आपण कृतीचा भाग कसा बनवू? (आयडल आयडियल यासारखा शब्दच्छल पोरकटच नाही का?) या मूल्यबधिर समाजाला आपण कसे बदलवू? आमच्या भोवतीच्या एका अज्ञानाच्या अराजकतेत गोची खाणाऱ्या समाजाला जीवनाचा वेग कसा समजावून सांगायचा? तत्त्वज्ञानातलं अराजक हेच आजच्या समाजाच्या अराजकतेचं कारण आहे. आपला देश माणसांपेक्षा तेहतीस कोटी दगडांचा देश आहे. त्यांचं माणसात रूपांतर करण्याचं किती मोठं आव्हान शिक्षणासमोर आहे? हे आव्हान कोण स्वीकारणार?" अशा विचारांनी मेंदूला सुरुंग झाल्यासारखे त्यांना वाटे, परंतु हॉस्टेलवर एकटं असताना मात्र गावाकडची आठवण येत राहते. आईने पुरणपोळ्या केल्या असतील. सारे जण जान्या म्हशीचे दूध आणि पोळ्या खात असतील. आई मनातून माझी आठवण काढत असेल.' आणि ते आठवून त्याला रडू येते. रात्र तळमळत काढावी लागते.

या आईनेच त्याला शिक्षणासाठी प्रवृत्त केलेले असते. "माझे दागिने विका. जानी म्हैस

विका पण याला शिकवा. याचं शिक्षण हाच माझा दागिना." असे ती आपल्या नवऱ्याला बजावते, कारण गाडगेबाबांचे कीर्तन ऐकून शिक्षणाची महती मनावर बिंबलेली असते. या कादंबरीचा आरंभ होतो तो आईच्या मृत्यूच्या बातमीने. त्यामुळे गावी जायला निघालेला जयवंत आपल्या सगळ्या गतजीवनाची क्षणचित्रे रेखाटत जातो. गावी गेल्यावरही हा आत्मशोध सुरू राहतो. तेथून परतल्यावर पुन्हा कॉलेजमधल्या वातावरणात ते गुदमरत राहतात. इतर प्राध्यापकांना स्थिर, सुखासीन जीवनाची ओढ असते परंतु हे मात्र अस्वस्थ. म्हणून लेख, व्याख्याने याद्वारे आपण ही कोंडी फोडत आहोत असे समाधान ते मानतात. त्यासाठी एक त्रैमासिक ते चालवत असतात. सर्वांच्या जीवनाला अर्थ प्रदान करणारा, कुणाचंच स्वत्व न फाडणारा, विवेकी समाजजीवन उभं करणारा, विचार मांडणारा आपला अग्रलेख नवा लढा उभा करील अशा भ्रमजालात ते मश्गूल होतात. त्याच विचारात स्कूटरवरून घरी जायला ते निघतात. गावात दंगल पेटलेली असते. पोलिसांनी संचारबंदी पुकारून रस्त्यावर कोणी दिसले तर गोळी घालण्याचा इशारा दिलेला असतो. भेदरलेली माणसे बोळाबोळातून घुसून पळत असतात. अग्रलेखाच्या अक्षरातून रक्त ओघळतेय असे देशमुखांना वाटते. दंगलीची भीती घेऊन पळणाऱ्या गर्दीत त्यांना रस्ताच दिसेनासा होतो, येथे हे निवेदन संपते.

आपल्या गतजीवनातील विविध चित्रे कल्याणकरांनी अर्थातच आत्मीयतेने रंगवली आहेत. प्राथमिक शाळा, शंकरप्पांचे शिकवणे, गावची जत्रा, कंधारचा किल्ला, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गावात घडणाऱ्या विविध घटना, पाटलाच्या मुलाने एका तरुण मुलीवर केलेल्या बलात्काराने उडालेली खळबळ, इंग्रजी शाळेतले शिक्षक, दैनिक 'मराठा'चे वाचन, पांडवपुराणातील स्त्री-पुरुषांच्या जीवनाच्या तऱ्हा, एम.एस्सी.ला असताना स्त्रीसहवासाची जाणवलेली जादू, स्पर्शाच्या विळख्यात गुंतूनही आधी पैसे दे म्हणणारी व ते नसल्याने दूर होणारी लमाणी तरुणी, (तुझ्यावर कविता करणार मी– असं तिला म्हणणारा भाबडा जयवंत), कॉलेजशिक्षणासाठी नांदेडला केलेले प्रयाण, प्राध्यापकांना घातलेले पेच, प्राचार्यांशी घातलेली हुज्जत, प्राचार्यांना रात्री लॅबमध्ये एका महिलेसमवेत पकडून गाजवलेली बहादुरी, वृत्तपत्रांशी साधलेली जवळीक, निवडणुकांतील राजकारण, युवक शिबिरातील सहभाग, औरंगाबादला पदव्युत्तर शिक्षणासाठी घेतलेला प्रवेश, तेथील गांधी स्मारक हॉस्टेल, कॉपी आणि मार्क वाढविल्याबद्दल विद्यार्थ्यांनी पुकारलेला बंद, त्यात विद्यार्थ्यांचे नेतृत्व करण्याची साधलेली संधी, विद्यार्थी संघटनांमधील, नेत्यांमधील शह-काटशह देण्याचे प्रकार, आंदोलनांमुळे निर्माण झालेला तणाव, नांदेडला मिळालेली पार्टटाइम लेक्चररशिप वगैरे घटनाक्रम हा प्रथमपुरुषी निवेदनाद्वारे सांगण्यात आला आहे. १९६०-७५ दरम्यानच्या तरुण पिढीच्या जडणघडणीचे प्रातिनिधिक चित्रण या निवेदनाद्वारे कळू शकते. नरहरशास्त्री, रामराव मोहिते, प्रा. देसाई, माधवराव शिंदे, उषाताई देशपांडे वगैरे अनेक व्यक्ती ओळखू येण्यासारख्या आहेत.

## विचारातील विसंगतीचे अराजक

या सर्व घटनांच्या अनुषंगाने भाष्य करण्याच्या प्रयत्नात अनेक विषयांवरील मतमतांतरे येऊन जातात. परंतु त्यात तर्कसंगती वा कार्यकारणमीमांसा यापेक्षा संज्ञाप्रवाहाचा प्रभाव जास्त दिसतो. सर्वच क्षेत्रात लेखकाला अराजक जाणवते. मग आपले बौद्धिक-वैचारिक क्षेत्र हे तरी त्याला अपवाद का असावे? लेखकाची जडणघडण आणि त्याची वैचारिक झेप यांच्यातले नाते उलगडणे त्यामुळे सोपे नाही. कारण यातील तथाकथित चिंतन हे वृत्तपत्रीय स्फुटांमधील आकर्षक घोषणा-शेरेबाजीच्या पातळीवरच राहते. प्राध्यापकाच्या सुरक्षित नोकरीत स्वतःला गुंतवून घेतल्यावर आपण तरुणवयात आदर्श मानलेल्या मूल्यांपासून त्याची झालेली फारकत, आदर्श आणि व्यवहार-तडजोड यातील विसंगती, या चारशे पृष्ठांच्या आत्मकथनातून हुलकावणी देत राहते. बंडखोरीच्या आकर्षणाने जीवनाला सुरुवात करणारे पण अल्पावधीतच सुखासीन बनणारे अनेक बुद्धिमान तरुण नंतर केवळ बेफाट मते बोलण्यात धन्यता मानून, खुर्च्या सांभाळत जगू लागतात. त्यांचे प्रातिनिधिक चित्र प्रा. जयवंत देशमुख यांच्या रूपाने उभे राहते. एवढेच या प्रदीर्घ आत्मकथनाचे श्रेय. कॉलेजमधला भाबडा ध्येयवाद आणि बंडखोरीचा आव हा पुढच्या व्यवहारी जगात वांझोटा ठरतो. तो कृतीत आणण्यासाठी किंचितही किंमत देण्याचे धारिष्ट्य नंतरच्या आयुष्यात जमत नाही. परंतु सवयीने तोंडाने भाषा मात्र बंडखोरीची निघत राहते. यातील आत्मवंचना न जाणवणाऱ्या तथाकथित बुद्धिजीवी वर्गाचा हा प्रतिनिधी. त्याचे आत्मकथनही आपल्या जीवनातील प्रसंग आठवतील तसे सांगण्यात लांबत जाते. परंतु अनुभवांना कार्यकारणभावाने ठाम वैचारिक भूमिकेपर्यंत आणून ठेवण्याऐवजी बनचुकी मतेच, विद्यार्थ्यांपुढे वर्गात दिलेल्या लेक्चरप्रमाणे पाठांतर केल्यासारखी म्हणून दाखविली जातात, त्यापेक्षा अधिक काही हाती लागत नाही. शाळा-कॉलेजमधील ध्येयवाद आणि नंतरच्या जीवनातला व्यवहारवाद यात पडणारे अंतर आणि ते अंतर दूर करता येत नाही याची पदोपदी होणारी अस्वस्थ जाणीव, यांसारखे मध्यवर्ती सूत्र ठेवून प्रा. जयवंत देशमुख यांची व्यक्तिरेखा उभी केली असती तर या कथेला एक वेगळे परिमाण लाभले असते. ते न करता, भ्रष्ट आमदाराच्या आणि भ्रष्ट यंत्रणेच्या भ्रष्टाचाराचा स्वीकार करून, बायको, बंगला, सुखासीनतेच्या मागे लागून जगत असताना केवळ सगळा समाज मूल्यबधिर झाला आहे आणि सर्व क्षेत्रात अराजक माजले आहे असे नुसते घोकत राहणे ही आपली स्वतःचीच फसवणूक करून घेणे आहे, आपले पुरोगामित्व आणि क्रांतिकारकत्व सिद्ध करण्याचा, तळागाळातल्या लोकांबद्दलची कणव प्रगट करण्याचा हा मार्ग नव्हे. जर सत्ता-संपत्ती मिळत असेल तर भ्रष्टाचारी लोकांच्या सेवेत राहण्यालाही आम्ही तयार आहो असा पवित्रा घेणाऱ्या प्रा. देशमुखांच्या तोंडी समाजपरिवर्तनाची भाषाच लटकी वाटते. शाळा-कॉलेजमधल्या प्रामाणिक पण भाबड्या ध्येयवादी विचारांशी आणि आपल्याला

घडवणाऱ्या आई-वडिलांशी वा ग्रामजीवनाशी कुठलीच बांधिलकी नंतर उरत नाही, केवळ स्वतःच्या नोकरीची चिंताच उरते, तेव्हा समाजाला मूल्यबधिर ठरवण्याऐवजी आपणच मूल्यबधिर आहोत हे स्वतःला बजावून सांगावे लागेल.

(अराजक : लेखक बा. ह. कल्याणकर. प्रकाशक : देशमुख आणि कंपनी, ४७३ सदाशिव पेठ, पुणे ३०. पृष्ठे ४११ पंचाहत्तर रुपये)

□

## भंडारभोग : राजन गवस

### *पुरुष असून बायकी जीवन जगण्याचा कर्मभोग*

तायाप्पा तापाने आजारी पडतो, औषधोपचारावर पाच-सात हजार रुपये खर्चूनही उतार पडत नाही. गावातल्या देवदेवस्की करणाऱ्या तानू सुतारणीचं म्हणणं पडतं की, "सगळं कोड्यागत दिसतंय. पोरगं यातून लवकर बाहेर पडंल असं दिसत नाही. हे कोडं माझ्याच्यानं सुटंल असं न्हाई, मंगळवारला इंचनाळला जाऊ." इंचनाळला तिची गुरू शेवंताक्का देववाली सांगते की, "हे झाड माझं हाय. किती दिसानं भेटतंय. पोराच्या गळ्यात दर्शन बांध." तशातच तायाप्पा आपल्याला पडलेलं स्वप्न सांगतो, "स्वप्नात ऐनापूरची देववाली आली. तिनं कपाळभर भंडारा लावला आणि ती एकाएकी मोठ्यानं हसायला लागली." हे आजारपण देवाधरमाचं दिसतंय. कुणी करणी केलेली दिसतेय ह्या समजुतीला बळकटी येते आणि शेवंताक्काने त्यावर शिक्कामोर्तब केल्यावर तरण्याताठ्या तायाप्पाला देवीला वाहून जोगत्या करण्याचा बेत त्याची आई कल्लवा पक्का करते.

म्हाईच्या पुनवेला मनोळीजवळच्या डोंगरावरच्या जोगळभावीला नेऊन तायाप्पाला विधिपूर्वक जोगत्या बनवण्यात येते. मनोळीच्या नदीवर स्नान करून, अंगाभोवती लिंबाच्या काड्या गुंडाळून, डोक्यावर दोन मोठ्या लिंबाच्या काड्या ठेवून, तोंडात एक काडी धरून डोंगर चढून जावा लागतो. जोगळभावीच्या देवळाजवळच्या कुंडात हातपाय धुऊन, चौंडक्याच्या टाँग टाँग आवाजात 'जगा'ची पूजा करून, देवळाला फेऱ्या मारून, सकोळातल्या देवळाला त्याला नेले जाते. वेणी कुंडातलं पाणी घेऊन, कमरेभोवतालचा लिंब सोडून तेथे त्याचा जोगत्या गुरू म्हादू त्याला नवं कोरं लुगडं नेसवतो. झंपर घालतो. त्या नव्याकोऱ्या लुगड्याच्या मऊ मऊ सूताच्या स्पर्शानं त्याच्या अंगाचं पाणी पाणी होतं. तायाप्पाला मुंडावळ्या बांधल्या जातात. बाशिंग बांधलेल्या कट्यारीपुढं अंतरपाट धरून तायाप्पाचं डोकं म्हादूच्या मांडीवर ठेवून त्याचं लग्न लावण्यात येतं. तोंडाला दूध लावून ते लुगड्यावर सोडण्यात येते. दहीभाताचा नैवेद्य दाखवून कपाळाला भंडारा लावला जातो.

तायाप्पा- एक तरुण- बाईचा वेष धारण करून 'देव' बनतो. 'ह्ये देवाचं जगणं लई

इपरीत हाय, अजून लई भोगायचं हाय बाबा' असं त्याला जाणती पारव्वा कळवळून सांगते. बाईच्या वेषात आपल्या गावात त्याला घराबाहेर पडायची लाज वाटते. लुगडं-झंपर टाकून नेहमीचे पुरुषी कपडे घालावेसे वाटतात. तर पारव्वा बजावते, "असला विचारसुद्धा मनात आणू नगं. बरं व्हणार न्हाई. ती डोंगराची बाई हाय. सादीसुदी न्हाय. व्हत्याचं न्हवतं करती. तुझं सोडच, घराचंसुद्धा मातेरं करेल."

तायाप्पाच्या घरची मंडळी त्याला दुरावतात, तो कधी या मेळ्यात तर कधी त्या मेळ्यात नाचतो. दारूही पिऊ लागतो. सोन्याचे डूल घेण्याएवढी मायाही मिळवतो.

तानाप्पाला तो एकदा विचारतो, "तुझ्याकडं, म्हादूकडं बघितल्यावर माझं मलाच कळत नाही– कसा जलम काढलास त्ये." त्यावर तानाप्पा आपले जीवनविषयक तत्त्वज्ञानच सांगतो, "एकदा भंडाऱ्यात रुतलं की असंच व्हतंय. मी कोंबड्यात गुंतलो. म्हादू देवरसी झाला. ज्येला कायच सूचत नाही त्ये दारू पिऊन मरतंय... हे सगळं असंच हाय बाई... जरासं मन दगडाचं करायचं. न्हाई करून काय उपेग?"

जोग्या, जोगतिणी, देवदासी या जगाकडे काही दलित लेखक आता वळले आहेत. 'झुलवा' कादंबरीद्वारे व नाटकाद्वारे उत्तम बंडू तुपे यांनी याच विषयाचा पाठपुरावा केला आहे. राजन गवस यांनी भंडारभोगमध्ये जोगत्याच्या ससेहोलपटीचा मागोवा घेतला आहे. विषयाचे वेगळेपण या दृष्टीने 'भंडारभोग' आपले लक्ष वेधून घेते, त्या जगातल्या चिरेबंदी विधी-प्रथांचे प्रस्थ, लोकांमधील अंधश्रद्धेचा प्रभाव, जोगतिणींच्या जीवनपद्धतीतील परंपरा आणि परस्परव्यवहाराचे संकेत याचीही कल्पना या कादंबरीद्वारे येऊ शकते. परंतु एकूण कादंबरीचे लेखन मात्र फारच ढिसाळ आणि पसरट झाले आहे. कुठलीही व्यक्तिरेखा डोळ्यासमोर नीट उभी राहू शकत नाही. बसाप्पा, संगाप्पा, कशाप्पा, गणाप्पा यांना त्यांचे असे पृथक् व्यक्तित्व प्राप्त होत नाही. रत्नव्वा व कमळी सोडल्यास इतर जोगतिणीही केवळ टाइप म्हणून ठोकळेबाजपणेच पेश होतात.

या पुस्तकाचे नीट संपादन झाले असते तर पृष्ठे अडीचशेऐवजी दीडशेपर्यंत कमी होऊ शकली असती आणि बरीच लांबण टळून कादंबरी वाचनीय बनली असती. राजन गवस यांच्यासारख्या नव्या लेखकाचे कौतुक जरूर वाटते– विषय वेगळा निवडला म्हणून. परंतु नुसता तपशील भरण्याचा सोस आवरला नाही, तर त्या लेखनाला तुटकपणा आणि रटाळपणा येतो. संपादकीय संस्कार न झाल्यामुळेच एका नावीन्यपूर्ण विषयावरील ही कादंबरी कमालीची कंटाळवाणी झाली आहे. घाईतले लेखन आणि धावपळीतले प्रकाशन म्हणजे वाचकाला शिक्षाच होय.

(भंडारभोग : राजन गवस, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, पृष्ठे २४९, पासष्ट रुपये)

□

# चिं.त्र्यं. खानोलकर : दीपक घारे

## *शापित प्रतिभावंत*

चिं.त्र्यं. खानोलकर हे मराठी वाचकांना चटका लावून गेलेले व्यक्तित्व होते. ८ मार्च १९३० रोजी जन्म आणि २७ एप्रिल १९७६ रोजी मृत्यू. अवघे ४६ वर्षांचे आयुष्य. तीनशे कविता, साठ कथा, सोळा कादंबऱ्या, रंगभूमीवर आलेली पंचवीस नाटके (त्यांतील बरीच पुस्तकरूपात न निघालेली), दहा-वीस एकांकिका आणि स्फुटलेखन, थोडे बाल-वाङ्मय असे झपाटेबंद लेखन. कोकणच्या जीवनातील शोकात्म, गूढ-गंभीर अतींद्रिय अनुभवांचे एक वेगळेच रसायन तशाच अर्थपूर्ण आशयसंपृक्त शब्दकळेतून प्रगट करणाऱ्या खानोलकरांच्या व्यक्तित्वाचा आणि साहित्याचा मेळ घालण्याचा मोह भल्या-भल्यांना चकवा देतो. जी.ए. कुलकर्णी आणि खानोलकर या दोघांच्या व्यक्तिमत्त्वांबद्दल आणि साहित्याबद्दल मराठी वाचकाला एक वेगळेच कुतूहल आहे. दोघांच्याही निर्मितीत एक उच्चतर प्रकारचा गंभीर एतद्देशीयपणा आहे आणि येथील जीवनाचा जो एक थबथबता असा जीवघेणा छेद त्यांनी घेऊन ठेवला आहे, तो अजूनही अस्वस्थ करणारा आहे. शस्त्रक्रियेच्या वेळी डॉक्टर जेव्हा हृदय उघडे करतात, तेव्हा त्याचे रक्तरंजित थबथबलेपण आपल्या काळजाचा ठाव घेते. तसाच प्रत्यय या दोघांच्या व्यक्तित्वाने आणि वाङ्मयाने येतो. आपल्या आणि आपल्या निकटवर्तीयांच्या हृदयांचाच छेद घेऊन त्याचे जे निर्मम दर्शन त्यांनी घडविले आहे ते आपल्याला भयचकित करते.

खानोलकरांच्या व्यक्तित्वाची आणि साहित्याची तऱ्हा ही 'नाही अंत किनाऱ्याला, इथे सरे तिथे उरे' अशा कोटीतली आहे. 'अशी पाखरून छाया, लावोनिया माया, आनंदाचे आसू लावी कोण ओघळाया ?' असे त्यांनी एका कवितेत लिहिलेले आहे, ते त्यांनाही लागू पडते.

खानोलकरांच्या या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्यासाठी समीक्षकांनी आपापल्या परीने लिहिलेच आहे. परंतु त्यापुढे जाऊन जया दडकर यांनी त्याच्या शोधासाठी त्यांच्याशी संबंधित कोकणच्या भूमीची पायपीट केली आणि त्यांच्या मित्रपरिवाराचीही मनधरणी

केली. "या माझ्या अजाण कवितेच्या वाटेला जाऊ नका. कारण ती ज्या वाटा चालते आहे त्या आहेत तिच्या नागमोडी स्वभावातून स्फुरलेल्या. मोडून पडाल." हा खानोलकरांनीच दिलेला कडक इशारा लक्षात घेऊन दडकरांनी आपल्या शोधकार्याला प्रारंभ केला. त्याचे फलित त्यांच्या पुस्तकांत दिसते. त्यात खानोलकरांच्या मुंबईपूर्व जीवनाचा बराच तपशील आला आहे. त्यापुढचा काळाच्या शोधाचा टप्पा दीपक घारे यांनी हाती घेतला आणि खानोलकरांचे ललित चरित्र पाच-सहा वर्षांच्या परिश्रमातून सिद्ध केले.

## ललित चरित्र

मराठीत लेखकांची आत्मचरित्रे अनेक आहेत, चरित्रात्मक कादंबऱ्याही थोड्याफार आहेत, परंतु ललित चरित्र हा प्रकार अभावानेच आहे. इंग्लिशमध्ये अशा ललित चरित्रांची वा चरित्रात्मक कादंबऱ्याची मोठी समृद्ध परंपरा आहे आणि त्यात नवनव्या प्रयोगांची सतत भर पडत आहे. मराठीत एकूणच हा प्रकार नवा असल्याने आणि आपल्या समाजात प्रचलित असलेली लेखनसंकेतांची काही रूढ चौकट कळत-नकळत आपल्यावर प्रभाव टाकत असल्याने या नादी लेखक विशेष लागत नाहीत. ग्रंथालीसाठी दिनकर गांगल यांनी ही कल्पना सुचविली आणि दीपक घारे यांनी ती स्वीकारून तिचा पाठपुरावा केला; हे विशेष होय. खानोलकरांशी संबंधित ठिकाणांना भेटी देणे, त्यांच्या कुटुंबातील लोकांना भेटणे, मित्र-परिचितांना भेटणे ही कामे घारे यांनी चोख केली. पंचेचाळीस व्यक्तींच्या मुलाखती त्यांनी घेतल्या. खानोलकर १९५९ मध्ये वयाच्या २९ व्या वर्षी मुंबईत आल्यापासून तो १९७६ मध्ये हे जग सोडून जाईपर्यंतच्या १६-१७ वर्षांच्या कालखंडावर ही चरित्रकथा बेतलेली आहे.

## कल्पनेचा बेतशीर वापर

दीपक घारे यांनी स्थळ, काळ, व्यक्तींबाबत सर्वच तपशील खरेखुरे व बिनचूक असावेत, असा कटाक्ष ठेवलेला नाही. खानोलकरांचा मित्र म्हणून दाखविलेल्या दत्तूमध्ये दोन-तीन व्यक्तींचे मिश्रण केले आहे, असे एका मुलाखतीत त्यांनीच म्हटल्याचे वाचनात आले. या पुस्तकात तसा निर्देश नाही. तसेच खानोलकरांचा जीवनपट, पुस्तके, नोकरीतील टप्पे, नाट्यकृती, प्रवास यांची निखळ माहिती देणारी परिशिष्टेही जोडलेली नाहीत. काही व्यक्तींशी खानोलकरांचे आलेले भलेबुरे, प्रेमाचे व तणावपूर्ण संबंध, खानोलकरांच्या त्या प्रसंगातील मानसिक प्रतिक्रियांचे दिग्दर्शन यांबद्दल दीपक घारे यांनी जे ठोकताळे बांधले, ते तसेच का, याबद्दलही काही खुलासा, स्पष्टीकरण व भूमिका पुस्तकात आलेली नाही. त्यामुळे काही ठिकाणी अडखळल्यासारखे वा चुकल्यासारखे वाटते, परंतु एकंदरीत दीपक घारे यांनी खानोलकरांचे जीवनचरित्र नेटकपणाने पकडले आहे, असे म्हणायला हरकत नाही. जमविलेल्या माहितीचा व तपशीलाचा वापरही साक्षेपाने केला असल्याने निवेदनाचा

ओघ कुठे रेंगाळत किंवा थबकत नाही. काही व्यक्तींशी खानोलकरांचे संबंध कसे हळूहळू बदलत गेले हेही दीपक घारे यांनी दाखविले आहे. त्यामुळे या कहाणीतील व्यक्ती व प्रसंग हे एकसुरी वा ठोकळेबाज होण्याचे टळले आहे.

कुडाळची आपली खानावळ बंद करून, तेथील आवराआवर करून खानोलकर मुंबईला येतात. आपल्या मामांकडे गिरगावात उतरतात. मंगेश पाडगावकर, मधू मंगेश कर्णिक, श्री. पु. भागवत यांना भेटतात. नोकरीसाठी वणवण भटकतात. फ्लॅशबॅकने अधूनमधून बागलांची राई, चिदानंद स्वामी, कोकणचा निसर्ग, शालेय जीवनातील स्मृती येत जातात. कर्ज़तला जागा बघून घर थाटतात. पाडगावकर गुरुकुलातील नोकरी शोधून देतात. पहिला काव्यसंग्रह 'जोगवा' प्रसिद्ध होतो. (चैतन्यशक्तीला कवेत घेण्यासाठी हात आसुसले होते, पण ती कवेत येत नव्हती. खानोलकरांच्या जीवनाला अतृप्ती वेढून राहिली होती. ते दीनपणे जोगवा मागत होते, धीर एकवटत होते.) खानोलकर पहिली लोणावळ्याची गुरुकुलातील नोकरी सोडून येतात. (हॉस्पिटलमध्ये भला मोठा कुत्रा होता. चित्रविचित्र भास व्हायचे. मनावर दडपण यायचे म्हणून मी पळून आलो, हे त्यांचे स्पष्टीकरण.) पुढे आकाशवाणीवर काम मिळते. पाडगावकर बॉस होतात. बॉस पाडगावकर आणि कवी आरती प्रभू यांच्यातले नवे नाते, नवे अंतर निर्माण करते. 'कम्युनिस्ट' म्हणून खानोलकरांना आकाशवाणीवरून डच्चू मिळतो. ते कम्युनिस्ट कधीही नव्हते, परंतु हितशत्रू नेमकी संधी साधतात.

कर्जतच्या घराचीही अशीच चमत्कारिक कहाणी असते. त्यांची पत्नी विहिरीकडे रात्री धावते. त्या विहिरीत आधी कोणा स्त्रीने आत्महत्या केलेली असते. तिचे पिशाच्च म्हणे त्या घरात राहणाऱ्यांना सतावते. तशातच त्या घरात नाग निघतो. त्याचा डंख कागदाला होतो. खानोलकर वाचतात. दुसरी जागा बघून खानोलकर कर्जत सोडतात. तशातच पाडगावकरांच्या आग्रहावरून खानोलकर एस.एस.सी. ला बसतात. कॉलेजात प्रवेश घेतात. नवे मित्र-चाहते त्यांना मिळतात. जे. कृष्णमूर्तींची प्रवचने ऐकतात. एका झपाट्यात 'झाडे नग्न झाली' ही कादंबरी लिहून होते. ती रहस्यरंजनमध्ये येते. विद्यापीठाच्या ग्रंथालयात नोकरी लागते. मौजच्या दिवाळी अंकात 'अजगर' छापून येते. अत्रे तिच्यावर झोड उठवितात.

## काव्य-नाट्य

दुसरा काव्यसंग्रह 'दिवेलागण' मौज छापून काढते. खानोलकरांना भास होऊ लागतात. दवाखान्यात घातले जाते. महिन्याने बरे होतात. रायटर्स सेंटरची शिष्यवृत्ती मिळते. मालाडला जागा मिळते. 'सनई' हा संग्रह येतो. 'रात्र काळी घागर काळी' ही कादंबरी येते. तशात ग्रंथालयातील नोकरीही जाते. संभाजी कदमांबरोबर बंगलोर, म्हैसूर फेरफटका होतो. तब्येतीमुळे तो अर्धवट टाकून परत येतात. इतर कादंबऱ्या लिहिल्या जातात. एक शून्य

बाजीरावचा प्रयोगही रंगायन करते.

पुढच्या काळात ते नाट्यलेखनात अधिक रंगतात. माकडाला चढली भांग यथातथाच ठरते. गुरू महाराज गुरूने मात्र श्रीराम लागूंच्या अभिनयाला वेगळीच झळाळी येते. खानोलकरांच्या वागण्यात आत्मविश्वास येतो, पण बेफिकीरी, कडवटपणा, अहंकारही डोकावतो. स्वतःच ते नाटक बसवून सादर करतात. ते नाटक पार कोसळते. तिसरा अंकही पुरा होत नाही. प्रेक्षक शिव्या घालतात. त्यांचे 'अवध्य' अमोल पालेकर अभिनवतंत्राने सादर करतो. ते मात्र चांगला धंदा करते.

एका मुलीच्या प्रेमात खानोलकर सापडतात आणि त्यांचे मद्यपान वाढत जाते. या दोन्ही बाबींमुळे वादळे निर्माण होतात. तब्येत ढासळते. 'कॉकेशियन चॉक सर्कल' निमित्त जर्मनीचा दौरा होतो, परंतु तेथेही आपली उपेक्षा होतेच या भावनेने पछाडल्याने मद्यपान खूप वाढते. 'चानी'वर चित्रपट निघतो. त्या कथेच्या हक्कांबद्दल गोविंद निहलानी कोर्टात जातो. खानोलकरांचे खोटेपण जगजाहीर होते. तशातच अतिरिक्त मद्यपानामुळे ढासळलेली तब्येत अधिकच बिघडते. तीन-चार आठवड्यांच्या आजारपणाने मृत्यू ओढवतो.

दीपक घारे यांनी खानोलकरांच्या प्रेयसीच्या संदर्भातील त्यांचे वागणे, 'चानी'च्या हक्कांबाबत त्यांनी केलेला खोटेपणा, जर्मनीतील दौऱ्याच्या वेळी होणारी उपेक्षा, 'चव्हाटा' हे नाटक सादर करताना झालेली फटफजिती, खानोलकरांना जाणवणारी असुरक्षिततेची जाणीव, स्क्विझोफ्रेनियाचे झटके, 'चानी'च्या एका गद्यप्राय गीताच्या संदर्भात हृदयनाथांशी झालेला वाद यांच्यावर चांगला प्रकाश टाकला आहे. सदैव पैशांच्या अडचणीत असलेले कुटुंबप्रमुख खानोलकर आणि काव्य-नाट्य निर्मितीच्या विलक्षण धुंदीत असलेले मस्त कलावंत खानोलकर या दोहोंचेही दर्शन या ललित चरित्रात कमी-अधिक होते. जया दडकर यांनी खानोलकरांच्या कादंबऱ्यांतील स्थळे, पात्रे आणि प्रसंग यांचा मेळ घालण्यासाठी शर्थीचा समंजस युक्तिवाद केला आहे. कामप्रेरणेविषयीची पौगंडावस्थेतील मनोवृत्ती, फँटसीमध्ये रंगून जाण्याची सहजप्रवृत्ती आणि अनाकलनीय दैवी शक्ती, पापपुण्याची संकल्पना, धार्मिक श्रद्धा वगैरे बाबींवर दडकर यांनी भर दिला आहे. दीपक घारे यांनी असे भाष्य करण्याचा वा खानोलकरांच्या कलाकृतींचा अर्थ लावण्याचा मोह टाळलेला आहे. हे पुस्तक म्हणजे खानोलकरांचे ललित चरित्र आहे. तो खानोलकरांच्या कलाकृतींवर भाष्य करणारा समीक्षा-ग्रंथ नाही, हे भान सतत सांभाळल्यामुळे या चरित्रकहाणीचा ओघ कुठेही खंडित होत नाही वा भलतीसलती वळणे घेत नाही. चरित्राची कादंबरी होत नाही.

## अनेक पैलू धूसरच

परंतु हे पुस्तक संपवल्यावर खानोलकरांच्या चरित्रातले काही तपशील कळले, काही व्यक्तींशी असलेले त्यांचे कमी-अधिक जवळ-दूरचे संबंध कळले, एवढेच समाधान लाभते. खानोलकरांच्या व्यक्तित्वातले अनेक पैलू हे धूसरच राहतात, अस्पर्शितच राहतात. हा माणूस

मोठा कलावंत होता. कालनिर्मितीच्या धुंदीत मस्त होता. ट्रान्समध्ये असल्यासारखे लिहून जाई. त्याच्या शब्दकळेला वेगळे तेज होते. त्या कलावंत सर्जनशील खानोलकरांची प्रचीती या ललित लेखनाद्वारे येत नाही. साचेबंद साधे चरित्र लिहिणाऱ्या लेखकाकडून ही अपेक्षा कदाचित करणे गैर ठरले नसते, परंतु ललित चरित्र लिहिण्याची प्रतिज्ञा करून लेखनाची बैठक मांडल्यावर त्या प्रतिभावंताची निर्मितीची जादू कुठे तरी आपल्याला उमगतेय, असा प्रत्यय वाचकाला यायला हवा. त्या दृष्टीने बघितले तर हे चरित्र काही घटना-तपशील नेटकेपणाने पुढे ठेवते, त्यापेक्षा अधिक काही साधत नाही, असे म्हणावे लागते. अर्थात् खानोलकरांचे व्यक्तित्व आणि लेखन हे तसे गुंतागुंतीचे आणि व्यामिश्र आहेच. त्यामुळे त्याची जादू ही अनेकांना अनेक रीतींनी हुलकावण्या देत राहणार. तेव्हा घारे यांच्या या पुस्तकाने त्यावरचा शेवटचा शब्द लिहिला गेला, असे कोणीच मानणार नाही. अजून खूप लोक खानोलकरांचा आपापल्या परीने शोध घेत राहणारच आहेत. दीपक घारे यांनी त्या दृष्टीने श्री. जया दडकर यांच्याप्रमाणेच काही नेमके तपशील उपलब्ध करून दिले आहेत, त्यांचा निश्चित उपयोग होईल.

*अखेरच्या वळणावर यावा*
*मंद सुगंधी असा फुलोरा*
*थकले पाऊल सहज उठावे*
*आणि सरावा प्रवास सारा*

(चि.त्र्यं. खानोलकर : दीपक घारे. ग्रंथाली वाचक चळवळ, बावरेकर मार्ग, दादर, मुंबई २८.
पृष्ठे १९४, चाळीस रुपये.)

□

# माणसे : अरभाट आणि चिल्लर : जी. ए. कुलकर्णी

***जी. एं. चे भावगहिरे आत्मकथन***

प्रिय जी.ए.

तुम्ही अगदी अकल्पितपणे निघून गेला आणि आमच्या अनेकांच्या भावजीवनातला एक विराट अनुभव बंदिस्त झाला. तुम्ही पुण्यात आला तेव्हा वाटले होते की, आता तुम्ही धारवाडपेक्षा जवळ आलात. आता तुमच्या वरचेवर गाठीभेटी होतील. पण आधी तुम्ही डोळ्यावरच्या ऑपरेशनने आलेल्या पग्रावलंबित्वाची सबब सांगून भेटीचे टाळत राहिलात. आणि नंतर कधी मधी फोनवरून बोलला तरी या असे म्हणायचे टाळलेत आणि त्यामुळे नाही म्हटले तरी आमचाही अहंकार दुखावला गेलाच. साहजिकच एरव्ही वाट वाकडी करूनही तुम्हाला भेटण्यासाठी आसुसलेले आम्ही तुम्ही अगदी रिक्षाच्या अंतरावर असूनही जवळ यायचे मनात सारखे येत असूनही आताच काय तातडी आहे म्हणून लांबणीवर टाकत राहिलो. परंतु ती भेट अजिबात होणारच नाही, अशी अंधुकशीही कल्पना मनात चुचकारली असती तरी अशी गफलत होती ना ! तुमच्या अखेरच्या दिवसांत तुमच्याजवळ आलेले चंद्रकांत परचुरे, अप्पा परचुरे जेव्हा मला सांगतात की तुमचे नावही जीएंच्या बोलण्यात अनेकदा येत असे, तेव्हा तर क्षणिक अहंकारासाठी आपण धडक भेटीचे आपले बेत का लांबणीवर टाकत गेलो याचेच शल्य घायाळ करीत राहते.

परंतु दुसरीकडे असाही अनुभव येतो आहे की, तुम्ही गेला आणि तुमचे असणे किती महत्त्वाचे होते याचा साऱ्यांनाच एकदम साक्षात्कार झाला. तुमच्या व्यक्तित्वाभोवती तुम्ही निर्माण केलेल्या गूढतेचे जे वलय होते त्याला छेदणाऱ्या अनेक स्पर्शरेषांचे कळसूत्री धागे ढिले पडले आहेत. आणि तुमच्या व्यक्तित्वाचे, तुमच्या पत्रांतून प्रकटलेल्या तुमच्या स्वभावसत्त्वाचे आणि लेखनाचे इंद्रधनुष्य कवेत घेण्याचा ज्याला त्याला जोश चढला. तुम्ही गेलात आणि तुमच्याबद्दलच्या आमच्या कोंडलेल्या भावनांना वाचा फुटली. तुम्हाला चाहणारे इतके वेगवेगळ्या क्षेत्रांतले लोक आहेत याचा प्रथमच शोध लागला आणि 'जी.ए. खास आपलेच आहेत' अशा आत्मगौरवाच्या भावनेत रमलेल्यांची संख्या किती प्रचंड

ओघ कुठे रेंगाळत किंवा थबकत नाही. काही व्यक्तींशी खानोलकरांचे संबंध कसे हळूहळू बदलत गेले हेही दीपक घारे यांनी दाखविले आहे. त्यामुळे या कहाणीतील व्यक्ती व प्रसंग हे एकसुरी वा ठोकळेबाज होण्याचे टळले आहे.

कुडाळची आपली खानावळ बंद करून, तेथील आवराआवर करून खानोलकर मुंबईला येतात. आपल्या मामांकडे गिरगावात उतरतात. मंगेश पाडगावकर, मधू मंगेश कर्णिक, श्री. पु. भागवत यांना भेटतात. नोकरीसाठी वणवण भटकतात. फ्लॅशबॅकने अधूनमधून बागलांची राई, चिदानंद स्वामी, कोकणचा निसर्ग, शालेय जीवनातील स्मृती येत जातात. कर्ज़तला जागा बघून घर थाटतात. पाडगावकर गुरुकुलातील नोकरी शोधून देतात. पहिला काव्यसंग्रह 'जोगवा' प्रसिद्ध होतो. (चैतन्यशक्तीला कवेत घेण्यासाठी हात आसुसले होते, पण ती कवेत येत नव्हती. खानोलकरांच्या जीवनाला अतृप्ती वेढून राहिली होती. ते दीनपणे जोगवा मागत होते, धीर एकवटत होते.) खानोलकर पहिली लोणावळ्याची गुरुकुलातील नोकरी सोडून येतात. (हॉस्पिटलमध्ये भला मोठा कुत्रा होता. चित्रविचित्र भास व्हायचे. मनावर दडपण यायचे म्हणून मी पळून आलो, हे त्यांचे स्पष्टीकरण.) पुढे आकाशवाणीवर काम मिळते. पाडगावकर बॉस होतात. बॉस पाडगावकर आणि कवी आरती प्रभू यांच्यातले नवे नाते, नवे अंतर निर्माण करते. 'कम्युनिस्ट' म्हणून खानोलकरांना आकाशवाणीवरून डच्चू मिळतो. ते कम्युनिस्ट कधीही नव्हते, परंतु हितशत्रू नेमकी संधी साधतात.

कर्जतच्या घराचीही अशीच चमत्कारिक कहाणी असते. त्यांची पत्नी विहिरीकडे रात्री धावते. त्या विहिरीत आधी कोणा स्त्रीने आत्महत्या केलेली असते. तिचे पिशाच्च म्हणे त्या घरात राहणाऱ्यांना सतावते. तशातच त्या घरात नाग निघतो. त्याचा डंख कागदाला होतो. खानोलकर वाचतात. दुसरी जागा बघून खानोलकर कर्जत सोडतात. तशातच पाडगावकरांच्या आग्रहावरून खानोलकर एस.एस.सी. ला बसतात. कॉलेजात प्रवेश घेतात. नवे मित्र-चाहते त्यांना मिळतात. जे. कृष्णमूर्तींची प्रवचने ऐकतात. एका झपाट्यात 'झाडे नग्न झाली' ही कादंबरी लिहून होते. ती रहस्यरंजनमध्ये येते. विद्यापीठाच्या ग्रंथालयात नोकरी लागते. मौजच्या दिवाळी अंकात 'अजगर' छापून येते. अत्रे तिच्यावर झोड उठवितात.

## काव्य-नाट्य

दुसरा काव्यसंग्रह 'दिवेलागण' मौज छापून काढते. खानोलकरांना भास होऊ लागतात. दवाखान्यात घातले जाते. महिन्याने बरे होतात. रायटर्स सेंटरची शिष्यवृत्ती मिळते. मालाडला जागा मिळते. 'सनई' हा संग्रह येतो. 'रात्र काळी घागर काळी' ही कादंबरी येते. तशात ग्रंथालयातील नोकरीही जाते. संभाजी कदमांबरोबर बंगलोर, म्हैसूर फेरफटका होतो. तब्येतीमुळे तो अर्धवट टाकून परत येतात. इतर कादंबऱ्या लिहिल्या जातात. एक शून्य

बाजीरावचा प्रयोगही रंगायन करते.

पुढच्या काळात ते नाट्यलेखनात अधिक रंगतात. माकडाला चढली भांग यथातथाच ठरते. गुरू महाराज गुरूने मात्र श्रीराम लागूंच्या अभिनयाला वेगळीच झळाळी येते. खानोलकरांच्या वागण्यात आत्मविश्वास येतो, पण बेफिकीरी, कडवटपणा, अहंकारही डोकावतो. स्वतःच ते नाटक बसवून सादर करतात. ते नाटक पार कोसळते. तिसरा अंकही पुरा होत नाही. प्रेक्षक शिव्या घालतात. त्यांचे 'अवध्य' अमोल पालेकर अभिनवतंत्राने सादर करतो. ते मात्र चांगला धंदा करते.

एका मुलीच्या प्रेमात खानोलकर सापडतात आणि त्यांचे मद्यपान वाढत जाते. या दोन्ही बाबींमुळे वादळे निर्माण होतात. तब्येत ढासळते. 'कॉकेशियन चॉक सर्कल' निमित्त जर्मनीचा दौरा होतो, परंतु तेथेही आपली उपेक्षा होतेच या भावनेने पछाडल्याने मद्यपान खूप वाढते. 'चानी'वर चित्रपट निघतो. त्या कथेच्या हक्कांबद्दल गोविंद निहलानी कोर्टात जातो. खानोलकरांचे खोटेपण जगजाहीर होते. तशातच अतिरिक्त मद्यपानामुळे ढासळलेली तब्येत अधिकच बिघडते. तीन-चार आठवड्यांच्या आजारपणाने मृत्यू ओढवतो.

दीपक घारे यांनी खानोलकरांच्या प्रेयसीच्या संदर्भातील त्यांचे वागणे, 'चानी'च्या हक्कांबाबत त्यांनी केलेला खोटेपणा, जर्मनीतील दौऱ्याच्या वेळी होणारी उपेक्षा, 'चव्हाटा' हे नाटक सादर करताना झालेली फटफजिती, खानोलकरांना जाणवणारी असुरक्षिततेची जाणीव, स्क्विझोफ्रेनियाचे झटके, 'चानी'च्या एका गद्यप्राय गीताच्या संदर्भात हृदयनाथांशी झालेला वाद यांच्यावर चांगला प्रकाश टाकला आहे. सदैव पैशांच्या अडचणीत असलेले कुटुंबप्रमुख खानोलकर आणि काव्य-नाट्य निर्मितीच्या विलक्षण धुंदीत असलेले मस्त कलावंत खानोलकर या दोहोंचेही दर्शन या ललित चरित्रात कमी-अधिक होते. जया दडकर यांनी खानोलकरांच्या कादंबऱ्यांतील स्थळे, पात्रे आणि प्रसंग यांचा मेळ घालण्यासाठी शर्थीचा समंजस युक्तिवाद केला आहे. कामप्रेरणेविषयीची पौगंडावस्थेतील मनोवृत्ती, फँटसीमध्ये रंगून जाण्याची सहजप्रवृत्ती आणि अनाकलनीय दैवी शक्ती, पापपुण्याची संकल्पना, धार्मिक श्रद्धा वगैरे बाबींवर दडकर यांनी भर दिला आहे. दीपक घारे यांनी असे भाष्य करण्याचा वा खानोलकरांच्या कलाकृतींचा अर्थ लावण्याचा मोह टाळलेला आहे. हे पुस्तक म्हणजे खानोलकरांचे ललित चरित्र आहे. तो खानोलकरांच्या कलाकृतींवर भाष्य करणारा समीक्षा-ग्रंथ नाही, हे भान सतत सांभाळल्यामुळे या चरित्रकहाणीचा ओघ कुठेही खंडित होत नाही वा भलतीसलती वळणे घेत नाही. चरित्राची कादंबरी होत नाही.

## अनेक पैलू धूसरच

परंतु हे पुस्तक संपवल्यावर खानोलकरांच्या चरित्रातले काही तपशील कळले, काही व्यक्तींशी असलेले त्यांचे कमी-अधिक जवळ-दूरचे संबंध कळले, एवढेच समाधान लाभते. खानोलकरांच्या व्यक्तित्वातले अनेक पैलू हे धूसरच राहतात, अस्पर्शितच राहतात. हा माणूस

आहे याचे भान आले. तुम्ही जन्मभर स्वतःच्या अज्ञातवासाचा तोरा मिरवत राहिलात, परंतु अनेक गवाक्षे खुलीच राहिली होती हे तुमच्या कसे लक्षात आले नाही, कळत नाही. तुमच्या अनेक कथांतून तुम्ही तर स्वतःला प्रगट करीत होता आणि अनेकांना दीर्घ-प्रदीर्घ पत्रे लिहून तुम्ही आपल्या अंतरंगाचेही पापुद्रे उलगडीत होता. स्वतःच्या कोषात राहण्याची तुमची मस्तवाल ऐट; तुम्हीच कळत नकळत गमतीदार फटी पाडून मजा बघत होता. तुमच्या सहवासातले खास ठेवणीतले भरजरी क्षण खास आपलेच म्हणून मनाच्या गाभाऱ्यात बंदोबस्तात ठेवून आम्हीही तुमची ऐट जपत होतो. तुमच्या त्या अज्ञातवासाच्या व्रताचा भंग होऊ नये म्हणून आपल्या परीने काळजी घेत होतो.

## साऱ्यांचेच खजिने आता खुले

परंतु जी.ए., तुम्ही गेला आणि हा परस्परमौनाचा लेखीटाकी न केलेला परंतु स्वेच्छेने पाळलेला करारही जणू व्यर्थ ठरला. तुमची पत्रे, वैयक्तिक भेटीगाठीतले दर्शन, तुमच्या लेखनावरचे भाष्य, तुमच्या घरच्या बंद फाटकामागचे ते रहस्यमय अस्तित्व सारेजण आता आपले खजिने जणू मुक्त करीत आहेत.

आणि जी.ए., आश्चर्य याचे वाटले की तुम्हीही तुमच्या जीवनाबद्दल प्रथमच जणू मोकळेपणाने बोलायला उत्सुक होता. आत्मचरित्रात्मक लेखनाची ॲलर्जी आहे. 'जाहीरपणे आत्मलेखन करणे हे आपल्या स्वभावाविरुद्ध आहे', अशी भूमिका तुम्ही मांडत होता. आणि आपल्या खासगी पत्रात आत्मलेखनाशिवाय काहीच नसते असेही तुम्ही सांगत होता. परंतु काही ठिकाणी मी हे सर्वनाम आलेच तर तो मी अगर काही व्यक्ती वा प्रसंग सर्वस्वी खऱ्याच असतात असे नाही आणि आत्मलेखन म्हणून त्याला फारसे महत्त्व नसते असाही इशारा तुम्ही न कंटाळता पुनः पुन्हा देत होता हेही खरे आहे. परंतु तुमच्यातला मी तुम्हालाही खरे तर हुलकावण्या देत होता असेच म्हणायला हवे. आणि याचे उदाहरण म्हणून तुमचे तुमच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेले पहिले पुस्तक 'माणसे : अरभाट आणि चिल्लर' हेच पुराव्यासाठी पुरेसे आहे.

## शाळेतले दिवस

प्रकाशक अप्पा परचुरे यांनी या पुस्तकाची जाहिरात करताना ती एक दीर्घकथा आहे अशी भलावण केली खरी, पण जी.ए., ही अरभाट चिल्लर माणसे म्हणजे तुमच्या स्वतःच्या शाळा-कॉलेजमधल्या काळातले मित्र, आप्तजन, गुरुजन आणि गावकरी आहेत आणि तुम्ही या सगळ्यांना साक्षी ठेवून आपण कसे घडलो हेच तर सांगितलंय. यातल्या कितीतरी व्यक्ती आणि वल्ली तुमच्या कथांतून विविध रंगरूप लेवून या आधी भेटलेल्या आहेत आणि त्यांची तुम्ही दिलेली नावं कदाचित वास्तवाहून भिन्न असली तरी हे सगळं तुमचंच आत्मकथन आहे असं स्वच्छ दिसतं. तुमच्या मित्रजनांना लिहिलेल्या पत्रांतूनही त्यातले काही तपशील आधी प्रकट झालेले आहेत. आणि पां.ना. कुमठा, अप्पा परचुरे, जयवंत

दळवी, सुभाष अवचट प्रभृतींच्या आठवणींतूनही काही तपशिलांना पुष्टी मिळतेच आहे. पण खरं सांगू, तुम्ही अमक्या अमक्याला कथेत असं बदललं हे शोधून काढण्यात मला काही रस नाही. तुमच्याबद्दल कुतूहल बाळगणाऱ्यांना तुम्ही दूर ठेवायचा, त्यामुळे तुमच्याबद्दल अधिकच जवळीक वाटायची, स्वतःचा हा अलिप्तपणा दूर ठेवून या पुस्तकात तुम्ही आपल्या माध्यमिक शिक्षणाच्या वेळच्या गावातल्या वातावरणाचं, शाळेचं, शिक्षकांचं अन् मित्रांचं चित्र रेखाटलं आहे आणि त्या मित्राचं, शिक्षकांचं, आप्तांचं पुढं काय झालं याचं कधी सलग, कधी विस्कळीत रूप दाखवलं आहे. तुम्ही कॉलेजात गेला, प्राध्यापकी पत्करलीत, नोकरीनिमित्तानं जन्मगावापासून दूर राहिलात आणि शेवटी तर अगदीच ज्याच्याशी नाळ जुळणार नाही अशा पुण्यात एका कुमुहुर्तावर येऊन पस्तावत राहिला.

'वाळूत पडलेल्या माशाप्रमाणं' या पुण्यात तळमळत राहिलात. वेटिंग रूमचं निवासस्थान केलं. गडकऱ्यांचं घर बघायला गेलात. दातार मास्तरांच्या वतीने जणू तुम्ही त्या निवासस्थानाकडे गेलात आणि त्या सोपस्कारातला निर्जीवपणा तुम्हाला जाणवला. दातार मास्तरांनी आयुष्यभर वाहिलेल्या हारफुलांचे निर्माल्य गोळा करून मी त्यांचे त्यांना पाठवून दिले या भावनेने पण त्यापलीकडे तुम्ही पुण्यात रमला नाही. 'ज्या ठिकाणी आपल्यासाठी काहीच नाही तेथून निसटून जाण्याची देखील माझी सवय जुनीच आहे' असे म्हणत तुम्ही पुण्याहून एकदम दूर, अगदी सर्वांना गाफील ठेवून निघून गेलात.

## अरभाट : क्लासिक, भव्य, खानदानी

जी. ए., तुम्ही तुमच्या या आत्मकथनाला नावही मोठं अर्थपूर्ण दिलंय. स्वतःबद्दल बोलण्यापेक्षा इतरांबद्दल जास्त बोलायला तुम्हांला आवडतं. स्वतःची जडणघडण कशी झाली, यापेक्षा इतरांकडून तुम्ही काय घेतलं, याचंच तुमचं स्मरण कृतज्ञतेनं जास्त चालतं. म्हणून तुमच्या या आत्मकथनात इतर माणसंच भाव खाऊन जातात. ही माणसंही अरभाट आणि चिल्लर अशी. अरभाट शब्दाशी प्रथम मीही घोटाळलो. पण तुम्ही पुस्तकाच्या ४४ व्या पृष्ठावर त्याचं अर्थवैभव उलगडून दाखवून वाचकाला गूढ रहस्यात फार काळ ताटकळत ठेवायचं टाळलंत, हे बरं केलंत. अरभाट म्हणजे खानदानी, भव्य, थाटामाटाचं. मठातील जेवण कसं होतं? अरभाट. मन्सूरांचं गाणं कसं झालं? अरभाट. ऋषिकेशला गंगा कशी आहे? अरभाट. अरभाट म्हणजे क्लास. क्लासिक. पांचाळीच्या देसाईंचा तुम्ही उल्लेख केला आहे. श्रीमंती आवडी-निवडीची ती एक राजमुद्राच असे म्हटले आहे. म्हणजेच अरभाट.

## पोक्तपणाचा मुखवटा गायब

जी. ए., तुमच्या माध्यमिक शाळेतल्या आडवयातल्या गमतीजमती सांगताना तुम्ही खरंच खूप मोकळे मोकळे झालाय. तुमचा नेहमीचा भारदस्तपणा, पोक्तपणाचा मुखवटा तिथं आलेलाच नाही. तिथं आरंभीच्या तुती, कैरीसारख्या कथांच्या घरगुती वातावरणात

गेल्यासारखं वाटतं. नोकरीचा गाव सोडून प्लॅटफॉर्मवर पाऊल ठेवताक्षणी तुमच्यातला सांजशकुनवाला तत्त्वज्ञ वरचढ ठरतो. शाळेतले तुमचे सवंगडी तातू सामंत, प्रभाकर, नानू बापट, दिवेकर, जाधव, निर्मळकर, वासू केळकर हे अजूनही तसेच खट्याळ खोडकर वाटतात. मेणबत्तीतील वातीप्रमाणे दिसणारा ओलसर डोळ्यांचा नानू बापट, एक टीचभर टोपी तुळतुळीत डोक्यावर ठेवून बेडूक डोळ्यांनी समोर बघत वर्गात स्वस्थ बसणारा चिलम्या नानू सामंत, कुठल्याशा मासिकात वीतभर लेख छापून आल्याने कपाळावर दोन विचारी सुरकुत्या टाकून विश्वाची चिंता करणारा कानविंदे म्हणजे कांदेविक्या, या सर्व मित्रांबरोबर तुम्ही शाळेत रंगला होता आणि तुमचे ते एकापेक्षा एक सरस शिक्षक. पांगळ्या मधुकरचा कुत्रा रस्त्यावर गेला आणि सारवटाखाली सापडून चिरडून मेला, त्याबद्दल निबंध लिहायला आवडेल असे म्हटल्यावर खेकसणारे सडेकर मास्तर. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' ही ओळ प्रयत्नांची स्तुती करणारी नाही, कुणीतरी असला खुळचट अर्थ डोक्यात घेतला व परंपरा होऊन बसली. एखाद्या पुजाऱ्याला पूजा करताना शिंक यावी व ते पाहून सुरवातीला शिंकलेच पाहिजे असा दंडक घातला जावा तसे या ओळीबद्दल झाले आहे असे ठणकावून बंडखोरीने त्या वयात शाळेतही तुम्ही लिहीत होता आणि त्यासाठी वर्गातून तुम्हाला बाहेर हाकलणारे मास्तरही होते. हे ऐकल्यावर मुलाचे पाय पाळण्यात दिसतात हे तरी खरे मानायलाच हवे. तिच्या हनुवटीवरील तीळ म्हणजे तिच्या पुण्याईचे गणित करीत असता विधीने दिलेले दशांश चिन्ह या ओळीने कमळाचे परागतंतू विजेच्या झळाळीने उजळण्याचा झालेला साक्षात्कार ही चेटूक करून जाणारी ओळ सतत तुम्हाला खुणावत राहिली.

### लक्षात राहिलेले सुवर्ण क्षण

सावरी कापसाची आठवण व्हावी असे गुबगुबीत व सौम्य संस्कृतचे दामले मास्तर, नाकातून बोलणारे भूगोलाचे कुलकर्णी मास्तर, रोम कुठे आहे ते बरोबर सांगितल्याबद्दल काचेच्या नळीत पोपटाच्या कोवळ्या पिसांच्या रंगाचे पाणी व त्यात मोहरीएवढा मासा असणारा टाक बक्षीस देणारे प्रिन्सिपॉल हिल, पार्शॅलिटी अंपायर म्हणून सर्वजणांच्या तक्रारी ऐकणारे चांदेकर मास्तर, नीटनेटक्या सुटातले, आकर्षक सेंट लावणारे कुर्रेबाज सायमन (ग्रेची इलिजी शिकवायला वीस तास त्यांनी घेतले आणि ती कविताही अशी शिकविली की देव्हाऱ्यातील चांदीच्या टाकाप्रमाणे मनात पुढेही स्वच्छ राहिली.) बटाट्यांच्या सालीच्या रंगाच्या धोतरात वावरणारे व आल्याबरोबर उबदार, घरगुती वातावरण निर्माण करणारे दातार मास्तर. चालताना डोलणारे आणि जहाजाच्या शिडाप्रमाणे वारा भरलेले धोतर सावरणारे देवण्णामास्तर, तोंडी छापखाना म्हणून ओळखले जाणारे रेगे मास्तर, प्रदर्शने, सहली, नाचगाणी यांत रंगणारे आपटे मास्तर, शिक्षकांच्या क्रिकेटच्या मॅचेस आणि गप्पा, नंतर होणारे भीमाक्काच्या खानावळीतले जेवण. त्यातही खरे भावले ते खरे

मास्तर. त्यांनीच तुम्हाला कवितेविषयी आस्था दिली. साहित्यातील सौंदर्याची जाण दिली. पायथागोरसचा सिद्धांत शिकवताना नवरदेवाप्रमाणे झगमगीत पिवळ्या रंगाचा एक काटकोन त्रिकोण बोर्डावर काढला. त्याच्या कर्णावर जांभळ्या रंगाचा चौरस, दोन उरलेल्या बाजूंवर दोन हिरवे चौरस ठेवून त्या दोन हिरव्या चौरसांची बेरीज जांभळ्या चौरसाएवढी आहे हे सिद्ध केले त्या देवदत्त क्षणी, जी. ए., तुम्हाला जणू साक्षात्कार झाला. 'मी आणि इतर जग यातील दुरावा जळून गेला. तसला अनुभव पुन्हा कधी आला नाही. राजहंस कधीच खाली उतरले नाहीत. त्या क्षणी तो दुर्मिळ, मूल्यवान व कणरूप अनुभव स्पर्श करून गेला' असे तुम्ही लिहिले आहे. अशा अनुभवाच्या भव्यतेशी किंवा स्वतःच्या मोठेपणाशी काडीचाही संबंध नसतो असेही तुम्ही म्हणता. हा तुमचा एक आवडता सिद्धांत आहे. एखादी घटना आणि सद्‌गुण-दुर्गुण यांच्यात काहीच नीतिसंबंध नसतो. त्यात कार्यकारणभाव वा सुसंगती नाही असे तुम्ही म्हणता. त्यासाठी तुम्ही एक समर्पक दृष्टांतही दिला आहे. 'पांढऱ्या ढगात एक पांढरी गाय आहे असे समजायचे, आणि तिचा शोध घेत धडपडायचे. तिचे पांढरे दूध पिण्याची खुळचट हाव बाळगायची असे सारे तुझे सोंग आहे.' असे तुम्ही म्हणता.

जी. ए., तुमच्या आत्मकथनात पुढे कॉलेजातल्या नोकरीचे, तेथील निवृत्तीचे, पीपीओचे निळे पेन्शन बुक यांचे आणि पुण्यातील वास्तव्याचे उल्लेख येतात. परंतु त्यात तुम्ही तपशील भरलेला नाही. तपशील आहे तो तुमच्या घरी रंगणाऱ्या करंदीकर आजोबा, अप्पा काळे, दातार मास्तर आणि तुमचे दादा यांच्या गप्पांचा. दादा हे एका वकिलाकडे काही काळ कारकून होते. आजोबा त्या वकिलाला यम म्हणत. म्हणून दादांना यमाचा कारकून या नात्याने चित्रगुप्त म्हणत. आजोबांना न्यायला येणारा त्यांच्या घरचा आश्रित पिशव्या विठोबा... त्यांच्या गप्पातून समृद्ध होणारं तुमचं भावजीवन.

अप्पांची बहीण आजारी असल्याचा निरोप आल्यावर ते जातात, आणि बहिणीची अवस्था कठीण आहे असे कळल्यावर झोपेच्या गोळ्या घेतात व मरतात. दादा व करंदीकर यांना चिठ्ठ्या तेवढ्या ठेवतात. आपली मैफल संपली. दैवदुर्विलास असा की बहीण आजारातून सावरते. आजोबाही पुढे जातात, आणि त्यांचा आश्रित पिशव्या विठोबा ते घर सोडून जातो. मुंबईत पडेल ते काम करून डॉक्टर होतो. पुन्हा गावी येऊन दवाखाना काढतो. परदेशात जातो. जी. ए. या कहाणीत तो पुन्हा पुन्हा येतो. तुमचा प्रतिनायक म्हणून, विसंवाद म्हणून. तुम्हाला जॅक म्हणणारा तोच एक. दातार मास्तरांच्या आणि आजोबांच्या अंतिम दिवसांची हालहवाल तोच तुमच्या कानी पोचवतो. शाळेतल्या नकाशात तुम्ही बघितलेल्या ओरीनोको नदीवर आश्रम घालून तुमच्याकडून घेतलेलं नाणं तो तिच्यात टाकणार असतो. विठोबा नेमका अशा वेळी येतो की, तुम्ही कुठल्यातरी निर्णायक स्थित्यंतराला सिद्ध असता. डॉन क्विझोटेचा सांचो पांझा, तसाच जॅकचा हा विठोबा. तुम्ही काहीच करायला धजला नाही, हा सगळे करूनही निःसंगच राहिला. तरीही जी. ए. तो तुम्हाला हक्काने म्हणतो, 'तू

बुरसट जन्मलास, बुरसट राहिलास, नि शेवटी बुरसटच मरणार. जॅक, तू जन्मभर अगदी बावळट, वाईकर भटजी राहिलास.' शेवटचा निरोप घेताना तो सांगतो, 'तू मला लिहू नकोस. आता सारंच संपलं आहे. तू लिहिणार कुणाला ? पिशव्या विठोबाला ? अरे, तो तर अनेक ठिकाणी अनेक वेळा मरून गेला आहे. आजोबा, तुझे दादा मास्तर गेले, त्याच वेळी मोठेमोठे कपचे उडत गेले आणि इतर वेळी उरलेले सारे कुजत गेले. आता आठवणींची जानवी तोडून स्वतःचं श्राद्ध करून मी चाललो आहे.'

जी. ए., तुम्ही वर्गात शिकवताना कधी मुलींकडे बघायचाही नाही म्हणे ! शेवटी प्लॅटफॉर्मवर उभे असताना वयाने जाडीभरडी मंदा केरूर, तुमची विद्यार्थिनी येते, पण तुम्ही तिला चुकविता. सुरेख निबंध लिहिणारी पण आता पांढरी पिठाळलेली वृंदा कट्टी तेथे येते. तिलाही तुम्ही टाळता. स्वतःला चिल्लर पान मानून, वाऱ्यावर उडून जायचं. भिरभिरणाऱ्या पानांचं तरंगत खाली येणं, आणि खाली उतरताना 'समजत नाही, समजत नाही' म्हणत उच्छवास सोडणं तुम्हाला जाणवतं. निर्जीव वस्तूचे पूजन तुम्ही कधी केले नाही, मुलखावेगळ्या पिंजारकेस पुस्तकात तुम्ही रंगला, 'माझ्या अज्ञानातील संशयाला संरक्षण दे' अशीच करुणा भाकत राहिला.

जी. ए., तुमच्याबद्दल अजूनही अपरंपार कुतूहल आहे. तुमचं अप्रकाशित असं किती साहित्य आहे याचा अजून कुणालाच अंदाज नाही. तुमची चित्रंही कितीतरी आहेत. तुम्ही लिहिलेल्या पत्रांचा खजिनाही शतशः विखुरलेला आहे. या साऱ्यातून कदाचित एक प्रतिमा उभी राहील. कदाचित तुम्ही त्यातूनही सराईतपणे निसटून आमची मजा बघत राहाल. 'माणसे : अरभाट आणि चिल्लर' ने तुमच्या भावजीवनात जो प्रवेश होतो, तो तुमच्या साऱ्या लेखनसंभाराला एक अधिष्ठान देणारा ठरेल. म्हणूनच तुमच्या मृत्यूनंतर हे पुस्तक प्रकाशित होत आहे यामागेही काही दैवी संकेत असेल. जाता जाता तुम्ही हे पुस्तक देऊन तुमच्या बाबतीत 'समजत नाही, समजत नाही' असे म्हणायची पंचाईत करून ठेवलेली आहे असेही म्हणता येईल. तशा फिरक्या तुम्ही नेहमीच घेत आला. फाय फाउंडेशनच्या बक्षीस समारंभाला हजर राहून तुम्ही मित्रांनाही धक्का दिला. नंतर प्रा. हातकणंगलेकरांना जाऊन भेटलात. एवढेच सांगण्यासाठी की, 'मी असे असे वागणार असे गृहीत धरता काय ? बघा, चुकला ना तुमचा होरा ?' या पुस्तकानेही तुम्ही तसाच धक्का दिला आहे खरा ! तुम्हाला ज्याबद्दल विचारावंसं वाटत होतं, अशा कितीतरी गोष्टी तुम्ही आपण होऊनच या पुस्तकात सांगितल्या आहेत. म्हणूनच हे पुस्तक म्हणजे तुमच्या अंतरंगात शिरण्याचा अरभाट मार्ग आहे. त्याबद्दल तुम्हाला धन्यवाद.

शंकर सारडा.

(माणसे : अरभाट आणि चिल्लर, लेखक : जी. ए. कुलकर्णी, प्रकाशक : परचुरे प्रकाशन मंदिर, गिरगाव, मुंबई ४, पृष्ठे १३२, किंमत ४० रुपये.)

□

# जी. ए. : एक पोर्ट्रेट : सुभाष अवचट

## *सुभाष अवचट यांनी घेतलेल्या जी. एं.च्या फिरक्या*

'जी. ए. : एक पोर्ट्रेट' हे चित्रकार सुभाष अवचट यांचे पुस्तक पाहताक्षणीच चित्ताचा ठाव घेते. चौकोनी आकार, काळ्या चौकटीतले विटकरी पिवळ्या तांबड्या रंगांची प्रकाशदायी उधळण करणारे मुखपृष्ठ, त्यातील बाटलीतील फुलांकडे, त्या पलीकडच्या खिडकीकडे व त्या बाहेर दूर कुठेतरी बघणारे जी. ए., मलपृष्ठावर जी. एं.चा किंचित हसरा, प्रसन्न चेहरा गॉगलच्या आडून आपल्याला न्याहाळणारा- असा बाह्यतःच समृद्धीचा प्रत्यय देणारा या पुस्तकाचा एकूण श्रीमंती रागरंग प्रथमदर्शनीच आपल्या औत्सुक्याला आवाहन करतो.

मुखपृष्ठाचे पान उलटले की आतील आसपासच्या (एंडपेपरच्या) दर्शनी पृष्ठावर भल्यामोठ्या कुलपाचे छायाचित्र आपल्याला दिसते, आणि मुखपृष्ठाच्या आत दुमडलेल्या भागावर चकाकणाऱ्या काळ्या कुळकुळीतपणातून 'कुलूप' हे शब्द आणि त्याखाली कवितेसारख्या दहा ओळी पांढऱ्या रंगातल्या नजरेसमोर येतात. त्या ओळीतून 'कुलूप या नित्यपरिचयाच्या वस्तूला स्वतंत्र अस्तित्व लाभते. तीही एक व्यक्ती वाटू लागते, सारे काही पाहणारी ऐकणारी पण तुमच्या किल्लीशिवाय तोंड न उघडणारी... अलिप्त-जिवंत' अशा आशयाचे हे अवतरण जीएंच्या पत्रातले, सुभाष अवचट यांच्या छायाचित्राच्या संदर्भात आलेले आहे, हे आपल्याला पुढे उमगते. जीएंच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक म्हणून सुभाष अवचट हे त्यांच्याच दारावरचे कुलूप आपल्यापुढे ठेवतात. तेव्हा हा काय वाह्यातपणा आहे असा विचार आपल्या मनात डोकावून जातोच, तशात चांगल्या प्रतिभावंत व्यक्तीही कधी कधी आचरटपणा करतात, किंवा कळत नकळत विक्षिप्तपणा दाखवतात- त्यातला हा प्रकार नव्हे ना अशीही शंका येते. त्यामुळे पुढची पाने आपण भराभर चाळून या पुस्तकात आहे तरी काय हे कुतूहल शमविण्याचा उतावळा प्रयत्न करतो.

'मौज'ने आपल्या परंपरेला साजेशा चोखंदळपणाने, सजवलेला मजकूर; पांढऱ्या शुभ्र ॲलाबस्टर कागदावरील आल्हादकारक मुद्रण, अधूनमधून जीएंचो व त्यांच्याशी निगडीत

बाग, फाटक, दार वगैरेंची छायाचित्रे; एकाच छायाचित्राचे वेगवेगळ्या आकारातील रूपदर्शन कसे भिन्न होऊ शकते हे दाखवण्याचा जाणीवदार आग्रह हे आपल्या लक्षात येते आणि ही अवचटांच्या इरसाल आचरटपणाची लहर नसावी असा दिलासा वाटून जातो. चौऱ्याऐंशी पृष्ठांपैकी अठरा-वीस पृष्ठे छायाचित्रेच असल्याने तसा मजकूर कमीच असतो. त्यामुळे हे लेखवजा पुस्तक अक्षरशः एका बैठकीत वाचून होते. पोर्ट्रेट एका दृष्टिक्षेपात पाहायला हवे; तसे ते पाहता यावे याला महत्त्व आहेच. त्या दृष्टीने या लेखनाचा आटोपशीरपणा हा सोयीस्करच ठरतो.

आरंभीच सुभाष अवचट 'इस्किलार'या कथेसाठी चित्रे काढण्याकरिता मुंबईहून राम पटवर्धनांचा फोन आल्यामुळे निघतात. (ती दीर्घकथा पोस्टाने पाठवण्याचा धोका, गहाळ होईल ही भीती) त्याचा किस्सा येतो. १९७४ मधील ही घटना असावी. कारण पुढे ही कथा पुस्तकरूपाने ७५ मध्ये प्रसिद्ध झाली. पटवर्धन वाङ्मयाबद्दल रेखीव काळजी करतात, तर अवचट संवेदनक्षम कलावंताच्या काळजाला 'कथा वाचताना धो-धो पावसाची साथ मिळाली' याबद्दल मनःपूर्वक आनंद मानतात. 'मला पाऊस आवडतो. जीएंचे लिखाणही. दोन्ही योग जुळून आले आणि ही चित्रे काढण्याची संधी मिळाली त्याबद्दल श्री. पटवर्धन, मी तुमचा आभारी आहे.' असे वाक्य येते आणि सुभाष अवचट यांचा मिस्किलपणा या पुस्तकात सर्वत्र दिसणार याचा जणू संकेत मिळतो. अवचटांचा हा मिस्किल, फिरक्या घेणारा स्वभाव, कधी अचाटपणाकडे तर कधी आचरटपणाकडे झुकतो, कधी वाह्यातही बनतो आणि कधी डिवचलेल्या प्राण्यासारखा हिंस्रही. प्रकाशक आप्पा परचुरे यांनी अवचटांची रंगीत चित्रे न वापरताच 'बखर बिम्मची' व 'मुग्धाची रंगीत गोष्ट' ही पुस्तके काढली. त्या संदर्भात अवचट लिहितात. 'लहान मुलांसाठी आम्ही (जीए व मी) दोघांनी ठरवलेला अशा सुंदर रंगीत पुस्तकांचा फुगा थोडावेळ उडाला आणि परचुऱ्यांनी बोट लावून तो फोडला. बिचारे! (बिचारे कोण? परचुरे? जीए की अवचट) पैलपाखरे या पुस्तकावर नटीचा चेहरा आला म्हणून जीए तक्रारीच्या सुरात बोलतात तेव्हा अवचट त्यांना सांगतात. 'आता गाठ पडलीय तर निस्तरा' परचुरे यांना जीएंच्या नव्या पुस्तकांच्या प्रकाशनाबाबत अवचटांनी प्रथम विचारले, परंतु जीएंची आणि आप्पा परचुऱ्यांची गाठ मात्र त्यांच्या अनुपस्थितीतच पडली आणि पुण्यातील वास्तव्यात आप्पा परचुरे यांची इतर कोणाही व्यक्तीपेक्षा जीएंशी अधिक जवळीक जुळली याबद्दलचा रागही अवचटांना आवरता येत नाही. 'शेवटी परचुरेच त्यांना भेटले असावेत. कारण त्यानंतर परचुरे नाहीसे झाले ते एकदम जीएंच्या मृत्यूच्या नंतर घाईगडबडीत दिसले.' असा शेलका फराटा मारून अवचट आपला राग प्रकट करतात.

जीएंच्या मृत्यूनंतर त्यांचा पार्थिव देह अत्रे सभागृहात आणण्यात आला. तेव्हा वरची खोली मोकळी करेपर्यंत तो खाली जिन्याखाली ठेवण्यात आला. त्याची नोंदही अवचट नेमकी करतात. 'जिन्याखाली या माणसाला ठेवले होते' अशा शब्दात, आप्पा परचुरे हे

जीएंच्या पुण्यातील वास्तव्यात जीएंच्या अगदी अंतरंगात प्रवेश करू शकले. अन्य दीर्घकालीन मित्रांनाही जीएंनी पुण्यातील वास्तव्यात भेटण्याचे टाळले. पुण्यात राहणाऱ्या परिचितांनाही जीएंनी जवळ येऊ दिले नाही याबद्दलचा हा त्रागा नाही ना? जीएंचे पोर्ट्रेट काढता काढता उगाच इतरांवर असे चार संतप्त शिंतोडे उडवण्याची गरज होती का?

## चित्रांनी कथेला खाल्ले

'इस्किलार' कथेचे वातावरण सुभाष अवचट अत्यंत रेखीवपणे अस्सल कलावंताच्या प्रतिभेने उभे करतात. "अंगणातले दाणे एक एक करत चिमणी जशी नेमके टिपत जाते तसे जीएंचे अक्षर होते... मी कथा वाचायला सुरुवात केली आणि हळूहळू आजूबाजूचे सारे विसरून गेलो. मला जाणवले, मी कोठल्यातरी समुद्रकिनाऱ्यावरच्या एका अनोळखी शहरात फिरतो आहे. तेथे दगडी निमुळते रस्ते होते, भग्न मंदिरे, त्यांच्या उंच चढत गेलेल्या पायऱ्या होत्या. कललेले सनातनी खांब, नक्षीदार कमानी होत्या. पानाफुलांची वेलबुट्टी कोरलेल्या अर्धवर्तुळाकार खिडक्या तर होत्याच, पण रस्त्यांवर जागोजागी भव्य शिल्पे होती..."

जीएंच्या कथेचा कॅनव्हॉस खूप मोठा असतो, जीएंची गोष्ट चार-सहा छापील कागदांत पकडण्याइतकी छोटी नाही. . . पण त्यांच्या कथेत सतत डोकवणारी नियती तर मला तीनशेपासष्ट अंशात पसरलेल्या वाइड अँगल लेन्स लावून सुद्धा डिस्टॉर्शन न येऊ शकणाऱ्या लँडस्केपसारखी भासते; परंतु चित्रे काढायला सोपी व आनंद देणारी अशी वाटते, असा अवचट आपला अनुभव सांगतात. कथांना चित्रे चिकटवण्याची जरूर आहे का या जीएंच्या प्रश्नाचे उत्तरही अवचट आपल्या मॉक-सिरियस स्टाइलमध्ये देतात. 'चित्रं चिकटवली नाहीत तर अधिक उत्तम... माझं हे मत. पण मी बोलत नाही. कारण व्यवसाय!'

'इस्किलार'ची चित्रं आवडल्याचं जीएंचं पत्र आलं. त्यांनी आपल्या खास शैलीत लिहिलं. 'पण बापरे अवचट, इस्किलारला तुमच्या चित्रांनी जवळजवळ खाऊनच टाकले.'

जीएंच्या आणि अवचटांच्या गाठीभेटी झाल्या. किती वेळा? दोन-तीन वेळा? (नक्की आकडा कुठला?) पत्रांची देवघेव झाली. दीर्घकाळ. परंतु ही पत्रे पाच-दहा की पन्नास याचा स्पष्ट उल्लेख नाही. पुण्यात जी. ए. आल्यावर फोनवरून बोलणे होई. किती वेळा? अवचट सांगतात. दिवसातून दोन-तीन वेळा तरी. पुण्यातल्या आपल्या स्टुडिओवर जीएंनी यावे असे अनेकदा आमंत्रण देऊनही जीए कधी आले नाहीत. जेवायला येतो असे सांगूनही कधी प्रत्यक्ष आले नाहीत. सोबत कधी जेवले नाहीत. पहिली भेट धारवाडला झाली. कॉंटिनेटल प्रकाशनचे अनंतराव कुलकर्णी यांच्या समवेत. ती किती दिवसांची होती? किमान दोन दिवसांचा संदर्भ लागतो. जीएंचे अमृतफळे हे अनुवादित परीकथांचे पुस्तक कॉंटिनेंटलने काढले (१९८०). ते जीएंना समक्ष देण्यासाठी हा दौरा होता. नंतरची जीएंची भेट पुन्हा धारवाडलाच झाली असावी असे भासवले जाते. तिच्या तारखेचा निर्देश

नाही. या एक किंवा दोन भेटीतील संभाषणांचे तुकडे, पत्रातील मजकुराचे उतारे आणि पुण्यात फोनवरून झालेला वार्तालाप यांचा सुभाष अवचट यांनी असा काही वापर केला आहे की जीए आणि सुभाष हे वारंवार भेटत असावेत असा वाचकांचा ग्रह व्हावा. झालेल्या प्रत्यक्ष भेटी एक वा दोन असल्यातरी संभाषणातील तुकडे अशा संदिग्ध पद्धतीने टाकण्यात आले आहेत की जणू दर आठ-पंधरा दिवसांनी जीए आणि अवचट यांच्या भेटीगाठी होत. पुण्यात जीए आल्यावर फोनवरून बोलणेही वरचेवर होई असा ठसा अवचट वाचकांच्या मनावर उमटवू पाहतात. तोही कितपत वास्तव याचा संभ्रम पडतो. आप्पा परचुरे हे जीएंच्या जवळ गेले. परचुरे यांनी जीएंची पुस्तके छापली, त्याबद्दल अवचटांना अगदी अंधारात ठेवले गेले असे अवचट स्वतःच म्हणतात. उलट परचुरे यांनी 'पैलपाखरे' वरील मुखपृष्ठावर नटीचा चेहरा टाकला, त्याबद्दलची नाराजी जीएंनी परचुरे यांच्याऐवजी अवचटांकडे मुद्दाम फोन करून प्रकट करावी याचेही आश्चर्य वाटते. 'नटीचा चेहरा' हा शब्दही जीएंच्या तोंडी खटकणारा वाटतो. जीएंच्या बऱ्याच पुस्तकांवर प्रभाकर गोऱ्यांची चित्रे होती. त्यांना ती आवडलेली होती असे मला वाटत नाही. अवचटांनी 'काजळमाया'साठी केलेले चित्रही जीएंना मनासारखे वाटले नव्हते हे स्वतः अवचटच सांगतात. (पृष्ठ ५२).

सुभाष अवचट यांनी धारवाडच्या पहिल्याच फेरफटक्यात जीएंच्या चांगल्या फिरक्या घेतल्या. प्रथम जीएंनी फोटो काढण्यास नकार दिला, तर त्यांनी सरळ दुसऱ्या दिवशी जीएंच्या घराचे, फाटकाचे, दारावरच्या कुलपाचे फोटो टिपून काढले. त्यांना रोल मिळाला तोही दोन वर्षांपूर्वीचा आऊटडेटेड. फिल्म फॉगी झाल्याची शंका मनाशी घोळवत पेंटिंग्जचे फोटो घेतले. (ती पेंटिंग्ज कोणा बेळगावकराची म्हणजे जीएंचीच होती हे नंतर स्पष्ट झाले) शेवटी जीए आपले फोटो काढू द्यायला तयार झाले. अवचट म्हणतात, 'फोटोग्राफीतली ही फार सोपी युक्ती वापरून मी जीएंना फोटोला तयार केले होते !' अशा सोप्या युक्त्या वापरून पुण्यातही जीएंच्या गाठीभेटी अवचट घेऊ शकले नसते का ? पण कुठे माशी शिंकली कोण जाणे. पुण्यात जीएंनी त्यांना टाळले. त्यामुळे वैतागून अवचट म्हणतात. 'मला प्रामाणिकपणे जीए तऱ्हेवाईक वाटू लागले. या माणसाला कोणता कॉम्प्लेक्स आहे ? एकान्ताचा बाऊ हे का करीत असावेत ? सारं एवढं असुरक्षित असताना खासगी आयुष्य जपणं म्हणजे तरी काय ? खरं काय जपायचं ? (पृष्ठ ७२) जीएंच्या अडचणींच्या ढाली पुन्हा पुढे. मग मी म्हणालो, "तुम्हाला काहीच करायचं नाही ना ? राहा आता माणसांत. हीच तुम्हाला शिक्षा." (पृष्ठ ७५).

## जीएंचा आविर्भाव

जीएंच्या पहिल्या भेटीतल्या गप्पांत त्या दोघांचा म्हणे करार झाला. कसला ? जीएंनी साहित्यावर बोलायचे नाही; अवचटांनी चित्रांवर बोलायचे नाही. त्यामुळे खारेदाणे, सिगरेट,

नदी, सूर्य, तारे, भाजीपाला, आपले पोट, आपले पोहे हे विषय गप्पांमध्ये आले. 'त्यातही जीए पारंगत होते हे भलतेच !' असे सर्टिफिकेटही अवचट देतात. आपल्याला गाण्यातलं कळत नाही, चित्रातलं कळत नाही, अमक्यातलं कळत नाही असं जीएंचं पालुपद असे, पण ते प्रत्येक विषयातले जाणकार होते हे कुठल्यातरी बेसावध क्षणी प्रकट होत असे आणि त्यांच्यापुढे उत्साहानं आपल्या ज्ञानाचं प्रकटीकरण करणाऱ्याच्या ते उशिरा ध्यानात येत असे, हा स्वभावविशेष अवचटांनी आवर्जून टिपला आहे. एवढेच नव्हे तर तो खुद्द जीएंवरच उलटवून त्यांच्या फिरक्याही घेतल्या आहेत. सुभाष अवचटांचे हे पोर्ट्रेट खरे म्हणजे कोलाज आहे, इकडचे तिकडचे बरेच रंगीबेरंगी तुकडे चिकटवून जीएंचे एक विस्तृत दर्शन घडवणारा हा कोलाज आहे. त्यामुळेच स्वतःच्या भेटीतले प्रसंग आणि संभाषणातले उतारे; पत्रांतले उतारे व फोनवरच्या बोलण्यातले अंश या कोलाजमध्ये अपरिहार्यपणे आले आहेत. त्याचप्रमाणे अनिल किणीकर यांना लिहिलेले पत्र किंवा 'आपली सृष्टी आपले धन'च्या नोंदणीच्या संदर्भातील व्यावहारिक शंकांचा खुलासा मागणारे इन्व्हेस्टमेंट गाईडच्या साहाय्याने लिहिलेले पत्र हे देखील त्यात चिकटवून बसवले जाते. अशी इतरांची आठवणी-पत्रे वगैरे द्यायचीच होती तर इतर साहित्य काय कमी होते ? स्वतःच्या वैयक्तिक अनुभवांवरच भर देऊन हे पोर्ट्रेट रंगवायचे पथ्य त्यामुळे धुडकावले गेले आणि कोलाज तयार झाले असे म्हणावे लागते. जीए, सुभाष अवचट, मुग्धा, अनंतराव कुलकर्णी, आप्पा परचुरे, सुनीता देशपांडे, लॉत्रेक, पिकासो... एक प्रदीर्घ कोलाज.

## नवा प्रकाश पडतो का ?

या कोलाजमधून जीएंवर नवा काही प्रकाश पडतो का? त्यांच्या साहित्याच्या अंतःसूत्राचा मागोवा घेण्याच्या दृष्टीने काही नवे ठोकताळे हाती लागतात का ? याचे उत्तर नकारार्थी देणे भाग आहे. सराईत चित्रकाराच्या अंतर्वेधक दृष्टीला जीएंचा काळा सावळा रंग एकदम भिडला. जीएंच्या डोळ्यांवरचा काळा चष्मा, त्यामुळे त्यांचे न दिसणारे डोळे, जीएंचा चारचौघांसारखा सामान्य चेहरा गर्दीत हरवून जाणारा; मध्यम उंचीचा, थोडासा स्थूल, मध्ये भांग, चापून केस बसवलेला, तपकिरीसर कोट, हिरवट स्कार्फ, हातात अर्धी सिगरेट असे त्यांचे रूप, अवचटांच्या मते या चेहऱ्यात काही वैशिष्ट्य नाही. अंगचे देखणेपण नाही. पुन्हा आठवण्यासाठी त्रास देणारा हा चेहरा. कोणाच्या लक्षात न राहणारा. इम्प्रेस न करणारा. त्यांचा पंजा शरीराच्या मानाने हवा त्यापेक्षा थोडा लहान, बोटे फारच आखूड हेही ॲनॉटॉमीचा अभ्यास करणारे अवचट लगेच टिपतात. काळ्या चष्म्यामुळे तुम्ही हिंदी चित्रपटातल्या गँगचे बॉस दिसता या अवचटांच्या शेरेबाजीवर जीएही हसून स्वतःवर विनोद करतात, 'नशीब माझं. रस्त्यातून जाताना मी साऱ्यांना आंधळाच वाटतो आणि आंधळा कसा तरातरा चालतोय म्हणून सारे आश्चर्याने बघतात,' 'फोटो काढताना जीए आपणहून विचारतात– 'माझं नाकच सारी फ्रेम खाऊन टाकतंय् ना ?' जीएंना

आपल्या पसरट प्रॉमिनंट नाकाबद्दल हळवेपण आहे हा अवचटांचा निष्कर्ष अनेकदा प्रकट होतो, पण जीए स्वतःची टिंगल करायची संधीही सोडत नाहीत. "तुम्हाला एखादा मोठा पिंजरा मिळाला तर त्यात पुष्कळसा चहा आणि खूप सिगरेटी ठेवल्यात तर त्यात काही दिवस मी राहू शकेन. मग हा पिंजरा तुम्हाला मुंबईला फिरवता येईल. अनेक सर्पांच्या सान्निध्यात अमका-तमका असे फोटो येतात त्याप्रमाणे तुम्हाला देखील माणसांच्या सान्निध्यात जीए असा एक फोटो घेता येईल."

अवचट जीएंना आग्रह करतात की, चला कुठंतरी दोन-चार दिवस फिरून येऊ या. ही कल्पना धुडकावून लावण्यासाठी जीए घरातल्या नारळाच्या झाडांची सबब सांगतात. धारवाडमध्ये नारळाचे चोर खूप आहेत. तेव्हा घरात बसण्यावाचून फाटकाला-दाराला कुलूपं लावण्यावाचून गत्यंतर नाही असा जीएंचा बिनतोड आणि चिरेबंदी युक्तिवाद. जीए कोणाकडेही जेवायला जात नसत; त्यासाठी ते आपल्या अक्रीतात्र व्रताची कहाणी सांगत. कुठलीही गोष्ट टाळण्यासाठी त्यांचा अदृश्य डॉक्टर कृष्णाप्रमाणे त्यांच्या हाकेला साद देत हजर होई. पहिल्याच भेटीत जीए अवचटांना सिगारेट देत म्हणतात, "अवचट, डॉक्टर हे वाईट असतात. आवडत्या गोष्टी सोडायला सांगतात. आता सिगारेट सोडली तर जगायचं कसं ? चला आपण सिगारेटी ओढू आणि डॉक्टरांची जिरवू." त्यातलं शेवटचं वाक्य हे खरं सुभाष अवचट स्टाइलमधलं आहे. जीएंनी सुभाषची फिरकी घेण्यासाठी ते म्हटलंय की सुभाषनं आपलं वाक्य त्यांच्या नावावर खपवलंय हे कळणं जरा अवघडच ! सुभाषचं लॉजिक आणि जीएंचं लॉजिक यांच्यातली जुगलबंदी अशी या पोर्ट्रेटमध्ये परस्परांवर आक्रमण करताना दिसते.

जीएंच्या पत्रांतून काही गंभीर, काही वादग्रस्त, काही आत्मशोधात्मक निरीक्षणं प्रकट होतात. जीएंच्या स्वभाववृत्तीतील काही कोनाडे त्यामुळे किंचिन्मात्र प्रकाशमय होऊन जातात. 'उद्या माझ्या मनाचेच फोटो घ्याल व मला मग खासगी आयुष्यच उरणार नाही.' (पृष्ठ ४१) 'तू लोकांच्या गराड्यात राहतोस म्हणून वेडा नाहीस. मी एकटा माझ्या घरात राहतो म्हणून शहाणा नाही.' (पृष्ठ ४७), 'सिगरेट, चहा, पुस्तकं नसली तर मी संपलोच.' (पृष्ठ ५१), 'व्यावहारिक काम जरूर असते. ते उत्कृष्टदेखील होऊ शकते; पण स्वतंत्र पेंटिंगचे खानदान निराळे. त्यात एखाद्या झाडाचा स्वयंपूर्ण दिमाख असतो. (पृष्ठ ५३), 'पुण्यात आणि मजा ?' जीएंचा नेहमीचा तिरका कॉमेंट. (पृष्ठ ५५), 'अहो, लिहिण्यात साऱ्या भराऱ्या, चित्र ते चित्र.' (पृष्ठ १९), 'तुम्हाला तळमळ नक्कीच आहे, पण ती वाङ्मयाविषयी आहे की आपण महान क्रांतिकारक काहीतरी करत आहो या किरकोळ आत्मसंतोषासाठी आहे याचे आपण निरीक्षण करावे.' – अनिल किणीकर यांना पत्र (पृष्ठ १८), 'माणसं आत्मचरित्र कसं लिहू शकतात हो ?' (पृष्ठ ५८), 'मुलांचे आयुष्य फॅन्टसी आणि ॲक्च्युॲलिटी यांच्या सीमेवर कुठेतरी वाढत असते. बालवाङ्मय कधी सीरियस असता कामा नये हे मत तर मला विक्षिप्त वाटते.' (पृष्ठ ६८), 'सात-आठ महिने तरी नो

कॉल्स, नो व्हिजिटस् अशीच कडक स्थिती वाट्याला येईल. मला पुण्याविषयी फारशी ओढ नाही.' (पृष्ठ ६८), 'मला माणसांची सवय नाही. इथं अजून माणसात कसं राहायचं हे शिकतो. थोडासा त्यात पास झालो की तुम्हाला भेटतोच.' (पृष्ठ ७०), 'या तुमच्या पुण्यात कुठं जावं कळत नाही बुवा.'

सुभाष अवचट यांचा असा काहीसा खट्याळपणा, खवचटपणा जीएंनी 'माझ्यापेक्षा अर्ध्या वयाचे तुम्ही' असे म्हणत खपवून घेतला; थोडीफार सलगीही केली. तिचे हे मॉक-सिरियस स्टाइलमधले चित्रण. जीएंच्यावर ते थोडेफार प्रकाश टाकते. त्यांचे रूपदर्शन घडवते हे खरेच. परंतु त्यापेक्षाही अधिक ते सुभाष अवचट यांच्या गमतीदार स्वभावावर आणि दिसेल्या त्याच्या फिरक्या घेण्याच्या सवयीवर प्रकाश टाकते. चित्रकार म्हणून असणारे प्रतिभेचे गांभीर्य आणि व्यक्ती म्हणून असलेले प्रौढत्वीही जपलेले खट्याळ, खोडकर बालिशपण यांचे हृदयंगम उत्साहपरिपूर्ण मिश्रण या पुस्तकाच्या वाचनीयतेला व लेखनशैलीला एक विशेष परिमाण देते. जीएंच्या व्यक्तिमत्त्वाचे गूढ त्यामुळे उलगडेल असे नाही, परंतु सुभाष अवचट यांच्या आचरट, आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे रहस्य मात्र त्यामुळे थोडेफार ज्ञात होईल. म्हणूनच अत्यंत सुंदर रीतीने मुद्रित केलेले हे पुस्तक दीर्घकाळ मराठी वाचकांना 'मौज' देत, फिरक्या घेत राहील.

(जी. ए.-एक पोर्ट्रेट. लेखक- सुभाष अवचट. मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई ४. पृष्ठे सव्वासात बाय सव्वासात आकाराची ८४. किंमत फक्त ७५ रुपये.)

□

# हरवलेले दिवस : प्रभाकर ऊर्ध्वरेषे

*एका माजी कम्युनिस्टाची भेदक स्मृतिगाथा*

सतत चाळीस-पन्नास वर्षे वृत्तपत्रीय लेखन करूनही एखाद्या व्यक्तीचे एकही पुस्तक प्रकाशित झालेले नाही, असे कळले तर ते आश्चर्यच नव्हे का? प्रभाकर ऊर्ध्वरेषे यांच्या बाबतीत असे घडलेले आहे खरे! 'हरवलेले दिवस' हे त्यांचे पहिले पुस्तक त्यांच्या वयाच्या ७० व्या वर्षी प्रसिद्ध झाले आहे. 'एका माजी कम्युनिस्टाचे आत्मनिवेदन' असे या पुस्तकाचे उपशीर्षक असून त्यामुळे आपले समग्र आत्मवृत्त सांगण्यापेक्षा कम्युनिस्ट पक्षाचा कार्डहोल्डर म्हणून १९४४ ते १९५१ च्या दरम्यान घालवलेल्या सात-आठ वर्षांच्या कालखंडाची कहाणी सांगण्यावरच त्यात भर आहे हे स्पष्ट केले आहे. भारतातील कम्युनिस्ट पक्षाच्या अंतर्गत कार्यपद्धतीवर प्रकाश टाकणारे, पक्षाच्या आतल्या गोटातील व्यक्तीने लिहिलेले हे पहिलेच पुस्तक या दृष्टीनेही लक्षवेधक ठरले आहे.

## समधात वृत्तीने लेखन

चाळीसेक वर्षांपूर्वीच्या काळावर दृष्टिक्षेप टाकताना प्रा. ऊर्ध्वरेषे यांची वृत्ती अंतर्मुख आणि तटस्थतेची आहे. त्या काळातील घटनांकडे पाहताना त्या घटना आपल्या जीवनात घडल्या आहेत असे मानून आत्मसमर्थन वा आत्मकरुणा यांच्या मोहात ऊर्ध्वरेषे पडत नाहीत; एका विशिष्ट विचारसरणीमुळे काही काळ एकत्र राहून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या गटाच्या 'कम्युन'च्या व्यवहाराचे शक्य तितक्या अनाग्रही, अलिप्तभावाने केलेले हे चित्रण आहे. ऊर्ध्वरेषे यांचे स्वतःचे व्यक्तित्व हे तसे आक्रमक आणि अहंकेंद्रित नाही. ते व्यक्तित्व तसे बुजरे पण सावध आहे. निष्ठावंत कार्यकर्त्याचे आहे, पण बुद्धिप्रामाण्य मानणारे आहे. त्यामुळे एखाद्या विचाराशी घट्ट राहिले तरी एखाद्या संघटनेच्या पोथीबंद चौकटीत हे व्यक्तित्व रमणारे नाही. आपल्याला आवडलेल्या विचाराला वा तत्त्वज्ञानाला चळवळीचे वा कृतीचे रूप देताना जी पक्षीय वा संघटनात्मक यंत्रणा उभी केली जाते, ती यंत्रणा इतकी अक्राळविक्राळ, सर्वसंहारक रूप घेऊ लागते की मूळ विचार

तत्त्वज्ञानालाही ती विकृत वा असंगत बनवते. वैचारिक निष्ठा कितीही जाज्वल्य असली तरी व्यक्तिव्यक्तींच्या अहंकाराच्या संघर्षात त्या विचारापेक्षा कोण कोणाच्या बाजूला आहे हेच प्रभावी ठरते आणि अशा संघटनांमध्ये ताणतणाव वाढतात, मूळ विचार दूर जातो; व्यक्तिकेंद्रित स्पर्धा सुरू होते. कुठलाही प्रामाणिक कार्यकर्ता नेत्यांमधील या अंतर्गत धुसफुशीने गुदमरून जातो. अशा गुदमरून गेलेल्या कार्यकर्त्याने त्या कालखंडाचे आत्मशोधक वृत्तीने केलेले हे शब्दांकन आहे. चाळीस वर्षांचा काल मध्ये लोटलेला असल्याने या सबंध लेखनात रागलोभांच्या तीव्र उद्रेकांऐवजी संयत, शांत, समधात मनाने केलेले 'रिकलेक्टेड इन ट्रँक्विलिटी' अशा स्वरूपाचे प्रांजळ चित्रण येथे आढळते.

त्या काळात ऊर्ध्वरेषे यांची जबरदस्त मानसिक घुसमट झाली असावी; परंतु त्याबद्दलचा कडवटपणा या निवेदनात सहजी जाणवू नये इतका अल्पस्वल्प आहे. (जयंत प्रधान यांचे कॉम्रेडस् लाल सलाम हे पुस्तक या दृष्टीने पाहावे. त्यात त्यांचे सगळे रागलोभ गडदगर्द रंगात प्रगट झालेले आहेत.)

## कम्युन हेच केंद्र

ऊर्ध्वरेषे हे स्वतःकडे हिरो वा चरित्रनायक म्हणूनही बघत नाहीत. कम्युनिस्ट पक्षाचे ते कम्युन हेच या आत्मनिवेदनाचे मुख्य केंद्र आहे. यामुळे आत्मसमर्थन आणि स्वप्रतिमेचे उदात्तीकरण करण्याचा प्रकार येथे अभावानेच जाणवतो. हा तटस्थपणा ऊर्ध्वरेषे यांना प्राप्त करून घेण्यासाठी तीस-पस्तीस वर्षांचा कालावधी लागला. हे आत्मनिवेदन करण्याइतके 'मानसिक पुनर्वसन' व्हायला आणि 'नॉर्मल जीवन जगून' लेखन-वाचनात रमण्याची सिद्धता व्हायला बराच त्रास पडला, हेही आपल्या लक्षात येते.

प्रभाकर ऊर्ध्वरेषे यांनी कम्युनिस्ट पक्षाचा स्वीकार करावा आणि पक्षाच्या कामात पत्नीसह झोकून द्यावे यामागे कुठली प्रेरणा प्रभावी ठरली असावी ? खरे म्हणजे स्वतः कम्युनिझमचा अभ्यास करून, त्यामुळे त्या तत्त्वज्ञानाबद्दल आकर्षण वाटून ते कम्युनिस्ट बनले असे दिसत नाही. पार्टीचा फुलटायमर म्हणून ते केवळ योगायोगानेच पार्टीच्या मुंबईच्या मुख्य कचेरीत राहिले आणि आपल्या पत्नीलाही त्या प्रवाहात त्यांनी सामील करून घेतले. इंदूरला फॅसिस्टविरोधी लेखकांची एक परिषद घेण्यात आली, तिची वार्तापत्रे ऊर्ध्वरेषे यांनी वृत्तपत्रांना पाठवली; त्या वेळी ते इंदूर संस्थानमध्ये दुय्यम माहिती अधिकारी म्हणून काम करीत होते; ती त्यांची नोकरी सुटली. त्याच वेळी कम्युनिस्ट पार्टीला लोकयुद्ध या साप्ताहिकासाठी उपसंपादकाची गरज होती. कॉ. बी. टी. रणदिवे यांना कोणीतरी ऊर्ध्वरेषे यांचे नाव सुचवले; रणदिवे यांनी त्यांना, 'मुंबईला येता का' असे पत्र पाठवले. 'आपले दोन-चारशे रुपयांचे कर्ज फेडण्यास पार्टी मदत करील का ?' या ऊर्ध्वरेषे यांच्या पृच्छेला होकारार्थी उत्तर आले. ऊर्ध्वरेषे यांची पंचाईत झाली. आप्तस्वकीयांचा विरोध असतानाही, समविचारी मित्रांच्या उत्तेजनामुळे आणि धंदेवाईक क्रांतिकारक होण्याच्या

रोमँटिक कल्पनेने झपाटून 'हुरळलेल्या मेंढीप्रमाणे' मुंबईकडे प्रयाण केले. असे ते स्वतःच म्हणतात.

म्हणजे एका दृष्टीने पूर्ण विचारांती कम्युनिझम या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करण्याची प्रक्रिया ऊर्ध्वरेषे यांच्या बाबतीत घडलेली नाही. १९३०-४० च्या काळात कम्युनिझमबद्दल, रशियात चाललेल्या समतावादी समाजरचनेबद्दल प्रत्येक तरुणाला कुतूहल होते. आणि त्या कल्पनेचे स्वप्नाळू आकर्षण होते. स्टॅलिनच्या रक्तपिपासू राज्यपद्धतीबद्दल फारशी माहिती आलेली नव्हती. जॉर्ज ऑरवेल, आंद्रे जिद, कोसलर इत्यादी लेखकांचा भ्रमनिरास स्पष्ट करणारी पुस्तके पुढच्या दशकात आली. साहजिकच ऊर्ध्वरेषे यांनाही ते आकर्षण मनोमन असणारच. तेव्हा पार्टीच्या मुखपत्राचे संपादन करण्याचे आमंत्रण ही त्यांना एका साहसी मोहिमेत सामील होण्यासाठी मिळालेली सुवर्णसंधी वाटली असणार. म्हणूनच पत्नीलाही पूर्वसूचना न देता ते या मोहिमेत सामील होण्यासाठी झटपट निघाले. पत्नी उषा ब्रह्मे ही पुढे त्यांच्याबरोबर राहायला आली आणि पतीपेक्षाही या कार्यात अधिक रमली.

## कम्युनमधील सहजीवन

'हरवलेले दिवस'च्या दुसऱ्या प्रकरणात मुंबईतील कम्युनिस्ट 'कम्युन'मधील सहजीवनाचे चित्रण त्यांनी केले आहे. गिरगावातील 'राजभवन' इमारतीतील ५-६ खोल्यात १५-२० कार्यकर्ते राहात, काही इतरत्र राहात. शंभरजण एकत्र जेवणखाण करीत. स्त्री-पुरुष एकत्र राहात. खडतर शिस्तीचे हे जीवन होते. चार-पाच शर्ट आणि तेवढ्याच पँट बरोबर घेऊन निघणाऱ्या ऊर्ध्वरेष्यांना त्यांचा कम्युनिस्ट मित्र शामू संन्यासी खवचटपणे सुनावतो, "अरे यार, इतने कपडे ? फिर तो तू राजभवन में एकदम रईस माना जाएगा." फुलटाइमर म्हणून ऊर्ध्वरेषे यांना ३० रु. महिना पार्टीवेज मिळे. त्यातील सतरा रुपये जेवण-चहासाठी कापले जात. हातखर्चाला तेरा रुपये उरत. ऊर्ध्वरेषे दांपत्याला रमेश संघवीच्या फ्लॅटमधील अंधाऱ्या स्वयंपाकघरात राहण्यास जागा मिळाली. पत्नीला कम्युनच्या स्वयंपाकघरात देखरेखीचे काम मिळाले. संघवी, कॉ. कोल्हटकर वगैरेंची राहणी चांगली होती. ते सतत कॅप्स्टनच ओढत. तेरा रुपये हातखर्चाच्या दृष्टीने ही चैनच होती. त्यामुळे कम्युनिझममधील समतेचेही वेगवेगळे स्तर असतात हे जाणवत गेले.

प्रथमपासूनच या कम्युनच्या जीवनाविषयी एक सुप्त असंतोष त्यांच्या मनात खदखदत राहिला. कम्युनच्या व कम्युनिस्ट जीवनप्रणालीच्या पूर्ण स्वीकाराच्या दृष्टीने अडसर असणारा ऊर्ध्वरेषे यांचा मध्यमवर्गीयपणा हा कधीच लोप पावला नाही. कॉ. डांगे हे तर कधीच कम्युनमध्ये राहिले नव्हते. त्यांची राहणी उच्च मध्यमवर्गीयांची श्रीमंती होती. इतर बरेच तरुण हे चांगल्या संपन्न घरांतून आलेले होते. घरून त्यांना पैसे येत. सज्जाद, जहीर, मोहन कुमारमंगलम, रोमेशचंद्र पेरित, अरुण बोस, पार्वती, एन. के. कृष्णन वगैरे बुद्धिमान व संपन्न तरुण केवळ या तत्त्वज्ञानाच्या आकर्षणाने गरिबीचे, हालअपेष्टांचे

कम्युनचे जीवन जगण्यास सिद्ध झाले. अनेकांचे विवाह येथे जुळले. रजनी पटेल-सुशीला गोखले, माणेक गांधी-मंजू नाडकर्णी, एल. के. ओक-प्रेमा राजे, पांडू रांगणेकर-अहिल्या रणदिवे, अरविंद मेहता-कुमुद रेगे, बंकिम मुखर्जी-शांता भालेराव, इ. इ. असे असतानाही चोरून प्रेम करणाऱ्या दोघा कॉमेरडना पक्षशिस्तीच्या विरुद्ध वर्तन केल्याबद्दल तंबी देऊन भेटण्यास बंदी घालण्यात आली.(पृष्ठ १०३).

विवाहित पती-पत्नींच्या बाबतीत पार्टीचे धोरण कसे बिनबुडाचे असे याचे उदाहरण म्हणून सोली बाटलीवाला-नर्गिस बाटलीवाला यांचा निर्देश या पुस्तकात आला आहे.(पृष्ठ १०६) पार्टीच्या पुढाऱ्यांनी त्यांच्यात वेळीच मध्यस्थी केली असती तर प्रकरण चिघळले नसते आणि या दोघांना पार्टीतून काढण्याचे कारण दिले गेले तेही चमत्कारिक होते, असे ऊर्ध्वरेषे सांगतात.

## कम्युनिस्ट तंत्राचे वेगवेगळे पैलू

कम्युनमधील जीवनाचे असे अनेक तपशील रंजक-उद्‌बोधक आहेत. त्याचप्रमाणे त्यात राहणाऱ्या व्यक्तींचेही दर्शन वेधक आहे. कम्युनिस्ट नेत्यांची स्वभाववैशिष्ट्ये, विविध प्रश्नांवर त्यांच्या भूमिका, एकमेकांना शह-काटशह देण्याची व्यूहरचना, अंतर्गत विरोधाला दडपण्यासाठी वापरण्यात येणारी तंत्रे, प्रचारकी थाटाची वक्तव्ये, कम्युनिस्टांचे खास शब्द आणि त्यांचे नेमके अर्थ, पार्टी मेंबर करून घेण्याची पद्धत, कार्डधारकांचे नूतनीकरण, एखाद्याला पक्षातून काढून टाकण्याची पद्धत, एकमेकांविरुद्ध एकमेकांना वापरण्याचे तंत्र वगैरे बाबींवरही प्रकाश पडतो.

कॉ.डांगे, पी.सी.जोशी, बी.टी.रणदिवे या तिघांची या निवेदनातून प्रथमच विश्वासार्ह माहिती मिळते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या तिघा नेत्यांची व्यक्तिचित्रणे प्रभावी आहेत. त्यांच्यातील परस्परसंबंधांचे विश्लेषण आणि मूल्यमापन हे या ग्रंथाचे खास वैशिष्ट्य मानायला हवे.

बी. टी. रणदिवे हे ऐंशीच्या पुढे असूनही नेतेपदी कार्यप्रवण होते. त्यांचा दरारा, दबदबा सर्वांना धाक दाखवे. कुजकट, तिखट बोलून ते इतरांना नामोहरम करत. हटवादी, साचेबंद मार्क्सवादी मांडणी करण्यात पटाईत, राहणीत टिपटॉप, परंतु कोणालाही एका विशिष्ट मर्यादेपलीकडे ते जवळ येऊ देत नसत. कॉ. डांगे आणि पी. सी. जोशी या दोघांशीही त्यांचे कधी जमले नाही.

रणदिव्यांनी पी. सी. जोशींना पक्षात निष्प्रभ करून आपले 'एकमुखी' नेतृत्व पक्के केले. पी. सी. जोशी हे तरुण वयातच पार्टीचे सरचिटणीस झाले. कानपूरच्या कामगारवर्गात काम केल्याने आणि मीरत खटल्यात गोवले गेल्याने त्यांचे पक्षात महत्त्व वाढले. दुसऱ्या महायुद्धात कम्युनिस्ट पक्षाने चले जावला प्रारंभी विरोध केला, सुभाष बोस यांच्याविरुद्ध आक्रस्ताळी प्रचार केला. पार्टी जनतेपासून अलग पडली. ब्रिटिश साम्राज्यशाहीला

लोकयुद्धाच्या भूमिकेतून पाठिंबा देऊन पक्षावरील बंदी उठवून घेण्यात आली. पूरणचंद्र जोशी यांनी कधी गांधीजींना पाठिंबा दिला तर कधी लीगला, कधी फाळणीला तर कधी नेहरू सरकारच्या स्थैर्याला. तेलंगणमधील लोक-आंदोलनाबाबतही जोशींची भूमिका वादग्रस्त ठरली. या सर्व धोरणात्मक चुकांचे खापर एकट्या जोशींवर फोडून त्यांचे अधिकार काढून घेतले गेले. खरे म्हणजे ही धोरणे एकट्या जोशींची नव्हती. सामुदायिक चर्चांतून ठरलेली होती, परंतु पी. सी. जोशींनी त्याबाबत खंबीर धोरण स्वीकारून सामुदायिक जबाबदारीचे तत्त्व पुढे करून आपला बचाव करून घेण्याचा मार्ग टाळला आणि रणदिवे यांचा मार्ग सुकर केला. पी. सी. जोशींचा सुधारणावाद हा पार्टीचा घात करणारा आहे, असे वातावरण डांगे-रणदिवे यांनी निर्माण केले. १९४६ मध्ये खलाशांच्या बंडाच्या वेळी रणदिवे-डांगे यांचे धोरण जहालपणाचे होते. जोशींचे धोरण मवाळ होते. १९४८ च्या कलकत्ता पार्टी काँग्रेसमध्ये 'मी पार्टीला चुकीच्या सुधारणावादी मार्गाने नेले, तेव्हा पार्टीने मला योग्य ती शिक्षा करावी,' असा पश्चात्तापाचा सूर त्यांनी लावला. मध्यवर्ती समितीतून त्यांना डच्चू देऊन रणदिव्यांना नवे सरचिटणीस केले गेले.

रणदिवे यांच्याबद्दल ऊर्ध्वरेषे यांच्या संमिश्र भावना आहेत. रणदिव्यांनी त्यांना पार्टीत आणले, पार्टीच्या मुखपत्राचे संपादक केले. कधीमधी कौतुक करून प्रोत्साहन दिले, परंतु कलासाहित्याचे त्यांना वावडे होते. 'नवे जग'च्या संपादनाच्या वेळी कथा-काव्य देणाऱ्या कॉम्रेडना ज्वलंत, जिवंत, जहाल लढ्याची जाण नाही, अशी टीका त्यांनी केली. खलाशांच्या बंडाच्या वेळी रणदिवे यांनी कम्युनिस्ट पक्षाची यंत्रणा पूर्णतया राबवून या बंडामुळे निर्माण झालेल्या वातावरणातील तणाव वाढविला. ब्रिटिश लष्करशाहीचा प्रतिकार करण्यासाठी जनतेला उत्तम रीतीने कार्यप्रवण केले. तेलंगणातील उठावालाही रणदिवे यांच्या नेतृत्वाखाली जोर आला, परंतु तो जोर ओसरला. उठाव फसला आणि रणदिवे यांच्या नेतृत्वालाही उतरती कळा लागली.

## कॉ. डांगे

कॉ. डांगे यांनी पक्षात व पक्षाबाहेर आपल्या पक्षांतर्गत विरोधकांशी टक्कर न देता नेहमी पड खाण्याचे धोरण स्वीकारले. सरचिटणीसपदाची खात्री असतानाही रणदिव्यांना पुढे केले. युद्धविरोधी भाषणे करून व गिरणी कामगार संप करून तुरुंगवास पत्करला. रशिया युद्धात उतरल्यावर मात्र धोरण बदलले. ब्रिटिशांना सुटकेसाठी त्यांनी जे पत्र पाठविले, त्याचाही निर्देश केला आहे. कॉ. डांगे यांच्याबद्दल ऊर्ध्वरेषे यांना जिव्हाळा आहे. त्यांच्या गुणवैशिष्ट्यांची आदरपूर्वक जाण आहे. कम्युनिस्ट पार्टीत फूट पडल्यावर सरचिटणीसपद देण्याऐवजी घटनेत बदल करून त्यांना नव्याने केलेले अध्यक्षपद देण्यात आले, याचा उल्लेखही ते करतात. इंदिरा गांधी, आणीबाणी यांना पाठिंबा दिला, पण संजय गांधींनी मात्र कम्युनिस्टांवर तोफा डागल्या. त्यांच्या कन्या रोझा देशपांडे पोटनिवडणुकीत

इंदिरा काँग्रेसच्या पाठिंब्याने निवडून आल्या. पुढे राजेश्वर राव यांनी डांगे यांना भारतीय कम्युनिस्ट पक्षातून हाकलले. सतत कुंपणावर बसणाऱ्या डांगे यांची ही जी शोकांतिका झाली, त्याबद्दल ऊर्ध्वरेषे यांना हळहळ वाटते.

पुढे 'मशाल' नामक एक दैनिक पार्टीतर्फे काढण्यात आले आणि त्याचे संपादन करण्याची जबाबदारी ऊर्ध्वरेषे यांच्यावर पडली. मुंबईजवळ भयाण विमान अपघात झाला तर त्याची बातमीही न देता पेकिंग शहर लाल फौजेने जिंकले, वगैरे मजकुराने पहिले पान रंगविणारे हे दैनिक- ते चालणार कसे ?

## बंडखोरी अंगलट आली

ऊर्ध्वरेषे यांनी १९५१ मध्ये पक्ष सोडला. म्हणजे चारआणे देऊन कार्डाचे नूतनीकरण करून घेण्याचे टाळले. मुंबई सोडली. त्याआधी त्यांनी थोडी बंडखोरी करण्याचा प्रयत्न केला, पण तो अंगलट आला. एक टीकात्मक निवेदन त्यांनी पक्षाकडे पाठविले. त्याबद्दल 'तू लेखी कशाला अडकवून घेतोस,' असा सल्ला मिळाल्याने ते मागे घेणारे पत्र पाठविले.

कॉ. कोल्हटकर त्यांचे मनोविश्लेषण करून त्यांना सुनावतात : "तुमचा खरा राग तुमच्या स्वतःवरच आहे. तुम्ही आत्मवंचना करून सगळं खापर पुढाऱ्यांच्या मुख्यतः बी. टी. रणदिव्यांच्या माथी मारून स्वतः मोकळे होऊ पाहात आहात, पण तुमचा खरा राग असा आहे की, आपण स्वतःला एवढे हुशार अन् बुद्धिमान समजतो, तरी आपण फसलो कसे ? काय खरंय ना मी म्हणतो ते ?" कॉ. शं. वा देशपांडे यांनी त्यांच्या दुःखावर फुंकर घालताना म्हटले, "मी किती मनस्ताप सहन केलाय, हे कुणाला सांगितलेलं नाही. हल्ली मी कोणताच मुद्दा आग्रहानं मांडत नाही." ऊर्ध्वरेषे यांना देशपांडे व्हायचे नव्हते म्हणून ते बाहेर पडले.

## प्रगल्भता

प्रा. प्रभाकर ऊर्ध्वरेषे यांच्या या आत्मनिवेदनाने कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यप्रणालीबद्दल, नेतृत्वाबद्दल, त्यातील अंतर्गत स्पर्धेबद्दल प्रथमतःच अस्सल, आतल्या गोटातील माहिती मराठी वाचकांपुढे आली आहे. ही माहिती अत्यंत संयमी, तटस्थ भावनेतून आणि तरीही सत्य परखडपणे सांगण्याच्या भूमिकेतून मिळते. त्यामुळे या पुस्तकाचे मोल अधिकच वाढते. ऊर्ध्वरेषे यांचे सत्तराव्या वर्षी हे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले. इतकी वर्षे थांबणे सार्थकी लागावे, असे ते झालेय, हे मान्य करायलाच हवे. ऊर्ध्वरेषे या कालखंडाला 'हरवलेले दिवस' म्हणतात. खरे म्हणजे उर्वरित आयुष्य त्यांनी सामान्य मध्यमवर्गीयांप्रमाणे काढले. या दिवसांनी त्यांच्या जीवनाला वेगळेपण दिले. अनुभव कडू-गोड असले तरी त्या अनुभवांनी त्यांच्या जीवनाला एक व्यापक प्रगल्भता दिली. ती प्रगल्भता या पुस्तकात पानोपानी दिसते.

(हरवलेले दिवस : प्रभाकर ऊर्ध्वरेषे, मौज प्रकाशन, मुंबई ४. पृष्ठे ३८०, शंभर रुपये.)

□

## ककची क : व. पु. काळे

### *यशस्वी कथाकथनाची कहाणी*

कथाकथन = वपु, वपु = कथाकथन असे समीकरण आजच्या मराठी श्रोत्यांच्या मनात पक्के बसलेले आहे. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत वपुंनी चारशेवर कथा लिहिल्या; थोड्या कादंबऱ्याही लिहिल्या; नाटकांचाही खेळ करून पाहिला; परंतु कथाकथनाने त्यांना त्यांचे वेगळेपण दिले; कथाकथनाला त्यांनी एका कलात्मक पातळीवर नेले. शं. ना. नवरे, ज्योत्स्ना देवधर, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार प्रभृतींनीही कथाकथनाचे उदंड प्रयोग महाराष्ट्रभर केले, परंतु वपुंचा कथाकथनावरचा वरचष्मा हा सर्वांच्याच कौतुकाचा (आणि हेव्याचा) विषय झाला. वसंत कानेटकरांनी तर एकदा त्यांना गमतीने म्हटले, "मला तुमचा हेवा वाटत नाही. चमत्कार वाटतो." (कारण पुणे ते नाशिक स्पेशल टॅक्सीने जाणाऱ्या कानेटकरांना टॅक्सीवाल्याने प्रवासभर वपुंच्या कथा ऐकवल्या !) वसंत पोतदारांनी क्रांतिकारकांच्या तर बाबासाहेब पुरंदरे, विजय देशमुख यांनी शिवचरित्राच्या कथनातच स्वतःला धन्य मानले. ग. म. केळकर, राजा मंगळवेढेकर, यदुनाथ थत्ते, प्रकाश मोहाडीकर प्रभृतींनी साने गुरुजींचा वारसा चालविण्यासाठी बालकथांवरच लक्ष केंद्रित केले. रवींद्र भट, पद्माकर गोवईकर यांनी ज्ञानेश्वरांना वेठीला धरले. शिरीष कणेकरांनी फिल्मी दुनियेतील किस्से सांगून श्रोतृवर्गाला खुलवले... एकूण मनोरंजनासाठी कथाकथनाचा स्वीकार करणारा, एकपात्री प्रयोगाप्रमाणेच किंबहुना त्यापेक्षा जास्तच लोकप्रियता मिळवणारा हा काळ ठरला आणि त्यात वपुंचे अग्रस्थान नाकारण्याचे अनुदारपण कोणी दाखवण्याचे कारण नाही. १४०० प्रयोगांचा अचूक हिशोब हा त्याचा एक दाखला आहेच. त्यांच्या कॅसेटचा होणारा प्रचंड खप (अलूरकर अस्वस्थ !) हाही भरीला आणखी एक पुरावा होऊ शकेल. तिकिटे काढूनही श्रोते कथाकथनाच्या कार्यक्रमांना हाऊसफुल्ल गर्दी करतात हे आता दुर्मिळ दृश्य राहिलेले नाही.

वपुंनी कथाकथनाची आपल्या अंगची कला अत्यंत जागरूकपणे, अधिकाधिक प्रभावी करण्यासाठी विपुल मेहनत घेतली आहे हे स्पष्टच आहे. वेगवेगळ्या श्रोतृवर्गावर

आपल्या कथांचा परिणाम कसा होतो; आपला त्यांच्याशी संवाद साधला जातो की नाही, याचा आरंभापासूनच अंतर्मुख होऊन शोध घेण्याची त्यांची प्रवृत्ती आहे आणि स्थानिक वा प्रासंगिक टच देऊन पहिल्या चार-सहा वाक्यातच श्रोतृवर्गाचे अवघे अवधान आपल्याकडे खेचून घेण्याचे नेमके तंत्र त्यांनी आत्मसात केले आहे. एकेक कथा अनेकदा सांगून झालेली असली तरी तिच्यात नव्या काही टाळीच्या जागा वा कल्पना घालण्याची संधी आली तर ते ती संधी कधी सोडत नाहीत. मुलखावेगळ्या व्यक्ती, चमकदार नाट्यपूर्ण प्रसंग, भावदर्शनातले बारकावे, गमतीदार विरोधाभास यांच्या मागावर ते सतत असतात आणि आपल्या भावनांना, विचारांना उदात्ततेचा, व्यापक सहानुभूतीचा परीसस्पर्श घडवून त्यांना सुवर्णकळा देण्यातील त्यांची किमया अजब आहे. फसलेल्या 'गजरा'च्या अनुभवानं वपु अधिकच सावध झालेले आहेत. वाचक-प्रेक्षक-श्रोते यांची शाश्वती आता त्यांना वाटत नाही; एक प्रयत्न फसला तर माणसं जंगली श्वापदासारखी कशी तुटून पडतात याचा हा उत्तरायुष्यातला अनुभव त्यांना चांगलाच झोंबला आहे, परंतु असा एखादा प्रसंग वगळला तर मराठी श्रोतृवर्गाची नाडी वपुंना नेमकी गवसलेली आहे असे मानायला काहीच हरकत नाही. व्यवसायानं आर्किटेक्ट असणारे वपु आपल्या कथावस्तूच्या उभारणीबाबतही अत्यंत चोखंदळ असतात आणि कथा परिणामकारक करण्याच्या नवनवीन युक्त्या-प्रयुक्त्यांचा त्यांचा खजिना अखंड भरलेलाच आहे हेही आपल्याला जाणवल्याविना राहात नाही. वपुंनी कथाकथनाला मराठी माणसाच्या भावविश्वात मानाच्या स्थानी नेऊन बसवलं.

## आकर्षक तंत्र

आपल्याला कथाकथनाच्या संदर्भात आलेल्या निरनिराळ्या अनुभवांची झलक वपुंनी वेळोवेळी लिहिलेल्या लेखांतून दिलेली होतीच. 'ककचीक' म्हणजे 'कथाकथनाची कथा' या त्यांच्या नव्या पुस्तकात त्या सर्व अनुभवांना एका नव्याच सूत्रात आकर्षकपणे पेश केलेलं आहे. हे पुस्तक १० बाय १० च्या चौकोनी आकारात, फोटोटाईप सेटिंगने, दोन कॉलमांच्या पृष्ठात भरपूर चित्रांनिशी ऑफसेटने छापले आहे. पुस्तकाचा आकार, मांडणी आणि निर्मिती या दृष्टीनेही हे पुस्तक देखणे झालेले आहे. मेनका प्रकाशनने आपल्या सर्वांत जास्त खपणाऱ्या लेखकाचे सत्पात्री कौतुक करण्याची गुणग्राहकता आपला नेहमीचा पुणेरीपणा टाकून दाखवली आहे. अर्थात किंमतही तशी दणदणीत (मॅपलिथो कागदाच्या प्रतीला ६० रुपये व आर्ट पेपरवर छापलेल्या प्रतीला ७० रुपये) ठेवून कौतुक करतानाही आपण हिशोबीपणा सोडत नाही याचीही खात्री पटवून दिलेली आहे.

कथाकथनाच्या या कथेचे निरूपण करताना वपुंनी आपली चतुराई प्रकट केली नसती तरच ते आश्चर्य ठरले असते. विविध व्यक्तींना लिहिलेल्या पत्रांद्वारे आपल्या अनुभवांची नाट्यपूर्ण उजळणी करण्याचा आकृतिबंध या पुस्तकासाठी त्यांनी वापरला आहे. निखळ, मोकळेपणानं, स्वतःचीच फसवणूक आहे हे मान्य करीत लिहायचं, विनासंकोच लिहिण्याची

प्रतिज्ञाही त्यांनी केलेली आहे. ह. मो. मराठे यांनी मनपसंतच्या दिवाळी अंकासाठी कथाकथनाच्या अनुभवाबद्दल लिहिण्यास सुचवले. तेव्हा २४ पत्रांच्या रूपात या अनुभवांना पकडण्याचा मार्ग वपुंनी स्वीकारला. ही पत्रे तशी काटेकोरपणे एकेका विषयाचाच पाठपुरावा करतात असे नाही, परंतु रमतगमत विषयांतर करीत, इकडे तिकडे चार टोले लगावत ती कथनाची मूळ सम गाठतात !

अडीच-तीन तपांच्या कालावधीतील कथाकथनाच्या वाटचालीतील वेगवेगळे भलेबुरे किस्से या पत्रांतून वाचायला मिळतातच; त्याचबरोबर कथाकथन या परफॉर्मिंग आर्टची वैशिष्ट्ये व पथ्ये यांच्याबद्दलची वपुंची अनुभवाधिष्ठित निरीक्षणेही येथे सिद्धांत बनून प्रगट होतात. कथाकथनामुळे आपल्याला लाभलेल्या यशाची आणि लोकप्रियतेची, मान्यतेची आणि अभिमानाची रास्त जाणीव वपुंना आहेच; परंतु आपल्या अभिजात नम्रतेने ते आपल्या सर्व सन्मानाचे श्रेय सिद्धीविनायकाला देतात. सिद्धीविनायकासमोर गुच्छ ठेवून ते म्हणतात, "ही फुलं, हा सन्मान तुमचा, तुम्ही दिलेल्या प्रतिभेचा. लोकांचं मनोरंजन करण्याचं कार्य तुम्ही माझ्यावर सोपवलंत, ते करून मी आलोय."

## साक्षात्काराचा क्षण

कथालेखन वा कथन हे साक्षात्कारक्षणी जमतं. त्या साक्षात्कारक्षणाच्या वेळी आपण सावध नसतो; बेसावध असतो; एक शक्ती आपल्याला स्पर्श करते; त्या निसटल्या स्पर्शानं अनेकांचं मनोरंजन होईल अशी काही निर्मिती होते; असं त्यांना वाटतं. या निर्मितीच्या बेसावध क्षणी आपलं अस्तित्व नेमकं कुठं होतं हे आपल्याला सांगता येत नाही; त्यामुळे त्या निर्मितीचं श्रेयही आपल्याकडे घेण्याचा अधिकार आपल्याला नाही, अशी 'ट्रँसेंडेंटल' भूमिका त्यांची आहे.

## एकपात्री प्रयोग नव्हे

कथाकथन हा एकपात्री प्रयोग नव्हे, असे ते पुनःपुन्हा बजावून सांगतात. नाटकापासूनही हा प्रकार काहीसा लांबच असतो. 'कथनात नाट्य हवं पण नाटक नको, अभिनय हवा पण त्यासाठी अभिनेता नको. विलक्षण स्मृती हवी पण पाठांतर नको.' असे सांगून ते त्याच्या स्पष्टीकरणासाठी एक दृष्टांत देतात, 'हातात लायटर न घेता सिगारेट पेटली पाहिजे किंवा प्रत्यक्ष उदबत्ती न लावता सुगंध पसरला पाहिजे.' (पृष्ठ ६३)

कथाकथनासाठी शब्दांची आराधना करावी लागते. आशयाच्या जास्तीत जास्त जवळ जाणाऱ्या शब्दांचा शोध सातत्यानं घ्यावा लागतो. छापलेल्या शब्दांऐवजी बोलल्या जाणाऱ्या शब्दांची शिकार करावी लागते. गतप्राण हा पुस्तकी शब्द येथे चालत नाही; 'तो डोळ्यादेखत गेला' असंच म्हणावं लागतं. पूर्व प्रकाशित गोष्टींमधील शब्दही त्यादृष्टीने बदलावे लागतात; कालबाह्य तपशीलही गाळावे लागतात. लिखित कथा आणि रंगमंचावर

सादर होणारी कथा या दोहोंच्या आकृतिबंधात फरक असतो. वसुंधरा पटवर्धनांच्या कथेत कथाकथनासाठी काही बदल वपुंनी केले. वसुंधराबाईंना ते आवडले नाहीत, परंतु हे बदल न करता ती कथा सांगण्याने तिच्या परिणामकारकतेत उणेपणा आला असता असा आपला ठाम विश्वास आहे असेही वपु सांगतात.

## सभागृहातील वातावरण

सभागृहातील वातावरण आणि श्रोतृवर्गाची जडणघडण यांचेही भान कथाकथनकाराला ठेवावे लागते. श्रोत्यांशी संवाद साधता येणे हे यशस्वी कार्यक्रमाचे आद्य सूत्र ठरते. आपला श्रोता हाच आपला देव, असे वपुही मानतात; आणि ऑडियन्सच्या भावनांना महत्त्व देतात. कथाकथन यशस्वी होण्यासाठी वपु काही क्लृप्त्या वापरतात. वर्तमानकाळातील भोवतालच्या घडामोडींवर भाष्य करण्यासाठी जागा हेरणं, त्यासाठी बाहेरगावी गेल्यावर तिथली स्थानिक वर्तमानपत्रं वाचणं, हॉटेलवर भेटायला येणाऱ्या चाहत्यांकडून त्या गावातील घटना जाणून घेणं. . . त्यांचा वापर कथाकथनाच्या वेळी चपखलपणे कसा करावा याचा ते दिवसभर विचार करीत असतात. प्रास्ताविक करणारा संयोजक वा एखादा आगाऊ श्रोता यांचाही उपयोग करून घेता येतो. प्रास्ताविकात एकानं म्हटलं, "सभागृहात लहान मुलं आलेली दिसतात. ती जर रडू लागली तर पालकांनी त्यांना नैसर्गिक पद्धतीनं शांत करावं." अशा चमत्कारिक विधानानं खरं म्हणजे बेरंग होणार; परंतु वपुंनी लगेच माईकपुढे जाऊन म्हटलं, "नैसर्गिक पद्धतीनं शांत करावं म्हणजे मुलांच्या वडिलांनी मुलाला घेऊन बाहेर जावं." आणि त्यांनी श्रोत्यांची दाद मिळवलीच; शिवाय पुढच्या कार्यक्रमासाठीही वातावरणाची उत्तम निर्मिती साधली.

गीतरामायणाच्या सांगता समारंभाच्या नेमक्या कार्यक्रमाच्या वेळी वपुंच्या कथाकथनाचा कार्यक्रम दुसरीकडे होता. वपुंनी म्हटले, "माझ्या कार्यक्रमाचे काय होणार असा विचार करीत इथं आलो. तुमचा प्रतिसाद पाहून लक्षात आलं की, एकपत्नीव्रतावर भक्ती असलेले सगळे गीतरामायणाला गेले आणि उरलेले सगळे माझ्यासारखे इथे जमलेले आहेत." कार्यक्रम उचलला न गेला तरच नवल !

## संवाद महत्त्वाचा

गंजिफाच्या खेळात अखेरी साधण्याला महत्त्व असतं. त्याच्या अगदी उलट कथाकथनात 'आरंभ' जिंकावा लागतो. श्रोत्यांना कथाकथनकार किंवा त्याच्या कथनातला अनुभव त्यांच्यातलाच वाटायला हवा. हा समोरचा माणूस कुणीतरी 'ऐकवणारा' आहे असं श्रोत्यांना वाटता कामा नये. 'हा संवाद साधण्याच्या तळमळीनं आलेला आहे' स्वतःला आलेले अनुभव, त्यावरून काढलेले निष्कर्ष वा घेतलेले निर्णय बरोबर की चूक यांचा संभ्रम दूर करवून घेण्यासाठी तो कथा सांगणार आहे असं ऐकणाऱ्याला वाटलं पाहिजे',

अशी त्यांची भूमिका आहे. आपली जगण्याची जी पद्धत आहे तीच आपल्या लेखनाची वा कथाकथनाची आहे असेही ते छातीठोकपणे त्याचमुळे म्हणू शकतात. (पृष्ठ ९५). वाङ्मयीन अलिप्तता वपुंना साधत नाही या आक्षेपाला उत्तर देताना ते म्हणतात, "माझ्या लेखनामागचा हेतूच जिथं 'संवाद जोडण्यासाठी होता' तिथं 'अलिप्ततेचा' सवाल येतोच कुठे ?"

## पहिल्या तीन मिनिटात श्रोता गुंतला पाहिजे

वपुंचा समज आहे की, निसर्गवर्णन वा प्रवासवर्णन आपल्याला साधत नाही. स्त्री-पुरुष सौंदर्याची, माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची वर्णनं करण्यातही रस वाटत नाही. बायकांचे संवाद बायकी आवाजात बोलण्याची नक्कल जमली नाही, परंतु या मर्यादांचा कुठेही अडथळा होऊ न देता वपु कथाकथन करतात. बोलका चेहरा, अस्खलित शब्दोच्चार, कथांची उत्तम निवड, शब्द-भावनांचं नाट्य फुलविण्याची ताकद यांमुळे कथा सुरू होताक्षणी पहिल्या तीन मिनिटात श्रोता कथेत गुंतला पाहिजे असा त्यांचा प्रयत्न असतो. कथाकथनाचा श्रोता, चतुर, बहुश्रुत असतो. स्वतःच्या आयुष्याचा प्रचंड ग्रंथ घेऊन तो कार्यक्रमाला आलेला असतो. "अशा अनेक पुस्तकांसमोर मीही एक पुस्तक म्हणून उभा असतो. श्रोत्यांनी त्यांच्या ग्रंथातल्या लपवलेल्या पानांसमोर मी माझी लपवलेली पानं उघडतो. जिथं मजकूर जुळतो तिथं प्रतिसाद मिळतो. तिथं श्रोत्यांचं आणि माझं पुस्तक वेगवेगळं राहत नाही." (पृष्ठ ९५).

वपुंना कथाकथनाचं अंग आपल्याला आहे हे कधी उमगलं ? बालशिक्षण मंदिरात चौथ्या वर्गात असताना चिंचोरे गुरुजींनी पानिपतची कहाणी सांगितली. समरस होऊन, स्वतःच जणू पेशव्यांच्या घराण्यातला महापुरुष होत सांगितली. घरी मावशी, आई, डोळेकाका, कीर्तनकार आफळे हेही उत्तम कथाप्रसंग सांगत. त्यामुळे वपुही शाळकरी वयातच कथा सांगू लागले. ऑफ पिरियडला त्यांना शाळेत कथा सांगायला लावत. टाळ्यांची वाक्यं, दाद मिळणाऱ्या जागा, परिणामकारक शब्दयोजना यांचं भान येत गेलं. शांता शेळके यांच्याबरोबर त्यांच्या कथाकथनाचा पहिला कार्यक्रम त्यांचे साडू पाध्ये यांनी केला. शं. ना. नवरे व मधु मंगेश कर्णिक यांच्याबरोबर आरंभीचे कार्यक्रम ते करीत. पहिला तिकिट लावून जो कार्यक्रम केला त्यात अडीचशे रुपयांचा तोटाच संयोजकांना झाला, परंतु हे गणित पुढे जमत गेलं. हॉल बंदिस्त हवा, खुर्च्यांची सोय हवी वगैरे मागण्याही त्यामुळे पूर्ण होत गेल्या.

## प्रत्येक कार्यक्रमाचे वेगळेपण

कथाकथनाच्या तंत्राबाबत असे काही तपशील वा ठोकताळे एका पत्रातून आले आहेत, तसेच निरनिराळ्या ठिकाणचे संयोजक, तेथील श्रोते, सभागृहांची वैशिष्ट्ये, प्रवासाच्या सोयी-गैरसोयी, प्रेमात पडलेले श्रोते व मित्र, कथाकथनामुळे भारावलेले दाद

देणारे कलावंत व रसिक, प्रास्ताविक करताना घोटाळे करणारे संयोजक वक्ते, रिझर्वेशन व मानधन याबाबत फसवाफसवी करणारे यजमान, आतिथ्याचे भलेबुरे अनुभव देणारे आमंत्रक यांचेही अनेक किस्से येऊन जातात. कथा छान सांगितली म्हणून दाद देणारे ना. सी. फडके भेटतात, तसेच 'विनोदी कथा सांगून लोकांना हसवणं सोपं आहे, गंभीर कथा सांगून श्रोत्यांना खिळवता आलं पाहिजे,' असं दुसऱ्यांकडे बघून बोलणारे गदिमाही वपुंना भेटतात. 'अर्धशिक्षित बायाबापड्यांना तोंडात पदराचा बोळा घालून हसायला बऱ्या 'हा श्रीजंचा शेराही वपु विसरू शकत नाहीत. 'तुम्ही कथा सांगत नाही, तुम्ही कथा गाता' अशासारख्या कोण्या रसिकाचा अभिप्रायही ते उरी जपतात. दत्ता हलसलीकर, नीता भिसे यांच्या कविताही आवर्जून देतात.

कथालेखन आणि कथाकथन यांच्या अडीच तपांच्या या आनंदप्रवासात वपुंना बहुतांश अनुभव आला तो सुखद श्रावणातल्या हिरवळीचा. (सुधीर गाडगीळांच्या मुलाखतीनं निर्माण केलेला वैशाखवणवा तेवढा अपवाद !) या कथाकथनकारामधला जो माणूस आहे तोही तसा भावुक, श्रद्धाळू, लोभस. तो नाटकीपणा करतो; चिमटे घेतो; चिडतो. त्रागा करतो; पण तरी स्वतःवर तो भलताच खूष आहे. त्यामुळे तो जे सांगतो ते सारेच श्रवणीय होऊन जाते; त्याच्या अंतरंगात घेऊन जाते. आपल्या अनुभवाशीही त्याची सांगड जुळते. त्यामुळे त्याच्या आनंदाचाच नव्हे तर त्राग्याचाही आपला प्रत्यय परका उरत नाही. म्हणूनच वपुंची कथा ही आपलीही कथा असते. आपल्या अव्यक्त सुखदुःखाची ती अभिव्यक्ती असते.

(ककची क : व. पु. काळे, मेनका प्रकाशन, २११७ सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, पुणे ३०, पृष्ठे ११६, किंमत साठ रुपये.)

□

# नाच ग घुमा : माधवी देसाई

## *आत्मकथनात्मक कादंबरी : रोमां ए क्लेफ*

'नाच ग घुमा' ही माधवी देसाई यांची आत्मनिवेदनात्मक कादंबरी आहे. फ्रेंचमध्ये 'रोमां ए क्लेफ' असे वर्णन ज्या कादंबरीचे करतात अशी ही किल्लीवाली कादंबरी आहे. (क्लेफ म्हणजे किल्ली आणि रोमां म्हणजे कथा-कादंबरी) वास्तवातील व्यक्ती व घटनाप्रसंग घेऊन त्यावर कल्पिताचा साज चढवून कथानिवेदन करणे हा या वाङ्‌मयप्रकाराचा विशेष. 'नाच ग घुमा'च्या निवेदिका माधवी देसाई, त्यांचे पालक भालजी पेंढारकर, त्यांचे पहिले पती नरेंद्र काटकर, चौदा वर्षे त्यांनी ज्यांच्याशी दुसरा घरोबा केला ते रणजित देसाई वगैरे सर्व व्यक्ती या खऱ्या आहेत. वास्तवातल्या आहेत. मात्र त्या त्यांच्या वास्तवरूपात उभ्या करण्याऐवजी माधवी देसाई यांनी आपल्या कल्पनेने आपल्याला भावल्या वा खटकल्या तशाच स्वरूपात पेश करून प्रांजळ आत्मकथनाऐवजी त्याला 'रोमां ए क्लेफ' चे रूप दिले. त्यातील नाटकीपणा आणि तांत्रिक चलाखीचा भाग 'रोमां ए क्लेफ'च्या एकूण धाटणीला साजेसाच आहे. कोणाचा तरी सूड उगवणे, त्याची बदनामी करणे, त्याचा भंपकपणा दाखवून देणे, प्रसिद्ध वा ख्यातकीर्त व्यक्तीची जनमानसातली प्रतिमा कशी गैर आहे यावर प्रकाशझोत टाकणे वगैरे हेतूंनी एखादा लेखक 'रोमां ए क्लेफ'कडे वळतो. खऱ्या-खोट्याची वाटेल ती भेसळ तो करतो. काही वेळा मूळ नावे तशीच ठेवतो, काही वेळा बदलतो. काही वेळा त्यात वाटेल तसे स्वतःचे रंग मिसळतो. मात्र त्यात वर्णिलेल्या व्यक्ती वाचकांच्या नेमक्या ध्यानात याव्यात अशी दक्षता तो घेतो. फॅक्टसपेक्षा इफेक्टला महत्त्व देणारा हा प्रकार असतो एवढेच.

'नाच ग घुमा' ही कादंबरी आत्मकथनात्मक आहे. काही जण तिला चुकीने आत्मकथन म्हणतील. स्वतः लेखिकाही हे आत्मकथन आहे असेच मानते; परंतु सर्व व्यक्ती व प्रसंग हे वास्तवात खरे असूनही केवळ आपल्या समर्थनार्थ आणि आपल्या चष्म्यातून तडकभडक स्वरूपात पेश केल्यामुळे हे लेखन किल्लीवाल्या कादंबरीच्या वर्गात चपखल बसते असे मला वाटते. जरूर तेथे फ्लॅश बॅकचा वापर करून, तपोवन, गोवा, कल्याण,

कोवाड, बेळगाव या स्थळांमधील वास्तव्यानुरूप प्रकरणे आणि प्रत्येकाच्या शेवटी कोर्टातल्या घटस्फोटाच्या खटल्याचा एकेक टप्पा असून या प्रथमपुरुषी निवेदनाची गती चटकदार ठेवण्यात आली आहे.

'नाच ग घुमा' एका दुःखीकष्टी पण मनस्वी अशा स्त्रीची कहाणी आहे, परंतु या कहाणीचा संबंध भालजी पेंढारकर आणि रणजित देसाई या महाराष्ट्रातील दोन नामवंत व्यक्तींशी असल्याने या कहाणीबद्दल वाचकांना विशेष औत्सुक्य वाटते. अर्थात वाचकांचे हे औत्सुक्य काहीसे बड्या लोकांची लफडी जाणून घेण्याच्या ऊर्मीतून वा विकृतीतून आलेले नसेलच असे नाही, परंतु लेखिकेने आपले पालक भालजी आणि आपले दुसरे पती रणजित देसाई या दोघांच्याही जनमानसातील प्रतिमा कशा एकांगी, चुकीच्या व तकलादू आहेत हे अत्यंत प्रभावीपणे दाखवले आहे आणि त्यामुळे वाचकांची अपेक्षा रास्त ठरते. मात्र वाचकांची ही अपेक्षा संपूर्णपणे सफल होत नाही, कारण लेखिका बऱ्याच गोष्टी सांगायच्या टाळते किंवा केवळ सूचित करून सोडून देते. त्यामुळे 'नाच ग घुमा'च्या वाचनानंतर काहीसे असमाधानच राहते. कलाकृतीचा बाह्य आविर्भाव हा या नायिकेच्या निवेदनाला एक प्रकारची सुसूत्रता देतो, परंतु आपल्याला सोयीचे तेवढे कधी सरळ तर कधी छद्मीपणाने सूचित करून इतर वास्तव वा सत्य शिताफीने टाळले जाते, आपण भाबड्या, भावूक व प्रांजल आहोत; परंतु जो जोडीदार मिळाला तो विश्वासघातकी निघाला असा सूर आरंभापासून त्यांनी लावला आहे. रणजित देसाईंनी घटस्फोटाचा आग्रह धरून तो घेतल्यावर लगेच या लेखनाचा घाट घालण्यातला लेखिकेचा हेतू हा शुद्ध वाङ्मयीन आहे असा आव आणण्यात काय अर्थ आहे? वस्तुस्थिती अशी होती की पाच-सहा वर्षांपूर्वी स्वतः माधवी देसाई यांनीच घटस्फोटाचे कागदपत्र बनवून घेतले होते व कोर्टात जाण्याची तयारी केली होती, परंतु रणजित देसाई आणि माधवी यांच्या मित्रांनी 'शांतपणे विचार करूनच हे पाऊल उचला' असा सल्ला दिला म्हणून त्या वेळी तो विचार मागे पडला. परंतु याचा निर्देश कुठेच नाही.

## अमेरिकन संसार

पुढे मात्र माधवी देसाई यांनी एके दिवशी कसलीही पूर्वसूचना न देता, रणजित देसाई परगावी गेले असताना आपले सर्व सामान घेऊन (ज्याचा उल्लेख वरचेवर आला आहे अशा आपल्या काळ्या शिसवी टेबलासह) बेळगावला प्रयाण केले आणि महिना दोन हजार रुपये बेळगावच्या घरखर्चासाठी पाठवा असा सांगावा धाडला. तेव्हा रणजित देसाईंनी तशी व्यवस्था केली. त्यानंतर लगेच घटस्फोट घेण्याबाबत रणजित देसाईंनी पुढाकार घेतला व दोन लाख रुपये पोटगीदाखल देऊन महिना दोन हजार रुपये माधवीला अखंड मिळत राहतील अशी व्यवस्थाही केली. या वस्तुस्थितीपैकी आधी स्वतः घटस्फोटाचा मसुदा बनवल्याच्या प्रकरणाचा उल्लेख निवेदनात येत नाही.

रणजित देसाई यांच्याशी माधवी काटकर यांचा चौदा वर्षे जो संसार झाला त्याचे वर्णन त्या 'आमचा अमेरिकन संसार' असे करतात.

रणजित– वय पंचेचाळीस. पहिली पत्नी मनोरुग्णालयात दाखल होऊन पंधरा वर्षे उलटलेली. दोन्ही मुली वयात आलेल्या. मानसन्मान, प्रतिष्ठा, मित्रपरिवार यांचा झगझगाट एकीकडे आणि लेखन, संगीत, मद्यपान यांची नशा दुसरीकडे. त्यात लपलेली एकाकीपणाची वेदना. इनामदाराचा वाडा आणि गाव यात अदृश्य भिंत. रयत नेहमी दूर. पूर्वायुष्याची पडछाया घेरून बसलेली. खऱ्या-खोट्या दुःखांना गोंजारून जगण्याची सवय झालेली. घराला स्वामिनी हवी; सहवासाला स्त्री हवी; संसाराला अधिष्ठान हवे ही त्यांची मनःस्थिती. 'बाई ठेवणं ही इनामदार वाड्यात नवीन गोष्ट नव्हती, पण जी स्त्री वाड्यात येईल ती पत्नी म्हणून येईल. मालकीण म्हणून येईल.' ही त्यांची भावना.

माधवी– वय पस्तीस. नुकतेच वैधव्य कोसळलेले. तीन मुली. एक लग्नाची, दुसरी वयात येऊ घातलेली, तिसरी शाळकरी. शिक्षिकेची नोकरी करून संसाराचा गाडा रेटणारी. स्वतःच्या वेदना कुरवाळत बसायला वेळ नाही असे मानणारी. भालजी पेंढारकरांच्या 'पितृत्वाचा' करारी वारसा जपणारी. 'सामान्य मुलांसारखे आम्ही कधी जगलोच नाही. सतत आदर्शाचा मागोवा घेत जगायचं; आदर्श बघायचं, आदर्श वागायचं, आदर्श विचार मनी वागवायचा, लढावं, सोसावं, लढावं, तुटून पडावं; पण अस्वस्थ मन सावरत, सोसत पुन्हा जीवनाची वाट नेटानं चालत राहावं' असा बाणा.

२४ एप्रिल १९७४ रोजी या दोघांचा वैदिक पद्धतीने पुण्याला विवाह झाला. रणजित देसाई यांच्याकडे पाहताना निवेदिका 'स्वामी' मधल्या माधवरावांना शोधत होती, पण आपण रमा नाही हे ती सपशेल विसरत होती. त्यामुळे लेखक जे आदर्श रंगवतो ते लेखकात दिसले पाहिजेत अशी आकांक्षा तर होती, परंतु ते आदर्श आपल्या जीवनात जगण्याची वृत्ती मात्र नव्हती. त्यामुळेच रणजित देसाई या व्यक्तीवर जो विश्वास टाकला तो कसोटीला उतरला नाही, हा लेखक जे आदर्श रंगवतो ते स्वतःच्या जीवनात पाळत नाही, सांगतो तसे जगत नाही, विश्वासघात करतो असे सूत्र या निवेदनात प्रकट झालेले आहे. या माणसाला स्वतःचे हित कळत नाही, त्याला व्यवहार कळत नाही. आजूबाजूचे लोक आपल्याला लुबाडत आहेत हेही त्याला कळत नाही आणि कळले तर तसे बोलून कुणाला दुखावणे याला जमत नाही असाही कैवार लेखिका घेते. आपल्या आगमनाने कोवाडच्या त्या वाड्याला घरपणा लाभला, त्यांच्या लेखनाला पुन्हा बहर आला, त्यांच्या मुलींच्या जीवनाला वळण लागले, त्यांच्या प्रथम पत्नीची मनोरुग्णालयातून मुक्तता होऊन आपल्या माहेरच्या सर्वसामान्य घरगुती जीवनात तिला स्थान मिळालं, कोवाड गावाच्या विविध समस्या मार्गी लागल्या असेही श्रेय त्या स्वतःकडे घेतात, अर्थातच हे श्रेय त्यांना द्यायला काही हरकत नाही. जेव्हा रणजित-माधवी यांची मने जुळलेली होती, परस्परांबद्दल आस्था होती तेव्हा त्या उभयतांना परस्परपूरक, परस्परपोषक, चैतन्याचे क्षण लाभले असणारच;

परंतु व्यावहारिक पातळीवर जेव्हा ताणतणाव निर्माण झाले, मुलींची लग्ने जवळ आली, नातलगांचे मानपान वादग्रस्त बनले, आपल्या मुलींच्या शिक्षणासाठी दूर बेळगावी वास्तव्य करणे माधवीबाईंना भाग पडले, तेव्हा 'तुम्ही जातिवंत सरकार आणि आम्ही जातिवंत कामगार' हे समीकरण फारच ताणले गेले आणि ते तुटणे अपरिहार्य ठरले.

## रणजित : दुहेरी व्यक्तित्व

आपल्या लेखनकर्तृत्वाने आणि समाजकार्यातील मुसंडीने बाईंना मान्यता मिळते. त्यामुळे मानसन्मानांना सरावलेल्या रणजित देसाई या आपल्या पतीचा पुरुषी अहंकार दुखावला गेला आणि त्याच्यातल्या सुप्त मत्सराला जाग आली असाही आरोप मग बाई बिनदिक्कत करतात. आपल्या नवऱ्याला 'दादा' असे त्या संबोधतात आणि रणजित देसाई यांच्या दुहेरी व्यक्तिमत्त्वाचा सिद्धांत त्या मांडतात. दादा कुणाच्या तरी खांद्यावर मान टाकून रडत असत आणि कधी देवदास बनत तर कधी श्रीकांत. त्यांचे नायक सदा एकाकी, चिरविरही, अभोगी, शापित, निमूटपणे सारे काही सोसणारे आणि अशा या कलावंताला बाई निघाल्या व्यवहाराची वेसण घालायला. "उत्पन्न आणि घरखर्च यांचा ताळमेळ बसत नव्हता. खड्डा प्रचंड होता. त्यांना घरातला चाकर शंकर माझ्यापेक्षा प्रिय होता. मद्याची सोबत पुरेशी होती. मग माझी सोबत कशासाठी स्वीकारली ?" असा प्रश्न बाई विचारतात.

रणजित-माधवी यांचा हा विवाह यशस्वी होणे कठीणच होते, हेही बाईंच्या निवेदनातल्या धारदारपणावरून आरंभापासूनच स्पष्ट होते. रणजितची प्रथम पत्नी सुनंदा मनोरुग्णालयात असते. विवाहानंतर त्यांनी तिला मारझोड केली. तिने जाळून घेण्याचा प्रयत्न केला वगैरे तपशील माधवीबाईंना विमानाने रणजितच्या भेटीला नेणाऱ्या लता मंगेशकर पुरवतात; लग्नाचा बेत ठरवला तेव्हा रणजितच्या दोन्ही मुली माधवीबाईंना भेटून स्पष्टच इशारा देतात, "तुम्ही लग्न करा, पण मूल होऊ देऊ नका." माधवीबाईंच्या तिन्ही मुलींच्या मनात आपल्या वडिलांच्या– नरेंद्र काटकरांच्या आठवणी ताज्याच असतात. रणजित देसाई हे आपले वडील होऊ शकत नाहीत हे त्या कुठलाही आडपडदा न ठेवता आपल्या आईजवळ प्रकट करतात. लग्नानंतर एकदा जेवणाच्या वेळी रणजित माधवीबाईंना आग्रहाने घास देण्याचा प्रयत्न करतात तेव्हा रणजितची थोरली कन्या ताडकन म्हणते, "समोर लग्नाच्या मुली बसल्यात ते तरी बघा." दोघांच्या पूर्व विवाहापासून झालेल्या मुली-तरुण वयातल्या. त्यांना या नव्या आई-वडिलांबद्दल अजिबात जवळीक नव्हती. आपल्या मुलींची आईप्रमाणे काळजी घेणारी बडोद्याची मावशी तडकाफडकी कोवाडच्या वाड्यातून निघून जाते तेव्हा रणजितदादा रडत बसून माधवीला दोष देतात– "तुझ्यामुळे माझी मावशी गेली."

रणजित हे कोवाडकरांचे सरकार. या सरकारांच्या वाड्यातील प्रत्येक वस्तूला ऐतिहासिक परंपरा. "अग माधवी, तो तांब्या वापरू नकोस. तो माझ्या आबांचा आहे."

कोवाडमधील प्रत्येक वस्तू त्यांना जवळची आहे. परकी फक्त मी. माझा नवरा माझी बाजू घेईलच अशी खात्री कधीच मला नव्हती," असे माधवीबाई वैतागून लिहितात. "ते भूतकाळ विसरणारे नव्हते. मी मात्र उडी मारून वर्तमान घट्ट पकडू पाहात होते." हे वर्तमान घट्ट पकडण्याचा प्रयत्न बाई जोरदार करीत होत्या. रणजितदादांना त्या बजावून सांगत होत्या– "माझ्या मुलींना आश्रिताची भावना नको. तुमच्या मुलींना दात्याची भावना नको." माधवीबाईंना गोव्यातील इस्टेटीच्या विक्रीतून पंधरा लाख रुपये मिळाले. "ते सर्व तुझ्या तिन्ही मुलींच्या नावाने बँकेत ठेव. त्यातला एक पैसाही या वाड्यात येऊ देऊ नको." असे दादा सांगतात. आणि त्या मुलींच्या शिक्षणाचा किंवा इतर खर्चाचा भार स्वतःकडे घेतात, पण हे त्यांचे मोठेपण स्वामीतल्या माधवरावांप्रमाणे गृहीतच धरलेले असते.

तशात उभयतांचे हितचिंतकही खूप. नरहर कुरुंदकर बाईंना कानमंत्र देतात, "स्वामींना काहीतरी एकच स्वीकारावं लागणार. ते एकवेळ तुम्हाला सोडतील पण सवयी सोडणार नाहीत." यशवंतराव चव्हाण मुत्सद्दी. ते बाईंना सल्ला देतात, "जरा कडक़ वागा. घर तुमचं आहे. इतकं मऊ राहून चालणार नाही." ही दोन्ही नावे मातबर. त्यांनी खूप काही सांगितलं असेल, पण बाईंना त्यातलं एवढंच आठवावं ना! आपल्या युक्तिवादाला बळकटी आणायला तोलामोलाचे साक्षीदार हवेतच.

या प्रथमपुरुषी निवेदनाचं फलित काय ? लेखिका काही प्रश्न उपस्थित करते आणि ते प्रश्न मात्र मूलगामी आहेत.

"भावनेने जन्मलेले नाते, कायद्याने संपुष्टात येते का? कोणी पुन्हा विश्वासाने कुंकवाचा साज चढवतो. मीही सन्मान समजून तो स्वीकारते. देणाराच ते सारे अलंकार परत मागतो. कोणतं रूप खरं ? भावना-विश्वासानं जन्मलेलं ? प्रेमानं जुळलेलं ? धर्मानं मानलेलं की कायद्याने तोडलेलं ?" हा प्रश्न कायद्याच्या कलमाने नैतिकता आणि नाती ठरवण्याच्या सद्यःप्रवृत्तीचे अपुरेपण दाखवतो, तर दुसरा प्रश्न आपल्या आत्मरूपाचा शोध घेण्याशी संबंधित असतो.

"साहित्यिक हा त्याच्या कल्पनेतल्या नायिका वास्तवातल्या स्त्रीमध्ये शोधत असावा. वास्तवातील स्त्री त्याच्या लेखनमूल्यांतून जीवनमूल्ये शोधत असावी. खरी फसगत इथेच होते. स्तुती, खोटं समाधान यांची नशा, खरं मानवी स्वरूप आणि कलेतून लाभलेलं बाह्यस्वरूप. यांच्या सीमारेषा कलावंताची घुसमट करतात. त्याच्या स्त्रीला ही दोन्ही रूपं परिचित. तिच्या मनानं घुसमटणं हे फक्त तीच जाणू शकते." माणसाचं खरं रूप कोणतं ? समोर दिसतं ते ? बोलण्यातून व्यक्त होतं ते ? साहित्यातून जाणवतं ते ? वागण्यातून दिसतं ते ? पतिपत्नी हे एक अभेद्य नातं असतं ?"

या कहाणीत असे अनेक तपशील आहेत की जे अशा प्रश्नांमागे असणाऱ्या आत्मानुभूतीमुळे अंतर्मुख करतील. या कहाणीत निवेदिकेने आपले बेळगावातील बालपण, आपले तपोवनातील शिक्षण, लग्नानंतर गोव्यात काढलेले सासरचे दिवस, प्रथम पतीच्या

नोकरीच्या निमित्ताने कल्याण-शहाडमध्ये काढलेले दिवस, शिक्षिकेची नोकरी करीत पार पाडलेले पदवीपर्यंतचे शिक्षण, पतीचे आजारपण व अकाली आलेले वैधव्य वगैरे प्रसंगांचेही तपशील दिले आहेत, परंतु त्यातून विशेष काही हाती लागत नाही. या कहाणीचा खरा गाभा रणजित-माधवी यांच्यातील जवळीक आणि फारकत हाच आहे आणि त्यातल्या त्यात रणजितपासून मिळालेल्या घटस्फोटामुळे रुष्ट झालेल्या नायिकेचा हा एका परीने उट्टे काढण्याचा प्रयास आहे. रणजित देसाई यांच्यासारख्या कलावंताचे पत्नीपद एक तपभर भूषविणाऱ्या स्त्रीने त्याच्यातील केवळ दोषांचीच व नकारात्मक बाजूचीच तस्वीर रंगवावी आणि तपभरच्या साहचर्यावर साफ बोळा फिरवावा हे अर्थातच चमत्कारिक वाटते.

आपल्याकडे वरच्या वर्गात आपण अजूनही पति-पत्नीच्या नात्याचे काही पावित्र्य मानतो. काही औचित्य पाळतो. कधी काय बोलावे याचे पथ्य पाळतो. साध्या नोकरीत व व्यवहारात देखील काही गोष्टी कॉन्फिडेन्शिअल मानतो. पंतप्रधान आणि राष्ट्रपती, मुख्यमंत्री आणि अन्य मंत्री, सचिव आणि त्याचे सहकारी, प्राचार्य आणि प्राध्यापक, दोन मित्र, दोन मैत्रिणी- अशा प्रत्येकात काही गोष्टींची, विचारांची विश्वासपूर्वक देवघेव होत असते. काही गोष्टी आपापसात ठेवण्याचा, त्याची वाच्यता न करण्याचा अलिखित संकेत असतो. अशा नात्यांतील विचारविमर्श वा घटनाप्रसंग यांची वाच्यता सार्वजनिक हिताच्या दृष्टीने करतानाही कालावधीचे आणि प्रसंगांचे औचित्य पाळावे लागते. 'नाच ग घुमा'चे लेखन करताना हे औचित्याचे भान सुटलेले आहे. रणजित देसाई यांनी आपल्या विश्वासाचा घात केला असे पालुपद बाईंनी अनेक वेळा या पुस्तकात घोळवले आहे, परंतु आपण स्वतःही त्यापेक्षा वेगळे काही केलेले नाही हे त्या सोयीस्करपणे विसरतात. चौदा वर्षांच्या वैवाहिक जीवनाचा असा पंचनामा घटस्फोट घेतल्यानंतर लगेच मांडणाऱ्या व्यक्तीच्या इंटेग्रिटीची, सचोटीची आणि विश्वासार्हतेचीच त्यामुळे कसोटी लागते. रणजित देसाई हे या अशा लेखनाने अस्वस्थ जरूर होतील पण त्याला उत्तर देऊन आपली बाजू मांडायला सहजी पुढे येणार नाहीत. आजवर त्यांनी खूप सोसले आहे, पुढेही सोसत राहतील. त्यामुळे काही काळ 'नाच ग घुमा'चे केवळ एकांगी चित्रच वाचकांसमोर राहील. सत्य घटनांच्या निःपक्षपाती निरुपणापेक्षा कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीचे रंगरूप लेवून हे निवेदन शब्दबद्ध होते, म्हणूनच ते आत्मचरित्रापेक्षा कादंबरीला जवळचे ठरते. रोमां ए क्लेफ- किल्लीवाली कहाणी म्हणून 'नाच ग घुमा'चे वाचन केले तरच त्यातील अनेक घटनांच्या एकांगी लटकेपणाने वाचकांची दिशाभूल होण्याचे टळेल. या पुस्तकातील घटना शंभर टक्के जशाच्या तशा स्वीकारणे म्हणजे ढालीची एकच बाजू बघितल्यासारखे ठरेल आणि अरेरे, ढालीची दुसरी बाजू बघितली नाही, असा खेद पुढे प्रकट करणे भाग पडेल.

(नाच ग घुमा : माधवी देसाई, चंद्रकला प्रकाशन, १३८ कसबा पेठ, पुणे ११, पृष्ठे ३०६, किंमत नव्वद रुपये.)

□

# लाव्हा : लता कामत

## *नव्या युगातील तरुणीचे दाहक आत्मकथन*

'लाव्हा' या आत्मकथनाद्वारे स्वतःच्या प्रेमाची, विवाहाची आणि त्यातून उद्‌भवलेल्या शोकांतिकेची कहाणी कसलाही आडपडदा न ठेवता सांगण्याचे धारिष्ट्य करणाऱ्या लता कामत या तरुणीने भारताच्या न्यायक्षेत्रातही एक नवाच प्रश्न उपस्थित करून, विश्वामित्री बाण्याने चलाखीने पितृत्वाची जबाबदारी नाकारणाऱ्या सर्वच पुरुषवर्गाला जबरदस्त आव्हान दिले आहे. मूल जन्माला येते ते स्त्रीच्या पोटी; त्यामुळे पुरुष तिच्या कुशीत ते देऊन स्वतः सफाईने नामानिराळा राहू शकतो, पण त्याला आता असे सटकन् सुटता येणार नाही.

लता कामत हिला झालेल्या मुलीचे पितृत्व नाकारण्याचा प्रयत्न करणारा तिचा पती विलास– त्याच्याविरुद्ध तिने सुप्रीम कोर्टात दावा दाखल केला, सुप्रीम कोर्टाने तो दाखल करूनही घेतला. रक्ताची तपासणी करून वा अन्य वैद्यकीय चाचण्या घेऊन आपल्या मुलीचा पिता विलास हाच आहे हे सिद्ध करता येईल; आणि तसा तो सिद्ध करण्यात यावा यासाठी हा दावा होता.

### अशा प्रकारचा पहिलाच दावा

सुप्रीम कोर्टापुढे अशा प्रकारचा दावा हा प्रथमच येत आहे; तो कोणत्या कलमाखाली वा कायद्याखाली दाखल करून घेता येईल असाही एक अडचणीचा मुद्दा आरंभी मांडण्यात आला होता; तरी लता कामतचा अर्ज सुनावणीसाठी घेण्याचे सुप्रीम कोर्टाने ठरवले.

अमेरिकेतील न्यायालयात अशा प्रकारचे खटले सर्रास चालतात आणि रक्ताच्या तपासणीवरून बाप व मुलगा यांचे नाते पारखून घेता येते हे मत तेथे मान्यताप्राप्त आहे. परंतु आपल्याकडे अशा प्रकारचे खटले आजवर कोर्टापुढे उभे केले गेले नव्हते. हायकोर्टाने तिचा दावा फेटाळून लावला तेव्हा लताने सुप्रीम कोर्टाकडे अपील दाखल केले.

### कोंडीतून होणारी घुसमट

लता कामतने 'लाव्हा'मध्ये सांगितलेली कहाणी पेटत्या निखाऱ्यासारखी दाहक आहे;

आणि ती ही कहाणी एवढ्या मोकळेपणाने सांगू कशी शकली याचेही आश्चर्य वाटतेच. लता ही काही सराईत व्यावसायिक लेखिका वा पत्रकार नव्हे. आपल्या जीवनातील अनुभवावर कथा वा कादंबरी लिहायची म्हणून तिने लेखणी हाती घेतली आहे असेही दिसत नाही. ती ज्या जीवघेण्या अनुभवचक्रातून गेली त्यातून मानसिक दृष्ट्या बाहेर पडण्यासाठी कॅथार्सिससाठी एक प्रकारच्या अपरिहार्य अशा आंतरिक कोंडीतून सुटण्यासाठी तिने लेखणी हाती धरली असणार हे स्पष्टच आहे. 'रिकलेक्टेड इन ट्रँक्विलिटी' अशा थाटात घटना घडून गेल्यावर दीर्घ काळाने मनाच्या समधात वृत्तीने त्यावर टाकलेली पुनर्दृष्टी नव्हे. त्यामुळे निवेदनात तिची सैरभैर अवस्थाही दिसते.

## नवीन विचारांची तरुणी

एक गांधीवादी कार्यकर्ते बाबूराव कामत यांची ही कन्या. विनोबांच्या निकटवर्ती सहकाऱ्यांपैकी ते एक. लताची आई ही आचार्य काका कालेलकरांच्या नात्यातली. बालवयात मेनेंजायटिस झाल्याने तिच्या कर्णेंद्रियांवर परिणाम होऊन तिला बहिरेपण आलेले, परंतु एरवी सर्व कामात आई हुशारच होती. लता वडिलांबरोबर देशभर फिरलेली, सुधारक वातावरणात वाढलेली. दादा धर्माधिकारींकडे लेखनिक म्हणून काम केलेली, स्त्री चळवळीत रमणारी. लता अमेरिकेत तीनदा रि-काउंसेलिंगच्या शिबिरांसाठी जाऊन प्रशिक्षित होऊन येते. लग्नाबद्दलही आधुनिक विचार ती बाळगते. तारुण्यात पदार्पण केल्यावर साहजिकच आपल्या चळवळींना पोषक साथ देणाऱ्या जोडीदाराची ओढ तिला लागते; आणि स्वतःच्या एकटेपणाचेही भान झाल्याने कोणीतरी असामान्य व्यक्तित्वाचा पुरुष आपल्या जीवनात यावा असे मनाशी घोळू लागते. 'कितीतरी मोर्च्यांवर एकाच वेळी आपल्याला चळवळीत लढावे लागते. तेव्हा कुणाचा तरी भक्कम आधार हवाच असे तिला वाटते.

अशा वेळी तिच्या जीवनात विलास उधोजी या तरुणाचा प्रवेश होतो. त्याचे वडील हे नाणावलेले वकील. आर.एस.एस. चे ज्येष्ठ कार्यकर्ते. विलास आणि वीणा ही त्यांना दोनच अपत्ये. विलास टीव्हीचा डीलर असतो. लताला तो पार्टनर म्हणून बोलावतो. ती आपली नोकरी सोडून विलासच्या दुकानावर बसू लागते. तिच्या एका मैत्रिणीने भविष्याच्या आधारे तिच्या भावी नवऱ्याविषयी जे वर्णन केले होते त्याच्याशी विलास मिळताजुळता असल्याने; या दोघांमधली जवळीक वाढते. तो तिला म्हणतो : तू मला आवडतेस, तुला पाहिले की माझा माझ्यावर ताबा राहात नाही. त्याला शारीरिक प्रेम हवं होतं, पण तिला टेंपररी रिलेशनशिपमध्ये रस नसतो. परमनंट कमिटमेंट हवी होती. 'माझं वय वाढत असल्यानं, एकदा त्या व्यक्तीशी शरीरसंबंध जोडल्यानंतर मला मनानं त्यातून मुक्त होता येणार नव्हतं.' ही तिची भावना.

पण तरीही ती दोघे एकत्र येतात. तिला गर्भ राहतो. तिच्या मैत्रिणी तिला ॲबॉर्शनचा

सल्ला देतात. तो लताची टाळाटाळ करत राहतो. गर्भ चार महिन्यांचा असताना ॲलर्जी असलेले अंडे खाण्यात आल्याने खूप रक्त जाऊन लताचा गर्भ पडतो. प्रचंड मानसिक आंदोलनातून तिला जावे लागते.

त्यानंतरही लग्नाची तो टाळाटाळ करत असतो, पण पुन्हा लताला दिवस जातात. तिची बहीण तिला बजावते, "तो सॅडिस्ट आहे. तुझ्या जिवाशी खेळतो आहे. सहा महिने तू त्याच्यापासून दूर राहा."

त्या वेळी त्याचे आई-वडील परदेशी गेलेले असतात. "ते आले की आपण लग्न करू." असे तो सांगत राहतो. घरच्यांचा विरोध असतोच. तो ॲबॉर्शनचा आग्रह धरतो. डॉक्टर सांगतात की "आधीच्या ॲबॉर्शनमध्ये बराच त्रास झालेला आहे. हे नवं ॲबॉर्शन केलं तर जिवाला धोका आहे."

## आत्महत्येचा प्रयत्न

याच वेळी 'अर्थ' हा चित्रपट ती पहाते. तिला 'स्वाभिमान' गवसतो. 'मी जर असाच दुसऱ्या स्त्रीकडे गेलो तर तू मला सोडून देशील ?' या त्याच्या प्रश्नाला ती 'हो' असे उत्तर देते. मग तुझा-माझा संबंध संपला असे तो सांगतो. ती माहेरी येते, परंतु तो पुन्हा तिच्या वाढदिवसाचे निमित्त करून भेटतो, तेव्हा ती रजिस्टर लग्नाचे फॉर्म आणून त्यावर त्याचा सह्या घेते, परंतु जन्मतारखेचा दाखला नसल्याने ते फॉर्म संबंधित कार्यालयात स्वीकारले जात नाहीत... ती त्याला टीव्ही डीलरशिप मिळावी म्हणून आपल्या वडिलांच्या मित्राद्वारे प्रयत्न करते. त्याचे होणारे नुकसान वाचवते... परंतु लग्नाला मात्र त्याची तयारी नसते.

निराशेच्या एका झटक्यात बेगॉन स्प्रेचा डबा आणून त्यातील द्रव ती पिऊन टाकते. परंतु उलट्या होऊन ते विष बाहेर पडते. तिची आई विलासला भेटून लग्नाबद्दल विचारते. तो म्हणतो लग्न करीन पण इतक्यात नाही. तशात तो काही ब्ल्यू फिल्मस् बघून येतो. तिच्याबरोबर वेगवेगळे प्रयोग सुरू करतो. ते किळसवाणे प्रयोग-सुख मिळत नसतानाही ती करू देते.

## भ्रमनिरास

तो लग्नाला एकदाचा होकार देतो. दसऱ्याचा मुहूर्त ठरतो. 'सकाळी साडेदहाचा.' परंतु तो आदल्या दिवशीच पुन्हा नकार देतो. 'केवळ मंगळसूत्र घालून आरामात राहा. पट्टराणी म्हणून' असे तो सांगतो.

आता तिचा पुरता भ्रमनिरास झालेला आहे. ती विलासच्या या फसवणुकीबद्दल तेथील सामाजिक कार्यकर्त्यांना भेटून माहिती देते. 'मला फसवून सहजासहजी विलासची सुटका मी होऊ देणार नव्हते' असा तिचा निर्धार होतो. रंजनाताई चितळे तिला इशारा देतात, 'या प्रक्रियेत तुझ्या जीवनाची परवड होईल. त्रास होईल. आत्महत्येचाही मोह होईल. एवढी

मोठी किंमत देऊन हा लढा उभारायचा का ? त्यातच विलासचं दुसरं लग्न झालं तर तुझी काय अवस्था होईल ?'

विलासकडून ती धंद्यासाठी त्याला दिलेले पैसे परत मागते. विलास तिच्याकडून लग्नासाठी सह्या केलेले फॉर्म परत मागतो. ती देत नाही. दरम्यान ती मुंबईला वडिलांबरोबर जाते. 'पितृत्व सिद्ध करणारी टेस्ट' भारतातही आहे अशी माहिती तिला मिळते. तिच्या मैत्रिणीचे वडील तिला ॲबॉर्शनचा सल्ला देतात. लग्न न करता मूल होऊ देणं व ते वाढवणं हे सध्याच्या समाजाच्या दृष्टीनं अयोग्य ठरतं असे ते म्हणतात. त्याच वेळी विलास तिला मुंबईला फोन करून बोलावून घेतो. लग्नाची तयारी दाखवतो. कोणालाही न बोलावता हे लग्न करायचं अशी त्याची अट असते, परंतु काही मंडळींना बोलावलं जातंच. त्यांना पाहिल्यावर तो मंगलाक्षता, लाजाहोम, सप्तपदी, वगैरे झाल्यावर न जेवताच तणतणत निघून जातो. लग्नाच्या फॉर्मवरही सह्या करण्यास नकार देतो. लताची आजी तिला म्हणते, "याची लक्षणं काही ठीक दिसत नाहीत. इतका भयंकर लहरी प्राणी मी आजपावेतो बघितला नाही."

## लहरीपणाचा कळस

लता विलासच्या घरी राह्यला जाते, परंतु त्याचे आईवडील तिचा स्वीकार करीत नाहीत. ती माडीवरच्या खोलीत राहू लागते. परंतु तेथेही तिचा छळ सुरू राहतो. वेळेवर न येणे, घरखर्चाला पैसे न देणे, न जेवताच ताटावरून उठणे, वाटेल ते कारण काढून भांडणे, ती घरी असताना सर्व दारेखिडक्या बंद करायला लावणे. धमकीवजा थट्टा. कधी अबोला.

एकदा तो तिच्या सह्या काही कोऱ्या कागदांवर घेतो. कशासाठी ह्या प्रश्नाला उडवाउडवीची उत्तरे देतो. नंतर तिला कळते की हे लग्न रद्द व्हावे म्हणून त्याने कोर्टात दावा गुदरला आहे. बेलिफ समन्स देऊन जातो तेव्हा तिला खरा प्रकार कळतो. कोर्टात जाऊन ती केस लढवायची म्हणून सांगते. तो तरी तिला साळसूदपणे सांगतो- 'ही केस फक्त तुझी परीक्षा पाहण्यासाठी टाकलेली आहे. मी पुन्हा तुझ्याशी लग्न करीन. तुझ्या मुलाला दत्तक घेईन."

## विवाह रद्द ठरतो

तेरा एप्रिल १९८४ रोजी तिला पोटात कळा आल्याने हॉस्पिटलमध्ये नेले जाते. वीस तास कळा येतात. नंतर मुलगी होते. तिचं बारसं होतं त्या वेळी सामाजिक कार्यकर्ते श्याम मानव तिची भेट घेतात. कोर्टात तारीख पडते. आपल्यावरील खोटे आरोप ऐकून ती थक्कच होते. तेथील महिला कार्यकर्त्या विलास उधोजीच्या दुकानावर मोर्चा नेऊन त्याला चपलांनी झोडपून काढतात. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात बातम्या येतात. विलासचा खुलासा छापला जातो. लग्न नोव्हेंबरात; मुलीचा जन्म एप्रिलमध्ये. तशात कोर्टात खटला चालू. त्यामुळे

वृत्तपत्रे तिची बाजू ऐकून घ्यायलाच तयार नसतात. तिने दिलेले वकील नीट काम करीत नाहीत. कोर्ट हे लग्न रद्द ठरवते. लग्नाच्या वेळी लताने आपण गरोदर आहोत हे लपवून ठेवले हा विलासचा युक्तिवाद कोर्ट ग्राह्य धरते. सरिता मोडक नामक तरुणीशी लग्न करून विलास मोकळा होतो.

...तशातच दुष्काळात तेरावा महिना म्हणजे लताला झालेली मुलगी समता ही मेंटली रिटार्डेड निघते. आज ती चार वर्षांची आहे. अजून ती बोलू शकत नाही; चालू शकत नाही. तिला आपली आई ओळखू येते, परंतु वडील कोण ते तिला माहीत नाही.

## सामाजिक अन्यायावर प्रहार

एक भाबडी तरुणी व तिला फशी पाडणारा बनेल अप्रामाणिक तरुण-अशा दोनच व्यक्तींची ही कहाणी नाही. तिच्या दैवदुर्विलासाचेही अनेक पदर आहेत. आपले सामाजिक कार्यकर्ते, आपली वृत्तपत्रे, आपले डॉक्टर्स व वैद्यकीय क्षेत्र, आपले वकील आणि न्यायालये या सर्वांकडून मदत मिळण्याऐवजी त्रासच होतो आणि न्याय मिळण्याऐवजी असत्याचा व अन्यायाचाच पाठपुरावा केला जातो-याचेही कितीतरी नमुने या कथनात निर्हेतुकपणे येऊन जातात.

डॉ. रूपा कुलकर्णी यांना लताच्या प्रकरणाबद्दल माहिती मिळते. त्या त्यावर दोन-तीन महिन्यांनी लेख लिहितात. त्याचे शीर्षक असते : असे हे दुष्यंताचे नवे अवतार. हा लेख प्रसिद्ध होतो तो कधी ? तर नेमका लग्नाच्या दुसऱ्या दिवशी.

कोर्टाला विलासचा वकील खोटेच लिहून देतो की "लताला झालेले मूल वारलेले आहे. याची कोर्टाने नोंद घ्यावी." लताने दिलेले वकील कोर्टात तारखांना हजरच राहात नाहीत. तिला काही कल्पनाही देत नाहीत. न्यायाधीशांची समजूत अशी करून देण्यात येते की लताला केस लढवायचीच नाही आणि केवळ लग्नाची तारीख व अपत्यजन्माची तारीख यांतील अंतर पाच महिन्यांचे आहे एवढ्यावरून न्यायमूर्ती विलासच्या बाजूने निकाल देऊन मोकळे होतात. या सगळ्या दैवदुर्विलासाच्या वा विरोधाभासाच्या घटना मानवी जीवनातील गुंतागुंतीवर आणि बेभरवशावर प्रकाश टाकतात.

लताला सुप्रीम कोर्टात न्याय मिळेल; न मिळेल. तिच्या या कहाणीत वाङ्मयीन गुण वा कलात्मक घाट वगैरे कोणाला दिसतील, न दिसतील. परंतु 'लाव्हा'च्या रूपाने तिने आपल्या जीवनाचे, आपल्या वेडेपणाचे आणि वासनेचे, आपल्या मानसिक वादळाचे दर्शन घडवण्यात फार मोठे साहस दाखवले आहे हे नाकारता येणार नाही. तिच्याप्रमाणे अनेक मुली फसल्या असतील; खोट्या आश्वासनांना भुलल्या असतील; परंतु त्या निमूट राहून आपल्या नशिबाला दोष देत परित्यक्तेचे, लांछनाचे जीवन जगत राहिल्या असतील. लताने त्याबद्दल समाजाशी संघर्ष करायचे ठरवले; आणि न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. त्यासाठी मोठी किंमत मोजली. बदनामी सोसली. सुप्रीम कोर्टाने तिच्या बाजूने निकाल देऊन पितृत्व

हे वैद्यकीय कसोटीवर मान्य केले तर तीही शहाबानोप्रमाणे एक बदलत्या समाजप्रणालीची प्रेरक शक्ती ठरेल. या दृष्टीने तरी प्रत्येक जागरूक स्त्री-पुरुष वाचकांनी 'लाव्हा'चे वाचन केले पाहिजे; एका मनस्विनीचे दाहक मनोगत जाणून घेतले पाहिजे.

(लाव्हा : लेखिका- लता कामत, प्रकाशक- श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे ३०. पृष्ठे १६९ किंमत ४५ रुपये.)

□

# अक्षरगंधर्व : प्र. श्री. नेरूरकर

## *अक्षरगंधर्व सदानंद रेगे*

२१ जून १९२३ हा सदानंद रेगे यांचा जन्मदिवस. रेगे ही एक प्रतिभावंत पण लहरी; धडपडणारी पण अस्थिर अशी व्यक्ती होती. अचाट कल्पनाशक्ती, लेखनाचा विलक्षण झपाटा, शब्दांवर कमालीचे प्रभुत्व असूनही, स्वतंत्र लेखनापेक्षा भाषांतरात ते जास्त रस घेत; दीर्घ लेखनापेक्षा फुटकळ लेखनातच समाधान मानत. आपल्या ताकदीचा अंदाज असूनही, ती सर्वस्व पणाला लावून वापरण्याची टाळाटाळ करीत. त्यामुळे नवकथाकारांच्या पहिल्या पिढीतल्या-आघाडीच्या लेखकांबरोबरच कथालेखन जोमात करूनही त्यांना त्याचे श्रेय मिळाले नाही; त्यांचे कथासंग्रहही फार उशिरा प्रसिद्ध झाले. अक्षरवेल, गंधर्व, देवापुढचा दिवा हे काव्यसंग्रह नवकाव्याचे वेगळेपण जपणारे असूनही नवकवीतही रेग्यांचे नाव आवर्जून आणि सहजपणे घेतले जावे असे रुळले नाही. 'देवापुढचा दिवा' (१९६५) नंतरचा काव्यसंग्रह प्रसिद्ध व्हायला १५ वर्षे जावी लागली. काव्यातही पुढे भाषांतरावरच भर राहिला; जयकेतू, राजा इडिपस, ब्रान्द, बादशहा, गोची ही नाटकेही भाषांतरित; आणि चंद्र ढळला, मोती, बंड, तांबडे तट्टू, चंद्रोत्सव, ससेहोलपट वगैरे कादंबऱ्या भाषांतरितच. स्वतंत्र प्रतिभाशक्ती असूनही सदानंद रेगे हे भाषांतरातच का गुंतून पडत हा एक मानसशास्त्रीय प्रश्न ठरेल; कलानिर्मितीच्या प्रक्रियेत कलावंत दुसऱ्याच्या कृतीचा पांगुळगाडा घेऊनच स्वतःला अधिक सुरक्षित मानत असेल तर तोही एक कुतुहलाचा विषय ठरणारच.

### प्रतिभेचे चीज नाही

सदानंद रेगे यांच्या पुस्तकरूपाने प्रकाशित साहित्याचे प्रमाण त्यांच्या एकूण निर्मितीच्या मानाने अल्प आहे; आणि विपुल लेखन करूनही फार मोठी वा उच्च कलाकृती त्यांच्या हातून घडायची राहूनच गेलेली आहे, अशी खंत वाटते. त्यांच्याचसारखी लहरी प्रतिभाशक्ती असणाऱ्या चिं. त्र्यं. खानोलकरांना लेखनाची वर्षे त्यांच्या तुलनेने कमी मिळाली; पण खानोलकरांनी स्वतःला जे काही हवे होते ते सहजपणे लिहून टाकले.

भाषांतराकडे ते शेवटी शेवटी वळले. रेगे मात्र काव्य सोडल्यास भाषांतरावरच भर देत राहिले. त्यांच्या विपुल कथालेखनातील विविधताही अशी दीर्घ पल्ल्याची आहे की त्यातले स्वतंत्र किती आणि आधारित किती याचा उलगडा होतच नाही. त्यांच्या कथांचे विषय असे अफलातून असत की ते इथल्या समाजजीवनातून सहजगत्या येण्यासारखे वाटत नसत. त्यामुळेही कदाचित् रेग्यांच्या चांगल्या कथांनाही जे श्रेय मिळणे आवश्यक होते ते खुल्या मनाने दिले गेले नाही.

## अंतर्मुख

रेगे तसे कोणाच्या हाती न सापडणारे होते. इव्हेजिव्ह होते. ते शिताफीने कोणालाही चकवत. एखादी व्यक्ती फार जवळ येऊ लागली की सावध होत. वर्षानुवर्षे जवळपास राहणाऱ्यांनाही रेग्यांच्या आंतरिक खळबळीचे पूर्ण दर्शन घडल्याचा विश्वास क्वचित वाटे. रेगे यांनी रेल्वेतली अठरा वर्षांची नोकरी सोडून इंग्लिश घेऊन एम. ए. च्या वर्गात नाव घातले. मी देखील एम. ए. साठी मुंबईला गेलो. त्यामुळे दोन वर्षे आम्ही दररोजच वर्गात आणि नंतर डेव्हिड ससून लायब्ररीत भेटत असू. इकडेतिकडे भटकत असू. एकेका रात्रीत वीस-पंचवीस कवितांची भर त्यांच्या वहीत पडलेली असे; डेव्हिड ससूनच्या गार्डनमध्ये बसून त्या कविता वाचल्या जात.

## अनुवादांवर भर जास्त

'रहस्यरंजन'च्या संपादनातही रेगे लक्ष घालत. मी त्यांच्या आग्रहावरून टॉलस्टायच्या 'फॅमिली हॅपीनेस'चे भाषांतर करून दिले. मुंबईतल्या साहित्यिक विश्वाशी परिचय होणे त्यांच्यामुळे सुलभ झाले. १९६२ मध्ये महाराष्ट्र टाईम्स निघाले त्यातही रेगे यांची मुलाखत मी दिली. एम. ए. नंतर रेगे रुईया कॉलेजमध्ये प्राध्यापक झाले. नॉर्वेला जाण्याची संधी त्यांना लाभली. इब्सेनच्या नाटकांची भाषांतरे त्यांनी केली. ब्रान्द १९६३ मध्ये प्रसिद्ध झाले. राजगोपालाचारींचे रामायण (१९६३) रहस्यरंजनमधून क्रमशः येत होते. चंद्र सावली कोरतो (१९६३) मासा आणि इतर विलक्षण कथा (१९६५) हे कथासंग्रह, देवापुढचा दिवा (१९६५) हा काव्यसंग्रह, ज्याचे होते प्राक्तन शापित (१९६५) आणि बादशहा (१९६५) ही ओनीलची नाटके याच काळात प्रसिद्ध झाली. १९७४ मधले गोची हे अनुवादित नाटक सोडले तर १९८० पर्यंत रेग्यांचे एकही पुस्तक बाहेर आले नाही, परंतु या काळात नॉर्वे (१९७८), रशिया (१९७२) दौरे घडले. सोविएत देशचा नेहरू पुरस्कार मिळाला. नॉर्वेजिअन कविमित्र हेराल्ड स्वेदरूप यांनी 'सदानंद रेगे आणि मुंबई' हा दोन तासांचा दूरदर्शन चित्रपट तयार केला. ब्रांकुशीचा पक्षी, पँट घातलेला ढग, वृत्तपत्रे हे काव्यसंग्रह, १९८०-८१ मध्ये एकापाठोपाठ एक प्रसिद्ध झाले. सहसा सभासंमेलनांत भाग घेण्यास कांकू करणाऱ्या रेग्यांनी मुंबईच्या पर्यायी साहित्यसंमेलनातील कविसंमेलनाचे अध्यक्षपदही स्वीकारले.

२१ सप्टेंबर १९८२ रोजी ते हृदयविकाराने निधन पावले.

## प्रदीर्घ मुलाखत-पण विस्कळीत

रेगे यांच्या पाचव्या स्मृतिदिनी अक्षरगंधर्व हे एक वेगळ्याच फॉर्ममधले पुस्तक प्रसिद्ध झाले. दोनशे चाळीस पृष्ठांच्या या पुस्तकात रेग्यांची प्र. श्री. नेरूरकर व शरद मंत्री यांनी घेतलेली १३७ पृष्ठांची प्रदीर्घ मुलाखत; नेरूरकर यांच्या १९४१ ते १९४६ या काळातील दैनंदिनीतील उतारे (७० पृष्ठे) रेग्यांच्या व रेगेविषयक साहित्याची सूची अशी सामग्री आली आहे.

रेग्यांची सविस्तर मुलाखत नेरूरकरांनी १९८० मध्ये घेतली. रेग्यांच्या निधनाच्या एक वर्ष आधी. या मुलाखतीतून रेग्यांचे बालपण, रेग्यांचे शिक्षण, कुटुंबीय, आरंभीच्या नोकऱ्या, वाचन, सुरुवातीचे लेखन, परदेशातील दौरे, साहित्यविषयक मते, मित्र व परिचित, शिक्षण क्षेत्र-साहित्यक्षेत्र यातील गटबाजी वा कंपूशाही वगैरे अनेक विषय येऊन गेले आहेत. परंतु तरीही रेगे त्यातून पूर्णपणे गवसतात असे वाटत नाही. मुलाखत घेताना अधिक शिस्तबद्ध हवी होती; आणि छापतानाही ती नीट संपादित केली असती तर तिचा उद्देश सफल झाला असता. रेग्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अंतरंगात अधिक प्रवेश होऊ शकला असता. रेग्यांची काही विषयांवरची शेरेबाजी ही अधिक पारखून, घासूनपुसून घेता आली असती.

## आरंभीचे लेखन

या मुलाखतीतून अर्थातच रेग्यांच्या मित्रपरिवाराची, वाङ्मयनिर्मितीची, तत्कालीन वातावरणाची आणि साहित्यविषयक मतमतांतराची बरीचशी माहिती आपल्याला कळते. सुंदर अक्षर असणारे, चित्रे काढणारे पण पराभूत वृत्तीने जगणारे वडील, आणि तापट, एककल्ली आई. रेगे ११ वर्षांचे असताना वडील वारले. त्यांच्या मृत्यूला 'काळोखाची पिसे' मध्ये कथारूप मिळाले आहे. प्रख्यात गायक मोहन पालेकर हे रेग्यांचे मामा. शाळेत असताना ध्रुवावर एक नाटक लिहून सादर केले. पुढे छबिलदासमध्ये प्रवेश केला. तेथील काळे मास्तरांमुळे मराठीची गोडी लागली. १९४० मध्ये मॅट्रिक झाल्यावर ४२ मध्ये रेल्वेत नोकरीला लागले. 'मून इज डाऊन' या स्टाइनबकेच्या पुस्तकाचे प्रभाकर लाड या मित्रासमवेत भाषांतर केले. त्याचे ७५ रुपये मिळाले. १९४८ मध्ये लाडने आत्महत्या केली; सायनाईड घेऊन. (मरतानासुद्धा रोमँटिकली मेला-इति रेगे) धनुर्धारीत प्रभाकर पाध्ये रेग्यांच्या कथा छापू लागले. (१९४५) कौतुक करू लागले. सत्यकथेच्या दिवाळी अंकात रेग्यांची कथा आली. झंकारच्या कथापूर्ती स्पर्धेत दुसरे बक्षीस मिळाले. महात्मा गांधींच्या वधानंतर त्यांनी लिहिलेली कविता अभिरुचीने मुखपृष्ठावर छापली. (ओम् कृतंस्मर), विल्यम सारोयानच्या 'द मॅन ऑन द ट्रॅपिझ'चा मौजेने अनुवाद प्रसिद्ध केला. किंचित् काव्ये लिहून धमाल उडवली. कृष्णमूर्तींच्या प्रवचनांचे अनुवाद केले आणि त्यांच्यावर टीका

करणारे भडक लेखही लिहिले. श्रीकृष्ण पोवळे यांनी रेग्यांचा 'जीवनाची वस्त्रे' कथासंग्रह प्रसिद्ध केला, परंतु त्याची वाताहतच झाली. तो बाजारात यायच्या आधी फूटपाथवर आला.

## मित्र खूप मिळाले, पण–

रेग्यांना मित्र, चाहते खूप मिळाले दि. बा. मोकाशी, श्रीकृष्ण खाडिलकर, मंगेश पदकी, वि. ग. कानिटकर, दीनानाथ म्हात्रे, प्र. श्री. नेरूरकर, रमेश मंत्री, शरद मंत्री, हमीद दलवाई, अरविंद गोखले, राम सरदेशमुख, पु. भा. भावे, ग. रा. कामत, श्री. पु. भागवत, अनंत अंतरकर (हंसचे रेग्यांनी संपादनही एकदोन वर्षे केले होते !), रामदास भटकळ, चंद्रकांत पोवळे, दत्तू सरमळकर, श्रीकृष्ण पोवळे, श्रीराम कामत, अ. सी. केळुसकर, मंगेश पाडगावकर, भानू शिरधनकर, ज्ञानेश्वर नाडकर्णी, रंगा मराठे, बाळ ठाकूर, प्रभाकर गोरे, पु. ल. देशपांडे, मा. कृ. पारधी इ. इ. त्यांच्याबद्दलचे ओझरते उल्लेख या मुलाखतीत आले आहेत.

परंतु या मित्रांबद्दलचे रेग्यांचे एकूण निरीक्षण मात्र भ्रमनिरासाचे आहे. 'मित्र मला चांगले मिळाले, पण ते मित्र राहिले नाहीत. पुढे व्यवहारी माणसंच झाली सगळी. अजूनसुद्धा मला जर काही अडीअडचण लागली तर हे मित्र धावत येतील अशी गॅरंटी नाही... गरज संपल्यानंतर मैत्री संपते-' (पृष्ठ ३१) अरविंद गोखले यांच्याबरोबर जीवनाची वेगवेगळी अंगे बघायची म्हणून वेश्यांकडेही गेले. गोखल्यांनी त्यांच्या नावाचा उल्लेख आपल्या कथेत केला. तो उल्लेख अशा संदर्भात करायची गरज नव्हती असे रेग्यांना वाटले. त्यांचे संबंध ताणले गेले. आपण लोकप्रिय लेखक कधीच नव्हतो. पुस्तक काढले आणि खपले असे कधी झालेच नाही. हे कबूल करूनही ज्या प्रकाशकाने रेग्यांची बहुतेक पुस्तके काढली त्याची रेगे भलावण करतात ती बेजबाबदार म्हणून... ॲडव्हान्सव्यतिरिक्त रॉयल्टी मिळाली नाही म्हणून.

अशासारखी विधानेही या मुलाखतीत सरसहा आली आहेत. त्याची शहानिशा करून घेणारी प्रश्नोत्तरे नेरूरकरांनी केलेली नाहीत. त्यामुळे रेग्यांच्या अनेक मित्रांबद्दल गैरसमज होण्याची शक्यता आहेच. त्या मित्रांवर अन्यायही झालेला आहे. जयकेतू, राजा इडिपस, ज्याचे होते प्राक्तन शापित, बादशहा यांसारखी खपाची विशेष शक्यता नसलेली पुस्तकेही हौस म्हणून काढणाऱ्या पॉप्युलरवरील हे ताशेरे खटकणारेच आहेत. इतरही मित्रांबद्दल अशी एकांगी विधाने या मुलाखतीत आहेत, त्याबाबत अधिक चर्चा वा खुलासा तिथल्यातिथे करून घ्यायला हवा होता.

'त्यामुळे माझी इतरांसारखी बूज झालेली नाही.' टीकाकारांबद्दल रेग्यांची तक्रार आहे. "डोळस टीकासुद्धा माझ्या लेखनावर झालेली नाही. हे फार वेगळे लिखाण आहे; मुख्य प्रवाहातले हे लिखाण नाही... माझ्या कवितेवर जबाबदारीनं लिहिणं अवघड आहे; असे अवघड लिहिणारे लोक औषधालाही आपल्याकडे मिळत नाहीत." पुढे मात्र रेगे तुकाराम, हॉपकिन्स यांचा हवाला देऊन म्हणतात, 'पण जे काही असेल लेखकाचं ते लपू शकत नाही.

ते म्हणजे तुम्ही नाही तर तुमच्या बापाला देखील कॉग्निझन्स घ्यावाच लागेल' (पृष्ठ ४५)

## व्यक्तिमत्त्वाचे गूढ पैलू

रेग्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी अनेक विधानेही जागोजाग अभावितपणे आलेली आहेत.

'मी असा मनुष्य आहे की स्वभावतःच धर्मावर माझी निष्ठाच नाही आहे. त्याच्यामुळे मी ख्रिस्त मानतो पण ख्रिश्चॅनिटी मानत नाही.' (पृष्ठ ५१)

'ही धादांत खोटी शिक्षणपद्धती आहे. ही शिक्षणपद्धती नव्हे. ही खाटिकखान्याची प्रक्रिया आहे.' (पृष्ठे ७३)

'स्वातंत्र्यापूर्वीचा हा देश पुष्कळ स्वतंत्र होता. कोणत्या बाबतीत तुम्हाला स्वातंत्र्य मिळाले ? तुम्ही अधिक भिकारी झालात. अधिक भणंग झालात. जीवनामध्ये काही उरलं नाही. म्हणजे गंभीर माणसाला सुद्धा अजून काही जगण्यासारखे आहे असे कुठे वाटायला लागले काय ?... स्वातंत्र्यापूर्वी... जीवनाविषयी जी एक मोकळीक होती ती गेलीच.' (पृष्ठ ७५)

'मला देहाने जगायचे आहे. मरेपर्यंत जगत राहायचे आहे. कारण दुसरं गत्यंतर नाही. ही स्थिती प्रत्येक माणसामाणसाची आहे'(पृष्ठ ७६)

'मी माणसं तोडली नाहीत... कदाचित् माझ्या वाणीमुळे. वाणी इतकी प्रखर आणि ही आहे की मी तिला... मला हे कळतेय की हा मनुष्य दुखावला जातोय, पण मला अशीही धारणा असते की हा इतकी वर्षे मला ओळखतोय– या विषयाबाबत त्याचा माझा मतभेद आहे...' (पृष्ठ ८०)

'कलावंत म्हणून मी माझं काम प्रामाणिकपणानं करणं ही माझी बांधिलकी आहे. माझी बांधिलकी कुठे असली तर ती माझ्या कलेशी आहे... प्रामाणिकपणा म्हणजे– शब्द हे माझे माध्यम आहे आणि मला हे शब्द असे एकत्र आणायचे आहेत की त्या शब्दांद्वारे जो अनुभव मला व्यक्त करायचा आहे त्याला एक वेगळे डायमेन्शन येईल.' (पृष्ठ १०१)

'मी भौतिकदृष्ट्या सुखी नाही. कारण मला पैशांच्या विवंचना आहेत. त्या विवंचना माझ्या बेजबाबदारीतून निर्माण झाल्या असे नाही... वयाच्या सोळाव्या वर्षापासून एकही दिवसाची रजा न घेता मी काम करतोय.' (पृष्ठ ११३)

## हुलकावणी

सदानंद रेगे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे आणि साहित्याकडे अधिक जाणीवपूर्वक पाहणारा तरुण लेखककवींचा एक वर्ग मुंबईत कार्यप्रवण आहे. रेग्यांनी अखेरच्या दिवसात अनेक होतकरू कविलेखकांना जवळ घेतले. मार्गदर्शन केले. उत्तेजन दिले. त्यामुळे रेगे हे त्यांना प्रेषित वाटतात. 'अक्षर गंधर्व' मधील मुलाखतीमुळे व

दैनंदिनीतील उताऱ्यांमुळे रेग्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू स्पष्टपणे जाणवण्याची सोय झाली आहे. परंतु दोनशे पृष्ठांचा पसारा मांडूनही रेग्यांनी आपल्याला हुलकावणीच दिली आहे अशी भावना अखेर मनात उरते. त्यांच्याच शब्दात सांगायचं म्हणजे 'नाही रे नाही. या जगातलं नाटक अजून संपलेलं नाही.'

(अक्षर गंधर्व : प्र. श्री. नेरूरकर, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४, पृष्ठे २४०, ऐंशी रुपये.)

□

# एक मार्ग, अनेक वाटा : बॅ. अप्पा पंत

## *पंतप्रतिनिधींचा विश्वव्यापी परिवार : एक विहंगम वेध*

अप्पासाहेब पंत. इंग्लंडमधील भारताचे हाय कमिशनर, नॉर्वे, इटली, इंडोनेशिया वगैरे देशांतील राजदूत, सिक्किम-भूतान येथील भारताचे राजकीय प्रतिनिधी (एजंट), आफ्रिकन देशातील कमिशनर-जनरल. १९५१ ते १९७५ अखेर परराष्ट्रव्यवहार खात्यांत अशी विविध पदे भूषविणारे आणि औंधच्या पंतप्रतिनिधी घराण्याचा राजनैतिक वारसा समर्थपणे जगभर लौकिकपात्र ठरविणारे अप्पासाहेब केवळ मुत्सद्देगिरीमुळेच गाजले असे नव्हे, तर विज्ञानाच्या चौफेर प्रगतीने जगाच्या प्रगत-अप्रगत देशांवर पसरलेल्या मायाजालाचे जागरूकपणे दर्शन घेऊन 'हे विश्वचि माझे घर' या वृत्तीने मानवी जीवनाच्या भवितव्याचा सर्वांगीण वेध घेणारे एक चिंतनशील भाष्यकार म्हणून देश-परदेशात संचार करीत राहिले. औंधचे कलाप्रेमी राजे श्रीमंत भवानराव पंतप्रतिनिधी यांचे हे दुसरे पुत्र. १९३७ ते ४१ इंग्लंडमधील ऑक्स्फर्डला अध्ययन, औंधमधील जनतेला लोकशाहीच्या प्रयोगात स्वातंत्र्यपूर्व काळातच सामील करून घेणारे लोकाभिमुख प्रशासक, जवाहरलाल नेहरूंचे घरोब्याचे स्नेही, जे. कृष्णमूर्ती, जोमो केनयाटा, दलाई लामा, पंचम लामा, सुकार्णो, किंग्सले मार्टिन वगैरेंच्या निकट प्रवेश मिळविणारे विश्वासपात्र सुहृद अशा विविध रूपांतले अप्पासाहेब पंत म्हणजे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व आहे. आज त्यांचे वय ७६-७७ असले तरी नवनव्या योजना आखण्यात, नवनव्या कल्पना मांडण्यात आणि त्या तरुणसुलभ चपळाईने पार पाडण्याच्या त्यांच्या झपाट्यात तसूभरही उणेपणा आलेला नाही. व्याख्यानांसाठी भारताच्या विविध भागांत तसेच परदेशांतही त्यांचे दौरे सतत चालू असतात. एकापाठोपाठ एक विचारपरिप्लुत ग्रंथही त्यांच्या लेखणीतून बाहेर पडत असतात. आणि अप्पासाहेबांचे वैशिष्ट्य असे की, ते जेथे जातात, तेथे चैतन्याचे गुलाबपाणी शिंपडून अवघे वातावरण दरवळून टाकतात. औंधच्या म्युझियमवरील दूरदर्शनच्या एका अनुबोधपटाच्या तयारीच्या निमित्ताने मध्यंतरी त्यांची गाठ पडली. तेव्हा त्या म्युझियममधील महत्त्वाच्या कलाकृतींचे सौंदर्यविशेष ते इतक्या बारकाव्यांसह विशद करीत होते की, मला आश्चर्यच वाटले ! आणि

ते ऐकणारा मीच एकमेव श्रोता होतो. त्यामुळे तर त्यांच्या त्या कृपादृष्टीची अपूर्वाई अधिकच जाणवत होती.

## परराष्ट्रसेवेत दाखल

अप्पासाहेब पंत १९४८ मध्ये औंधमधून बाहेर पडले आणि भारताच्या परराष्ट्रसेवेत प्रविष्ट झाले. अवघे विश्वची त्यांचे घर झाले. देशोदेशी राजदूत म्हणून त्यांचे वास्तव्य झाले एवढ्याच मर्यादित अर्थाने हे विधान येथे मला करायचे नाही. त्यांच्या अपत्यांनी, नातवंडांनी, जवळच्या नातलगांनी विविध प्रांतांच्या, विविध देशांच्या तरुण-तरुणींशी विवाह-संबंध जोडून त्यांच्या परिवाराला एका विश्व-कुटुंबाचे वैभव प्राप्त करून दिले आणि देशोदेशी त्यांना रक्ताच्या नात्यापेक्षाही जवळच्या नात्याने स्नेही लाभले, या अर्थानेही हे विधान येथे अभिप्रेत आहे.

## आफ्रिकन दत्तक वडील

१९५१ मध्ये नैरोबीला अप्पासाहेब पंत सहकुटुंब गेले असताना केनियातील त्या वेळचे नेते कोईनांगे यांनी आपल्या भल्या मोठ्या शेतावर नेऊन तेथील कायद्याप्रमाणे अप्पासाहेबांना दत्तक घेण्याचा विधी पार पाडला. 'अप्पासाहेबांचे स्वागत मी हिंदुस्तानचे प्रतिनिधी म्हणून करीत नाही, माझा मुलगा म्हणून करतो. अप्पा व त्यांच्या कुटुंबियांना माझ्या जमिनीतील रास्त हिस्साही माझी मुले बिनतक्रार देतील, याची ग्वाही मी देतो.' टांगानिकाच्या स्वातंत्र्यउत्सवात भाग घेण्यासाठी अप्पासाहेब १९६१ मध्ये गेले तेव्हा दरम्यान वारलेल्या कोईनांगे यांच्या समाधीवर पुष्पचक्र वाहण्यासाठी मुद्दाम गेले आणि त्या वेळी कोईनांगे परिवाराने मोठ्या भावाचे करावे तसे त्यांचे अगत्यपूर्वक स्वागत केले व त्यांना त्यांच्या वाटणीची जमीनही दाखविण्यासाठी नेले.

## मुलाचे नाव पंत ठेवले

ऱ्होडेशियात स्थायिक झालेले विठ्ठलभाई पटेल हे गुजराती, भक्त पाटीदार समाजातील धनाढ्य व्यापारी, कडक सोवळे-ओवळे पाळणारे, सनातनी ब्राह्मणाच्या घरीही पाणी न पिणारे. परंतु अप्पासाहेबांशी मात्र त्यांचे मैत्र जुळले. अप्पासाहेबांच्या पत्नी अक्कासाहेब यांनी विठ्ठलभाईंच्या पत्नीला विचारले, "तुम्हाला मुले किती आहेत ?" तेव्हा तिने उत्तर दिले, "लग्नाला पाच वर्षे झाली, पण अजून पाळणा हललेला नाही." तेव्हा अक्कासाहेबांनी सहज म्हटले, "यंदा तुला मुलगा होईल." आणि खरोखरच वर्षाने त्या बाईला मुलगा झाला. त्याचे नाव पटेल दांपत्याने भास्करपंत असे ठेवले. भास्करपंतांच्या पत्नीलाही लवकर मूलबाळ झाले नाही. त्याच्या पत्नीलाही अक्कांनी तसाच आशीर्वाद दिला आणि सप्टेंबर १९८६ मध्ये भास्करपंत पटेल यांनाही 'अर्जुनपंत' झाला. औंधच्या पंत घराण्याच्या

संस्कार-संहितेचा आणि पटेल घराण्याचा पूर्वजन्मीचा काही ऋणानुबंध होता का, असा प्रश्न अप्पासाहेबांना पडतो.

## भूतानचे राजे : अप्पांचे मित्र

न्यू स्टेट्समन अँड नेशन या प्रभावशाली साप्ताहिकाचे संपादक किंग्स्ले मार्टिन हे इंग्लंडमधील एक बडे प्रस्थ. १९५१ पासून अप्पांचे व त्यांचे गोत्र जुळले. १९६८ मध्ये कैरो येथे अप्पासाहेबांकडे वास्तव्यासाठी आले असताना किंग्स्ले मार्टिन यांचा रात्री जेवणानंतर अचानक मृत्यू झाला. हा सह-पथिक असा अर्ध्या वाटेवरून आपल्या घरी जावा, याचेही गूढ अप्पासाहेबांना होतेच.

भूतानचे राजे जिग्मे दोरजी वांगचूक यांना अप्पासाहेब दिल्लीला घेऊन आले, परंतु त्यांना दिल्लीतील परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्यांनी तुच्छतेने वागवले. ते संतापून दौरा अर्धवट टाकून जाण्याची तयारी करू लागले. ही बातमी अप्पांचे जवळचे मित्र पृथ्वीचंद बक्षी यांनी दिली. अप्पांनी लगेच जवाहरलालजींशी संपर्क साधून या गंभीर स्थितीची कल्पना दिली. नेहरूंनी भूतानच्या राजांना बोलावून, दोन तास त्यांच्याशी चर्चा करून त्यांच्या मनातील शंका दूर केल्या. "भारताचा पंतप्रधान म्हणून मी आपल्याला भूतान-भारत संबंधांबद्दल लेखी आश्वासन देण्यास तयार आहे. या माझ्या लेखी आश्वासनाचा मसुदा तुम्हीच तयार करून द्या. मी त्यावर आनंदाने सही करीन." असे नेहरूंनी सांगितले तेव्हा भूतानच्या राजांना गहिवरून आले. ते म्हणाले, "भूतानच्या वतीने या संबंधात मी भारताला कोणती आश्वासने द्यावीत, याचा मसुदा आपणच तयार करून मला द्या. मी त्यावर आनंदाने सही करीन." ह्या दोन्ही पत्राचे 'ड्राफ्ट' करायची कामगिरी अप्पासाहेबांनीच पार पाडली.

## मॉरिस काका

पोलंडमध्ये जन्मलेले मॉरिस फ्रीडमेन हे ज्यू इंजिनिअर. यहुदी व ख्रिश्चन धर्मग्रंथांचा अभ्यास करून समाधान न लाभल्याने ते १९१८ मध्ये वेद-उपनिषदे यांकडे वळले. १९२३ मध्ये जे. कृष्णमूर्तींजवळ गेले, पुढे साठ वर्षे ते जे. कृष्णमूर्तींसमवेत वर्षातले दोन महिने तरी घालवीत. मॉरिसकाका औंधमधील 'स्वावलंबी स्वराज्य' जनतेच्या हाती देण्याच्या प्रयोगाचे प्रवर्तक होते. स्वतंत्रपूर ही शिक्षा झालेल्या कैद्यांची स्वतंत्र वसाहत स्थापन झाली, तीही मॉरिसच्या पुढाकारानेच. (दो आँखे बारह हाथ). मॉरिसमुळेच अप्पासाहेब पंतांचा रमण महर्षी, जे. कृष्णमूर्ती, निसर्गदत्त महाराज, महर्षी महेश योगी, गंगटोकमधील सद्‌गुरू, लामा, खेंच रिपोचे आणि संत तुलसी रिपोचे यांच्या निकट जाण्याचा मार्ग सुलभ झाला. १९८३ मध्ये मृत्यूपूर्वी मॉरिसने अप्पासाहेबांना एकांतात सांगितले, "अप्पा, मला आजूबाजूला तेजच तेज दिसते आहे. कानात दिव्य संगीत गुणगुणते आहे. शरीर हलके झाले आहे. औषधे देऊन या कुजलेल्या निरुपयोगी शरीरात मला का डांबत आहात? मला माझा

महामार्ग स्पष्ट दिसत आहे. माझी या शरीरात राहून करण्याची वाटचाल संपलेली आहे..."
या मॉरिसकाकांचे नाव आजही औंधच्या आसपासच्या खेड्यांपाड्यांतून आदराने घेतले जाते.

## रॅल्फ व्हिटलिंगचे माहेरघर : औंध

हिंदू संस्कृतीविषयी व भारताविषयी प्रेम असणाऱ्या रॅल्फ व्हिटलिंगला औंध हे माहेरघर वाटते. श्री भवानी म्युझियमसाठी त्याने ६ हजार पौंडांचा (सव्वा लाख रुपयांचा) ट्रस्ट स्थापन केला आहे. लीड्स येथील फ्रॅन्सिस वॉटसनची आणि अप्पासाहेबांची दोस्ती रॅल्फमुळे जुळून आली. अहिंसेपासून अद्वैतापर्यंत राजकारण, समाजकारण, चित्र-शिल्प-साहित्य या सर्वांसंबंधी सखोल व यथार्थ ज्ञान मिळवण्याची प्रेरणा अप्पासाहेबांना फ्रॅन्सिसकडून मिळाली. पीटर राइटची व अप्पांची घसट ते ऑक्सफर्डला असल्यापासून. हा पीटर पुढे भारतात आला. गुप्तचर खात्यात काम करून ब्रिगेडिअर बनला. इंडियन स्कूल ऑफ आफ्रिकन स्टडीज या दिल्लीतील संस्थेचा डायरेक्टर बनला. त्याच्या मुलांचे गॉडफादर अप्पा हेच आहेत.

## मुलाची कॅनेडियन पत्नी

अप्पासाहेबांचे चिरंजीव अनिकेत (जन्म १९४५) यांनी कॅनडातील हेलन अल्बाने झे हिच्याशी विवाह केला. हेलनचे पूर्वज मूळ युगोस्लाव्हियाच्या दक्षिणेकडील व ग्रीसच्या उत्तरेकडील अल्बेनियाचे रहिवासी. तेथून हेलनचे आजोबा इटलीत आले. त्यांचे द्राक्षमळे होते. तेथून हेलनचे आई-वडील कॅनडात आले. नायगारा धबधब्यावर कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करून हेलनच्या वडिलांनी पैसा मिळवला आणि टोरांटोला घर बांधले. तेथेच अनिकेत आणि हेलन यांची गाठ १९७३ मध्ये पडली आणि आई-वडिलांना पूर्वसूचना न देताच त्यांनी लग्नही केले. या दांपत्याला अमेया व अरुण ही मुले आहेत.

अप्पासाहेबांची एक कन्या अवलोकिता आणि पुण्यात स्थायिक झालेल्या विस्थापित पंजाबी नंदा कुटुंबातील विजय यांचा प्रेमविवाह १९७७ मध्ये झाला. नंदा-टुली-कौडा-पंत परंपरेचा वारसा या दांपत्याच्या मुलांना लाभला आहे.

## दलाई लामांशी चर्चा

गंगटोकमध्ये साडेसहा वर्षे अप्पासाहेब भारताचे पोलिटिकल एजंट म्हणून राहिले. या काळात तिबेटला चार-पाच वेळा भेटी झाल्या. १९५७ मध्ये दलाई लामांच्या कृपेने व चिनी अधिकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी अनेक तिबेटी गुंफांना भेटी देऊन संत-साधू व लामा यांच्याशी मोकळेपणाने चर्चा केली. गुरू ढुशी रिपोचे यांनी आपल्या देहत्यागापूर्वी एकदोन महिने अगोदर अप्पासाहेबांना एकांतात शून्यत्वाचा (एम्प्टीनेस, नथिंगनेस) अनुभव दिला.

गुरू खैर दसेरिपोचे यांनी मनबुद्धीच्या आकलनात कधी येऊ न शकणाऱ्या अशा तत्त्वाची प्रचीती अप्पासाहेबांना दिली. संस्कार व तपाचरण यांमुळे निर्माण होणाऱ्या स्पंदनांनी मन-बुद्धी-देह यातील सूक्ष्म-सूक्ष्मतर व सूक्ष्मतम स्तरावरील अणू-परमाणूंचे व्यवस्थित संचालन होते, ती स्पंदने अधिक कार्यक्षमतेने काम करू लागतात, चैतन्य वाढते. त्यामुळे तुमच्यातून तेज-सत्य-शक्ती-तत्त्व यांचे स्फुरण अनिर्बंधपणे होणे सुलभ जाते, आणि नंतर आनंदाचा प्रत्यय येतो असेही अप्पासाहेबांना जाणवले. असा आनंद की, जो दुसऱ्या कोणावर, वस्तूवर वा स्तुतीवर अवलंबून नसतो. हा पूर्ण आनंद असतो. त्यात अहंकार नसतो, पण आत्मविश्वास असतो. शरीर-बुद्धी-मन यांच्या व्यापाराचे फक्त अवलोकन हा चैतन्यदायी आनंद आपल्यापुढे ठेवत असतो.

### नातलग ? छे ! सहयात्रिक

अप्पासाहेबांनी आपली पंचाहत्तर वर्षांची वाटचाल पूर्ण झाली त्या वेळी आपल्या या विश्वात्मक कुटुंबाचा एक धावता आढावा घेण्याचा संकल्प सोडला आणि आई, वडील, भाऊ, बहीण, पतिपत्नी या नात्यांपेक्षा, सत्यं-शिवं-सुंदरम शोधासाठी बाहेर पडलेले आपण सारे सहयात्रिक आहोत अशी कल्पना करून आपल्या विशाल कुटुंबातील निरनिराळ्या शाखांच्या कथा संग्रहित केल्या आहेत. अनेक वाटा असल्या तरी महामार्ग एकच, अशी त्यांची श्रद्धा आहे. सत्याचा खरा शोध घेता यावा यासाठीच ही नाती जडतात, प्रपंचाचा गाडा ओढत असताना आपली मूल्ये, भावना, बुद्धी यांचा कस लागतो. हीण कमी कमी होऊन साफसफाई होत जाते. पलायनवादाचा मोह कमी होत जाऊन साऱ्या सुखदुःखांना तोंड देण्याची सिद्धता होत जाते, तसतशी नव्या अनुभूतींच्या स्वीकाराची आपली तयारी होत राहते. ही तयारी खरी की फसवी याचीही कसोटी पाहणारे प्रसंग येतात. आजार, मृत्यू, भांडणे, चिडणे, शत्रू-निंदक, विरोध, वंचना, बदनामी, नुकसानी, अधिकार, संपत्ती, सौख्य, संतती, मानमान्यता, आढ्यता, अहंकार अशा अनेक कसोट्या. वाटा वेगळ्या असल्या तरी ब्रह्मजिज्ञासेकडे आणि आंतरिक सुखसाधनेकडे जाणारा महामार्ग एकच आहे आणि त्यावरून वाटचाल करताना सहयात्रिक भेटतच राहतात. हे सारे सहयात्रिक एका मोठ्या कुटुंबाचे, तुमचे नातलग असतात, असा विस्तारित कुटुंबाच्या संकल्पनेचा उलगडा अप्पासाहेब पंत करतात.

### स्मृतिकथांची साखळी

आता हे सांगण्यासाठी अप्पासाहेब पंतांनी जो वाङ्मयीन प्रकार निवडला आहे तो स्मृतिकथेचा. त्यांनी स्वतःच आरंभी नव्वद पृष्ठांत आपल्या पंत घराण्याच्या गेल्या चारशे वर्षांचा इतिहास सांगितला आहे. शेवटी परदेशातील आपल्या समानधर्मीय मित्र-सुहृदांच्या जीवनकथांची जोड अप्पांनी दिली आहे. ॲलेक्स हेलीने 'रूटस' मध्ये आपल्या पूर्वजांच्या

अनेक पिढ्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. तसाच काहीसा हा प्रयत्न आहे. १६३० मध्ये किन्हई, भाडळे, हिवरे गावच्या त्र्यंबकपंत कुलकर्ण्यांना झालेला पहिला मुलगा परशुराम हा पहिला पंतप्रतिनिधी, येथपासून भवानराव (१९१०-१९५१ पर्यंतचे राजे) पंत प्रतिनिधींपर्यंतच्या राजकीय चढ-उतारांची कहाणी वस्तुस्थितिनिदर्शक तपशिलांनिशी निवेदन केली आहे. १९५१ नंतर मात्र ही कहाणी एका कुटुंबाची न उरता, जे जे प्रवाह या घराण्याशी निगडित झाले त्या सर्वांची ही कहाणी बनली.

## वेगळ्या ढंगाची निर्मिती

ही कहाणी आपल्या विसाव्या-एकविसाव्या शतकाच्या वैज्ञानिक झपाट्याच्या काळात जगणाऱ्या नातवंडांना रुचेल/पचेल का हा प्रश्न त्यांताही पडत आहे. पण त्यांना ही कहाणी माहिती असणे आवश्यक आहे असा पंतांचा आग्रह आहे. तुमच्या पेशीसमुच्चयावर पूर्वपरंपरांचे संस्कार असतात. पणजोबा-आजोबांचेही संस्कार छापले (प्रोग्रॅम्ड) गेलेले असतात. तुम्हाला मी कोण असा प्रश्न जेव्हा पडेल तेव्हा हे सर्व संस्कारांचे भान उत्तरासाठी उपयुक्त ठरेल. पेशीसमुच्चय आणि संस्कार यांचे व्यवस्थीकरण करण्यात यश आले, तर त्यांचा वापर उत्तम रीतीने करता येईल व जीवन पुरुषार्थपूर्ण, सुखी समाधानी होऊ शकेल असा त्यांचा दावा आहे.

या पुस्तकाचे दोन भाग आहेत. एका भागात कुटुंबियांचे केवळ फोटो दिले आहेत. दुसऱ्या भागात आठवणी. टंकलिखित मूळ प्रतीवरून प्रतिरूप मुद्रित केलेले हे साडेतीनशे पृष्ठांचे पुस्तक. एका वेगळ्या ढंगाच्या निर्मितीमुळे ते लक्षवेधक ठरते. अप्पासाहेब पंतांची औंधच्या यमाई देवीवर, जगदंबेवर पूर्ण श्रद्धा आहे. वडील राजे भवानराव यांनाही ते देवासमान मानतात. त्यांच्या वारशाचा त्यांना वाटत असलेला अभिमान पानोपानी प्रकट होतो. तरीही आपल्या आत्मरूपाचा शोध घेण्याची त्यांची प्रक्रिया निरलसपणे चालूच राहते. आपल्या विस्तारित कुटुंबाची कहाणी अशा प्रकारे संकलित करण्याची कल्पना स्मरणिकेच्या पातळीवरच न रेंगाळता अधिक व्यापक अधिष्ठान तिला लाभल्यामुळे आकर्षक ठरते. अप्पासाहेबांच्या व्यक्तित्वाचे अनेकविध रंग त्यातून प्रकट होतात आणि आपले कुतूहल अधिक वाढवतात.

(एक मार्ग अनेक वाटा (वाटेत भेटलेले काही प्रवासी) संपादक जनुभाऊ कुलकर्णी, प्रकाशक : बॅ. अप्पासाहेब पंत, भांडारकर रस्ता, पुणे ४. किंमत दिलेली नाही.)

□

## स्वाध्याय : सरोजिनी बाबर

### *कर्तृत्वपूर्ण जीवनाचं दिलखुलास आत्मकौतुक*

'माझं मराठमोळं साधंभादं ध्यान बघून अन् गावाकडची बोलण्याची धाटणी ऐकून मी आहे तरी कुणाची कोण याबद्दलची उत्सुकता अनेकांच्या मनात डोकावते. त्यातून पुण्यात राहायचं अन् सांगली-कोल्हापूरच्या चालीरीतींचं आख्यान लावायचं ह्या माझ्या स्वभावधर्माचंही कोडं कितीकांना! शिवाय मी अविवाहित. ना नोकरी ना व्यवसाय. उठता-बसता पदरमोडीनं सार्वजनिक कामात रमणारी... हिचं चालतं तरी कसं अन् हिला पाहतं तरी कोण ? म्हणताना म्हटले सांगून टाकावं आपल्या एकी खरं खरं न व्हावं मोकळं.. बघता बघता मालेनं केवढी आघाडी मारली त्याची पावती म्हणजे हे चारशे पन्नासावं प्रकाशन.' अशा आरंभीच्या प्रास्ताविकातच कैफियत देऊन डॉ. सरोजिनी बाबर यांनी आपल्या जीवनावर एक तृप्त नजर टाकण्यासाठी, 'स्वाध्याय'चा प्रपंच मांडला आहे.

### कौतुकभरल्या दृष्टीनं बघितलेलं जग

सरोजिनीबाईंचे वडील. कृ. भा. बाबर प्राथमिक शिक्षक, शिक्षण-साहित्य-समाजकारणात रस घेणारे. लेखनात रमणारे. सरोजिनीबाईंना त्यांनी मुलासारखंच वाढवलं. पोलियोनं एका पायात अधूपण आलेलं असूनही सरोजिनीबाईंनी एम.ए, पीएच.डी. पर्यंत मजल मारली. माटे मास्तरांची ही लाडकी विद्यार्थिनी. यशवंतराव चव्हाणांनी तिला बहीण मानलं. आमदारकी-खासदारकी दिली. लोकसाहित्य समितीच्या अध्यक्षपदी स्थानापन्न केलं. लोकगीतांची गोड गायकी अन् पाकशास्त्राची आवड... त्यामुळेही मोठा मित्रपरिवार अन् चाहता वर्ग मिळाला. समाजशिक्षण मालेचं अडतीस वर्षे संपादन करून साडेचारशे पुस्तकं प्रसिद्ध करून, या प्रदीर्घ वाटचालीकडं कौतुकभरल्या डोळ्यांनी बघून संतोष पावणारी... एखाद्या परीकथेसारखं स्वतःच्या आयुष्याकडं अद्‌भुतरम्य नवलाईनं बघणारी... जणू काही सिंड्रेलाच.

## आजन्म देशसेवेची प्रतिज्ञा

आत्मकौतुकानं ओसंडून वाहणारं हे निवेदन म्हणजे तृप्त कर्तृत्ववान, कार्यक्षम जीवनाची धावती स्मरणसाखळीच. सुरुवातीलाच त्या आठवण देतात ती आपल्या दीड-दोन वर्षे वयाच्या वारलेल्या भावाची. त्यामुळं भाऊ नसल्याचं मोठंच दुःख उरी बाळगून त्या जगत राहिल्या. कदाचित त्यामुळंच यशवंतराव चव्हाणांसारखे अनेक भाऊ त्यांनी जोडले. भावाच्या मृत्यूमुळं बी.ए. च्या वर्गात असणाऱ्या सरोजिनीबाईंना 'जगून काय करायचं' असंही वाटून गेलं; परंतु सुभाषचंद्रांसमोर 'लग्न करणार नाही, नोकरी करणार नाही, देशसेवेला वाहून घेऊ' अशी शपथ घेतलेली असल्यानं आपण व्रतस्थ आहोत असाही अहंकार होताच. म्हणून मनाला समजावून अभ्यास केला. मराठीत पहिला नंबरही मिळवला.

## वडिलांचा प्रभाव

वडिलांचा प्रभाव खूप. तेच त्यांचे दैवत. आजही सरोजिनीबाईंशी पाच-दहा मिनिटं बोललं तरी त्यात त्यांच्या अण्णांचा उल्लेख येणार. अण्णांनी अशी शिकवण दिली. अण्णांनी असं सांगून ठेवलंय. कुणाला काही मागायचं नाही; दुसऱ्याचं बघून उसासायचं नाही, असेल त्यात भागवायचं. आपलं घर वेगळं आहे... त्याच प्रेमळ धाकात बाई अजून राहताहेत. आजोळघरातल्या खेड्यापाड्यातल्या गमती-जमती; नावडतीच्या राजपुत्रागत आपण जंगी पराक्रम गाजवावा ही मनात जागलेली ईर्ष्या, साध्या भातुकलीच्या खेळातही उडणारा तालेवारी थाट, लाडाची लाडाबाई, खुळाबाई, वेडाबाई म्हणून होणारं कौतुक. पुण्यातल्या भटजी कॉलेजात 'लई' शब्द वापरल्याबद्दल झालेली बाकावर उभं राहण्याची शिक्षा. त्यातून 'त्याच बोली भाषेत लिहीत राहणार– कोण काय करतं बघू' हे स्वीकारलेले आव्हान, संस्था चालविणारे ब्राह्मण, सत्तेपुढं शहाणपण नाही हा अनुभव. ब्राह्मणांबद्दलचा हा राग त्यांच्या मनात आजही आहे.

बालवयातल्या काही 'गमतीदार' कल्पनाही या निवेदनात नकळत येऊन जातात. 'नवऱ्यानं रागाच्या भरात विहिरीत फेकली पोरीला तर मरायला नको म्हणून घरातल्या सगळ्या पोरींना त्यांनी पोहायला शिकवलेलं.' हे महादू मामाबद्दल काढलेले उद्गार. नवरा रागावतो, बायकोला विहिरीत ढकलतो, तेव्हा त्यांनी मरू नये ही सारी गृहीतकृत्ये बालमनात कशी घट्ट बसलेली असतील. ग्रामीण जीवनात त्या काळी हेच संस्कार मुलांच्या मनावर होत असणार, हीच मूल्ये रुजत असणार. अर्थात अशी काही निरीक्षणे अगदी अभावितपणे येऊन जातात; परंतु त्यांचा आपल्यावर उमटणारा ठसा हा आपली उदारमतवादी गृहीतकृत्ये उन्मळून टाकणारा असतो.

## वाकडं बघायची कुणाला टाप होणार नाही

वडिलांनी सरोजिनीबाईंना स्वावलंबी होण्याला आणि निर्भयपणानं जगायला शिकवले. वडील वारले आणि त्यांचा भरभक्कम आधारवृक्षच उन्मळून पडला. त्यांचं बालपण हरवलं गेलं. 'पोरकेपणा आला म्हणण्यापेक्षा प्रौढपणा धारण करावा लागला.' पण त्यापेक्षाही वडील बजावून सांगताहेत की, 'तू रडत बसलेली मला चालणार नाही. मनानं खंबीर राहा. ऊठ, कामाला लाग. कासोटा घट्ट असू दे. टाप नाही होणार कुणाची तुझ्याकडे वाकडे पाहायची.' घर चालवायची जबाबदारी पत्करली. शरीराने नसले तरी मनाने आण्णा– म्हणजे वडील– अवतीभोवती वावरत आहेत हा त्यांचा अजूनही अनुभव आहे.

गरजा कमी. लेखनातून होणारी प्राप्ती, शेतीतून येणारं तुटपुंजं उत्पन्न, खासदारकीचं पेन्शन, यामुळे त्यांचं एकूण जीवन सुखावह आहे. 'अरे, हिला नवरा नाही, मुलगा नाही. मग हिचं पाहतं कोण ? हिचं तर नेहमीच हसतमुख वागणं, बोलणं ! हिचं भागतं तरी कशात ?' असे लोक बोलतात. त्यावर सरोजिनीबाईचं उत्तर एकच. 'झाकली मूळ सव्वालाखाची. मीच नाही का भरभक्कम ?' मला कुणाचं काही नको असतं. माझी आगळीवेगळी श्रीमंती... माझ्या ध्येयधोरणाशी इमान राखील अशाच कामात स्वतःला झोकून दिलेली. पोटभर वाचावं अन् मनसोक्त लिहावं हा माझा पिंड. 'लोकगीतं गावीत आणि सुरावटीत धुंद व्हावं हा माझा विरंगुळा. घर माझं निर्मळ ढगावाचून आभाळ असं आपण वागलं, बोललं पाहिजे हे आपले ब्रीद.'

## आत्मकौतुकाची लज्जत वाढवणारे किस्से

'स्वाध्याय'मध्ये या आत्मकौतुकाची लज्जत वाढवणारे आणखीही काही किस्से आहेत. दिल्लीला खासदार असताना इंदिरा गांधी त्यांना निरोप पाठवतात : 'मला पुणेरी थाटाचं जेवण हवंय.' सरोजिनीबाई सरळ पुण्याला येऊन आईकडून पुरणपोळ्या करून नेतात. पण ऐनवेळी इंदिराजींचा दौरा निघतो. त्यामुळे त्या येत नाहीत. मग भेटेल त्याला आमंत्रण देऊन पार्टी पार पडते. ग. दि. माडगूळकर त्यांना दिवाणसाब म्हणतात; आणि एकदा एका 'चालू' पोरीबरोबर फिरताना बघितल्यावर चांगलेच खडसावतात. घरी आणून पोचवतात. तर सरदारगृहात एका अशाच कोणा बाईच्या शेजारी त्या जेवायला बसतात. बाबूराव पेंढारकर त्यांना ताटावरून उठवून खोलीत नेतात.

## डाकूंच्या प्रदेशातून रेल्वे-प्रवास

एकदा फ्रंटियरने दिल्लीहून येत असताना पावसामुळे रेल्वे भोपाळमार्गे म्हणजे डाकूंच्या प्रदेशातून न्यावी लागते; तेव्हा चौदा तास लेट होणाऱ्या गाडीमध्ये खाण्यासाठी त्या ज्या सामान घेतात त्याचं बिल किती व्हावं ? तीन-साडेतीन हजार रुपये ! डाकूंच्या

प्रदेशातून गाडी जाणार म्हटल्यावर गणपतीची प्रार्थना करण्याचा सल्ला त्यांना मिळतो आणि त्या तो पाळतात. दिल्लीला आर. के. पुरममधून संसद भवनापर्यंत जाताना टॅक्सी कुठं मध्येच थांबली तर जवळची शिट्टी वाजवून पोलिसाला बोलावण्याचा सावधपणाही बाळगावा लागतो; ताजमहाल पाहण्यासाठी आग्र्याला गेल्यावर मुमताज चौदाव्या बाळंतपणात मरण पावली हे ऐकल्यावर मैत्रिणीचा ताजमहाल पाहण्याचा उत्साह कसा मावळतो याचीही गंमत त्या सांगतात.

## विनोदाचे देणे

बाईंना विनोदाचे मोठेच देणे लाभलेले आहे; आणि स्वतःला विनोदविषय बनवतानाही त्यांना संकोच वाटत नाही. त्यामुळे आपल्या फजितीचे वा खरडपट्टीचे प्रसंगही त्या रंगवून सांगतात. समाज शिक्षणमाला ना नफा ना तोटा तत्त्वावर चालविली जाते हे कळल्यावर शंतनुराव किर्लोस्कर खडसावतात : 'असला मूर्खपणा नसावा. थोडाफार का होईना, फायदा हा झालाच पाहिजे. तरच उद्योग नीट चालतो.' विनोबा भावे त्यांना एकदा बोलावून घेतात आणि लेखन-वाचन भरपेट होऊ दे असं सांगतात. राजकारणाच्या धबडग्यात वेळ मिळत नाही असं सांगितल्यावर ते खाड्कन बजावतात : 'तुमच्यासारखीनं घर सोडून एवढ्या लांब नागपुरात येऊन काय करायचं तर म्हणे राजकारण ! बंद करा यापुढं ही ससेहोलपट.' आणि ते त्यांना ओव्या म्हणायला लावतात.

## थाप अंगलट येते

एकदा विमानाचं तिकीट मिळवण्यासाठी त्या थाप ठोकतात : 'अरे बाबा, माझा नवरा वाट पाहतोय ना तिकडे. मला गेलंच पाहिजे.' बुकिंग क्लार्क चक्रावून विचारतो, 'शादी कब हुई आपकी ?' आणि तो ही बातमी यशवंतराव चव्हाणांच्या पीएला कळवतो. श्री. डोंगरे धावतपळत येऊन बाईंना गाठतात व विचारतात, 'काय भानगड ?'

बाई वस्तुस्थिती सांगतात. पण डोंगऱ्यांचा विश्वास बसत नाही. यशवंतराव पार्लमेंटमध्ये गाठून म्हणतात : 'कोण भेटलाय असा तुम्हाला ? पत्रिका आमच्या नावानं काढू या. . .' त्या गप्प बसतात. तेव्हा यशवंतराव संध्याकाळी घरी जेवायला चला म्हणून सांगतात. 'कुणाशी लग्न ठरवलंय ?' ते गंभीर चेहऱ्यानं परत विचारतात. 'खुळे की काय' असं म्हणायचा बाई बेत करतात तर यशवंतराव पुढं सांगतात : 'सांगून सवरून लग्न करावं. असं चोरून नकोय. मी कशाला इथं आहे मग ? विश्वासानं बोला.' बाईही अशा बनेल की, केसांवर गजरा माळून, झिरझिरीत साडी नेसून जेवायला हजर; अन् पुन्हा जेवताना जाम तोंड उघडीत नाहीत ते नाहीच !

### मराठ्याची मुलगी अशी कशी बिनलग्नाची ?

इरावती कर्वेही एकदा विमानप्रवासात बरोबर असतात. मुलीसारखा जीव असतो त्यांचा सरोजिनीबाईंवर. त्यांचा प्रश्न एकच, 'लग्न का केलं नाही ? मराठ्याची मुलगी अशी कशी बिनलग्नाची ?' विमानातून उतरल्यावर त्या ठासून सांगतात. 'तुम्ही रोज माझ्यासारखं असं लांबरुंद इरकली नेसत जा. मला आवडतं. तुमची आई नेसते ना ?'

नटश्रेष्ठ गोविंदराव टेंबे त्यांना झिम्म्याची गाणी म्हणायला सांगतात. जात्यावरच्या ओव्या गायला लावतात. आकाशवाणीवर त्यांना लोकसंगीत सादर करण्याची संधी गोविंदराव टेंबे मिळवून देतात.

निवडणूक प्रचाराच्या वेळी रात्री काही बेरड त्यांची गाडी रोखतात; पण बाबर मास्तराची लेक म्हटल्यावर ते कुऱ्हाडी टाकून त्यांच्या पायाला हात लावतात. एवढंच नव्हे, तर रेडिओवर सकाळी अभंग छान म्हटले म्हणून शाबासकीही देतात. पाच हजारांची नोटांची चवड त्यांच्या हाती देतात...

अशा अनेक आंबटगोड आठवणींनी सरोजिनी बाबर यांचा हा स्वाध्याय रंगलेला आहे. त्या स्वतःवर खूष आहेत; आपण जे काही केले त्याबद्दल त्यांना रास्त अभिमान आहे. त्याबरोबर काही अडचणीचे, फजितीचे अनुभव सांगतानाही त्या स्वतःला विनोदविषय बनवून काही आडपडदा न ठेवता ते मोकळेपणाने कथन करतात. त्यामुळे हे आत्मकथन वाचताना वेळ कसा जातो ते कळतही नाही.

(स्वाध्याय : सरोजिनी बाबर. समाज शिक्षणमाला, २०९५, सदाशिव पेठ, पुणे-३०, पृष्ठे : १८०. दहा रुपये.)

□

# मागे वळून : डॉ. मथूताई आठल्ये

*डॉ. मथूताई आठल्ये यांच्या आंबटगोड आठवणी*

'मागे वळून' च्या लेखिका डॉ. मथूताई आठल्ये या पंचाहत्तरपेक्षाही जास्त वयाच्या. यापूर्वी त्यांनी कधी काही ललित लिहिले नाही. हे आठवणीवजा लेखन केले तेही मोठ्या कष्टाने. दृष्टी मंद झालेली, स्मरणशक्ती लहरी बनलेली. निवृत्तीनंतर वेळ जाईना म्हणून नातलगांच्या आणि 'सकाळ'चे माजी कार्यकारी संपादक वा. दा. रानडे यांच्या आग्रहामुळे त्यांनी हे लेखन केले. रानडे यांनी त्यावर संपादकीय संस्कार करून, घटनांची क्रमवार रचना केली. अनावश्यक संदर्भ, सत्य पण कटू घटना वगळून मुद्रणप्रत सिद्ध केली.

## सातारचे सनातनी वातावरण

या आठवणींमधून लग्नानंतर चार वर्षांनी म्हणजे वयाच्या सोळाव्या वर्षी विधवा झालेल्या आणि त्यानंतर शिक्षण घेऊन एम. बी. बी. एस. होऊन जुनागढ, सेवाग्राम, कस्तुरबाग्राम व घटप्रभा येथे वैद्यकीय सेवाकार्य करणाऱ्या एका मनस्विनीचे जे दर्शन घडते, ते तिच्या प्रांजलपणामुळे आपल्याला झपाटून टाकते. सातारच्या गोराराम मंदिराचे पिढीजात पुजारी आगटे यांच्या घरात जन्मलेली ही मुलगी. शाही इनामदारीचे वैभव संपुष्टात आलेल्या उतरणीच्या काळातले कष्टमय बालपण जगत, राम मंदिरात बारा महिने अठरा काळ चाललेल्या कथा-कीर्तन पुराणांतून आपोआप कानावर पडणारे धर्मनीतिज्ञान आत्मसात करीत अकराव्या वर्षी आठल्यांची सून बनते. नवऱ्याबरोबर चार वर्षे संसार करून वैधव्य आल्यावर स्वतःच्या पायावर उभी राहण्यासाठी तत्कालीन समाजाचा रोष पत्करून चिकाटीने डॉक्टर होते आणि आर्थिक यशापेक्षाही सेवाभावाला महत्त्व देऊन हजारो रुग्णांचा दुवा घेते, विवाहाचा प्रस्ताव येऊनही आपले स्वातंत्र्य प्रमाण मानून एकाकी जीवन आनंदाने घालविते. गांधी, नेहरू, राजगोपालाचारी, डॉ. सुशिला नायर, डॉ. ना. सु. हर्डीकर वगैरेंच्या आदराला पात्र ठरते, आपल्या कुटुंबियांसाठीही आपल्या परीने कष्ट उचलते, भलेबुरे अनुभव पचवत आपले स्वत्व अबाधित राखते.

## अकाली वैधव्य

मथूताईंच्या या निवेदनात स्वतःच्या रूपसंपदेचे तसेच एकटेपणाचे उल्लेख येतात. ग्रामीण भागात राहिल्याने होणाऱ्या हाल-अपेष्टांचे संदर्भ येतात. परंतु विवाहासाठी अनेकांनी त्यांना मागण्या घालूनही आपल्या मनाला त्यांनी कठोर शिस्तीखाली संयमशील ठेवले. 'विश्वास बसणार नाही, पण लैंगिक विचारांनी तरुण वयातही मला कधी बेचैन केलं नाही, हे सत्य आहे.' असे स्वतःच त्यांनी स्पष्ट केले आहे. पहिल्या लग्नाचा त्यांचा अनुभव तसा वैताग आणणारा नव्हता. सासू त्यांना थोडाफार त्रास देई. परंतु लाहोरला पतीबरोबर त्यांनी संसार केला. वय बारा-तेरा वर्षांचंच असल्यानं कर्तव्यपरायण असल्या तरी सहवासानं उत्पन्न होणारं दुःख वा विरह जाणवण्याएवढ्या त्या मोठ्या नव्हत्या. 'नवरा-बायकोचं नातं म्हणजे काय ते कळायच्या आतच लग्न झालं आणि सोळाव्या वर्षी वैधव्य आलं.' त्यांचे यजमान लाहोरला पलुसकरांच्या गांधर्व विद्यालयात संगीत शिक्षक होते. वय २६, पैलवानी घाट. परंतु मधुमेहानं त्यांचं तरुणपणीच पार चिपाड झालं आणि ते अचानक गेले.

## डॉक्टर व्हायची महत्त्वाकांक्षा

मथूताईंच्या घरच्यांनी केशवपनाचा घाट घातला, पण त्यांनी विरोध केला. शंकराचार्य त्यांच्या मंदिरात उतरायचे, पण ती विधवा म्हणून तिला दर्शन देण्याचे टाळायचे. डॉ. कुर्तकोटी यांनी मात्र तिला दर्शन दिले. स्वयंपाकघरात येऊन ते म्हणाले, "मुली, पुढं ये पाहू. बघू दे मला तुझं तोंड." मग त्यांनी हेही दिवस जातील, असा तिला दिलासा दिला. कन्याशाळेत ही सोळा-सतरा वर्षांची मुलगी शिकायला जाऊ लागली. तेव्हाही कर्मठ आजीचा विरोध होताच. दादासाहेब करंदीकर, डॉ. वा. वि. आठल्ये, दिवाण महाजनी हे मात्र शिकाच म्हणून आग्रह करायचे. कमलाबाई देशपांडे तर मथूला शिकवायला पाठवा म्हणून तिच्या पालकांना गळ घालण्यासाठी महर्षी कर्व्यांना घेऊन आल्या. शाळेत जाऊ लागल्या तर निनावी पत्रं यायची. 'कोणीही कळी कुस्करून टाकील' अशा मजकुराची. परंतु त्या व्ह. फा. झाल्या. पुण्यास हुजूरपागेतून मॅट्रिक पास झाल्या. कवी यशवंत हे दूरचे नातलग. त्यांनीही लग्नाची मागणी घातली. कवी गिरीशांनी त्यासाठी आग्रह केला. परंतु डॉक्टर व्हायचं, ही मथूताईंची महत्त्वाकांक्षा.

फर्ग्युसन कॉलेजमध्ये गॅदरिंगच्या सेक्रेटरी म्हणून त्या निवडून आल्या. मेडिकलला जायचे, तर वय आड येत होते. पंचवीसच्या पुढे वय. तेव्हा त्या वरिष्ठ अधिकारी डॉ. नऱ्होना यांना भेटल्या. 'मी बालविधवा आहे, घरचे लोक सनातनी अन् रूढीप्रिय असल्यानं माझ्या शिक्षणाला फार उशीर झाला अन् वय जास्त म्हणून तुम्ही मला प्रवेश देत नाही.' असं सांगता सांगता त्यांना रडू फुटलं.' डॉ. नऱ्होना वरिष्ठांना सांगून त्यांना स्पेशल केस म्हणून

प्रवेश देतात. सर्जरी व मिडवाइफरीमध्ये त्या प्रथम येतात. 'हे बघायला दादा-आई नाहीत, याचं मात्र वाईट वाटलं,' असं त्या म्हणतात.

## महर्षी कर्वे यांची शाबासकी

सातारला एका अडलेल्या बाईची सोडवणूक करण्यासाठी तिला टांग्यातून हॉस्पिटलमध्ये नेण्याची वेळ आली. त्या वेळी तेथील केळकर शास्त्री यांनी सवाष्णी बाईला बरोबर पाठविले. ऑपरेशन अर्थात मथूताईंनी केले. शास्त्रीबुवांनी त्याबद्दल शाबासकी दिली तेव्हा बाईंनी सुनावले, "अहो, पण हे सर्व तुमच्या दृष्टीनं एका विधवेनंच केलंय." तेव्हा ते चूप झाले. त्या डॉक्टर झाल्याचे कळल्यावर महर्षी कर्व्यांनी त्यांचे दोन्ही हात धरून शाबासकी दिली. त्या वेळी कर्व्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले होते.

## घरच्या मंडळींचा जाच

घरच्या मंडळींनी मथूताईंना खरे तर शक्य तेवढा त्रासच दिला. वडील सनातनी व रागीट होते. ते मुलांना खूप मारत. आईही रागावून झोडपत असे. सासूबाईंनी तर त्यांच्याशी बोलणेच टाकले होते. कवी गिरीश हे मोठ्या बहिणीच्या यजमानांचे बंधू. त्यांना मथूताईंबद्दल कौतुक वाटे. त्यांच्यामुळे साहित्याची गोडी लागली. मेहुण्यांना मात्र साहित्याचे वावडे होते. धाकट्या बहिणीचे यजमान मिरजेत वकील होते, पण कानाने बधिर झाल्याने नोकरी करू लागले. धंद्यात पडले, पण त्यात फसले. बहीण आपल्या दोन मुलींसह मथूताईकडे कस्तुरबाग्रामला येऊन राहिली. तिने खूप गोंधळ घातला. शेवटी मात्र वीस वर्षांनी बहिणीला पश्चात्ताप झाला.

## लक्षणीय अनुभव

जुनागढ, सेवाग्राम, कस्तुरबाग्राम वगैरे ठिकाणी काम करताना त्यांना आलेले काही अनुभव लक्षणीय होते. ते त्यांनी या पुस्तकात दिले आहेत. सेवाग्रामला गांधीजींच्या जादूने भारलेले वातावरण. गांधींची शिस्त कठोर. या आश्रमाला भेट देणाऱ्या राजगोपालाचारी, मश्रूवाला, राजेंद्रप्रसाद वगैरेंच्या आठवणीही मजेदार आहेत. डॉ. भन्साळींचे चमत्कारिक प्रयोग ही बाईंना एक डोकेदुखीच होती. प्रेमाबाई कंटक यांना त्यांचा स्पष्टवक्तेपणा कसा आवडला नाही, याचीही हकिगत उद्बोधक आहे. जवाहरलालजींनी कस्तुरबाग्रामला भेट दिली तेव्हा त्यांच्याकडचे बेसनाचे लाडू आवडीने खाल्ले. इंदिराजींनी भेट दिली तेव्हा एका बालकाच्या हस्ते इंदिराजींना सुताचा हार घातला गेला. परंतु त्याबद्दल आश्रमाच्या मुख्य सुशिला पै या त्यांच्यावर भडकल्या. तेथून त्यांना निघावे लागले.

घटप्रभेलाही पंचवीस वर्षे त्यांनी काढली. डॉ. हर्डीकर यांनी त्यांना म्हटले होते, 'तुम्ही आम्हाला पसंत आहात. आता इथंच कायम राहा. कुठं जाऊ नका.' परंतु २५ वर्षे तेथे काढून

शेवटी त्यांना काही अप्रिय घटनांमुळे बाहेर पडावे लागले. मान्यवर संस्थांमध्येही क्षुद्र वृत्तीची माणसे मिजास मिरवितात. त्यामुळे त्या संस्थांना संस्थानाची कळा येते. सेवाभाव मागे पडतो.

### लक्षणीय क्षण

पाऊणशे वर्षांच्या या जीवनाच्या एकाकी वाटचालीतले काही लक्षणीय क्षण या पुस्तकामुळे आपल्याला कळतात. हे काही फार गाजलेल्या व्यक्तीचे अंतरंगदर्शन नव्हे. संघर्षपूर्ण घटनांचेही त्यात मोठे नाट्य आहे, असे नव्हे. परंतु नेहमीच्या बाळबोध जीवनातही काहीतरी लक्षणीय दडलेले असते आणि वैधव्यामुळे आलेल्या सामाजिक बंधनांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा बळी न देता, त्याला फुलवण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करणाऱ्या मथूताईंची ही कहाणी एखाद्या शूर झाशीवालीसारखीच आदरणीय ठरते.

(मागे वळून : डॉ. मथूताई आठल्ये, श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०, पृष्ठे १२०, तीस रुपये.)

□

# वालांग : कर्नल श्याम चव्हाण

## *भारत-चीन चकमकीतील एक रोमहर्षक प्रकरण*

युद्धाच्या कथा रम्य असतात; रोमांचकारक असतात असे म्हणतात. ज्यांनी कधी रणांगणावर पाऊल ठेवले नाही, तोफखान्याच्या भडिमाराला तोंड दिले नाही; पोटात दिवसच्यादिवस अन्नाचा कण नसताना आणि दारूगोळा अपुरा असताना केवळ मनोबलावर शत्रूशी मुकाबला करून जीव धोक्यात घातला नाही अशा कोणातरी केवळ बघ्या माणसाला युद्धाच्या कथा रम्य असतात असे वाटणारच. परंतु प्रत्यक्ष ज्याने रणांगणावर जाऊन शत्रूशी दोन हात केले आहेत; त्याचा युद्धाचा अनुभव हा रम्य असण्यापेक्षा भयानकच असतो. आपल्या डोळ्यांदेखत आपल्याबरोबरच्या सहकारी घायाळ सैनिकांचे केविलवाणे विव्हळणे आणि मृत्युमुखी पडणे बघावे लागते; शत्रूवर हल्ला चढवण्यात जरा काही चूक झाली की स्वतःच्याच मरणाची तयारी ठेवावी लागते; आणि या भयानक विध्वंसक संहाराचा निर्घृण अनुभव मनात ठेवूनही स्वतःचे मानसिक संतुलन टिकवून ठेवायचे असते हे एक दिव्यच.

### कृष्ण मेनन यांचा आत्मसंतुष्ट उर्मटपणा नडला

१९६२ मधील चीनच्या आक्रमणाच्या वेळी भारताची संरक्षण व्यवस्था किती कुचकामी आहे याची प्रचीती आली आणि 'हिंदी चिनी भाई भाई'चे बेहोषपणे नारे देणाऱ्या भारताला खडबडून जाग आली. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या शांतिदूताच्या प्रतिमेला जबरदस्त तडा गेला. संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांच्या आत्मसंतुष्ट उद्धटपणाची निर्भर्त्सना झाली. हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेला आणि पुढे भारताची कुरापत काढणाऱ्या पाकिस्तानला सणसणीत चपराक देण्याएवढी ताकद आपल्या संरक्षण यंत्रणेत आली हा कथाभाग अर्थातच पुढच्या काळातला.

१९६२ साली नेमके काय झाले; आपण कुठे कमी पडलो याची चर्चा अजूनही चालूच आहे आणि पुढेही चालूच राहील. कारण सत्य-अहिंसा-शांततामय सहजीवन वगैरे ध्येयधुंद

कल्पनात मश्गुल झालेल्या स्वप्नाळू भारताला जागतिक सत्तास्पर्धेच्या कठोर वास्तवाची पहिलीवहिली रोखठोक जाणीव करून देणारे हे चीनचे आक्रमण होते आणि पौगंडावस्थेतील कुमाराला एकदम आपल्या तारुण्याचे भान व्हावे तसा या आक्रमणाचा प्रभाव होता.

## प्रत्यक्ष युद्धात भाग घेणाऱ्याचे निवेदन

या आक्रमणासंबंधी क्वचित कुणा लष्करी अधिकाऱ्यांनी आपापले अनुभव ग्रथित करणारी पुस्तके लिहिली आहेत. लेफ्टनंट कर्नल श्याम चव्हाण यांचे 'वालाँग' हे सव्वाशे पृष्ठांचे पुस्तक १९६२ मधील त्या आक्रमणातील फक्त एका चकमकीची स्मृती ताजी करणारे करणारे आहे आणि मराठी वाचकांना त्या चकमकीतील दाहक वास्तवाचा साक्षात चटका बसेल इतके ते सरळ आणि प्रांजळ आहे. ले. कर्नल श्याम चव्हाण हे काही सराईत लेखक नव्हेत त्यामुळे आपल्या अनुभवाचे निवेदन परिणामकारक करण्यासाठी सराईत लेखकांना उपलब्ध असणारी आयुधे ते सहसा वापरत नाहीत. त्यामुळे जे काही या पुस्तकात वाचायला मिळते ते अनुभवाचे एक अनघड पण निखळ रूप आहे आणि युद्धाच्या विविध रूपांशी आपल्याला थेट भिडवणारे आहे. निवेदन चटकदार करण्यासाठी येथे कुठल्याही क्लृप्त्या वापरण्यात आलेल्या नाहीत. तरीही त्यातील तपशील आपल्याला गुंतवून ठेवतो. आपल्या अंतरात्म्याला भिडतो.

## पहिल्या फेरीत स्पेशल हार

वीस ऑक्टोबर १९६२ रोजी चीनने नेफामध्ये दोन आघाड्या उघडल्या. 'ढोला' काबीज केले. दुसऱ्या आघाडीवर २२ ऑक्टोबरला मॅकमोहन रेषेजवळील किविथू येथे हल्ला चढवला व तेथील पराभूत भारतीय सैन्याच्या कुमॉव बटालियनला वीस मैल माघार घेऊन वालाँग गावाजवळच्या तळावर यावे लागले. ह्या बटालियनने चिनी सैन्यावर पुन्हा हल्ला करण्याची योजना आखली. १२ नोव्हेंबरला कुमॉव बटालियनचे ३५० जवान पायी निघाले. दारूगोळा, अन्नधान्य पाठीवर घेऊन, जड ओझ्यानिशी प्रत्येकाला चालावे लागले. बूट चांगले नसतात. ४ हजार फुटांवरून १४ हजार फूट उंचीपर्यंत चढायचे असते. ग्रीनपिपल व यलोपिपल येथे चिन्यांचे मोर्चे बांधले गेले होते. त्याच्यांवर हल्ला चढवण्यासाठी ट्रॉय ॲक्शन या ठिकाणी जायचे असते. १३ ला रात्री हा हल्ला करायचा असतो. परंतु १४ नोव्हेंबरला पहाटे चारला पहिली तुकडी ट्राय जंक्शनला पोचते. तेथे संरक्षणासाठी खड्डे खणणे, चिन्यांच्या ताकदीचा अंदाज घेणे, सुरुंगाचा छडा लावणे इ. म्हणजे दिवसभर या कामासाठी वापरून रात्री हल्ला करणे योग्य झाले असते. परंतु ब्रिगेडियरने मात्र हा हल्ला सकाळी १० वाजता करण्याचा आदेश दिला आणि दोन दिवसांच्या वाटचालीने थकलेल्या सैनिकांना जराही विश्रांती घेऊ न देता बचावात्मक मोर्चे

व खणण्यास वेळ न देता स्वसंरक्षणाची सिद्धता करण्याची संधी न देता हा हल्ला करण्याचा आदेश– मूर्खपणाचा आणि आत्मघातकी– दूरवर बसलेल्या ब्रिगेडियरकडून दिला जातो.

## जेवणही पुरेसे नाही

१२ नोव्हेंबरला वॉलाँगहून निघालेल्या या जवानांना प्रत्येकी फक्त ८ पुऱ्या व बटाट्याची भाजी एवढाच खुराक देण्यात आलेला असतो. त्यानंतर जेवण देण्याची काहीही व्यवस्था नसते. बरोबर घेतलेल्या पाण्याच्या बाटल्या सोडल्या तर ताजे पाणी मिळण्याचीही सोय नसते. वॉलाँगहून निघताना ले.क. श्याम चव्हाण हे भाजीपुरीचा आपला कोटा घेण्यास विसरले; आणि त्यांना पुढे आठ दिवस काहीही खायला मिळाले नाही. ते उपाशीपोटीच राहिले, लढले व परत पायी चालले असे या निवेदनात त्यांनीच सांगितले आहे. दारूगोळाही फार कमी असतो, त्याच्याशी संपर्क साधणारी वायरलेस यंत्रणाही लौकरच बंद पडते, अशा अवस्थेत या हल्ल्याचा फोलपणा हा स्वयंसिद्धच होता आणि आपल्या लष्करी यंत्रणेचा ढिसाळपणा दाखवणारा होता.

या हल्ल्याला १० वाजता सुरुवात करायची म्हणून नऊ वाजल्यावरच श्याम चव्हाण यांची कंपनी ट्राय जंक्शन व चिनी मोर्चा यांच्यामधील सखल भागात दबा धरून बसण्यासाठी निघाली. दहा वाजता दोन कंपन्या गोळीबाराला सुरुवात करण्यासाठी नेमून दिलेल्या दोन जागी जाऊन तयारीत राहायचे व तिसऱ्या कंपनीने पुढे जाऊन संरक्षणाची तयारी करायची अशी योजना असते.

श्याम चव्हाण यांच्या कंपनीला सखल जागा सापडल्यावर जवानांना नेमक्या जागी दबा धरून बसण्याविषयी सांगितले जाते. सुभेदार गोविंदसिंग हे त्यांपैकी एक. वय ४५, सडपातळ, तपकिरी डोळ्यांचे, गौरवर्ण. हे जरासे उभे राहिले आणि चिन्यांच्या गोळ्या त्यांच्यावर आदळल्या. आपण चिन्यांना चाहूल न लागू देता येथवर आलोय हा जो भ्रम होता तो दूर झाला... दहा वाजण्याआधी यलो पिंपल या चिनी ठाण्यावर तोफगोळ्यांचा मारा सुरू व्हायला हवा होता; परंतु तो सुरू झालाच नाही. काही गोळे तर चिन्यांवर जाऊन आदळण्याऐवजी मधल्या दरीतच गडप होत होते. आपल्या तोफेचा एकही गोळा शत्रूच्या जागेवर पडला नाही. आपले जवान मात्र चिन्यांच्या गोळ्यांना बळी पडत होते. चव्हाणांच्या प्लॅटूनचा लान्सनाईक देवीदत्त या अकारण हत्याकांडाने उसळून त्यांना म्हणाला, 'साहेब, मरनेके पहले दो-चार चिनी को मारना है । मै आगे जाऊंगा ।' चव्हाणांनाही त्या वेळी वाटलं की या बेसुमार चाललेल्या गोळीबारात एखादी गोळी आपल्यालाही लागणारच. मरण अटळ आहे. तर त्यापूर्वी एक-दोन शत्रूंना तरी मारलंच पाहिजे. नाहीतर सर्व फुकट. म्हणून तेही झाडांचा आडोसा घेत पुढे होतात आणि जवळ येणाऱ्या एका चिनी सैनिकाची चाहूल घेऊन त्याला गोळी मारतात. तो चिनी कोसळतो. पण चिन्यांचा भडिमार चव्हाण उभे असलेल्या झाडाच्या रोखाने सुरू होतो. बरोबरीच्या जवानांची तर खात्रीच पटते की,

'चव्हाणसाब मर गया । उनकी बॉडी निकालो' त्यांच्याजवळ सरपटत येऊ पाहणारे आपले दोन जवान गोळयांना बळी पडतात. चव्हाणांच्या हेल्मेटची कड फोडून एक गोळी जाते.

## भिजलेल्या कपड्यांनिशी पायी वाटचाल

चिन्यांनी लांबच्या लांब खड्डा केलेला होता; त्यामुळे ते जागा बदलून गोळीबार करीत होते. आपले बरेच जवान त्यामुळे कोसळले. कॅप्टन सिंग यांच्या हाताला गोळ्या लागल्या. त्यांनी कमरेचा पिस्तुलधारी पट्टा चव्हाणांना दिला. भारतीय जवानांकडच्या गोळ्या संपत आल्या. नवी रसद कधी येते याची वाट बघणे त्यांच्या नशिबी होते. १४ नोव्हेंबरला ३ वाजता ही चकमक थांबली. चौदा हजार फूट उंचीवर कडक थंडीत ओल्या कपड्यानिशी दमलेले व हुडहुडी भरलेले हे जवान. रात्री दहा वाजता चिन्यांनी त्यांच्यावर जबरदस्त हल्ला चढवला. हँडग्रेनेडच्या माऱ्याने अनेकांचा बळी घेतला. रात्री तीनपर्यंत गोळीबार करून चिन्यांनी भारतीयांना ट्राय जंक्शनपर्यंत माघार घ्यायला लावली.

१५ नोव्हेंबरच्या पहाटेपर्यंत भारताचे तीन अधिकारी व बरेच जवान मारले गेले. मेजर भाटिया व ले. खत्री जखमी झाले. कॅ. चव्हाण यांच्याकडे कंपनीची कमांड देण्यात आली. 'बचावासाठी खड्डा खणा' हा त्यांचा आदेश पाळण्याच्या मनःस्थितीत थकलेले जवान नव्हते. तेवढ्यात एक चिनी जवान मेलेला आढळतो. त्याच्या हातातील स्वयंचलित रायफल ते काढून घेतात. वायरलेस संपर्क तुटल्याने दारूगोळा व अन्न मागवण्याचे साधन उरले नाही. १५ नोव्हेंबरला जवळ दारूगोळा नसले आपले जवान असाह्यपणे चिन्यांच्या भडिमारातून स्वतःचे जीव वाचविण्याची शर्थ करीत होते. चार दिवसांचा उपास. जवळ पाणी देखील नाही.

## तोफांचे धारदार गोळे

१६ नोव्हेंबरला सायंकाळी डोग्रा बटालियनची एक कंपनी घेऊन मेजर ग्रेवाल आले. पहाटे तीन वाजता अचानक चिन्यांचे तोफगोळे येऊन आदळू लागले. झाडांच्या फांद्या कटाकट तुटू लागल्या. तोफगोळ्यांचे फुटून होणारे गरम धारदार तुकडेही जवानाचे हातपाय कापून जात होते. काही डोग्रा बटालियनचे जवान परतू लागले. त्यांची चौकशी करायला निघालेले जवान वाटेतच गारद झाले. जखमींवर प्रथमोपचार करण्याच्या जागेवरच चिन्यांचा बॉंब पडला आणि तेथील रुग्ण आणि डॉक्टर सगळेच दगावले. डॉक्टरांचे लग्न होऊन केवळ तीनच महिने झाले होते.

भारतीय जवानांनी ट्राय जंक्शनवरून परत वालाँगकडे वाटचाल सुरू केली. उतारावरून भरवेगाने जवान खाली येऊ लागले. सीओ जखमी झाल्याने त्यांनाही जवान खाली नेत होते.

१६ नोव्हेंबरची रात्र यपक नाल्यावर काढावी लागली. तेथे ओढ्याचे पाणी प्यायला

मिळाले. पाच दिवसांनी चव्हाणांची तहान भागली.

१७ नोव्हेंबरला पहाटे २९-३० जवान यपक नाल्यावरून पुढे निघाले. उंच गवतामुळे नाल्याच्या काठाकाठाने चालताना फसगत होत होती. वाटेत आपले जवान गतप्राण पडलेले दिसत. आदल्या रात्री डोंगरावरून चढताना पाय घसरून हे जवान खाली घरंगळत आले असावेत ! मेजर बॅनर्जीच्या पाठीला गोळी चाटून गेली होती. जमेदार मानसिंग यांचा तळवा पोळून निघाला होता.

## तुटलेल्या कड्यावरून मारलेली उडी

एक ठिकाणी कडा तुटलेला होता. पुढे जाण अवघड होते. त्या कड्यामध्ये एक लांब भेग होती. पलीकडे देवदाराचं झाड होतं. सिग्नल हवालदाराच्या फेट्याचे एक टोक कमरेला बांधून चव्हाणांनी भेगेतल्या गवतावरून देवदाराचे झाड पकडण्यासाठी झेप घेतली; आणि झाड नेमके पकडलेही. इतर जवानही त्या मार्गाने दरी ओलांडून आले. परंतु मेजर बॅनर्जींना मात्र ही उडी जमली नाही. ते सरळ खाली गेले. कॅ. जिंदल त्यांच्या शोधासाठी गेले. 'डोक्यावर पडल्याने मेजर बॅनर्जीची मान मोडली आहे. डोके फुटून गेले आहे. जबडा निखळला आहे.' असे त्यांनी येऊन सांगितले. त्यांना तेथेच थांबण्यास सांगून मदत पाठवण्यासाठी इतर मंडळी पुढे निघाली.

वालाँग जवळ येत होते. आशा पालवत होत्या. परंतु लान्सनाईक आनसिंग खबर देतो की वालाँगचा चिन्यांनी कब्जा घेतला आहे. निसटण्याचा अन्य मार्गच नव्हता. आपले सर्व जवान चिन्यांच्या हाती सापडले.

## युद्धकैद्यांना चीनने दिलेली वागणूक

चिन्यांनी आपल्या जवानांना युद्धकैदी म्हणून जी वागणूक दिली ती आरंभी कठोरपणाची पण नंतर समंजसपणाची होती. जवानांकडून लष्करी माहिती काढण्याचे बरेच प्रयत्न चिन्यांनी केले. दहा दिवसांचा उपास असूनही ले.क. चव्हाण यांनी काहीही माहिती देण्यास नकार देण्याचे धैर्य दाखवले. पुढे सातूची पेज जवानांना मिळू लागली. अडीचशे तीनशे युद्धकैदी व सुमारे दहा ऑफिसर व दहा जेसीओ यांना चिनी हद्दीतल्या सामा या गावी नेण्यात आले. तेथून जवळच एका देवदार जंगलात लोहीत नदीकाठी युद्धकैद्यांना तंबूमध्ये ठेवण्यात आले. चिनी सैन्याचे कॅम्पही तेथे जवळच होते. तेथून जवळच एक गाव होते. सातूच्या पेजेऐवजी पुढे आहारात तांदूळ, भाज्या, डुकराचे मांस, मीठ, तेल वगैरे मिळू लागले.

दिवाळीसाठी गव्हाचा शिराही करण्याची मुभा मिळाली. एक तिबेटियन अधिकारी सोन्द्रु हा भारतीय जवानांवर लक्ष ठेवी. ब्रेनवॉशिंगचेही बरेच प्रयत्न झाले. आपले काही जवान त्याला बळीही पडले. एकीकडे देशासाठी प्राण देण्यासाठी सिद्ध असणारे जवान

मुठीने शेंगदाणे वाटताना कमी मिळाल्याचा संशय आला तरी हमरीतुमरीवर येत. दाणे मोजून वाटण्याची पाळी त्यामुळे येई. कर्नल चव्हाण यांची सुटका होण्याआधी ते बेपत्ता असल्याची तार त्यांच्या घरी गेली; मॅजिस्ट्रेटसमोर जाऊन आई-वडिलांना प्रतिज्ञापत्र द्यावे लागले. (त्या वेळी मॅजिस्ट्रेट कोर्टात स्वतःच्या आसनावरून खाली उतरून आले आणि चव्हाणांच्या वडिलांच्या सांत्वनपर बोलले.) पोस्टमनदेखील ही पत्रे दिल्यावर उघडून वाचीपर्यंत थांबत, ग्रँटरोड पोस्टातील सर्व कर्मचारी भेटून धीर देत. या पार्श्वभूमीवर ले. कर्नल चव्हाणांचे 'मी चांगला आहे. काळजी करू नये.' असे पत्र घरी आले तेव्हा घरी उडालेल्या आनंदोत्सवाची कल्पनाच केलेली बरी !)

## माणुसकीचा प्रत्यय

साडेपाच महिन्यांनी ले. कर्नल श्याम चव्हाण प्रभृतींची सुटका झाली. त्यांच्यावरील तिबेटियन निरीक्षक सोन्द्रुने त्या वेळी सांगितले- 'माझी बायको बाळंत झाली. मुलगा झालाय. त्याचे नाव मी श्याम ठेवणार आहे.' सुटकेआधी सर्वांना मापाचे कपडे शिवून देण्यात आले. कॅम्प कमांडरने थाटाची मेजवानी दिली. मात्र त्यात मद्यही दिले. सोन्द्रु आपल्या हातातील लामा लोक देवाचे नाव जपताना वापरतात तसली माळ श्याम चव्हाणांना देतो व सांगतो 'माझ्या पत्नीने मला दिलेली ही माळ, मी तुला देत आहे.' कधी तरी भारतात येऊन भेटेन असेही तो म्हणतो.

२४ एप्रिल १९६३ रोजी चिनी रेडक्रॉसच्या हवाली या युद्धकैद्यांना केले जाते. तेथून मॅकमोहन रेषा ओलांडून हे जवान भारतात प्रवेश करतात. वालाँगहून विमानातून आधी कलकत्त्याला त्यांना आणले जाते.

कलकत्त्याहून रांचीला. तेथे त्यांची कसून तपासणी होते. ब्रेनवॉशिंगचा काही प्रभाव आहे का हे बघितले जाते. मेजर बॅनर्जी आणि कॅप्टन जिंदल यांना जिवंतपणी पाहणारी शेवटची व्यक्ती म्हणून त्यांचे त्यांचे नातलग शहानिशा करून घेण्यासाठी त्यांना भेटतात. तेथून मग मुंबईत. रेल्वे प्लॅटफार्मवर आई-वडील भेटतात. या सहा महिन्यांत ती दोघं किती वृद्ध दिसू लागली आहेत, असा विचार श्यामच्या मनात डोकावून जातो.

वालाँगच्या लढाईत ११९ जवान मरण पावले. ११३ जखमी झाले आणि १७२ युद्धकैदी म्हणून पकडले गेले.

## लष्कराचीच तयारी अपुरी ?

वालाँगची ही कहाणी पंचवीस वर्षांनी ले. कर्नल श्याम चव्हाण यांनी सांगितली आहे. आपल्या भारतीय लष्कराच्या एकूणच त्या वेळच्या दुरवस्थेची ती रडगाथा आहे आणि जवळ पुरेसा दारुगोळा नसताना, पायांत चांगली पादत्राणे नसताना, खायला अन्न नसताना, मृत्यू समोर दिसत असताना, बेधडक पुढे जाणाऱ्या जवानांच्या शौर्याची अपूर्व गाथाही

आहे. चव्हाणांनी लष्करी अधिकाऱ्यांना कुठेही दोष दिलेला नाही. टीकेचे लक्ष्य बनवलेले नाही. परंतु या कहाणीचे तपशीलच त्याकडे नेमके लक्ष वेधणारे आहेत. कथेच्या ओघात मानवी स्वभावाचे, उदारपणाचे तसेच क्षुद्रपणाचेही नमुने सहज येतात आणि या कथेला वेगळेच वजन देतात. वालाँगची लढाई ही तशी लुटुपुटीची लढाई होती, आपले सातशे जवानच काय ते त्या लढाईत होते. परंतु चिन्यांशी मुकाबला करण्याच्या दृष्टीने आपली अजिबातच तयारी नव्हती हे स्पष्ट दिसते. त्या वेळेच्या वृत्तपत्रातील बातम्या पुस्तकाच्या 'आसपास'साठी वापरल्या आहेत. त्यातील एक मथळा आहे. 'आमच्या तीन हजार सैन्याने पाचपट चिन्यांशी तीन आठवडे झुंज दिली.' या बातमीतील अतिशयोक्तीही त्यामुळे उघड होते.

## चुकांवरून सुचलेले शहाणपण

एका जवानाने लिहिलेली ही बखर वाङ्मयीन कलाकुसरीचा अभाव असलेली, परंतु तरीही खिळवून ठेवणारी. आपण त्या लढाईत प्रत्यक्ष हजर आहोत, त्या डोंगरदऱ्यांतून पायी चालत आहोत– चिन्यांचे हल्ले चुकवत आहोत असाच सारखा प्रत्यय येत राहतो. युद्धाचा हा अनुभव तसा फारसा भीषण नसूनही थरारक वाटतो आणि आपल्या लष्कराच्या त्या वेळच्या बेफिकीर आणि गाफील अवस्थेबद्दल चीड निर्माण करतो. आपल्या सैन्याची व अधिकाऱ्यांच्या निर्णय प्रक्रियेची प्रत पुढे सुधारली असावी हे बांगला देश युद्धाच्या वेळी स्पष्ट झालेच आहे. वालाँग ही कहाणी त्यामुळेच आपल्या मनात घर करून राहील आणि वालाँग हा शब्द आपल्या चिरपरिचित शब्दांत विराजमान होईल.

'वालाँग' सारखी पुस्तके खूप निघायला हवीत. युद्धभूमीचा साक्षात अनुभव असलेल्या जवानांनी लिहिलेली आठवणींची पुस्तके मराठीत अगदीच कमी आहेत. एक मोठे अनुभवविश्व त्यामुळे मराठी वाचकांपासून दूर राहिलेलें आहे.

(वालाँग : एका युद्धकैद्याची बखर, लेखक : कर्नल श्याम चव्हाण राजहंस प्रकाशन. १०२५, सदाशिव, पुणे– ४११ ०३०. किंमत रु. ३५/-)

□

# मगध आणि नंतरच्या कविता : श्रीकांत वर्मा

## *सर्वोच्च सत्तास्थानाजवळ राहूनही घुसमटणाऱ्या कवीचा आत्मसंघर्ष*

'मगध' या काव्यसंग्रहाच्या प्रसिद्धीने हिंदी कवी श्रीकांत वर्मा यांनी हिंदी भाषेचे क्षेत्र पार करून भारतीय काव्यक्षेत्रात आपले स्थान प्रस्थापित केले. कॉंग्रेस (आय)चे सरचिटणीस आणि निवडणूक प्रचार मोहिमेचे प्रसिद्धिप्रमुख म्हणून गाजलेल्या, आणीबाणीतही इंदिराजींशी निष्ठा दाखवणाऱ्या श्रीकांत वर्मा यांच्यातील कलावंताच्या मूळ अधिष्ठानाबद्दलच ज्यांना शंका वाटू लागली होती, त्यांना खणखणीत उत्तर देणारा 'मगध' हा काव्यसंग्रह ठरला आणि राजकारणाच्या रणधुमाळीत आणि चिखलफेकीत वावर असूनही त्यांचा मूळचा विद्रोही आणि आत्मशोधक पिंड दडपलेला व हरवलेला नाही याची त्यायोगे खात्री पटली.

गजानन माधव मुक्तिबोध आणि अज्ञेय यांच्या साहित्याने भारावून गेलेला, डॉ. लोहिया यांच्या सहवासात फुललेला, नवसाहित्याची कथा-कविता ही दालने श्रद्धेने हाताळणारा हा तरुण कवी १९६० च्या आगेमागे लिहू लागलेल्या नव्या दमाच्या साहित्यिकांत मोठा दबदबा निर्माण करणारा होता. परंतु १९७५ नंतर मात्र इंदिराजींच्या जवळ जाऊन, आणीबाणीतही त्यांच्या समर्थनार्थ सिद्ध झालेल्या श्रीकांत वर्मांबद्दल अनेकांना आश्चर्य वाटत होते. जनता राजवटीत साप्ताहिक दिनमानमधून त्यांची झालेली उचलबांगडी, इंदिरा कॉंग्रेस (आय) तर्फे राज्यसभेवरील झालेली नेमणूक, परदेशातील दौरे, कॉंग्रेस (आय) मध्ये वरच्या श्रेणीच्या नेत्यांत त्यांची होणारी गणना, यांमुळे श्रीकांत वर्मांचे जवळचे मित्रही चक्रावून गेले होते.

### अंतरीची अस्वस्थता

परंतु त्या सर्व गदारोळात वावरतानाही श्रीकांत वर्मा यांच्यातील कलावंत जागा होता; आणि अवतीभवती चाललेल्या पडझडीकडे तो निर्लेप मनाने, निरपेक्ष करुणाबुद्धीने कसा बघत होता याची 'मगध'मधील कवितांद्वारे प्रचीती येते. त्या राजकीय उलाढालीत, इमान,

वास्तव आणि विश्वासार्हता यांचा चक्काचूर होत असलेला बघून आतल्या आत पोखरून गेलेला हा कवी, प्रसिद्धीच्या झगमगाटात सतत राहूनही अंतरी अस्वस्थच होता. आणि ते सर्व काही मिळूनही कसे न मिळाल्यासारखे आहे याची प्रचीती घेत होता, सतत आतल्या आत धुमसतच होता याचा 'मगध'द्वारे आपल्याला प्रत्यय येतो.

## आजच्या दिल्लीचे प्रतीक : मगध

मगध हे आजच्या दिल्लीचे व राज्यकर्त्यांचे प्रतीक म्हणून निवडण्यात श्रीकांत वर्मा यांनी खरी प्रतिभा दाखवली आहे. मगधच्या भूमीला एक परंपरा आहे; प्रदीर्घ इतिहास आहे. एकेकाळी नालंदा, तक्षशिला ही भारताच्या बौद्धिक कर्तृत्वाची केंद्रे होती. मगध हे जैन व बौद्ध संप्रदायांचे, नवविचार प्रवर्तनाचे आद्यपीठ होते. अनेक सत्तांतरे त्या भूमीत झाली. अनेक राज्यकर्ते आले. गेले. मग काय राहिले ?. . . इंदिरा गांधींची सत्तेवरून झालेली हकालपट्टी आणि पुन्हा त्यांना मिळालेली सत्ता या दरम्यानचा कालखंड हा त्यांच्या सन्निध वावरणाऱ्या श्रीकांत वर्मा यांच्यासारखे संवेदनाशील कलावंताला अंतर्बाह्य किती ढवळून काढणारा असणार याची कल्पना 'मगध' मधल्या ओळी-ओळीतून येते. 'मगध'च्या नांदीत यजमानांना गुणग्राहक, गुणसागर, गुणविधान असे संबोधून 'जन्मजन्मांतरीच्या कथा, नगर-नागरिकांच्या व्यथा' सांगण्यासाठी आपण नवयोनी धारण करून आलो आहोत, असे स्पष्ट करून, 'जर मी आपल्याला स्वर देऊ शकलो नाही तर आपणच मला स्वर द्यावा.' असा वर तो मागतो आहे. मगध हे केवळ आजच्या दिल्लीचे प्रतीक नाही. ते युगानुयुगे चालत आलेल्या सत्ताकारणाचेच प्रतीक आहे.

## मगध : कल्याणकारी राज्य : एक भ्रमजाल

'मगध'ला जायचं तर आहे; पण मगध आहे की नाही, मगध कुठं आहे, मगधला जायचं तर कुठल्या दिशेला जायचं आहे; मगधचा शोध घेणाऱ्यांनाही ते माहीत नाही, पुस्तकात ज्याविषयी वाचलं होतं ते मगध आपण हरवून बसलो आहोत; तुम्हाला जे मगध हवंय, ते मगध कुठे नाहीच– अशा संभ्रमावस्थेत हा कवी स्वतः सापडलेला आहे; आणि वाचकांनाही तो तसाच संभ्रमित करण्याचा जणू आटोकाट प्रयत्न करतो आहे. मगध होऊन गेलं, मगध नव्हतंच कधी; मगध व्हायचं आहे– मगध असं होऊ लागलं आहे, मगध मागं राहिलं आहे, मगध अजून पुढंच आहे– अशा भ्रमजालात सापडलेल्या कवीला दिसतं की मगधवर मगध, मगधवर मगधचे थर जमा झाले आहेत आणि आता मगध असणार नाही, जे असेल ते मगध नसेल, अशा जाणीव-नेणिवेच्या चक्रव्यूहात तो सापडला आहे. वास्तव-अवास्तव, भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांच ही जी धूसर सीमारेषा आहे, ती या सर्व कवितांच्या गाभ्याशी आहे.

केवळ मगध राज्यापुरतेच नव्हे, तर काशी, कोसंबी, हस्तिनापूर, कपिलवस्तू, तक्षशिला, उज्जैनी, अवंती, अमरावती, मिथिला, नालंदा, वैशाली, श्रावस्ती, कोसल या कविताही अशाच त्या त्या शहरांबद्दलची साशंकता प्रकट करतात. उज्जैनी उज्जैनी राहिलेली नाही कारण तिथं न्याय उरलेला नाही. मगध मगध राहिलेलं नाही. कारण तिथं दया उरलेली नाही, रया उरलेली नाही, मिथिलेत विदेहाऐवजी संदेहाचे राज्य आहे, धर्माची भीती चेपलेली आहे. हस्तिनापुरात कोणी कोणाचं ऐकत नाही. जे ऐकतात ते बाहेर आहेत. वैशाली एक स्मृती आहे जे आमच्याआधी आले त्यांची. आम्ही असू तर वैशाली असेल. आम्ही नसलो तर वैशाली नसेल. कोसल हे गणराज्य फक्त कल्पनेत आहे. तेथील प्रजा सुखी आहे. तिथं कोणी तक्रार करीत नाही, कुणीच बोलत नाही, गर्दी एका तालासुरात आपण सुखी असल्याची ग्वाही देत असते. कारण विचार करून बोलण्याची शैलीच अजून त्यांना अवगत झालेली नाही. मगधमध्ये विचार करतो तो एक शकटारच. तो थरथर कापतो. कारण 'जो विचार करतो तोच भयभीत होणार !'

मगधमध्ये म्हणून सर्वजण गप्प असतात. 'मगध टिकवायचे असेल तर तेथे शांतता हवी, कोणी किंचाळता कामा नये, तक्रार करता कामा नये. साहजिकच मगधमध्ये स्मशानशांतता प्रस्थापित झालेली आहे. परिणामतः मगध हे गाव राहिलेलं नाही, ते केवळ नाव उरलेलं आहे. परंतु इतर शहरांचीही अवस्था काही प्रशंसनीय नाही. श्रावस्ती वांझ आहे तर कोसंबी वैधव्यात, कपिलवस्तू पांढरीफटक तर अवंती उघडीबोडकी, वस्त्रहीन. काशीत फक्त प्रेतांचा हिशेब चालतो.

## सद्यःकालीन संदर्भ

या अशा तपशिलातले सद्यःकालीन संदर्भ हे एकदम अंधारलेल्या आकाशात वीज चमकून जावी तसे लखलखाट करून, अंतःकरणात एक सन्नाट लहर दौडवून जातात. बाणांच्या शय्येवर तळमळणाऱ्या पितामहांची समजूत महाभारतकार व्यासांनी काढावी असं सांगतानाच, आयाराम गयारामांच्या या जमान्यातला कवी म्हणतो :

*व्यासांनी कुठेही सांगितलेलं नाही की हरल्यानंतरही पक्ष बदलू नये.*
*...व्यासांनी कुठेही सांगितलेलं नाही की युद्धात सत्य मारलं जात नाही.*
*...व्यासांनी कधी सांगितलं की जो महाभारत लिहितो तो पक्षपाती असत नाही.*
*नियम बदलला जाऊ शकत नाही, असं म्हणू नका,*
*जो दुसऱ्याला लागू होतो तो मलाही लागू होणारच.*
*मोडला जाऊ शकत नाही तो नियम,*
*नियम बदलता मात्र येतो, सैल करता येतो. (नियम)*

पं. कमलापती त्रिपाठी यांच्यासारखे बुजुर्ग काँग्रेस (आय)च्या कार्याध्यक्षपदी विराजमान होतात तेव्हा काय होते ?

*काशीचे पंडित अवंतीच्या ज्ञानाला हसतात.*
*अवंतीचे पंडित काशीच्या तर्कशास्त्राला*
*हसतात*
*ही महाकालीची कृपा. (कृपा आहे महाकालीची)*

यशवंतराव चव्हाण यांच्यासारखा नेता पुनश्च काँग्रेसमध्ये येताना स्वगृहाची भाषा वापरतो तेव्हा वर्मा म्हणतात : 'मी परत येऊ लागलो हे म्हणणे निरर्थक. तसेच मी स्वगृही पोहोचलो आहे हे म्हणणेही निरर्थक. मी काळासोबत चाललो आहे. काळ तुम्हाला बदलवत आहे. तुम्ही काळाला बदलवत आहात.' (मित्रांचे प्रश्न)

## तिसरा रस्ता : कोणालाच नको

मगधमध्ये सगळीकडे गोंधळ आहे. कारण तेथे राज्यकर्ते उरलेले नाहीत. राज्यकर्ते नाहीत म्हणून कायदेकानू नाहीत. व्यवस्था नाही, समाज, धर्म, व्यक्ती काही नाही. आता हे राज्यकर्ते का उरलेले नाहीत याचे कारण ? मदिरा, मस्ती आणि आळस यांमुळे राज्यकर्ता म्हणावे अशा योग्यतेचे कोणी उरलेले नाही. अशा वेळी दोन रस्ते दिसतात. कुनीतीने वागत राहावे व नीतीवर चर्चा करावी; दुराचरण करावे व सदाचारावर चर्चा करावी; असत्य बोलावे. सत्यासाठी प्राण देण्याची भाषा मात्र करू नये. 'प्राण सगळेच सोडतात, परंतु आपण निष्कारण प्राण टाकू नये.'

मात्र शेवटी कवी आणखी एक तिसरा रस्ता असल्याचे सूचित करतो. तो रस्ता कोणता हे तो सांगत नाही. फक्त एवढेच सांगतो की, हा रस्ता मगध, अवंती, कोसल इ. शहरांवरून जात नाही. (तिसरा रस्ता) सत्तेच्या जवळपासही न जाणारा हा रस्ता, विजनवासाचा, वैराग्याचा, संन्यासाचा असणार.

दिल्लीतील राजकीय वातावरण, राज्यकर्त्यांची तऱ्हा, आयाराम-गयारामची झोंबी, राजकारणी लोकांच्या कोलांटी उड्या, 'स्वगृही' वा स्वपक्षात परतण्याची भाषा, कायदेकानूंचा आपमतलबी अर्थ लावण्याची वृत्ती, प्रसंगी गैरसोयीचे कायदेच बदलण्याची फायदेशीर सोय, सत्य-नीती-न्याय यांची राजरोस पायमल्ली करण्याची किंवा त्यांच्या खरेपणाबद्दलच संदेह निर्माण करण्याची बुद्धिवाद्यांची तार्किक चलाखी– या संदर्भात मगधवरील कवितांमधील निरीक्षणे चपखल बसतात. समाजवादाकडे हा रस्ता जातो याचा कोणी आग्रहाने निर्वाळा देतो, तर समाजवादाकडे जाण्यासाठी मुळी रस्ताच नाही, हा रस्ता कुठेही जात असेल पण समाजवादाकडे निश्चितच नाही अशी परस्परांना छेद देणारी विधाने आपल्या तार्किकतेची मर्यादा व निरर्थकता स्पष्ट करतात. राज्यकर्ते जनतेला भुरळून टाकण्यासाठी जी मोठमोठी आश्वासने देतात ती कशी भडक-भ्रामक आणि खोटी असतात याची कवीला पुरेपूर जाण आहे. राज्यकर्त्यांच्या घोषणाबाजीवर भाबडी जनता विश्वास ठेवते आणि निवडणुकीत मतांचा वर्षाव करते हे श्रीकांत वर्मांना माहीत असले तरी असल्या

घोषवाक्यांचा फोलपणा त्यांना नजरेआड करता येत नाही असाच याचा अर्थ आहे.

## आपले रस्ते भलतीकडेच जातात

आपल्या घोषणा, आपली उद्दिष्टे आणि आपले मार्ग यांची जी भयानक गफलत सध्या चालू आहे ती श्रीकांत वर्मांना अस्वस्थ करते.

'नालंदा' मध्ये ते म्हणतातः 'नालंदेला जाणाऱ्या मित्रांनो, नेहमी असंच होतं. दाखवण्यात आलेल रस्ते जिथं आपल्याला पोहोचायचं असतं तिथं जात नाहीत. उदाहरणार्थ, नालंदा.' लोकशाही समाजवादाचे, कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट समोर ठेवून आपण जो मार्ग आखतो, तो मार्ग आपल्याला लोकशाही समाजवादाकडे वा कल्याणकारी राज्याकडे नेतच नाही. आपण भलतीकडेच पोहोचतो. या दैवदुर्विलासाकडे, शोकांतिकेकडे आपलं लक्ष वेधण्याचे काम कवी करतो. आज युद्ध न होताच निःशस्त्र शत्रू परत जातो आणि तरीही आपण आपलाच जय झाला म्हणून चक्रवर्तीच्या थाटात अभिनंदने स्वीकारतो. (कोसलमध्ये विचारांची उणीव आहे.) आजच्या युगातला हा विषम सामना आहे. असहाय एकाकी दुबळ्यांवर विजय मिळवण्यात आपला सारा पराक्रम सामावलेला आहे. त्या पराक्रमातला खोटेपणा श्रीकांत वर्मा यांना बोचतो आहे.

## सत्तेच्या पायऱ्यांचे गौडबंगाल

या नव्या राजकारणाच्या शैलीत सत्तास्पर्धेच्या पायऱ्या चढणे सोपे नाही. त्या संपता संपत नाहीत. त्या पायऱ्या प्रगतीच्या असतील वा अधोगतीच्या, प्रस्थानाच्या असतील वा आगमनाच्या, मरणाच्या असतील वा अभिमानाच्या, त्यावर आपण चढत असतो तसेच उतरत असतो, पण आपण किती पायऱ्या चढलोय्, किती उतरलोय, याचा कधीच अंदाज लागत नाही. कोण चढतंय, कोण उतरतंय याचाही छडा नेमका लागत नाही. वसंतसेनेला हे कळत नाही, कारण 'अजून तू तरुण आहेस' असे कवी तिला सांगतो. दिल्लीतल्या राजकीय प्रभावळीत सर्वोच्च नेत्यांच्या जवळपास पोहोचणारे जसे अधिकाराच्या वरवरच्या श्रेणी चढत असतात, तसेच खोल खालीही येत असतात. कालचे सत्ताधीश आज कुठल्या कुठे फेकले गेलेले दिसतात. राजकीय प्रभुत्वाकडे नेणाऱ्या पायऱ्याच राजकीय अधोगतीकडे, आत्मघाताकडे लोटत असतात. पायऱ्या चढणाऱ्याच्या ते ध्यानात येत नाही एवढेच !

## हौतात्म्य कोण पत्करतात ? सत्ता कोण मिळवतात ?

रक्ताचा टिळा लावून राज्याभिषेक केला जातो. हे रक्त कुणाचं असतं ? ते रक्त कुणाचं आहे यानं काही फरक पडतो का ? मौर्य रक्त सांडणं हा अपशकून होतो का ? मौर्य त्या वेळीही आपला विजयोत्सवच साजरा करत असतात. कुठल्याही चळवळीत हौतात्म्य कोण पत्करतात आणि निवडून कोण येतात याचा मेळ कधी लागतो का ? संयुक्त महाराष्ट्राच्या

चळवळीत जे हुतात्मे झाले त्यांपैकी एकाचा तरी जवळचा कोणी नातलग महाराष्ट्राच्या मंत्रिपदी बसला का? असा काहीसा पेचदार प्रश्न आहे. 'पाटलीपुत्र' या कवितेत श्रीकांत वर्मा यांनी हा प्रश्न उभा केला आहे.

## राजकारणाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारी कविता

बरे, ज्या व्यक्तीला सत्ता मिळते, जिची थाटाने मिरवणुक निघते तिला तरी दीर्घकाळ त्या सत्तेचा उपभोग घेता येतो असे आहे का? तसेही नाही. वीस वर्षांनी तशीच मिरवणूक निघते तेव्हा तो नेता त्या मिरवणुकीत चालत असतो, परंतु सूत्रे दुसऱ्या कोणाच्या हाती आहेत आणि आपण केवळ सवयीने मागोमाग चालत आहोत हे त्याला कळत असते, याची नोंद 'परती' ही कविता करते. राजकारणाच्या सद्यकालीन रूपामध्येही इतिहासाचे अंतस्त्रोत सतत वाहतच असतात, याचे भान 'मगध'मधील एकाही कवितेत सुटलेले नाही. राजकीय घटनांकडे पाहण्याची एक नवी दृष्टीच या कवितांद्वारे प्राप्त होते.

## आत्मसंघर्षाचा आविष्कार

'मगध'मधील कवितांना असा हा दिल्लीतील राजकीय घटनांचा अंतर्बाह्य संदर्भ आहे. त्या घटनांभोवती असणारे अनिश्चिततेचे, धूसरतेचे वातावरण हे श्रीकांत वर्मा यांनी 'मगध' च्या प्राचीन राज्याचे प्रतीक योजून अधिकच गडद केले आहे. स्वतःचीही काहीशी होणारी कुचंबणा आणि सरळ निवेदनातून हे सर्व उभे करण्यात जाणवणाऱ्या अडचणी यातून 'मगध'च्या प्रतीकाद्वारे त्यांनी उत्तम प्रकारे सोडवणूक करून घेतली आहे असे निश्चितच वाटते. श्रीकांत वर्मा इंदिराजींच्या म्हणजेच पर्यायाने भारतीय राजकारणाच्या सर्वोच्च सत्तास्थानाच्या जवळपास वावरत होते आणि त्यायोगे एकीकडे आपल्या प्रभावाची जादू अनुभवत होते, परंतु दुसरीकडे त्यांच्यातील डॉ. लोहिया-अज्ञेय-मुक्तिबोध यांच्याशी इमान बाळगणारा, धडपडणारा कलावंत मात्र प्रचंड आत्मग्लानीने आणि पश्चात्तापाने होरपळून निघत होता. स्वतःशीच त्यांचा मोठा आत्मसंघर्ष चालू होता. तो आत्मसंघर्ष 'मगध'च्या रूपाने प्रकट झाला आहे आणि म्हणूनच 'मगध' या काव्याने केवळ हिंदी कवितेलाच नव्हे, तर संबंध भारतीय कवितेलाच एक नवे लेणे बहाल केले आहे.

## आशयाला अनेक परिमाणे देणारी संदिग्धता

श्रीकांत वर्मा यांच्या या कवितांचे शब्द साधे सोपे आहेत, प्रतिमा-प्रतिकांचेही येथे विशेष अवडंबर नाही. परंतु तरीही त्या वाचू लागले की, त्यांच्या आशयातील बहुपेडीपणा, व्यामिश्रता आणि वेगवेगळ्या पातळ्या आपल्याला भयचकित करू लागतात. त्यातील संदिग्धता आणि धूसरपण हा त्या आशयाला अनेकविध परिमाणे देतो, तात्त्विक अधिष्ठान देतो. लहानपणी कुठलीही कोरी भिंत दिसली की, आपलं नाव लिहिणारा कवी, दुसऱ्या

दिवशी ते नाव पुसलेले दिसले की कोणा सोमदत्तावर ठपका ठेवायचा. परंतु आता वृद्ध झालेला कवी कोऱ्या भिंतीवर चुनखडीनं लिहिलेलं नाव पुसलं गेलेलं बघितल्यावर 'कुणी पुसलं हे' असा प्रश्न विचारून उत्तर देतो– काळानं पुसलं. तेव्हा त्या उत्तरात कवीची प्रगल्भताच प्रकट होते. विष पिऊनसुद्धा सगळेच शिव होत नाहीत, पण विष प्याल्याशिवाय कुणीच शिव बनत नाही हे या वयात त्यांना कळून चुकलेलं आहे.

## अखेरची कविता : मृत्यूची चाहूल

'अश्वघोष' ही कर्करोगाशी दुर्धर लढा देताना लिहिलेली, मृत्यूपूर्वी चार-पाच महिने आधी लिहिलेली कविता. स्वतःलाच सुखी मानून हसत राहणारा अश्वघोष शोकविव्हळ अवस्थेत दिसतो. पायऱ्या चढून जाताना हसणारे-खिदळणारे लोक पायऱ्या उतरताना अश्रू गाळत असतात. कधी स्वतःला तर कधी पायऱ्यांना शिव्या घालत असतात. परंतु काळ जवळ आला की, 'मी कोण आहे ?' हे स्वतःला अंतर्मुख होऊन विचारण्याऐवजी गडबडून 'तू कोण आहेस ?' असंच विचारत सुटतात. . . तर मणिकर्णिकेची आठवण करून आसन्नमरण कवी स्वतःलाच बजावतो : 'कण्हतो आहेस कशाला ? कुठलाही उपाय तुला मणिकर्णिकेपासून वाचवू शकणार नाही. कुठलीही विस्मृती वास्तवावर पडदा टाकू शकणार नाही.' २५ मे १९८६ रोजी वयाच्या अवघ्या ५५ व्या वर्षी श्रीकांत वर्मा न्यूयॉर्कमधील एका रुग्णालयात कर्करोगाने मृत्यू पावले.

म्हणून 'मगध' च्या या कवितांचे मराठीकरण करून चंद्रकांत पाटील यांनी एक चांगले काम केले आहे. या मराठीकरणात कुठे कुठे खटकणाऱ्या जागा आहेत, परंतु श्रीकांत वर्मा ह्यांच्या आंतरिक ओढाताणीच्या वेदनांची जाण व्हायला त्यामुळे बाधा येत नाही. 'जे लिहिलं होतं ते व्यर्थ, जे लिहिलं नाही तो अनर्थ' अशा श्रद्धेने हे लेखन घडलेलं आहे, त्यामुळे या कवितांचा सूर सच्चा आहे. वाचकाला अंतर्बाह्य ढवळून काढणारा आहे.

(मगध आणि नंतरच्या कविता : श्रीकांत वर्मा, अनुवाद : चंद्रकांत पाटील, प्रकाशक : नामदेव ढसाळ, आंबेडकर प्रबोधिनी, ९४ हाजी कासम चाळ, जेकब सर्कल, मुंबई ११. पृष्ठे : ९८ + १४, किंमत २५ रुपये.)

□

# राजघाट : अरुण शेवते

## *एक राजकीय उपहासिका*

अरुण शेवते यांच्या 'राजघाट' या कवितासंग्रहाचे प्रकाशन दिल्लीला त्यांचे खासदार मित्र यशवंतराव गडाख यांच्या पुढाकाराने झाले. हे पुस्तकही खा. गडाख यांनाच अर्पण करण्यात आले आहे. सुरवातीलाच मानलेल्या आभारात गं. बा. सरदार, रवींद्र पिंगे, डॉ. बारलिंगे यांच्यापासून तो डॉ. बाबा आढावपर्यंत ४९ साहित्यिक-विचारवंत मित्रांचा वेळोवेळी प्रोत्साहन दिल्याबद्दल आभारपूर्वक निर्देश करण्यात आला आहे. त्याशिवाय प्रकाशक, मुद्रक वगैरेंचे उल्लेख आहेतच.

'राजघाट'या कवितामालिकेच्या केंद्रस्थानी अरुण शेवते यांची अस्वस्थता आहे. भारताच्या आजच्या बकाली आणि मूल्यहीन अवस्थेच्या दर्शनाने संवेदनाशील मनाची तगमग होते. ती व्यक्त करण्यासाठी महात्मा गांधींना उद्देशून, 'तुमचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले,' असे पालुपद घोळवत बसणे हा मार्ग त्यांना सापडला आणि सद्यःकालीन जीवनातील विसंवाद उपरोधिकपणे प्रकट करण्यासाठी गांधीजींच्या तीन माकडांच्या प्रतीकांचा चांगला वापर करता येईल, याचा त्यांना एका 'मध्यरात्री' साक्षात्कार झाला. सद्यःकालीन समूहजीवनातील स्थित्यंतरामुळे वाटणाऱ्या अस्वस्थतेला गांधीजी व त्यांची तीन माकडे यांचा आधार मिळाला आणि 'खचून गेलेले कविमन स्वतःच्या बळावर उभे राहिले,' असे श्री. शेवते आरंभीच स्वतःहून स्पष्ट करतात.

### वास्तवातून अवास्तवात

सद्यःस्थितीची ही जी भीषणता आहे, ती शेवते यांना कशी दिसते ? त्यांना या देशाचा लिलाव चालू आहे आणि तोही संसदेसमोर असे वाटते आहे. दलाल बोली करत आहेत. येथील सारेच अर्जुन हे आता वाचाळ पंडितांचे गंडे बांधून महालात बसून मागच्या पिढ्यांचे हिशेब लिहीत आहेत. दिशा असलेल्या आणि नसलेल्या रस्त्यांवरून आपापले रथ हाकण्यासाठी ते उत्सुक आहेत. राजघाटावर फुले वाहण्यासाठी त्यांच्यात स्पर्धा आहे.

त्याचबरोबर त्यांना असेही जाणवते आहे की, या देशात काहीच उरलेले नाही. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत हा देश भकास बनला आहे. कफल्लकांचे तांडे भीक मागत हिंडत आहेत. प्रार्थना, याचना करीत आहेत.

परंतु हे दृश्य नीट पकडण्याच्या प्रयत्नात अरुण शेवते मध्येच अडखळतात आणि वास्तवातून एकदम अवास्तवात शिरतात. त्यामुळे विंचवाच्या पाठीवर पक्ष्यांनी संसार थाटायचे चित्र त्यांना दिसू लागते. येथे घरे नाहीत, गुढ्या नाहीत, झेंडे नाहीत, चक्रव्यूहात सापडलेला अभिमन्यूही नाही, असे ते म्हणू लागतात. या संग्रहातल्या सगळ्याच कवितांत ही वास्तव-अवास्तवामधील 'अँबिग्युअस' कसरत बघायला मिळते. वैचारिकतेचा आव आणणारी ही कविता अगदीच भुसभुशीत बनते आणि कविता म्हणूनही ती आपले सत्त्व व स्वत्व प्रस्थापित करण्यातच उणी पडते.

## बोथट उपरोध

सद्यःस्थितीवर उपरोधपूर्ण टीका करण्याची, त्यातील लुच्चेपणा आणि भंपकपणा दाखविण्याची कवीची इच्छा दिसते. परंतु त्याच्या समर्थ आविष्कारासाठी लागणारी विसंगती टिपणारी नेमकी उदाहरणे कवीला पकडता येत नाहीत. त्यामुळे हे उपरोधाचे शस्त्र अगदीच बोथट बनते. प्रतीके व प्रतिमा एकदा निवडल्या की, त्यांचा नेमका वापर करावा लागतो. त्यामुळे आपल्याला अभिप्रेत असणारा आशय विजेच्या लखलखाटाप्रमाणे उजळून निघावा लागतो. कोणावर वार करायचा असेल, तर तो नेमका वर्मावर व्हावा लागतो. परंतु राजघाटमधील कविता असा नेमका वार करण्यात कुठेच यशस्वी होत नाहीत. इकडे-तिकडे उगीच फटकेबाजी करीत उलट अधिकच गोंधळ निर्माण करतात.

## सच्चा सूरच गवसत नाही

या संग्रहातील पहिलीच कविता घ्या. 'बापू, तुमचे घर दंगलीत शाबूत आहे का ते सांगा' या पहिल्या ओळीवरून गांधींच्या एकूणच अहिंसेच्या शिकवणीतील वैयर्थ्य स्पष्ट करण्यासाठी ही कविता असावी, असा आपला ग्रह होतो. 'एखाद्या भगतसिंगाला तुमचे घर वाचविण्यासाठी बोलावता येईल, 'ही दुसरी ओळ गांधींच्या अहिंसेच्या रक्षणासाठी क्रांतिकारकांची सशस्त्र मदत लागेल का, असे सांगून गांधीविचाराचे अपयश अधिक गडद करते. परंतु यापुढची कविता मात्र अगदी वेगळ्याच रुळावर जाते. सत्याग्रहींनी उपोषण करून चालणार नाही. तुमचा काळ वेगळा होता. त्या काळाचे अवशेष साबरमतीवरही मिळणार नाहीत.' अशी विधाने कवी करतो आणि एकदम उठसूट गांधींचे नाव घेऊन उपोषण करणाऱ्या, वृत्तपत्रांत फोटो छापून आणणाऱ्या सोम्या-गोम्याचे उदाहरण पुढे करून 'त्यांच्या मूल्यांचा दहावा जाहीरपणे साजरा होतो.' असे सांगून, 'लोक हळहळतात, निघून जातात,' अशी शेवटची ओळ लिहून कविता संपवितो. दंगलीत बापूंचे घर शाबूत

राहिले का हा प्रश्न विचारून सुरू होणारी ही कविता फालतू लोकांनी उपोषणमार्गाची केलेली विटंबना दाखवून संपवते तेव्हा तिच्यातले मुख्य सूत्रच निसटून जाते. अशा फालतू उपोषणाचा शेवट वृत्तपत्रांत फोटो छापून होतो, तेव्हा 'लोक हळहळतात' ते कशासाठी, हेच कळत नाही. बापूंचे घर जळले म्हणून ? गांधींची शिकवण फसली म्हणून ? उपोषणाला बसणाऱ्यांबद्दल सहानुभूती म्हणून ? का हळहळतात लोक ? आणि हे हळहळणारे लोक तरी कोण ? ते जर संवेदनाक्षम असते, तर गांधींच्या उपोषण कल्पनेची अशी विटंबना करणाऱ्याबद्दल हळहळतील की चिडून त्याला बदडून काढतील ? टाळ्या मिळविण्यासाठी पुढारीछाप वक्तव्य करणाऱ्या ढंगातल्या या कवितेला त्यामुळे सच्चा सूरच गवसत नाही. याच एका कवितेबाबतीत हे घडते असे नाही; तर या संग्रहातील सर्वच कविता खूप काही सांगण्याचा आव आणणाऱ्या, पण काहीच अर्थपूर्ण सांगू न शकणाऱ्या अशा झाल्या आहेत. क्वचित थोडेफार नेमके काही सांगतात तेव्हा त्या सांगण्यात काही खास वेगळेपण असतेच असे नाही.

## वर्मावर वार

गांधीजींचे नाव धारण करणाऱ्या बापूनगर झोपडपट्टीत दलितांच्या झोपड्या जाळल्या जातात हे बघून आपला एक डोळा ओलावत नाही कारण तो जन्मापासून कोरडा आहे, तो कायम दुष्काळात वावरत असतो, माणूस मेला तरी तो कोरडाच असतो असे ते सांगतात. परंतु दुसरा डोळा मात्र दररोजच्या जगण्याचे संदर्भ जाणून घेऊन, करुणेचे हुंकार ऐकत, मध्यरात्रीही ओलाच असतो व तो गांधींकडे काही तरी सांगण्यासाठी धाव घेतो, असे कवी सांगतो. कवीच्या या दोन डोळ्यांपैकी कुठला डोळा केव्हा, कुठल्या दृश्याकडे बघत असतो, यावर त्या दृश्याचे रूप ठरते. गांधीजींच्या डोळ्यादेखत उन्मळून पडलेली नौखालीतील झाडे; त्यांना कुणी वाली मिळाला नाही, ती अनाथ राहिली हे सांगताना त्यांचा करुणार्द्र डोळा पाणावलेला असतो; तर गुंडांच्या वस्तीतल्या गांधींच्या पुतळ्याजवळ कावळे येतात तेव्हा दुसरा कोरडा डोळा ते पाहून म्हणतो, 'त्यांचे आयुष्य धन्य व्हायला तेवढाच एक मार्ग असतो.' परंतु असा हा उपरोधाचा व उपहासाचा वार अगदी वर्मावर करणाऱ्या ओळी या कवितांतून क्वचितच आढळतात.

## हुलकावणी देणारी कविता

'बापू, तुम्हाला तुकाराम भेटला की नाही मला माहीत नाही' या कवितेतील कल्पना कशी छान आहे ! तुकारामाने मग मीठ उचलले असते. दांडीयात्रेतील सत्याग्रही सैनिकांचे आयुष्य अभंगांनी अमर झाले असते,' इथवर ही कल्पना सुंदर वाटते. परंतु पुढे एकदम 'नौखालीला तुकारामाने आत्महत्या केली असती.' अशी ओळ येथे येते आणि कविता दुसऱ्याच टोकाला जाते. हे दुसरे टोक कोणते ? तर मीरेच्या भजनात दंग झाल्याने हरिजन

वाड्यातील विष पिणाऱ्या मीरा तुमचे रामराज्याचे स्वप्न भंग होऊ नये लांब राहिल्या' असा चक्क हेत्वारोप करणारे तुकाराम व गांधी यांच्यातीलच जवळ येणे न येणे हे सूत्र अखेरपर्यंत नीट हाताळले असते तर ही कविता अर्थपूर्ण अनुभूती देऊ शकली असती ! आहे या अवस्थेत ती एक हुलकावणी ठरते.

## कल्पनेचा पाठपुरावा

अनेक कवितांतून चांगली वाक्ये चमकदार कल्पना सांगतात, पण त्यांच्या आगेमागे असणाऱ्या ओळी त्या कल्पनांना कुठेच आधार देत नाहीत.

*ऊन आता प्रौढ होत चालले आहे.*
*सकाळच्या भविष्याची पत्रिका कुठल्याही ज्योतिषाला सापडत नाही.*
*सगळेच रथी-महारथी ठाण मांडून बसले आहेत*
*सगळ्यांनाच तुमचा प्रसन्न चेहरा हवा असतो.*
*१५ ऑगस्टला सत्याच्या प्रयोगाचे जाहीर वाचन होते*
*निवडणुकीसाठी हिंदुस्थानात तुम्हाला उभे केले जाते.*
*तुमचे सत्याचे प्रयोग निवडणुकीत अनाथ होतात*
*जिथे तुमचा जन्म झाला,*
*त्या पोरबंदरचे रस्ते*
*भारताच्या नकाशात कुठेही सापडत नाहीत*
*अंधाराने तुमचे घर गिळंकृत केले आहे.*

ही कविता अकरा ओळींची. 'निवडणुकीसाठी हिंदुस्थानात तुम्हाला उभे केले जाते, तुमचे सत्याचे प्रयोग निवडणुकीत अनाथ होतात,' या दोन ओळी या कवितेतील मध्यवर्ती आशय प्रकट करतात. परंतु त्याआधीच्या ओळी (उन्हाचं प्रौढपण, ज्योतिषाला न सापडणारी पत्रिका, रथी-महारथी, सगळ्यांना हवा असणारा चेहरा) या 'गांधींना निवडणुकीत उभे केले जाते,' या कल्पनेला कुठली पुष्टी देतात का? पुढच्याही ओळी पोरबंदरच्या रस्त्यांचा उल्लेख करून या मध्यवर्ती आशयाला कसली बळकटी आणतात का? त्यामुळे मध्यवर्ती आशय प्रगट करणाऱ्या या दोन ओळी उपऱ्या ठरतात. त्या मुख्य मानल्या तर इतर ओळी अनावश्यक, अ-संगत ठरतात. एक विशिष्ट युक्तिवाद, विधान, प्रसंग वा चित्र रेखीवपणे उभे राहू शकले तरच ते प्रभावी ठरते.

## उत्तम कल्पना, सुमार आविष्कार

दुष्कृत्ये पाहण्याची पाळी येऊ नये म्हणून डोळे मिटून घेणारे माकड, दुर्वचन ऐकावे लागू नये म्हणून कानांवर हात ठेवणारे माकड आणि कोणाबद्दल वाईट बोलावे लागू नये म्हणून तोंड बंद ठेवणारे माकड-अशी तीन माकडे गांधीजी नेहमी आदर्श म्हणून

उदाहरणादाखल घेत. अरुण शेवते यांनी या तीन माकडांच्या प्रतीकाचा वापर सद्य:स्थितीचा वेध घेण्याकरिता केला आहे. ही कल्पना त्यांना उत्तम सुचली यात शंकाच नाही, परंतु ती त्यांना प्रभावीपणे वापरता मात्र आलेली नाही. त्यामुळे या प्रतीकाचा वापर करूनं लिहिलेल्या कविताही बुळबुळीत बनल्या आहेत.

## विविध प्रसंगांतून जीवनदर्शन

माकड गावात येते तेव्हा त्याचे होणारे स्वागत चमत्कारिक असते. (दारूचे फुगे चावडीकडे जात होते, फुलांचे प्रेत चावडीवर टांगले होते व त्यावर अहेवपणी जाणाऱ्या स्त्रीचे वस्त्र ठेवले होते), कुत्र्यांच्या सहवासात राहून कळ्यांची फुले कशी होतील या भीतीने माकडाला हुंदका फुटतो, माकड उपोषणाला बसते. (सत्याग्रहींच्या आयुष्याचा लिलाव करण्यात आला, रोजंदारीने सत्याग्रहींना विकत घेण्यात आले), माकड देवळाच्या आश्रयाला गेले, डोळे बंद असलेले माकड हे सरहद्दीवरचा चाचा आहे असे वाटले. गुरुद्वारात त्याला प्रवेश मिळाला नाही. माकडाला सायंकालीन प्रार्थनेला जाता आले नाही. कारण त्याला कुठलाच धर्म नव्हता, प्रार्थनेला माकड उभे राहिले तेव्हा त्याच्यावर हल्ला झाला, ते निराधार झाले तेव्हा बापू त्याच्या स्वप्नात गेले, पोरबंदरला माकड गेले तर त्याला पाहताच तेथील रस्ते पाठमोरे झाले, तेथील धर्मशाळेत त्याला प्रवेश नाकारण्यात आला. कारण तेथे जुगाऱ्यांचे डाव रंगात आलेले होते, रस्त्यावर झोपलेल्या माकडाला पोलिस कोर्टात पाठवितात. परंतु ते सज्ञान आहे, हे सिद्ध न करता आल्यामुळे त्याला रिमांड-होममध्ये भरती केले जाते. तेथून ते बाहेर पडते तर बापूंचे घर जळताना दिसते. त्या घराची राख घेऊन ते राजभवनावर जाते. तेथे कावळ्यांनी आत्मदहन केलेल असते. परंतु संसदेचे अधिवेशन चालू नसल्याने सुतक पाळायचे फर्मान निघू शकत नाही.

माकडाला संचारबंदीच्या काळात पकडण्यात येते, आश्रमातून ते बाहेर पडते, बापूंची प्रार्थना म्हणत शहरात हिंडते, रामाच्या पादुका दारूच्या गुत्त्यावर ठेवल्या आहेत, असे कळल्याने ते गुत्त्यावर जाऊ लागते, दारू पिऊन ते बापूंना शिव्या देत नाचू लागते, माकडाचे मौन मोडणाराला संसदेची खुर्ची मिळेल अशी घोषणा होते.माकडाला प्रत्येक दिवस जाब विचारू लागतो, माकडाच्या शेपटीने लंका जाळली, आता शेपटीविना इतिहास जळतो, माकडे संसदेसमोर आत्महत्या करायला निघतात. संसदेसमोर त्या माकडांचे स्मारक बांधायला हवे, माकडे इतिहासकारांच्या घरात दिवा पेटवतील, अशी काहीशी ही माकडविषयक कल्पनांची साखळी अरुण शेवते या कवितांतून उभी करतात. परंतु ती मालिका सद्य:जीवनाचे विडंबन करण्यात वा त्याचे फुसकेपण सिद्ध करण्यात यशस्वी होत नाही. त्याचप्रमाणे काही विशिष्ट युक्तिवादही बिनतोड मांडत नाही.

मनात बरेच काही खदखदत असते, पण ते जोपर्यंत आपले स्वत:चे रूप घेऊन शब्दांत प्रकट होत नाही, तोपर्यंत साहित्य होत नाही. या कवितांना हे वाङ्मयीन रूप

गवसलेले नाही. शेवते यांना आधार सापडल्याचा जो भास झाला आहे, तो स्वतःच्या पायावर उभा राहण्याएवढा समर्थ नाही. अधिक भक्कम असा काव्यविषयक संकल्पनेचा आणि ऐहिकाबद्दलच्या उत्कट रागलोभाचा शोध घेत त्यांना अजून बरीच वाटचाल करावी लागेल.

(राजघाट : अरुण शेवते, प्रकाशक : सुरेश एजन्सी, २०५ शुक्रवार पेठ, पुणे २.
पृष्ठे ६९, पंचवीस रुपये)

□

# यक्षरात्र : अरुणा ढेरे

## *कवितेचा समंजस कांचन स्वर*

मैत्रेयी ही लघुकादंबरी, मराठी प्रेमकविता व नागमंडल यांसारखी संपादित पुस्तके व त्यांच्या प्रस्तावना, प्रारंभ व यक्षरात्र हे काव्यसंग्रह, ललितलेख इत्यादी लेखनकर्तृत्व आणि शैक्षणिक दूरदर्शनचे अनेक कार्यक्रमांचे निर्माणकार्य ज्यांच्या नावावर जमा आहे अशा डॉ. अरुणा ढेरे म्हणजे आजच्या मराठी साहित्यविश्वातले वैदर्भी लेखनशैलीचे गुणविशेष आकर्षकपण प्रकट करणारे व्यक्तिमत्त्व आहे. डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या आरंभीच्या संस्कृत वाङ्मयातील आपल्याला भावलेल्या 'अमृतकन्यां'च्या रसाळ शब्दचित्रांच्या लालित्याचा प्रभाव अरुणा ढेरे यांच्या आरंभीच्या लेखनावरही जाणवतो. परंतु त्यांची पुढची वाटचाल ही वडिलांप्रमाणे संशोधनाच्या दिशेने न होता ललितलेखनाच्या आणि आस्वादक समीक्षेच्या दिशेनेच होईल, अशी शक्यता गेल्या दोन-तीन वर्षांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या पुस्तकांवरून वाटते. वर्तमानकाळापेक्षा प्राचीन ऋषिमुनींच्या, वेद-उपनिषदांच्या आणि आदिम संस्कृतीच्या वातावरणाशी अरुणा ढेरे यांचे मानसिक मैत्र जुळलेले दिसते. संस्कृतच्या अध्ययनाने हे मैत्र अधिक घनिष्ट झालेले जाणवते. परंतु संस्कृतच्या परंपरानिष्ठ अभ्यासाने येणारा वाङ्मयीन सांकेतिकपणा आणि जडपणा टाळून अरुणा ढेरे यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण आणि आधुनिक विदग्ध मराठीचे रसाळपण यांची मोहक सांगड घातली आहे.

'यक्षरात्र' ही कल्पनाच मुळात काव्यात्मक. वात्स्यायन दिवाळीला यक्षरात्र म्हणतो. यक्षाप्रमाणे रात्रही सुंदर आणि मायावी असते. 'ज्या रात्रीचा अंधार देखणा अन् उत्सवी असतो, स्वतःच प्रकाशमान असतो, अशा भारणाऱ्या अंधाराची रात्र म्हणजे यक्षरात्र. यक्षरात्र म्हणजे 'मंतरलेली रात्र' असे संग्रहाच्या मलपृष्ठावर यक्षरात्रीच्या प्रतिमेचे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे आणि 'निर्मितीचं रहस्य उरी-उदरी वागवणाऱ्या सृष्टीच्या जन्मापूर्वीच्या त्या आदिम तेजस्वी अंधाराशी यक्षरात्रीचं नातं आहे तसंच कवितेशीही तिचं नातं आहे' अशी पुस्ती जोडण्यात आलेली आहे.

## भळभळून वाहणारी वेदना

या कवितांमधील वातावरण आणि मानसिक अवस्था ही देखील या यक्षरात्रीप्रमाणेच आहे. भिन्नलिंगी व्यक्तीच्या परिचयाची आणि सहवासाची जादू तारुण्यात पदार्पण करता-करता पहिल्यांदाच अनुभवाला यावी आणि आपल्या सर्वस्वाला तिने झपाटून टाकावे. आपल्या अवघ्या अस्तित्वाला उजळून टाकणारी आणि सार्थकी लावणारी ही जादू पहिला बहर सरताच संपून जावी, आणि उर्वरित आयुष्याला झाकोळून टाकणारी भळभळून वाहणारी वेदना मात्र मागे अखंड उरावी- मंतरलेली ती यक्षरात्र केवळ हुलकावणी देऊन हातून निसटावी अशी काहीशी कहाणी बऱ्याच कवितांमधून आपल्याला खुणावत राहते.

## परावर्तित होणारा विश्वास

हा जो कोणी 'साजणा' या कवितांमधील 'मी'ला भेटतो, तो दाट विश्वासाचे आश्वासन तिला देतो. त्या डवरून आलेल्या विश्वासातून प्रीत दरवळून फुलते. (पृष्ठ ४० - मी बघते), अजिंठ्याच्या शिल्पासारखं जुनं पण चिरनवीन अन् सनातन विश्वासाभोवती परिवर्तनाच्या सहस्त्र कळांनी स्वाभाविकपणे उजळणारे आदिमायेचे रूपधर प्रेम (पृष्ठ ४१), करुणार्त नदीच्या काठी भोगाचा उत्सव सजवते (पृष्ठ ११) हा विश्वास एका क्षणातून दुसऱ्या क्षणात लांबवर पसरत हातापायांवर, चेहऱ्यावर, छोट्या घरावर परावर्तित होतो.

## अस्तित्वाचे न सोसणारे सुख

या प्रियकरासन्निध घालवलेल्या क्षणांनी आपले जीवन उजळून निघते. वीज झोंबून जावी तसे गीत आवेगाने भेटते, जीवनाने दिलासे दिले होते. त्याच्या गळामिठीने गात्रात चंद्रमंदिर आसक्त पाण्याचे सर्पधुंद वेढे आयुष्याला पडतात आणि या देहस्वी प्रदेशाखेरीज अन्यत्र कुठे तृप्तीची तळी असणारच नाहीत असे भान येते. (तू नसताना) प्राणाहूनही प्रिय-सुंदर होत जाणारा तो आख्खा हवाहवासा वाटतो (तेकओ) आपण कुणाला हवे असण्याचा आनंद, आयुष्याचा सगळा अर्थ जणू उलगडून दाखवतो (आयुष्याचा सगळा अर्थ), त्याचा मऊमवाळ चेहरा, तिचे हात हातात घेऊन निळ्या पहाडांच्या आणि निळ्या जलाशयाच्या हिरव्या उन्हात आणि गारव्यात तिच्याकडे बघत राहिलो तेव्हा अस्तित्वाचे सुख सोसवेनासे होते (नकोच काही). दिसायला भोळाभाबडा असणारा 'हा' शेजीत भलताच बलदंड निघतो.

## उद्ध्वस्त भावविश्व

परंतु प्रियकराच्या सान्निध्यातही ओळखीच्या कळा सोसाव्या लागतात, त्याला न समजणाऱ्या जाणिवांचे हुंदके गळाभर दाटून येतात. घरटी विणून घेताना निर्मितीची आंतरिक संवेदना जगवणाऱ्या झाडांचीही जवळीक वाटते. एक अद्‌भुत वेदना शरीरभर

दाटते. 'मी असा अन् तू अशी' हे पालुपद सांभाळत प्रवाहावेगळी नौका हाकारण्यात आपण सार्थकतेला पारखे आहोत ही बोचही कुठेतरी असतेच.

– आणि अचानक एके दिवशी हे सारे भावविश्व उद्‌ध्वस्त होते.

*'पण एक दिवस त्या सगळ्यातच माझ्या आयुष्याला*
*तू नालायक ठरवलेस,*
*अन् सहजपणे मला असे उघड्यावर*
*एकटीला फेकलेस.*
*तुझ्यात गुंतून गेलेले माझे सारे सोडवताना*
*सगळेच संदर्भ कसे बदलून गेले...*
*सवयीच्या सगळ्या गोष्टींना*
*क्रूरतेचा एवढा वास असतो*
*हे तेव्हाच तर कळले*
*अन् माझ्या सुखदुःखांचे नि कष्टांचे*
*सगळे पोकळ अर्थ सावल्यांसारखे*
*समोर नाचत आले.*

## सामूहिक जगण्याचे विधिलिखित

असा हा दाहक अनुभव, जे घडले ते घडून गेले. त्यापासून स्वतःला अलग करणे अवघड गेले. 'तू जवळ नाहीस म्हणून वेडे दिवस मला पुन्हा छळत नाहीत...' 'तू नसतानाही जगणे एवढे सहज आहे' ही जाणीवच किती मोलाची आहे ! या अनुभवाने एक समंजस शहाणपण या कवितेमधल्या 'मी' ला लाभलेले आहे. 'पंख छाटलेल्या पाखरांचे उरात दिशा घेऊन वांझ असणे' म्हणजे काय ते तिला कळलेले आहे आणि जुन्या नात्यांना स्मरून एखादे काव्यपुष्प त्याच्या हाती द्यावे हा विचारही तिला परका वाटतो. दुःखशीळ घालणारी पाखरे नकोत, जुन्या नात्यांपासून लांब गेलेलेच बरे. परंतु या शहाणपणासाठी फार मोठी किंमत तिला द्यावी लागलेली आहे. 'आपली नाव वल्हवायला स्वतःचेच हात हवेत हे खरे. पण तेवढ्याने सारे भागले नाही. शब्दांचे वागणे बदलले तसे तिचे पाणी बदलले, जाणे बदलले अन् गाणेही बदलले. स्वतःहून नव्याने उगवताना दरवेळी नवे आकाश विणणे जमेलच अशी खात्रीही आता उरलेली नाही.

'त्याच्या'शिवाय जगणे तिचे चालूच आहे. परंतु काळापार मागे-पुढे आपल्याच अंतरात उतरताना सामूहिक जगण्याचे विधिलिखित भयकारक वाटू लागते.

## आयुष्य नावाचे खुळे गाणे

आणि अशा या भळभळत्या जन्मात आता निरामय आयुष्य भोगायचे तर कवितेचीच

कास धरावी लागते. त्याच्या खेळात बळी गेल्यावर कवितांची गर्द तळीही रक्तचांदण्यात न्हातात. त्याला कधीच न कळलेल्या जाणिवांचे हुंदके दाटून आले की, कविता होऊन कागदावर ठिबकू लागतात. त्याला दिलेल्या एका शब्दाने विश्व 'सबंध' हाती आणि पुऱ्या गाण्यासाठी तिला जन्माचे साकडे पडले. मनात शब्दावाचून दुखणाऱ्या कवितेसाठी तडफड अखंड वाट्याला आली, स्वतःतच रुजत चाललेल्या अंधाराविषयी, अकारण फुलणाऱ्या धमनीतल्या अंगाराविषयी, आपल्यातल्या दुराव्याविषयी, निसटून गेलेल्या क्षणांसाठी आता लिहिणे भाग आहे, असे तिला अनावर जाणवते. दुःखाला देह देऊन, आयुष्याची होळी पेटवून, उदंड सोसण्याचे बळ धारण करून जमल्या तर दोन कवितेच्या ओळी जमतील असा हा अघोरी वसा तिच्या वाट्याला आला आहे. आयुष्य नावाचे खुळे गाणे गाण्यासाठी सारा जन्म जणू गहाण राहिला आहे.

कवितेनेच या आयुष्याला आधार दिला आहे आणि कवितेनेच त्याचा कब्जा घेतलेला आहे. त्यामुळे एक समंजस हिरवेपण तिच्या अस्वस्थ तरुण शब्दांमध्ये जीव भरून तिला परिपक्व बनवत आहे, प्राणवान् स्वयंभू अस्तित्व कवितेच्या जन्मक्षणी येऊन शपथ घालते. काळाचा चेहरा कमळाप्रमाणे फुलून येतो, उजळ मृदू कवितेचा कांचनस्वर जुळून येतो. गाण्याविना माणसाचे जिणेच खरे नव्हे हा साक्षात्कार तिला होतो आणि सर्वार्थाने कवितेची बाळमूठ धरून ताठ जगण्याचे बळ यावे, त्यात अबोधाचे आणि अंतिमाचे राजरूपडे डोलताना दिसावे हा ध्यास तिला लागतो.

## दोन तटातील अंतर दुर्लंघ्यच

कवितेची ही सोबत जीवनाला समंजस शहाणपणाची भक्कम बैठक देते खरी, परंतु तरीही एक परम सत्य तिला आपल्या अस्तित्वाचे वेगळेपण म्हणून स्वीकारावेच लागते.

*मैलोगणती पसरलेल्या क्षणांच्या घट्ट जाळीतून*
*एकमेकांचे नुसते अस्तित्व कळत असताना*
*आम्ही एकरस-एकजीवच आहोत असे म्हणणे*
*किती असुरक्षित अन् असह्यही-*
*याची उदाहरणे मला शब्दांनी सांगवत नाहीत*
*तुझ्या-माझ्या तटांमधला प्रवाह रुंदावण्याचे*
*कदाचित हेही एक कारण असेल !*

## मनमोहक पारंपरिक स्त्रीगीते

आपल्याच काळोखात आपल्याला शोधण्याचा, आत्मशोधाचा हा ध्यास या कवितेला बळ देतो. आता या काव्यसंग्रहातून अशी कहाणी प्रकट होत असली तरी ती तशी शोधावी की नाही हा प्रश्न रसिकतेचा आणि अभिरुचीचा कस लावणारा ठरेल. या कहाणीमुळे या

काव्यसंग्रहातील कवितांना मोठेपण लाभते असेही नाही. या संग्रहातील अनेक कविता, त्यांतील अस्मितासंपन्न प्रतिमा, त्यांतील भावगडद स्मरणरूपे, त्यांतील सायसाखरी श्वास आणि बदलते अर्थसंदर्भ- हे मनाचा ठाव घेणारे आहेत. या कहाणीच्या कक्षेत न येणाऱ्या अशा काही पारंपरिक स्त्रीगीतांची आणि ओव्यांचीही अर्थगर्भ उपस्थिती या संग्रहात आहे. 'आता सखीच्या गावात सोनकार्तिक असेल, रेंगाळत्या पाऊलांनी जाता आश्विन हसेल' किंवा 'एक पाखरू, दूर देशाचं भुऱ्या डोळ्यांचं, निळ्या पंखांचं, इथं आलं वो, इथं आलं वो, मन धालं वो, मन धालं वो' या ओळी वानगीदाखल पाहाव्यात.

'यक्षरात्र' या संग्रहाने अरुणा ढेरे यांना सापडलेला सूर आपल्यापर्यंत पोहोचतो. हा सूर आभाळडहाळीशी झुलतो, हळदीचा रंग घेऊन दंग होतो, क्षितिजाला पेटवून रात्र उजळवून टाकतो, अंधारलेल्या रात्रीला लाख दिव्यांनी नटवून टाकतो आणि एका दुःखगहिऱ्या काळजाचं आत्ममग्न अहेवपण थाटानं मिरवतो. म्हणूनच आपणही या यक्षरात्रीच्या भूलभुलैय्यात स्वतःला हरवून बसतो.

'अर्पण' या कवितेतील शेवटच्या ओळी एकापाठोपाठ एक सुटलेल्या बाणांप्रमाणे आपल्या अंतराला भेदत जातात :

*तू लखख करुणेचे हात पसर*
*आणि मला हृदयाशी धर*
*तुला अर्पण असोत माझ्या उरलेल्या आयुष्याचे तुकडे*
*रक्ताळ... केविलवाणे*
*माझी शरम, माझे काजळणे अन् गदगदणे*
*अर्पण असो ही सर्वव्यापी लखाख वेदना*
*अन् हृदयात आत्ता उगवू लागलेली*
*अनाघ्रात प्रेमाची उजळ, कोवळी भावना.*

(यक्षरात्र : अरुणा ढेरे, प्रकाशक : सुरेश एजन्सी, २०५ शुक्रवार पेठ, पुणे २. पृष्ठे ८०, किंमत पंचवीस रुपये.)

□

## लय : सुधीर मोघे

### *शब्दभ्रमाचे चलाख प्रयोग*

सुधीर मोघे यांच्या काही कविता एका अनौपचारिक बैठकीत ऐकायला मिळाल्या आणि त्यांच्या विलक्षण स्मरणचातुर्याने मी विस्मयचकित झालो. त्यांच्या कवितेतील शब्दांच्या सहजसुंदर जादूगिरीने आणि भावनांच्या उदात्तीकरणाच्या लीलया चालणाऱ्या क्रीडेने त्यांच्याजवळ सांगण्यासारखे वेगळे काहीतरी आहे याची खूण पटली. सिनेमासाठी गीते लिहिण्यातली व्यावसायिक सफाई आणि स्वतःच्या कविता सादर करण्यातली चलाख शोमनशिप याचा खुबीदार मेळ त्यांच्या कविता पानोपानी या कार्यक्रमात घालण्यात आला आहे. त्यामुळेही बालकवी तांबे, आरती प्रभू, माडगूळकर, महानोर यांच्या पठडीतला हा नवा अवतार आहे असे वाटून गेले. चित्रपटांसाठी गीते लिहिणे, संगीत रचना करणे, गीतांना चाली देणे एवढ्यावरच न थांबता मंतरलेल्या चैत्रबनात, उत्तररात्र यांसारखे कार्यक्रमही उत्साहाने करणे, दूरदर्शन मालिकेसाठी संगीत देणे, छोटीमोठी भूमिका करणे असा त्यांचा सर्वदूर संचार असल्याने सुधीर मोघे यांना लोकप्रियताही झपाट्याने लाभत आहे. त्यांच्या कार्यक्रमांना रसिक गर्दी करीत आहेत. साहजिकच व्यावसायिक गरजा आणि कवी म्हणून जाणवणाऱ्या आंतरिक प्रेरणा यांच्यातील जुगलबंदीतून मोघे कशा प्रकारे मार्ग काढतात हे पाहण्यात माझ्याप्रमाणेच त्यांच्या अनेक चाहत्यांचे लक्ष असणार.

### चार ओळींची कविता सात तुकड्यांत

लय या सुधीर मोघे यांच्या काव्यसंग्रहात चार चार ओळींचे रुबायासदृश ७३ रचनाबंध आहेत. मात्र छापताना या चार ओळींचे सात तुकडे करून छापलेले आहेत.

*ही दरी*
*धुक्याचे तळे जणू अनिवार*
*सांडला केशरी कुंभ*
*उठे झंकार*

*कोवळ्या तृणांना जणू उन्हाचे*
*डोळे उमटले कळीवर*
*पाय दवाचे ओले*

चार ओळींची कविता पहिल्या ओळीतील दरी नंतर दुसऱ्या ओळीतील कुंभनंतर आणि चौथ्या ओळीतील 'कळीवर'नंतर नवी ओळ मुद्रित केल्याने सात ओळींची बनली आहे. संस्कृत सुभाषिते, उर्दू शेर, जपानी हायकू, पर्शियन रुबाया या धर्तीवरील या कविता एखादी चमत्कृतिपूर्ण कल्पना पेश करून तेवढ्यापुरता आल्हाद देऊन जातात. प्रत्येक कविता एकेक सुटा कल्पनेचा मणी धरून ठेवते. त्या मण्यांची एका सूत्रात माळ गुंफता येईलच असे नाही. तशी ती माळ गुंफता आली असती तर आणखी बहार आली असती. एक सलग जीवनविषयक चिंतन मांडणारी ती दीर्घ कविता बनली असती.

## जिव्हाळ्याचे विषय

मोघे यांच्या जिव्हाळ्याचे काही विषय आहेत, आणि ते वरचेवर या काव्यखंडातून डोकावतात.

निसर्गातील काही धुंद-फुंद दृश्ये त्यांना खुणावतात आणि शब्दलयीतून एकेक निसर्गचित्र उभे राहते. घनरात्रीला भिडते. सावळ्या डोहांनी सावल्या पेहरल्या, गोऱ्या चांदण्यात निळा अंधार दाटून आला असे दृश्य ते पकडून ठेवतात आणि तेवढ्यात दूरवर दरवळणारा सृजनाचा हुंकार त्यांना साद घालतो. धुक्याचे तळे बनलेली दरी कोवळ्या सूर्यकिरणांचा केशरी कुंभ सांडल्याने झंकारून उठते. तृणाची पाती चकाकू लागतात, दवाचे ओले पाय कळीवर उमटतात अशासारखे दृश्यही त्यांना भूल टाकते. पागोळ्या, झरे, धबधबे, ओढे या भिन्न रूपांमध्ये पाणी एकच असते. सांबशिवाच्या जटेतील गंगेचीच वंशावळ ते सांगते असे त्यांना जाणवते.

ही निसर्गदृश्ये आपल्या भावजीवनाला कुठेतरी भिडतात आणि आपल्या आंतरिक उर्मीला कोंब फुटतात. सर्वांगातून स्मरलेला आषाढ हवेच्या नसनसातून फिरतो. आभाळातून झरतो आणि अखेर शब्दातून प्रकट होतो. रित्या आभाळात मनाचे थेंब दाटून येतात. उंचावर दूर तरंगणारे आकाश मातीच्या हृदयात झुरणीचे काहूर माजवते आणि कोसळणारा पाऊस या दोघांमधील सेतू बनतो.

आकाश मातीचा रंग लेऊन नटते. मेघांमध्ये पृथ्वीचे ऋण दडते. मातीला भूल पडते, झाडांना पावसाळ्याची झिंग चढते. झाडाखालचा मूक पाचोळा चोळा मोळा झालेली स्वप्ने उराशी घेऊन कण्हत पडतो. चक्रीवादळाची धूळ उठताच पाचोळ्यातील पाने दूर दिगन्ती सैरभैर पसरतात. हा निसर्ग कवीला खूप काही शिकवून जातो. तीराला पाण्याचा आधार असतो. लाटांमध्ये संसार विरघळतो. नदी आटते. पात्र कोरडे होते. तीर बिचारा वाट पाहत राहतो. आपल्याही नशिबी असेच वाट पाहण्याचे लिहिलेले असावे. ओंजळ रिती घेऊन

आपण येतो आणि रितीच ठेवून जातो. आल्या गेल्या श्रेयावर पुसट नाव तरी राहते का ? अशी शंका कवीच्या मनात डोकावून जाते.

## श्रद्धाळू मनाचे चिरंतन खेळ

भारतीय श्रद्धाळू मनाचे काही चिरंतन खेळही खेळण्यात कविता रमते. आपल्या अस्तित्वाचे, जन्म-मरणाचे कारण काय असा प्रश्न तिला पडतो. सुखदुःखाचा हा शाप आपल्या नशिबी का हा विचार त्याला अस्वस्थ करतो. हा प्रवास कशासाठी याचेही कोडे त्याला सतावत असते. आपल्या मर्यादा जाणवत असतात आणि तरीही या सर्वांमागे काहीतरी संकेतसूत्र आहे असा साक्षात्कारही त्याला अधूनमधून होत राहतो. हे सर्व मनाचे खेळ करण्यात कवीला गंमत वाटते. तू कोण, कोठला वगैरे प्रश्न विचारून तो म्हणतो, मृत्यूच या प्रश्नाचे उत्तरे देऊ शकेल. परंतु लगेच तो सावध होतो आणि म्हणतो, पुन्हा नव्या प्रश्नांचा त्यामुळे जन्म होईल. प्रश्नांचे हे रहाटगाडगे कधीच थांबणार नाही. आयुष्य आपल्या आधीन नसते हे खरे, परंतु ते अशाश्वताच्या डोहाशी इमान राखून स्वयंभूपणे राहते असेही त्याला जाणवते.

जीवन हे एक गाणे आहे. कोणीही यावे, तंबोरा लावावा व गाण्यात रमावे. हे जगणे म्हणजे दोन स्वरांचा संथ श्वास आणि मृत्यू म्हणजे या दोन स्वरांमधील आस. जगण्याला लोभस स्वप्नांचा आधार असतो. मग निद्रेचे भय कशाला हवे ? आपण या जगाचे कुणी नाही, आपण कुठले तेही कळत नाही. हे विश्व पोरके आहे असे वाटते. पण त्याच वेळी या विश्वाचे विश्व होऊन त्याचे पोरकेपण संपवावे अशी उर्मीही मनात दाटून येते.

रक्ताच्या सळसळणाऱ्या रंगात समर्पणाचा केशरी आणि वैराग्याचा भगवा अंश भिनला आहे, असाही कवीला प्रत्यय येतो. आयुष्य ही काही वर्षांनी तोलायची गोष्ट नाही. हा विनाशी देह घरे बदलत असतो. साहजिकच आयुष्य हे जन्मांच्या मुक्कामाचे स्थान होय. मी मलाच शोधत दिशादिशातून फिरलो. परंतु या शोधकाळात जे शोधत होतो तेच हरवून बसलो. जगणे पाप ठरावे असा कठोर शाप मिळाला. परंतु भानावर आल्यावर कळले की त्या शापाच्या रूपाने तू वरदानच दिलेले होतेस. बेरीज करा, वजाबाकी करा, गुणाकार करा वा भागाकार करा. वेगवेगळ्या नावीन्यपूर्ण पद्धतींनी गणित करा. शेवटी उत्तर शून्यच. अशी काही गमतीदार म्हटले तर गंभीर, आध्यात्मिकही निरीक्षणे या कवितांतून कवी मांडतो. यात शाब्दिक चलाखी किती आणि अनुभूतीचा भाग किती हा प्रश्न अडचणीचा ठरेल.

## शब्दांचे मायाजाल-कसरत

शब्दांचा खेळ करताना कदाचित शब्दांच्याच मोहजालात अडकून पडण्याची शक्यता जास्त असते आणि त्याचमुळे स्वानुभूतीपेक्षा इतरांच्या शब्द-कल्पनांची उसनवारी होण्याची शक्यता अधिक असते. राजकवी तांबे, पु. शि. रेगे, रॉय किणीकर यांच्या सुरांचा अनुवाद

कुठे कुठे जाणवतो तो त्यामुळेच.

सूर्यमाला, ग्रहगोल, विराट विश्व यातून जाणवणारे गजबजते आकाश हे पाहून पोकळीला अस्तित्वाचा भास मिळत आहे यासारखी कल्पना मोघे करतात. हे विधान निष्कर्ष सांगून मोकळे होते. काव्यापर्यंत पोचतच नाही. हीच अवस्था इतरही तत्त्वचिंतनात्मक कवितांची होते. मी इथला नाही, कोठला आहे हे माहीत नाही यावरून एकदम उडी जाते ती मला विश्वाचे विश्व व्हायचे आहे अशी ! एवढी झेप पहिल्या दोन ओळींना झेपणार नाही याची कल्पना आल्याने आपल्या पोरकेपणाची जाण ही सर्व विश्वावर लादली जाते. विश्वालाच पोरके ठरवले जाते आणि त्याचमुळे या विश्वाचे विश्व बनण्याची महत्त्वाकांक्षा चौथ्या ओळीत एकदम अनपेक्षितपणे प्रकट केली जाते. अवघ्या चार ओळीत अशा प्रकारे प्रवासाचा एक प्रदीर्घ टप्पा कापणे अवघड आहे. परंतु मोघे त्यात पटाईत आहेत. हे काव्य आहे की कसरत हे मात्र कळत नाही. अनेक कवितांतून मोघे यांची ही कसरत उत्साहाने व सराईतपणे चालल्याचे लक्षात येते.(४८ ते ५१)

## प्रेमकहाणी

सुधीर मोघे यांच्या काही कवितांतून एक प्रेमकहाणीही रंगून सजून चितारली जाते. ती जी कोणी प्रेयसी आहे ती दर वळणावर अनोळखी होते. रूपे बदलते. पण कवी चलाख. तो त्या बदलत्या विभ्रमरूपांमधून तिला ओळखून काढतो. तो तिच्या घराशी जातो. थबकतो. मागे फिरतो. सर्व धागे सोडून दूर जातो. परंतु वळून बघतो तर तिचाच उंबरा दिसतो. तो तिला घेऊन सागरतीरी जातो. एकांताचा पहारा, समुद्र भरतीची वाट पाहून कंटाळतो आणि सैरभैर होऊन दोघांवर कोसळतो. तिने न सांगताच तिच्या मौनातूनच तिचे हृद्गत तो जाणून घेतो. शब्दांचे बांध दोघांमध्ये नकोत असे त्याला वाटून जाते. गर्द रानात रात्रीच्या वेळी चांदण्यातला निळा अंधार दाटलेला. अशा वेळी सावळा डोह सावल्या परिधान करतो आणि कुठेतरी सृजनाचा हुंकार दरवळलेला जाणवतो. परंतु ही प्रणयभावना अशी अगदी सूचकपणे शालीनतेने प्रकट होते. किंवा खरे सांगायचे तर प्रकट होण्याचे टाळते. आपल्या भावभावना प्रकट करताना त्यांचे उदात्तीकरण करण्याची, कल्पनेच्या चमकदार चमत्कृतिपूर्ण खेळात रमण्याची सुधीर मोघे यांची प्रवृत्ती त्यांच्या कवितेला कमजोर बनवते. प्रेयसी भेटली, तिची नवनवोन्मेषशाली रूपे दिसली. तिच्या मौनानेही खूप काही सांगितले हे सारे सूचित झाले. परंतु तेवढ्याने त्या संबंधाला, नात्याला परिपूर्णता- अर्थपूर्णता आली का ? पुढचे सारे सांगण्याचे राहूनच जाते. ती जी कोणी प्रेयसी आहे ती अमूर्त भावात्मच राहते. हाडामासांची जिती जागती तिची मूर्ती क्षणभरही साकार होऊन पुढे उभी राहत नाही. तिने दिलेला कठोर शाप- त्यामुळे जगणेही पाप व्हावे असे त्याला वाटून जाते. पण लगेच त्याने सावरून घेऊन हा शाप हेच वरदान होय असे म्हणून तिचे आभार मानून ही कहाणी संपतेही. गणितातल्या लघुतम साधारण विभाजकासारखीच अपेशी नवथर प्रेमाची ही मिनी

आवृत्ती रूढ मार्गानेच जाऊन स्मृतिकोशात विसावते.

## हाती काही उरत नाही

मोघे शब्दांचे खेळ करण्यात रंगतात. मनोभावांचे उदात्तीकरण करण्यात रंगतात. त्यामुळे खूप वेळा ते फसतात. चांगले काहीतरी कानात रुणझुणु करून जाते पण हाती काही उरतेच असे नाही.या मोहचक्रातून मोघे बाहेर पडले तरच कवी म्हणून स्वतःची जपणूक करू शकतील.

*मी माझ्यामधल्या मला एकदा भिडलो*
*मी माझ्यामधल्या माझ्यावरती भुललो*
*मी माझ्यामधल्या मलाच सांगत सुटलो*
*मी माझ्यामधला मला भेटुनी आलो*

या ओळीत काही काव्य नाही आणि आशयही नाही. पहिल्या ओळीतला 'मी भिडलो' आणि चौथ्या ओळीतील 'भेटुनी आलो' यात भावनात्मक प्रवासाचा कुठला फरक जाणवतो ? मधल्या दोन ओळीतले भुललो व सांगत सुटलो हे टप्पे शेवटच्या मला भेटुनी आलो यात परिवर्तित होतात. स्वतःला ओळखण्याचा क्षण फार काळ लांबवता आला नाही असे सूचित करण्याचा हा प्रयत्न येथे काव्यात्म झालेला नाही. स्वतःच्या आंतरिक दर्शनाने भूल पडल्यावर स्वतःला सांगत काय सुटणार ? हा सगळा गोंधळ मोघे यांनी टाळला असता तर काय बिघडले असते ?

## रचनासुलभता हा शाप तर नव्हे ?

मोघे यांना कविता सहजपणे रचता येतात हे खरे आहे. इतक्या सहजपणे त्या रचता न येत्या तर बरे झाले असते. कारण या रचनासौकर्यामुळे ते शब्दांचे कसेही खेळ करून एखाद्या जादूगाराप्रमाणे नजरबंदी करून वाचकांना चकवण्यात पटाईत झाले आहेत. परंतु या नजरबंदीच्या खेळात रंगून कुठे टोपीतून कबुतरे काढ किंवा तोंडातून दहावीस मीटर लांबीची रिबन काढ असे प्रयोग करण्यातच ते धन्यता मानत आहेत. मग कधी प्रेमकथेला वेठीस धर, कधी अध्यात्माला, कधी निसर्गाला, कधी चमकदार कल्पना चमत्कृतीला, सांगण्यासारखे काही खास जवळ नाही, अवघ्या अस्तित्वालाच हादरा बसावा असा कुठला अनुभव आलेला नाही. कसलीच वेदना नाही, कसलीच व्यथा नाही. कशाबद्दल चीड नाही. दिव्यत्वाच्या दर्शनाने हृदयाच्या अंतर्हृदयाला दैवी श्रीमंती लाभत नाही. अंतःकरण पेटून उठत नाही तोपर्यंत हे शाब्दिक चलाखीचे खेळ करण्याचाच मोह अनावर राहणार. मोघे अजून वाचकांना हुलकावण्या देण्यातच रमलेले आहेत. पण या हुलकावण्या ते वाचकांना देत आहेत की स्वतःच्याच अंतःप्रेरणेला हा खरा प्रश्न आहे. अशा हुलकावण्या देऊन टाळ्या मिळविण्याच्या प्रयोगांचा त्याग करून आपल्या समृद्ध भावजीवनाचा थांग घेऊ

पाहतील तरच स्वतःची पृथगात्मकता त्यांना कधीतरी सापडेल. अन्यथा ते हातचलाखीचे आणि शब्दभ्रमाचे गोड खेळ कधी संपायचेच नाहीत. गिव्ह हिम ए गुड क्लॅप ! बच्चे लोग, तालिया बजाव ! जोरसे; और जोरसे.

(लय : सुधीर मोघे, प्रकाशक : शब्द पर्व, ग्रंथाली, ३५/९४८, नेहरूनगर कुर्ला (पूर्व) मुंबई ४०००२४, पृष्ठे ८८, किंमत पंचवीस रुपये).

□

## मेघहृदय : वसंत बापट

### *मेघदूताचे मुक्तछंदात्मक भावदर्शन*

मेघदूताचा गद्यकाव्यात्मक (किंवा मुक्तछंदात्मक) भावानुवाद कविवर्य वसंत बापट यांनी मेघहृदय या नावाने पेश केला आहे. मूळ मेघदूताच्या सव्वाशे श्लोकांचा सगळा आशय बारा-बारा ओळींच्या पंचावन्न तुकड्यांत वसंत बापट यांनी पकडला आहे. या कृतीला मेघदूताचा अनुवाद, सारांश, स्वैर रूपांतर, पुनर्निर्माण यांपैकी कोणतेही नाव देण्याबद्दल बापट उत्सुक नाहीत. 'तुका म्हणे झाले काहीचिया बाही' एवढेच खरे असे ते म्हणतात. 'अलौकिक कल्पनाशक्ती, भावनांची स्पंदने आणि चित्रदर्शी शैली यांचा मेघदूतात त्रिवेणी संगम आहे' असे म्हणून मूळ मेघदूताला उराउरी भेटून मिळणाऱ्या अनिर्वचनीय आनंदाची कल्पना सहृदय आस्वादकाला मिळावी म्हणून हा भावानुवादाचा प्रयत्न आहे, असा खुलासा वसंत बापट करतात.

मेघदूत हे दूतकाव्य रसिक मनाला पिढ्यानपिढ्या गोड गुदगुल्या करीत आले आहे. अर्थगांभीर्य आणि रचनासौष्ठव यादृष्टीने चिरेबंदी असलेले हे काव्यशिल्प तसे अगदी साधी सोपी अशी एक कल्पना केंद्रीभूत ठेवून सरळ रेषेत जाणारे आहे. आपल्या सेवेत असणाऱ्या एका यक्षाला संतप्त कुबेर वर्षभराच्या हद्दपारीची सजा फर्मावितो आणि दक्षिणेतील रामगिरीच्या गुहेत राहण्याचा आदेश देतो. हा विरहव्याकूळ यक्ष कैलासाच्या उतरणीवर वसलेल्या गगनचुंबी प्रासादांनी, सदाप्रफुल्ल वृक्षभ्रमरांनी आणि हंसमालांच्या मेखलांनी विनटलेल्या अलकानगरीत वस्तीला असलेल्या आपल्या प्रेयसीला मेघाबरोबर संदेश पाठवतो- एवढीच मध्यवर्ती कल्पना. परंतु रामगिरी ते अलकानगरी दरम्यानच्या प्रवासात मेघाला काय काय दिसेल याचे जे चित्र कालिदास उभे करतो त्याचे सौंदर्य नाना विभ्रम धारण करून रसिक मनांना गेली अनेक शतके गुंगवत राहिलेले आहे. मेघदूताची शेकडो भाषांतरे विविध भारतीय भाषांत झालेली आहेत, त्यांतील वृत्ते, यमक यातील वैविध्ये लक्षणीय आहेत. तसेच समश्लोकी, समवृत्त भाषांतराची अवघड कसरत साधण्याचा खटाटोप अनेकांनी केला आहे.

## मराठीत किमान २० भाषांतरे

हिंदी, गुजराथी, बंगाली, कानडी इ. भाषांतील बहुतेक मान्यवर कवींनी मेघदूताचे भाषांतर करण्याचा परिपाठ ठेवला आहे. महावीरप्रसाद द्विवेदी, नानालाल दलपतराय, रवींद्रनाथ, महाकवी बेंद्रे अशा मातब्बर कवींचा त्यात समावेश आहे. मराठीत किमान वीस भाषांतरांची नोंद आढळते. कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे १८६५ मधील भाषांतर हे आद्य भाषांतर म्हणता येईल. त्यानंतर ५ वर्षांनी गोविंदस्वामी इस्लामपूरकर यांनी १८७० मध्ये मेघदूत मराठीत आणले. १९०१ मध्ये गणेशशास्त्री लेले यांनी तसा प्रयत्न केला. रा. प. सबनीस, चिंतामणराव देशमुख, डॉ. रा. चिं. श्रीखंडे, नानासाहेब गोरे, बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज यांची भाषांतरेही वेगवेगळ्या कारणांसाठी गाजली.

काटेकोर भाषांतराचा आग्रह धरणारा रसिक वाचकांचा एक पक्ष असतो. त्याचे संपूर्ण समाधान करणारे भाषांतर अजून एकही झालेले नाही आणि तसे ते अशक्य आहे ही वस्तुस्थिती आहे. शब्दाला शब्द ठेवून भाषांतर केले तरी मुळातली काव्यमयता भाषांतरात उतरत नाही. संस्कृत भाषेची मूळ प्रकृती, संस्कृत वाक्यरचनेची धाटणी, संस्कृत शब्दांमधील अर्थच्छटांचे व अलंकारांचे बहुरंगी वैभव आणि संस्कृतमधील संकेत यामुळे शब्दाबरहुकूम भाषांतर हे अन्य कुठल्याही भाषेत शंभर टक्के समाधानकारक होणे असंभवनीय ठरते. परंतु हे लक्षात न घेतल्यामुळे काटेकोरवादी पक्षीय मंडळी अशा भाषांतरांचा आस्वाद घेण्याच्या मनःस्थितीत कधी नसतातच. अमक्या पदाचा भाषांतरात अर्थच आला नाही किंवा कालिदासाला अभिप्रेत असलेल्या अर्थाचा विपर्यास केला गेला, अशी तपासणी करण्यातच या मंडळींना रस असतो. भाषांतराकडे त्या विशिष्ट भाषेतली एक स्वतंत्र कलाकृती म्हणून पाहून, तिचा रसास्वाद घेण्याची वृत्ती अभावानेच आढळते.

## समानधर्मी अनुभूतीचे स्मारक

डॉ. लीला अर्जुनवाडकर आणि आनंद साधले यांचे कुसुमाग्रजांच्या मेघदूताच्या भाषांतरावरील टीकालेख वाचले म्हणजे काटेकोरवादी पक्षाच्या भूमिकेची कल्पना येते. डॉ. श्रीखंडे यांच्यासारख्या विद्वान पंडिताने समश्लोकी उपजाती-इंद्रवज्रा वृत्तात भाषांतर केले तर त्यात शब्दाला शब्द सापडतो पण काव्य मात्र त्यातून शतयोजने दूर पळ काढते हेही आपल्याला विसरता येत नाही. विशिष्ट वृत्ताची निवड केल्याने बोरकर-कुसुमाग्रजांसारख्या सिद्धहस्त कवींनाही शब्दांची मोडतोड करावी लागते किंवा अवजड, अनोळखी वा ग्रामीण शब्दांची योजना करावी लागते हेही आपल्याला नजरेआड करता येत नाही. वस्तुतः बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज किंवा वसंत बापट यांच्यासारखे प्रतिभावंत कवी जेव्हा मेघदूताचे मराठीकरण करतात तेव्हा ते कालिदासाच्या मेघदूताचे शब्दशः भाषांतर करायचे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवत नसतात, तर कालिदासाचा आधार घेऊन आपल्याच मनातल्या

मेघदूताला आवाहन करीत असतात आणि आपल्या भावजीवनातल्या कुठल्यातरी समानधर्मी अनुभूतीचे स्मारक उभारत असतात. 'यक्ष-यक्षपत्नीच्या विरह व्यथेशी एकरूप होऊन माझी शृंगारभावना मी परिशुद्ध करून घेतली' असे बोरकर म्हणतात, तेव्हा ते कालिदासाच्या मेघदूतापासून स्फूर्ती घेऊन स्वानुभूतीवर स्वार होऊन आपल्या खास वेगळ्याच विश्वात दौड मारत असतात हे विसरून कसे चालेल ?

## मुक्तछंदाचा अवलंब

वसंत बापट यांनी बोरकर-कुसुमाग्रज यांच्या मेघदूताच्या वृत्तात्मक अवतारांचा अनुभव (किंवा पराभव) लक्षात घेऊन चाणाक्षपणे मुक्तछंदाची कास धरली आणि शब्दाला शब्द, ओळीला ओळ, श्लोकाला श्लोक या जाचक चौकटीपासून प्रारंभीच स्वतःला सोडवून घेतले. बारा ओळींचे एकेक कडवे आणि त्यात दोन-तीन श्लोकांचा गोळाबेरीज आशय असा त्यांचा साधारणतः खाक्या आहे. मुक्तछंदामुळे वसंत बापट यांच्या एकूण रचनेत एक प्रकारची प्रगल्भ प्रौढता आली आहे. वृत्तयमकासाठी शब्दांची ओढाताण करण्याची पाळीही त्यांच्यावर विशेष आलेली नाही. एकूणच हा प्रयत्न त्यामुळे वाचनसुलभ आणि रसात्मक ठरला आहे.

*दिवसमास गेले दीर्घदीर्घ पावलांनी*
*आणि अचानक*
*आषाढाच्या पहिल्या दिवशी*
*समोर उभा ठाकला एक प्रचंड मेघ*
*डोंगरकड्याला धडक देणारा*
*मदमस्त हत्तीचा जसा.*
*ये घना, ये,*
*घे ही कुड्याची रानफुलं*
*तुझ्या चाहुलीनं टवटवलेली.*
*ने माझा संदेश दूर अलकेपर्यंत*
*दे तो कशाबशा तगून राहिलेल्या*
*प्रियेला*
*पालव तिची आशा पुनर्मिलनाची.*
*हे पुष्करावर्तकांच्या कुलभूषणा,*
*कामरूप तो वेग दयाघना ! अनुकूल वाऱ्याच्या वारूवरून*
*जा दूर दूर उत्तरेला.*
*जा तुझ्या गतीनं, हवां तर रमत गमत*
*सर्वांवर सुखाची बरसात करीत.*

*मार्गावरची गिरिशिखरं तुझ्या*
*विसाव्याला.*
*मोरांचे आर्त टाहो तुझ्या स्वागताला.*
*फाळानं उखणलेल्या माळावर उठतील सुगंधी वाफा*
*तुझ्या पहिल्यावहिल्या सरींच्या*
*उन्मादक स्पर्शानं.*

—अशा ढंगात संस्कृतप्रचुर परंतु तरीही भारदस्त मराठी वळणाच्या या भाषेला अधूनमधून स्पर्श होतो अस्सल ग्रामीण मराठमोळ्या शब्दकळेचा ! आणि हे सर्व रसायन असे मोहक ठरते की, एकामागून एक ओळ जिभेवर विरघळत जाते, आपले नाट्यरूप डौलदारपणे चपखल पेलत मेघाच्या अंतरिक्ष प्रवासाची चित्रे पेश करीत संथपणे पुढे पुढे जात राहते.

*'भूदेवतेच्या वर्तुळाकार गौर स्तनावर*
*तू शोभशील*
*जांभुळशार अग्रासारखा.'*

किंवा

*"जा निववीत पर्वतांचे माथे*
*जा देत स्पर्शसुख कृश झालेल्या*
*नद्यांना*
*दे गारवा उन्हानं पोळलेल्या*
*फुलमाळणींना.*
*दूर प्रवासाल गेलेल्या अभाग्यांच्या*
*संगमोत्सुक सहेल्यांना*
*दे तुझं सुखशीतल आश्वासन."*

यांसारख्या ओळीत 'संगमोत्सुक' सहेल्या वा पोळलेल्या फुलमाळणी, कृश नद्या, दुःखव्याकुळ मन, अनेकाग्र जायपत्री, वेलपत्री, पीतकेशरी उतारांचा डोंगर, कामोत्सुक शुभ्र बलाकांच्या माळा, हस्तिदंती केतकीची कणसं, दशार्ण देश, चौर्यप्रणयाचे उग्र गंध, नखरेलपणानं दाखवलेला नाभींचा भोवरा, उन्मन होऊन नाचणारे गृहमयूर, रमणींचे केस उदवून चोरट्यासारखे जाळीदार गवाक्षांतून निसटणारे धूपाचे फराटे, भितऱ्या धीट कामिनी, कमलिनीचे दंवभरले डोळे, जलधारांच्या स्पर्शानं वाफारलेल्या मातीचा गंध, नटेल छटेल डोळ्यांच्या पापण्या, शिवशंकराच्या लखलख हास्याची प्रचंड रास, कातलेल्या हस्तिदंताच्या गाभ्यासारखा गौरांग कैलास, विजेसारख्या सुंदर ललना, मेघमंद्र मृदंगाच्या तालावर कल्पवृक्षानं दिलेली मदिरा झुलत झुलत चवीनं झोकणारे यक्ष, प्रणयी प्रियकरांचे धटिंगण हात...कालिदासाच्या चित्रदर्शी रेखीव प्रतिमा अशा प्रकारे ठसठशीतपणे मराठीत

उभ्या करणे ही वसंत बापट यांच्या प्रतिभेची सहजलीला होय ! मुक्तछंदाच्या वापरामुळे मिळालेल्या मोकळिकीचा फायदा त्यांनी चतुरपणे घेतला आहे. इतरांच्या संस्कृतनिष्ठ भाषांतरातील बोजडपणा त्यांनी शक्यतोवर टाळला आहे.

## स्त्री सौंदर्याची पुतळीच !

आपल्या प्रेयसीचे वर्णन बापटांचा हा यक्ष कसे करतो ? 'तन्वी श्यामा शिखरिदशना पक्वबिम्बाधरोष्ठी'चे हे रूप बघा.

*"दिसेल तुला माझं दुसरं हृदयच*
*अशी ती मितभाषिणी विरहिणी. . .*
*तिचे दात सुरेख; ओठ लालचुटुक*
*अन् नजर भ्यालेल्या हरिणीची."*

असे सर्वांगीण रूपवर्णन झाल्यावर लगेच हा यक्ष उसासा सोडून म्हणतो,

*"कशी सोसत असेल ती पोर*
*या वियोगदीर्घ दिवसांच्या वेदना ?*
*दिसत असेल थंडीनं झोडपलेल्या*
*कमळवेलीसारखी."*

पिंजऱ्यातल्या गोडबोल्या मैनेला ती विचारत असेल :'अग रसिके, येते का स्वामींची आठवण ? फार लाडकी ना तू त्याची ?"

कधी कधी गावरान मराठी वळणाच्या शब्दांचा वापर वसंत बापट गमतीदारपणे करतात; आणि एक वेगळीच बहार आणतात.

*लवलवणाऱ्या विजेने दिपलेले*
*तिथल्या सुंदरींचे भिरभिरणारे डोळे*
*न पाहणं म्हणजे फुक्कटच की हे जिणं ! (१२)*
*जलधारांच्या स्पर्शानं वाफारलेल्या*
*मातीचा गंध*
*वारा मनसोक्त झोकून घेईल*
*आणि सोंडेनं फुर्रर फुर्रर करीत*
*हत्ती प्राशून घेतील त्या वाऱ्याला. (१९)*
*तसाच तो कल्पवृक्ष. . .*
*एकटाच पुरवतो बेटा*
*रंगबिरंगी वस्त्रे अन् हरतऱ्हेचे*
*अलंकार. . .*
*सारे चोचले, सारी प्रसाधनं. (३७)*

अनुवाद हा तुमच्या पत्नीप्रमाणे असतो. प्रामाणिक तरी किंवा सुंदर तरी (ट्रान्सलेशन इज लाइक युवर वाइफ, आयदर फेथफुल ऑर ब्यूटिफुल) असे एक विधान केले जाते. एखाद्या सौंदर्यसंपन्न पत्नीच्या वैतागलेल्या नवऱ्याचे कदाचित हे स्वानुभवपूर्ण उद्गार असतील; परंतु ते अर्धसत्य म्हणावे लागतील. सुंदर वस्तूंबद्दल इतका अविश्वास बाळगणे बरोबर नाही. प्रामाणिक अनुवाद हा सुंदर असूच शकणार नाही, असे समजून चालायचे कारण नाही. प्रामाणिक आणि सुंदर यांच्यात शत्रुत्व असायलाच हवे असे नाही. बापटांचे हे लेखन स्वतंत्र नाही, कालिदासाच्या मेघदूताचेच ते मराठीकरण आहे. पण तरीही मूळ अर्थसौंदर्य आणि आशय यांच्याशी ते जास्तीत जास्त प्रामाणिक आहे. सर्जनशील पातळीवरच्या आकलनाशी ते निश्चितच प्रामाणिक आहे, तसेच मराठी भाषेच्या संस्कृतप्रचुर जडणघडणीशीही ते इमान राखते. त्यामुळे ते सुंदर उतरले आहे. प्रासादिक ठरले आहे.

## वेधक निर्मिती

या पुस्तकाच्या निर्मिती मूल्यांचा खास निर्देश केला पाहिजे. दोनशे ग्रॅमेजचा जाड हस्तिदंतशुभ्र कागद याला वापरण्यात आला असून फोटोटाईपसेटिंग अक्षरजुळणी केली आहे. फोटोटाईपसेटिंगच्या अक्षरवळणातला ताजेपणा आपल्या नेत्रांना आल्हादकारक वाटतो. पूर्वीच्या मोनो व डिग्री टाइपांच्या चिरपरिचित वळणांमुळे मुद्रित अक्षरे व शब्द आपल्या आवाहकतेचे थोडेफार सामर्थ्य हरवून बसतात. या नव्या वळणातले प्रत्येक अक्षर अन् प्रत्येक शब्द डोळ्यांचा ठाव घेतो. त्याच्याच जोडीला जवळजवळ प्रत्येक पानावर चित्र, आणि त्यावर एक किंवा दोन द्वादशपदी कडवी-त्यामुळे पृष्ठांवरील मोकळी शुभ्र जागाही आपल्या सौंदर्यदृष्टीला खुणावत राहते.

वासंती मुजुमदार या कल्पक कलावतीने या पुस्तकाच्या साजशृंगारात खानदानी उदारपणा दाखवला आहे. मुखपृष्ठावर आषाढाच्या प्रथम दिवशीच्या घनघोर काळ्या घटांचे आणि सोनेरी पिवळ्या उन्हाच्या मधूनच होणाऱ्या शिडकाव्यांचे धूसर-प्रसन्न वातावरण पकडले आहे. जलरंगातला हा कोलाज सुबक प्रतिरूप मुद्रणातही सहीसही उतरला आहे. त्यामुळे या मुखपृष्ठाशीच मन रेंगाळत राहते.

पुस्तकाचे कव्हर उलटल्यावर पहिल्याच पृष्ठावर हाच कृष्णघटांचा घनघोर संग्राम पुढे येतो, मधूनच प्रकाशाचे दोन पुंज आपल्या नजरेला मोकळीक देतात-त्यापुढच्या दोन पृष्ठांवर पृथ्वीवरचे दगडधोंडे-प्रस्तरशिल्प आणि आकाशात दूरवर पसरलेल्या त्या मेघमालांकडे आतुरतेने माना वर करून पाहणारे दोन बगळे. . . रामगिरीतल्या वनराईत सुखेनैव विहार करणारे हरणांचे कळप आणि गुंफेबाहेरच्या शिळेवर एकटाच बसलेला एकाकी यक्ष, त्यापुढच्या पृष्ठांवरचे त्या यक्षाने उभे राहून मेघाला केलेले आवाहन - अशी ही चित्रमालिका शेवटच्या पृष्ठापर्यंत निसर्गाचे आणि मानवी रूपाचे वेगवेगळे विभ्रम पकडते. निसर्गरूपे रेखाटताना वासंती मुजुमदारांनी कोलाज पद्धतीचा वापर केला आहे.

ऐरावतासारखे दिसणारे ढग, डोंगरमाथे, कडाडणारी वीज, गगनचुंबी हिमशिखरे, भूमितलावरील शिलाखंड इ. यांना कोलाज चित्रामुळे एक सर्वव्यापी सहजता लाभते. यक्ष, ग्रामकन्या, कमलकळ्यांसारखी पावलं अळत्यानं रंगवून निघालेली चतुर कामिनी, सोन्याच्या दांडीवर दिमाखात बसलेला मयूर, रडून सुजलेल्या डोळ्यांनी कुरळ्या केसांच्या बटा फिकट मुखावर आणून थंडीनं झोडपलेल्या कमळवेलीसारखी मंचकावर पहुडलेली यक्षपत्नी यांना प्रवाही रेखाचित्रांद्वारे साकार केले आहे. निसर्ग आणि मानव या दोहोतील हा शाश्वत व क्षणिक, घनगंभीर आणि नाचरा-हसरा असा काल-संबंध त्यातून बरोबर पकडला जातो. आतील ही चित्रेही रंगीत असती तर या पुस्तकाचे सौंदर्य शंभरपट वाढले असते. अर्थात आहे या स्वरूपातही आपल्या भ्रुकुटिभंगाला निमित्तमात्र होणार नाही, असाच हा ठेवणीतला वाण आहे.

'मेघहृदय' हा ५० रुपये किंमतीचा एक काव्यसंग्रह नाही, ते एक अंतराचा ठाव घेणारा शब्दचित्रांचा विरहव्याकुळ-शृंगारमधुर अनुभव आहे. पूर्ण अनुभव.

या पुस्तकाची निर्मिती श्रीमंती थाटाचीच आहे. ती अगदी ॲरिस्टोक्रॅटिक राजेशाही करताही येईल. तसेच रसिक ग्राहक भेटले तर! ५० पृष्ठांच्या पुस्तकाची ५० रु. भारी किंमत.

(मेघहृदय : वसंत बापट, साधना प्रकाशन, ४३० शनिवार पेठ, पुणे ३०. पन्नास रुपये.)

□

# मराठी भंडी कवितेचा गोपाळकाला : शं. ना. जोशी

## *भेंड्यांसाठी ३००० कवितांचा संग्रह*

सहलीला गेल्यावर वा सुटीतल्या फावल्या वेळेत टाइमपास करण्यासाठी भेंड्या लावण्याचा खेळ हा हमखास उपयोगी पडतो. त्याला बाह्य साधने काही लागत नाहीत. केवळ स्मरणशक्ती आणि नेमका संदर्भ आठवण्याची 'हजरजबाबी' कुशलता.(वसंत बापट प्रस्तावनेमध्ये या कुशलतेला उपस्थिती हा शब्द वापरतात) चित्रपटांची नावे, चित्रपटांतील गीते, कविता, शहरांची नावे, इंग्रजी शब्दांची स्पेलिंग्ज इ. कशाच्याही भेंड्या लावल्या जातात आणि एका गटाने दिलेल्या शब्दाच्या वा कवितेच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणारा शब्द वा कवितेचा चरण दुसऱ्या गटाने पेश करायचा असतो. जर असा शब्द वा चरण दुसऱ्या गटाला ठराविक वेळेत पेश करता आला नाही तर पहिला गट तो पेश करून दुसऱ्यावर भेंडी चढवू शकतो. अगदी चुरशीचा हा खेळ कंटाळवाण्या प्रवासालाही रंगतदार बनवू शकतो, आणि वेळ कसा गेला याचे भानही राहू नये इतके अटीतटीचे रूप धारण करू शकतो.

अगदी शाळकरी अवस्थेपासून परिचयाचा असणारा हा खेळ, परंतु त्याबद्दल कधी गंभीरपणे विचार करण्याची गरजच वाटू नये इतका तो चिरपरिचित आहे. अतिपरिचयात् अवज्ञा म्हणतात त्याप्रमाणे. हा खेळ कधी सुरू झाला ? भारताच्या इतर राज्यांत त्याला काय नावे आहेत? संस्कृतमध्ये त्याला काय म्हणतात? कवितेच्या चरणांप्रमाणेच इतर कशाकशाच्या भेंड्या लावल्या जातात ?

श्री. शंकर नारायण जोशी या सत्तरी पार केलेल्या गृहस्थांनी आपल्या निवृत्तीनंतरच्या काळात सात-आठ वर्षे खपून या खेळाचा पाठपुरावा गेला आणि भेंड्यांसाठी उपयुक्त अशा १३६ कवींच्या तीन हजारांवर काव्यचरणांचे वा कडव्यांचे संकलन सिद्ध केले. प्रस्तावनेत या खेळाची माहिती देऊन त्याचा इतिहास आणि राज्यागणिक त्यात असणारे भेदही स्पष्ट केले आहेत. वसंत बापट यांनी या उपक्रमाचे काही विशेष आपल्या मिस्किल शैलीत खुलवून सांगितले आहेत.

## भेंड्या की भंड्या ?

भेंड्या लावणे हा शब्दप्रयोग आपल्याकडे सरसहा वापरला जातो, परंतु दाते-कर्वे शब्दकोशात दिलेला भंडी हा शब्द शं. ना. जोशी यांनी प्रमाण मानून आपल्या या संकलनाला मराठी भंडी कवितेचा गोपालकाला असे नाव दिले आहे. दाते-कर्वे शब्दकोशाने किंवा व्युत्पत्तिकोशानेही भंडी या शब्दाची व्युत्पत्ती दिलेली नाही, असेही जोशींनी नमूद केले आहे. दोन मुलांपैकी एकाने कविता म्हटली असता, तिच्या शेवटी येणारे अक्षर जिच्या आरंभी आहे अशी कविता दुसऱ्या मुलाने म्हणावयाची. याप्रमाणे आलटून-पालटून कविता म्हणण्याचा प्रकार. अशाच तऱ्हेने कोणत्या तरी अटी ठेवून कविता म्हणणे म्हणजे भंडी.

नवभारतमधील प. कृ. गोडे यांच्या मूळ इंग्रजी लेखाच्या भाषांतराच्या (१९५९ मधील) आधारे भंड्यांची पूर्वपीठिकाही दिली आहे. त्यावरून हा खेळ दोन हजार वर्षांपासून प्रचलित आहे, त्याला संस्कृतमध्ये प्रतिमाला, अंत्याक्षरी, अंत्याक्षरिका ही नावे आहेत. वात्स्यायनानेही त्याचा उल्लेख केला आहे. इंग्रजीत याला 'कॅपिंग द व्हर्स' असे म्हणतात. या खेळाला तेलगूमध्ये प्रासा, तामीळमध्ये अन्तादी म्हणतात, असाही खुलासा जोशींनी केला आहे. भंडी म्हणजे फजिती किंवा फसवणूक. भंडी चढवणे म्हणजे प्रतिपक्षावर मात करणे, त्याची फजिती करणे. त्यामुळे कालांतराने अंत्याक्षरीऐवजी भंडी हा शब्दच प्रचारात आला असावा, असा आपला कयास श्री. जाशी यांनी प्रकट केला आहे.

## आद्याक्षराप्रमाणे कवितांचे चरण

भंडी हा शब्द शब्दकोशात दिला आहे म्हणून ग्रंथनामात वापरण्याचा त्यांचा निर्णय अर्थातच वादविषय होऊ शकतो.

भेंड्या हा शब्द आज प्रचलित आहे. तोच वापरणे अधिक सोयीस्कर असे मला वाटते. दोन हजार वर्षांपासून चालत आलेल्या भेंड्यांच्या सांस्कृतिक परंपरेला आपण पारखे झालो आहोत हे जोशी यांचे विधानही बरोबर नाही. हा खेळ महाराष्ट्रात आजही सर्वत्र लोकप्रिय आहे. मात्र जाहीर स्पर्धा होणे वा शासकीय पातळीवर त्याला मान्यता मिळणे हे या खेळाला जोरदार चालना देणारे ठरेल, हे जोशी यांचे प्रतिपादन ग्राह्य आहेच. जागोजाग स्थानिक पातळीवर भेंड्यांच्या स्पर्धा होत राहिल्या. शालेय पातळीवरही त्याचे आयोजन हे गीता पाठांतराप्रमाणे स्मरणशक्ती व काव्याची अभिरुची जोपासण्यासाठी प्रेरक ठरेल. सध्या ज्या अक्षराने कविता वा शब्द संपतो त्या अक्षराच्या बाराखडीतील कुठल्याही अक्षराने पुढची कविता वा शब्द सुरू करता येतो. त्याच अक्षराचा आग्रह धरला तर चुरस वाढेल अशीही सूचना त्यांनी केली आहे. तीही विशेष नैपुण्य स्पर्धेला पोषक ठरेल. दूरदर्शनवर क्विझ प्रोग्रॅमप्रमाणे भेंड्यांच्या स्पर्धा झाल्या तर त्यांना नव्याने सार्वत्रिक प्रतिष्ठा लाभू शकेल.

भेंड्यांच्या दृष्टीने श्री. शं. ना. जोशी यांनी आद्याक्षरानुसार कवितांचे चरण निवडून ते अ वर्ग, क वर्ग, च वर्ग, प वर्ग, ट वर्ग य र ल व श ष स ह ळ ज्ञ या क्रमाने पुस्तकात दिले आहेत. प्रत्येक चरणाचे वृत्त आणि कवी यांचाही निर्देश केला आहे. दीडशेवर कवींच्या काव्यभांडारातून निवडलेल्या तीन हजारांवर चरणांमुळे भेंड्यांच्या दृष्टीने तर सोय होतेच. परंतु मला या संग्रहाचे एका वेगळ्या दृष्टीनेही मोल वाटते. लहानपणापासून आपल्या ऐकण्यात असणाऱ्या आणि कधी काळी वाचनात आलेल्या अनेक कवितांच्या ओळी या येथे चरणाचा भाग म्हणून येतात आणि त्या पूर्ण चरणाच्या संदर्भात त्या ओळींचे वेगळेच अर्थ गवसतात. त्या काव्याचा व कवितेचाही परिचय होतो. त्या कवींचेही कसब, कौशल्य त्यायोगे ध्यानात येते. जुन्या वृत्तांमधील गेयताही पाठांतराला कशी अनुकूल ठरे याचीही खूणगाठ पटते.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, वामन पंडित, सामराज, रघुनाथ पंडित, फादर स्टिफन्स, भानुदास, श्रीधर, मोरोपंत, होनाजी बाळा, विष्णुदास, नामा यांसारख्या संत-पंतकवींच्या निवडक व सूत्रमय काव्यचरणांची उजळणी होतेच. १९-२० व्या शतकातील कवींच्याही काव्यपंक्तींची सौंदर्यकळा टवटवीत गुलाबाप्रमाणे मन आकर्षून घेते. अनेक विस्मृत कवींचे स्मरण ताजे होते. प्रथमच मोरोपंतांच्या अंत्ययमकांच्या कसरतीने करमणूक होते, विशिष्ट वृत्तात रचना करताना जुन्या मराठी कवींची जी दमछाक होई तिच्याही खाणाखुणा जागोजाग भेटतात. तुकाराम-रामदासांच्या रोखठोक प्रासादिक मराठीचे सामर्थ्य प्रत्ययाला येते. गाजलेल्या व परिचित ओळींच्या आसपासच्या ओळी वाचायला मिळतात आणि त्यांची काव्यात्मता व रचनादृष्ट्या होणारी ओढाताण लक्षात येते. यशवंतांच्या 'आई' कवितेचा एक चरण येथे दिला आहे.

***आई म्हणोनि कोणी आईस हाक मारी ।***
***ती हाक येई कानी मज होई शोककारी ॥***
***नोहेच हाक माते मारी कुणी कुठारी ।***
***आई कुणा म्हणू मी आई घरी न दारी ॥***

पहिल्या दोन ओळी आणि शेवटची चौथी ओळ या आपल्याला पाठ असतात. परंतु तिसरी ओळ मात्र कुणाच्याच स्मृतिमंजुषेत स्थिरावलेली नाही. काव्यदृष्ट्या तसेच कल्पनेच्या दृष्टीने ती इतर ओळींपेक्षा कच्ची आहे, हे याचे कारण असावे.

ल. गो. विंझे, लक्ष्मणशास्त्री रेंदाळकर, वि. भ. लेंभे, न. शं. रहाळकर, गं. रा. मोगरे, वि. मो. महाजनी, आनंदराव टेकाडे अशा अनेक विस्मृतीत गेलेल्या कवींच्या या संग्रहातील काव्यपंक्ती वाचताना थोडीशी हळहळ वाटतेच. वामन पंडित, रघुनाथ पंडित यांच्या नीतिबोधपर सूत्रांतील नेमकेपणा आणि समर्पक दृष्टांतांचा वापर परिणामकारक ठरतो.

***प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलहि गळे***
***तृषार्तांची तृष्णा मृगजळ पिऊनीहि वितळे***

*सशाचेही लाधे विपित फिरता शृंगही जरी*
*परंतु मूर्खाचे हृदय धरवेना क्षणभरी ॥*

ही शिखरिणी वृत्तातील चतुष्पदी वामन पंडितांची आहे. तिच्यातील पहिली ओळ तर म्हण म्हणूनच मराठीत रूढ झालेली आहे.

## ळ, ण यांचे आव्हान

ळ आणि ण अक्षरे अशी आहेत की जी शब्दाच्या आरंभी येतच नाहीत. त्या अक्षरांनी सुरू होणाऱ्या काव्यचरणांची स्पर्धा आनंद मासिकाने १९२५-२६ मध्ये लावली होती. त्यापैकी काही कविता या गोपालकाल्यात आल्या आहेत. त्यांतील कसरती आजही चतुर आणि लक्षणीय वाटतात.

*'ळ हे अक्षर आहे चौतिसावे मराठी भाषेत*
*पाहू गेले असता ते न सापडे मराठी कवितेत.'*

यात कवीला शब्दाच्या आरंभी ळ आढळत नाही हे सांगणे जमले नाही. सबंध मराठी कवितेतच ते नाही असे अतिव्याप्त विधान तो करतो.

*ळ वर्ण आद्याक्षर येत नाही*
*मराठि शब्दांमधि ते कदाही*
*जोडावया पद्य नसे मुलांना*
*भंडीत कोडे पडतें तयांना*

ही र. गो. यारदी या अपरिचित व्यक्तीची गद्यप्राय कविता मुलांची समस्या मात्र बरोबर सांगते.

*'ण आद्याक्षराचा कुठे शब्द नाही*
*मराठीचिया कोशि शोधून पाही*
*कधी पाळि भंडीत येईल तेव्हा*
*तिथे श्लोक हा नेमका वापरावा'*

ही गंगाधर ठेकेदारांची रचना भंडीत सुटकेचा मार्ग दाखवते.

रामदासांच्या काव्यचरणातील अनेक शब्दप्रयोग आजही अनोळखी, नवे करकरीत वाटावेत, असे आहेत.

*झिडका झिडकू द्यावे वारा*
*जैसा काळीचा म्हणियारा*
*ढग मारूनी दिनकरा*
*मोकळें करी ।*
*झिंजी हे सर्व लोकांची*
*चुकता झिडकू नये*

*मनापासून वोढावे*
*यासी त्यासी क्षणक्षणा ॥*
*ढिसाळ ढाळा ढळती कुंचे*
*ढोबळा ढकसण डुले नाचे*
*ढळेचीना ढिग ढिगांचे*
*कंटाळवाणे ॥*
*डळमळ डळमळ डळो नये*
*डगमग डगमग कामा नये*
*डंडळे डंडळ चुको नये*
*हेकांडपणे ॥*
*ठस ठोंबस ठाकावेजा*
*ठक ठक ठक करावेना*
*ठाके ठमके ठासावेना*
*मूर्तिद्यान ॥*
*हुंब्यासि हुंबा लावून द्यावा*
*टोणप्यास टोणपा आणावा*
*र या संग्रहामइलौंदास पुढे उभा करावा*
*दुसरा लौंदा ॥*

या सर्व ओळी रामदासांच्या लेखणीतून उतरलेल्या आहेत हे कदाचित खरेही वाटणार नाही.

## एका दगडात अनेक पक्षी

म्हणूनच मराठी भंडी कवितेचा हा गोपालकाला एका दगडात अनेक पक्षी मारणारा आहे. भेंड्यांसाठी तर यातील कवितांचा वापर करता येईलच. जुन्या वृत्तांची व रचनाछंदांची गेयताही आपल्याला आकृष्ट करील. अनेक अज्ञात अपरिचित विस्मृत कवींकडे ती आपले लक्ष वेधील, रूढ परिचित काव्यपंक्तीचे संदर्भ त्यामुळे ध्यानात येतील. जुन्या-नव्या कवींच्या रचनावैशिष्ट्यांचे सहजसौंदर्य व कसरतबाजी त्यामुळे जाणून घेता येईल. तसेच सुभाषित-सुविचारांचे एक भांडारही या संग्रहामुळे आपल्यापुढे खुले होईल. कुठलेही पान उघडावे आणि वाचावे, तेथेच रमावे असे हे वैभव वाचकाला श्रीमंत करणारे आहे. मराठी कवितेच्या सातशे वर्षांच्या परंपरेचेही धावते दर्शन त्यामुळे सहजगत्या होऊन जाते. एरवी ज्यांचे काव्यग्रंथ आपण मुद्दाम मिळवून सहसा वाचण्यासाठी हाती घेणार नाही, अशा कवींच्या काव्याचीही ओळख या गोपालकाल्यामुळे अनायासे होऊन जाईल आणि आनंदाचे एकेक नवे दालन खुले झाल्याचा प्रत्यय येईल.

**व्यापक प्रयत्न**

भेंड्यांवर मराठीत या आधी तीनच पुस्तके निघाली आहेत. अशी नोंद या पुस्तकात आहे. या तिन्ही पुस्तकांपेक्षा हा प्रयत्न अधिक व्यापक आणि महत्त्वाकांक्षी आहे. कवींची नावे आणि वृत्ते यांचा तपशील दिलेला असल्यानें या संग्रहातील कविताचरणांचे मोल वाढले आहे. भेंड्यांच्या लोकप्रियतेला नवी परिमाणे लाभण्याच्या दृष्टीने या पुस्तकाचा चांगला उपयोग होईल. शुभदा सारस्वत प्रकाशनचे संचालक शरद गोगटे यांनी या संग्रहाचा पाठपुरावा केला आणि म. रा. साहित्य संस्कृती मंडळाने त्याला अनुदान दिले. याचा गौरवाने उल्लेख करायला हवा. साडेतीनशे पृष्ठांच्या या पुस्तकाची किंमत ५५ रुपये म्हणजे माफकच आहे. या पुस्तकाच्या प्रती प्रत्येक वर्गासाठी शाळांनी वेगवेगळ्या घ्याव्यात, असेही सुचवायला हरकत नाही.

निवृत्तीनंतरचे आपले आयुष्य अशा एखाद्या छंदासाठी व कल्पनेसाठी गुंतवण्याचे मोल मोठे आहे. आपल्या पतीच्या या छंदात सौ. कमल जोशी यांनीही समर्थपणे साथ दिली आहे, याचाही निर्देश कौतुकाने करायला हवा.

(मराठी भंडी कवितेचा गोपाळकाला : संपादक : शं. ना. जोशी, शुभदा सारस्वत प्रकाशन, ६७, पाटील इस्टेट, पुणे ५ पृष्ठे ३५० पंचावन्न रुपये.)

□

# मॉस्कोतील कविता : बापूराव जगताप

## *मॉस्कोच्या प्रेमात पडलेला कवी*

*"हे मॉस्को,*
*कला आणि क्रांतीच्या नगरी*
*तुझ्या सुंदर हृदयसरोवरातील*
*माणसांची गुलाबी डवरलेली कमळं घेऊन*
*मला माझ्या नेत्रात बागा फुलवू दे.*
*हे मॉस्को !*
*माझी जीवननौका*
*या कमळांच्या भोवती विहरत राहू दे.*
*आणि मला एक विशाल कालवा*
*मॉस्कोहून दिल्लीपर्यंत खणून दे.*
*ही सारी कमळं वाहात*
*माझ्या होडीमागून येऊ देत.*
*त्यानं जगाला सुखसमृद्धी मिळेल."*

असे आर्त उद्‌गार काढणारे कवी आहेत औरंगाबादचे प्राध्यापक पट्ठे बापूराव जगताप. १९८५ मध्ये रशियाचा दोन आठवड्यांचा दौरा करण्याची संधी त्यांना मिळाली आणि तेथून आल्यावर मॉस्कोच्या स्मृतिज्वराने त्यांना जाम झपाटून टाकले. जळीस्थळीपाषाणी त्यांना मॉस्कोची 'भोळीभाबडी' माणसेच दिसत राहिली. त्या माणसात पराक्रमी भाऊ-बहिणींचे दर्शन त्यांना घडत राहिले. तिथल्या मातांमध्ये जगन्मातांचे रूप त्यांना दिसू लागले. मॉस्कोचे पांढऱ्या शुभ्र कबुतरासारखे अन आषाढमेघासारखे गरजणारे आभाळ चांद्रयानातून जगावर तारकाफुले उधळतेय असे भास त्यांना होऊ लागले. शतकांची भूक लागलेल्या उपाशीपोटी माणसाला कधी न संपणारी प्रचंड भाकरी देणाऱ्या लेनिनमधील शक्तिशाली नायकाने त्यांना मोहून टाकले आणि लाल चौकातील त्याच्या

समाधीपुढे आपणही समाधिस्थ व्हावे या विचाराने त्यांच्या मनाला सैरभैर केले. मॉस्कोच्या महान भूमीतील सारी धग, सारी प्रतिभा आपल्यात संचारावी असे वाटून गेले. 'कालचा पाऊस आमच्या गावात कोसळलाच नाही' असे म्हणणारा एकही व्याकुळ कवी आपल्याला मॉस्कोत भेटला नाही' असेही सोल्झेनित्सिन, शोलोखोव्ह, ब्रॉडस्की मांदेलश्ताम, ॲना अखमातोवा ही नावे ज्ञात असणारे प्रा. जगताप हमीपूर्वक सांगतात ! धन्य आहे त्यांची.

## लेनिनने घडवलेली मानवी शिल्पे

मॉस्कोच्या मातीतील कण न कण बापूराव जगतापांना कसा निखळ बावनकशी सोन्यासारखा आकर्षक आणि आदरणीय वाटतो आहे ! मॉस्कोत त्यांना पावलोपावली दिसताहेत दाही दिशांना सौंदर्य उधळणारी लेनिनने घडवलेली मानवी शिल्पे, (स्टॅलिनने दडपलेली नि कुस्करलेली भावजीवने त्यांना दिसलीच नाहीत) वेरूळ अजिंठ्यापेक्षाही ही माणसातून घडवलेली लेणी अधिक सुंदर संपन्न आहेत अशी बापूरावांची आत्मप्रतीती आहे. ही मानवी शिल्पे उत्साह आणि आनंदाने आपल्या समर्थ बाहूंनी आणि पारदर्शी निळ्या डोळ्यांनी एकमेकांच्या हातात हात घालून निसर्गालाही सामर्थ्य देत आहेत आणि उमलणाऱ्या ओठातून सर्वांसाठी हास्य सांडत आहेत. (कविता क्र. ३५) मॉस्कोतल्या मुक्या माणसांचा मंजुळ, मोकळा आवाज त्यांना ऐकायला आवडतो. (कविता क्र. ३३) मॉस्कोच्या तरुण-तरुणींच्या हृदयात सूर्य तळपताना दिसतात आणि ते कवीच्या हृदयाच्या क्षितिजावर एकदम येऊन स्थिरावतात (कविता क्र. ३१) आणि त्यामुळे जगाची स्वप्ने उरात साठवून वैभवशाली उज्ज्वल उद्यासाठी एका विलक्षण चैतन्याच्या धुंदीत कवी भिरीभिरी मॉस्कोच्या अंगाखांद्यावर फिरतो (कविता क्र. ३२), या मॉस्को नगरीत मानवी स्वातंत्र्याचा अलौकिक श्वास कवीला ऐकू येतो. (सैबेरियात त्यांना कोणी हिंडवून आणलेच नाही.) आणि वैयक्तिक मालकीच्या भ्रमजालात सापडलेल्या सागरी प्रवाशांना आश्वासक किनारा येथेच दिसतो. (कविता क्र.३०) माणुसकीचे भरघोस पीक सर्वांसाठी पिकवणारे, माणसांच्या मनाची मशागत करणारे नांगरही येथील सामूहिक शेतजमिनीत त्यांना दिसतात. (कविता २८), मॉस्कोतले राजवाडेही बापूराव जगतापांना खूप आवडतात कारण त्या राजवाड्यात त्यांना विश्रामगृहे, रुग्णालये, शाळा, कॉलेजे थाटलेली दिसतात. (कविता २७) असे हे मॉस्कोच्या प्रेमात पडणे, झपाटून जाणे. चपखल, गोजिरवाण्या, तारस्वरातल्या घोषवाक्यांच्या साहाय्याने मॉस्को हा प्रॉडक्ट जणू ग्राहकांच्या गळी उतरविण्यासाठी बापूराव जगतापांनी आपली सेल्समनशिप पणाला लावली आहे.

## गोदातीरावर लाल चौक उभारण्याची कांक्षा

भारताबद्दल बापूरावांना तसं फारसं प्रेम कधीच वाटलेलं नाही हे ते वरचेवर आग्रहपूर्वक स्पष्ट करतात. ज्या गोदावरीच्या परिसरात ते जन्मले, त्या गोदावरीचे नामांतर

प्रश्नाच्या वेळी रस्त्याने लाल झालेले पाणी त्यांनी बघितले आहे. दीनदलितांच्या जाळलेल्या झोपड्यांचे प्रतिबिंब शांतपणे वाहून नेणारे तिचे रूपही त्यांनी देखलेले आहे; तिचे हे दूषित पाणी बदलण्यासाठी तिच्या प्राचीन घाटावर लाल चौक आणि क्रेमलिन बांधणे हाच एकमेव मार्ग बापूराव जगताप यांच्या लेखी उरलेला आहे.(पृष्ठ १४)

भारत हा देश महान आहे, पण तिथल्या आकाशानं आपल्यावर अंधारच ओतला अशी त्यांची तक्रार आहे. भारतातील उद्‌ध्वस्त गावं, गावकुसं, जातिपंथांचा बडिवार, गावकुसाबाहेरची अस्पृश्य गावं, वेगळ्या विहिरी, पाणवठे, स्मशानं, डोंगरदऱ्यातील वनवासी मुलं, झोपडपट्टीत गटारांच्या काठी सडलेल्या माता, भ्रष्टाचाराने उभारलेल्या भव्य इमारती, शेतकऱ्यांच्या घरादारांवर फिरवला जाणारा आणि पाणी-वीज, शिक्षण, रस्ते, आरोग्य यांना उद्‌ध्वस्त करणारा नांगर या सर्वांबद्दल त्यांच्या मनात चीड आहे आणि ही सर्व स्थिती बदलण्यासाठी त्यांची सारी भिस्त आहे ती सोव्हिएत रशियावर. भारतातील स्पृश्य-अस्पृश्यता, जातीपाती-धर्मांधता यांना हिंदी महासागरात बुडवून, मस्क्वा-व्होल्गांनी संपन्न केलेली नवी व्यवस्था त्यांना प्रस्थापित करायची आहे. उरल-कॉकेशियस, हिमालय, सह्याद्री पर्वताच्या विशाल रथांची चाकं मॉस्को-दिल्लीच्या गतिमान सुवर्णरथाला जोडून साऱ्या विश्वावर शांतिसाम्राज्य स्थापण्यासाठी क्रेमलिनने एकविसाव्या शतकाचा सूर्य सारथी म्हणून द्यावा अशी त्यांची रशियाच्या राज्यकर्त्यांपुढे हात जोडून प्रार्थना आहे. भारतातील सजवलेले बंगले, मोटारींचे ताफे, विचारवंतांची भ्रष्ट डोकी, संपत्ती दडवणारे आणि स्वतःसाठी राजसत्ता चालवणारे धनिक सत्ताधीश यांच्यावर मॉस्कोतील हे नांगर फिरवून त्यांना जमीनदोस्त करावे आणि भारतातील मातीला व आकाशाला चैतन्य द्यावे अशी ओढ कवीला लागली आहे. लेनिनच्या जन्मगावातल्या झाडांच्या सावल्या आणि शांत निर्झर उचलून भारतातच नव्हे तर आशिया-आफ्रिकेच्या भूमीत पेरायचे असे कवीचे स्वप्न आहे.

## मॉस्को ते दिल्ली : प्रचंड नवे राष्ट्र हवे

एक नवे राष्ट्रगीत मॉस्कोत शोधून, मॉस्को ते दिल्ली असे एक प्रचंड राष्ट्र निर्माण करून त्यांना प्रत्येक भारतीयाच्या कंठातून ते गाऊन घ्यायचं आहे. दिल्लीतल्या किल्ल्यांना लाल रंग नव्याने द्यायचे आहेत. लेनिनच्या ज्या हाताने ईश्वराला बंदिस्त केले, ईश्वराचे चुकीचे कायदे दुरुस्त केले आणि माणसाला मुक्त केले तो पोलादी प्रेमळ हात 'भारत-रशिया' यांच्या एकत्रीकरणाच्या मोहिमेच्या 'कमांडरपदी' स्वेच्छेने स्वतःच नेमणूक करून घेणाऱ्या बापूराव जगतापांना अलगदपणे घेऊन येण्याची आस लागून राहिलेली आहे. हे हात काळ्यागोऱ्यांना एकत्र आणतील आणि अण्वस्त्रांचे सारे साठे नष्ट करतील अशी या कमांडरची बाळबोध श्रद्धा आहे. 'संपत्तीवर आणि संपत्तीसाठीच जगणाऱ्या माणसातल्या मृतांना' नव्या दुनियेत, व्होल्गा ते गंगा आणि थेम्स ते सिंधूपर्यंत पसरलेलं

इंद्रधनुष्य या कमांडरला दाखवायचं आहे.

## झेन्या रोमानोव्हाची वेड लावणारी मिठी

मॉस्कोतल्या युवक महोत्सवात बापूराव जगताप यांना एका तरुणीने 'बापूराव, भारत-रशिया मैत्री चिरायू होवो' असे म्हणून उत्फुल्ल होऊन चक्क मिठी मारली. या तरुणीचे नाव झेन्या रोमानोव्हा. तो दिवस २७ जुलै १९८५ हा बापूराव जगताप यांच्या इवल्याशा हृदयात घट्ट घट्ट जाऊन कसा बसला आहे याचे छानछटाक चित्र अठराव्या कवितेत निरागस होऊन प्रकटते. या झेन्याशीही बापूराव गुफ्तगू करतात ते कशाबद्दल ? तर भारतातील आजची खेडी नष्ट झालेल्या गावांची स्मशानं आहेत. ती सोविएत रशियातल्या खेड्यासारखी आनंदाच्या बागांनी सजवायची आहेत यासाठी तिचे हात हातात हवेत म्हणून ! (कविता २०) झेन्याच्या निळ्या डोळ्यात देशातले सारे धर्मसंस्थापक जन्म घेताना बापूरावांना दिसतात (कविता २१), आपला सोनेरी पिसारा उभारून झेन्याचा मोर धुंदपणे नाचला याचेही कवीला अप्रूप आहेच. (कविता १९), दुसऱ्या महायुद्धाच्या गोष्टी झेन्या सारखी सारखी सांगत असते. म्हणून तुझ्या-माझ्यातला 'शांतता-मैत्री-सहभाग' तिसरं युद्ध टाळू शकेल असा दिलासा बापूराव तिला देतात (कविता १७), एवढेच नव्हे तर ती सोबत असताना मॉस्कोतलंच नव्हे तर भारतातलंही आकाश त्यांना वेगळं दिसतंय, आणि भारतातल्या माणसांची गावं नव्यानं बांधण्यासाठी लाल चौकातलं सामर्थ्य झेन्याने आपल्याला द्यावं अशी ते तिची आळवणी करतात. तेथील पार्कमध्ये झेन्याचा प्रेमळ हात लोकसंगीताचे स्वर छेडतो तेव्हा आपल्या अंतःकरणात वाहणारी महोत्सवी यात्रा आणि मैत्रीपूर्ण संवादाची स्नेहयात्रा जगाच्या सुखाच्या शोधात निघाल्याचा साक्षात्कार बापूरावांना होतो ! (कविता १५)

## वात्सल्याचा धबधबा

सोव्हिएत भूमी बापूराव जगताप यांना महान प्रयोगशील, विशाल हृदयाची भूमी वाटते. तिच्या मातृत्वाच्या महान धारांनी न्हाऊन निघाल्यासारखे वाटते. तिच्या वात्सल्याच्या धबधब्याखाली अमरत्वाची निद्रा घेण्याची उत्कट इच्छा त्यांच्या मनात दाटते. (कविता २६) लेनिनच्या चिरंतन समाधीतला चिरंतन आवाज आपल्यात घुमावा अथवा त्याच्या अंतरात समाधी मिळावी अशीही भावना ते प्रकट करतात. (कविता ६)

एवढेच नव्हे तर भारतात गोदातीरी आपला जन्म झाला याचीही कुठेतरी त्यांना खंत वाटते. 'जन्म न घेताही तूच माझी जन्मभूमी आहेस' असे ते म्हणतात. रशिया ही आपली काळजाची मायभूमी असल्याचे ते अभिमानाने नमूद करतात. त्यामुळे मॉस्कोला जाण्यापूर्वीच 'माझ्या हृदयात कोरलेली मॉस्को नगरी चिरंतन झालेली होती' असे ते प्रास्ताविकातही स्पष्ट करतात. दोन आठवड्यांच्या अल्प वास्तव्यानंतर या भूमीचा

निर्धारपूर्वक निरोप घेताना जगतापांच्या काळजात कालवाकालव होणारच. 'फक्त माझ्याच प्रतिक्षेत असलेली झेन्या रोमानोव्हा. भारत-रशिया मैत्रीचं जिवंत प्रतीक', त्याचाही निरोप घेणं आलंच. या निरोपाच्या संध्याकाळचं वर्णन करणारी एक कविताही जगतापांनी लिहिली आहे.

तर प्रा. बापूराव जगताप यांच्या मॉस्को यात्रेची अशी ही स्मृतिचित्रे. मॉस्कोत जगतापांना फक्त दिसले ते क्रेमलिन, तेथील घंटा, लाल चौक, चर्चचे शिखर, मस्क्वॉ नदीचे पात्र, जुने राजवाडे, इझमायलोस्की पार्क, वसंत ऋतू, पियानोचे स्वर छेडणारी तरुणी, झेन्या रोमानोव्हा ही मार्गदर्शिका, लेनिन स्टेडियम आणि लेनिनचे जन्मगाव सिम्बिर्क. . ...... जगतापांचे निरीक्षण अगदीच ढोबळ आहे. तेथील निसर्गाची वर्णने अगदी सांकेतिक आहेत. झेन्याचे डोळे फक्त निळे दिसतात. इतर काहीच रूपरंग तिला लाभत नाही. मॉस्कोतली माणसे ही लेनिनने घडवलेली शिल्पे या स्वरूपातच दिसतात. जिवंत एकेकट्या व्यक्ती त्यांना दिसतच नाहीत. सगळीकडे जनरलाइज्ड सर्वसामान्य ढोबळ विधानांचाच गदारोळ. त्यामुळे या सर्वच कविता नुसत्या प्रचारकी थाटाच्या, ढोबळ भावनांच्या शिळ्यापाक्या आवर्तनांच्या, त्याच त्या विधानांची पालुपदे पुनः पुन्हा आळवणाऱ्या, जाहिरातीतल्या गोंडस कॉपीसारख्या चटपटीत बनल्या आहेत. मॉस्को ही आदर्श नगरी, रशियाची समाजप्रणाली ही निर्दोष, शांतताप्रिय, सुखी जीवनप्रणाली हा झापडबंद विचार रशियाच्या भेटीपूर्वीच जगतापांच्या मनाच्या गाभाऱ्यात पक्का बसलेला. त्यामुळे आपला जन्म भारतात झाला असला तरी आपली खरी मातृभूमी रशिया हा त्यांचा गाढ विश्वास आधीपासून दृढावलेला. तेव्हा रशियात गेल्यावर डोळे उघडे ठेवून वावरणे जगतापांना शक्यच झाले नसावे. रशियात सर्व काही आलबेल आहे आणि भारतात आपल्याल रशिया आणायचा आहे, दिल्ली-मॉस्कोचे एकच राज्य निर्माण करावयाचे आहे, हा जगतापांच्या कवितेतला भ्रामक सूर तर रशियाची भाटगिरी करणाराच आहे. सोविएत लँडच्या पाच-दहा हजारांच्या भुक्कड दक्षिणेसाठी आणि दहा-पंधरा दिवसांच्या फुकट दौऱ्यासाठी बिनकण्याची भाट मंडळी रांगा लावून हारीने खडी आहेत. भारताची नालस्ती करण्याने आपला डावेपणा सिद्ध होतो अशा भ्रमात ती वावरत असतात.

एखाद्याने एखाद्या गावाच्या, देशाच्या, राज्यप्रणालीच्या वा व्यक्तीच्या प्रेमात जरूर पडावे, परंतु डोळ्याला झापडे लावून आणि वास्तवाकडे पाठ फिरवून स्वत्वाचे भान हरपण्याएवढे वाहवत जावे हे जळो जिणे लाजिरवाणेच नव्हे का ?

(मॉस्कोतील कविता : प्रा. बापूराव जगताप. प्रकाशक : श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे ३०. पृष्ठे ६०. किंमत २७ रुपये ५० पैसे.)

□

# वाटेवरले गाणे : कविता जपे

## *रूपसुंदर क्षणांनी तजेलदार झालेले वाटेवरले गाणे*

कळी उमलते आणि उमललेल्या पाकळ्यांनी खुल्या केलेल्या विशाल जगाचे दर्शन घेणाऱ्या फुलाला उचंबळून येते.

कुमार वयातून तारुण्यात पदार्पण करणाऱ्या प्रत्येक युवक-युवतीला असेच एकदम विशाल जगाचे भान येते आणि या जगाचे आपणच एकटे साक्षीदार, स्वामी आहोत असे जाणवते.

ह्या विशाल जगाची होणारी ही पहिलीवहिली जाणीव अनेकदा काव्य बनून प्रकट होते. हे काव्य मग जुन्या वाचलेल्या आठवलेल्या ओळींचे पुनर्स्मरण असेल, पुनरुक्ती असेल वा शब्दांचे नवे रंगरूप घेऊन उत्स्फूर्तपणे उमटलेले भाव कोवळ्या अंतरंगाचे प्रांजल नवल-निरुपण असेल. स्वतःच्या अहंकेंद्रित व्यक्तित्वाचे निर्हेतुक प्रक्षेपण असेल वा स्वतःच्या भावी महत्त्वाकांक्षेचे अनिर्बंध स्वप्न -रंजन असेल. अंगाप्रत्यंगात भरणाऱ्या नव्या बहारीची ती सुखद्र जाणीव..... आणि त्याच वेळी सृष्टीतील साऱ्याच गोष्टीत जाणवणारा सुसंवादी ताजेपणा यांचा मेळ मनात आपोआपच सुरेख जमत जातो, आणि नव्या आशांचे इमले डोळ्यांपुढे साक्षात उभे राहू लागतात.

...अशा काव्यातली नवथर नव्हाळी ही रोमांचकारक असते.

.. बहुतेकांच्या जीवनातील ही काव्याची धुंदी अल्पकाळ टिकते. पुढचे आयुष्य नोकरी, पगार, ऑफिस, संसार, जमाखर्चाची ओढाताण आणि तडजोडी स्वप्नगंध यात भरकटत जाते आणि तारुण्यातल्या गुलाबी स्वप्नफुलाच्या एकेक पाकळ्या गळू लागतात.

अशा एका स्वप्नाळू मनोवस्थेतील काही सुंदर ओळी 'वाटेवरले गाणे' मध्ये भेटतात, आणि त्यांना जणू विरोध म्हणून प्रौढ वयातल्या कर्तव्यभावनेतला आणि प्रापंचिक गृहिणीच्या स्थिर जीवनातला तोचतोचपणा-हरवलेला उत्फुल्ल ताजेपणा उत्तरकालीन कवितांमधून प्रकट होतो. एक आवर्तन पूर्ण होते.

अशा वयातल्या कविताही केवळ डायरीत वा वहीत बंदिस्त राहतात.

परंतु सौ. कविता जपे यांनी मात्र शाळा-कॉलेजच्या वह्या– पुस्तकांवर खरडलेल्या कविता तब्बल पंधरा वर्षांनी शोधून काढल्या. पुढेही त्यात काही भर घातली आणि साठ कवितांचा वाटेवरले गाणे हा संग्रह प्रसिद्ध केला.

यातील काही कविता यौवनातील नव्हाळीच्या, प्रीतीच्या अल्लड खाणाखुणांच्या आहेत आणि काही कविता पंधरा-वीस वर्षांच्या वैवाहिक जीवनाचा अनुभव गाठीशी आल्यावर मनात दाटणाऱ्या खळबळीच्या आहेत. सर्वच काही प्रकट करता येते असे नाही, भावभावनांचे नेमकेपणही अनेकदा निसटून जाते, परंतु मनातली वादळे तरीही आपल्यापर्यंत येऊन पोचतात.

पूर्व स्मृतींनी गहिवरलेल्या त्या दिवसांचे स्वरूप कसे होते ? हातातले थवे सोडून द्यावेत असे भिरकावून दिलेले दिवस. डोळ्यात पाऊस ऋतू आणि सुकले हार घेऊन गाणे शोधत राहणारे. स्पर्श-शपथांचे आणि आश्वासक स्वप्नांचे खोल डोहाच्या तळातील स्वयंभू मूर्ती लाल आसनावर सुशोभित करणारे असे ते दिवस. भावी आयुष्याबद्दल अमर्याद आश्वासने शोधणारे क्षण.

पुढे काय होते ?

या कवितेतील मी जी कोणी आहे ती अक्षदा उधळून कोणाची तरी जीवनसंगिनी बनते. आपले परब्रह्म शरीर त्याच्या पूजेला सर्वकाळ सिद्ध ठेवते. मनाला भरजरी वस्त्रे नेसवून केव्हाचीच उघडी होते. त्याच्या आणाभाकेच्या आणि भांगातल्या कुंकवाच्या लक्ष्मणरेषेचा धाक बाळगते.

परंतु या कवितांतील 'मी' आणखी एका अनुभव चक्रातून जणू जाते. ह्या टप्प्यावर त्या कोणा जोडीदाराचे जीवनातले असणे हे नसल्यासारखे होते. साफल्याची धाव संपते, आणि त्याने दिलेली धाव बेदरकारपणे उरीकुशी वागवत ती जगत राहते. औदासिन्याच्या सावटानं नदी-डोंगर-माळ सारंच झाकोळून जातं. उधाळणाऱ्या हास्याला, उत्साहाला पक्षाघात होतो. घोड्यावरून कोसळलेल्या झाशीच्या राणीच्या वेषात आपल्या संपलेल्या देहाची ठप्प झालेली हालचाल दिसू लागते. बेटाच्या त्या टोकावरच्या सफेद देवळाचे आमंत्रण स्वीकारण्यासाठी मैल मैल तुडवून परतल्यावर आपली नुसती दमणूकच झाली, कारण देवळातला देव बघायचाच राहिला असे तिच्या लक्षात येते.

कधी कधी ही हळवी-गंभीर 'मी' एकदम पार लौकिकाच्या कल्पनेनेच भारावून जाते आणि गाणी, पुस्तके, बॉन्साय, घर आणि नाती यांना सोडून जाण्याची वेळ येईल तेव्हा माझ्या नसण्याच्या धगीत तुमचे आयुष्य होरपळून निघेल या विचाराने भयचकित होते.

कधी कधी रॉय किणीकरांच्या रात्र-उत्तररात्रीचे पडसाद कवयित्रीच्या काव्यात उमटतात :

*थकतील पाऊले भ्रांति थकली नाही*
*श्रमतील ऋतू पण चक्र थांबले नाही.*

*हा युगायुगांचा शाप मला काळाचा*
*मी तुझी होऊनी तुझी राहिले नाही.*

काही काव्यमय कल्पनाही मनात रेंगाळत राहतात. श्वासांचेही ओझे व्हावे एवढे एकटेपण जाणवते. जन्माला येणे म्हणजे मरणापर्यंतचे सहेतुक जागरणच होय.

– तर अशी ही वाटेवरली गाणी. बरंच काही सांगणारी, बरंच काही छपवणारी, कधी चक्क चकवणारी.

(वाटेवरले गाणे : कविता जपे, श्री विद्या प्रकाशन, २५० क शनिवार पेठ, पुणे ३०. पृष्ठे ६८. वीस रुपये.)

□

# आनंदयात्रा : ग. वा. बेहेरे

*आनंदवादी जीवनदृष्टीचे अनोखे रूप*

सोबतचे संपादक ग. वा. बेहेरे यांनी गेल्या वीस-पंचवीस वर्षांत विपुल लेखन केले. एकेका अंकात तीन चार लेख कधीकधी त्यांचे एकट्याचे असत. विविध विषयांवर बेहेरे यांची लेखणी चालत असते.

## विविध दृष्टिकोनांतून मांडणी

'सोबत'मध्ये येणारे हे लेख पुस्तकरूपाने यावेत असे खूप वाटे. कटाक्ष व गवाक्ष असे संग्रह त्यातून सिद्ध झाले. 'आनंदयात्रा' हे त्यांचे आत्मकथनही १९८३ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यानंतर यंदा आनंदयात्रा, अक्षरयात्रा, निसर्गयात्रा आणि संसारयात्रा असे चार संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. साडेनऊशे पृष्ठांच्या या चार पुस्तकात मिळून त्यांचे १८१ लेख आहेत आणि अक्षरयात्रेचा अपवाद वगळता उर्वरित लेख प्रामुख्याने 'कटाक्ष' या सदरातील आहेत. बेहेरे यांच्या 'आनंदवादी' तत्वज्ञानाची विविध दृष्टिकोनांतून मांडणी करणारे हे लेख पुस्तकरूपाने आल्यामुळे वाचकांची मोठीच सोय झाली.

## अक्षरयात्रा : वाङ्मयीन प्रवास

'अक्षरयात्रा' या संग्रहातील पहिले सहा लेख त्यांच्या आनंदवादी भूमिकेच्या दृष्टीने लक्षणीय असले तरी उर्वरित लेखांचा बाज वेगळा आहे. खांडेकर, माडगूळकर, पु. भा.भावे, यशवंतराव चव्हाण, अ. ज. करंदीकर वगैरे साहित्यिकांवरील भावपूर्ण लेख, दलित साहित्य, नाट्यलेखन, चित्रपट कथालेखन, मध्यमवर्गीय साहित्य, ग्रंथाली, साहित्य संस्था इत्यादी विषयांवरील घणाघाती लेख आणि पुणे, रायपूर, मुंबई, अकोला, आंबेजोगाई येथील संमेलनांच्या निमित्ताने लिहिलेले लेख या संग्रहात आले आहेत. भावे, ग. दि. माडगूळकर, यशवंतराव चव्हाण, वि. स. खांडेकर यांच्यावर लिहिताना बेहेरे मोजक्या शब्दांत त्यांचे वेगळेपण व मोठेपण प्रकट करतात. खांडेकर हे त्यांना साने गुरुजींप्रमाणे 'करुणेचा

जलाशय' वाटतात, परंतु ती करुणा शरश्चंद्रांच्या साहित्याप्रमाणे हेलावून टाकत नाही, असेही ते म्हणतात. यशवंतरावांवर अत्यंत कठोरपणे वेळोवेळी प्रहार करणारे बेहेरे त्यांच्या व्यासंगाचा, सुसंस्कृतपणाचा, वक्तृत्वाचा, मनाच्या उमदेपणाचा, समंजसपणाचा, अस्सल मराठमोळ्या भाषेचा आदरानेच निर्देश करतात. माडगूळकर आणि भावे हे तर त्यांचे खास बैठकीतले मित्र. त्यांच्यावरचे लेख आपुलकीने ओथंबलेले असले तरी काहीसे (आज वाचताना) वृत्तपत्रीयच वाटतात, यापेक्षा अधिक मोठे त्या मैत्रीचे स्मारक होणे बाकी आहे, असे येथे नमूद करावेसे वाटते.

## निसर्गयात्रा : हिरवा शृंगार

'निसर्गयात्रा' मध्ये फुले, वृक्ष, ऋतुचक्र,बालपणचे गाव, महाबळेश्वरचे वर्षाकालीन रूप, प्रवास, पावसाळी दिवस, पशुपक्षी, वगैरे विषयांच्या अनुषंगाने आठवणींच्या पारंब्यावर झोके घेणारी आंबटगोड गद्यकाव्ये आपल्याशी लगट करतात. कधी हुलकावणी देतात. निसर्गाचे हे नाना विभ्रम बघत असताना आपल्या अनुभवांच्या स्मृतीत बेहेरे अधिक रंगतात. आजरा या जन्मगावी गेल्यावर त्यांना स्वतःलाच जाणवले की 'ज्या सगळ्या आठवणींच्या जागांना स्पर्श करायला गेलो. . .' त्या कुठेच तशा भेटेनात. परसदाराच्या सत्तर फूट खोल विहिरीत त्या काळ्याकुट्ट आडात आपले बालपण मरून पडलेय, असे त्यांना वाटते. 'खूप भटकूनही हे गाव माझे वाटत नव्हते' असे ते म्हणतात. 'गावाकडे येताना मला माझे एक गाव होते, परंतु जाताना ते काहीच उरलेले नव्हते, आता मी निराधार होतो,' या शब्दांत ते आपल्या या अनुभवाचा निष्कर्ष मांडतात. बरोबर आणलेल्या मित्रांनाही त्या गावचे काहीच अप्रूप वाटत नाही, त्यांची लौकर निघण्याची घाई चालू असते. या निसर्गविषयक ललित लेखांत बेहेरे यांच्यातील कलासक्त कवी आणि समाजाशी बांधिलकी मानणारा जागरूक पत्रकार यांत्री अनेकदा जुगलबंदी चाललेली दिसते. माहिती भाव खाते, काव्य मागे पडते.

## संसारयात्रा : आत्मस्वकीय

स्त्री-पुरुष आकर्षण, लग्न-समारंभ, मधुचंद्र, स्त्री-मुक्तीचा अर्थ, स्त्रीचे वेगळेपण, सौंदर्याचे प्रलोभन, सांसारिक नात्यांचा भुलभुलैय्या, मोह आणि चारित्र्य, संसारयात्रेच्या यशाची गुप्त लिपी, पत्नी व प्रेयसी, नातवंडांच्या रूपाने जीवनाला सार्थकतेचा होणारा स्पर्श– इत्यादी विषयांचा परामर्श 'संसारयात्रा'मधील लेखांद्वारे घेण्यात आला आहे. आडगावातल्या एका कळकट भोजनगृहातले बेचव अन्न समोर असताना, लता मंगेशकरांच्या गीताचे सुरेल स्वर कानावर पडतात आणि जणू ते आपल्या रसनेला जागे करीत आहेत; आणि त्या कळकट खोलीलाही सुंदर रंग येत आहे आणि पदार्थांची चवही बदलत आहे असा साक्षात्कार होतो; हृदयनाथच्या एका कार्यक्रमाच्या वेळी हातात सुगंधी

रुमाल येतो तो त्यांच्या तरुण मुलाचा असतो; त्या घमघमाटाने आयुष्यातली तीस-पस्तीस वर्षे गळून पडतात. तो मुलगा जन्मला तेव्हा त्याच्या अंगाला जो वास येत होता त्या वासाच्या स्मरणात ते बुडून जातात. त्या रुमालाच्या रूपाने 'माझा मुलगा या उत्तररात्री मला सुरक्षितपणे घरी घेऊन जाणार होता' असा जणू आधार वाटतो . . . अशा प्रसंगांतून एका वेगळ्याच भावनाशयाचा कल्लोळ उठतो.

बेहेरे यांची इतरही काही विधाने आपल्या विचारांना चालना देतील. स्त्रीच्या नाजूकपणाचे गोडवे गाऊन तिला रंगीबेरंगी वस्त्रांनी मढवून, सुंदर प्रसाधनांनी भूषवून पुरुषाने स्त्रीचे एक खेळणे केले. तसे खेळणे म्हणून राहण्यात आजच्या सुशिक्षित स्त्रीलाही मोठी मौज वाटते. आपल्याला दिलेले दिखाऊ स्वातंत्र्य आणि केलेली खुशामत यातच आजची स्त्री खुश आहे; परंतु हे गुलामगिरीलाच दिलेले नवे रूप आहे. हे स्त्री समजणार केव्हा कोणास ठाऊक ! (पृष्ठ १७८)

नवऱ्याला मित्र नाहीत; स्त्रीला मैत्रिणी नाहीत, असे हे अतिरेकी सहजीवन. . . एकमेकांवर पहारा करणे. . . या दुष्ट चक्रामुळे आम्ही संसाराचा तुरुंग करू पाहतो. (पृष्ठ १६०)

बाजीरावाने (आपल्या) निंदकांना कुठल्यातरी किल्ल्याची हवा दाखवून मस्तानीलाही लग्न करून खुशाल काशीबाईच्या बरोबरीने सन्मानाने पत्नीपद द्यायला हरकत नव्हती. शौर्यात तो उणा पडला नसेल पण मनस्वीपणात आणि गृहकलहात तो नक्की उणा पडला. प्रेयसीचाही अखेर सन्मान करावा लागतो. प्रेयसी ही काही क्षणभर पाय टेकण्याचे पायपुसणे नव्हे' (पृष्ठ ११४)

शैशव, कौमार्य, तारुण्य, प्रौढत्व हे क्रमशः येत जाणारच. लोकांच्या दृष्टीने माणूस दिवसेंदिवस अनुभवसंपन्न होतो, शहाणा होतो, पण तितकाच तो निरुपयोगी होत जातो... निरुपयोगी होण्याच्या क्रियेलाच तर म्हातारपण म्हणत नाहीत ? (पृष्ठ ५२)

## स्वानुभूतीवर तत्त्वज्ञानाची आखणी

'आनंदयात्रा' या संग्रहातील लेखांतून बेहेरे यांच्या आनंदवादी जीवनदृष्टीचे व्यापक स्वरूप स्पष्ट होते. अर्थात बेहेरे काही तत्त्वज्ञानाचे अभ्यासक किंवा एखादी विशिष्ट जीवनविषयक भूमिका सलगपणे मांडणारे तत्त्वचिंतक नव्हेत. थोडे चाकोरीतील आणि थोडे चाकोरीबाहेरचे जीवन जगल्याने जे काही अनुभवाला आले; त्यातून त्यांचे जे काही जीवनविषयक चिंतन घडले, त्याचे फुटकळ दर्शन आनंदयात्रेतील लेखांद्वारे आपल्याला होते. बेहेरे यांच्या या आनंदवादाला त्यांच्या जीवनानुभूतीचे अधिष्ठान आहे; तत्त्वज्ञानाच्या ॲकॅडमिक अध्ययनाची शिस्त वा चौकट नाही.

स्वानुभूतीचे अधिष्ठान आहे याचा नेमका अर्थ काय ? बेहेरे यांनी स्वतःच आपण जीवन कसे व्यतीत केले याचे जागोजाग निरूपण केले आहे. मध्यमवर्गीय पुणेरी कुटुंबात

जन्म; कडक स्वभावाचे वडील, नू. म. वि. मध्ये श्री. म. माटे, पु. ग. सहस्रबुद्धे यांच्यासारखे शिक्षक; स्वातंत्र्य चळवळीत एका मिरवणुकीच्या वेळी पायाला गोळी लागल्याने किंचितसे अंपगत्व; कारकून, मास्तर, शेअर ब्रोकर, हॉटेल मालक वगैरे व्यवसायात मिळवलेले आणि घालवलेले पैसे, विवाह, मुले, अचानक जीवनात आलेली एक विवाहित चतुर नारी; नाट्य-कला-लेखन, जाहिरात क्षेत्रात झालेला स्वैर संचार; नव्या संसारात उठलेली वादळे; त्यातून पुन्हा सावरला गेलेला मूळ घराचा डौल, सोबतसारखे मतपत्र काढण्यामागचे आत्मबळ; हिंदुत्वाचा दबलेला आवाज पुन्हा प्रस्फुटित करण्याचे पेललेले आव्हान; सोबतला लाभलेले यश; खपात झालेली वाढ; परखड स्पष्ट लेखनाने लाभलेला मोठा वाचक-लेखक परिवार, शिवसेनेच्या ऐन वैभवकाळात तिच्यावर केलेला टीकाप्रहार; त्यामुळे झालेल्या मारहाणीनंतरही प्रकट केलेला बाणेदारपणा, सत्तारूढ पक्षावर केलेले वज्रप्रहार; आणीबाणीतही जारी ठेवलेला निर्भीड सूर; निवडणुकीच्या प्रचारात केलेले दौरे; जनता राजवटीने मिळालेले सौख्य; भ्रमनिरास, साहित्य परिषदेतील कार्य, संमेलने भरवण्यातला, अध्यक्ष निवडून आणण्यातला उत्साह; अंगावर ओढवून घेतलेले अनेक खटले; हृदयविकार, परदेशातील शस्त्रक्रिया इ. इ. ग. वा. बेहेरे यांच्या लौकिक जीवनाचे हे वेगवेगळे रंग त्यांच्या आनंदवादी तत्त्वज्ञानाला पाथाभूत आहेत.

## जग हे आनंदाचे निधान

हे जग आनंदाचे निधान आहे. चराचरावर सुखाची सावली आहे; दुःख, वेदना, उणिवा, दारिद्र्य हे सर्व तुलनेने भोगले की सुखमय होते; सुख-दुःख या कल्पना सापेक्ष आहेत. दुःखाचे दूरवर किनारे असले तरी जग हे मूलतः सुखमय आहे; आणि माणसाचा जन्म सुखाचा शोध व अनुभव घेण्यासाठी आहे अशी त्यांची ठाम श्रद्धा आहे. सुखाच्या जागा कोणी कोणास सांगावयास नकोत. त्या सहज समजतात. दुसऱ्यांना दाखवून देता येतात असे ते मानतात. संगीताच्या सुराची धुंदी, पुस्तक वाचनाने पडणारा जगाचा विसर, कपड्यांचा स्पर्श, अन्नग्रहणाने लाभणारी तृप्ती, देवालयातील नीरव शांतता, भजनपूजनातील तल्लीनता, मुलांच्या चेहऱ्यावरचा निरागस भाव; सकाळ-सायंकाळचे रंगवैभव. अशा सगळ्या गोष्टी या आनंदाच्या साम्राज्याचीच ग्वाही देतात असे त्यांना वाटते.

## दुःखाचे अस्तित्व स्वतंत्र नाही

अर्थात्, या जगात दुःख, वेदना, संघर्ष, वार्धक्य, वैफल्य, आजारपण, मरण वगैरेंचे जे अस्तित्व आहे ते बेहेरे नाकारत नाहीत. आजाराने वेदना होतात पण वेदना संपताच शरीर सुखावते, कामाने थकवा येतो, पण विश्रांतीने पुन्हा चैतन्य वाटते. कमी होत जाणारे दुःख किंवा दुःखाचा अभाव हेही सुखाचे साधन ठरते. दुःख, सुख हे काही अभावाने, अस्तित्वाने जाणवणारे विषय, त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाही असे त्यांचे प्रतिपादन आहे. जेव्हा आपण

सुखी, आनंदी, समाधानी असतो, तेव्हाच दुःखाची किनार, अतृप्तीचे ठिगळ, असमाधानाचा ओंबरा त्या सुखी वस्त्राला लागलेला असतो. बहुसंख्य स्त्री-पुरुषांचा आनंद सुखसाधनांच्या अस्तित्वावर अवलंबून असतो आणि त्या सुखसाधनांचे शेजारपाजारच्या लोकांजवळ असणे वा नसणे हे देखील आपल्या सुख-दुःखाला तडा देऊ शकते.

## इथला हिशेब इथेच पूर्ण

जगण्याची अनावर ओढ हे माणसाच्या संस्कृतीचे आद्य प्रेरक बळ आहे. जग सुंदर आहे. जगण्याला कारण नसते तसेच मृत्यूलाही कारण नसते, हे वास्तव स्वीकारले म्हणजे जगतो कशासाठी या प्रश्नांची बोचणीही अस्वस्थ करण्याएवढी तीव्र राहत नाही. मरणाचे भय नाही, पण स्वतःचे अस्तित्व मानणारा, या जगाने आपले आयुष्य उभे केले अशी श्रद्धा बाळगणारा माणूस मरणाला भिणारच का मुळी असा त्यांचा सवाल आहे. या जगावर आपले प्रेम आहे, अजून शंभर जन्म जगणे बाकी आहे. मात्र त्यासाठी पुनर्जन्माच्या कल्पनेचा आश्रय घेण्याची त्यांची तयारी नाही. या जन्मातल्या सुखदुःखाच्या उधारीचा हिशेब पुढच्या जन्मासाठी बाकी ठेवायचा नाही, तो इथल्या इथेच पूर्ण करायचा अशी त्यांची धारणा आहे.

देवाचे अस्तित्व मानायचे म्हणजे काय करायचे ? या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणतात, "देवाची रूपे मानवी गरजांतूनच सिद्ध झालेली आहेत. मग स्तोत्रे, आरत्या, मंत्र कशाला म्हणायचे ? फुले, फळे, पाणी का वाहायचे ?"

## जीवनयात्रेचे सूत्र

इंद्रियांच्या मर्यादा माणसाला त्याच त्या जीवनक्रमाच्या कंटाळवाण्या चाकोरीत अडकवून टाकतात. माणसालाही पुनरुक्तीत, तेच ते करण्यात त्यामुळे सुरक्षिततेचा भास होतो. माणसाचे मन तेच असते, पण ते प्रत्येकक्षणी वेगळे होऊ शकते. त्यामुळे या चाकोरीतून बाहेर पडण्याचीही उसळी येते. आपले रस्ते चूक म्हणून नव्हे तर दुसरे चांगले रस्ते दिसू लागतात म्हणूनही आपले चिरपरिचित जीवनव्यवहार कवडीमोल वाटू लागतात. स्वप्नाचा आणि सत्याचा पूल बांधण्याचा प्रयत्न होऊ लागतो. सुखाचा शोध त्यामुळे सुकर होऊ शकतो, पण खरे तर हा शोध कधीच लागलेला असतो. कुठल्याही क्षणाला, प्रसंगाला, उत्कटपणे सामोरे जाणे, त्याला पुरेपूर स्वीकारणे, भोगणे हे या यात्रेचे आवश्यक सूत्र असते. त्यामुळे दुःख उरतच नाही. पाप-पुण्य या कल्पनांशीही म्हणूनच सुखदुःखाची सांगड घालण्याचे प्रयोजन नाही असाही त्यांचा आग्रह आहे.

## आनंद ही चैन नव्हे

आनंदाचा अनुभव, सुखाचा प्रत्यय, तृप्तीची भावना ही माणसाची आंतरिक, मानसिक

गरज आहे, ती काही चैन नव्हे असे नॅथॅनिएल बँडेन म्हणतो. यशस्वी कृतीबद्दल मिळणारी पावती या यशाची परिणती म्हणजे आनंदानुभव. अपयश, विध्वंस, विनाश याची परिणती म्हणजे वेदना. आनंदाच्या अनुभूतीतून माणसाला जीवनाचे मूल्य गवसते. जीवन जगण्यासारखे आहे हे कळून चुकल्याने जगण्यासाठी संघर्ष करण्याचीही त्याची सिद्धता होते. हे मूल्य संपादन करण्यासाठी कृतीची गरज असते. यशस्वी कृतीबद्दल मिळणारा भावनात्मक मोबदला म्हणजे सुख, पुढील सत्कृत्यासाठी प्रेरित करणारा घटक म्हणजे सुख, उत्पादक, श्रम, इतरांशी असणारे स्नेहसंबंध, करमणूक, कला आणि वासना या पाच परस्परसंबंध क्षेत्रांद्वारे सुखाचा वा आनंदाचा प्रत्यय माणसाला येतो. या दृष्टीने पाहिल्यास बेहेरे यांच्या आनंदाच्या व भोगवादाच्या भूमिकेला विवेकाचे निकोप पाठबळ आहे.

## आनंदवादाची मीमांसा

या आनंदवादाची सर्वांगीण नसली तरी ही जी फुटकळ मीमांसा आढळते ती विलोभनीय वाटते. भारतीयांनी मध्ययुगीन काळात प्रत्येक सुखाची सांगड ही पापाशी घातली. वासना वाईट. स्त्री जात वाईट. सुखोपभोग वाईट. आनंद व्यक्त करणे हाच खरा गुन्हा. आनंदाचा शोध घेणेही निषेधार्ह. दुसऱ्याला आनंद भोगू द्यायचा नाही. आपणही भोगायचा नाही. किंबहुना सुखी माणसाचा नित्य मत्सर करायचा अशी आपली वृत्तीच अकरणात्मक बनलेली.

या पार्श्वभूमीवर बेहेरे आनंदवादाचा उघड पुरस्कार-प्रचार करतात हे आश्चर्यच. बेहेरे यांनी अर्थात या आनंदवादाचे ढोबळ रूपदर्शन घडवले आहे. त्यांच्या कोण्या चाहत्याने त्या आनंदवादाला भक्कम तात्त्विक अधिष्ठान द्यावे. पाश्चात्य तत्त्वज्ञानात प्लेझर प्रिन्सिपल, हेडॉनिझम वगैरेंच्या रूपाने आनंदावादाचा उद्घोष सतत चालू आहे. आपल्याकडे अजून त्याचा प्रभाव तोकडा आहे. समाजाच्या पुरुषार्थपूर्ण घडणीसाठी आनंदवादाची संकल्पना उपकारक ठरू शकेल.

आता हे खरे आहे की आनंदवादाचा वा प्लेझर प्रिन्सिपलचा अनेक पाश्चात्य व भारतीय तत्त्वचिंतकांनी निर्देश केला आहे. परंतु तत्त्वज्ञानाची एक शाखा म्हणून आनंदवादाचा अभ्यास हा वेगळ्या प्रकारे होत असतो. बेहेरे यांच्या आनंदवादाला ती ॲकॅडमिक चौकट व शिस्त लागू करणे योग्य ठरणार नाही. स्वानुभूतीतून जीवन सुखावह करून सर्वांगी भोगण्याचे जे काही ठोकताळे त्यांना गवसले ते त्यांनी ललित लेखांच्या रूपाने वेळोवेळी प्रकट केले. एका संग्रहात अशा प्रकारचे बरेच लेख आल्यामुळे आपण त्यातून काही विशिष्ट आशयप्रणाली निघते का याचा शोध घेत निघतो. काही मर्यादेपर्यंत हा शोध घेता येतो. या ठोकताळ्यांची शहानिशा करणे, तर्कशास्त्रावर त्याची तपासणी करणे वा त्याचे खंडण-मंडण करणे हाही अभ्यासविषय होऊ शकतो. तसा तो व्हावा. स्थलमर्यादेमुळे येथे केवळ बेहेरे यांच्या आनंदवादाचे काही प्रमुख विशेषच नोंदवण्यावर समाधान मानणे

भाग आहे. पत्रकाराचे बहुतांश लेखन फुटकळ असते. एक विशिष्ट विचारप्रणाली तात्त्विक भूमिकेतून सलगपणे मांडण्याएवढी सवड त्याला मिळतेच असे नाही; परंतु बेहेरे यांनी आपल्या आनंदवादाचे स्वरूप अधिक विस्तृत आणि सूत्रबद्ध रीतीने मांडले तर नव्या युगातल्या नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक असणारी ऐहिकता आत्मसात करणे सुलभ होईल. आनंदवाद जीवनातील सुखदुःखांना सामोरे जाण्याचे बळ देतो, स्वकर्तृत्वावरील विश्वास दृढ करतो, कृतिप्रवणतेवर भर देतो, नैराश्य, औदासीन्य झटकून टाकतो. पुरुषार्थाची विविध दालने आपल्यापुढे खुली आहेत, याचे आश्वासन देतो आणि सर्वस्व पणाला लावून मिळवलेल्या यशाचा उपभोग घेण्याचा क्षणही संपूर्ण सुंदर राहील अशी मानसिक सिद्धता बहाल करतो.

(आनंदयात्रा, अक्षरयात्रा, संसारयात्रा, निसर्गयात्रा. ग. वा. बेहेरे, प्रकाशक : रविराज प्रकाशन, ४५८/२ सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे ३०. मूल्य प्रत्येकी ६० रुपये.)

□

# आरसपानी : सदा डुंबरे

## *व्यापक समाजहिताचे व जीवनमूल्यांचे भान*

'आरसपानी' या छोटेखानी पुस्तकात सदा डुंबरे यांच्या ३९ लेखांचा समावेश करण्यात आला आहे. कोल्हापूर सकाळचे संपादन करीत असताना श्री. डुंबरे हे प्रतिशब्द नावाचे सदर चालवत; त्यातून हे लेख निवडण्यात आलेले आहेत. दोन-तीन पृष्ठांच्या आटोपशीर अशा या स्फुटांची प्रेरणा प्रासंगिक असली तरी त्यांना कळा लाभलेली आहे ती प्रसन्न शैलीदार लघुनिबंधांची. ललित लेखांची.

### निसर्गाचे चित्रमय दर्शन

श्री. डुंबरे यांच्यात एक निसर्गवेडा कवी जसा आहे तसाच एक रंगरेषांचे वेड असलेला चित्रकारही. एस.टी. नं पुण्याहून निघाल्यावर एका वळणावर त्यांना दिसतो पिवळाजर्द फुलांचा घोस. मध्यम उंचीचं झाड, एकही पान नाही. नुसत्या फांद्या आणि त्यांवर पिवळी फुलं. हा एकटाच वृक्ष शेजारच्या वैराणाला हिणवत, अंगावर सोनेरी वैभव मिरवतो;-त्याचं दर्शन मनसोक्त घडलं नाही म्हणून खट्टू होणारे डुंबरे तसाच सोनेरी शृंगार पुन्हा दिसल्यावर एकदम हरखून उठतात. त्या झाडांचा जथा उघड्याबंब साधूंसारखा त्यांना भासतो. मंदसर लाल पानांपासून तुकतुकीत हिरव्यापर्यंत लुसलुशीत हिरव्या पानांनी अनेक वृक्ष नवे रूपडे सजवत होते. वसंताच्या आगमनानं वृक्षांच्या सुरू झालेल्या या मातृवेणा बघताना त्यांच्यातला सुहृद कवी हेलावून उठतो; तर त्यांच्यातला भूमिपुत्र नांगरलेली, पाळ्या घातलेली शेतं, सऱ्यातून वर डोकी काढणारी उसाची हिरवी कांडी, वाऱ्यावर डोलणारा पोटऱ्यात आलेला गहू, मुंडकी बांधलेला शाळू, रस्त्यालगतची खळी, गव्हाणीतली बैलं, उकिरडा उस्कटणाऱ्या कोंबड्या, थापलेल्या गोवऱ्या आणि अंजिराच्या पाट्या असा सारा आसमंत दोन्ही डोळ्यांत भरभरून घेऊन सुखावतो. एक चित्रकारही त्यांच्यात हजर असतो. कोल्हापूरला नुसत्या उसाच्या शेतीकडे बघून थिजलेल्या डोळ्यांना हे वेगळेपण किती हर्षभरित करते हे तो रंगवतो. मोनोकल्चर कशी कंटाळवाणी ठरते हेही त्यांच्या समाजवेधक

मनाला नोंदवावेसे वाटते. डोळे मिटून पुन्हा उलटा प्रवास करून कात्रजच्या घाटातले सगळे गर्द रंग, गुलमोहराचे लालबुंद झुपके, हळद लावलेला तरवड, सोनमोहोर झालेला बहावा, पळसाने पेटलेली दरी हे साठवून घेत राहणारा हा रसिला कलावंत 'वसंत फुलला' या ललित निबंधात भेटतो; तेव्हा पत्रकारितेच्या दैनंदिन धबडग्यात गुंतून पडलेल्या या लेखकाचं खानदान खरं कवी-चित्रकाराचं आहे याची खात्री पटते आणि वृत्तपत्रीय झपाटेबंद लेखनकामाठीच्या गदारोळातही ते आपलं सत्त्व टिकवून राहिलेलं आहे याचं आक्रित वाटतं.

## ज्ञात व्यक्तींचे अज्ञात पैलू

वृत्तपत्रसृष्टीतील दीर्घकालीन वावर आणि जागरूक सामाजिक जाणीव यामुळे डुंबरे यांच्या लेखनाला एक प्रकारचे व्यापक अधिष्ठान लाभलेले आहे. प्रभाकर पाध्ये, लक्ष्मणशास्त्री जोशी, राजा केळकर म्युझियमचे दि. गं. केळकर, छायाचित्रकार शंकरराव घोरपडे, इंग्लंडमध्ये वीस वर्षे पत्रकार म्हणून जगून निवृत्तीचे आयुष्य बेळगावला घालवणारे श्रीधर तेलकर, रोहिणी हा उपग्रह तयार करणाऱ्या विक्रम साराभाई अंतराळ संशोधन केंद्राचे संचालक डॉ. वसंतराव गोवारीकर अशी विविध थरांतील माणसे डुंबरे यांच्या आदरयुक्त नोंदींचे विषय होतात. त्यातही डुंबरे यांचे वैशिष्ट्य हे की या बड्या व्यक्तींच्या एखाद्या वेगळ्याच अंगाकडे ते आपले लक्ष वेधतात. लक्ष्मणशास्त्री हे आपल्याला कायम विद्वत्तेचा पर्वत लीलया उचलून उड्डाण करणाऱ्या हनुमानासारखे दिसतात; पण मराठी बोलू न शकणाऱ्या व आजोबांचे इंग्लिशचे उच्चारही न समजू शकणाऱ्या शास्त्रीजींच्या नातीने जे शब्दातीत नाते जोडले आहे त्याकडे डुंबरे आपले लक्ष वेधतात. मृत पत्नीच्या आठवणीने भावव्याकुळ होणारे केळकर वेगवेगळ्या कालखंडातील ६७ तुळशीवृंदावनं जमवण्याचा संकल्प सोडतात याची डुंबरे यांना अपूर्वाई वाटते. चिपको आंदोलनाचे सुंदरलाल बहुगुणा वृक्षसंवर्धनासाठी गावोगाव दौरा काढून, ज्या रीतीने प्रभावी प्रचारकार्य करतात त्याचे रहस्य डुंबरे यांना जाणून घ्यावेसे वाटते. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पत्रकार श्रीधर तेलकर निवृत्तीनंतर बेळगावला राहतात हे कळल्यावर त्यांच्या बंगल्यात ते अनपेक्षितपणे शिरतात आणि पत्रकारिकेतील रोमांचकारक अनुभव त्यांच्या तोंडून ऐकून रोमांचित होतात. भेटीदाखल आपले पुस्तक देण्यासाठी तेलकर उत्सुक असतात; पण वाळवीच्या कचाट्यातून शाबूत राहिलेली एकही प्रत त्यांना मिळत नाही हा विषण्ण करणारा अनुभवही ते सांगून, तेलकरांची आयुष्यात कशी उपेक्षा झाली तिचा निर्देश करतात.

## गुणग्राहक

हस्तसामुद्रिक आणि जादूचे प्रयोग यांच्या जुजबी कौशल्यावर प्रवासात कुठेही जागा मिळवू शकणाऱ्या छायाचित्रकार शंकरराव घोरपडे यांच्या फर्निचर, पुस्तके, फ्लॉवरपॉटस्,

आगपेट्या, आरसे, पुस्तके, तिकिटे, नाणी, नोटा वगैरे संग्रहाचीही माहिती देतात; आणि आगपेटीचा गुल चंदेरी, गुलाबी, हिरवा, निळा, जांभळा, मोतिया अशा अनेक रंगांचा असू शकतो याची स्वतः खातरजमा करून घेतात. परदेशी जाणाऱ्या मित्राला काडीपेटी आणा अशी माफक विनंती घोरपडे करतात याचे गूढ त्यामुळे उकलते. 'मराठी माणसं यात किती' या डुंबरे यांच्या प्रश्नांचं उत्तर देताना गोवारीकर सांगतात की संख्या किती यापेक्षा त्याचं योगदान किती हे महत्त्वाचं आहे. रोहिणी उपग्रह सोडताना एसएलव्ही तीन हा अग्निबाण वापरण्यात आला; त्यात एक लाखावर घटक होते; त्यामुळे तो अवकाशात जातो तेव्हा आनंद होतोच; पण तो यशस्वी उड्डाण करतो की नाही यावर त्याचे मोजमाप करता कामा नये असेही ते बजावतात, तेव्हा एक नवीच दृष्टी लाभते. प्रभाकर पाध्ये हे वृत्तपत्र शिक्षण विभागातले सर्वांत वृद्ध अतिथी-प्राध्यापक; पण तरुण पोरांचा सर्वांत जास्त घोळका त्यांच्याभोवतीच असतो हेही ते नमूद करतात. पाध्यांचा अथक उत्साह त्यांना थक्क करतो.

व्यक्तींप्रमाणेच विविध संस्थांच्या कामातही नावीन्य दिसते तेव्हा ते गुणग्राहकतेने त्यांची दखल घेतात. राजाराम कॉलेजचं उतरणीला लागलेलं वैभव आणि 'सरकारी' वागण्यामुळे त्या ऱ्हासप्रक्रियेला मिळालेली गती त्यांना अस्वस्थ करते; तर गारगोटीच्या उजाड माळरानावर, बोडक्या डोंगरावर आणि धुळीच्या रस्त्यावर बाबूराव अलूरकरांनी वेदगंगेशी पारंपरिक नातं सांगणारा दुर्मिळ ग्रंथांचा खजिना खुला केल्यामुळे गारगोटी हा खडबडीत शब्द आता निर्मळ उदात्त भासतो असं ते सहजपणे लिहून जातात.

## उपरोधपूर्ण शैलीचे तांडव

श्री. डुंबरे यांचा सामाजिक न्यायावर व औचित्यावर विश्वास आहे. त्याला जेथे जेथे तडा जातो तेथे तेथे ते आपल्या उपरोधपूर्ण शैलीने त्याची हुर्रेवडी उडवतात. बॅ. अंतुले हे सर्वधर्मसमभावाबद्दल किती बोलतात हे सांगण्यासाठी 'गाडीभर' शब्द वापरतात. आपल्या नावाची आद्याक्षरे ए. आर. अशीच लिहिण्याची ताकीद अंतुले देतात तेव्हा त्यांच्या अंतरीचा खरा पत्ता लागतो. गटबाजीचे, स्वार्थाचे 'भिक्षुकी' राजकारण करून शिवचरित्राच्या लेखनाची घोषणा डॉ. मधुकर आष्टीकर करतात किंवा डॉ. सुरेंद्र बारलिंगे सरकारवर टीका करणाऱ्यांना बक्षिसे का म्हणून द्यायची असा सवाल करतात तेव्हा डुंबरे यांच्या औपरोधिक शैलीचे तांडव बघायला मिळते. सरकारी बक्षिसांना अनुदान म्हणावं म्हणजे सर्व प्रश्न सुटतील या गो. नी. दांडेकरांच्या आत्मवंचक शाब्दिक खेळावरही ते अशीच झोड उठवतात आणि कृषि विद्यापीठे पंतप्रधानांना डॉक्टर ऑफ ह्युमॅनिटिज ही सन्माननीय पदवी देण्यासाठी पुढे सरसावतात तेव्हा आपले क्षेत्र सोडून हे विकतचे श्राद्ध कशाला असा रोखठोक सवाल ते विचारतात.

## आवेश आणि अभिनिवेश

स्त्रीमुक्ती, पर्यावरण जागृती, बुवाबाजी व अंधश्रद्धा, वडणग्याची महाशिवरात्रीची यात्रा, एस.टी. ची दरवाढीची अन् सौजन्यहीनतेची संस्कृती, हरिजनांवरील ग्रामीण भागातील अत्याचार, शेतकरी आंदोलनाची दखल घेण्याची टाळाटाळ करणारी वृत्तपत्रे व संपर्क माध्यमे अशा अनेक विषयांवर डुंबरे यांनी आवेशपूर्ण लिहिले आहे. प्रसंग खुलवून सांगण्याचीही त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. एक बैल आजारी पडल्याने रस्त्यातच बसला तर त्यावर उपचारासाठी डॉक्टरला आणण्यासाठी प्रचंड धावपळ केली जाते आणि पाच-सहा वर्षांच्या पाय नसलेल्या आजारी पोराला बूटही घेऊ न शकणाऱ्या आईनं निमूटपणे स्वीकारलेलं त्याचं आजारपण यातील विसंगतीही ते भेदकपणे मांडतात. संपकाळात चवताळलेल्या वाघिणीसारखा आवेश दाखवणारी ही तंबाखू कामगार महिला, मुलाला स्वच्छ, निरोगी ठेवण्यासाठी वा औषधपाणी करून बरं करण्यासाठी काहीही करीत नाही; त्याची तब्येत नादुरुस्तच राहणार हे गृहीत धरून शेळीसारखी वावरते तेव्हा या द्वंद्वातून आपण तिची सोडवणूक कशी करू शकणार असा प्रश्न त्यांना पडतो.

असे मूलगामी प्रश्न त्यांना पदोपदी अंतर्मुख करतात म्हणूनच त्यांच्या लेखनाला एकप्रकारचा जिवंतपणा लाभतो आणि वाचकांशी संवाद साधण्याचा मार्ग खुला होतो. डुंबरे यांच्या लेखनामागे व्यापक समाजहिताचे व जीवनमूल्यांचे हे जे भान आहे तेच त्यांच्या लेखनाला धारदार बनवते. पत्रकाराच्या पेशेवार पाट्या टाकण्याच्या प्रवृत्तीच्या पलीकडे त्यांना नेते, त्यांच्यातील पत्रकाराला त्यांच्यातील कवी-चित्रकार-समाजचिंतक अशी समर्थ साथ करतो तेव्हा त्यांच्या लेखनाला वेगळेच तेज येते. आरसपानीच्या पानापानावर त्याचा प्रत्यय येतो.

वृत्तपत्रीय लेखन त्या त्या वेळी वाचकांना प्रिय होते; परंतु नंतर मात्र ते फायलीतच बंदिवान होऊन पडते. पुस्तकरूपाने ते आले तर त्याचे समग्र रूप डोळ्यात भरते आणि त्यातले दैनंदिन घाईगर्दीच्या वरवरच्या वाचनात निसटलेले पैलू लक्ष वेधून घेतात. सदा डुंबरे केवळ बहुश्रुत पत्रकारच नाहीत, त्यांच्या लेखणीत लालित्य आहे याचा एरव्ही शोध लागता ना !

(आरसपानी : सदा डुंबरे, चिरायू प्रकाशन, ४७ चारुश्री, अभिमानश्री सोसायटी, पुणे ४११००८, पाने १०४, किंमत ४० रुपये.)

□

# विसाजीपंताची वीस कलमी बखर : वसंत बापट

*विनोदी लेखक आणि व्यंगचित्रकार यांची जुगलबंदी*

रोजचे वृत्तपत्र हाती पडले की, तुम्ही प्रथम त्यातले काय बघता ? पॉकिट कार्टून. मग 'सकाळ'मधले विकास सबनीस यांचे ते व्यंगचित्र असेल किंवा टाईम्समधले लक्ष्मणचे व्यंगचित्र असेल, ते पाहिल्याबरोबर चेहऱ्यावर हास्य उमटते आणि एकूण दिवस मजेत जाईल याची जणू ग्वाहीच मिळते. मी अमेरिकेत असताना तेथील काही वृत्तपत्रांत आर्ट बुकवाल्ड या लेखकाचा एक विनोदी स्तंभ वाचायला मिळे. प्रचलित राजकारणावर त्यात उपहासगर्भ शैलीत अगदी निरागस मनाने पण अत्यंत गुदगुल्या करणारे भाष्य असे. ते वाचताना सारख्या हास्याच्या उकळ्या फुटत. मला तर त्या सदराची अशी चटक लागली होती की, वृत्तपत्र हाती आल्यावर मी पहिल्या पानावरच्या हेडलाईन्स बघण्याआधी संपादकीय पृष्ठावरचा आर्ट बुकवाल्डचा तो कॉलम वाचून काढत असे. माझ्याप्रमाणेच इतरही लाखो अमेरिकन वाचक आर्ट बुकवाल्डच्या प्रेमात पडलेले असणार. म्हणून तर त्याचा हा स्तंभ शंभरावर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होई. आपल्याकडे रमेश मंत्री हे रविवारच्या लोकसत्तेत 'कात्रजच्या घाटातून' हे सदर लिहितात; ते आर्ट बुकवाल्डच्या त्या सदरासारखेच असते. प्रचलित राजकारणाची रेशमी चिमटे घेत उडविलेली अशी खिल्ली किंवा बड्या-बड्यांच्या खेळकरपणे घेतलेल्या फिरक्या यांमुळे अशा सदरांना व व्यंगचित्रांना वाचकांची दाद लगेच मिळते.

## बातमीतून जाणवणारी घटना

असाच निखळ आनंद कविवर्य वसंत बापट यांची 'विसाजीपंतांची वीस कलमी बखर' साधना साप्ताहिकात प्रसिद्ध होत होती, तेव्हा तिच्या वाचनाने मिळत होता. बखरीच्या शैलीत आणि बखरकारांच्या भाषेत सध्याच्या राजकीय घडामोडींवर केलेल्या त्या टीका-टिप्पणीत बापटांचा मिश्किलपणा तर जागोजाग भेटेच; परंतु आपण दररोज वृत्तपत्रात ज्या बातम्या वाचतो, त्याच जरा वेगळ्या ढंगाने पेश केल्या म्हणजे त्यातल्या नाट्याचे

आणि नवलाईचे एक आगळेच रूप आपल्यापुढे उभे राहते. बातम्यांच्या वृत्तपत्रीय बुळबुळीत भाषेतून त्या घटनेचे जाणवणारे स्वरूप आणि वसंत बापट यांच्यासारख्याच्या बखरीच्या विडंबनपर शैलीतून त्या घटनेचे जाणवणारे स्वरूप यात मोठाच फरक जाणवतो आणि या साध्या तात्कालिक बातम्यात दडलेल्या चिरकालिक मानवी मनांच्या स्वार्थलोभांचे आणि गुणदोषांचे जसे भान येते, तसेत त्यातल्या हास्यास्पद आणि हास्यकारक अशा नाट्याकडेही आपले लक्ष जाते.

## सरवटे-बापट यांची जुगलबंदी

आता बापटांची ही वीस कलमी बखर अत्यंत आकर्षक छपाईत पुस्तकरूपाने बाहेर पडली आहे आणि तिला वसंत सरवटे यांच्या मिश्किल आणि वात्रट अशा व्यंगचित्रांची जोड मिळाल्याने या पुस्तकाच्या दर्शनीयतेला आणखी एक परिमाण लाभले आहे. सरवटे यांची ही व्यंगचित्रे क्वचित बापटांच्या मजकुराशी मिळतीजुळती आहेत, पण बहुतेक वेळा ती स्वतंत्र आहेत आणि बापटांच्या मजकुरात येऊ न शकलेल्या अशा त्या घटनेच्या अंगांकडे लक्ष वेधणारी आहेत. एका अर्थाने बखरकार बापट आणि व्यंगचित्रकार सरवटे यांच्यातील जुगलबंदीच या पुस्तकात बघायला मिळते आणि त्यात सरशी कुणाची झाली हे ठरविणे खरोखरच अवघड पडते. लेंटिन आयोगापुढे जे. जे. हॉस्पिटलमधील सदोष ग्लिसरीनमुळे झालेल्या हत्याकांडाची चौकशी चालू असताना माजी मुख्यमंत्री शिवाजीराव निलंगेकर, आरोग्यमंत्री भाई सावंत प्रभृतींनी 'आठवत नाही'ची रेकॉर्ड लावली, तिचे विसाजीपंत जे वर्णन करतात त्याचा एक मासला बघा :

## बखरीच्या भाषेतील गंमत

"दर सवालास जबाब 'आठवत नाही' ऐसाचि येता लेंटीनसाहेब हैराण होत्साते बोलते जाले- 'सर्व सवालांना माहीत नाही, आठवत नाही, खरे नाही, ऐसे ऐसे जबाब देता है कैसे ?' यावरही माजीमंत्री गोविंदराव सरनाईक बोलले : 'आठवत नाही.' तेयाउपरी दस्तऐवज दाखविताच 'हे कागज तो कोणते आम्हासी स्मरत नाही.' हाच जाब दील्हा. 'पूर्वकाळी आम्ही मंत्री असताना पत्रे लिहिली वा वाचली आसतील, आज त्यातले काही आठवत नाही.' तेयावरी वकील शाहाजींनी पुसिले, 'आपली स्मरणशक्ती भारी खराब आहे काय ?' सुभेदार सरनाईक बोलिले, 'जुणे काही आठवत नाही' 'कागजपत्री आपले नाव कैसे ?' यावरीही 'माहीत नाही' ऐसा जबाब दील्हा. पाव घटिका ग्वाही दिली. त्यात आठवत नाही याच जबाबाचे पाव शतक पुरे जाले. पूर्वी श्रीमंत पेशवे सरकारचे कारकिर्दीत गुणपरत्वे आडनावे बदलीत. जैसे उत्तर शिकार करणार शिकारखाने, वाघ मारणार वाघमारे, जुंझात डोईवर घाव घालणार ते डोईफोडे. प्रस्तुत समयी ऐसाचि रूढी होती तो गोविंदरावजी सरनाईक यांस नूतन नामकरण प्राप्त होते. गोखलियांचे रास्ते जाले तद्वत 'सरनाईकांचे'

विसरनाईक होते ! सांप्रतकाळी विस्मरणारे अस्त्र ही केवळ काँग्रेसायच्या लेकरांची मक्तेदारी राहिली नसौन इतर राजकारण धुरधरांणीही विस्मरणाचे अस्त्र आपलेसे केले असे.' यास प्रमाण म्हणाल तर आकोले येथील माजी मंत्रीण प्रमिलाबाई टोपलीण यांचे दिसे. लेंटीनसाहेबांचे आदालतीत या बाईंनीही विसरनाईकांचा ठेका पुढती चालयिला आणि यच्चयावत् सवालांना नेस्तनाबूद केले. ये सर्व प्रकरणींचा बोध एवढाच दिसतो की, राज्यातील बालकांस स्मरणशक्ती वर्धमान करणेचे न सांगता समस्त घटना विस्मरणाचे बळदात बंदिस्त कैशा कराव्या तेयाचे पाठ द्यावे... 'माहीत नाही,' 'स्मरत नाही,' 'असेल किंवा नसेल' ऐसे ऐसे जबाब पाठीवरील भातियांत आहेत, तोवरी हिम्मतबहादरास भय ते कैचे ?... सोयीस्कर ते आठवावे । गैरसोयीचे विसरौन जावे । हे मर्म जेयाला ठावे । तोचि मंत्री यशस्वी ॥"

## सरवटे यांची धमाल

या घटनेवरचे वसंत सरवटे यांचे चित्रही त्यांच्या वेगळ्या प्रतिभेची चुणूक दाखविणारे आहे. लेंटीनसाहेब आपला हातोडा उगारून साक्षीदाराच्या पिंजऱ्यात दोन्ही हात मागे मानेवर ठेवून 'काही काही आठवत नाही' म्हणणाऱ्या विसरनाईकांकडे बघताहेत. इकडे वकील आ वासून कपाळावर हात मारताहेत आणि लहान दूधपिते मूल, शाळकरी मुलगा, ऑफिसर, मंत्री सारेजण आठवत नाहीच्या अमोघ मंत्राचा उच्चार बेदरकारपणे करीत आहेत. वर शिवरायांचे चित्र व 'शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप' या ओळी आहेत; तर चित्राच्या खाली 'आठवावा तो प्रताप, 'आठवत नाही' नोहे पाप' अशा दोन पंक्ती दिल्या आहेत.

अशी ही जुगलबंदी वीस कलमी बखरीच्या प्रत्येक कलमात बघायला मिळते आणि एक वेगळीच मजा येते.

## विनोदाचे आवारू उभे करणारा बोरू

वसंत बापट यांनी बखरीच्या स्टाईलचे अगदी तंतोतंत अनुकरण करून गेल्या वर्षा-दीड वर्षात महाराष्ट्रात घडलेल्या घटनांचे विडंबनरूप पेश केले आहे. बखरीच्या प्रारंभीच 'राजीवेश नमस्तुभ्यं वन्दामः पादपंकजे । शरणागत दासानां हस्तस्पर्श क्षमस्व भोः' असे राजीवेश्वरांचे स्तवन केले आहे. हातात साबणाची वडी व टॉवेल-पंचा घेऊन मंचकावर स्थानापन्न झालेल्या राजीवजींनी पादत्राण घातलेला एक पाय पुढे केला असून, त्या पदस्पर्शासाठी अनेक हात पुढे झालेले आहेत अशा चित्राची त्याला जोड मिळालेली आहे. शिवाजीराजे निलंगेकरांची मुख्यमंत्रिपदावरून झालेली उचलबांगडी, शालिनीताईंनी दादांची इस्पितळात घेतलेली भेट, मंत्र्यांचे दुष्काळी दौरे, चंद्रिका केनिया यांचा थयथयाट, शंकरराव चव्हाण यांच्या मुख्यमंत्रिपदाला मिळालेला शह, लेंटिन आयोगापुढच्या साक्षी,

झैलसिंग-राजीव गांधी यातील पत्रापत्री, अमिताभ बच्चन-रामाराव-रामचंद्रन प्रभृतींमुळे भारतात येऊ घातलेली नटाक्रसी, आठमाही-बारमाही पाणीपुरवठ्याचा वाद, चरणसिंगांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी झालेली सुंदोपसुंदी, विश्वनाथप्रताप सिंग यांचा राजीनामा वगैरे घटनांवर या बखरीतील कलमे आधारलेली आहेत आणि जनताजनार्दनाच्या आज्ञेवरून विसाजीपंत हे या घटनांची माहिती स्वामींना कळवत आहेत असा आविर्भाव शेवटपर्यंत टिकविण्यात आला आहे. 'आपले जनलोक आवघी खेकडियांची टोकरी. तियेवर ना झाकणाची ना दडपणाची आपेक्षा. . . विरोधी दलातही आकलमंदीजागी आगलच जादा. . . क्वचित् हे सिंव्हासनी आले तऱ्ही इथे भरतखण्डी वीनोदासी उणीव राहील ऐसा संभवो नाही. . . चहू दिशीदिशी बेबंदशाही व अनागोंदी व आंदाधुंदी फैलावोन इयेपरीस मोगलाई परवडली, निजामीत बहुत सुख होते, ऐसे ऐसे आभद्र लोक बोलितात. यद्यपि विसाजीपंत मुळी चक्षुष्मंत, तशात स्वामींनी धैर्यत्वाचे आंजन डोळियात घातलेले. तऱ्ही त्याचेही नेत्रांसमोर आंधारून येते. . .' असे असूनही जनबोधार्थ बोरू हाती धरून, 'विनोदाचे आवारू' उभे करण्यासाठी वीस कलमी बखरीचा हा प्रपंच मांडला आहे.

## थट्टा करत वर्मावर घाव

विसाजीपंतांचे काम स्वामींना महाराष्ट्रदेशी घडणाऱ्या घटनांचे वर्तमान कळविण्याचे, परंतु केवळ वृत्त देऊन त्यांना समाधान नाही. या वृत्तावर आपल्या मूल्यांच्या संदर्भात भाष्य करण्यातही त्यांना मोठा रस आहे. त्यामुळे शिवाजीराव निलंगेकर मी निर्दोष आहे, असा डांगोरा पिटणारे पत्रक काढतात तेव्हा विसाजीपंत लिहितात : 'हिंमतबहाद्दर सकलशूर शिरोमणी शिवाजीराजे यांणी मात्र सिंव्हगरजणा करौन, वक्षावरी हस्तताडण गर्वे करौन, दुनियेस जाहीर केले ऐसा जे : 'बड्या मुन्सफी साफ इन्साफ केला. मजसी निष्कलंक म्हटले. खटला हारलो आसेन, पण मी जींकलो आहो. . .' शाबास तीसऱ्या सीवाजी राजेयांची ! ऐसी बहादुरी पूर्वी जाहली नाही. पुढे होणे नाही. रजियांसारखा सुखी कोणी नसेल. याशी सुभाषितात प्रमाण आहे. ऋषींनी म्हटले आसे : 'निर्लज्जस्तु सदा सुखी' सिवाजीराजे यांनी ऋषींचे शब्द खरे करौन दाखविले. कलियुगी कीर्त केली. मऱ्हाट मुलुखी आवघिया चावडीचौकी व पारावर व चौव्हाट्यावर डफदिमडी पिटौन शाहीर तेयांचा पवाडा गातात–

*धन्य धन्य सीवाजी निलंगढचे स्वामी*
*हिकमती हुन्नरी कायम राज्य इनामी*
*पुत्र थोर कन्याही थोर गडी हरकामी*
*जरि मुखा हजारो डाग ।*
*छी थू जागोजाग वीर बेलाग हुषार आसामी । जी जी*

थट्टा करता-करता विसाजीपंत वर्मावर घाव घालण्यात चतुर आहेत. अशा वेळी

दयामाया नाही.

तर अशी ही विसाजीपंतांची बखर. प्रचलित राजकारणावर पारंपरिक जुन्या मऱ्हाटी चौकटीतून नजर टाकणारी आणि त्यामुळेच बातम्यांच्या बटबटीतपणातून आपण ज्याकडे बघायचे टाळतो, त्या घटनांच्या मुळाशी असणाऱ्या मानवी प्रवृत्तींच्या आणि समान आदिबंधाच्या (पॅटर्नच्या) स्वरूपाकडे आपले लक्ष वेधणारी. चिरपरिचित घटनांमध्येही दडलेल्या शाश्वत संघर्षाची बीजे प्रकट करणारी. भाषेचे एक विशिष्ट रूप आपल्या बोथटलेल्या संवेदनांना हळुवार फुंकर घालून पुन्हा टवटवीत, तरतरीत करू शकते, याची खात्री पटविणारी ही बखर आहे.

(विसाजीपंतांची वीस कलमी बखर : लेखक वसंत बापट, प्रकाशक : चिरायू प्रकाशन, पुणे ८. पृष्ठे १०० + १२, किंमत ६० रुपये.)

□

# संसदेची सप्तपदी : मो. ग. तपस्वी

*जाणत्या पत्रकाराने टिपलेले संसदेचे अंतर्भेदक रूप*

भारतीय संसदेच्या सात लोकसभांच्या कारकीर्दीवर धावता दृष्टिक्षेप टाकणारे ज्येष्ठ पत्रकार मो. ग. तपस्वी यांचे 'संसदेची सप्तपदी' हे पुस्तक म्हणजे आपल्या राजकारणातील अनेक नेते आणि अनेक वादविषय यावर टाकलेला प्रकाशझोतच आहे. आजवरचे सर्व राष्ट्रपती, सर्व पंतप्रधान आणि अनेक केंद्रीय मंत्री, विरोधी पक्षनेते, खासदार आणि प्रादेशिक नेते यांच्याशी जवळचा संपर्क आल्याने आणि पत्रकाराच्या व्यवसायधर्माप्रमाणे सर्वांशी घनिष्ठ संबंध ठेवूनही आपली अलिप्तता जपण्याची वृत्ती बाळगल्याने तपस्वींच्या लेखनात एक प्रकारचा परखडपणा आला आहे आणि नेहरू, राजेंद्रप्रसाद, यशवंतराव चव्हाण, मोरारजी देसाई, लालबहादूर शास्त्री, अटलबिहारी वाजपेयी, जगजीवनराम, इंदिरा गांधी, कामराज वगैरेंच्या गुणांबरोबरच दोषांकडे वा मर्यादांकडेही नीरक्षीरविवेक न्यायाने तपस्वींनी लक्ष वेधले आहे. बातम्या काढण्यात दिल्लीतील अनेक पत्रकार निष्णात असतात. हिंदूचे दिल्लीतील प्रतिनिधी जी. के. रेड्डी यांचा त्याबाबत मोठाच लौकिक होता. त्यांनी दिलेल्या बातम्या भावी घटनांची नेमकी कल्पना देत आणि त्या अचूक ठरत. असे काँटॅक्टस उच्चस्तरीय वर्तुळात असणारे पत्रकार अर्थातच मोजकेच असतात. मराठी पत्रकारांचे हात फार वरपर्यंत पोचणे दुरापास्तच. तरीही दिल्लीत द्वा. भ. कर्णिक, गंगाधर इंदूरकर, अनंत सात्त्विक, लेले, तपस्वी, कुलकर्णी वगैरे महाराष्ट्रीय पत्रकारांनी आपल्या दीर्घकालीन वास्तव्याने खूप मोठी पुण्याई संपादन करून स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. यापैकी काही जणांची राजधानीतील राजकीय घटनांवरील भाष्ये पुस्तकरूपानेही प्रसिद्ध झाली आहेत.

## विविध विषयांचा मागोवा

तपस्वी यांनी संसदेच्या कामकाजाची विविध अंगे विचारात घेतली आहेत, राज्यघटनेतील दुरुस्त्यांची दखल घेतली आहे. लोकसभा, राज्यसभा, पंतप्रधानपद,

राष्ट्रपतिपद, सभापतिपद, जनता सरकार, संसदेची बांधिलकी, विरोधी पक्षांचे जागरूक खासदार, काही महत्त्वाच्या वादविषयांचे निरनिराळे पैलू, लोकशाहीची वाटचाल अशा विविध विषयांचा मागोवा घेत भाष्य केले आहे. खटके, चुटके आणि चटके या प्रकरणात लोकसभेत घडलेल्या विनोदी वा गमतीदार प्रसंगांचे संकलन दिले आहे. आठव्या लोकसभेची राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली चाललेली वाटचाल कशी पुन्हा आणीबाणीच्या दिशेने चालली आहे याचे विवेचन शेवटच्या प्रकरणात आहे. संविधानात अध्यक्षीय पद्धती आणण्याच्या दृष्टीने आणीबाणीच्या काळात इंदिराजींनी तयार केलेला आकृतिबंध, संविधानातील बदलासंबंधी नऊ जणांच्या समितीने सादर केलेला अंतरिम अहवाल आणि संसदेला बांधील करण्याच्या दृष्टीने केलेल्या तरतुदींचा मसुदा अशी परिशिष्टेही शेवटी जोडण्यात आलेली आहेत.

## वृत्ति-प्रवृत्तींचे स्पष्टीकरण

तपस्वी यांच्या विवेचनाचे स्वरूप ॲकॅडमिक नाही. विशिष्ट प्रश्नांचे सैद्धांतिक निरूपण करण्याचा त्यांचा उद्देशही नाही. संसदेत विविध प्रश्न हाताळताना नेहरू-पटेल-इंदिराजी वगैरेंच्या वृत्ति-प्रवृत्ती कशा काम करीत याचे स्वानुभवाद्वारे केलेले स्पष्टीकरण असेही या लेखनाचे स्वरूप आहे. तपस्वी यांचे रागलोभही पक्के आहेत आणि ते परखडपणे मांडण्यात ते कुठेही कसूर करीत नाहीत. स्वमत रास्त असल्याचा त्यांचा विश्वास जागोजाग प्रकट होतो आणि काही प्रसंग ते असे सांगतात की चव्हाण, जगजीवनराम, राजेंद्रप्रसाद वा कायदामंत्री हरिभाऊ गोखले वगैरे त्या वेळी निरुत्तर होतात. त्यांना पेचात पकडणारे नेमके प्रश्न तपस्वी विचारू शकतात आणि त्यांच्यापेक्षा आपले राजकीय आकलन अधिक मूलगामी आहे असा दावाही ते कळत नकळत मांडतात.

## इंदिराजींना आवडलेला सल्ला

जनता राजवटीच्या काळात ते इंदिराजींनाही एकदा सल्ला देतात की तुम्ही पुन्हा मैदानात उतरा. १ जुलै १९७७ रोजी इंदिराजींच्या घरीच त्यांना भेटून 'एक पत्रकार म्हणून नव्हे तर एक नागरिक म्हणून सूचना करतो' असे सांगून तपस्वींनी त्यांना सांगितले, "तुम्ही स्वतःला या घरात असे कोंडून कशासाठी घेतले आहे? तुम्ही राजकीय पुढारी आहात. लोकशाहीत निवडणुकीत पराभव झाला म्हणून काय असे निष्क्रिय व्हायचे असते?... तुम्ही पुन्हा मैदानात उतरा. आपली लोकशाही आहे. लोकशाहीत विरोधी नेतृत्वही प्रखर असायला नको काय? त्याविना लोकशाही सरकार नीट रुळावर कसे राहील?" आणि गंमत अशी की या सूचनेवर इंदिराजी भडकल्या नाहीत; रागावल्या नाहीत. उलट मनःपूर्वक म्हणाल्या, "तुम्हाला प्रामाणिकपणे असे वाटते?" आणि 'अच्छा सोचेंगे, और भी कुछ लोग ऐसाही कहते है त्यानंतरच्या भेटीत इंदिराजींनी त्यांच्याकडे इतक्या अर्थपूर्ण नजरेने पाहून

स्मित केले की, आपली सूचना त्यांना रुचली आहे हे तपस्वींना कळून चुकले. त्यानंतरच्या पत्रकार परिषदेत तपस्वींनी त्यांना विचारले, "पोटनिवडणुकीला उभ्या राहणार ना?" तेव्हा इंदिराजींनी त्यांना उलट प्रश्न केला, "हा प्रश्न पत्रकार म्हणून विचारताय की सामान्य नागरिक म्हणून?" त्यावर पुढचे तपस्वींचे भाष्यही महत्त्वाचे आहे. "लोकशाहीची मुस्कटदाबी केली म्हणून इंदिराजींचा पराभव झाला. त्या लोकशाहीसाठीच अखेरीस त्यांनी लढा दिला. तेव्हा त्यांना पुन्हा सत्ता मिळाली."

तपस्वींनी नागपूरच्या आपल्या व्याख्यानाचा हवाला देऊन म्हटले आहे, 'काँग्रेसची सत्ता ३० वर्षे सोसलीत. जनता सरकारला निदान तीस महिने तरी द्या, असे मी व्याख्यानात म्हटले. कोणत्या अंतःप्रेरणेने मी त्या वेळी तसे म्हणून गेलो कुणास ठाऊक, परंतु माझी बत्तिशी खरी ठरली.'

## दोन नेत्यांची मनोवृत्ती

यशवंतराव चव्हाणांचाही एक असाच उद्‌बोधक किस्सा तपस्वींनी सांगितला आहे. अध्यक्षीय संविधानाचा मसुदा इंदिरा गांधीनी त्यांच्याकडे पाठवला त्या वेळी तपस्वी चव्हाणांना भेटले. चव्हाण अगदी सावध. 'मी तो मसुदा तुम्हाला दाखवीन अशी तुमची अपेक्षा आहे काय?' असा प्रश्न त्यांनी केला. चव्हाणांना तपस्वींनी सल्ला दिला की 'मंत्रिमंडळात तुम्ही त्याला विरोध करावा... लोकशाहीवरील श्रद्धा प्रकट करावी. देश मग तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचेल.' त्यावर यशवंतराव म्हणाले, "मी मंत्रिमंडळात काय बोलतो ते कुणालाच सांगत नसतो. . ." निरोप देतानाही यशवंतराव म्हणाले, "तो आकृतिबंध माझ्याकडे आला आहे की नाही, हे मी तुम्हाला काहीच सांगितलेले नाही." 'मंत्रिमंडळ बैठकीत काय झाले ते मी तुम्हाला सांगणार नाही.' आणि त्यांचा खांदा तेवढा थोपटला.

जगजीवनरामनी मात्र तपस्वींना स्पष्टच सांगितले, "तो आकृतिबंध मजकडे आला आहे. मी तो मंजूर होऊ देणार नाही."

दोन नेत्यांच्या मनोवृत्तीतला फरक तपस्वींनी या एकाच प्रसंगाद्वारे अत्यंत बिनतोड दाखवला आहे.

## शास्त्रीजींची छानशी आठवण

लालबहादूर शास्त्रीजींचीही अशीच एक छानदार आठवण तपस्वींनी दिली आहे. १९६५ च्या युद्धातील भारताच्या विजयानंतर ह. वि. पाटसकर यांजबरोबर तपस्वी शास्त्रीजींच्या घरी गेले. (तेही गीतारहस्य देण्याकरता). त्या वेळी पश्चिम सरहद्दीच्या नकाशाकडे तपस्वी बघत होते तेव्हा शास्त्रीजींनी त्यांना काय बघताय असे विचारले. 'ताश्कंद वाटाघाटीत कुठला मुलूख सोडणार याचा अंदाज घेत होतो.' असे तपस्वी यांनी

म्हटले तेव्हा शास्त्रीजींनी तुम्ही पत्रकार सुतावरून स्वर्गाला जाता अशी त्यांची फिरकी घेतली. जिंकलेला मुलूख सोडू नका असे तपस्वींनी सुचवले तेव्हा शास्त्रीजी म्हणाले,"प्रश्न काश्मीर हद्दीचा आहे. बघू या." त्यावरून तपस्वींना अंदाज आला की जिंकलेला मुलूख ते परत करणार.

## कृष्ण मेनन यांचा राजीनामा

पंडित नेहरूंच्या हातून काश्मीर, बेरुबाडी प्रकरणात चुका घडल्या, त्यांचे परिणाम देशाला अजून भोगावे लागत आहेत असे तपस्वी म्हणतात. नेहरूंचे अनेक दोषही ते दाखवतात. कृष्ण मेननना पाठीशी घालण्याचा त्यांचा प्रयत्न महावीर त्यागींनी कसा उधळून लावला याचा किस्साही मजेदार आहे. नेहरूंनी राजीनाम्याची धमकी दिली. 'मी तुम्हाला नकोय का?' असे विचारले. तेव्हा महावीर त्यागी त्या बैठकीत म्हणाले, "मिस्टर जवाहरलाल, वुई ऑल वाँट यू. वुई वरशिप यू. वुई लव्ह यू. बट दॅट डझ नॉट मीन दॅट वुई शुड लव्ह युवर डॉग टू." नेहरू तणतणत आपल्या निवासस्थानी गेले, पण जाताना आपल्या सेक्रेटरीला सांगून गेले, 'उस महावीर के बच्चे को बुला भेजो.' त्याच दिवशी कृष्ण मेननचा राजीनामा आला.

अधिवेशन काळात वटहुकूम काढू नयेत हा संकेत जेव्हा दोन-तीनदा धुडकावला गेला तेव्हा सभापती मावळंकर यांनी सरकारची कानउघाडणी केली. नेहरूंना ती झोंबली. त्यांनी मावळंकरांना भेटीला बोलावले. तेव्हा मावळंकरांनी त्यांना उत्तर दिले, "सभापती कधीही पंतप्रधानांकडे जात नसतो. तुम्हीच माझ्या चेंबरमध्ये येऊन भेटा." आपली चूक झाल्याचे लक्षात आल्याने, नेहरूंनी पुन्हा चिठ्ठी पाठवली, 'आय ॲम व्हेरी सॉरी.'

परंतु नेहरू असताना संसदेत चैतन्य असे अशीही कबुली तपस्वी देतात. इंदिराजींच्या राजवटीत, आणीबाणीत संसदेला गौण स्थान मिळत गेले. इंदिराजींच्या काळात किचन कॅबिनेट जन्माला आले, हा संसदीय लोकशाहीला पहिला तडाखा होता असे ते म्हणतात. पंतप्रधान झाल्यावर पहिले सव्वा वर्ष इंदिराजी लोकसभेत नुसत्या बसून राहात. 'रानी, गूंगी गुडिया बनकर बैठी मत रहना. मेरे प्रश्नोंके उत्तर देना' असे डॉ. लोहिया यांनी खिजवल्यावरही त्या मौनच राहिल्या.

## बॅ. नाथ पै

बॅ. नाथ पै यांनी जेव्हा घटनेपेक्षा संसद श्रेष्ठ अशी भूमिका घेतली तेव्हा तपस्वींनी त्यांना सरळच म्हटले,"तुमचे भाषण/शैली सुंदर पण मुद्दा भयंकर". तेव्हा नाथ पै यांनी त्यांना घरी जेवायला बोलावले आणि त्या मताचा खुलासा करायला सांगितले. 'साक्षरशाही नसताना आणलेली लोकशाही कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ठरेल' असे स्पष्टीकरण तपस्वींनी दिले. तेव्हा नाथ पै म्हणाले, "यू हॅव गॉट ए व्हेरी व्हॅलिड अर्ग्युमेंट."

जगजीवनराम आणीबाणीच्या समर्थनासाठी लोकसभेत उभे राहिले तेव्हा तपस्वींना एक शेर सहज सुचला.

'नमकहरामी करने पर किसीको हरामी तो कह सकते है
मगर नमक ही हराम हो जाए तो किससे शिकवा करे ?'

## श्री. गोखले यांची अगतिकता

आणीबाणीच्या काळात कायदामंत्री हरिभाऊ गोखले यांनी संविधान संशोधन विधेयक मांडले. खा. पुरुषोत्तम मावळंकर यांच्या एकट्याच्या विरोधी भाषणानंतर अवघ्या २२ मिनिटात ते मंजूरही झाले. त्या संदर्भात हरिभाऊंशी तपस्वी बोलले, "बाळासाहेब, मी, तुम्ही, इंदिरा गांधी कुणीच राहणार नाही तेव्हा या देशात मागे काय राहावे याचा विचार केलाय का या दुरुस्तीच्या वेळी ?" त्या वेळी गोखल्यांची अगतिकता तपस्वींनी नेमकी पकडली आहे. 'हे विधेयक तुमचं नाही.' असं मत तपस्वी बोलून दाखवतात तेव्हा गोखले थक्क होतात. निरीक्षण बिनचूक आहे अशी कबुली देतात.

राष्ट्रपतींनी आपल्या वर्तनाने संसदीय लोकशाही व राज्यघटना यांना कितपत बळकटी आणली याचा मागोवाही अत्यंत रोचक पद्धतीने तपस्वींनी घेतला आहे.

राजेंद्रप्रसादांनी राष्ट्रपतिभवनात पर्णकुटी बांधली होती. तिला भेट देताना तपस्वींनी त्यांना विचारले, "हे दालन आहे की प्रायश्चित्त ?" तेव्हा राजेंद्रबाबू म्हणाले, "हे फक्त मनाचं समाधान."

## राजेंद्रबाबू दोनदा राष्ट्रपती

राजेंद्रबाबू प्रथम राष्ट्रपती कसे झाले, नेहरूंची इच्छा नसतानाही दुसऱ्यांदा ते पुन्हा राष्ट्रपती कसे झाले याचीही तपस्वी यांनी दिलेली हकिगत या दोन्ही नेत्यांच्या संबंधाचे व बेबनावाचे चांगले दर्शन घडवते. (पृष्ठ २१५-२२०) हिंदू कोड बिलाला राजेंद्रबाबूंचा विरोध होता. डॉ. राधाकृष्णन यांनी हिंदी भाषेला राष्ट्रभाषा बनविण्याऐवजी सरकारी कामकाज भाषा कायदा करून हिंदी व इंग्रजी दोन्हींचा मेळ घातला. त्यांनी लक्ष घालून केलेली ही एकमेव गोष्ट असे तपस्वी सांगतात. फकरुद्दीन अलींनाही तपस्वींनी विचारले की, 'इंदिराजींना लगाम घालू शकाल का आपण ?' तेव्हा फकरुद्दीन अली म्हणतात, 'बडी दूर की कौडी ले आये आप.' आणीबाणीच्या जाहीरनाम्यावर सही करण्यापूर्वी फकरुद्दीन अलींना त्या निर्णयाची पूर्वकल्पना देण्यात आली नव्हती हेही आता सर्वांना ज्ञात झालेले आहेच. संजीव रेड्डींनी चरणसिंहांना पंतप्रधानपद देऊन सरकार बनवायला सांगितले ही मोठीच चूक होती, असेही तपस्वींनी स्पष्ट केले आहे. झैलसिंग यांच्या कारकीर्दीचेही परखड मूल्यमापन आले आहेच.

## प्रणव मुखर्जींचा किस्सा

इंदिरा गांधींच्या आणि हिटलरच्या कारकीर्दीतील साधर्म्य दाखवून, इंदिराजींनी उचललेली अनेक पावलेही हिटलरची हुबेहूब नक्कल होती असे तपस्वींचे प्रतिपादन आहे. (पृष्ठ १२३-२४) प्रणव मुखर्जी यांनी सांगितलेला किस्सा इंदिराजींना लोकमत आपल्या विरोधात कसे चालले आहे याची जाणीव करून देणारा आहे. संपूर्ण सत्ता लष्कराकडे देण्याचा इंदिराजींचा निर्णय झाला होता, पण राष्ट्रपती फकरुद्दिन अली यांनी तो कसा हाणून पाडला हेदेखील तपस्वी यांनी सविस्तर विशद केले आहे.

मुंग्यांचे वारुळ या प्रकरणात भ्रष्टाचाराचे विविध पातळीवर माजलेले थैमान कसे भयानक आहे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. काळा पैसा, प्रश्न विचारण्यासाठी हजारो रुपये मागणे, भत्ताबहाद्दर खासदार, खोटारड्या समित्या, खासदार निवासस्थानांचा भ्रष्टाचार, खासदारांचा ढोंगीपणा याबद्दलची अनेक उदाहरणे तपशीलवार या प्रकरणात आली आहेत.

## काश्मीरला वेगळा दर्जा

काश्मीरला वेगळा दर्जा देणारे घटनेचे ३७० वे कलम तात्पुरते म्हणून घातले असले तरी ते कसे चिरेबंदी आहे याचे तपस्वी यांनी केलेले विवेचनही विचारप्रवर्तक आहे. नेहरूंनी हे विधेयक करताना अशी मेख मारून ठेवलेली आहे की काश्मीरचे स्वतंत्र अस्तित्व हे कायमच राहणार. काश्मीरच्या विधिमंडळाने हे कलम रद्द करावे, अशी शिफारस केल्याशिवाय हे कलम रद्द करताच येणार नाही. लोकसभेच्या प्रत्येक अधिवेशनामध्ये या कलमाचा विषय निघतो, पण त्यावर काहीही करण्याची ताकद सरकारकडे नाही. सरदार पटेलांची सूचना होती की निर्वासितांचे पुनर्वसन करताना पंजाबी हिंदूंना काश्मीरमध्ये वसवावे आणि सीमा प्रांतातील हा महत्त्वाचा भाग 'मुस्लीम बहुल' होण्याचा धोका टाळावा, परंतु नेहरूंनी ही सूचना मंत्रिमंडळापुढे येऊच दिली नाही.

पं. द्वारकाप्रसाद मिश्र मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री असताना विधानसभेत त्यांचा पराभव झाला. राजीनामा न देता राज्यपालांना विधानसभा विसर्जित करण्याचा सल्ला देण्याचा त्यांचा बेत होता, परंतु कामराज यांनी त्यांना आधी राजीनामा द्या व मग दिल्लीला या असे स्पष्टच सुनावले. 'मी बहुमतात आहे की नाही हे इंदिराजींना मी मुख्यमंत्री राहायला हवेच की नको यावर अवलंबून आहे. त्यांची मर्जी असली की बहुमत पाठीशी असतेच, नसली की बहुमतही संपून जाते' असे मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री प्रकाशचंद्र सेठी एकदा म्हणाले होते. कामराज आणि इंदिराजी यांच्यातील मूल्यविवेकाचे हे वेगळेपणही तपस्वींनी नेमके ध्यानात आणून दिले आहे.

## संसदेचे एक वेगळेच रूप

भारतीय राजकारणातील काही कुतूहलाचे विषय अशा प्रकारे तपस्वी यांनी 'संसदेची सप्तपदी'मध्ये अत्यंत रोचक पद्धतीने पेश केले आहेत. संबंधित व्यक्तींचा प्रत्यक्ष परिचय असल्याने या सर्व व्यक्ती व घटना यांच्या निवेदनाला एक प्रकारची विश्वासार्हता लाभली आहे. तपस्वी एक पत्रकार म्हणून तपशीलाबाबत जागरुकता दाखवतातच. संसदीय लोकशाही, शुचिता वगैरे काही मूल्यांवर ठाम श्रद्धा असल्याने ते औचित्याला महत्त्व देतात. नेहरू, इंदिराजी यांनी संसदेला, लोकशाहीला व काँग्रेस पक्षाला ज्या प्रकारे गुंडाळण्याचा प्रयत्न केला त्याचे साधार विवेचन त्यामुळेच तपस्वी जेव्हा करतात तेव्हा त्यांच्या लेखणीला त्वेष चढतो. युक्तिवादात वकिलीपणा येतो, तसेच त्यामुळे एकूण विषय रंगतदार होतो. राजकीय गॉसिपपेक्षा वरच्या पातळीवर हे विवेचन जाते आणि दिल्लीतील राजकारणाचे एक 'अंदरूनी' दर्शन घडवते.

(संसदेची सप्तपदी– मो.ग. तपस्वी, परचुरे प्रकाशन मंदिर, २०३/४ मेहता भवन, ३११ राजा राममोहन रॉय मार्ग, गिरगाव, मुंबई ४, पृष्ठे ३०६, शंभर रुपये)

□

# अजिंक्यतारा ते आल्प्स : अरुण गोडबोले

*पुलंच्या शैलीतील मिस्किल प्रवास वर्णन*

पु. ल. देशपांडे यांनी अपूर्वाई आणि पूर्वरंग लिहून मराठी प्रवासवर्णनांना विनोदाचे एक नवे परिमाण दिले. ही प्रवासवर्णने त्या प्रवासाविषयी, तेथील स्थळांविषयी, तेथील माणसांविषयी अनुभवाविषयी जे काही सांगत त्यापेक्षाही जास्त ती पुलंबद्दल सांगत. प्रवासात असलेल्या बहुहुन्नरी कोटिबाज पुलंच्याबद्दलची ही वर्णने असत, आणि स्वतःकडे कृतक्, बावळटपणाचा मक्ता आल्याप्रमाणे प्रत्येक अनुभव वा नवी गोष्ट त्यांना चक्रावूनच जाणार असा एकूण आविर्भाव असल्याने आपल्या फजिती-फरफटींची वर्णने ते चटकदार बनवीत. त्यामुळे वाचकाला त्यात स्वतःच्या सुज्ञपणाचा जणू बिनतोड पुरावाच मिळत असल्यासारखा गुंतून जाई. आपण त्या ठिकाणी असतो तर इतका बावळटपणा केला नसता असा वाचकाला आत्मगौरवाचा व अहंभावतुष्टीचा प्रत्यय पानोपानी येत राहिल्याने या प्रवासवर्णनांच्या वाचनाने वाचकाला खरे स्वान्तसुख लाभे.

## बावळटपणाचेही भांडवल

पुलंच्या या प्रवासवर्णनांनी मराठी वाचकांना प्रवासाची गोडी नव्याने लावली आणि प्रवासातील गमतीजमती सांगण्याची एक नवी शैलीही रूढ केली. परक्या देशात होणारी आपली फजिती ही आता लाजेकाजेची वा लपवण्याजोगी गोष्ट राहिली नाही. ती चारचौघात अभिमानाने सांगण्यासारखी आणि श्रोतृवर्गावर इंप्रेशन मारणारी बाब ठरली. आपल्या बावळटपणाचेही भांडवल करता येते याची मराठी माणसाला रोकडी प्रचीती आली आणि लोक काय म्हणतील हे मनावरचे दडपण दूर झाले.

## माहितीपर प्रवासवर्णने

पुलंच्या या प्रवास-कथांच्या वाचनाने मराठी माणसाच्या लेखी प्रवासाची लज्जत वाढली. प्रवासातील हालअपेष्टा, फसगती, नवखेपणामुळे होणाऱ्या गमतीजमती यांचा

मिस्किलपणे आस्वाद घेण्याची मानसिक तयारी त्यामुळे झाली.

तरीही आश्चर्य असे की पुलंच्या नर्मविनोदी शैलीच्या ढंगात लिहिली गेलेली फारच थोडी प्रवासवर्णने मराठीत आहेत. आजही बहुसंख्य प्रवासवर्णने त्या त्या स्थळाची माहिती पर्यटनदृष्ट्या देण्यावरच भर देतात, मार्गदर्शकाचीच भूमिका बजावण्याच्या हेतूने लिहिली जातात, लिहिणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे खरेखोटे, खट्टेमिठे रंग घेऊन ही माहिती रंगतदार बनलेली आहे असे दिसत नाही. अशी पुस्तके माहिती देणाऱ्या वृत्तपत्रीय लेखनाच्या पातळीवरच राहतात, प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराच्या जवळ ती जात नाहीत. या लेखकांची भूमिका बघ्याची असते, ललित लेखकाची नसते. अर्थात् अशा लेखनाचाही उपयोग हा असतोच. रेल्वेचे टाइमटेबल किंवा फोनची डिरेक्टरी यावाचून जसे चालत नाही, तसे अमके ठिकाण अमुक ठिकाणापासून इतक्या मैलांवर आहे, तेथे जाण्यासाठी अमुक भाडे पडते, तेथे अमुक हॉटेले आहेत, त्यांचे दर अमुक आहेत आणि वर दहा टक्के सर्व्हिस चार्ज द्यावा लागतो वगैरे व्यवहारोपयोगी माहिती आपल्याला बहुमोलाची व उपयुक्त ठरते ही वस्तुस्थिती आहेच. एवंच, पुलंच्या ढंगातली प्रवासवर्णने फार क्वचित् वाचायला मिळतात. त्यामुळेच त्या ढंगातली अरुण गोडबेले यांची सातारा ते सिंगापूर आणि अजिंक्यतारा ते आल्प्स ही पुस्तके एकदम आपल्या चित्ताचा ठाव घेतात.

## हाँगकाँग-सिंगापूर आणि युरोप

सातारा ते सिंगापूरमध्ये बँकाक, हाँगकाँग, मनिला, सिंगापूर या शहरांच्या भेटीची तर अजिंक्यतारा ते आल्प्समध्ये मॉस्को, पॅरिस, जिनिव्हा, पिसा, फ्लॉरेन्स, रोम, काप्री, व्हेनिस, म्युनिक, कलोन, ॲमस्टरडॅम, लंडन, ऑक्सफर्ड वगैरे शहरांच्या फेरफटक्याची हकिगत गोडबोले यांनी सांगितली आहे. 'प्रवास म्हणजे बखर किंवा इतिहास-भूगोल नाही' हे लक्षात घेऊन प्रवासात नोंदी-टिपणे ठेवायच्या नाहीत, प्रवास करताना प्रवासाचा आनंद मनमुराद घ्यावा व नंतर त्या आनंदक्षणांमध्ये वाचकांना सहभागी करून घ्यावे असा त्यांचा दृष्टिकोन आहे. त्यामुळे तपशिलातल्या चुकांचा बाऊ वाचकांनी करू नये वा मुद्रणदोषांसाठी शुद्धिपत्राची मागणी करू नये अशी रंजनात्मक भूमिका गोडबोले यांची आहे आणि ती अर्थातच सोयीस्कर आहे.

## रंगत खुलविणारे निरूपण

प्रवासाला निघायचे ठरवल्यानंतर मित्रमंडळींचे मिळणारे अनाहूत पण प्रेमळ सल्ले, टूरिस्ट कंपनीबरोबर प्रवास केल्यामुळे बरोबर असणारे सहप्रवासी आणि त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांचे किस्से, मार्गदर्शक म्हणून बरोबर असणाऱ्या गाईडचे आणि ड्रायव्हरचे मूड्स, अधूनमधून होणाऱ्या फसगती आणि चुकामुकी, खरेदीत होणारे गडबडघोटाळे, पत्नी बरोबर असल्याने राहणारा गृहखात्याचा कडक पहारा आणि एकाद्याच्या अज्ञानावर हसू

पाहावे तर आपलेच अज्ञान उघडे पडण्याचा धोका- अशा सगळ्या तपशिलांची या गोष्टी वेल्हाळ ऐसपैस निवेदनात रेलचेल असली तरी लेखकाने पुलंसारखा मुखवटा धारण करून, काहीसा मध्यमवर्गीय भिडस्तपणाचा वा बावळटपणाचा वारसा आपण चालवत आहोत हे गृहीत धरून सगळे निरूपण केल्यामुळे त्याची रंगत खुलली आहे यात संदेह नाही. संगती-विसंगती टिपण्याचे आणि अप्रिय प्रसंगीही विनोदाने त्यातून सहीसलामत सुटून जाण्याचे कसब अंगी असल्याने या सकृत्दर्शनी बावळट वा भिडस्त वाटणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा चलाख बेरकीपणा देखील पदोपदी जाणवतो आणि तोही या प्रवासातील गमतीजमतींना एक प्रकारची खुमारी देतो.

## बँकॉक स्टाईल स्वागत

बँकॉकला टॉम किम विमानतळावरून बाहेर पडताना आपल्या प्रवासी ग्रुपमधील ५ जोडपी, ५ व्यापारी, १ कॉलेजकुमार आणि दोन सत्तरीतले वृद्ध यांची गणती जमेना. शेवटी एक कतारमें जनगणना झाल्यावर एक वृद्ध मौजूद नसल्याचा ठाम निष्कर्ष निघतो. हा गृहस्थ भेटल्यावर 'काश्मीरप्रमाणे कोणाचे चूक कोणाचे बरोबर हा वाद सुरू होऊन तो तसाच लोंबकळत ठेवून' बसमध्ये स्थानापन्न होतात. ओडी हा गाईड 'लेदीज अँड जंदलमेन' असे बँकाकस्टाईल इंग्रजीत स्वागत करतो आणि लेखक 'सयाम येथून जवळच आहे का?' असा प्रश्न आपल्या कडक इंग्रजीतून त्या गाईडला विचारतो तेव्हा "माझ्या पत्नीने एकदम फस्स केले आणि काही तरी चुकले हे माझ्या लक्षात आले. आता पत्नीने सयाम म्हणजेच थायलंड हे वाक्य सर्वांना ऐकू जाईल एवढ्या मोठ्याने बोलायला हवे होते का?" असा लेखकाला पडलेला प्रश्न आणि "आपले आणि पत्नीचे अनेक बाबींवर एकमत व्हायचे शिल्लक आहे." अशा त्यावरील निर्णायक भाष्यामुळे या निवेदकाच्या व्यक्तित्वाची प्रवासाच्या सुरुवातीपासूनच वाचकावर पकड बसते.

## भारतीय परिस्थितीशी तुलना

भारतीय परिस्थितीशी जागोजाग तुलना करण्याची निवेदकाला आवड असल्यानेही वाचकाची दृष्टी विशाल होते. 'पोलिस बंदोबस्त आणि भिकारी यांच्या अभावामुळे आम्हाला बुद्ध मंदिरातील सोन्याची मूर्ती पाहताना चुकल्याचुकल्यासारखे वाटले.' 'पण भारतीय परंपरेला अनुसरून माहिती देण्यासाठी कोणीही भारतीय प्रतिनिधी हजर नव्हता.' 'लगेज तेथे ठेवायचे म्हणजे सातारा एस.टी. स्टँडची आठवण झाली. ठेवले की गेलेच म्हणून समजा. आपला स्वभाव शंकेखोर. डाग मोजून ट्रकमध्ये चढले याची खात्री झाल्याशिवाय ट्रकमध्ये बसवेना.' 'आमच्याबरोबर पुणेरी प्रवासी होते. त्यांच्या मते हाँगकाँगच्या या टेकडीला पुण्याच्या पर्वतीची सर येत नाही.' 'तीन-चार तासांच्या खेलखेल में आम्हाला त्या कॅसिनोकडून बरी प्राप्ती झाली. हे उत्पन्न करमुक्त हा एक आनंद. आणि

विदेशात जाऊन महाराष्ट्राची अस्मिता राखून आवाज बुलंद केला हा दुसरा आनंद' 'अहो, या वस्तू इथे काय घेताय?' 'माण तालुक्यातील दुष्काळी वैराण उजाड खेड्यात गेलो तर त्या खेड्याचे वर्णनसुद्धा सवयीने आम्ही दि मोस्ट ब्युटिफूल व्हिलेज इन दि वर्ल्ड असे करू.'

अशासारख्या फिरक्यांमुळे या प्रवासातील शहरांशी आपले नाते जुळणे सोपे जाते. हॉलंडमधले खेडे बघताना कोकणातली बाजारपेठच तांबड्या मातीऐवजी डांबरी सडक बनून भेटते आणि हार्विच ते लंडन हा २५-३० मैलांचा प्रवास करताना आजूबाजूला दिसणारी खेडी, रस्त्यावरचे दिवे यांमुळे सिंहगडहून पुण्याकडे चालल्यासारखे वाटते.

स्वतः, स्वतःची पत्नी, स्वतःचे मित्र आणि सहप्रवासी यांवर दिलखुलास विनोद करण्याची मोकळी वृत्ती आणि पुलंच्या ढंगाने एकूणच प्रवासाकडे व स्थळांकडे बघण्याची. दृष्टी असल्याने अरुण गोडबोले यांच्याबरोबर आशिया-युरोपचा हा जो दौरा वाचकांना घडतो तो सुखद ठरतो. लेखकाच्या व्यक्तित्वामुळे त्या त्या स्थळांच्या अल्पस्वल्प दर्शनानेही त्याबद्दल आपल्याला जुनीपुराणी ओळख असल्यासारखी आत्मीयता वाटते. प्रवाशांना व्हिसा, पासपोर्ट, परकी चलन, बॅगेज, हॉटेल्स, विमानतळावरील तपासण्या वगैरे बाबतीत काय दक्षता घ्याव्या याच्या सूचना देऊन व्यावहारिक मार्गदर्शनही या पुस्तकात आले असले तरी केवळ माहितीपर आणि वृत्तपत्रीय स्वरूपाचे हे लेखन न राहता, वाङ्मयीन रंजकता त्याला लाभते; कारण एका अभिरुचिसंपन्न रसिकाच्या मिष्किल चष्म्यातून या साऱ्या स्थळांचे दर्शन आपल्याला घडते.

## रशियातील घुसमट

रशियात आज गोर्बाचेव यांनी मोकळेपणाचा पुरस्कार चालवला आहे, पण गोडबोले दोन वर्षांपूर्वी तेथे गेले तेव्हा त्यांना सर्वच वातावरणात घुसमट जाणवली. कोणीच कोणाशी मोकळेपणाने बोलायचे नाही. फक्त पूर्वनियोजित चर्चा व व्यक्तींच्या भेटी शक्य. त्यातही मोजके बोलण्याचा अलिखित संकेत. रशियात दोन दिवस राहिल्यावर कळत नकळत त्याचा प्रभाव आपल्यावरही पडतो, 'नेहमी बडबड करण्याची सवय असलेला मी सुद्धा येथील वास्तव्यात विनोबाजींच्या मौन साधनेकडे वाटचाल करायला लागलो,' असे लेखक म्हणतो. मोजके प्रश्न, त्यांची बेतलेली उत्तरे असा आखीव गुळगुळीत प्रकार. भारतीय वकिलातीतील एक अधिकारी तर मराठीतही त्यांच्याशी मोकळेपणाने बोलायला तयार होईनात. ते म्हणाले, "रोजचा जाण्यायेण्याचा आमचा मार्ग ठरलेला. सुटीचा कार्यक्रम ठरलेला. त्यात थोडा बदल झाला तरी पोलिसांच्या चौकशा सुरू होतात." रशियात कुणालाही व्हेअर, व्हॉट, व्हेन हे प्रश्न विचारा, पण व्हाय हा प्रश्न विचारू नका. लगेच कटुता निर्माण होईल. सगळीकडे संशयाचे वातावरण. विमानतळावर जवळच्या मौल्यवान वस्तूंचे डिक्लेरेशन करताना एकाने गळ्यातील चेनचा उल्लेख केला नाही; तर त्याला तेथील

अधिकाऱ्यांनी तो फार गुन्हेगार असल्यासारखे वागवले. लेनिनच्या पुतळ्याजवळ एका झाडाखाली सफरचंद पडलेले होते, पण कोणी ते उचलले नाही. न जाणो तो गुन्हा ठरायचा आणि रशियातून हद्दपारीची शिक्षा व्हायची अशी प्रत्येकाला धास्ती !

रशिया म्हणजे समाजवादाचा स्वर्ग. पण तेथील दुकानांपुढे मोठमोठे क्यू, आणि सगळीच सरकारी दुकाने. त्यामुळे मालाचा दर्जा भिकार. स्पर्धा नाही. निवडीला वाव नाही. किंमती ठराविक. ब्रेड, बटाटे, मांस, दूध, कापड यांचे भाव गेल्या तीस-चाळीस वर्षांत स्थिर आहेत. परंतु इतर वस्तूंचे तेथे दुर्भिक्ष्य आहे. सुरक्षितता व स्वास्थ्य एकीकडे आणि स्वातंत्र्य दुसरीकडे. यात रशियनांना निवडीला वाव नाही. तेथील हॉटेलमधील बेपर्वाईची वागणूकही प्रवाशांना कशी जाचक ठरते याचेही अनेक किस्से येऊन जातात. रशिया सोडतानाही पासपोर्टवरील फोटो आणि प्रवाशाचा चेहरा यांचा कसून मेळ घातला जातो. साधी शाल लपेटल्याने शरीर जरा गुबगुबीत दिसते तरी तेथील अधिकारी संशयाने बघणार ! अशी घुसमट अन्य युरोपियन देशात आढळत नाही. कदाचित् रशियापासून या दौऱ्याचा आरंभ झाल्यामुळे इतरत्र असणारा मोकळेपणा हा तुलनेने अधिकच प्रभावी ठरला असावा.

## लक्षात राहणाऱ्या व्यक्ती

या प्रवासात भेटलेल्या काही व्यक्तिरेखा आपल्या मनाचा ठाव घेण्याइतक्या प्रत्ययकारी ठरतात, हे आणखी एक वैशिष्ट्यही नमूद करायला हवे. विमानतळावर लेखकाच्या सामानाचे वजन ७ किलो जास्त होते, त्यामुळे ७० डॉलर्सची मागणी सिंगापूर एअरलाइन्सची कर्मचारी सू पिन ही करते. लेखक तिच्याशी वाद घालतो. 'इफ यू वॉंट टू रॉब मी, डू इट, बट डोन्ट से अरलियर बॅगेज वॉज ४० किलोज्' असे तो म्हणतो, पण त्यावर ती शांतपणे म्हणते, "नाऊ आय डोन्ट वॉन्ट एनी चार्जेस-फॉर एक्स्ट्रॉ वेट. सिंगापूर एअरलाईन्स डझ नॉट रॉब इट्स पॅसेंजर्स."

बॅनर्जीचा पासपोर्ट मिळेना, त्यामुळे तो हवालदिल झाला. सारे प्रवासी हबकले. अशा वेळी जॉन सुचवतो. "आपण दोन मिनिटे शांतपणे परमेश्वराची प्रार्थना करू या." आश्चर्य असे की बॅनर्जीला त्याच्या पायाशी बसच्या मॅटिंगखाली पासपोर्ट पडलेला दिसतो. 'थँक्यू फ्रेंडस्' म्हणताना त्याला भावनावेगाने रडू कोसळते.

. . . अशा व्यक्तींची अधूनमधून होणारी भेट ही या विविध स्थळांशी आपल्याला अधिक बांधून ठेवते आणि यातच अरुण गोडबोले यांच्या प्रवासवर्णनाचे यश आहे.

(सातारा ते सिंगापूर, अजिंक्यतारा ते आल्प्स. अरुण गोडबोले, प्रकाशक-कौशिक प्रकाशन, ६९ शनिवार पेठ, सातारा. पृष्ठे अनुक्रमे १२४ व ३१६, किंमत २५ रुपये व ७२ रुपये.)

□

# मधाळलेल्या संध्याकाळी : बॅ. सुनीती पुंगलिया

*गाजलेल्या परदेशी नाटकांचे वेधक परिचय*

'मधाळलेल्या संध्याकाळी' हे काव्यात्म नाव धारण करून अवतरलेल्या शंभर पृष्ठांच्या पुस्तकात दहा गाजलेल्या इंग्लिश नाटकांची आल्हाददायक रसग्रहणे आपल्याला वाचायला मिळतात. स्त्रीमुक्ती चळववळीच्या महाराष्ट्रातील एक आरंभीच्या काळातील प्रमुख प्रवक्त्या आणि अनेक पुरोगामी चळवळींशी संबंधित कार्यकर्त्या या नात्याने बॅ. सुनीती पुंगलिया या आपल्याला परिचित आहेत, 'मधाळलेल्या संध्याकाळी' या पुस्तकाद्वारे बॅ. सुनीती पुंगलिया यांच्या नाट्याभिरुचीची आणि रसिकतेची आपल्याला ओळख होते आणि पाश्चात्य रंगभूमीवर गाजलेली नाटके पाहताना त्यांच्या ज्या अनेक संध्याकाळी प्रफुल्लित झाल्या, त्यांपैकी काहींमध्ये आपल्याला सामील होण्याची संधी मिळाल्याचे सौख्य वाटते.

## विविध पातळयांवरील नाट्यकृती

बॅ. पुंगलिया यांनी निवडलेल्या दहा नाटकांपैकी काही आपल्या परिचयाची आहेत. ॲगाथा ख्रिस्तीचे 'माऊस ट्रॅप' हे नाटक १९५१ पासून आजपावेतो विनाखंड रोज लंडनमध्ये चालू आहे. विवस्त्रावस्थेत रंगमंचावर वावरणाऱ्या पात्रांमुळे गाजलेल्या हिप्पी संस्कृतीचे दर्शन घडवणारी हेअर ही संगीतिका, अमेरिकेत ब्रॉडवेवर तुफान धंदा करून इंग्लंडमध्येही लोकप्रिय ठरलेले फिडलर ऑन दि रूफ, आधुनिक ब्रिटिश रंगभूमीला नवा आशय देणारे जॉन ऑसबॉर्नचे लुक बॅक इन ॲंगर यासारख्या आपल्यापर्यंत महती पोहोचलेल्या नाटकांप्रमाणेच सॉमरसेट मॉमचे कॉन्स्टंट वाइफ, सर नोएल कॉवर्ड यांचे प्रायव्हेट लाइव्हज्, गॉन वुइथ दि वुइंड या विश्वविख्यात अमेरिकेत कादंबरीवरून तयार केलेली संगीतिका, पीटर निकल्सची विडंबनपर अनुबोधपटमालिका, 'नॅशनल हेल्थ,' हेरॉल्ड पिंटरचे 'ओल्ड टाइम्स' हे प्रायोगिक नाटक, रॉबर्ट बोल्ट (ए मॅन फॉर ऑल सीझनचा मान्यताप्राप्त लेखक) याचे शैलीदार 'व्हिवा ! व्हिवा रेजिना !' या नाटकांचीही दखल

सुनीतीबाईंनी घेतलेली आहे. हे लेख प्रसिद्ध झाले ७१ ते ७४ या दरम्यान, परंतु या मूळ नाट्यकृतींचे सामर्थ्य असे सार्वकालिक आहे की, १९८८ मध्ये हे पुस्तक प्रसिद्ध होत असले तरी त्यांची वाचनीयता व विवेचनातील ताजेपणा फारसा कमी झालेला नाही.

## महायुद्धाने बदललेले जीवन

महायुद्धांच्या अनुभवाने युरोपियन राष्ट्रांचे अवघे जनजीवन ढवळून निघाले. तेथील प्रत्येक व्यक्तीच्या मनोधर्माला सत्यासत्याचे, पापपुण्याचे, व्यक्तिसमष्टीच्या नात्याचे एक नवे भान आले. साध्य-साधन यांच्या नात्याबद्दलही मूलगामी द्वंद्व मनात निर्माण झाले. सार्त्रच्या मेन विदाऊट शॅडोज (१९४६) या नाटकात बंडखोरांचा एक गट नाझींच्या तुरुंगात चौकशीसाठी डांबला गेलेला दाखवला आहे. या कैद्यांमध्ये नायिकेचाच पंधरा वर्षांचा कोवळा भाऊही आहे. तो नाझींच्या छळाला घाबरून महत्त्वाची माहिती त्यांना देईल ही भीती इतर बंडखोरांना वाटते. तो शेवटी मरणारच आहे, मग ही माहिती तरी त्याच्याकडून का फुटू द्यावी ? तेव्हा त्या बंडखोरांपैकीच एकजण त्याचा गळा घोटतो. महायुद्धाने हत्या हे एक आवश्यक दुष्कर्म म्हणून प्रतिष्ठित केले. त्या वेळेच्या बहुतेक नाटकांतून समाजासाठी व्यक्तीचा त्याग हा गृहीत धरूनच त्याला गौरवण्यात आले आहे. दि मेझर्स टेकन या बर्थाल्ट ब्रेशतच्या नाटकातला एक कम्युनिस्ट तरुण स्वतःच्या अस्तित्वामुळे त्या गावातील कम्युनिस्ट चळवळीला धोका उत्पन्न होईल, हे मान्य करून मृत्यूला कवटाळण्यास तयार होतो. आल्बेर कामूच्या 'दि जस्ट वन्स' मध्येही झारच्या चुलत्याची हत्या करण्यासाठी त्याच्या घोडागाडीत बॉंब ठेवण्याचा निर्णय क्रांतिकारक घेतात, परंतु त्या गाडीत दोन लहान मुलांना बघितल्यावर बॉंब ठेवण्याची जबाबदारी ज्याच्यावर सोपवली आहे तो कलियामेव कच खातो, पण त्याचा सर्वजण धिक्कार करतात. . . महायुद्धाने युरोपियन समाजाच्या मानसिक विचारप्रक्रियेत कसा मूलगामी फरक पडला याची झलक त्यावेळच्या नाटकांतून बघायला मिळते.

## गमतीदार पेचप्रसंग

त्यापुढचा टप्पा सुनीतीबाईंनी निवडलेल्या नाटकांत दिसतो असे म्हणता येणार नाही. कारण ही नाटके वेगवेगळ्या काळात लिहिली गेलेली आहेत, आणि त्यांचा रोख हा वेगवेगळ्या समस्यांवर आहे. 'फिडलर ऑन दि रूफ' मध्ये १९०५ चे रशियातील खेडे पार्श्वभूमी म्हणून येते. एकाच वेळी कोणत्याही गोष्टीच्या बऱ्या व वाईट अशा दोन्ही बाजू पाहण्याची स्वभाववृत्ती असणाऱ्या टेव्हीच्या जीवनाभोवती त्याचे कथानक गुंफलेले आहे. 'देवा तुझ्या कृपेमुळे मी अर्धपोटी मरतो आहे. . . अन् हो, अर्थात गरिबीची लाज कसली ? पण त्यात मोठेपणाही नाही. म्हणून म्हणतो, मी थोडासा श्रीमंत असतो तर तुझ्या डोक्यावर काय मोठं आकाश कोसळणार होतं ?" अशी त्याची वेळ मिळाली की देवाशी स्वगतात

बोलण्याची सवय आहे. त्याच्या तीन मुली आपापले नवरे मिळवतात. त्यातले गमतीदार पेचप्रसंग या संगीतिकेत धमाल उडवून देतात.

## नवनाट्य 'हेअर'

'हेअर' हा ब्रिटिश रंगभूमीवरील एक खळबळजनक प्रयोग. हिप्पी संस्कृतीचा, तारुण्याचा सळसळणारा जोश- आवेश पकडणारी ही संगीतिका उच्चभ्रू रसिकांतही मान्यता पावली आहे. कथा नाही, नाट्य नाही, अभिनय नाही, सुरुवात-शेवटही नाही, क्लायमॅक्स नाही असं हे नवनाट्य आहे. नाटकाच्या सुरुवातीला पात्रे प्रेक्षकांतूनच येतात, स्टेजवर वाटेल तशी बसतात किंवा लोळतात, गातात, नाचतात. सद्यःस्थितीवर टीका करतात, अश्लीलतेच्या कायद्याची, संततिनियमनाची, युद्धविनाशाची, समाजातील विविध रूढींची, धार्मिक अंधश्रद्धेची टर उडवतात, टवाळी करतात. सुनीती पुंगलिया या कृतीच्या यशाचे रहस्य उलगडून दाखवताना त्यातील संगीताचे स्थान तर अग्रक्रमाने विचारात घेतातच (गडगडणाऱ्या ढगांसारखं नि कडाडणाऱ्या बिजलीसारखं घणाघाती संगीत), एस्टॅब्लिशमेंटच्या व सामाजिक अन्यायाच्या तीव्र जाणिवेतून उगम पावलेल्या पाश्चात्य तरुणातील संतापाला वाट देणारी 'हेअर' ही कृती प्रेम व जीवन या शाश्वत मूल्यांवर श्रद्धा प्रकट करणारी नवसंगीतिका आहे असेही त्या म्हणतात. हेअर म्हणजे केवळ वादळ नव्हे, तर तो जिवंत ज्वालामुखी आहे.कलाहीन कृतीचे कलात्मक रीतीने सादरीकरण हे तिच्या यशाचे मर्म आहे असेही त्या म्हणतात. ही संगीतिका रंगभूमीची मर्यादा ओलांडून, प्रेक्षकांना आपली तटस्थ भूमिका विसरायला लावून आपल्याबरोबर सबंध नाट्यगृहालाच प्रयोगात सामील करून घेते.

याउलट 'गॉन वुइथ दि वुइंड' ही संगीतिका म्हणजे युद्ध व प्रेम यांचे गुंतागुंतीचे कथानक, नेत्रदीपक नेपथ्य (गंधर्वनगरीचे दर्शन घडवणारे), असाधारण रंगमंचतंत्र, भव्य कलात्मक दिग्दर्शन. इंग्लंडमध्ये निर्माण झालेली ही पहिलीच संगीतिका. अमेरिकेहून आलेली नव्हे.

## विक्रमी नाटक 'माऊस ट्रॅप'

'माऊस ट्रॅप' ही तर ॲगाथा ख्रिस्तीची रहस्यकथाच. साधे पण अर्थपूर्ण नेपथ्य, संयत अभिनय यांच्या जोडीला अत्यंत तर्कशुद्ध व नाट्यात्मक कथानकाची कौशल्यपूर्ण उभारणी यामुळे हे नाटक २५ नोव्हेंबर १९५२ पासून गेली ३६ वर्षे सतत चालू आहे. एकाच नाट्यगृहात त्याचे १४ हजारावर प्रयोग झालेले आहेत. २२२ नटनट्यांनी त्यात काम केले. १ कोटी ३० लाख पौंड म्हणजे २६ कोटी रुपयांची कमाई त्याने केली. ७० लाख प्रेक्षकांनी ते पाहिले. सुनीतीबाईंनी या माऊस ट्रॅपच्या प्रयोगानंतर प्रेक्षकांच्या ज्या प्रतिक्रिया होतात त्या नेमक्या टिपल्या आहेत.

## स्त्रीमुक्तीचा उद्‍गाता मॉम

सॉमरसेट मॉमच्या कॉन्स्टंट वाइफ (चिरकालीन पत्नी) या नाटकाचे रसग्रहण करताना सुनीती पुंगलिया यांनी विशेष आत्मीयता दाखवली आहे. स्त्रीमुक्तीची कल्पना समान हक्काविषयी एक शब्दही न उच्चारता प्रभावीपणे प्रकट करण्यासाठीच मॉमने हे नाटक लिहिले असावे असे सुनीतीबाई मानतात आणि मॉमला स्त्रीमुक्तीच्या कल्पनेचा पहिला उद्‍गाता असे श्रेयही उदारपणे देऊन टाकतात. विवाहसंस्थेची मॉमने यात चिरफाड केलेली आहे. पत्नी ही एकप्रकारची रखेलीच होय, वेश्याच होय, फक्त कायदेशीर समारंभाचा आग्रह धरून पुरुषाच्या प्रेमाचा फायदा घेऊन, त्याने आपल्याला पुढे टाकून देऊ नये म्हणून त्याला सापळ्यात अडकवते. 'विवाह म्हणजे स्त्रीनं स्वीकारलेला एक सुखदायी व्यवसाय' अशासारखी वाक्ये या नाटकात वरचेवर येतात. १९२६ मध्ये मॉमचे हे नाटक प्रथम रंगभूमीवर आले. त्या वेळी अशा वाक्यांनी प्रेक्षकांना कसा घाम फुटत असेल याची कल्पनाच केलेली बरी ! आपल्या प्रियकराबरोबर काही काळ काढून परत पतीकडे येणारी आणि 'असा राग येतो तुझा... खरोखर तुझ्यासारखी हट्टी, उलट्या डोक्याची, आकर्षक व सुंदर स्त्री पत्नी म्हणून लाभणं यासारखा पुरुषाला दुसरा शाप नाही. ये बाई ये परत. घर तुझंच आहे' असं नवऱ्याला म्हणायला लावणारी, कॉन्स्टंट ही या नाटकाची नायिका ही आपल्याकडे इब्सेनच्या 'नोरा' प्रमाणेच प्रत्येकाच्या जाणिवेत घर करून राहायला हवी.

मॉमचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ही विवाहसंस्थेची खिल्ली उडवणारी सर्व विधाने नायिकेच्या तोंडी घातलेली आहेत आणि एकूण नाटकाची प्रकृती विनोदी असल्याने त्या वेळच्या नीतिवाद्यानांही या नाटकाविरुद्ध झोड उठविणे कठीण गेले असावे. अर्थात याचे सारे श्रेय ब्रिटिशांच्या अभिजात विनोदबुद्धीला द्यायला हवे.

## राष्ट्रीयीकरणाची टिंगल

इंग्लंडमध्ये वैद्यकीय व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण झालेले आहे. त्यामुळे तेथे रुग्णांवर येणाऱ्या विविध प्रसंगांची एक मालिकाच डॉक्युमेंटरीप्रमाणे पीटर निकल्सने 'नॅशनल हेल्थ' या नाटकाद्वारे उभी केली आहे. वॉर्डबॉय बार्नेट हा सूत्रधारासारखा शेवटपर्यंत प्रेक्षकांशी संवाद करीत असतो. एका राष्ट्रीकृत रुग्णालयातील एक पुरुषांचा वॉर्ड आणि त्यातील सहा रुग्ण यांच्याद्वारे जे विडंबन उभे राहते, दुःख, वेदना, मृत्यूचे सावट यांच्या जोडीनेच विनोदाचे हे कारुण्य अधिक गडद होते...

त्याचप्रमाणे १९६८ मध्ये नाटकावरील सेन्सॉरशिप रद्द करून इंग्लंडने कलास्वातंत्र्याच्या दिशेने एक मोठी झेप घेतली. सेन्सॉरशिप गेल्यामुळे हेअर, ओ कलकत्ता यासारखी नाटके सर्रास होऊ लागली. त्या संदर्भात रंगभूमीवर घडलेल्या परिवर्तनाचा मागोवा घेणारा एक लेखही या संग्रहात घेण्यात आला आहे. 'अश्लीलतेच्या वस्तुनिष्ठ

व्याख्येला व्यक्तिगत दृष्टीचा सामाजिक संदर्भ पायाभूत असतो' याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

आपल्याकडे पाश्चात्य साहित्याबद्दल कुतूहल उदंड आहे, परंतु त्यावर जाणतेपणाने लिहिणारे अभ्यासक कमी आहेत. बॅ. सुनीती पुंगलिया यांनी पाश्चात्य नाटकांची ही जी ओळख रसिलेपणाने करून दिली आहे, ती त्यामुळेच एक स्वागतार्ह घटना आहे.

(मधाळलेल्या सायंकाळी : बॅ. सुनीती पुंगलिया, प्रतिमा प्रकाशन, १३५९ सदाशिव पेठ पुणे ३०. पृष्ठे १००, तीस रुपये.)

□

# मराठी सारस्वत : सं. अनंत जोशी

## *मराठी लेखकांची अद्ययावत सूची*

आजमितीला मराठी भाषेत ज्यांनी एक वा अधिक पुस्तके लिहिली आहेत असे सुमारे ३३०० लेखक हयात आहेत; आणि त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची संख्या ४० हजारांपेक्षा जास्त आहे, असे तुम्हाला कोणी छातीठोकपणे सांगितले तर तुमचा त्यावर विश्वास बसेल का? एरवी कदाचित बसला नसता. परंतु मराठी सारस्वत हे पुण्याच्या अनमोल प्रकाशनतर्फे प्रसिद्ध झालेले पुस्तक पाहिले म्हणजे या माहितीबाबत शंका घेण्याचे कारणच उरत नाही. 'मराठी सारस्वत' हा ग्रंथ दोन खंडांत प्रसिद्ध होत आहे. त्यापैकी पहिल्या खंडाचे दोन भाग बाजारात आले असून, वर्षभरात दुसरा खंड वाचकांच्या हाती देण्याचा प्रकाशकांचा निर्धार आहे. पहिल्या खंडाच्या दोन भागात मिळून अ ते न पर्यंतच्या सुमारे १३७५ लेखकांचा परिचय आला आहे. दुसरा खंड एकाच भागात निघणार असून त्यात उर्वरित प ते ज्ञ पर्यंतचे लेखक येतील, पहिला खंड प्रसिद्ध झाल्यावर हाती आलेल्या सुमारे ३५० लेखकांच्या माहितीचा पुरवणी खंडही त्याला जोडला जाईल. शिवाय वाङ्मयप्रकारानुसार लेखकांची सूचीही परिशिष्ट म्हणून देण्यात येईल.

### वाचक-अभ्यासकांची सोय

पहिल्या खंडाच्या दोन्ही भागांची मिळून ४८६ पृष्ठे मोठ्या क्राऊन चतुर्थांश आकारातील असून, दुसरा खंड त्यापेक्षा मोठा होणार हे उघडच आहे.

डिसेंबर १९८४ मध्ये या कामाला आरंभ झाला, त्या वेळी जे लेखक हयात होते, त्यांचाच या सूचीत समावेश करायचा असा एक व्यावहारिक निर्णय घेण्यात आला आणि माहितीची जमवाजमव सुरू झाली. डिसेंबर १९८४ मध्ये हयात असलेले परंतु हा ग्रंथ सिद्ध होत असताना कालवश झालेले साहित्यिकही त्यात समाविष्ट केले गेलेले आहेत. ही एक लक्ष्मण रेषा संपादक अनंत जोशी यांनी आखून घेतल्यामुळे काही सोयी, काही गैरसोयी होणार हे स्पष्टच आहे. कारण त्याआधी मृत झालेल्या लेखकांची माहिती या

ग्रंथात आढळणार नाही. खांडेकर, फडके, पु. शि. रेगे, खानोलकर, चिं. वि. जोशी, श्री. के. क्षीरसागर, आचार्य अत्रे अशा अनेक नामवंत लेखकांची माहिती या ग्रंथात आपल्याला मिळणार नाही. वाचकांच्या व अभ्यासकांच्या दृष्टीने ही गोष्ट गैरसोयीची ठरणार हे निश्चित, परंतु त्याबद्दल तक्रार करण्याचे कारण नाही. अशा स्वरूपाचे संदर्भ ग्रंथ तयार करताना काळाचा एक निश्चित आरंभ बिंदू ठरवणे अपरिहार्य असते आणि डिसेंबर १९८४ मध्ये हयात असलेल्या लेखकांची सूची तरी नेमकी नेटकी उपलब्ध झाल्यामुळे वाचक-अभ्यसकांची जी सोय होणार आहे, तिचे मोलही कमी लेखण्याचे कारण नाही.

## शासनाच्या मदतीशिवाय काम

हे प्रचंड काम आहे आणि ते खरे म्हणजे शासनाने वा साहित्यसंस्थांनी हाती घेण्यासारखे आहे, परंतु आपल्याकडे साहित्यसंस्कृती मंडळ, विश्वकोश मंडळ आणि अन्य प्रादेशिक साहित्यसंस्था यांच्या हातून होणारी कामे ही एका विशिष्ट चाकोरीतील आणि त्यामानाने खूप खर्चिक व वेळकाढू ठरतात, असा अनुभव आहे. म. सा. परिषदेने मराठी वाङ्मयाचा इतिहास प्रसिद्ध करण्याची योजना आखली. गेल्या २५/३० वर्षांत या योजनेतील पाच-सहा खंड प्रसिद्ध झाले. परंतु अजून उर्वरित खंडांची जमवाजमव बाकीच आहे. विश्वकोशाचे कार्य इतक्या मंदगतीने चालले आहे की केवळ सरकारच त्यामागे असल्याने त्याचा प्रचंड खर्च आजवर चालवता आला. खाजगी पातळीवर अशी आस्तेकदम वाटचाल ही दिवाळखोरीची ठरली असती. पं. महादेवशास्त्री जोशी यांनी भारतीय संस्कृती कोश अगदीच अल्प खर्चात आणि मोजक्या साहांय्यकांच्या आधारे तुलनात्मकदृष्ट्या फार कमी वेळात प्रसिद्ध केला आहे. हे उदाहरण या पार्श्वभूमीवर खूप बोलके ठरेल.

## संपादक-प्रकाशकांची जिद्द

मराठी लेखकांच्या सूचीचा हा संकल्प अनमोल प्रकाशनचे मोरेश्वर नांदूरकर यांनी आपल्या एकट्याच्या बळावर सोडला आणि अनंत लक्ष्मण जोशी यांनीही एकट्याने त्याच्या संपादकपदाची जबाबदारी पत्करली. एवढेच नव्हे तर अवघ्या तीन वर्षांत पहिला खंड छापून प्रसिद्ध केला व सहा वर्षें संपण्याच्या आत सर्व काम पूर्ण करण्याची जिद्द दाखवली. या गोष्टीचे त्यामुळेच अप्रूप वाटते.

## स्मृतींना उजाळा

'मराठी सारस्वत'च्या पहिल्या खंडाचे दोन भाग सहज चाळले तरी कितीतरी उद्‌बोधक तपशील लक्ष वेधून घेतात. परिचित लेखकांचे फोटो पाहून जुन्या स्मृती चाळवतात. त्यांच्या चरित्रविषयक तपशिलाकडे लक्ष टाकले तरी आपल्याला अनेक नव्या

गोष्टी कळतात आणि त्या लेखकाच्या पुस्तकांची सूची बघितली की त्यापैकी कितीतरी पुस्तके आपल्या नजरेतून निसटल्याची खात्री पटते. फार थोड्या लेखकांची पूर्ण माहिती आपल्याला असते आणि एखादा लेखक जर बहुप्रसव असेल तर त्याच्या पुस्तकांच्या मागावर सतत राहणेही अशक्यप्राय ठरते.

बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथांच्या यादीने या ग्रंथातील २२ पृष्ठे व्यापलेली आहेत. हजारावर पुस्तकांची नावे त्यात आहेत, तर त्यांचेच धाकटे बंधू मधुकर अर्नाळकर यांच्या दोनशेवर रहस्यकथांची नोंद यात मिळते. डॉ. प्र. न. जोशी यांच्या नावावर १२० पुस्तके आहेत. त्यात अठरा पुराणे, शब्दकोश, तुकाराम गाथा, वाङ्मयेतिहास, शास्त्रज्ञांचा चरित्रकोश, भौगोलिक साहसकथा, विज्ञानकथा, संतकथा, अशी विविधता आहे. पं. महादेवशास्त्री जोशी यांनी भारतीय संस्कृती कोशाची ८ हजार पृष्ठे तर संपादित केलीच, भारतदर्शन माला, कथा कौमुदी माला, जनपद कथा, कथाकल्पलता, भारती उपकथा, प्राचीन सुरस गोष्टी, लोककथा आदी मालांद्वारेसुमारे पाऊणशे पुस्तके लिहिली. शिवाय ११ लघुकथा संग्रह व आत्मचरित्र आहेच.

## विपुल ग्रंथसंख्या

डॉ. रा. चिं. ढेरे, मनमोहन नातू, गो. नी. दांडेकर, शं. गो. तुळपुळे, श्रीपाद जोशी, यदुनाथ थत्ते, नारायण धारप, गुरुनाथ नाईक, चंद्रकांत काकोडकर, वामन चोरघडे, प्रभाकर दिघे, योगिनी जोगळेकर, भालबा केळकर वगैरेंची ग्रंथनिर्मिती अशीच शंभरीच्या जवळपास जाणारी आहे. बालवाङ्मयाचा विचार केला तर शं. रा. देवळे यांचा नंबर पहिला लागतो. त्यांच्या ३५० वर पुस्तकांनी ८ पृष्ठे व्यापलेली आहेत. त्यांच्या पत्नी सौ. नलिनी देवळे यांनीही २५ पुस्तके लिहिली आहेत. मालतीबाई दांडेकरांच्या पुस्तकांची संख्याही अशीच विस्मयकारक आहे. १४ कादंबऱ्या, १८ कथासंग्रह, शंभरावर बालकथांची पुस्तके, १६ संकीर्ण पुस्तके इ. इ. दत्ता टोळ, रं. म, जोशी, निर्मलगुरुजी हे भरपूर लिहिणारे बालवाङ्मयकार आहेत.

राम कोलारकरांनी कथा-संपादनावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. सर्वोत्कृष्ट मराठी कथांचे २३ संग्रह, विनोदी कथांचे २० संग्रह, ऐतिहासिक कथांचे ६ संग्रह आणि काही लेखकांच्या निवडककथांचे संग्रह, असे संपादनकर्तृत्व त्यांच्या खात्यावर जमा आहे. अमरेंद्र गाडगीळांनीही संपादित केलेल्या पुस्तकांची संख्या मोठी आहे.

अशी अनेक निरीक्षणे नोंदवता येतील. माझी खात्री आहे की प्रत्येक वाचकाला, या पुस्तकाची पाने चाळता चाळता असे अनेक शोध लागतील आणि आपल्या माहितीला एक प्रकारची परिपूर्णता लाभल्याचा आनंद मिळू शकेल.

हे मोठे अवघड काम मार्गी लावणाऱ्या श्री. अनंत लक्ष्मण जोशी यांचे मला मोठे कौतुक वाटते. त्यांच्याशी त्याविषयी चर्चाही केली. त्यातील काही प्रश्नोत्तरे वाचकांचे कुतूहल शमविण्यासाठी येथे देत आहे.

"लेखकांची माहिती जमवावी अशी कल्पना तुमच्या मनात कशी आली ?"

"मी गरवारे कॉलेजमध्ये गेली वीस वर्षे ग्रंथपाल आहे. आमच्याकडे वक्ते म्हणून अनेकदा साहित्यिक येतात. त्यांचा परिचय करून देण्यासाठी त्यांची माहिती लागते. माझ्याकडे विचारणा झाली की ती माहिती संकलित करीत असे. एकदा श्रीपाद जोशी हे पाहुणे म्हणून आले होते. त्यांची ओळख करून देताना 'आनंदी गोपाळ ही कादंबरी यांच्याच लेखणीतून उतरलेली आहे' असे ओळख करून देणाऱ्या व्यक्तीने म्हटले. ते म्हणाले, "आनंदी गोपाळचा लेखक मी नव्हे. ते श्री.ज.जोशी वेगळे." त्या वेळी मला वाटले की असा घोटाळा टाळायचा असेल तर लेखकांची माहिती, त्यांच्या पुस्तकांची यादी यांचे संकलन करणे अभ्यासकांना उपयुक्त ठरेल; परंतु हा प्रकल्प फार व्यापक आणि खर्चिक आहे हे लक्षात आले. त्यामुळे तो मनातल्या मनातच घोटाळत राहिला."

"मग नांदूरकरांचा व तुमचा संपर्क कसा आला ?"

"नांदूरकरांच्या रसिक साहित्य मध्ये पुस्तके चाळण्यासाठी मी नेहमी जात असे. त्यांच्या साहित्यसूचीसाठी लेखन करीत असे. एकदा ते म्हणाले, "एखादी नवी योजना डोक्यात आहे का ?" मी या सूचीची योजना त्यांना सांगितली. तेव्हा ते म्हणाले, "आमच्याही मनात अशी योजना घोळत आहे. मागे दोन जणांकडे ते कामही सोपवले, परंतु काहीच निष्पन्न झाले नाही. तुम्ही हे काम करायला लागा." मी म्हटले की हे काम खर्चाचे आहे. खासगीरीत्या करणे परवडणार नाही. शासनच ते करू शकेल. नांदूरकर म्हणाले की तुम्ही म्हणता ते खरे आहे. परंतु हे काम आपणच करावे असे आमच्या मनात आहे. तेव्हा तुम्ही कामाला लागा."

"प्रारंभी त्यादृष्टीने कशी जुळवाजुळव केली ?"

"मी प्रकाशन डायरी घेतली. तिच्यात सातशेवर लेखकांचे पत्ते होते. त्या सर्वांना ४ एप्रिल १९८४ रोजी माहिती भरून पाठवण्यासाठी एक फॉर्म पाठवला, परंतु त्या डायरीत ज्यांचे पत्ते नाहीत असेही अनेक लेखक होतेच. त्यांची नावे मिळविण्यासाठी प्रकाशकांना पत्रे लिहिली. मासिकांचे १९८० पासूनचे अंक धुंडाळले. रविवारच्या आवृत्त्यांमधील परीक्षणे, साभार पोच, पुस्तकांच्या जाहिराती यांचा शोध घेत राहिलो. पुणे, मुंबई, सोलापूर, ठाणे, नागपूर, वर्धा, नाशिक, कोल्हापूर वगैरे ठिकाणच्या ग्रंथालयांना भेटी देऊन तेथील रजिस्टर्स चाळली. ग्रंथसंग्रह बघितले. छोट्या मोठ्या पुस्तकविक्रेत्यांना भेटून माहिती मिळवली. वृत्तपत्रांना निवेदने पाठवली."

गोष्टी कळतात आणि त्या लेखकाच्या पुस्तकांची सूची बघितली की त्यापैकी कितीतरी पुस्तके आपल्या नजरेतून निसटल्याची खात्री पटते. फार थोड्या लेखकांची पूर्ण माहिती आपल्याला असते आणि एखादा लेखक जर बहुप्रसव असेल तर त्याच्या पुस्तकांच्या मागावर सतत राहणेही अशक्यप्राय ठरते.

बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथांच्या यादीने या ग्रंथातील २२ पृष्ठे व्यापलेली आहेत. हजारावर पुस्तकांची नावे त्यात आहेत, तर त्यांचेच धाकटे बंधू मधुकर अर्नाळकर यांच्या दोनशेवर रहस्यकथांची नोंद यात मिळते. डॉ. प्र. न. जोशी यांच्या नावावर १२० पुस्तके आहेत. त्यात अठरा पुराणे, शब्दकोश, तुकाराम गाथा, वाङ्मयेतिहास, शास्त्रज्ञांचा चरित्रकोश, भौगोलिक साहसकथा, विज्ञानकथा, संतकथा, अशी विविधता आहे. पं. महादेवशास्त्री जोशी यांनी भारतीय संस्कृती कोशाची ८ हजार पृष्ठे तर संपादित केलीच, भारतदर्शन माला, कथा कौमुदी माला, जनपद कथा, कथाकल्पलता, भारती उपकथा, प्राचीन सुरस गोष्टी, लोककथा आदी मालांद्वारेसुमारे पाऊणशे पुस्तके लिहिली. शिवाय ११ लघुकथा संग्रह व आत्मचरित्र आहेच.

## विपुल ग्रंथसंख्या

डॉ. रा. चिं. ढेरे, मनमोहन नातू, गो. नी. दांडेकर, शं. गो. तुळपुळे, श्रीपाद जोशी, यदुनाथ थत्ते, नारायण धारप, गुरुनाथ नाईक, चंद्रकांत काकोडकर, वामन चोरघडे, प्रभाकर दिघे, योगिनी जोगळेकर, भालबा केळकर वगैरेंची ग्रंथनिर्मिती अशीच शंभरीच्या जवळपास जाणारी आहे. बालवाङ्मयाचा विचार केला तर शं. रा. देवळे यांचा नंबर पहिला लागतो. त्यांच्या ३५० वर पुस्तकांनी ८ पृष्ठे व्यापलेली आहेत. त्यांच्या पत्नी सौ. नलिनी देवळे यांनीही २५ पुस्तके लिहिली आहेत. मालतीबाई दांडेकरांच्या पुस्तकांची संख्याही अशीच विस्मयकारक आहे. १४ कादंबऱ्या, १८ कथासंग्रह, शंभरावर बालकथांची पुस्तके, १६ संकीर्ण पुस्तके इ. इ. दत्ता टोळ, रं. म, जोशी, निर्मलगुरुजी हे भरपूर लिहिणारे बालवाङ्मयकार आहेत.

राम कोलारकरांनी कथा-संपादनावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. सर्वोत्कृष्ट मराठी कथांचे २३ संग्रह, विनोदी कथांचे २० संग्रह, ऐतिहासिक कथांचे ६ संग्रह आणि काही लेखकांच्या निवडककथांचे संग्रह, असे संपादनकर्तृत्व त्यांच्या खात्यावर जमा आहे. अमरेंद्र गाडगीळांनीही संपादित केलेल्या पुस्तकांची संख्या मोठी आहे.

अशी अनेक निरीक्षणे नोंदवता येतील. माझी खात्री आहे की प्रत्येक वाचकाला, या पुस्तकाची पाने चाळता चाळता असे अनेक शोध लागतील आणि आपल्या माहितीला एक प्रकारची परिपूर्णता लाभल्याचा आनंद मिळू शकेल.

हे मोठे अवघड काम मार्गी लावणाऱ्या श्री. अनंत लक्ष्मण जोशी यांचे मला मोठे कौतुक वाटते. त्यांच्याशी त्याविषयी चर्चाही केली. त्यातील काही प्रश्नोत्तरे वाचकांचे कुतूहल शमविण्यासाठी येथे देत आहे.

"लेखकांची माहिती जमवावी अशी कल्पना तुमच्या मनात कशी आली ?"

"मी गरवारे कॉलेजमध्ये गेली वीस वर्षे ग्रंथपाल आहे. आमच्याकडे वक्ते म्हणून अनेकदा साहित्यिक येतात. त्यांचा परिचय करून देण्यासाठी त्यांची माहिती लागते. माझ्याकडे विचारणा झाली की ती माहिती संकलित करीत असे. एकदा श्रीपाद जोशी हे पाहुणे म्हणून आले होते. त्यांची ओळख करून देताना 'आनंदी गोपाळ ही कादंबरी यांच्याच लेखणीतून उतरलेली आहे' असे ओळख करून देणाऱ्या व्यक्तीने म्हटले. ते म्हणाले, "आनंदी गोपाळचा लेखक मी नव्हे. ते श्री. ज. जोशी वेगळे." त्या वेळी मला वाटले की असा घोटाळा टाळायचा असेल तर लेखकांची माहिती, त्यांच्या पुस्तकांची यादी यांचे संकलन करणे अभ्यासकांना उपयुक्त ठरेल; परंतु हा प्रकल्प फार व्यापक आणि खर्चिक आहे हे लक्षात आले. त्यामुळे तो मनातल्या मनातच घोटाळत राहिला."

"मग नांदूरकरांचा व तुमचा संपर्क कसा आला ?"

"नांदूरकरांच्या रसिक साहित्य मध्ये पुस्तके चाळण्यासाठी मी नेहमी जात असे. त्यांच्या साहित्यसूचीसाठी लेखन करीत असे. एकदा ते म्हणाले, "एखादी नवी योजना डोक्यात आहे का ?" मी या सूचीची योजना त्यांना सांगितली. तेव्हा ते म्हणाले, "आमच्याही मनात अशी योजना घोळत आहे. मागे दोन जणांकडे ते कामही सोपवले, परंतु काहीच निष्पन्न झाले नाही. तुम्ही हे काम करायला लागा." मी म्हटले की हे काम खर्चाचे आहे. खासगीरीत्या करणे परवडणार नाही. शासनच ते करू शकेल. नांदूरकर म्हणाले की तुम्ही म्हणता ते खरे आहे. परंतु हे काम आपणच करावे असे आमच्या मनात आहे. तेव्हा तुम्ही कामाला लागा."

"प्रारंभी त्यादृष्टीने कशी जुळवाजुळव केली ?"

"मी प्रकाशन डायरी घेतली. तिच्यात सातशेवर लेखकांचे पत्ते होते. त्या सर्वांना ४ एप्रिल १९८४ रोजी माहिती भरून पाठवण्यासाठी एक फॉर्म पाठवला, परंतु त्या डायरीत ज्यांचे पत्ते नाहीत असेही अनेक लेखक होतेच. त्यांची नावे मिळविण्यासाठी प्रकाशकांना पत्रे लिहिली. मासिकांचे १९८० पासूनचे अंक धुंडाळले. रविवारच्या आवृत्त्यांमधील परीक्षणे, साभार पोच, पुस्तकांच्या जाहिराती यांचा शोध घेत राहिलो. पुणे, मुंबई, सोलापूर, ठाणे, नागपूर, वर्धा, नाशिक, कोल्हापूर वगैरे ठिकाणच्या ग्रंथालयांना भेटी देऊन तेथील रजिस्टर्स चाळली. ग्रंथसंग्रह बघितले. छोट्या मोठ्या पुस्तकविक्रेत्यांना भेटून माहिती मिळवली. वृत्तपत्रांना निवेदने पाठवली."

"लेखकांकडून माहिती मिळणे सोपे गेले की अवघड ? त्यात काय अनुभव ?"

"बऱ्याच लेखकांनी पहिल्या पत्राला प्रतिसाद दिला नाही. काही जण माहिती अर्धवट पाठवत. काहींचे फोटो येत नसत. अशा वेळी पुनःपुन्हा पत्रे पाठवण्यात मी कधी आळस केला नाही. चार-चार वेळा स्मरणपत्रे पाठवली. एका व्यक्तीकडे तर नऊ वेळा फेऱ्या मारल्या. निरनिराळ्या ठिकाणच्या सुमारे २००० लेखकांना या काळात मी प्रत्यक्ष भेटलो. काही मोठ्या लेखकांकडूनच माहिती मिळवणे अवघड ठरले. जी. एं. ची माहिती प्रा. हातकणंगलेकरांकडून मिळवावी लागली. एका मोठ्या संशोधकांनी प्रत्यक्ष भेटीत प्रथम सांगितले की 'मी माहिती देणार नाही.' तो किस्सा मजेशीर आहे. मी म्हटले, "ठीक आहे, पण मला फक्त पाणी द्या." त्यांनी विचारले, "एवढे दमायला काय झाले ? प्रकाशकांनी पैसे दिले नाहीत का ?" मी म्हटले, "प्रकाशकांनी पैसे दिले आहेत, पण तुमचं घर शोधण्यासाठी रिक्षावाल्याला हिंडवण्यात काय फायदा आहे ? म्हणून मी सायकलवरून आलो आहे." त्या गृहस्थाने पाणी तर दिलेच, पण माहितीही दिली. माहिती न देणारे असे फार मोजकेच होते. पहिला खंड प्रसिद्ध झाल्यावर अनेकांनी आपण होऊन माहिती पाठविली."

"लेखकांची माहिती मिळवताना काही गमतीजमती आढळल्या ?"

"अनेक गमतीदार गोष्टी आढळल्या. आशा जोशी या नावावर काही पुस्तके मिळाली. आशा जोशी कोण, त्यांचा पत्ता यासाठी मी कितीतरी ठिकाणी चौकशी केली. शेवटी ते. का. क. जोशी यांचे टोपण नाव निघाले. उर्मिला तिबिले यांची माहिती मिळेना, अनंत तिबिले यांचे ते टोपणनाव असल्याचे कळले. २५० कादंबऱ्या त्या नावावर आहेत. काही लेखक तर आदरातिथ्य करूनच माहिती देत."

"दोन्ही खंड प्रसिद्ध झाल्यावर पुढे काय करणार ? नवनवे लेखक येत राहणार. त्यांची माहिती देण्यासाठी काही योजना ?"

"दर पाच वर्षांनी ही सूची अद्ययावत करावी असे मनात आहे. नव्या माहितीचे पुरवणी खंड काढणे किंवा पूर्णतःच नवी अद्ययावत सूची प्रसिद्ध करणे या दृष्टीने कायम यंत्रणा उभी केली गेली तर हे शक्य होईल."

संपादक अनंत जोशी आणि प्रकाशक मोरेश्वर नांदूरकर या दोघांनी 'मराठी सारस्वत'च्या रूपाने एक मोठी कामगिरी बजावली आहे. वाचकांनी या कार्याचे चीज करायला हवे.

(मराठी सारस्वत खंड १ भाग १ व २. संपादक : अनंत लक्ष्मण जोशी. प्रकाशक : अनमोल प्रकाशन, ६८३, बुधवार पेठ, पुणे २. पृष्ठे : ४८६. मूल्य : दोन्ही खंडांचे रु. ५००/-. सवलतीची किंमत ३०० रु.)

□

# महाराष्ट्र १९८८ : संतोष दास्ताने/ राजेंद्र व्होरा

*बदलत्या महाराष्ट्राचा सर्वांगीण मागोवा*

आज क्षणाक्षणाला जग बदलते आहे. नवे शोध लागत आहेत. नवी माहिती उपलब्ध होत आहे, नव्या घटना घडत आहेत, देशादेशांतील सत्ताधीश बदलत आहेत आणि वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ, मासिके, जाहिराती, पुस्तके, पत्रके, चित्रपट, व्हिडीओ वगैरे साधनांद्वारे या माहितीचा, ज्ञानाचा आपल्यावर चौफेर मारा चालू आहे.

## माहितीची आवश्यकता

पदोपदी माहिती लागते, आणि अद्ययावत माहितीविना आपले काम भागत नाही. कुठलेही सरकारी कार्यालय असो, खासगी व्यापारी व्यवसाय असो, शाळा-कॉलेजांतील अभ्यासवर्ग असो, नगरपालिकांचे प्रशासन असो की स्पर्धात्मक परीक्षा असोत, ज्ञान, तपशील, अद्ययावत माहिती यांची क्षणोक्षणी गरज असते, त्यावाचून नडते, रेल्वेचे टाइमटेबल माहीत नसले तरी सारा दिवस वाया जातो, रस्त्यांची माहिती देणारे अद्ययावत नकाशे नसले तर अनोळखी भूभागात प्रवास करणे म्हणजे महागड्या पेट्रोलची उधळपट्टी ठरते. फोनची डिरेक्टरी हाताशी नसली तर प्रचंड महानगरात आपली अवस्था जंगलात चुकलेल्या अजाण मुलासारखी होते, जागतिक तेजीमंदीतील फरकांचा मागोवा सारखा दक्षतापूर्वक घेण्यात कसूर झाली तर क्षणात दिवाळे वाजू शकते. विमानं अपघातात कोणी राष्ट्रनेता गेला, पुढचे सारे त्या देशाचे राजकारण-अर्थकारण वेगळे वळण घेऊ शकते. . . जितके ज्ञान जास्त वाढत आहे तितके आपले जीवन अधिक असुरक्षित, अधिक बेभरवशाचे होत आहे.

## अद्ययावत माहिती

अशा वेळी आपल्या हाती अचूक माहिती, अचूक आकडेवारी देणारी साधने असणे आवश्यक ठरले आहे. महाराष्ट्रापुरता विचार केला तर महाराष्ट्रातील प्रशासकीय यंत्रणा,

शिक्षण, शेती, सहकारी चळवळ, उद्योगधंदे, विभागीय विकास मंडळे, महामार्ग, वैद्यकीय सोयी, औद्योगिक सोयी सवलती, बँका, वृत्तपत्रे, महत्त्वाच्या व्यक्ती, सांस्कृतिक घटना, पर्यटनविषयक सोयी, अशा कितीतरी बाबी आढळतात की, त्यामध्ये दरवर्षी काही ना काही बदल होत असतो, नवी भर पडत असते आणि आपण ज्या कुठल्या व्यवसाय क्षेत्रात असू त्या क्षेत्रात घडणाऱ्या नव्या घटनांची, होणाऱ्या बदलांची दखल घेण्यावाचून आपल्याला गत्यंतरच नसते. शर्यतीत राह्यचे तर पळावेच लागते. परिस्थितीचे भान ठेवावेच लागते.

## उपयुक्त सर्वांगीण वार्षिक

'महाराष्ट्र' नावाचे वार्षिक हे अशा संदर्भांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले आहे. १९८२ पासून पुण्याच्या दास्ताने रामचंद्र आणि कंपनीच्या वतीने ते दरवर्षी प्रसिद्ध केले जात आहे. साधारणतः मार्च अखेरपर्यंतची माहिती आणि आकडेवारी देणारे हे वार्षिक ऑगस्ट अखेर प्रसिद्ध होते. भारतीय भाषांमध्ये फार थोड्या राज्यात अशी वार्षिके प्रसिद्ध होतात. त्यामुळे मराठीत अशा प्रकारचे वार्षिक निघते ही एक अभिमानाची बाब आहे.

वस्तुतः अशा प्रकारची माहिती देणारी वार्षिक प्रकाशने ही महाराष्ट्र शासनाने प्रसृत करायला हवीत, परंतु माहिती संकलित रूपात प्रसिद्ध करण्याबाबत सर्वसमावेशक अशी कुठलीही यंत्रणा आज शासनाकडे नाही. फक्त लोकराज्य व विविध खात्यांतर्फे निघणारी प्रकाशने एवढेच सध्यातरी मर्यादित स्वरूप आहे. साहजिकच दास्ताने रामचंद्र आणि कंपनी या खासगी प्रकाशन संस्थेने हा उपक्रम हाती घेऊन, दरवर्षी त्याला अधिकाधिक पूर्णता आणण्याचा प्रयत्न चालविला आहे, त्याचे मोल मोठे आहे.

## खपात सतत वाढ

अशा वार्षिकाची उपयुक्तता व गरज सर्वांनाच जाणवते, हे या वार्षिकाचे खपाचे सतत वाढणारे आकडे ध्यानात घेतल्यावर स्पष्ट होते. १९८२ मध्ये दोन हजार प्रतींची आवृत्ती होती, ती दरवर्षी हजार-दोन हजारांनी वाढतच आहे आणि त्यातही विशेष लक्षणीय गोष्ट अशी की सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात 'महाराष्ट्र'ची नवी आवृत्ती बाहेर पडली की, पंधरा दिवसांत तिच्या ९० टक्के प्रती खपलेल्या असतात. महिन्यानंतर हे वार्षिक मागायला गेले तर विकत मिळेलच अशी खात्री नसते. हा खप होतो त्यात वैयक्तिक ग्राहकांची संख्या मोठी असते, बँका, सरकारी खाती, साखर कारखाने वगैरे या पुस्तकाच्या प्रती आपल्या संदर्भग्रंथालयांसाठी डझनवारी घेतातही, परंतु या पुस्तकाचा अधिकांश खप वैयक्तिक ग्राहकाच्या पातळीवर, काउंटर सेल म्हणून होतो असा दास्ताने यांचा अनुभव आहे. ललित वाङ्मयाची विक्री करणाऱ्या महाराष्ट्रातील मोठ्या पुस्तक विक्रेत्यांपेक्षा, ज्या विक्रेत्यांकडे शाळा-कॉलेजच्या पुस्तकांची विक्री जास्त असते त्यांच्याकडे हे पुस्तक अधिक खपते. ग्रंथ विक्रीच्या दृष्टीने हे एक उद्‌बोधक निरीक्षण मुद्दाम नोंदवण्याजोगे मला वाटते. एस.टीच्या

न्यूज स्टॉलवरही या वार्षिकचा चांगला उठाव होतो आणि त्यांच्याकडून विक्रीची रक्कमही वक्तशीर मिळते. ज्या मालाला गिऱ्हाइक असते तो माल विकायला ठेवण्याबाबत हे विक्रेते जागरूक असतात. न खपणारा माल कोणाच्या गळ्यात मारला तर पैसे येत नाहीत हा अनुभव नित्याचाच आहे. 'महाराष्ट्र' वार्षिक हे खपाऊ प्रकारात मोडते हे या विक्रेत्यांकडून मिळणाऱ्या उत्साहवर्धक प्रतिसादावरूनही स्पष्ट होते. 'या पुस्तकाने गोडाऊन कधी बघितलेच नाही' असे प्रकाशक दास्ताने म्हणाले. छापून झालेले पुस्तक बाइंडरकडून आले की ऑफिसमधून सरळ विक्रेत्यांकडे जाते आणि पंधरा दिवसांच्या आत बहुतांश खपूनही जाते.

## माहितीत दरवर्षी नवी भर

या वार्षिकाच्या माहितीत दरवर्षी नवी भर पडते. त्या दृष्टीने वर्षभर माहितीची जमवाजमव चालू असते. शिक्षण, शेती, पाटबंधारे, सहकार, उद्योगधंदे, वीजनिर्मिती, वाहतूक, दळणवळण व संपर्कव्यवस्था, आरोग्यव्यवस्था, रोजगार हमी योजना, पतपुरवठा, शासनयंत्रणा (स्थानिक स्वराज्य संस्था, आमदार-खासदार-मंत्रिमंडळ इ.), विकासाचे विशेष कार्यक्रम, पर्यटन अशा प्रकरणांद्वारे अद्ययावत माहिती व आकडेवारी प्रत्येक वार्षिकात दिली जाते. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील जिल्ह्यांची माहिती एका तक्त्यात आटोपशीरपणे बसवण्यात आली आहे. त्या त्या वर्षातील राजकीय, सामाजिक, वाङ्मयीन, नाट्य-चित्रपट-क्रीडाक्षेत्रातील घटनांचा जाणकार व्यक्तींनी घेतलेला आढावा हे या वार्षिकाचे आणखी एक वैशिष्ट्य होय. शिवाय महाराष्ट्राचे काही नकाशे आणि प्रकरणांतून गरजेप्रमाणे तक्ते किंवा आलेख याद्वारे ही माहिती दर्शनीय बनवण्याचा प्रयत्न केला जातो. त्या वर्षातील घटनांची सूचीही तारखेनुसार देण्यात येते. साहजिकच विद्यार्थी-अध्यापक, स्पर्धापरीक्षांना बसणारे उमेदवार, उद्योजक, विक्री प्रतिनिधी, सरकारी व निमसरकारी कार्यालये, वृत्तपत्रे व संदर्भ ग्रंथालये वगैरेंना हा अद्ययावत आकडेवारीचा खजिना उपयुक्त ठरतो.

## माहितीची जमवाजमव

"या पुस्तकासाठी लागणारी अद्ययावत माहिती तुम्ही कशी मिळवता?" असे संपादकांना विचारले असता, ते म्हणालेः विधिमंडळात सादर करण्यात येणारा अर्थसंकल्प, खातेनिहाय निघणारी नियतकालिके व परिपत्रके, लोकराज्याचे अंक, वृत्तपत्रे वगैरे द्वारे ही माहिती सतत येत असते. आम्ही त्याचे वर्गीकरण करून फाईल्स तयार करीत राहतो. वर्षाअखेरीस त्या माहितीचा अंतर्भाव होईल अशा रीतीने त्या त्या प्रकरणाची सिद्धता करतो. सरकारी वा अन्य खात्यांशी व संस्थांशी पत्रव्यवहार करूनही अनेकदा माहिती मिळवावी लागते. ती केवळ पत्राने मिळते असे नाही, तेव्हा समक्ष फेऱ्या मारूनही मिळवावी

लागते. अनेकदा सरकारी ऑफिसमध्येही अद्ययावत माहिती मिळत नाही. एका खात्याच्या अद्ययावत आकडेवारीचा दुसऱ्या खात्याला पत्ताच नसतो." या संदर्भात एक गमतीचे उदाहरण त्यांनी दिले. डायरेक्टर ऑफ एज्युकेशनच्या पुणे कार्यालयात जाऊन काही माहिती मी विचारली, तर त्यांनी आम्ही गतवर्षीच्या 'महाराष्ट्र'मध्ये छापलेली माहितीच आमच्यापुढे ठेवली. त्यापुढची आकडेवारी नव्या वार्षिकात आलेली होती. ती त्यांना दाखवली, तेव्हा ते आश्चर्यचकित झाले. ही माहिती तुम्हाला कुठून मिळाली म्हणून विचारू लागले. मी म्हटले, ते आमचे ट्रेड सिक्रेट आहे.' खरे म्हणजे त्याच इमारतीतल्या त्याच खात्याच्या दुसऱ्या कार्यालयातून ती माहिती मला मिळाली होती. परंतु सरकारी खात्यांमध्ये परस्परसंपर्क एवढा कमी असतो की, शेजारच्या टेबलावरचा कर्मचारी काय करतोय हे देखील कुणाला माहीत नसते. त्यामुळे अधिकृत माहिती मिळवण्यासाठी अनेकदा खूप परिश्रम घ्यावे लागतात. बॅ. अंतुले मुख्यमंत्री असताना विदर्भातील तहसीलची पुनर्रचना करून त्यांचे तालुके बनवण्यात आले. मुंबईला मंत्रालयात खेटे घालूनही त्या पुनर्रचित तालुक्यांची यादी मिळेना, शेवटी नागपूरला जाऊन तेथील विभागीय आयुक्तांकडून ती यादी मिळवावी लागली. त्यासाठी तीन महिने खटपट करावी लागली. असाही एक अनुभव श्री. दास्ताने यांनी सांगितला.

## चुका कळवणारे ग्राहक

महाराष्ट्र वार्षिकाचे वाचक-ग्राहक अत्यंत जागरूक असतात, याची प्रचीती वरचेवर येते. जिल्हावार माहितीच्या तक्त्यात प्रमुख पिकांमध्ये पहिल्यावर्षी कोरेगाव तालुक्यात 'घेवडा' हे नाव आलेले नव्हते. शांतिलाल भंडारी यांनी कळवले की येथील घेवडा देशभर जातो आणि तेच तुम्ही वगळले हे कसे ? एकदा जिल्हा आमदारांची यादी छापताना एका जिल्ह्यातील तीन आमदारांची नावे चुकून छापायचे राहून गेले. लगेच त्या भागातील वाचकांची पत्रे आली. माहितीतील त्रुटी वा चुका दाखवून देणारी पत्रे येतात, तशीच अमुक विषयावरील माहितीही द्यावी अशा सूचना करणारी पत्रेही येतात, असाही खुलासा प्रकाशक विश्वास दास्ताने यांनी केला.

## दर्शक आकडेवारी

दरवर्षी होणाऱ्या प्रगतीची व फेरबदलाची कल्पनाही आज करवत नाही, इतकी आज आपली गती जोरदार आहे. १९८३ व १९८६ चे काही बाबींचे तुलनात्मक आकडे घेतले तरी हे स्पष्ट होते. १९८३-८४ मध्ये महाराष्ट्रात व्यापारी बँकांच्या ४३२१ शाखा होत्या. एकूण ठेवी १०९८० कोटी रुपयांच्या व कर्जे १०५६४ कोटी रुपयांची होती. १९८५-१९८६ या वर्षात हेच आकडे अनुक्रमे ४९१३ शाखा, १७१७७ कोटी व १४४८३ कोटी असे होते. दोन वर्षांत लोकांच्या हाती ३५०० कोटी रुपये कर्जरूपाने जादा दिले गेले.

सहकारी पतसंस्थांच्या खेळत्या भांडवलात या दोन वर्षांत २५३६ कोटीवरून ३५५० कोटी एवढी वाढ झाली. आणि त्यांनी दिलेल्या कर्जाची रक्कम ४७०० कोटीवरून ६३०० कोटीवर गेली.

१९८१-८२ मध्ये एकूण उद्योगधंद्यात स्थिर भांडवल ५८१६ कोटी रुपये होते आणि उत्पादन १६९७० कोटी रुपयांचे होते. १९८४-८५ मध्ये आकडे ८५०८ कोटी रुपये व २२११४ कोटी रुपये असे होते. तीन वर्षात सुमारे दीडपट वाढ झाली.

१९८३-८४ मध्ये ५२९०० प्राथमिक शाळा व ९० लाख विद्यार्थी होते. ८६/८७ मध्ये ५५ हजार शाळा व ९६ लाख विद्यार्थी अशी वाढ झाली. माध्यमिक शाळा ७००० वरून ८२०० झाल्या. विद्यार्थी संख्या ३९ लाखावरून ४८ लाखापर्यंत गेली. उच्चशिक्षण संस्था ८३० वरून ९९० झाल्या. विद्यार्थी संख्या ७ लाखावरून ९ लाखावर गेली.

औद्योगिक वसाहतींची संख्या ८४-८६ च्या दोन वर्षात ६५ वरून ७३ वर गेली. त्यातील गाळ्यांची संख्या २४१७ वरून ३१२३ झाली. आणि कारखान्यांच्या संख्येत ६६५० वरून ८७४८ एवढी वाढ झाली. ८३ मध्ये ४०४ संप-टाळेबंद्यांमध्ये २ लाख २२ हजार कामगारांनी २ कोटी ८० लाख श्रमदिवस वाया घालवले. ८६ मध्ये संप-टाळेबंद्यात १० लाख कामगारांचे ५३ लाख श्रमदिवस वाया गेले.

शाळा-विद्यार्थी, साक्षरवर्ग वाढत असूनही वाचनालयांची संख्या मात्र जवळजवळ कायम आहे आणि त्यावर सरकार १ कोटी रुपयेच काय ते खर्च करीत आहे. त्यात काहीही वाढ नाही.

महाराष्ट्राच्या विकासाची अशी तुलनात्मक आकडेवारी खूप बोलकी ठरू शकेल. आणि अभ्यासकांच्या विचारांना खाद्य पुरवू शकेल. वर्षानुवर्षे सातत्याने एखादी विशिष्ट कल्पना राबवणे आणि दरवर्षी अद्ययावत माहिती व आकडेवारी उपलब्ध करून देणे हे कार्य एखाद्या व्रतासारखेच आहे. विश्वास दास्ताने व संतोष दास्ताने या बंधूंनी ते निष्ठेने चालविले आहे.

(महाराष्ट्र ८८. संपादक- संतोष दास्ताने, राजेंद्र व्होरा, दास्ताने रामचंद्र आणि कं, सदाशिव पेठ, पुणे ३०, किंमत ३० रुपये.)

□

# स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत : ग. प्र. प्रधान

## *आपल्या इतिहासातील एक रोमहर्षक संघर्ष पर्व*

गेल्या चोवीस तासांत घडलेल्या घटनांची आपणाला उत्तम माहिती असते, परंतु गेल्या साठ शतकातील घटनांच्या माहितीचा विषय निघाला, तर आपण अर्धवटच असतो, असे मानवजातीचा भव्य साधार इतिहास लिहिणारा वुईल ड्युरांट म्हणे. गेल्या साठ शतकांचा इतिहास त्याने अनेक खंडात साठ वर्षे रात्रंदिवस परिश्रम घेऊन लिहिला, परंतु साठ शतकांचे जाऊ द्या; आपणा भारतीयांपुरता विचार केला, तर १८५७ नंतर ब्रिटिशांविरुद्ध जो संघर्ष करून आपण १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळवले, त्याचा इतिहास तरी आपल्याला कुठे माहीत असतो ? त्या स्वातंत्र्यासाठी जो अमाप त्याग आणि बलिदान करावे लागले, त्याची वेदना आज आपल्याला कुठे जाणवते ? ती वेदना जाणवली असती, तर भारतीय जनतेत आज जे फाटाफुटीचे आणि दहशतवादाचे, प्रादेशिक आणि धार्मिक असहिष्णुतेचे वातावरण दिसते, ते दिसले असते का ? इतिहास ज्यांना नीट माहीत नसतो, ते मागच्या चुकाच पुनःपुन्हा करत राहतात आणि आपला खड्डा आपणच खणत राहतात. ज्या फुटीरतेने देशाचे स्वातंत्र्य लयाला गेले, त्याच फुटीरतेची बीजे एरव्ही अशा झपाट्याने येथे पुन्हा फोफावलेली दिसली असती का ? फोडा आणि झोडा नीतीने इंग्रजांनी भारतीयांवर अधिराज्य प्रस्थापित केले आणि आता अमुक धर्म विरुद्ध तमुक धर्म, अमुक भाषा विरुद्ध तमुक भाषा, अमुक वंश विरुद्ध तमुक राजवट असे नवे फोडा-झोडाचे राजकारण भारतात ज्या कुठल्या बाह्य प्रेरणेने फोफावत आहे त्याचा धोका ज्यांना या स्वातंत्र्यसंग्रामासाठी मोजलेली किंमत माहीत आहे, त्यांना तरी कसा विसरता येईल ? इतिहासाची पुनरावृत्ती होते, असे म्हणतात; आणि हेच इतिहासाचे चुकते, असे क्लॅरेन्स डॅरो मानतो. ज्या घटना पुन्हा कधी घडत नाहीत, त्यांचे शास्त्र म्हणजे इतिहास असे पॉल व्हॅलेरी म्हणतो. इतिहासाची पुनरावृत्ती होते आणि इतिहासाची पुनरावृत्ती होत नाही या दोन्ही मतात तथ्यांश आहेच. कुठल्याही घटनेला कारणीभूत ठरलेले असंख्य गुंतागुंतीचे घटक हे आपल्याला कधीच पूर्णतः कळत नाहीत; त्यामुळे त्यांच्या आधारावर पुढच्या घटनांचे भाकित करणे हे धोक्याचे

असते, असेही जी. एम. ट्रेवेलिन हा इतिहासकार सांगतो. इतिहासाच्या अभ्यासाने शहाणपण येतेच असे नाही .आणि शहाणी माणसेच इतिहास घडवतात, असे तरी कुठे दिसते? चंगीझखान, तुघलक, नीरो, इदी अमीन, हिटलर आणि स्टॅलिन यांच्या बेबंद हिंसाचारापुढे आपले शहाणपणच लुळेपांगळे ठरत असते.

## देखणे मुखपृष्ठ

सन १९८५ मध्ये काँग्रेस पक्षाच्या स्थापनेला शंभर वर्षे झाली. त्यानिमित्ताने दिल्ली प्रशासनाने एक ग्रंथस्पर्धा आयोजित केलेली होती. कुमारांसाठी भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास लिहिण्यासाठी ही स्पर्धा होती. प्रा. ग. प्र. प्रधान यांनी या स्पर्धेच्या निमित्ताने इंग्लिशमध्ये १८५७ ते १९४७ अखेरचा इतिहास लिहिला. त्या स्पर्धेत त्यांना दहा हजार रुपयांचे खास बक्षीसही मिळाले(मागे टिळक चरित्र लिहूनही त्यांनी असेच बक्षीस मिळविले होते.) परंतु मराठीतही भारतीय स्वातंत्र्यसमराचा इतिहास लिहावा, असे त्यांना मनःपूर्वक वाटत होते. म्हणून इंग्रजी पुस्तकाचे भाषांतर न करता मराठीत अधिक विस्तृत असा हा इतिहास त्यांनी लिहिला. साडेचारशे पृष्ठांच्या या पुस्तकाचे 'स्वातंत्र्यसंग्रमाचे महाभारत' असे आकर्षक पण समर्पक नामकरण करण्यात आले आहे आणि या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील बेड्यांच्या साखळीने या स्वातंत्र्यसंग्रामाचे अत्यंत सार्थ असे प्रतीकही उभे केले आहे. सुभाष अवचट यांचे हे मुखपृष्ठ दीर्घकाळ स्मरणात राहील. त्यांच्या उत्तम मुखपृष्ठांमध्ये हे अग्रभागी शोभेल इतके देखणे व आशयघन आहे.

महाभारत म्हटले की १८ अध्याय असे समीकरण न कळत आपल्या मनात घोटाळू लागते. प्रा. प्रधान यांनी चौदा प्रकरणे व हैदराबाद आणि गोवा मुक्तिसंग्राम अशा सोळा प्रकरणात आपला ग्रंथ बसवला आहे. सुनीतात जशा चौदा ओळी तसे महाभारतात अठरा अध्याय किंवा गीतेचे अठरा अध्याय यांना एक वेगळे अंगभूत महत्त्व आहे आणि ते येथेही साधता आले असते.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास हा महाकाव्याचा विषय आहे आणि तो लिहायला असामान्य प्रतिभेचा कवी हवा वा व्यासंगी इतिहासकार हवा. या दोन्ही बाबतीत आपला अधिकार नाही, असे प्रा. प्रधान मनोगतात म्हणतात. त्यात अर्थात काहीसा विनयाचा भाग आहेच, परंतु कादंबरीसारखे वाचनीय आणि माहितीच्या दृष्टीने खूपच साधार व सर्वांगीण असे हे लेखन झालेले आहे. 'साता उत्तराची कहाणी'मध्ये भारताच्या निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या वाटचालीचा जो वेधक आढावा आला आहे, त्यातून त्यांच्यातील सर्वसाक्षी व समंजस निरीक्षकाचे, अनाग्रही जागरूक पण ध्येयवादी प्रांजळपणाचेही दर्शन जसे घडते, तसेच स्वातंत्र्यसंग्रामाचा हा धावता आलेख काढतानाही त्यांच्या व्यापक मूल्यविवेकाचे प्रत्यंतर येते. प्रा. प्रधान हे समाजवादी विचारसरणीने भारलेले, समाजवादी पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते व नेते, प्रकृतीनेही मृदू व मवाळ. समाजवादी मंडळींना

हिंदुत्ववाद किंवा सावरकर यांच्याबद्दल असला तर रागच असणार हे उघड आहे, परंतु प्रधानांनी आपल्या या पुस्तकात स्वातंत्र्यवीर सावकरांच्या लोकोत्तर क्रांतिकार्याची अत्यंत आत्मीयतेने व आदराने दखल घेतलेली आहे, हे विशेष. किंबहुना, सशस्त्र क्रांतीचे प्रयत्न करणाऱ्या सर्वच क्रांतिकारकांचा अत्यंत रेखीव मागोवा ग. प्र. प्रधान यांनी घेतलेला आहे.

## क्रांतिकारकांची परंपरा

सन १८५७ मधील पहिला हुतात्मा मंगल पांडे याच्यापासून, तात्या टोपे, झाशीची राणी, वासुदेव बळवंत फडके, उमाजी नाईक (रामोशी संघटना), झायत अल्ली, मुहम्मद जाफर (वायव्य सरहद्द प्रांतातील वहाबी संघटना), गुरू रामसिंग (कुका पंथीय शीख लोकांची संघटना), चाफेकर बंधू, श्यामजी कृष्ण वर्मा (इंग्लंडमध्ये भारतीयांसाठी इंडिया हाउसची स्थापना व क्रांतिकारक चळवळींचे केंद्र फ्रान्समध्ये सुरू करणे), मॅडम कामा (स्टुडगार्ड येथे सोशॅलिस्ट काँग्रेसच्या प्रतिनिधींसमोर १९०७ मध्ये भारतीय स्वातंत्र्यलढ्याची माहिती देऊन, त्यांचा पाठिंबा मिळविणे व भारताचा राष्ट्रध्वज म्हणून तिरंगी झेंडा फडकविणे), सेनापती बापट (बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेऊन भारतात आगमन), मदनलाल धिंग्रा (कर्झन वायली या पाताळयंत्री अधिकाऱ्याची लंडनमध्ये गोळ्या घालून हत्या), अनंत कान्हेरे (नाशिकला कलेक्टर जॅक्सनची नाट्यगृहात जात असताना हत्या), अरविंद घोष (गनिमीयुद्धाचा पुरस्कार, युगांतर हे जहाल साप्ताहिक, अलिपूर कटाचा खटला), खुदिराम बोस (मुजफ्फरपूरला केनेडी या अधिकाऱ्याच्या गाडीवर बॉम्ब टाकून फाशी स्वीकारली), बारिंद्रकुमार घोष व उल्हासकर दत्त (अलीपूर कटात जन्मठेपेची शिक्षा), तारकनाथ दास, सोहनसिंग भाखना व पांडुरंग खानखोजे, विष्णू हरदयाळ ('गदर' साप्ताहिकाद्वारे भारतीय तरुणांच्या अमेरिकेतील संघटनांचे एकत्रीकरण. गदर पक्षाची स्थापना), विष्णू गणेश पिंगळे, कर्तारसिंग (लाहोर कट खटल्यात फाशीची सजा), जतीन मुखर्जी (शस्त्रे आयात करण्याचा प्रयत्न. बालासोरजवळ क्रांतिकारकांचे केंद्र. पोलिसांच्या गोळीबारात मृत्यू), वीरेंद्र चटोपाध्याय (जर्मनीत तलवार हे पत्र चालवले. जर्मन सोशॅलिस्टांशी संधान बांधले), राजा महेंद्र प्रताप (काबूल येथे १९१५ मध्ये भारताचे हंगामी सरकार स्थापन करून जर्मनी, जपान, रशियाचे भारतीय स्वातंत्र्यासाठी सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न, मात्र आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचा एक भाग म्हणून भारतीय स्वातंत्र्य लढा चालविण्यास स्पष्ट नकार), चंद्रशेखर आझाद (काकोरी स्टेशनवर सरकारी खजिना लुटण्याचा कट), भगतसिंग (हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशनची स्थापना, भारत स्वातंत्र्यानंतर सोशॅलिस्ट रिपब्लिक होईल, अशी स्पष्ट घोषणा, लाहोरचा डी.वाय.एस.पी. सॉंडर्स याची हत्या, सेंट्रल असेंब्लीत बॉम्बफेक), जितेंद्रनाथ दास (लाहोर कटातील आरोपी, तुरुंगात ६३ दिवस उपोषण, त्यानंतर ४ दिवसांनी मृत्यू), श्रीपाद अमृत डांगे प्रभृती कम्युनिस्ट कार्यकर्ते (मीरत कटाचा खटला), सूर्यसेन व तारकेश्वर (चितगाव

शस्त्रागार लूट खटल्यात फाशी), प्रीतिलता वक्कदार (चितगावच्या ऑफिसर क्लबवर हल्ला करून नंतर सायनाईड घेऊन आत्महत्या), वासुदेव बळवंत गोगटे (गव्हर्नर हॉटसनवर गोळी झाडली), धनशेट्टी, सारडा, कुरबान हुसेन, शिंदे (सोलापूरचे हुतात्मे) या आणि इतरही अनेक तळहातावर शिर घेऊन लढणाऱ्या क्रांतिकारकांच्या प्रयत्नांची स्फूर्तिदायक माहिती या पुस्तकात शक्य तितकी विस्तृत पण नेमकी देण्यात आली आहे. यांपैकी अनेक नावांचे आणि त्यांच्या कृतीचे आपल्याला विस्मरण झाले आहे. त्या स्मृतींना या ग्रंथामुळे उजाळा मिळेल.

क्रांतिकारकांच्या सशस्त्र क्रांतीच्या या वेळोवेळच्या उठावांनी जनतेत स्वातंत्र्याची आस ही दृढमूल झाली तसेच जागृतीही घडून आली. जुलमी परकीय सत्तेशी लढण्याची ईर्ष्या निर्माण झाली.

## काँग्रेस पक्ष : जनतेशी समरस

स्वातंत्र्य चळवळीचा दुसरा मोठा घटक म्हणजे काँग्रेस पक्ष आणि त्याने १८८५ पासून सनदशीर आणि जहाल असे अवलंबिलेले मार्ग. दादाभाई नौरोजी यांच्यासारखे नेते, नामदार गोखले, लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, सुरेंद्रनाथ पाल, महात्मा गांधी, ॲनी बेझंट वगैरेंचे वेगवेगळे मार्ग काँग्रेसच्या मुख्य प्रवाहाला येऊन बलवान करीत होते. त्यातही जनतेच्या आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करण्याची क्षमता हळूहळू येत होती आणि जनतेचा सहभाग अधिकाधिक मिळविण्यासाठी कालानुरूप पावले टाकण्यात येत होती. धोरणे त्यादृष्टीने आखण्यात येत होती. सामान्य नागरिक हा या स्वातंत्र्यलढ्याच्या केंद्रस्थानी होता, असा एक सिद्धांत प्रा. प्रधान मांडतात, तो ढोबळमानाने खराही आहे, परंतु राज्यकारभारात अधिक सहभाग हवा येथून आरंभ करून होम रूल, वसाहतीचे स्वराज्य, संपूर्ण स्वराज्य, लोकशाही समाजवादी राज्य या सर्व टप्प्यांतले मानसिक अंतरही काळाच्या अंतराप्रमाणे काही कमी नव्हते आणि काँग्रेसमध्ये व भारतीय नेत्यांमध्ये वैचारिक व राजकीय ताकद क्रमाक्रमाने कशी येत गेली, याचाही मागोवा घेणे या पुस्तकामुळे सोपे जाते.

आरंभापासूनच काँग्रेस ही संस्था शेतकरी व सामान्य जनता यांना जवळ घेऊन एक व्यापक व्यासपीठ निर्माण करू पाहत होती, याची सम्यक् कल्पना येऊ शकेल. असे अनेक तपशील प्रा. प्रधान हे आवर्जून देतात. शीख आणि मुसलमान यांनी या स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वतःचे काही अंशी वेगळे अभिमत व स्थान ठेवलेले होते, याकडेही प्रधानांचे बारीक लक्ष आहे. १८९५ च्या काँग्रेस अधिवेशनाच्या प्रसंगी कृष्णराज कार्लेकर यांनी सभामंडपच्या दारासमोर शेतकऱ्याचा पुतळा उभारून त्याच्या हातातील फलकावर लिहिलेले होते : '१९ कोटी शेतकऱ्यांच्या दुःखांना वाचा फोडण्यासाठी येथे १९ व्यक्ती तरी आहेत का ?' स्त्रियांनीही आपल्या प्रश्नांसाठी काँग्रेसच्या व्यासपीठाचा उपयोग केला.

टिळक आणि महात्मा गांधी यांनी काँग्रेसला लोकाभिमुख केले. असहकार, बहिष्कार, सत्याग्रह वगैरे नव्या साधनांनी जनतेत निर्भयता व अस्मिता निर्माण केली. काँग्रेसचे नेतृत्व आरंभापासून शीख, मुसलमान, अस्पृश्य आदींना जवळ घेऊन, चुचकारून आपल्यात व त्यांच्यात अंतर पडू नये यासाठी प्रयत्नशील होते, याचीही खात्री पटते आणि इंग्रजांचे प्रयत्न मात्र फोडा व झोडा नीतीवर आधारित होते. त्या त्या वर्गातील जहाल वृत्तीच्या विशिष्ट व्यक्तींवर प्रभाव पडत होता, याचीही कल्पना येते.

## समाजवादी विचारांचा प्रभाव

आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण यांच्या पुढाकाराने १९३४ मध्ये काँग्रेस सोशालिस्ट पार्टीची दीडशे प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्थापना झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाद्वारे हिंदू तरुणांची तर अलामा मश्रिकींच्या पुढाकाराने जहाल मुस्लिमांची खाकसार संघटना उभी राहिली. कम्युनिस्टांनीही कामगार संघटनाक्षेत्रात पाय रोवले.

भारतीय राजकारण्यांमधील वेगवेगळे मतप्रवाह प्रखरपणे उघडे पाडण्यास दुसऱ्या महायुद्धाने मदत केली, कम्युनिस्ट पक्ष, रॉयवादी गट, गांधी-नेहरूंची चलेजाव घोषणा, सुभाषचंद्र बोस यांची इंग्लंडविरोधी राष्ट्रांच्या सहकार्याने भारतीय स्वातंत्र्याचा लढा देणारी व्यूहरचना, समाजवादी तरुणांचे भूमिगत कार्य– दशदिशांनी स्वातंत्र्याच्या अंतिम टप्प्याकडील वाटचाल चालू झालेली होती. प्रधानांनी बेचाळीसच्या आंदोलनाचे उत्तम चित्र रेखाटले आहे आणि सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेचीही स्फूर्तिदायक कहाणी शाहिराच्या तडफेने सांगितली आहे. संस्थानांचे विलीनीकरण, हैदराबाद व गोवा मुक्तिसंग्राम यांचीही जोड देऊन भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे भरतवाक्य लिहिताना मोठ्या तळमळीने लिहिले आहे: 'आणि दारिद्र्य व विषमता याविरुद्धच्या नव्या संग्रामाची सुरुवात झाली.'

## अनेक लक्षणीय निरीक्षणे

प्रा. प्रधान यांनी गेल्या काही वर्षांत उपलब्ध झालेल्या कागदपत्रांचा, संशोधन पुराव्याचा आणि पुस्तकांचा साकल्याने अभ्यास करून, अनेक तपशील प्रथमतःच या पुस्तकात दिलेले आहेत. भारतात स्वातंत्र्यानंतर समाजवादी प्रजासत्ताक राज्यपद्धती राहील अशी संकल्पना ही भगतसिंगप्रणित हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनने प्रथम मांडली असाही निर्देश प्रा. प्रधान करतात. पहिल्या पिढीतले क्रांतिकारक ध्येयवादी व धर्मश्रद्ध होते, तर दुसऱ्या पिढीतले क्रांतिकारक हटवादी व समाजवादी होते अशासारखी निरीक्षणेही धारदार वाटतात.

## प्रमुख प्रवाहांची सम्यक् कल्पना

मराठीत यापूर्वी लिहिल्या गेलेल्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासाच्या पुस्तकांपेक्षा

हे अधिक साक्षेपी आणि सर्वांगीण आहे असे म्हणता येईल. पृष्ठांच्या मर्यादेमुळे अनेक घटना वा तपशील अगदी पुसटपणे देणे क्रमप्राप्त ठरले असले तरी बहुतांशी कालानुक्रमे केलेले निरूपण मनाचा ठाव घेण्यात यशस्वी होते. सध्याच्या संकुचित स्वार्थाच्या, विघटनवादी प्रवृत्तीच्या, भेदभावांच्या असहिष्णू गदारोळाच्या काळात भारताच्या मूलभूत एकात्मतेचा संस्कार करणाऱ्या अशा पुस्तकांची मोठीच गरज आहे.

(स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत : लेखक : प्रा. ग.प्र. प्रधान, साधना प्रकाशन, ४३० शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०. पृष्ठे : ४५६ + १६ + १२. किंमत : पंचाहत्तर रुपये.)

□

# लक्षवेधक पुस्तके : १९८८

## *काही पुस्तकांवर धावता दृष्टिक्षेप*

सन १९८८ मधील उत्कृष्ट मराठी पुस्तके कोणती असा प्रश्न मी स्वतःला वर्षाच्या सुरुवातीपासून विचारत होतो आणि त्याचे उत्तर वर्षभर शोधत होतो. प्रसिद्ध होणारी बहुतेक पुस्तके नजरेखालून घालत होतो. त्यांची सूची करीत होतो. वेळोवेळी त्यांपैकी काही पुस्तकांवर लिहीतही होतो. पाच-सहाशे पुस्तकांतून वाचनासाठी निवड करावीच लागते. बरे-वाईट ठरवावे लागते.

मराठीतील १९८८ मधील बेस्ट बुक्स (उत्कृष्ट पुस्तके) अशी यादी करताना मात्र बेस्ट-उत्कृष्ट ही विशेषणे जरा खटकायला लागतात. म्हणून ८८ मधील महत्त्वाची पुस्तके असा उल्लेख करावा काय असा प्रश्न पडला, परंतु 'महत्त्वाची' शब्दाचाही उपयोग महत्त्वाचे महत्त्व कमी करणारा ठरेल असे वाटू लागले. म्हणून '८८ मधील लक्षवेधक पुस्तके' यावर तडजोड करतो. ८८ मधील लक्षवेधक पुस्तकांची यादी पुढे देतो : वानगीदाखल काहींवर थोडीफार शेरेबाजी. खरे म्हणजे या सर्वच लक्षवेधक पुस्तकांवर लिहिता येईल, परंतु जागेअभावी मोजकीच पुस्तके निवडणे क्रमप्राप्त म्हणून हा शॉर्टकट.

### तुंबाडचे खोत

मराठीतील ही प्रचंड कादंबरी. रथचक्रकार श्री. ना. पेंडसे यांनी लिहिलेली. ज्या महत्त्वाकांक्षेने पेंडसे यांनी हा प्रकल्प हाती घेऊन पंचवीस वर्षांच्या चिंतनानंतर लिहिला; त्याचा प्रभाव वाचकाच्या मनावर उमटवण्यात ही कादंबरी अपयशी ठरते. कोकणातली दोन गावे, चार-सहा पिढ्या, तेथील समाजजीवन, हिंदू-मुस्लीम संबंध, राजकीय स्थित्यंतरे, भावाभावातील संघर्ष, या सर्वांपेक्षा तेथील लैंगिक व्यवहारातच पेंडसे यांना अधिक रस वाटतो आहे असे आढळते आणि एवढा प्रचंड विस्तार करूनही तसे भव्य जीवनदर्शन घडवण्यात त्यांना यश येत नाही. या कादंबरीने पेंडसे यांना अनेक सन्मान मिळवून दिले त्याबद्दल आनंद वाटतो, परंतु ही कादंबरी भारतीय व जागतिक वाङ्मयातही श्रेष्ठ ठरावी

अशा तोलामोलाची उतरली असती तर खरोखर धन्यता वाटली असती. पेंडशांची ती ताकद होती, परंतु त्यांची झेप कमी पडली. पाल्हाळ, पुनरुक्ती, काळाचे अनुसंधान सुटणे, काही व्यक्तिरेखांमधील नात्यांचे संदिग्धपण यांमुळे पेंडसे यांची विषयावरील पकड शिथिल झाल्याचे जाणवते. तरीही ही कादंबरी प्रत्येक मराठी वाचकाने वाचावी अशी शिफारस मी करीन. इतकी मजल तरी इतर कुणी कुठे मारली आहे ?

## प्रस्थान

ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या 'प्रस्थान'मधील प्रस्थान, विनाशकाल, भिंती, पादुका अशा या वाचनीय कथा गुणवत्तेच्या दृष्टीने लक्षणीय आहेत. तुकारामाच्या जीवनावर एक लेखक नाटक लिहिण्याचे ठरवतो आणि त्याच्यासारखा निःसंग होऊ पाहतो. सर्व नातीही त्यादृष्टीने तपासू लागतो. कलानिर्मितीचा सात्त्विक सोस भयानक आत्मक्लेशदायी कसा असतो याचा जो आलेख नाडकर्णी उभा करतात तो सैरभैर करतो आणि शेवटी या सर्व आत्मक्लेशकारक प्रयत्नामागचे निरर्थकपण सूचित करून नाडकर्णी जीएंच्या वळणावरची सम घेतात तेव्हा तर वाचक होरपळून निघतो. 'भिंती'मधील रावजी व त्याची दुसरी पत्नी यांच्यातील गुंतागुंतीच्या नात्यातले वासना व व्यवहार या टोकातले ताणतणाव संसारचक्राचे वेगळेच भान देतात 'माध्यम्'मध्येही मानवी व्यवहाराला कामवासनेने कसे चौफेर घेरलेले असते याचे दाहक दर्शन वासू दणाईतच्या संज्ञाप्रवाहातून आपल्याला घडते. आधुनिक शहरी जीवनातील उच्चभ्रू ताणतणाव हे नाडकर्णींच्या कथेचे विषय बनतात तसेच पारलौकिक-अतींद्रिय जग, अंतर्मनाचे व्यापार यांचेही गूढ त्यांना खुणावत असते.

## तो राजहंस एक

तो राजहंस एक या बालगंधर्वांच्या चरित्रग्रंथावर महाराष्ट्र टाईम्समधून अरुण आठल्ये यांनी झोड उठवली; तर माधव मनोहर, प्रा. हातकणंगलेकर प्रभृतींनी त्याची भलावण केली. वसंत शांताराम देसाई यांच्या बालगंधर्व चरित्राचा आधार त्याला आहे आणि तपशिलाच्या व तारखांच्या अनेक चुका त्यात आहेत असा आठल्ये यांचा आक्षेप तर बालगंधर्व-जोहर यांच्या प्रेमाचे आणि संबंधांचे एक वेगळे मानसशास्त्रीय स्पष्टीकरण हे या चरित्राचे खरे वैशिष्ट्य, असे प्रतिपादन त्याचा पक्ष घेणाऱ्यांनी केले.

## विदेश दर्शन

यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या पत्नीला उद्देशून लिहिलेली पण न पाठविलेली विदेशी प्रवासाची पत्रे यांचे संकलन म्हणजे विदेश दर्शन हे पुस्तक. ते यशवंतरावांच्या मनोव्यापाराच्या मोहक चक्रव्यूहात वाचकाला नेणारे आहे. यशवंतराव हे तसे मोजकेच बोलत; आपल्या अंतरंगात क्वचितच कोणाला प्रवेश देत. दिल्लीला गेल्यावर तर ते फारच

सावधपणे बोलत, परंतु या पत्रात मात्र अगदी मोकळे यशवंतराव दिसतात. रशियाला १९७४ मध्ये जाताना तेहरान ओलांडल्यावर एकुलते एक हिमाच्छादित शिखर पाहिल्यावर त्यांना आश्चर्य वाटले. हवाईसुंदरीला विचारले. तिने पवित्र अरारात शिखर असे सांगून त्याची धार्मिक-ऐतिहासिक माहिती दिली. साहेबांनी मग तिची चौकशी केली तिने आपली आई आर्मेनियन, वडील मंगलोरचे सारस्वत, मुंबईत वास्तव्यामुळे मराठी मातृभाषा असल्याची माहिती दिली. 'एकूण सर्वच गोंधळ' असे ती म्हणाली तर यशवंतराव म्हणाले, "तसं काही नाही. नव्या हिंदुस्थानात असेच होत राहणार." यशवंतरावांचे ग्रंथप्रेम, व्यक्तिस्वभावाचे आकलन करण्याचे तंत्र, विविध प्रश्नांकडे पाहण्याची दृष्टी, भारत व परदेशातील समस्यांवरील भाष्य वगैरे अनेक बाबींवर प्रकाश टाकणारे हे महत्त्वपूर्ण पुस्तक आहे.

## तवा चुल्यावर

पुण्याच्या परिसरातील आठ दलित नवबौद्ध स्त्रियांशी सतत संबंध ठेवून त्यांच्या जीवन कहाण्या ऐकून, त्या सुमित्रा भावे यांनी त्यांच्याच शब्दात लिहून काढल्या. त्याला प्रदीर्घ विश्लेषक प्रस्तावना लिहिली. या स्त्रिया हालअपेष्टा, दारिद्र्य, नवऱ्याचा व्यसनीपणा व जाच सहन करूनही बाणेदारपणे जगतात, स्वतःकडे स्त्री म्हणून कमीपणा घेऊन सोशिकपणाचे तत्त्वज्ञान मांडतात. 'नवऱ्यावाचून आडून ऱ्हायचं न्हाई. आपलं त्वांड गोड असल्यावर काय ?' अशासारखे आपले नवे सहिष्णू समंजस जीवनाचे ठोकताळे बनवतात. व्यावहारिक शहाणेपण दाखवतात. यातील बहुतेक स्त्रियांचा नवऱ्याचा अनुभव हा एक छळवणूक करणारा अरेरावी प्राणी असा आहे आणि शारीरिक गरजांपुरते व समाजाचे काही संकेत म्हणून वैवाहिक बंधन स्वीकृत करणे क्रमप्राप्त असले तरी नवऱ्याबद्दलची घृणाही त्यांच्या आत्मकथनातून प्रकट होते. त्यांच्या जीवनातील मामा, भाऊ, वडील वगैरे पुरुष यांचे अनुभव मात्र सुखद असतात; परंतु हेच पुरुष पतीच्या रोलमध्ये आपापल्या बायकांना हिडीसफिडीस करून तुच्छतेची वागणूक देतात हा विरोधाभास या कथनांतून ठसठशीतपणे प्रकट होतो.

## भाराभर गवत

फास्टर फेणेचे जनक भा. रा. भागवत यांना आज प्रामुख्याने बाललेखक म्हणून ओळखले जाते. त्यांनी प्रौढांसाठीही विनोदी कथा लिहिल्या आहेत, यांकडे सामान्यतः वाचकांचे दुर्लक्षच झाले आहे. त्यांच्या निवडक विनोदी लेखनाचा एक चुरचुरीत संग्रह त्यांच्याच पत्नी सौ. लीलावती भागवत यांनी संपादित केला आहे. शाब्दिक कोट्या, चुटके, विक्षिप्तपणा, विडंबन अशा विविध अंगांनी त्यांचा मिस्किल विनोद खुलत जातो. फास्टर फेणे, जाईची नवल कहाणी, बिपिन बुकवारची चमत्कृतिपूर्ण साहसे, विज्ञानाधिष्ठित कथा

यांना खुसखुशीत विनोदाची फोडणी आहे.

'भागवत म्हणजे भाड्याने गवत वाहणारा तट्टू' अशी स्वतःच्या नावावरही ते मल्लीनाथी करतात. पहिलेवहिले स्त्रीदाक्षिण्य, विमानातून पहिली फेरी, चक्कर संघाची साप्ताहिक सभा, दत्त दडकरचे मंगळसूत्र, धिक् काल यान, जीवननाट्याची ऐशीतैशी, बाईल चोर वगैरे त्यांच्या लेखांमध्ये एक प्रकारचा अल्लड ताजेपणा आहे.

## कात्रजचा घाट

रमेश मंत्री यांनी आर्ट बुकवाल्ड या अमेरिकन विनोदी स्तंभलेखकाच्या धर्तीवर केलेले सद्यःकालीन राजकीय घडामोडींवरील हे चुरचुरीत विडंबनात्मक लेखन वाचकाला गुदगुल्या करणारे आहे. अनेक मंत्री आणि राजकीय नेते यांची नावे घेऊन, त्यांच्यातील काल्पनिक भेटीगाठी-संवाद-किस्से यांनी रमेश मंत्री धमाल उडवून देतात. लोकसत्तेतील हा स्तंभ चांगलाच वाचनीय ठरला होता.

सत्तापिपासूंसाठी खास लोकप्रिय सत्तेची खानावळ, प्रोप्रायटर राजीव गांधी येथे प्रवेश केल्यावर लेखकाला काय दिसते? हॉलमध्ये काही लोक जेवत होते, बाकीचे आशाळभूतपणे उभे. शरद पवार शंकरराव चव्हाणांना 'ताक-भात आणू का' असा आग्रह करतात तर शंकरराव म्हणतात, 'आत्ताच कुठं खायला सुरुवात केलीय्. अजून सत्तेचा मलिदा यायचाय्. विनाअनुदान श्रीखंड, नातेवाईकांची जिलेबी इत्यादी अजून यायचेय्. मग पांढरा भात आणि मठ्ठा.'

मठ्ठा शब्द ऐकताच बाबासाहेब भोसले ओ असे मोठ्याने ओरडतात. तिरपुडे ताटकळून म्हणतात : मी चाललो विदर्भ खानावळीत. सुशीलकुमार शिंदे त्यांना सांगतात-खुशाल जा. विदर्भ खानावळ सुरूच झालेली नाही अन् होणारही नाही. अशा असंख्य गमतीजमती यात आहेत.

## सावरकरांचा बुद्धिवाद

प्रा. शेषराव मोरे (नांदेड) यांचे साडेपाचशे पानांचे हे पुस्तक सावरकर भक्तांनाही अस्वस्थ करील. हिंदुराष्ट्र व हिंदू ध्वज या जुन्या संकल्पना सावरकरांनी स्वीकारल्या, पण त्यात आधुनिक आशय ओतला; त्यातील व्यक्तिगत अभिनिवेश गोळवलकर गुरुजींनाही रुचला नाही. सावरकरांची मुस्लीमेतर अहिंदूबद्दल तक्रार नाही; इतर धर्मियांना त्यांनी हिंदूंपेक्षा दुय्यम लेखले नाही वा त्यांच्याविरुद्ध अन्याय्य भूमिका घेतली नाही; असे प्रा. मोरे यांचे प्रतिपादन आहे. सावरकरांच्या भूमिकेप्रमाणे सध्याचे राज्य हे हिंदूराज्यच आहे. या राज्यात धर्मनिरपेक्षतेचे घटनामान्य धोरण शब्दशः अंमलात आणण्याची खबरदारी घेणे हे हिंदूराज्यवाद्यांचे कर्तव्य आहे; हिंदू राज्यकर्त्यांनी हिंदूंवर अन्याय करू नये म्हणून सामर्थ्य हवे व धर्मनिरपेक्षतेचा आग्रह हवा असाही मोरे यांचा निष्कर्ष आहे. सावरकरांचे नाव न घेता

आपल्या राष्ट्राला आज त्यांचीच भूमिका स्वीकारणे भाग पडले आहे; असाही मोरे यांचा युक्तिवाद आहे. सावरकरांचा बुद्धिवाद व उपयुक्ततावाद, धर्म-ग्रंथ-विज्ञानधर्म-मानवी जीवनाचे स्वरूप-नीतिमूल्ये-अध्यात्म-अंधश्रद्धा यांची छाननीही त्यांनी केली आहे.

सावरकरांमधील विसंगतीचे स्पष्टीकरण करताना 'त्या त्या परिस्थितीप्रमाणे त्यांनी मते मांडली परंतु त्यात सुसंगतीच आहे' असेही ते म्हणतात. राष्ट्रउभारणीचा सर्वांगीण विचार सावरकरांच्या लेखनात झालेला नाही; मात्र रानडे-गोखले यांनी लक्षात न घेतलेले मुद्दे सावरकरांनी मांडले असेही या ग्रंथाचे एक सूत्र आहे.

## अब्राह्मणी साहित्यांचे सौंदर्यशास्त्र

साम्यवादी कार्यकर्ते व विचारवंत शरद पाटील यांनी सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष स्थापन केला, तसेच आदिवासी-दलित ग्रामीण साहित्य एकत्र आणण्यासाठी संमेलने भरविली. या पुस्तकात त्याचा एक जाहीरनामा देण्यात आला आहे. पुस्तकाचे नाव सार्थ करणारे दहापैकी फक्त चार-पाचच लेख यात आहेत, उरलेले मार्क्सवादावरील आहेत. कोसला, हयवदन, सूड, मृच्छकटिक यांच्या परीक्षणांच्या निमित्ताने ब्राह्मणी साहित्याचा एकांगीपणा दाखवून नव्या सौंदर्यशास्त्राची गरज असल्याचे मत मांडले आहे. या सौंदर्यशास्त्राचे स्वरूप काय असावे याचा तपशील ते देत नाहीत, त्यामुळे हे पुस्तक 'बडे घर पोकळ वासा' थाटाचे झाले आहे. कोसला (भारतीय परात्मतेचा परमोत्कर्ष), हयवदन (ब्राह्मणी नेणिवेने परतवलेली प्रतिभाझेप), सूड (आधुनिक जानकीचे रामायण), मराठी साहित्यातील यादवी व संघर्ष हे लेख शरद पाटील यांच्या साक्षेपी व्यासंगाची खणखणीत साक्ष देतात.

दलित साहित्य हे ब्राह्मणी साहित्याशी नाते जोडणारे व नवबौद्ध धर्मांतराचे अपत्य आहे, त्याचा विद्रोह नकारात्मक आहे, स्वतःचे सौंदर्यशास्त्र निर्माण करेपर्यंत ते होकारात्मक होणार नाही असे त्यांचे मत आहे. रा. ग. जाधव हे दलित साहित्याला वर्गसंघर्ष व मार्क्सवाद यापासून अलग ठेवतात अशी तक्रार ते करतात. ग्रामीण साहित्य हे मुख्यतः मध्यमवर्गीयांचे आहे आणि त्याची आशाळभूत नजर ब्राह्मणी साहित्य संस्थांकडे आहे, असा आरोप ते करतात.

## समर्थ साहित्यातील आकृतिबंध

समर्थ रामदासांचे जीवन घडविणारी मूल्ये हीच त्यांच्या काव्याची मूल्ये आहेत, चिंतनाच्या परिपक्वतेतून त्यांचे काव्य वेगवेगळ्या आकृतीबंधांद्वारे प्रकट झाले आहे, मराठी मनाच्या अस्मितेचे स्पंदन पकडणारे व प्रयत्नवादाच्या अनुषंगाने परमार्थ विचार मांडणारे हे लेखन आहे अशा आशयाचे सूत्र उषा जोशींच्या विवेचनात आढळते.

## आणि म्हणूनच

प्रा. चंद्रकांत पाटील यांच्या १६ टीकात्मक लेखांचा संग्रह. समकालीन कविता, देशीयता व कविता, छोटी नियतकालिके यांच्याशी संबंधित या लेखांतून एकसूत्री भूमिका प्रकट होते. साहित्य हे जास्तीत जास्त मानवी होणे व विशिष्ट अनुभवाचे सार्वत्रिक अनुभवात रूपांतर होणे, तीव्र भावनेसोबत विचारकल्प व कल्पनाशक्ती यांचे तसेच भावविभावाचे संतुलन होणे त्यासाठी नवे शब्दबंध, साधर्म्य, रूपक, प्रतिमा, शैली सुचणे असे काही टप्पे पाटील उलगडून दाखवतात. अनुभवाचे अंतरिकीकरण होते तेव्हा संवेदनात्मक ज्ञान व विचाराधिष्ठित ज्ञान यांचे द्वंद्व होते, त्यामुळे एकाच वेळी अनुभवाशी तादात्म्य व ताटस्थ्य शक्य होते असे ते मानतात. अशा विचारांची छाननी करण्यासाठी आपल्या समीक्षक-प्राध्यापकांना वेळ नसतो, त्यामुळे त्याबद्दल आदर दाखवून आपले सौजन्य प्रकट करणे शिष्टसंकेतानुसार योग्य ठरते.

## पु. भा. भावे : साहित्यविचार

डॉ. मंगला आठलेकर यांनी पु. भा. भावे यांच्या अनेक मर्यादा दाखवल्या आहेत. स्त्रीला आदर्श देवता, सात्त्विकतेची मूर्ती मानली, पण तिच्या मनाचा वेध कधीच जाणीवपूर्वक  घेतला नाही. ते रोमॅन्टिक वृत्तीचे, आदर्शवादी होते. मानवी अस्तित्वाच्या मुळाशी ते भिडले नाहीत. त्यामुळे माणसाचे खरे प्रश्न त्यांना कळले नाहीत, नियतीचे कोडे त्यांना उलगडले नाही. भावे यांची सगळी पात्रे आदर्शाच्या ओढीतून निर्माण झाली, ती भाव्यांच्या विशिष्ट मतांचे प्रतिनिधित्व करणारी ठरली. जो थोडाफार वैचारिक संघर्ष त्यांच्या साहित्यात आला त्याचा शेवट काय करायचा हे भाव्यांचे आधीच ठरलेले असल्याने सगळे काही भाव्यांच्या मनाप्रमाणे होत गेले. भावे यांच्या लेखनाला त्यामुळे मर्यादा पडल्या असा मंगलाबाईंचा अभिप्राय आहे.

## बॅरिस्टर : तीन रूपे

सौ. उमा दादेगावकर यांनी जयवंत दळवी यांचे 'बॅरिस्टर' नाटक व त्यांचे कथा व कादंबरी या रुपांतील आधीचे अवतार यांची तुलनात्मक तपासणी या पुस्तकात विचारपूर्वक केली आहे. या तिन्ही साहित्यकृतींची बांधणी सैल आहे. शेवटाबद्दल लेखकाच्या मनात अनिश्चितता आहे. त्यामुळेच एकाच कथासूत्राभोवती दळवींनी लिहिलेल्या तीन वाङ्मयप्रकारातील तीन कृती आशय व घाट या दोन्ही दृष्टींनी स्वतंत्र ठरतात. हे वाङ्मय प्रकारान्तर नसून एकाच कथावस्तूवर आधारलेल्या तीन नवनिर्मितियुक्त कृती आहेत, असा लेखिकेचा निष्कर्ष आहे. त्याला उद्देशून रचनान्तरे हा शब्द त्यांनी वापरला आहे.

दळवींना एकच कथावस्तू तीन प्रकारे वापरण्याचा मोह का झाला असावा? याचे

उत्तर त्या देतात : "वाङ्मयप्रकारान्तर करण्यामागे कलाकाराचे कलात्मक असमाधान असते. निर्मितिप्रक्रियेचे आवर्तन आणि कलावंताचा अहंकार ही कारणेही त्यामागे असू शकतील."

## बॉनसॉय

मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंना मुदतवाढ हवी असते, ती मिळविण्यासाठी जे प्रयत्न करतात ते दाखविण्याच्या निमित्ताने एकूणच आपल्या शिक्षणक्षेत्रात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचे भेदक रूपदर्शन घडविणारी ही कादंबरी सुभाष भेंडे यांच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणेच रंजकही आहे. कुलगुरू वसंतराव मोडक, कुलसचिव साटम, प्राचार्य सांगळे, प्रा. दातार ही सारी खुजी माणसे; त्यांनीच आजचे शिक्षणक्षेत्र व्यापून टाकलेले आहे; त्याची दाहक टोचणी त्याच क्षेत्रात काम करणाऱ्या सुभाष भेंडे यांना विद्ध करीत असणार. त्यामुळेच या कादंबरीतील एकूणच मर्मभेदक कथावस्तूची रंगत अधिक बोचरी झाली आहे. थ्रिलरच्या तंत्राने लिहिलेली ही कादंबरी एखाद्या चित्रपटाप्रमाणे दृश्यामागून दृश्ये उभी करून झपाटेबंद कथानकाचा ओघ कायम टिकवते. राजकीय नेत्यांचे राजकारण, प्राध्यापक संघटनेतील गटबाजी, तोंडपुजे बिनकण्याचे संधिसाधू प्राध्यापक, लाचार व बनेल संस्थाचालक, अशैक्षणिक बाबींचे माजलेले स्तोम, तरुण-तरुणींच्या मोहाचे क्षण अशा अनेक बाबींना ही कादंबरी स्पर्श करते.

## भेटेन पुन्हा

रघुवीर सामंत यांचे लेखन १९३० ते ६० च्या दरम्यान जोरात चाललेले होते. खांडेकर-फडके यांच्याबरोबर त्यांचे नाव घेतले जाई. कथा-कादंबऱ्या, लघुनिबंध, काव्य सर्वत्र त्यांचा संचार होता. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची अप्रकाशित राहिलेली 'भेटेन पुन्हा' ही पावणेचारशे पृष्ठांची कादंबरी मॅजेस्टिकने प्रसिद्ध केली आहे.

ही कादंबरी तीन पिढ्यांची कहाणी सांगते. रंगकामाचा व्यवसाय करणारा आबा, जमिनीचे व्यवहार करणारा त्याचा मुलगा आना आणि मुद्रणाचा व्यवसाय करणारा त्याचा मुलगा सदानंद- अशा तीन पिढ्या यात येतात. या तिघांत तसा संघर्ष नाही. जनरेशन गॅप असली तरी संवाद तुटण्याइतकी ती मोठी नाही. कधी पत्रांद्वारे, कधी दैनंदिनीतील नोंदींद्वारे हा संवाद चालू राहतो. मोजक्या घटना, कठीण प्रसंग; परंतु सन्मार्गाने चालण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न; सद्भावनेने एकमेकांजवळ येण्याचा, जीवनाबद्दल आशावादी राहून सुख-दुःखात सहभागी होण्याचा जुना काळ या कादंबरीच्या कथेतून उभा राहतो.

## कृष्णजन्म

राजेंद्र बनहट्टींच्या शेजारी, शुक्लकाष्ठ व कृष्णजन्म या तीन दीर्घकथांचा हा संग्रह १९८८ मधील एक लक्षवेधक कथासंग्रह आहे. गेली २०-२५ वर्षे बनहट्टी लिहीत आहेत;

त्यांच्या लेखनाचा गाभा मात्र कायमच आहे. माणसा-माणसांतील नात्यांचा शोध घेण्यात त्यांना रस आहे; आणि या नात्यांचे सूक्ष्मतरल पदर उलगडून दाखवण्याचे त्यांचे नैपुण्य हेवा करण्यासारखे आहे.

कृष्णजन्म ही कथा आत्मकथनात्मक वाटावी अशी एकूण पार्श्वभूमी आहे. अविनाश हा नव्याने लिहू लागलेला, वास्तववादी तरुण लेखक आणि त्याचे जुन्या जमान्यातले प्राचीन साहित्याचे गाढ व्यासंगी व मान्यताप्राप्त संशोधक-प्राध्यापक असे वडील. वडिलांच्या रूढीबंद वाङ्मयीन व नैतिक कल्पना आणि समाजमान्यतेने लाभलेला प्रतिष्ठितपणा यांच्या विरोधात अविनाशचे वास्तववादी लेखनविषय व नव्या शैलीतले त्यांचे आविष्करण हे वडिलांना आपल्या नावाला बट्टा लावणारे वाटते. वडिलांच्या आत्मसंतुष्ट विद्वत्तेचे अलोट प्रदर्शन त्याला असह्य होत असते; तर मुलाच्या लेखनाचा अंकुर खुडून टाकण्यासाठी वडील त्याची कथाही फाडून टाकतात. 'कंसाने हजार पहारेकरी नेमले तरी कृष्णजन्म होणारच ! अविनाशचे लेखन हे थांबणार नाही.' वडिलांना हे जाणवते आणि अविनाशच्या फाडलेल्या कथेचे कागद ते जोडू लागतात.

या कथेत अनेक प्रकारचे ताणतणाव, वडील, मुलगा या दोघांतील वाढत जाणाऱ्या दुराव्याचे एकेक टप्पे, अशा काही नाजूकपणे आणि तरी अपरिहार्यपणे स्पष्ट होत जातात की वाचक संभ्रमित होऊन जातो. परंतु एकीकडे हा अटळ दुरावा वाढत असताना दुसरीकडे हे बाप-लेक पुन्हा साहित्यप्रेमाच्या धाग्याने एकमेकांजवळ अधिकाधिक येत आहेत, ही प्रक्रियाही चालूच असते; त्यामुळेही या संघर्षाला अधिक वास्तवाची धार येते. प्रत्यक्ष घटना आणि मानसिक आंदोलने यांचे अत्यंत तरल सामंजस्य बनहट्टींच्या कथेत असते आणि ते तिला एक वेगळेपण बहाल करते.

## निरगाठी व चंद्रिके ग सारिके ग

गौरी देशपांडे यांच्या दोन लघुकादंबऱ्या. त्यांची पात्रे आंतरराष्ट्रीय संचार करणारी, उच्चभ्रू वर्गातली. या पात्रांच्या परस्परांवरील क्रिया-प्रतिक्रियांचा मागोवा घेण्यात गौरी देशपांडे यांना रस असतो; आणि त्या मोजक्याच मुख्य पात्रांच्या परस्पर स्पर्शबिंदूंशी वेगवेगळ्या केंद्रांपासून भिडत असतात. 'निरगाठी'चे कथानक इ. स. २०२१ मध्ये घडल्याचे दाखवले आहे. निधनाच्या बातमीने सुरू झालेला पूर्वस्मृतींचा प्रवाह कधी वर्तमानकाळात घुसतो तर कधी भूतकाळात. फ्लॅशबॅकचा वापर, संवाद, पत्रे आणि आत्मनिवेदने यांतून.निरगाठीतील आईला स्वतःला हे माहीत असते की आपण रूढ अर्थाने आईच्या प्रतिमेपासून दूर आहोत. प्रेमस्वरूप वात्सल्यसिंधू आई हे वर्णन आपल्यासाठी नाही. त्यामुळे मुलांशी वागताना जे ताण तिला सोसावे लागतात ते वेगवेगळ्या पातळ्यांवरचे असतात. अखेर ही आई आपल्या नवऱ्यासह उतारवयात आत्महत्या करते. 'चंद्रिके ग सारिके ग' ही कादंबरी दोन मैत्रिणींच्या आयुष्याची गुंतागुंत पकडण्याचा प्रयत्न

करते. घटनांचा अर्थ उमगून घेण्याचा, त्यामागची कारणपरंपरा शोधण्याचा प्रयत्न करते. मालविकाला मृत्यू समोर दिसत असतो परंतु तरीही जीवनाबद्दलची, सुहासबद्दलची ओढ तिला आवरता येत नाही. गौरी देशपांडे यांच्या नायिका या अशा अत्यंत आत्मकेंद्रित, आत्मरत आणि अंतर्मुख असतात. इतरांशी त्या एक अंतर ठेवूनच जगतात. आणि आपल्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाच्या वर्तनाची आपल्या अंतर्भेदक दृष्टीतून सारखी छाननी करत असतात.

## कृष्णचंदन

जी. ए. कुलकर्णी यांच्या प्रथम श्राद्धदिनी प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकात धनंजय आचार्य यांनी जीएंच्या कथाविश्वातील २० व्यक्तिरेखांचे गुंतागुंतीचे पदर उलगडून दाखवले आहेत. जीएंच्या काही कथांत निवेदक म्हणून येणारा लहान मुलगा (तुती, कैरी, राधी) जीएंच्या कथांतून जपवणारी आई (पराभव), वांझोटेपणाचे दुःख भोगणारी करेव्वा (वंश), विद्रूपता हा गुन्हा नसेल पण शाप नक्कीच आहे, या विद्रूपपणामुळे जीवन उद्‌ध्वस्त झालेली उपेक्षित काशी (शॅलॉट), आपले सर्वस्व रुग्णसेवेत व्यतीत करूनही, आयुष्यात प्रत्येक ठिकाणी आपले भांडे रिकामेच राहिले या खंतावणाऱ्या जाणिवेने पोखरलेली मिस डिसोझा (वरअ), उत्तम वैद्यकीय कौशल्य असूनही अपेशी ठरल्याने मानसिक दृष्ट्या खचलेले डॉ. फाटक (सोडवण), लौकिकार्थाने कसलाही छळ न झालेली, थोर पुरुषाची पत्नी म्हणून जगणारी शांताक्का (प्रदक्षिणा), सच्चेपणाने वागणाऱ्या माणसालाच समाज येडचाप विक्षिप्त मानून त्यांची टिंगलटवाळी करते. त्या विक्षिप्तपणामागचे उत्कट भावजीवन प्रकट करणारे बळवंतमास्तर (वीज) अशा अनेक व्यक्तिरेखा आचार्य यांनी ठसठशीतपणे पकडल्या आहेत. अनेकदा आचार्य सबंध कथाच संक्षेपाने सांगताना दिसतात. पृथक्करणावर त्यांचा भर कमीच आहे परंतु जीएंच्या निवडक कथांचे हे सुलभ असे रूपांतर सर्वसामान्य वाचकाला सुखद ठरेल यात शंका नाही.

## शुभवर्तमान

वसंत आबाजी डहाके यांचा योगभ्रष्ट (१९७२) नंतरचा हा काव्यसंग्रह. व्यक्तीचा एकाकीपणा हा आधुनिक जाणिवेचा एक विशेष, केंद्रबिंदू. व्यक्तीच्या एकाकीपणाला सामाजिक आणि राजकीय वास्तवाचा परीघ कसा सारखा वेढून असतो याचा क्षणभरही विसर डहाके यांना पडत नाही. त्यामुळे ते वास्तवाचे चित्रण विरूपीकरण करून, विद्रूप करून पेश करतात. आपल्या बोथटलेल्या संवेदनांना धक्का देण्यासाठी हे विरूपीकरण प्रभावशाली ठरते.

*"उंदीर मारण्याचं औषध आहे का*
*तर, नाही, दुकानदार म्हणाला*

*आजकाल आम्ही ठेवीत नाही*
*परवाना फी पुष्कळ अन् बाटल्या*
*खपणार दोन-चार*
*तर ॲस्प्रो द्या दोन म्हणालो*
*नि पायऱ्या उतरून चालायला लागलो.*
*मग मी उंदीर पकडण्याचा पिंजरा विकत*
*घेतला*
*नि घरी आलो*
*प्रथम मुलीला आत ढकललं*
*मग बायकोला ढकललं*
*नंतर मी आत जाऊन बसलो."*

यासारख्या कवितेवरून वास्तवापासून एकदम फँटसीच्या विद्रूपीकरणात डहाके कसे शिरतात ते लक्षात येईल. नीतिकथेचा पॅरेबलचा घाट तिला येतो. जनावर, कत्तल, रानमांजर वगैरे कविता प्रतीकात्मक असून, अपरिवर्तनीय वास्तवाचे दाहक दर्शन त्या घडवतात. काही ठिकाणी दुर्बोध प्रतिमा किंवा वृत्तपत्रीय तपशील ही कविता देत बसते तसेच एकाच विषयावरील अनेक रचना सादर करते. परंतु ही डहाके यांची कविता आहे असे सांगता यावे इतकी ती वेगळी आशयभिन्नता घेऊन येते.

## वडिलांच्या सेवेशी

शिरीष पै यांनी केलेले हे लेखन आपल्या आयुष्यात आलेल्या तीन निकटवर्ती व्यक्तींचे आणि आपले भावजीवन खुले करते. आचार्य अत्रे यांची ही कन्या. पप्पांबद्दल त्यांना कमालीचा आदर आहे; आणि आचार्यांच्या विलोभनीय व्यक्तित्वाची विविध रूपेही त्यांनी पाहिलेली आहेत. पप्पांच्या कर्तृत्वाच्या गरुडभराऱ्या आवाक्याबाहेर असणाऱ्या त्यांच्या मातोश्री सुधाताई अगदी साध्याभोळ्या व शिस्तप्रिय. आई आणि वडील यांच्यातील विसंवाद, मध्यंतरीची ताटातूट, पुन्हा झालेले मीलन यांतील अनेक नाट्यपूर्ण घटनांचे रेखीव चित्र शिरीष पै यांनी उभे केले आहे. सर्वांत त्यांची कसोटी लागली आहे ती आपल्या पतीबद्दल लिहिताना. व्यंकटेश पै यांनी 'मराठा'च्या निमित्ताने आचार्य अत्रे यांच्या संसारात प्रवेश केला आणि त्यांच्या मुलीलाही भुरळ घातली. आचार्य अत्रे आणि व्यंकटेश पै यांचे संबंध हे व्यामिश्र होते. शिरीष पै यांचे आणि व्यंकटेश पै यांचे संबंधही तसे अवघड होते त्यामुळे वडील, आई आणि नवरा या तिघांबद्दल त्यांनी इतपत मोकळेपणाने लेखन करण्याचे धारिष्ट्य दाखवले हेच विशेष !

## गोखले : नवदर्शन

नाशिकचे व्यासंगी प्राध्यापक मु. गो. देशपांडे यांनी बहुत वर्षांच्या परिश्रमांनी थोर नेते गोपाळ कृष्ण गोखले यांचे हे नवे चरित्र सिद्ध केले आहे. प्रबंधाच्या वळणाने ते गेलेले आहे; त्यामुळे ते बरेचसे क्लिष्ट व रुक्ष जाणवते; परंतु त्यात नव्याने आलेली माहिती इतकी विपुल व रसदार आहे की हे चरित्र वाचणे कोणालाही अपरिहार्य ठरावे. गोखल्यांचा पत्रव्यवहार, त्यांचे सरोजिनी नायडू वगैरेंशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध, 'इंडिया' साप्ताहिकातील व सुधारकामधील लेखन, या सामग्रीचा वापर केल्यामुळे अनेक तपशील नव्याने कळतात. देशपांडे यांनी सी एफ अँड्रयूज, वैजनाथशास्त्री राजवाडे, सी रामलिंग रेड्डी, महर्षी शिंदे, आनंद कुमारस्वामी, भगिनी निवेदिता, सरला रे, सिडने वेब, रियासतकार, सरदेसाई वगैरेंची पत्रे उद्‌धृत करून गोखले यांच्या कार्याच्या विविध अंगांकडे लक्ष वेधले आहे.' अंमल चालविणारे अधिकारी कितीही सहानुभूतीने वागणारे असले तरी हिंदुस्तान सरकारचे दारिद्र्य हे सगळ्या समस्यांचे मूळ आहे. सरकारने अधिक श्रीमंत व्हायला हवे' यासारखे विचार यात येऊन जातात. गोखले नेमस्त सुधारणावादी होते तसेच समंजस विचारवंत होते आणि त्यांचे स्त्रीदाक्षिण्यही वाखाणण्याजोगे होते. अनेक नामवंत स्त्रियांशी त्यांची चांगली मैत्री होती. गोखले यांची प्रतिमा या पुस्तकामुळे अधिक जवळची वाटू लागते.

## काममात्र

लैंगिक शिक्षण ही अत्यंत अवघड गोष्ट आहे आणि ते देण्याच्या योजना मूर्त स्वरूपात येण्यात अनेक अडथळे आहेत. निरामय व तृप्त कामजीवनाची साधना ही प्रत्येक विवाहित दांपत्याच्या सुखासाठी उपयुक्त ठरते. दुर्दैवाने कामव्यवहाराबद्दल नानाविध गैरसमज आणि गंड व्यक्तीव्यक्तीत रुजतात आणि यशस्वी स्त्री-पुरुष संबंधाला ते बाधक ठरतात. असे समज-गैरसमज दूर करणारे वाङ्मय आपल्याकडे दुर्मिळच आहे. एक सराईत कादंबरी-कथाकार गो. ना. मुसळे यांनी कादंबरीच्या रूपात लैंगिक व्यवहाराबाबतच्या अनेक समस्या मांडून त्यावर प्रकाश टाकला आहे. खरे म्हणजे कादंबरी असे या लेखनाला म्हणू नये; परंतु काही विशिष्ट पात्रे मध्यवर्ती ठेवून निरनिराळ्या लैंगिक विकृतींवर प्रकाशझोत टाकण्याचा हा प्रयत्न आहे. वीणा श्रीधनकर आणि तिचा नवरा, तिची मैत्रीण हेमा, डॉ. बुद्धिसागर, गुप्तरोगाने पछाडलेला श्रीधनकरच्या ऑफिसमधला बगे, श्रीधनकरने वीणाला घटस्फोट देऊन श्यामाशी केलेला पुनर्विवाह, डॉक्टर मिसेस धनवटेची ट्रीटमेंट अशा सैलसर कथासूत्रांभोवती श्वेतप्रदर, हस्तमैथुन, उद्दीपन, गुप्तरोग, त्यावरील औषधोपचार, रतिक्रीडेची पथ्ये, मनातील धाकधूक, नवऱ्याचे मानसशास्त्र, परस्परांतली सुसंवाद वगैरे बाबींची चर्चा गुंफलेली आहे. दोघांच्या शरीरांनी एकमेकांचा तोल सावरीत,

एकमेकांची लय पकडीत, एका विशिष्ट उंचीवर जाऊन एका विशिष्ट मस्तीत येऊन आणि एक विशिष्ट क्षण घट्ट पकडून एका विशिष्ट धूनमध्ये गायलेलं मदनमस्त द्वंद्वगीत म्हणजे खरे मीलन हा काममात्रचा संदेश आहे.

## महाराष्ट्रातील जातिसंस्था विषयक विचार

जातिधर्माबद्दलच्या प्रश्नाशी प्रत्येक विचारवंत, समाजसुधारक आणि राजकीय नेता अडखळलेला आहे असे दृश्य दिसते. समानता, बंधुता, स्वातंत्र्य यांचा उद्घोष करीत असताना जातीच्या कडेकोट किल्ल्याचे बंदिस्त दरवाजे प्रत्येकाच्या समोर आव्हान देत उभे आहेत आणि उदारमतवादी, आधुनिक विचारसरणीच्या कितीही धडका दिल्या तरी ते दरवाजे अजून किलकिलेही झालेले नाहीत. महाराष्ट्रातील विचारवंतांनी जातिभेदाच्या प्रश्नावर केलेले चिंतन अत्यंत नेटकेपणाने व नेमके टिपणारे लेख या पुस्तकात प्रा. पुंडे व यशवंत सुमंत यांनी एकत्र केले आहेत. जातिभेद नैसर्गिक आहे, हिंदू धर्माच्या अस्तित्वाला त्याचा उपयोग आहे अशी भूमिका आहिताग्नी राजवाडे, महादेव शिवराम गोळे प्रभृतींची आहे. अस्पृश्यतेचा ते पुरस्कार करतात. लोकहितवादी, इतिहासाचार्य राजवाडे, श्री. म. माटे, डॉ. केतकर वगैरेंनी ब्राह्मणी वर्चस्व गृहीत धरूनच समाजव्यवस्थेचा विचार केलेला होता. स्वातंत्र्यवीर सावरकरही जातिभेदाला हिंदूंनी स्वहितासाठी तिलांजली द्यावी असे म्हणत, परंतु गुणजात जातिभेदाचा म्हणजे पर्यायाने चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा ते पुरस्कार करीत असे दिसते तर जातिव्यवस्था ब्राह्मणांनी निर्माण केली नाही, अशी इरावती कर्वे यांची भूमिका आहे. जातिव्यवस्थेची मार्क्सवादी चिकित्सा प्रा. शरद पाटील करतात, तर फुले, आंबेडकर, कर्मवीर शिंदे यांनी जातिव्यवस्थेच्या नव्या उभारणीची निकड प्रतिपादित केली. पुनरुज्जीवनवादी, परिवर्तनवादी, मार्क्सवादी, अशा अनेकविध भूमिकांमध्ये घोटाळणाऱ्या विचारवंतांच्या चिंतनातील गुणदोष व मर्यादा यांचेही दिग्दर्शन करणारे हे लेख आहेत. मराठीतील या विषयांवरील चिंतनाचे हे साररूप आपल्या विचारवंतांच्या युक्तिवादाची व्यापक बैठक लक्षात आणून देणारे असल्याने महत्त्वपूर्ण आहे.

## दलित आत्मचरित्रातील स्त्रीप्रतिमा

उपरा, बलुतं, तराळ-अंतराळ, आठवणींचे पक्षी आणि मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे या पाच दलित आत्मकथांमध्ये आलेल्या स्त्रियांच्या विविध नमुन्यांची विस्तृत छाननी अत्यंत साक्षेपाने व अभ्यासू वृत्तीने त्यावरून निघणारे निष्कर्ष शोभा भागवत यांनी शब्दांकित केले आहेत. हे एकेक आत्मचरित्र म्हणजे केवळ लेखकाच्या वैयक्तिक सुखदुःखाचे आलेख नसून, त्या त्या लेखकाच्या समाजाचे प्रातिनिधिक चित्रण ठरते, असेही यावरून जाणवते. भटक्या जमातीला व्यवस्थित राहून चालत नाही. जी स्त्री टीपटॉप राहते ती बाहेरचे धंदे करीत असणार अथवा तिच्यावर बलात्कार होणार असा ठाम ग्रह 'उपरा'मधील कैकाडी

समाजाच्या बायका प्रकट करतात. आई म्हणून प्रेमाने वागणारी स्त्री सासूच्या भूमिकेत गेली की सुनेचा जाच करू लागते. नवऱ्याकडून मार खाणे हा प्रत्येक बायकोचा धर्मच आहे असेही येथे पक्के रुजलेले आहे. नवऱ्याला पोसणाऱ्याही बायका यात आहेत, त्यांच्या नीतिमूल्यांच्या कल्पना वास्तव आहेत आणि तरीही नीतिबाह्य वर्तनाबद्दल ठपका ठेवण्यात त्या मागे नसतात. एक उद्‌बोधक सामाजिक विश्लेषण करणारे हे पुस्तक दीर्घकाळ मनात रेंगाळत राहील.

### हास्य कॉर्नर

'तुझी शेवटची इच्छा काय ?' एका फाशीचा दोर गळ्याभोवती आवळलेल्या कैद्याला विचारलेला प्रश्न आणि 'मला देश एकविसाव्या शतकात गेलेला पाहायचा आहे' हे कैद्याने दिलेले उत्तर हे व्यंगचित्र डोळ्यासमोर उभे करून पाहा, म्हणजे कैद्याच्या इरसाल चतुराईने आपल्या गालावर खळी पडल्याशिवाय राहणार नाही.

अशा चारशे व्यंगचित्रांचा संग्रह 'हास्य कॉर्नर'मध्ये झालेला आहे. विवेक मेहेत्रे हे आजचे एक झपाटलेले व्यंगचित्रकार, त्यांची कल्पनाशक्ती अचाट आहे. त्यांच्या चित्रनिर्मितीचा वेगही बुलेट ट्रेनला मागे टाकणारा आहे.

दूरदर्शनवरील प्रौढांच्या चित्रपटांबाबतचा अहवाल सादर करणारा म्हणतो, हे चित्रपट मुलांना खूप आवडल्याचे आमच्या पाहणीत आढळून आले.

मेहेत्रे यांच्या कचाट्यातून कुठलाही विषय सुटत नाही. त्यामुळे या व्यंगचित्रांची लज्जत बहुढंगी आहे.

## *काही महत्त्वपूर्ण पुस्तके*

### कादंबऱ्या

* एकलव्य– शरद दळवी.
* पानिपत– विश्वास पाटील.
* बोनसॉय– सुभाष भेंडे.
* वृत्तांत– श्री.ज. जोशी.
* अलकनंदा– सुरेश द्वादशीवार.
* मेड इन इंडिया– पुरुषोत्तम बोरकर.
* भंडारभोग– राजन गवस.
* आवर्त– गोपाळ बेळगावकर.
* कागदी सिंह– रमेश मंत्री.
* खाई– उत्तम बंडू तुपे.

* घुसमट– भीमसेन देठे.
* परिमल– केशव इनामदार.
* प्रेम– पद्माकर गोवईकर.
* वैदेही– आनंद साधले.
* सूडसंभ्रम– यशवंत रांजणकर.
* आंदोलन– दीनानाथ मनोहर.
* आकांत– सुबोध जावडेकर.
* मार्केट– ह.मो.मराठे.

**कथा :**

* पत्नी,प्रेयसी,प्रतिभा,अथक– अरविंद गोखले.
* निरगाठ आणि चंद्रिके ग सारिके ग– गौरी देशपांडे.
* अनिरुद्ध– मनोहर शहाणे.
* काळोखगर्भ– के.व्ही.सरवदे.
* कृष्णजन्म– राजेंद्र बनहट्टी.
* अश्रद्ध– वसुधा पाटील.
* प्रस्थान– ज्ञानेश्वर नाडकर्णी.
* सायकेडेलिया– अनिरुद्ध बनहट्टी,
* सर्वोत्कृष्ट शत्रा– शं.ना.नवरे.
* गाजराची पुंगी– पंढरीनाथ रेगे.
* मावळतीची झाडे– जयश्री थत्ते-भट.
* मातरं– गंगाधर ठाणगे.
* सांजरात– जयवंत दळवी.
* काही कथा काही व्यथा– ना.वा.फडके.

**चरित्र-आत्मचरित्र**

* नाच ग घुमा– माधवी देसाई,
* तो राजहंस एक– बाळ सामंत.
* कॉम्रेडस,लाल सलाम– जयंत प्रधान
* वालाँग– श्याम चव्हाण.
* माझी शिपाईगिरी– एस.पी.पी.थोरात.
* आणि डॉ.काशिनाथ घाणेकर– चारुशीला ओक
* झाकली मूठ– खाशेराव सावंत.

* जीए-एक पोर्ट्रेट– सुभाष अवचट
* रंगनायक– अरविंद देशपांडे संपादित.
* ककची क– व.पु.काळे.
* चिं.त्र्यं खानोलकर– दिलीप घारे.

## समीक्षा

* आशय आणि आविष्कार– प्रल्हाद वडेर.
* मधाळलेल्या संध्याकाळी– बॅ.सुनीती पुंगलिया.
* समर्थ साहित्यातील आकृतिबंध– उषा जोशी.
* बॅरिस्टर-तीन रूपे– सौ.उमा दादेगावकर.
* अब्राह्मणी साहित्यांचे सौंदर्यशास्त्र– शरद पाटील.
* परिचय,रससूत्र,वाटचाल– नरहर कुरुंदकर.
* साहित्य– बांधिलकी आणि विद्रोह– यशवंत मनोहर.
* मराठी नाटकातील स्त्री प्रतिमा– मुक्ता मनोहर.
* इतिहास आणि कल्पित– सेतु माधवराव पगडी.
* नाट्यरंग,माझा नाट्यलेखन/दिग्दर्शनाचा प्रवास– सं.वि.भा.देशपांडे.

## कविता

* शुभवर्तमान– वसंत आबाजी डहाके.
* प्रार्थना– फ.मु.शिंदे.
* स्त्रीसूक्त– अश्विनी धोंगडे.
* राजघाट– अरुण शेवते.
* महाराष्ट्र रामायण– आनंद साधले.
* मेघहृदय– वसंत बापट.
* लय– सुधीर मोघे.
* यक्षरात्र– अरुणा ढेरे.

## इतर

* बुवाबाजी,बळी स्त्रियांचा– श्याम मानव.
* शोध भानामतीचा– श्याम मानव.
* अंधश्रद्धा-प्रश्नोत्तरे– दाभोळकर-आर्डे.
* जातिसंस्थाविषयक विचार– संपादक सुमंत,पुंडे.
* गजल दर्पण– विजय वाईकर.

* मराठी नाट्यसंगीत– बाळ सामंत.
* परंपरा आणि परिवर्तन– गं.बा.सरदार.
* ओलांडताना– लीला पाटील.
* संसदेची सप्तपदी– मो.ग.तपस्वी.
* पाण्याचे पंख– श्रीनिवास कुलकर्णी.
* आनंदयात्रा, अक्षरयात्रा, संसारयात्रा, निसर्गयात्रा– ग.वा.बेहेरे.
* अंगणातलं चांदणं– रवींद्र पिंगे.
* चेरी ब्लॉसम– अंजली कीर्तने.
* पुनर्जन्म-एक शोध– बाळ सामंत.
* चौफेर– भाग १– माधव गडकरी.
* परिक्रमा– लता राजे.
* बाईमाणूस– सरोजा परुळकर.

□

# १९८८ : साहित्य क्षेत्रातील नवलविशेष

*कुसुमाग्रज-जीएंनी गाजवलेले वर्ष*

या वर्षात मराठी साहित्य विश्वातील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे कविवर्य कुसुमाग्रज यांना मिळालेला ज्ञानपीठ पुरस्कार. या पुरस्काराने कुसुमाग्रज मोठे झाले असे नव्हे, परंतु मराठीला तब्बल चौदा वर्षांनी हा मान मिळाला. त्यामुळे अवघ्या मराठी ग्रंथप्रेमी मंडळींना आपल्यालाच हा बहुमान मिळाल्यासारखा सुखानुभवाचा प्रत्यय आला.

जी.ए. कुलकर्णी यांचा हा मान हुकला याची हळहळ आहेच. मराठी लेखकांचे साहित्य कसदार असूनही ते भाषांतराद्वारे हिंदी-इंग्रजी भाषकांपर्यंत पोचत नाही. त्यामुळे मराठी लेखक हे इतर राज्यांमध्ये अपरिचित राहतात. त्यांचा राष्ट्रीय पुरस्कारांसाठी फारसा गंभीरपणे विचार होत नाही. महाराष्ट्र शासनही आपल्या लेखकांचे मोठेपण ओळखण्यात आणि त्यांचा यथायोग्य गौरव करण्यात कमी पडते.

अमरावती येथे होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कथाकार के.ज. पुरोहित तथा शांताराम यांची निवड फक्त एका जादा मताने झाली. पत्रकार-नाटककार विद्याधर गोखले यांनी अटीतटीची लढत दिली.

मराठी साहित्य संमेलनाची यंदाची अध्यक्षीय निवडणूक त्यामानाने अत्यंत खेळीमेळीच्या आणि बिनतणावाच्या वातावरणात पार पडली. आपली निवडणूक पद्धत अशी हवी की, प्रतिभावंतांना त्यापासून वंचित राहावे लागू नये. हा सन्मान आदराने आणि गुणग्राहकतेनेच दिला, घेतला जावा. मते जमवून वा गट बनवून त्याचा बाजार मांडू नये.

## जी.ए. : अठ्ठ्याऐंशीचे हीरो

जी.ए. कुलकर्णी यांच्या अकाली निधनाने मराठी साहित्यविश्व ढवळून निघाले. जीएंचा एकलकोंडेपणा, जीएंचा अज्ञातवास ही मराठी रसिकांनी मनोमन आदरणीय मानून, तो जपण्यात आनंद मानला होता. कधीतरी जी.ए. स्वेच्छेने लादून घेतलेला अज्ञातवास संपवून सभासंमेलनात, सार्वजनिक जीवनात रमतील असा आशावाद मनाशी बाळगत होता, परंतु

जी.एं.नी एकदम हुलकावणी दिली आणि सगळ्यांनाच हादरा बसला.

जी.एं.वर अनेक लेख विविध वृत्तपत्रांतून आले. ललितने विशेषांक काढला. 'माणसे : अरभाट आणि चिल्लर' हे जी.एं.चे काहीसे आत्मचरित्रात्मक पुस्तक परचुरे प्रकाशन मंदिराने प्रसिद्ध केले. डोहकाळिमा हा जी.एं.च्या निवडक कथांचा संग्रह प्रा. हातकणंगलेकर यांनी संपादित केला. तो पॉप्युलरने काढला.

उगवाईचा दिवाळी अंक पूर्णतया जीएंवर निघाला. जी.एं.च्या कथांतील व्यक्तिरेखांचा मागोवा घेणारे धनंजय आचार्य यांचे पुस्तक 'कृष्णचंदन' जी.एं.च्या पहिल्या पुण्यतिथीला प्रकाशित झाले. जी.एं.ची काही पत्रे म.सा. पत्रिकेने छापली. पु.ल. देशपांडे प्रभृतींनी जी.एं.च्या पत्रांचे संकलन काढण्याची योजना तयार केली.

चित्रकार सुभाष अवचट यांचे 'जी.ए. : एक पोर्ट्रेट' हे पुस्तक सौंदर्यपूर्ण छपाईने लक्ष वेधून घेते. दोन-तीन भेटी, दहा-वीस पत्रे आणि काही फोन अशा साधनसामग्रीचा अत्यंत चलाखीने वापर करून अवचटांनी केलेला हा लेखनपराक्रम म्हणजे नजरबंदीचा सफाईदार प्रयोगच आहे. जी.ए. : एक पोर्ट्रेट ऐवजी जी.ए. : काही फिरक्या असे नाव या पुस्तकाला शोभून दिसले असते.

## लेखनस्वातंत्र्य : हल्ले चालूच

पंतप्रधान राजीव गांधी यांनी लोकसभेत बदनामी विधेयक मांडले. त्यातील तरतुदी पत्रकारांना जाचक ठरणाऱ्या होत्या. देशभर वृत्तपत्रांनी बंद पाळून या विधेयकाला कडाडून विरोध केला. त्यामुळे लोकसभेत मंजूर झालेले असूनही हे विधेयक स्थगित करण्यात आले.

भारतात जन्मलेला परंतु इंग्लंडमध्ये स्थायिक झालेला लेखक सलमान रश्दी यांच्या 'दि सॅटानिक व्हर्सेस' या कादंबरीवर ती भारतात येण्यापूर्वीच बंदी घालण्यात आली. मुस्लिमधर्मीयांच्या भावना दुखावतील अशा प्रकारचा पैगंबराबद्दलचा मजकूर या कादंबरीत आहे, त्यामुळे कस्टम कायद्याच्या आधारे भारतात हे पुस्तक आयात करण्यास मज्जाव करण्यात आला.

लेखन - स्वातंत्र्यावर हा हल्ला आहे, असा आरोप सरकारवर करण्यात आला, परंतु भारतातील नाजूक परिस्थितीत जातीधर्मावरून तणाव माजेल असे लेखन होऊ देणे इष्ट नाही अशा भूमिकेतून काही विचारवंतांनी या बंदीचा पुरस्कार केला. 'सोबत'मधील महात्मा फुले यांच्यावरील, बाळ गांगल यांच्या लेखानेही वादळ माजले.

## महत्त्वपूर्ण ग्रंथप्रकल्प

वर्षभरात काही महत्त्वपूर्ण ग्रंथप्रकल्प पूर्ण झाले वा मार्गी लागले. रियासतकार गो.स. सरदेसाई यांच्या मराठी रियासतीचे आठ खंडांत पुनर्मुद्रण करण्याचा संकल्प बडोद्याचे महाराज फत्तेसिंहराव गायकवाड आणि प्रसिद्ध इंग्रजी लेखक मनोहर माळगावकर प्रभृतींच्या पुढाकाराने पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ यांनी सोडला.

त्याच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन ठरल्याप्रमाणे विजयादशमीला झाले. स.मा. गर्गे यांच्या संपादकत्वाखाली एक संपादन समिती नियुक्त करण्यात आली असून, प्रत्येक भागाला नवीन संदर्भ व टीपा जोडण्यात येत आहेत. वरदा प्रकाशनच्या ह. अ. भावे यांनी लोकमान्य टिळक यांच्या केळकरकृत त्रिखंडात्मक चरित्राचे पुनर्मुद्रण पूर्ण केले. तसेच महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश हा दाते-कर्वे संपादित १३७६ पृष्ठांचा कोशही झपाट्याने प्रसिद्ध केला. संपूर्ण महाभारत (दहा खंड), वाल्मीकी रामायण (पाच खंड), सकलसंत गाथा (सहा खंड), महाराष्ट्र शब्दकोश (३८५६ पृष्ठांचे आठ खंड), संपूर्ण शेक्सपिअर (५ खंड), बाणाची कादंबरी, कथासरित्सागर अशांसारखे प्रचंड प्रकल्प भावे उत्साहाने पार पाडत आहेत. विदर्भ मराठवाडा बुक कंपनीनेही रामायण-महाभारत सवलतीने उपलब्ध करण्याची आपली योजना जारी ठेवली आहे.

दुर्गा भागवत यांच्या भारतीय लोककथामालेचे ३४ भाग आणि मालती बेडेकरांच्या परिकथांचे दहा भाग हे देखील वरदा बुक्सतर्फे प्रसिद्ध झाले. सन पब्लिकेशनने मुलांसाठी पुराणकथांच्या २० पुस्तकांचे प्रकाशन केले.

## मराठी वाङ्मयाचा इतिहास

डॉ. अ.ना. देशपांडे यांनी गेली ३५ वर्षे आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिण्याचे काम चालवले होते. त्याचा पहिला खंड १९५४ मध्ये प्रसिद्ध झाला. शेवटचा आठवा खंड फेब्रुवारी ८८ मध्ये बाहेर आला. डॉ. देशपांडे यांनी वार्धक्यातही आपला व्यासंग जारी ठेवून साडेचार हजार पृष्ठांचा विस्तार असलेला हा वाङ्मयेतिहास एकटाकी पूर्ण केला, हा एक प्रकारचा पराक्रमच आहे.

व्हीनस प्रकाशनचे स. कृ. पाध्ये यांनी आरंभापासून या ग्रंथांच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली आणि ती श्रद्धेने पार पाडली. साहित्य परिषदेने डॉ. देशपांडे यांच्या आधी वाङ्मयेतिहासाचा उपक्रम हाती घेतला. त्यासाठी अनेक विद्वानांचे साहाय्य मिळविले परंतु अजून तो उपक्रम अर्धवटच राहिला आहे. त्या पार्श्वभूमीवर डॉ. देशपांडे यांनी केवळ एकट्याच्या बळावर हे महाकार्य तडीस नेले ही गोष्ट निश्चितच उल्लेखनीय आहे.

## मराठी सारस्वत

विद्यमान लेखकांची माहिती मिळण्याच्या दृष्टीने मराठी सारस्वत हा अत्यंत उपयुक्त ठरेल, असा ग्रंथ आहे. १९८४ मध्ये हयात असणाऱ्या सुमारे ३३०० लेखकांच्या २० हजार ग्रंथांची सूची त्यामुळे उपलब्ध होईल. या ग्रंथाचा पहिला खंड बाजारात आला असून, दुसरा खंड मुद्रणाधीन आहे. अनंत जोशी यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक हे काम केले आहे आणि अनमोल प्रकाशनाचे मोरेश्वर नांदूरकर हे या ग्रंथाकडे आपला एक मातबर व प्रतिष्ठेचा उपक्रम म्हणून पाहत आहेत.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने लोकहितवादी समग्र वाङ्मय, महात्मा फुले समग्र वाङ्मय, सेनापती बापट खंड ४, मराठा वॉल पेंटिंग्ज, महाराष्ट्रातील दप्तरखाने वगैरे पुस्तके प्रकाशित करून ती लगेच अभिप्रायार्थ वृत्तपत्रांनाही पाठवली, ही तत्परता हे एक सुखद आश्चर्यच !

परंतु असे प्रकल्प हाती घेणे सर्वांनाच साधते असे नाही. डॉ. विवेक परांजपे यांनी 'आपली सृष्टी आपले धन'या ग्रंथांचे पाच खंड काढण्याचा संकल्प केला होता. प्रत्येकी दीड-दोन हजार रुपये देणारे हजार-पंधराशे ग्राहकही त्यांनी मिळवले होते. पहिला खंड त्यांनी इतका देखणा, दर्जेदार काढला की सारेच चकितच झाले. परंतु अपघाती निधनामुळे त्यांच्या मित्रांवर उर्वरित खंडांची जबाबदारी पडली. तीन खंडांनंतर हा प्रकल्प जारी ठेवणे त्यांना कठीण जात असल्याने त्याला अर्धविराम देण्यात येत आहे अशा बातम्या मध्यंतरी येऊन गेल्या. परंतु पुन्हा नेटाने हा प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्धार केला गेला आहे.

## पुस्तके खपतात

पुस्तके खपत नाहीत ही आपली तक्रार फार जुनी आहे आणि तशी ती तक्रार घोळवत, कुरकुरत नवे-जुने प्रकाशक पुस्तके प्रसिद्ध करीतच असतात. पुस्तकाची प्रसिद्धी करण्यासाठी योग्य ती दक्षता घेतली, त्यासाठी खर्च केला, त्यासाठी काही क्लृप्त्या लढवल्या तर पुस्तके झपाट्याने खपू शकतात हे लक्षात घेणे जरूर आहे.

पानिपत ही आठशे पृष्ठांची ऐतिहासिक कादंबरी, लेखक त्यामानाने नवीन, ती प्रकाशनासाठी स्वीकारून राजहंस प्रकाशनने प्रथमच प्रकाशनपूर्व सवलतीची योजना जाहीर केली. चाळीस हजार रुपये जाहिरातींसाठी खर्च केले. ९५ रुपये सवलतीची किंमत ठेवली. दीड महिन्यात चौदाशे प्रतींची नोंदणी झाली !

'प्रेमपत्र' हे एक छोटेसे पुस्तक माहेश्वरी युवा मंडळाने प्रसिद्ध केले. पन्नास-साठ मजेदार प्रेमपत्रांचे हे संकलन. वृत्तपत्रांतून त्याबद्दल बातम्या आल्या. एका महिन्यात त्याच्या दोन हजार प्रती खपल्या. नंतर काढलेल्या तीन हजार प्रती पुढच्या तीन महिन्यांत खपल्या. त्यानंतर आणखी तीन हजार प्रती काढण्यात आल्या. हे युवा मंडळ म्हणजे काही व्यावसायिक प्रकाशनसंस्था नव्हे. विक्रीची यंत्रणाही त्याजजवळ नाही. परंतु पुस्तकाचा गाजावाजा अशा प्रकारे झाला की त्याला भारताच्या कानाकोपऱ्यातून मागणी येत आहे, परंतु अशी झटपट व जोरदार खप होणारी पुस्तके एकूण कमीच आहेत. १९८८ मधील अनेक पुस्तके खपाच्या दृष्टीने चांगला वाव असलेली आहेत, परंतु प्रकाशक त्यांची पुरेशी जाहिरात व प्रचार करण्यात कमी पडतात. त्यामुळे त्यांचा खप मार खातो. पुस्तक नीटनेटके काढण्यासाठी प्रकाशक खूप परिश्रम घेतात, परंतु पुस्तक छापून बाजारात आले की ते एकदम हतबल होतात. जाहिरात नाही, प्रचार नाही, पुस्तक निघालेय हेच लोकांना कळत नाही, खप होणार कसा ?

याबाबतीतला माझा एक ताजा अनुभव सांगण्यासारखा आहे. १९८८ मधील कोणत्याही एका आवडीच्या पुस्तकावर एका इनलँडवर बसेल एवढा मजकूर पाठवावा अशी पत्रे मी साठ-सत्तर लेखकांना जुलैमध्ये पाठवली. डिसेंबरमध्ये परत स्मरणपत्रे पाठवली. डिसेंबरमध्ये जी उत्तरे आली त्यात ८८ मधील एकही पुस्तक पाहण्यात आले नाही अशा आशयाची अनेकांची पत्रे आली. साहित्यिक-प्राध्यापक वर्गात जर नव्या समकालीन पुस्तकांसंबंधी इतकी अनास्था व बेफिकिरी असेल तर विद्यार्थी व सर्वसामान्य वाचक यांना तरी काय दोष द्यावा ?

## उत्तम निर्मिती

उत्तम निर्मितिमूल्ये असणारी पुस्तके ही मराठीत तरी फार मोजकीच निघतात. मौज, पॉप्युलर, मॅजेस्टिक, श्रीविद्या, कॉंटिनेंटल वगैरे जुन्या अनुभवी प्रकाशनसंस्था प्रत्येक पुस्तकाच्या निर्मितीबाबत चोखंदळपणा दाखवतात. परंतु श्रीमंती वैभवाचा थाट त्यांनाही क्वचितच दाखवावासा वाटतो. मौजेने यंदा 'जी.ए. : एक पोर्ट्रेट'च्या निर्मितीत अशी चैन केली आहे. मेनका प्रकाशनने ककची क म्हणजे कथाकथनाची कथा हे व. पु. काळे यांचे पुस्तकही झोकात काढले आहे. वसंत बापट यांच्या मेघहृदयची निर्मितीही दृष्ट लागण्याजोगी घरंदाज झाली आहे.

निर्मितिमूल्ये वाखाणण्याजोगी आणखी काही पुस्तके : साहित्याकडून सत्याकडे (विजय तेंडुलकर), रंगनायक (अरविंद देशपांडे), (ऑलिंपिकवरील एक पुस्तक खूप चित्रे व तपशील असूनही मुद्रणदृष्ट्या मात्र ढिसाळ आहे.)

## दलित साहित्याचा बहर ओसरला

'उचल्या' या लक्ष्मण गायकवाड यांच्या आत्मकथनाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला तरी दलित साहित्याचा आरंभकालीन तजेलदारपणा ओसरत चालला आहे, असे दृश्य १९८८ मध्ये दिसते. बलुतं, उपरा, अक्करमाशी, आठवणींचे पक्षी, जटायू व हकीकत, आभराण, उचल्या, गबाळ वगैरे आत्मचरित्रात्मक लेखनाने दलित वेदनेचे आणि दारिद्र्याचे, बंदिस्त कडेकोट समाजपद्धतीचे, नीतिमूल्यांच्या वेगळेपणाचे आणि लैंगिक व्यवहारातील मोकळेपणाचे जे काही दर्शन घडवले ते मध्यमवर्गीय अभिरुचीच्या शिष्टसंमत चाकोरीतील संवेदनक्षमतेला धक्का देणारे होते. अंतर्मुख करणारे होते. त्याचे नावीन्य त्या वेळी आकर्षक वाटले. आज त्यापेक्षा अधिक काही हवे.

दलित कथा, दलित काव्य, यातही एकदम विजेच्या लखलखाटाप्रमाणे चमकून जावे असे आज काही समोर येत नाही. ही कोंडी फुटेल असे नवे अधिक ताकदीचे, संवेदनशक्तीची वेगळी दालने खुले करणारे प्रतिभावंत पुढे येणे आवश्यक आहे. एरव्ही दुःखदारिद्र्याची वेदना सच्ची असूनही वाङ्मयीन तोचतोपणा सर्वत्र आढळला तर त्यामुळे त्याची आच जाणवेनाशी होईल. अक्करमाशीने जे विश्व पुढे उभे केले ते जसे आकृष्ट

करणारे ठरले तसे त्याच लेखकाच्या बारामाशीतले विश्व आकृष्ट करू शकत नाही.

## पुनर्रचना खोळंबली

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची मुदत मे १९८८ अखेर संपली. त्याची पुनर्रचना करायला महाराष्ट्र शासनाला अजून वेळ मिळालेला नाही. त्यामुळे तूर्त तरी हे मंडळ अस्तित्वात नाही. नव्या पुस्तकांना छपाईसाठी अनुदान देणे, वाङ्मयीन नियतकालिकांना अनुदान देणे वगैरे गोष्टी यामुळे अडून राहिल्या आहेत. डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांच्यानंतर या मंडळाचे अध्यक्षपद कोणाला मिळते याकडे अर्थातच सर्वांचे लक्ष आहे. इच्छुकांची यादी मात्र फारच छोटी आहे, असे सांगण्यात येते.

## साहित्य परिषद

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या त्रैवार्षिक निवडणुका जूनमध्ये घेण्यात आल्या. मोठ्या चुरशीच्या निवडणुकांत राजेंद्र बनहट्टी हे १३ मतांच्या अधिक्याने कार्याध्यक्षपदी निवडून आले. म.श्री. दीक्षित कोषाध्यक्ष झाले. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या संपादकपदी शंकर सारडा यांची निवड करण्यात आली. परिषदेच्या अध्यक्षपदी प्रा. ग.प्र. प्रधान यांची कार्यकारिणीने नियुक्ती केली.

## ग्रंथजत्रेत अल्पभाग

फेब्रुवारी १९८८ मध्ये दिल्लीला आंतरराष्ट्रीय ग्रंथजत्रा भरली होती. मराठीतील मोजक्याच प्रकाशकांनी त्यात आपले स्टॉल मांडले होते. ग्रंथाली, पॉप्युलर, पुणे विद्यार्थी गृह, मराठी प्रकाशक परिषद, दास्ताने रामचंद्र आणि कं. इ. भारताच्या राजधानीत मराठीचे अस्तित्व जाणवावे इतका जोर त्यात नव्हता. मराठी लेखकही या बुकफेअरमध्ये अभावानेच दिसले. इतर भाषिक प्रकाशकांच्या स्टॉलवर गेले की मराठीतील त्यांच्या भाषेत अनुवादित झालेल्या पुस्तकांची माहिती ते स्टॉलवाले आवर्जून देत. अशा ग्रंथजत्रांचा वापर आपल्या भाषेचा प्रभाव वाढविण्यासाठी करता येतो हे आपल्या प्रकाशकांच्या व शासनाच्या ध्यानात अजून नीट आलेले नाही. त्यामुळे आपण मागे पडतो. अनेक प्रकारच्या केंद्रीय अनुदानांचा, योजनांचा लाभही आपल्याला मिळणे दुरापास्त ठरते. कारण त्या योजनांची माहितीच आपल्याला नसते. श्रीविद्या प्रकाशनच्या मधुकाका कुलकर्णींनी मात्र परदेशात मराठी पुस्तकांचे प्रकाशन समारंभ करण्याचा परिपाठ यंदाही पाळला.

## ललित : रौप्यमहोत्सव

ललितने आपले रौप्यमहोत्सवी वर्ष प्रत्येक अंक हा विशेषांक काढून डौलदारपणे साजरे केले. कथा, कादंबरीकार, नाटक, विनोदी लेखन, आत्मचरित्र अशा विविध वाङ्मयप्रकारांत गेल्या २०/२५ वर्षांतील महत्त्वपूर्ण भर घालणाऱ्या साहित्यिकांच्या

मुलाखतींवर वा लेखांवर भर देऊन सद्यःकालीन वाङ्मय विश्वाचे विहंगम दर्शन घडविण्याचा हा प्रयत्न मोठा लक्षणीय आहे.

प्रत्येक अंकाचे संपादन वेगवेगळ्या अतिथी संपादकांकडे सोपवल्याने त्यात रुचिर्भिन्नताही आली आणि प्रत्येकाने हे आपल्याला आव्हान आहे, अशा भावनेने अत्यंत कसोशीने आपले काम पूर्ण केले. जी. एं. वरील विशेषांक तर पुन्हा छापावा लागला इतका लोकप्रिय ठरला.

काही दिवाळी अंकांनी मात्र निखळ वाङ्मयीन मेजवानी दिलेली आहे. गुलमोहर, कवितेच्या प्रदेशात, साहित्यसूची, महाराष्ट्र साहित्यपत्रिका, हंस, रसिक इत्यादी नावे चटकन ध्यानात येतात. मॅजेस्टिक गप्पांचे कार्यक्रम वेगवेगळ्या शहरी झाले. ढवळे ग्रंथयात्रेची प्रदर्शनेही अनेक ठिकाणी भरली. 'रसिक साहित्य'ही वर्षात अनेक ग्रंथप्रदर्शने भरवते.

### जन्मशताब्दी

सुधारक हे पत्र गोपाळ गणेश आगरकर यांनी १५ ऑक्टोबर १८८८ रोजी सुरू केले. त्याची जन्मशताब्दी यंदा १५ ऑक्टोबरला कराड येथे मराठी पत्रकार परिषद व चौफेर या संस्थेतर्फे साजरी करण्यात आली. महाराष्ट्र शासनही या शताब्दीच्या सोहळ्यात पाच मंत्र्यांची हजेरी लावून सहभागी झाले. लोकसत्तेचे संपादक माधव गडकरी यांनी आगरकरांच्या टेंभू या जन्मगावी आगरकर स्मृतिमंदिरात निर्भयता ज्योत प्रज्वलित केली.

बालसन्मित्र या पाक्षिकाचे संपादक पारुजी नारायण मिसाळ यांचा जन्म १० एप्रिल १८८८ रोजी मालवण येथे झाला. मालवणसारख्या आडगावी राहून त्यांनी बालवाचकांसाठी बालसन्मित्र हे पाक्षिक १९३३ मध्ये सुरू केले आणि ते नावारूपाला आणले. २७ मे १९५५ रोजी वयाच्या ६७ व्या वर्षी त्यांचे देहावसान झाले. त्यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष. बालसन्मित्राने आजच्या अनेक ख्यातकीर्त लेखकांचे लहानपणचे लेखन प्रथम प्रसिद्ध केले. त्यांच्या कार्याची स्मृती जागविण्यासाठी या वर्षात तसे ठोस काम मात्र दुर्दैवाने झाले नाही.

१९८८ मध्ये काही नामवंत साहित्यिक व विचारवंत काळाच्या पडद्याआड गेले. समन्वयवादी सत्त्वशील, विचारवंत गं.बा. सरदार, लोकप्रिय कादंबरीकार चंद्रकांत काकोडकर, शेकडो बालकथा, रहस्यकथा, कादंबऱ्या लिहिणारे अशोक थोरे, आणखी एक, नारायण निकम इ. नाटकांचे कर्ते भालचंद्र सुळे, चरित्रनट गजानन जागीरदार, गीतकार वसंत निनावे, नेहरूंच्या सहवासातले लेखक पु.शं. पतके, माधव वाटवे यांचा त्यात समावेश आहे.

□

# निवडक पुस्तकांची सूची

## १९८८

### कादंबऱ्या

एकलव्य– शरद दळवी
वृत्तांत– श्री.ज.जोशी
बॉनसॉय– सुभाष भेंडे
मार्केट– ह.मो.मराठे
अलकनंदा– सुरेश द्वादशीवार
वैभवी वास्तूला काटेरी खांब– मंदाकिनी अष्टेकर
ती बाई– द.रा.जवाहिरे

पाताळयंत्री, अधिकार– अशोक थोरे
नेमानेम– स्नेहलता दसनूरकर
शुभ्रखंडाचे सम्राट– मालती देशपांडे
आनंदाचे झाड– शं.ना.नवरे
परिक्रमा– देवदत्त पाटील
टोकियो टॉवरवरून– पांढरीपांडे
मेड इन इंडिया– पुरषोत्तम बोरकर
चक्रव्यूह– व.सु.भगत
चूक माझीच आहे– राजा रजवाडे
पाण्याखाली अंधार– चिंतामणी लागू
रेशीम काटे, शलाका, कारण– सुरेश वैद्य
यमुना– आनंद हांडे

चक्रव्यूह– जनार्दन ओक
सलामी– प्रकाश कदम
अश्वमेध, मधुरा– अनिल आठल्ये
अभिसारिका, अपराजिता– शैला कामत
वारस– वैजयंती काळे

मानसहंस– वि.म.कुलकर्णी
विसरशील खास मला, क्रेझ – ना.ज.जाईल
अपराजिता– कुंभार
आवर्त– गोपाळ बेळगावकर
आधार– गोविंद केळकर
एका कोळियाने– अरुण हेबळेकर
कागदी सिंह– रमेश मंत्री
सन्मान, ताळमेळ, कृतार्थ– शैलजा राजे
खाई– उत्तम बंडू तुपे
दळी– हेमंत सावंत
नक्षत्र– रेणू देशपांडे
शिकार– सुधा मराठे
विस्मृती, देवता, दूरदूर, श्रद्धा– प्रतिभा रायकर

भेटेन पुन्हा– रघुवीर सामंत
आपलं घर– वैजयंती काळे
आशाळभूत– चांगदेव काळे
उजेडाची ओढ– स्नेहसुधा कुलकर्णी
फरारी, गजरी, चावरतिडा, सामना,
वेताळ, टिटवी– व. बा. बोधे
दैवाचे फासे, चिनार, निष्पाप बळी
–बाबा कदम
चैत्री, कमळा, वंचना– मामा साठे
बे दुणे पाच– नयनतारा देसाई
बंदिस्त– नवजीत देशमुख
मदनिका– यशवंत पाध्ये
मेघमल्हार– सुमती क्षेत्रमाडे
यज्ञ– राम शिर्के
शमा– किरण आचार्य
स्वामी महाराज– नयना आचार्य

काचघर– चारुशीला गुप्ते
डॅशिंग– सुभाष शहा
भंडारभोग– राजन गवस
शिल्पी– संजय सोनवणे
भरपाई– चंद्रकांत भोगटे
मिटल्या पापण्या– पुरुषोत्तम बावकर
वळणावर– वैजयंती काळे
वैदेही– आनंद साधले
सूडसंभ्रम– यशवंत रांजणकर
विलक्षण– सुभाष शहा
ब्लॅकमेल– शशिकांत मेहता
आंदोलन– दिनानाथ मनोहर
आकांत– सुबोध जावडेकर
गिऱ्हाण– भीमसेन देठे
ढगाळलेला चंद्रमा– सुमती श्रेत्रमाडे
ऊर्मिला– माया साठे

सूर तेच छेडता– मालती लोहार
संघर्ष– रघुवीरसिंह रजपूत
घुसमट– भीमसेन देठे
ज्वलन– शंकर इनामदार
परिमला– केशव केळकर
लावण्यवती– माधव कानिटकर
जयपराजय– जयश्री रुईकर
दिक्‌बंधन– अरुण ताम्हणकर
पराक्रम– व्यंकटेश महाजन
प्रतिबिंब– रजनी शिरोडकर
भातुकली आणि घरटे– जोशी-लिमये
युगावतार– प्र. ग. सहस्रबुद्धे
रत्नप्रभा– जयंत रानडे
शिकार– निवृत्ती मुळीक
सलामी, अश्वमेघ– अशोक व्हटकर
कालचक्र– विनायक डंके
कर्मगती– अरुण गडकरी

देहदास– देवदत्त पाटील
प्रेम– पद्माकर गोवईकर
बारामाशी– शरणकुमार लिंबाळे
बाप से बेटा– भरत पाटील
दुसरा डाव– वैजयंती काळे
कधी कधी– सुरेश वैद्य
आवर्तन– हृषिकेश परांजपे
कळासी– उत्तम बंडू तुपे
एकलीच दीपकळी– शशिकांत देशपांडे
टेरर– प्रकाश कदम
लेपर– पी. जी. कुलकर्णी
ऐसपैस– हृषिकेश परांजपे
गंध सुगंध– प्रज्ञा तपस्वी
काममात्र– गोविंद मुसळे
ओळख, राघू मैना– आशू रावजी/दिनू कानडे

नजमा कांबळे– गोरख भालेराव
बेनाम– शरच्चंद्र वाळिंबे
मेसेज– अशोक थोरे
क्षमा– प्रभाकर दिघे
रूपाली– शं.ना.पाटील
एकच स्पर्श– पद्मा कुलकर्णी
स्वरगंगेच्या काठी– सुमती गांधी
थेंब थेंब मृत्यू– संजय सोनावणे
पानिपत– विश्वास पाटील
स्वप्न संदेश– पद्मा कुलकर्णी
प्रबुद्ध– भा.द.खेर
समाधी– चिंतामणी लागू
कुंठित– सुहास शिरवळकर
गद्दार– जयंत रानडे
तीन पानी डाव– विनायक राजगुरू
शंकी– अशोक गोडबोले
महापूर– जयवंत काकडे
विस्तवाशी खेळायचंय मला– भाऊ बाविस्कर
महाराणी पद्मिनी– रघुवीर राजपूत

## कथा

मृत्यूचं थैमान–बा.सी.अष्टेकर
आम्ही पेन्शनीत निघतो
– चंद्रकला जोगळेकर
निरगाठी आणि चंद्रिके ग– गौरी देशपांडे
पाषाण– पु.भा.भावे
शल्य– रघुवीर राजपूत
विनोदी द्वादशी– वसंत सबनीस
अनिरुद्ध– मनोहर शहाणे
काळोखगर्भ– के.व्ही.सरवदे
राजधानी– नागनाथ कोत्तापल्ले
अति झालं,हसू आलं–रमेश मंत्री
ओझं– व्यंकटेश माडगूळकर
संपा.गो.मा.पवार
प्राण्यांचे जग– निरंजन घाटे
तथास्तु– हरिहर आठलेकर
हुलकावणी– रमेश मंत्री
लक्ष्मीसेतू– गो.नी.दांडेकर
प्राजक्त,पाकळ्या– प्रभा बँकर
सर्वोत्कृष्ट शन्ना– शं.ना.नवरे
आनंदाचे डोही– मंदाकिनी अष्टीकर
गाजराची पुंगी– पंढरीनाथ रेगे
पत्नी प्रेयसी प्रतिभा– अरविंद गोखले
चटक–स्नेहलता दसनूरकर
मॉस्कोच्या बुरुजावरून– पिंपळखरे
वृंदावन– शैलजा राजे
सुखदु:ख,प्रेमाची दंगल– राजा राजवाडे
सपन– सोपान हाळमकर
कॉम्प्रेड– मधुकर बडवणे
पहाट– सुखराव हिवराळे
श्रावण– योगिनी जोगळेकर
कृष्णजन्म– राजेंद्र बनहट्टी
अश्रद्ध– वसुधा पाटील
सायकेडेलिया– अनिरुद्ध बनहट्टी
प्रस्थान– ज्ञानेश्वर नाडकर्णी
अखेरचे पर्व– विजया राजाध्यक्ष
मळभ– वसंत कुलकर्णी
अवेळ– विजया वाड
कुंकवाचं देणं-घेणं– जयश्री खरोटे
देवचार– पुरुषोत्तम बावकर

पहिला पाऊस– खंडू अढांगळे
भगेल भिंत– रणसिंग
डोहकाळिमा– जी.ए.कुलकर्णी
सं.म.द.हातकणंगलेकर
दिवेलागणी– पद्मजा फाटक
हर्ष– अनंत गुरव
भोगशिळा– दसनूरकर
मावळतीची झाडे– जयश्री थत्ते

बनाटी– रमण माळवदे
सांजरात– जयवंत दळवी

काही मनातलं– विजया जहागीरदार
अनुभव– श्रीकांत कार्लेकर
मरणमाळा– केशव मेश्राम
देणगी– योगिनी जोगळेकर
मातरं– गंगाधर ठाणगे

## चरित्र-आत्मचरित्र

नाच ग घुमा– माधवी देसाई
शिवाजीराव भोसले– प्र.न.दीक्षित
मागे वळून– मथूताई आठल्ये
सांगण्याजोगे– शांताबाई गुलाबचंद
वणवा हिंद देशीचा– वि.श्री.जोशी
कॉम्रेड्स्, लाल सलाम– जयंत प्रधान
माझी शिपाईगिरी–एस.पी.पी.थोरात
माझेश्वरी– वसंत सबनीस
माणसे– अरभाट व चिल्लर
– जी.ए.कुलकर्णी
स्वरसंगम– अरविंद गजेंद्रगडकर

वडिलांच्या सेवेसी– शिरीष पै
थोर बालसन्मित्र– पां.ना.मिसाळ
– दत्तू गोरे
कल्याणी– नरुभाऊ लिमये

डायऱ्यातील टिपणे–वा.ल.कुलकर्णी
गोखले नवदर्शन– मु.गो.देशपांडे
वडवानल– वि.श्री.जोशी
तो राजहंस एक– बाळ सामंत
सर्पतज्ज्ञ रेमंड– वीणा गवाणकर
जीवनव्रती दाजीसाहेब– सतीश तराळ
एका गायकाचा ताळेबंद– देशपांडे
रामशास्त्री– चरित्र व पत्रे– सदाशिव आठवले

अशी मने असे नमुने– शिवाजी सावंत
आणि डॉ.काशिनाथ घाणेकर
– चारुशीला ओक
वालांग– श्याम चव्हाण

वऱ्हाडी मंडळी– मधुकर केचे

## काव्य

मॉस्कोतील कविता– बापूराव जगताप
औदुंबर– प्रफुल्लदत्त
स्त्रीसूक्त– अश्विनी धोंगडे
महाराष्ट्र रामायण– आनंद साधले
इंटरव्ह्यू– जगन्नाथ गवळे
स्पर्शिका– सुलभा कोरे

शुभवर्तमान– डहाळे
प्रार्थना– फ.मुं.शिंदे
अस्तित्व– सीताराम गिरप
राजघाट– अरुण शेवते
मर्डर लॅन्ड– सोनावणे
हा छंद सुटत नाही– निर्मला देशपांडे

भिल्लांची गाणी– डॉ.सुदाम जाधव
शिंग फुंकले रणी– वसंत बापट
सा-या गुलाब वाटा– गिरिबाल
शूर मर्दाचा पोवाडा– वसंत बापट
मेघहृदय– वसंत बापट
स्वस्तिका– वा.ज्यो.देशपांडे

## नाटक-एकांकिका

डॉ.हुद्दार– श्री.ना.पेंडसे
सायरन– श्याम य.जोशी
एक मेलेलं पोस्ट– मोंडकर
मामकाः पाण्डवाश्चैव– गो.पु.देशपांडे
वाटा-पळवाटा– दत्ता भगत
गडबड नगरीचा झोपाळू राजा– कुलकर्णी
विठो रखुमाय– रत्नाकर मतकरी
म्हाराज मेलो– दिलीप परदेशी
देव[illegible]ा– मनोहर बबलपोळे
गजरा चमेलीचा– लक्ष्मीपुत्र लक्ष्मण
बाटली,बाई आणि मंडळी– खरात
आणि एकदा गंमतच झाली– विजय मोंडकर
कालचक्र– जयवंत दळवी
डबल गेम– सुरेश जयराम
कारान– तुषार भद्रे
सूर्यफूल जगे अंधारी– वसंत लोंढे
पांडगो इलो रे बा इलो– प्र.ल.मयेकर
निराधार– रमाकांत पायाजी
व्यंकोजी– गणेश हिर्लेकर

## समीक्षा

अश्वत्थाची सळसळ– नाडकर्णी
जमलेली पानं– शुभदा शेळके
वाल्मीकी रामायण– लालचंद हिराचंद
स्वप्नगात्री शांता शेळके– स.ग.यादव
रायगडाला जेव्हा जाग येते– सं.वि.भा.देशपांडे
आशय आणि आविष्कार– प्रल्हाद वडेर
रसमयी– दुर्गा भागवत
मधाळलेल्या संध्याकाळी– बॅ.सुनीती पुंगलिया
समर्थ साहित्यातील आकृतिबंध– उषा जोशी
रंगनायक– राजीव नाईक
संहिता,समीक्षा आणि पारिभाषिक संज्ञा– वसंत दावतर
बॅरिस्टर-तीन रूपे– दादेगावकर
हिरव्या चादरीवर– वा.य.गाडगीळ
मराठी लावणी/निर्मिती व स्वरूप– पी.जी.गायकवाड
अब्राह्मणी साहित्यांचे सौंदर्यशास्त्र– शरद पाटील
शतपावली– भास्कर नंदनवार

साहित्यिकांच्या गमती-जमती– राठौर
रससूत्र, वाटचाल– नरहर कुरुंदकर
साहित्य-बांधिलकी आणि विद्रोह– यशवंत मनोहर
गझल : रंग आणि गंध– हिरेमठ
आणि म्हणूनच– चंद्रकांत पाटील
माध्यम समीक्षा– धारुरकर
कृष्णचंदन– धनंजय आचार्य
रसिक मित्रहो– वसंत कानेटकर
गजल दर्पण– विनय वाईकर
भाषा विज्ञान परिचय– डॉ. स. गं. मालशे
मराठी नाट्यसंगीत– बाळ सामंत
रंगयात्रा, मराठी नाटक आणि रंगभूमी– वि. भा. देशपांडे
नाट्याभिनय आणि संवाद– दिनानाथ टाकळकर
नाट्यविचार– डॉ. अनंत देशमुख
पोत आणि पदर– प्र. ई. सोनकांबळे
पूर्वेची प्रभा– राम शेवाळकर
इतिहास– सेतु माधवराव पगडी : सत्य आणि कल्पित
समर्थ रामदास-तुकडोजी– राम धांडे
श्रीकृष्ण चरित्र– डॉ. रा. चिं. ढेरे

## वैचारिक/ललित/इतर

साहित्यातून सत्याकडे– सं. प्रिया तेंडुलकर, शिरीष पै
आनंदयात्रा, निसर्गयात्रा, संसारयात्रा, अक्षरयात्रा– ग. वा. बेहेरे
सोबतचे पहिले पान (४ खंड)– ग. वा. बेहेरे
बुवाबाजी-बळी स्त्रियांचा– श्याम मानव
पाऊले चालती– रमेश सहस्त्रबुद्धे
देशाचे वाटोळे करणारी मनोवृत्ती– गजानन सूर्यवंशी
पहाट वारे– दादा धर्माधिकारी
बदलते जीवन– इंदुमती सुखात्मे
१४ पत्रे– ज. बा. कुलकर्णी
झुंबडशाहीचे बंड– सुंठणकर
तुम्ही आणि कायदा– सुप्रिया सरवटे
विज्ञानप्रणीत समाजरचना– सहस्त्रबुद्धे

सावरकरांचा बुद्धिवाद– शेषराव मोरे
संस्कार आणि कुळाचार– खाडिलकर
लोलक– पु.रा.बेहेरे
शोध भानामतीचा– श्याम मानव
रंगनायक– सं.राजीव नाईक
मुले आणि व्यंग– संभाजी घाटे
महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार– सं.सुमंत,पुंडे
भारतीय संस्कृतीचा विश्वसंचार– हेबाळकर
भारतीय स्वातंत्र्य संग्राम– लीला आवटे
स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत– ग.प्र.प्रधान
महाराष्ट्राची शोकांतिका– अरुण सारथी
माझा नाट्यलेखन/दिग्दर्शनाचा प्रवास– सं.वि.भा.देशपांडे
वास्तव आणि दृष्टिक्षेप– ठोके
हैद्राबादचा पहिला सत्याग्रह– परळीकर
ओलांडताना– लीला पाटील
चंदेरी चित्रहार– रा.ग.जाधव
रामकृष्णांचे कोडे– दुर्गा भागवत
संसेदेची सप्तपदी– मो.ग.तपस्वी
तरंग – श्याम कुरळे
पाण्याचे पंख– श्रीनिवास कुलकर्णी
सफर– मंगला साठे
साहित्य संमेलनाचे महाभारत– भीमराव कुलकर्णी
मनोविकारांचा मागोवा– श्रीकांत जोशी
आरोग्याचा अर्थ– डॉ.नाडकर्णी
घनचक्करची दुनिया– यशवंत पाध्ये
ऐलमा पैलमा– लीला पाटील
धर्म,शासन आणि समाज– नलिनी पंडित
पुनर्जन्म– एक शोध– बाळ सामंत
आंबेडकरांचे विरोधक– हेरलेकर
सांस्कृतिक संचित– वि.रा.करंदीकर
आभाळवेडी– श्रीकांत तिडवे
प्रस्तावनाकार चव्हाण– दिनकर पाटील
स्पेशल रिपोर्ट– अरुण ताम्हणकर

चौफेर (भाग १)–
चौफेर (भाग २)– } माधव गडकरी

परिक्रमा– लता राजे
भटक्याचे लग्न– उत्तम कांबळे
बाईमाणूस– सरोजा परुळकर
पोलिसातील माणूस– गजानन टाकळे
अमेरिकनांच्या अंतरंगात– कशाळीकर
आपली स्वप्ने– गुरसाळे
उमलत्या कळ्यांचे प्रश्न– विठ्ठल प्रभू
धर्म आणि राजकारण– अरुण शौरी
रुपेरी पडदा : तंत्र मंत्र– दिनकर पाटील
आजचा महाराष्ट्र– सं. बेडकीहाळ-सुराणा
अंधश्रद्धा-प्रश्नचिन्ह– दाभोळकर-आर्डे
रानवा– प्रकाश गोळे

## विनोदी / ललित / प्रवास

भाराभार गवत– भा.रा. भागवत
हास्यत्रयोदशी– वसंत मिरासदार
निसर्गशिल्प– गो.नी. दांडेकर
आरसपानी– सदा डुंबरे
मोहनचं स्टडी सर्कल– माडीवाले
अंगणातले चांदणं– रवींद्र पिंगे
पाण्याचे पंख– श्रीनिवास कुलकर्णी
दीपमाळ– विद्याधर गोखले
पुरुषराग अळूरपांडे– पु.ल. देशपांडे, अलुरकर, राजाध्यक्ष
विरंगुळा– प्रमोद नवलकर
हास्य कॉर्नर– विवेक मेहेत्रे
गद्धेपंचविशी– डॉ. आनंद नाडकर्णी
चेरी ब्लॉसम– अंजली कीर्तने
वैभवाचे दिवस– रमेश मंत्री
सोमनाथ ते साबरमती– रमेश मंत्री

□

# पूर्वप्रसिद्धी

*('साप्ताहिक सकाळ'खेरीज अन्यत्र आलेल्या लेखापुढेच वेगळा निर्देश केला आहे.)*

| | | |
|---|---|---|
| पानिपत | | ३०-९-८९ |
| झेलझपाट | | २८-३-८९ |
| वृत्तान्त | | ५-११-८८ |
| मेड इन इंडिया | | १९-३-८८ |
| एकलव्य | | ८-४-८९ |
| हर्षखेद ते मावळले | | १-४-८९ |
| अराजक | | १७-१२-८८ |
| भंडारभोग | रविवार सकाळ | २०-६-८८ |
| खानोलकर | | २९-४-८९ |
| माणसे-अरभाट आणि चिल्लर | | १२-३-८८ |
| जी. ए. : एक पोर्ट्रेट | | ३१-१२-८८ |
| हरवलेले दिवस | | १-७-८९ |
| ककची क | | ३-१२-८८ |
| नाच ग घुमा | | २७-५-८९ |
| लाव्हा | | ७-५-८८ |
| अक्षरगंधर्व | | १८-६-८८ |
| एक मार्ग अनेक वाटा | | १५-१०-८८ |
| स्वाध्याय | लोकसत्ता | ५-६-८८ |
| मागे वळून | | १७-९-८८ |
| वालांग | दै. ऐक्य, सातारा | ५-९-८८ |
| मगध | रविवार सकाळ | २४-९-८८ |

| | | |
|---|---|---|
| राजघाट | | १६-७-८८ |
| यक्षरात्र | | २३-७-८८ |
| लय | | १८-२-८९ |
| मेघहृदय | | २६-११-८८ |
| भंडी कवितेचा गोपालकाला | | ८-७-८९ |
| मॉस्कोतील कविता | | २३-४-८८ |
| वाटेवरले गाणे | गोमंतक | २४-७-८८ |
| आनंदयात्रा | | २४-९-८८ |
| आरसपानी | रविवार सकाळ | ७-५-८८ |
| विसाजीपंताची वीसकलमी बखर | | ५-३-८८ |
| संसदेची सप्तपदी | | ६-८-८८ |
| अजिंक्यतारा ते आल्प्स | | ३-९-८८ |
| मधाळलेल्या संध्याकाळी | | १३-८-८८ |
| मराठी सारस्वत खंड १ | | २०-८-८८ |
| महाराष्ट्र १९८८ | | १०-९-८८ |
| स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत | | ११-६-८८ |
| लक्षवेधक पुस्तके | | ७ व १४-१-८९ |
| साहित्यक्षेत्रातील नवलविशेष | रविवार सकाळ | १-१-८९ |

□

REFBK-0026376

**।। ग्रंथविशेष ।। शंकर सारडा ।।**

।। मराठीत दरवर्षी सुमारे १२०० पुस्तके प्रसिद्ध होतात. ।।

।। ती सर्वच्या सर्व वाचकवर्गापर्यंत सहजी पोचतातच असे नाही. ।।

।। अनेक महत्त्वपूर्ण पुस्तकेही दुर्लक्षित राहतात. ।।

।। त्याकडे जागरुक वाचकांचे लक्ष वेधण्यासाठी करावे तेवढे प्रयत्न थोडेच ।।

।। मेहता पब्लिशिंग हाऊसने त्या दृष्टीने हाती घेतलेला हा अभिनव उपक्रम. ।।

।। त्या त्या वर्षातील लक्षवेधक पुस्तकांची नोंद घेऊन, त्यापैकी काही पुस्तकांचे सम्यक् परिचय देणारी पुस्तके प्रसिद्ध करणे. ।।

।। त्या मालिकेतील हे पहिले पुस्तक : ग्रंथविशेष ।।

।। आपल्या रसाळ, अंतर्वेधक पुस्तक परीक्षणांनी चोखंदळ वाचकांना उदंड लोभ व विश्वास संपादन करणारे समीक्षक शंकर सारडा यांनी १९८८ मधील महत्त्वपूर्ण अशा ३६ पुस्तकांवर केलेली अंतर्वेधक भाष्ये या पुस्तकात संकलित करण्यात आली आहेत. ।।

।। ही शांकरभाष्ये ललित लेखासारखीच चटकदार असून पुस्तकाचा गाभा नेमका पकडतात. ।।

।। मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या नव्या दमाच्या नव्या लेखकांचा आणि निवडक पुस्तकांचा अद्ययावत मागोवा ठेवण्यासाठी 'ग्रंथविशेष' प्रत्येक चोखंदळ रसिकाच्या संग्रही असणे आवश्यकच. ।।

।। या मालिकेतील आगामी पुस्तके : 'ग्रंथ गौरव' आणि 'ग्रंथ चैतन्य' लौकरच प्रसिद्ध होत आहेत. ।।